# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

**बी. ए. भाग-१**

**सत्र १ पेपर DSC-B2**

# समाजशास्त्र परिचय

**(Introduction to Sociology)**

**सत्र २ पेपर DSC-B16**

# समाजशास्त्राची मूलतत्त्वे

**(Principles of Sociology)**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम

शैक्षणिक वर्ष २०२२-२३

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
प्रथमावृत्ती : २००७
द्वितीय आवृत्ती : २००९
तृतीय आवृत्ती : २०१०
सुधारित आवृत्ती : २०२२
बी. ए. भाग-१ समाजशास्त्र सत्र १ व २ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ५००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN- 978-81-905918-0-5

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### सल्लागार समिती

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**■ समाजशास्त्र अभ्यासमंडळ समन्वयक ■**

**प्रा. (डॉ.) जगन कराडे,**
प्राध्यापक व विभागप्रमुख, समाजशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने जून २०२२-२३ पासून बी.ए.भाग-१ समाजशास्त्र विषयाचा अभ्यासक्रम नविन शैक्षणिक धोरणानुसार सत्रपद्धतीनुसार व सुधारित स्वरूपात लागू केला आहे. त्यानुसार दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत बहिःस्थ विद्यार्थ्यांसाठी 'समाजशास्त्र' विषयाचा दोन्ही सत्राचा अभ्यासक्रम विचारात घेवून सदरच्या ग्रंथातील स्वयं अध्ययन साहित्य अनुभवी शिक्षकांकडून लेखण करून तयार करण्यात आले आहे. जून २०२२ पासून या वर्गासाठी तयार केलेल्या 'समाजशास्त्र परिचय व समाजशास्त्राची मूलतत्त्वे' या ग्रंथात विद्यार्थ्यांना समजेल, उमजेल अशा भाषेत लिखाण करण्यात आले आहे.

'समाजशास्त्र परिचय' या सत्र-१ साठीच्या अभ्यासक्रमात समाजशास्त्राचे स्वरूप, समाजशास्त्रामधील मूलभूत संकल्पना, सामाजिक संस्था, सामाजिक समूह या घटकांचा समावेश करण्यात आला आहे. सत्र-२ साठी तयार केलेल्या अभ्यासक्रमात संस्कृती, समाजीकरण, सामाजिक नियंत्रण आणि सामाजिक परिवर्तन इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे. या ग्रंथाची एकूण ८ घटकांमध्ये विभागणी करून मांडणी केली आहे. सर्व विद्यार्थी व शिक्षकांना सदरचा ग्रंथ मार्गदर्शक ठरेल, असा मला विश्वास वाटतो.

सदरहू ग्रंथाच्या लिखाणाचे काम शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर कक्षेतील विविध मान्यवर शिक्षकांनी वेळेत पूर्ण केल्याबद्दल, संपादक या नात्याने त्यांचा मी आभारी आहे. या ग्रंथाचे प्रकाशन करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल संपादक म्हणून त्यांचा मनापासून आभारी आहे.

**■ संपादक ■**

**प्रा. (डॉ.) जगन कराडे**

प्राध्यापक व विभागप्रमुख,

समाजशास्त्र अधिविभाग,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **सत्र–१ : पेपर–१** | |
| **डॉ. सर्जेराव आ. साळुंखे**<br>माजी समाजशास्त्र विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १ |
| **श्री. बबन रणजित पाटोळे**<br>दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १ |
| **डॉ. बालाजी केंद्रे**<br>समाजशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई | २ |
| **श्री. विश्वनाथ पानस्कर**<br>के. बी. पी. कॉलेज, इस्लामपूर | ३ |
| **डॉ. सरला आप्पासाहेब आरबोळे**<br>घाळी कॉलेज, गडहिंग्लज | ३ |
| **श्री. एस. एल. मोहिते**<br>यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, पाचवड | ४ |
| **सत्र–२ : पेपर–२** | |
| **श्री. जयंत घाटगे**<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महाविद्यालय, वडगांव | ४ |
| **डॉ. आनंद गाडीवड्ड**<br>देवचंद महाविद्यालय, अर्जुननगर, निपाणी | ४ |
| **डॉ. सर्जेराव आ. साळुंखे**<br>माजी समाजशास्त्र विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | २ |
| **श्री. पांडुरंग साळुंखे**<br>के. बी. पी. कॉलेज, इस्लामपूर | ३ |
| **श्री. चंद्रकांत खंडागळे**<br>श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, सांगली | ४ |

**■ संपादक ■**
**प्रा. (डॉ.) जगन कराडे**
प्राध्यापक व विभागप्रमुख, समाजशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शिर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | पेपर–१ : सत्र–१ | |
| १. | समाजशास्त्राचे स्वरूप | १ |
| २. | समाजशास्त्रीय मूलभूत संकल्पना | ५३ |
| ३. | सामाजिक संस्था | ८६ |
| ४. | सामाजिक समूह | १३९ |
| | पेपर–२ : सत्र–२ | |
| १. | संस्कृती | १६९ |
| २. | समाजीकरण | २०४ |
| ३. | सामाजिक नियंत्रण | २२९ |
| ४. | सामाजिक परिवर्तन | २५८ |

## विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्यास साहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२१-२२ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भग्रंथ व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक–१
# समाजशास्त्राचे स्वरूप
(The Nature of Sociology)

**घटक–संरचना :**


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ विषय–विवेचन

१.२.१ समाजशास्त्राचे शास्त्रीय स्वरूप आणि अभ्यासविषय

१.२.२ समाजशास्त्राचा उदय आणि विकास : रूपरेषा

१.२.३ समाजशास्त्राच्या अभ्यासाचे महत्त्व

स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

१.३ सारांश

१.४ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सरावासाठी प्रश्न

१.६ चिंतन आणि कार्य

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## १.० उद्दिष्ट्ये (Objectives) :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला समाजशास्त्राच्या :

- समाजशास्त्राची व्याख्या, समाजशास्त्रीय स्वरूप आणि अभ्यासविषय समजेल.
- समाजशास्त्राचा उदय आणि विकास याची रूपरेषा स्पष्ट करता येईल.
- समाजशास्त्राचे महत्त्व आणि उपयोग समजून घेता येईल.

## १.१ प्रस्तावना (Introduction) :

या घटकाद्वारे आपण समाजशास्त्राचा परिचय करून घेण्यास सुरुवात करणार आहोत. प्रथम आपण 'Sociology' या शब्दाची व्युत्पत्ती कशी झाली ते समजून घेऊन त्याचा अर्थ कोणता हे पाहू. त्यानंतर समाजशास्त्र या संज्ञेच्या काही व्याख्यांचा अभ्यास करू. एखाद्या संज्ञेची व्याख्या अचूक शब्दात नेमका अर्थ स्पष्ट करते. म्हणूनच आपण नामवंत समाजशास्त्रज्ञानी केलेल्या 'समाजशास्त्र' या संज्ञेच्या काही निवडक व्याख्यांचे विश्लेषण करणार आहोत. समाजशास्त्राचा नेमका अभ्यासविषय कोणता हेही आपण या घटकाद्वारे अभ्यासणार आहोत.

आज समाजशास्त्राला एक स्वतंत्र सामाजिक शास्त्र म्हणून मान्यता लाभली आहे. पण समाजशास्त्राच्या विकासाच्या प्रारंभिक काळात टीकाकार त्याला एक स्वतंत्र शास्त्र म्हणून मान्यता देण्यास नाखूष होते. या घटकात एक शास्त्र म्हणून समाजशास्त्राचे स्वरूप आपण समजून घेणार आहोत. यासाठी, प्रथम आपण 'शास्त्र' म्हणजे काय? शास्त्रीय पद्धतीतील विविध अवस्था कोणत्या? शास्त्रीय ज्ञानाची वैशिष्ट्ये कोणती? या प्रश्नांची उत्तरे माहित करून घेणार आहोत. या पार्श्वभूमीवर मग आपण समाजशास्त्राचे शास्त्रीय स्वरूप समजून घेणार आहोत.

प्रत्येक ज्ञानशाखेला स्वत:चा वैशिष्ट्यपूर्ण इतिहास असतो. एखाद्या विषयाचे व्यवस्थित आकलन करून घेण्यासाठी त्याचा इतिहास अभ्यासणे आवश्यक ठरते. समाजशास्त्रालाही स्वत:चा असा वैशिष्ट्यपूर्ण इतिहास आहे. समाजशास्त्राच्या उदय आणि विकासाच्या इतिहासाचे अध्ययन केल्यावर आपल्याला समाजशास्त्राचा उदय कोठे झाला? कधी झाला? कोणत्या परिस्थितीत झाला? प्रारंभिक अभिजात समाजशास्त्रज्ञ कोण होते? त्यांचे समाजशास्त्राच्या विकासातील नेमके योगदान कोणते? आदी प्रश्नांची उत्तरे मिळतील. या प्रश्नांच्या उत्तरांचा वेध घेण्यासाठी या घटकात आपण समाजशास्त्राच्या उदय आणि प्रारंभिक विकासाचा थोडक्यात परिचय करून घेणार आहोत.

या प्रकरणाच्या पहिल्या घटकात आपण समाजशास्त्राची व्याख्या आणि अभ्यासविषयाचे, आणि दुसऱ्या घटकात, समाजशास्त्राच्या शास्त्रीय स्वरूपाचे अध्ययन केले आहे. शास्त्रीय संशोधनाच्या आधारे सामाजिक जीवन आणि समूहाच्या संदर्भातील व्यक्तीच्या वर्तनाचे नियंत्रण करणारी तत्वे आणि नियमांची मांडणी समाजशास्त्रात केली जाते, हे आपण पहिले आहे. समाजशास्त्र हे मूलत: 'शुद्ध' (pure) शास्त्र असले तरी त्याचे काही व्यावहारिक उपयोग आहेत, याचाही उल्लेख यापूर्वीच आपण केला आहे. ज्ञान हे शक्तीशाली साधन आहे. ज्ञानाचा उपयोग करून मानवी जीवनात सुधारणा घडवून आणता येतात. समाजशास्त्रीय ज्ञानाबाबतही हे खरे आहे. समाजशास्त्रीय ज्ञानाचा विविध प्रकारे उपयोग करून घेता येतो. समाजशास्त्राचे विद्यार्थी, समाजशास्त्राचे व्यावसायिक, शासनाचे विविध विभाग, धोरणांची आखणी करणारे तज्ज्ञ, सामाजिक नियोजनकार, औद्योगिक संघटना, सामाजिक चळवळी, राजकीय नेते, प्रसारमाध्यमातील व्यावसायिक, सामाजिक कार्यकर्ते आणि सर्वसामान्य नागरीक या सर्वांना समाजशास्त्रीय ज्ञानाचा कोणत्या ना

कोणत्या प्रकारे उपयोग करून घेता येणे शक्य आहे. या घटकात आपण समाजशास्त्राचे कोणकोणते उपयोग आहेत याचा अभ्यास करणार आहोत.

## **१.२ विषय–विवेचन** (Presentation of Subejct-matter) :

प्रथम आपण समाजशास्त्र या संज्ञेचा शब्दशः अर्थ आणि या संज्ञेच्या व्याख्या पाहू.

### **१.२.१ समाजशास्त्राचे शास्त्रीय स्वरूप आणि अभ्यास विषय**

**समाजशास्त्राची व्याख्या** (Definition of Sociology) :

'Sociology' ही संज्ञा ऑगस्त कॉम्त (Auguste Comte) या फ्रेंच तत्त्वज्ञाने त्याच्या "Positive Philosophy" या ग्रंथात १८३९ साली सर्वप्रथम वापरली. प्रस्तुत विषयाचे 'Sociology' असे नामकरण करण्याचे श्रेय ऑगस्त कॉम्तकडे जाते. ऑगस्त कॉम्तला 'समाजशास्त्राचा जनक' (Father of Sociology) समजले जाते.

'Sociology' : **भाषाशास्त्रीय उगमस्थान आणि शब्दार्थ :**

'Sociology' ही संकरित संज्ञा आहे. लॅटिन भाषेतील 'Socius' आणि ग्रीक भाषेतील 'logos' किंवा 'ology' या दोन शब्दापासून 'Sociology' ही संज्ञा तयार झाली आहे. (Socius + logos = Sociology). लॅटिन भाषेतील 'Socius' म्हणजे सहचर (Companion) आणि ग्रीक भाषेतील 'logos' म्हणजे उच्च पातळीवरील अभ्यास किंवा शास्त्र. म्हणून व्युत्पत्तीशास्त्रदृष्ट्या 'Sociology' या शब्दाचा अर्थ 'मानवा–मानवातील साहचर्याचा अमूर्त पातळीवरील अभ्यास करणारे शास्त्र' असा लावता येईल.

**समाजशास्त्र : निवडक व्याख्या :**

अनेक समाजशास्त्रज्ञांनी समाजशास्त्र या संज्ञेच्या व्याख्या विविध प्रकारे केल्या आहेत. त्यामुळे अनेक व्याख्या उपलब्ध आहेत. पण सर्वांना मान्य असलेली एकच व्याख्या देता येणे मात्र शक्य नाही. म्हणूनच सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या समाजशास्त्राच्या काही निवडक व्याख्या खाली दिल्या आहेत.

१) **किंग्जले डेव्हिस – ''समाजशास्त्र हे समाजाविषयीचे सामान्य विज्ञान आहे.''** ("Sociology is a general science of society." - Kingsley Davis)

२) **लुंडबर्ग, जी.ए. – ''समाजशास्त्र हे समाजाविषयीचे शास्त्र आहे.''** ("Sociology is a science of society." - Lundburg, G. A.)

३) **ऑगबर्न आणि निमकॉफ – ''मानवाच्या सामाजिक जीवनाचा अभ्यास म्हणजे समाजशास्त्र होय.''** (Sociology is "the study of social life of man." - Ogburn and Nimkoff)

४) **हॉर्टन आणि हंट – ''मानवी सामाजिक जीवनाचा शास्त्रीय पद्धतीने केलेला अभ्यास म्हणजे समाजशास्त्र होय.''** ("Sociology is the scientific study of human social life." - Horton and Hunt)

५) **रॉस इ.ए. – ''समाजशास्त्र हे सामाजिक घटनांविषयीचे शास्त्र आहे.''** ("Sociology is the science of social phenomena." - Ross E.A.)

६) **एमिल दुरखीम – ''(सामाजिक) संस्था, त्यांची उगमस्थाने आणि त्यांचे कार्य यांच्याविषयीचे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र''** ("Sociology can be defined as the science of institutions, of their genesis and of their functioning." - Emile Durkheim)

७) **हॅरी जॉन्सन – ''समाजशास्त्र हे सामाजिक समूहांसंबंधीचे शास्त्र आहे.''** ("Sociology is the science that deals with social groups." - Harry Johnson)

८) **किंबाल यंग – ''समाजशास्त्र हे मानवाच्या समूहांमधील वर्तनाविषयीचे शास्त्र आहे.''** ("Sociology deals with the behaviour of man in groups." - Kimball Young)

९) **विनबर्ग आणि शाबट – ''समाजाच्या मूलभूत संरचनेचा अभ्यास म्हणजे समाजशास्त्र होय.''** ("Sociology is the study of the basic structure of society." - Weinberg and Shabat)

१०) **बेनेट आणि ट्यूमिन – ''समाजशास्त्र हे सामाजिक जीवनाची संरचना आणि कार्ये याविषयीचे शास्त्र आहे.''** ("Sociology is the science of the structure and functions of social life." - Bennet and Tumin)

११) **मॅक्स वेबर – ''सामाजिक क्रियांचे अर्थापनात्मक आकलन करण्याचा (किंवा अन्वयार्थ लावण्याचा) प्रयत्न करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र होय.''** ("Sociology is the science which attempts the interpretative understanding of social action." - Max Weber)

१२) **अॅलेक्स इंकेल्स – ''सामाजिक क्रिया व्यवस्थांचा आणि त्यामधील आंतरसंबंधांचा अभ्यास म्हणजे समाजशास्त्र होय.''** ("Sociology is the study of systems of social action and of their interrelations." - Alex Inkeles)

१३) **गोल्डनर आणि गोल्डनर – ''सामाजिक आंतरक्रियांचा अभ्यास ही समाजशास्त्रज्ञांच्या दृष्टीने केंद्रीय महत्त्वाची बाब आहे.''** ("The study of social interactions is central to sociologists." - Gouldner and Gouldner)

१४) **मॉरिस गिन्सबर्ग – ''व्यापक अर्थाने, मानवी आंतरक्रिया व आंतरसंबंध, त्यांची कारणे आणि परिणाम यांचा अभ्यास म्हणजे समाजशास्त्र होय''** ("In the broadest sense, sociology is the study of human interactions and interrelations, their conditions and consequences." - Morris Ginseberg)

१५) **मेरिल आणि एल्ड्रीज – ''समाजशास्त्र हे मानवी परस्परसंबंधांचा अभ्यास करणारे शास्त्र आहे.''** ("Sociology is the science of human relationships." - Merril and Eldrige)

**१६) मॅकायव्हर आणि पेज – ''समाजशास्त्र हे 'सामाजिक संबंधांचा', सामाजिक संबंधांच्या जाळ्याचा अभ्यास करणारे शास्त्र आहे, सामाजिक परस्परसंबंधांच्या जाळ्यालाच आपण समाज म्हणतो''**
("Sociology is the study of 'Social relationships', the network of relationships; the network of relationships, we call society." - MacIver and Page)

वरील व्याख्या काळजीपूर्वक अभ्यासल्या तर आपल्याला खालील बाबी ध्यानात येतील.

अ) 'अभ्यासपद्धती' आणि 'अभ्यासविषय' या दोहोंच्या संदर्भात समाजशास्त्र या संज्ञेचा अर्थ वरील सर्व व्याख्यांमधून स्पष्ट झाला आहे.

ब) 'शास्त्र', 'शास्त्रीय पद्धती' या संज्ञा समाजशास्त्र हे एक शास्त्र असल्याचे स्पष्ट करतात. समाजशास्त्रज्ञ शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करतात. ते केवळ कल्पना करीत नाहीत, मुक्त चिंतन करीत नाहीत. समाजशास्त्रज्ञ अभ्यास विषयासंबंधीच्या सर्व पूर्वकल्पना, पूर्वग्रह बाजूला ठेवतात आणि नैतिकदृष्ट्या तटस्थ राहून अभ्यास करतात.

क) समाजशास्त्राचा अभ्यासविषय किंवा अभ्यासक्षेत्र स्पष्ट करण्यासाठी वरील व्याख्यांमध्ये निरनिराळ्या शब्दांचा / संज्ञांचा वापर केला आहे. अगदी व्यापक किंवा सर्वसामान्य (general) अर्थाने समाजशास्त्राचे अभ्यासक्षेत्र स्पष्ट करताना 'समाज', 'सामाजिक जीवन', 'सामाजिक घटना' या शब्दांचा वापर वरील व्याख्यातून दिसून येतो. 'सामाजिक संस्था', 'सामाजिक समूह' आणि 'सामाजिक संरचना' या संज्ञांचा वापरही काही व्याख्यातून केला आहे. सूक्ष्म पातळीवरील समाजशास्त्राचा अभ्यासविषय म्हणून 'सामाजिक क्रिया', 'सामाजिक आंतरक्रिया' या संज्ञांचा वापरही वरील व्याख्यातून करण्यात आला आहे.

वरील व्याख्यांमधून समाजशास्त्राचा अभ्यासविषय विविध शब्दांत व्यक्त झाला असला तरी सर्व शब्दांमधून व्यक्त होणारी केंद्रीय कल्पना मात्र एकच आहे. ती म्हणजे समाजशास्त्र हे मानवी सामाजिक संबंधांचा आणि सामाजिक संबंधातून निर्माण होणाऱ्या सर्व सामाजिक तथ्यांचा अभ्यास करणारे शास्त्र आहे.

वरील सर्व व्याख्यांतून स्पष्ट होणारा अर्थ ध्यानात घेऊन समाजशास्त्र या संज्ञेची व्याख्या आपणाला खालीलप्रमाणे करता येईल.

समाजशास्त्र हे मानवी सामाजिक आंतरक्रियांचे, सामाजिक संबंधांचे आणि सामाजिक परस्परसंबंधांच्या जाळ्यातून निर्माण होणाऱ्या सर्व सामाजिक घटनांचे शास्त्र आहे.

**समाजशास्त्राचा अभ्यासविषय** (Subject-matter of Sociology) :

या विभागात आपण समाजशास्त्राचा अभ्यासविषय कोणता याची चर्चा करणार आहोत. प्रारंभी आपण, समाजशास्त्राच्या अभ्यासविषयाबाबतच्या नामवंत समाजशास्त्रज्ञांच्या मतांचा थोडक्यात आढावा घेणार आहोत. नंतर, काही ठळक अभ्यासविषयांचे थोडक्यात विवेचन करणार आहोत.

काही नामवंत समाजशास्त्रज्ञांनी समाजशास्त्राच्या अभ्यासविषयासंबंधी मांडलेली मते कोणती, हे आपण प्रथम पाहू.

**१) ऑगस्त कॉम्त** (Aguste Comte) : ऑगस्त कॉम्तने समाजशास्त्राच्या अभ्यासविषयाची खालील दोन स्थूल विभागात विभागणी केली.

अ) सामाजिक स्थितिशास्त्र (Social Statics) : सामाजिक संरचना, प्रकार्ये, सामाजिक संबंध, सामाजिक व्यवस्था तसेच सामाजिक ऐक्य आणि सामाजिक स्थैर्य यांना बळकटी प्राप्त करून देणाऱ्या घटकांचा अभ्यास सामाजिक स्थितीशास्त्रात कॉम्तला अभिप्रेत होता.

ब) सामाजिक गतिशास्त्र (Social Dynamics) : सामाजिक रूपांतरण, सामाजिक परिवर्तन, सामाजिक उत्क्रांती आणि सामाजिक विकास यांचा अभ्यास सामाजिक गतिशास्त्रात कॉम्तला अभिप्रेत होता.

**२) एमिल दुरखीम** (Emile Durkheim) **:** फ्रेंच समाजशास्त्रज्ञ एमिल दुरखीम यांनी समाजशास्त्राच्या अभ्यासविषयाची विभागणी तीन भागात केली.

अ) सोशल मॉर्फालॉजी – सामाजिक रूपे आणि संरचनांचा अभ्यास.

ब) सोशल फिजिऑलॉजी – सामाजिक प्रक्रियांचा अभ्यास.

क) सामान्य समाजशास्त्र – सामाजिक समस्यांचा अभ्यास.

**३) जॉर्ज सिम्मेल** (Georg Simmel) **:** जर्मन समाजशास्त्रज्ञ जॉर्ज सिम्मेल यांनी समाजशास्त्राची तीन अभ्यासक्षेत्रे सांगितली आहेत.

अ) सामान्य समाजशास्त्र – समाजाचा ऐतिहासिक विकास, त्यातील लयबद्धता, अवस्था, विकास-प्रबंध, वाढ आणि ऱ्हास यांचा अभ्यास.

ब) आकारिक समाजशास्त्र – सामाजिक आंतरक्रियांच्या विविध रूपांचा (उदा. सहकार्य, स्पर्धा, संघर्ष, वर्चस्व इ.) अभ्यास.

क) तात्त्विक समाजशास्त्र – सामाजिक शास्त्रांचा ज्ञानमीमांसाशास्त्रीय अभ्यास.

**४) मॅक्स वेबर** (Max Weber) : जर्मन समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबर यांनी सामाजिक क्रिया हाच समाजशास्त्राचा अभ्यासविषय असल्याचे म्हटले आहे.

**५) ॲलेक्स इंकेल्स** (Alex Inkeles) : नामवंत समाजशास्त्रज्ञांची समाजशास्त्राच्या अभ्यासविषयाबाबतची मते आणि समाजशास्त्राच्या क्रमिक पुस्तकातील आशय यांच्या आधारे ॲलेक्स इंकेल्स यांनी समाजशास्त्राचा अभ्यासविषय चार भागात विभागला आहे.

अ) समाजशास्त्रीय विश्लेषण : मानवी संस्कृती आणि समाजाचा विश्लेषणात्मक अभ्यास.

ब) सामाजिक जीवनातील प्राथमिक एकक : सामाजिक क्रिया, सामाजिक संबंध, सामाजिक समूह आणि समुदायांचा अभ्यास.

क) मूलभूत सामाजिक संस्था : कुटूंब, आप्तसंबंध व्यवस्था, अर्थसंस्था, राज्यसंस्था, कायदा, धर्म, शिक्षण, विज्ञान, करमणूक, समाजकल्याण, अभिरूची आणि अभिव्यक्तीदर्शक क्रिया यांचा अभ्यास.

ड) मूलभूत सामाजिक प्रक्रिया : सामाजिक विभेदन, सामाजिक स्तरीकरण, सहकार्य, स्पर्धा, संघर्ष, सामाजिक नियंत्रण, सामाजिक एकात्मता आणि सामाजिक परिवर्तन इ. चा अभ्यास.

एक शास्त्र या दृष्टीने समाजशास्त्र काही मूलभूत प्रश्नांची उत्तरे आणि स्पष्टीकरणे मिळविण्याचा प्रयत्न करते. समाज कसे निर्माण होतात? समाज का आणि कशा रीतीने टिकून राहतात? समाजात कोणत्या कारणांमुळे आणि कसे परिवर्तन घडून येते? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी ज्या-ज्या बाबींचा अभ्यास आवश्यक आहे, अशा सर्व बाबींचा समाजशास्त्राच्या अभ्यासविषयात अंतर्भाव होतो. समाजशास्त्र हे एक व्यापक शास्त्र असल्याने त्यात कोणत्या विशिष्ट बाबींचा अभ्यास होतो हे सांगणे अवघड आहे. सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, समाजशास्त्रज्ञ समाजांचा, त्यांच्या उत्क्रांतीचा आणि विकासाचा अभ्यास करतात, विविध समाजांमधील साम्य-भेदांचा अभ्यास करतात, समाजाच्या संरचनेचा, विविध संरचनात्मक घटकांचा (उदा. सामाजिक संस्था), त्यामधील परस्परसंबंधांचा अभ्यास करतात. समाजात एकात्मता निर्माण करून स्थैर्य प्रस्थापित करणाऱ्या घटकांचा तसेच समाजात परिवर्तन घडवून आणणाऱ्या घटकांचाही समाजशास्त्रात अभ्यास होतो. समग्र सामाजिक जीवनाचाच अभ्यास समाजशास्त्रात होतो.

समाजशास्त्राच्या अभ्यासविषयासंबंधीच्या वरील विवेचनातील प्रमुख मुद्दे विचारात घेऊन समाजशास्त्राचा अभ्यासविषय खालीलप्रमाणे थोडक्यात स्पष्ट करता येईल.

१) **सामाजिक क्रिया / सामाजिक आंतरक्रियांचा अभ्यास** (Study of Social Actions / Social Interactions) :

मानवी व्यक्ती समाजात आपले जीवन व्यतीत करते. म्हणजेच ती इतरांच्या संपर्कात राहून, इतरांशी संबंध प्रस्थापित करून आपले जीवन जगते. इतरांच्या संपर्कात आल्यामुळे समाजातील इतर व्यक्तींचा तिच्या वर्तनावर प्रभाव पडतो. व्यक्तीच्या दृष्टीने अर्थपूर्ण स्वरूपाचे, इतर व्यक्तींना अनुलक्षून केलेले, आणि इतरांमुळे प्रभावित झालेले व्यक्तीचे वर्तन म्हणजे सामाजिक क्रिया (Social Action) होय. एक व्यक्ती वा समूह दुसऱ्या व्यक्ती वा समूहाच्या संपर्कात आल्यावर त्यांच्यात घडून येणाऱ्या पारस्परिक वर्तनाला किंवा अन्योन्य परिणामाच्या क्रियेला सामाजिक आंतरक्रिया (Social Interaction) असे म्हणतात. आता, सामाजिक क्रिया वा वर्तन किंवा सामाजिक आंतरक्रिया हा समाजशास्त्रीय विश्लेषणातील सूक्ष्म (Micro) पातळीवरील अध्ययन घटक होय. सामाजिक आंतरक्रियेमुळेच समाजातील घटकांत अर्थपूर्ण सामाजिक संबंध प्रस्थापित होतात, इतर सर्व सामाजिक प्रक्रिया घडून येणे शक्य होते, एवढेच नव्हे तर सामाजिक जीवनही सामाजिक आंतरक्रियेमुळेच शक्य होते. म्हणूनच अनेक विद्वानांनी सामाजिक आंतरक्रिया, त्यांची कारणे, त्यांची विविध रूपे आणि त्यांचे परिणाम इ. चा अभ्यास समाजशास्त्रात होतो यावर भर दिला आहे.

## २) **सामाजिक संबंधांचा अभ्यास** (Study of Social Relationships) :

काही समाजशास्त्रज्ञ सामाजिक संबंध हाच समाजशास्त्राचा अभ्यासविषय आहे यावर विशेष भर देतात. मनुष्याचे इतर मनुष्यांशी असणारे संबंध हा खरोखरीच समाजशास्त्रीय अभ्यासाचा खास असा अभ्यासविषय आहे. समाजात दोन व्यक्तींत जसे परस्परसंबंध निर्माण होतात. (उदा. पति-पत्नी, गुरु-शिष्य, आणि प्रियकर-प्रेयसी या दोहोंमधील संबंध), तसेच व्यक्ती व समूह (उदा. नेता व त्याचे अनुयायी, मालक व त्याच्या कारखान्यातील मजूर, शिक्षक व त्याचा वर्ग) आणि समूहा-समूहात (उदा. दोन कुटुंबांत, दोन राजकीय पक्षांत, दोन राष्ट्रांत) देखील निर्माण झालेले असतात. दोन सामाजिक वर्गात, दोन समुदायांतही असे संबंध पाहावयास मिळतील. सामाजिक संबंध एकाच प्रकारचे नसून त्यांत विविधताही असते. ते सहकार्यावर आधारलेले असतील, स्पर्धात्मक स्वरूपाचे किंवा संघर्षप्रधानही असू शकतील, मित्रत्वाचे असतील वा शत्रुत्वाचे असतील, हे संबंध समपातळीवरील असतील किंवा श्रेष्ठ-कनिष्ठत्वाचे परिमाण लाभलेले असे असतील. समाजातील विविध घटकांत सामाजिक संबंध निर्माण होण्याची, ते स्थिर होण्याची तसेच त्यात परिवर्तन घडून येण्याची प्रक्रिया सातत्याने सुरू असते. सामाजिक संबंध हे जटिल किंवा गुंतागुंतीचे असतात. ते व्यक्ती वा समूहांच्या समाजातील स्थानांवर किंवा दर्जावर आधारलेले असतात आणि काही नियमने आणि मूल्यांद्वारा नियंत्रित झालेले असतात. असे सामाजिक संबंध म्हणजे सामाजिक वर्तनाची एक व्यवस्थाच असते. कोणत्याही समाजात असे असंख्य सामाजिक संबंध पाहावयास मिळतील. अशा सामाजिक संबंधांतूनच समाजाची निर्मिती होते. समाज हे सामाजिक संबंधांचे जाळेच असते. त्यामुळेच समाजशास्त्रात, सामाजिक संबंधाचे वा क्रिया-व्यवस्थांचे स्वरूप, प्रकार, त्यांना स्थैर्य प्राप्त करून देणारे घटक तसेच त्यातील परिवर्तनासाठी जबाबदार असणारे घटक या सर्वांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास होतो. म्हणूनच, समाजशास्त्र हे सामाजिक संबंधांचा अभ्यास करणारे शास्त्र होय.

## ३) **सामाजिक संस्थांचा अभ्यास** (Study of Social Institutions) :

सामाजिक संस्था हे मानवी सामाजिक जीवनातील आणि समग्र समाजव्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाचे घटक होत. विवाह, कुटूंब, आप्तसंबंधव्यवस्था, अर्थसंस्था, राज्यसंस्था, कायदा, धर्म, शिक्षण इ. या कोणत्याही समाजातील सामाजिक संस्था होत. या सामाजिक संस्थांची समान लक्षणे कोणती? त्या कोणती कार्ये पार पाडतात? समाजव्यवस्था टिकवून ठेवण्यात त्यांचे नेमके योगदान कोणते? विविध सामाजिक संस्थांत नेमक्या कोणत्या स्वरूपाचे परस्परसंबंध असतात? संस्था कशा निर्माण होतात? त्यात कसे परिवर्तन घडून येते? इ. प्रश्नांच्या संदर्भात सामाजिक संस्थांचा अभ्यास समाजशास्त्रात होतो आणि हा खास समाजशास्त्रीय संशोधनाचा एक महत्त्वाचा अभ्यासविषय होय.

## ४) **सामाजिक समूहांचा अभ्यास** (Study of Social Groups) :

व्यक्तींमधील परस्परसंपर्क आणि पारस्परिक आंतरक्रियांतूनच सामाजिक समूहांची निर्मिती होते. कोणत्याही समाजात विविध आकाराचे आणि विविध प्रकारचे सामाजिक समूह असतात. हे समूहदेखील प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे परस्परांशी संबंधित असे असतात. माणूस समाजात राहतो याचा अर्थ तो त्या समाजातील

कोणत्या ना कोणत्या समूहाचा सभासद म्हणून आपले जीवन जगतो. एखादी व्यक्ती अनेक समूहांची सभासद असते. कुटूंब, मित्रमंडळ, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, राजकीय पक्ष, कामगार संघटना, सैन्य-दले इ. हे विविध प्रकारचे सामाजिक समूहच आहेत. व्यक्तीच्या वर्तनावर सामाजिक समूहांचा जबरदस्त प्रभाव पडत असतो. व्यक्तीच्या वर्तनाला वळण लावण्यात आणि एक माणूस म्हणून व्यक्तीची जडण-घडण करण्यात सामाजिक समूहांची भूमिका अतिशय महत्त्वाची असते. विविध समूहांशिवाय सामाजिक जीवन संभवतच नाही. म्हणूनच सामाजिक समूहांचे स्वरूप, त्यांचे प्रकार, त्यांची कार्ये, व्यक्ती व समूह यांतील परस्परसंबंध इ. विषयांचे समाजशास्त्रात अध्ययन केले जाते.

**५) मानवी सामाजिक जीवनाचा अभ्यास** (Study of Human Social Life) :

मानवेतर प्राण्यांहून मानवी वर्तन अगदी वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. म्हणूनच मानवासारखे परिपूर्ण असे सामाजिक जीवन अन्य प्राण्यांत दिसत नाही. केवळ माणूसच संस्कृती निर्माण करतो. संस्कृती हे मानवप्राण्याचे एक अनन्यसाधारण असे वैशिष्ट्य आहे. माणूस रूढी-परंपरा निर्माण करतो. त्यांचे पालन करतो, संस्थांची निर्मिती करतो, मूल्ये निर्माण करतो, या सर्वात परिवर्तनही तो घडवून आणतो. मानवी संस्कृती रूढी-परंपरा, नियमने-मूल्ये सामाजिक संस्था, सामाजिक समस्या, सामाजिक चळवळी, सामूहिक जीवनाची वैशिष्ट्ये, इ. चा आणि विविध पदरी अशा मानवाच्या सामाजिक जीवनाचा अभ्यास समाजशास्त्रात होतो.

**६) समग्र समाजाचा अभ्यास** (Study of Society as a Whole) :

मानवी समाज परस्परसंबंधित आणि परस्परावलंबी अशा विविध घटकांनी मिळून बनलेला असतो. त्या सर्व घटकांचा स्वतंत्रपणे अभ्यास समाजशास्त्रात होतोच, पण समग्र समाज (society as a whole) हाच समाजशास्त्रीय विश्लेषणाचा एकक (unit of analysis) मानून समाजशास्त्रज्ञ समाजाचा अभ्यास करतात. समाज ही एक व्यवस्था आहे असे मानून समाजाच्या विविध अंगांचा समाजशास्त्रात साकल्याने अभ्यास होतो. मानवी समाजांची वैशिष्ट्ये कोणती? विविध समाजात कोणती समान वैशिष्ट्ये दिसून येतात? त्यातील भेदांचे स्वरूप कोणते? समाजाच्या विकासात विविध अवस्था असतात काय? मानवी समाजाबद्दलच्या अशा सर्वसाधारण स्वरूपाच्या प्रश्नांच्या संदर्भात जसे समाजशास्त्रात अध्ययन होते त्याचप्रमाणे समाजाच्या अंतर्गत संरचनेचा अभ्यास करण्यातही समाजशास्त्रज्ञांना विशेष रस असतो. ज्या संस्थांनी मिळून समाज बनतो त्यामधील परस्परसंबंध कसे असतात? समाजात अंतर्गत विभेदन कशा रीतीने अस्तित्वात येते? कोणत्याही समाजाला कोणत्या अंतर्गत समस्यांना तोंड द्यावे लागते? त्या समस्या सोडविण्याची यंत्रणा समाजात कशा रीतीने अस्तित्वात येते? समाजातील विविध कार्यांचे आणि जबाबदाऱ्यांचे वाटप समाजव्यवस्थेत कशा रीतीने करण्यात येते? समाजव्यवस्थांना स्थैर्य प्राप्त करून देणारे घटक कोणते? समाजव्यवस्थांत परिवर्तन कसे घडून येते? या आणि यासारख्या अनेक प्रश्नांचा अभ्यास समाजशास्त्रात होतो.

समाज परिवर्तनशील किंवा गतिशील असतो. त्यात सातत्याने बदल घडून येतात. समाजातील या परिवर्तनांचा किंवा बदलांचा अभ्यास समाजशास्त्रात होतो. त्यामुळे समाजशास्त्र हे शास्त्रदेखील गतिशील आहे. समाजात घडून येणाऱ्या परिवर्तनांचा अभ्यास समाजशास्त्रात होत असल्याने समाजशास्त्राच्या अभ्यासकक्षेत सातत्याने नव्या विषयांची भर पडत जाते. उदा. प्रारंभी युरोपीय देशांमध्ये औद्योगीकरण घडून आले, नागरीकरणाच्या प्रक्रियेला प्रारंभ झाला. या दोन्ही प्रक्रियांचे तेथील समाज व्यवस्थेवर परिणाम झाले. या सर्व बाबींचा अभ्यास समाजशास्त्रात प्रथम करण्यात आला. नंतर औद्योगिकीकरण नागरीकरण आणि अनुषंगिक सामाजिक परिवर्तने जगातील इतर देशातही घडून येऊ लागली. त्यामुळे इतर देशांतही या विषयांचा समाजशास्त्रात अभ्यास होऊ लागला आणि अजुनही होत आहे. त्यानंतर आधुनिकीकरणाची प्रक्रिया समाजशास्त्राचा अभ्यासविषय बनली. १९७० च्या दशकात स्त्रियांची चळवळ तसेच पर्यावरणविषयक चळवळी जगभर निर्माण झाल्या आणि स्त्रियांचे प्रश्न आणि पर्यावरणीय समस्या या विषयानी विद्वानांचे लक्ष आकर्षित करून घेतले. हे विषय देखील समाजशास्त्राचे अभ्यासविषय बनले आहेत. अगदी अलीकडच्या काळात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने वेग घेतला आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचे चांगले-वाईट परिणाम जगातील सर्वच समाजात दिसून येऊ लागले आहेत. जागतिकीकरण हाही समाजशास्त्राचा अभ्यासविषय बनला आहे. सारांश, समाज परिवर्तनशील आहे, समाजाचा अभ्यास करणारे समाजशास्त्रही गतिशील आहे; त्यात नवनव्या अभ्यासविषयांची सातत्याने भर पडत जाते.

समाज शास्त्राचे स्वरूप योग्यरीत्या समजून घेण्यासाठी समाजशास्त्रीय दृष्टिकोनाची ठळक वैशिष्ट्ये समजून घेणेही आवश्यक आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनाच्या ठळक वैशिष्ट्यांचे थोडक्यात विवेचन खाली दिले आहे.

**समाजशास्त्रीय दृष्टिकोनाची ठळक वैशिष्ट्ये** (Salient Features of Sociological Perspective):

वास्तव परिस्थितीकडे पाहण्याची विशिष्ट रीत म्हणजे दृष्टिकोन होय. समाजशास्त्राचा त्याच्या अभ्यास विषयाकडे, समाज आणि मानवी सामाजिक वर्तनाकडे पाहण्याचा विशिष्ट असा दृष्टिकोन आहे. या समाजशास्त्रीय दृष्टिकोनाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील:

१) विशिष्ट सामाजिक घटनेच्या अभ्यासात समाजशास्त्राला स्वारस्य नाही; मानवी सामूहिक जीवनात वारंवार घडून येणाऱ्या घटनांच्या किंवा वर्तन-प्रबंधांच्या अभ्यासात तसेच सामाजिक घटनांच्या अमूर्त लक्षणांच्या अभ्यासात समाजशास्त्राला विशेष स्वारस्य आहे.

२) समाज, सामाजिक संस्था आणि सामाजिक परस्परसंबंध या बाबींना संरचना असते, त्याना व्यक्तींहून निराळे आणि स्वतंत्र अस्तित्त्व असते आणि समाज त्यातील व्यक्तींच्या गोळाबेरजेपेक्षा अधिक काहीतरी असतो असा समाजशास्त्राचा या बाबींकडे पाहण्याचा दृष्टिकोन आहे.

३) समूहाच्या संदर्भात मानवी वर्तनाचा अभ्यास समाजशास्त्रात होतो. व्यक्तींच्या वर्तनाचा अभ्यास समाजशास्त्रात होतो पण तो व्यक्ती म्हणून नव्हे, तर समूहातील विविध स्थाने भूषविणाऱ्या आणि विविध भूमिका पार पाडणाऱ्या समाजाचा सदस्य असणाऱ्या व्यक्ती या दृष्टीने तो होतो.

४) 'सूक्ष्मलक्ष्यी' (Micro) तसेच 'समग्रलक्ष्यी' (Macro) अशा दोन्ही दृष्टिकोनातून सामाजिक वास्तविकतेचा अभ्यास समाजशास्त्रात होतो. सामाजिक क्रिया आणि सामाजिक आंतरक्रियांचा अभ्यास हा सूक्ष्मलक्ष्यी पातळीवरील अभ्यास तर व्यापक समाजव्यवस्था हाच एकक मानून समग्र समाजाचा केलेला अभ्यास हा समग्रलक्ष्यी अभ्यास असतो. समाजशास्त्रात सामाजिक घटनांचा अभ्यास सर्वसमावेशक (holistic) तसेच सापेक्ष (relational) अशा दोन्ही दृष्टिकोनातून होतो. समाजशास्त्रीय अभ्यासासाठी गुणात्मक (qualitative) तसेच सांख्यिकीय (quantitative) अशा दोन्ही संशोधन तंत्रांचा अवलंब केला जातो.

५) एका बाजूला, सामाजिक शक्तींद्वारा (social forces) व्यक्तींचे वर्तन कसे प्रभावित आणि आकारित होते या दृष्टीने समाजशास्त्रात व्यक्तींच्या सामाजिक वर्तनाचा अभ्यास होतो, तर दुसऱ्या बाजूला, व्यक्तीच (कर्ते) सामाजिक जीवनाची, समाज-जीवनातील विविध प्रसंगांची निर्मिती आणि पुनर्निर्मिती कशी करतात आणि त्यांनीच निर्माण केलेल्या सामाजिक जीवनाचा त्यांच्या वर्तनावर कसा प्रभाव पडतो याही दृष्टीकोनातून समाजशास्त्रात कर्त्यांच्या (Actors) वर्तनाचा अभ्यास होतो.

**समाजशास्त्र एक शास्त्र**

**'शास्त्र' या संज्ञेचा अर्थ** (Meaning of 'Science') :

**'शास्त्र' या संज्ञेच्या व्याख्या :**

**१) ग्रीन, ए. डब्ल्यू – ''संशोधनाची रीत (पद्धती) म्हणजे शास्त्र होय.''**

**२) बसंतानी के.टी. – ''शास्त्रीय पद्धतीने मिळविलेल्या घटनांच्या किंवा तथ्यांच्या ज्ञानाचे सुव्यवस्थित संघटन म्हणजे शास्त्र होय.''**

**३) पु. ल. भांडारकर – ''शास्त्र ही विश्वातील क्रिया-प्रकियांची वा घटनांची सुसंगती लावण्याचा व त्यांचे यथार्थ ज्ञान करून देण्याचा प्रयत्न करणारी एक बौद्धिक वा वैचारिक योजना असून शक्य तितक्या सुलभपणे, अचुकपणे व संपूर्णपणे अनुभवकक्षेत येणाऱ्या तथ्यांचे, ते सप्रमाण सिद्ध करता येतील अशा पद्धतीने वर्णन व संकल्पीकरण करणे हाच शास्त्राचा आशय होय.''**

**शास्त्र या संज्ञेचा अर्थ :**

इंग्रजीतील 'Science' (मराठी भाषेतील प्रतिशब्द शास्त्र किंवा विज्ञान) हा शब्द 'Scientica' या लॅटिन शब्दापासून तयार झाला आहे. लॅटिनमध्ये 'Scientica' म्हणजे ज्ञान. यावरून शास्त्र म्हणजे एका विशिष्ट स्वरुपाचे ज्ञान होय.

शास्त्राच्या वर दिलेल्या दोन व्याख्यांचे काळजीपूर्वक वाचन केल्यास असे लक्षात येते की, शास्त्राची व्याख्या करताना 'संशोधनाची रीत' किंवा 'शास्त्रीय पद्धती' या बाबीवर विशेष भर देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, बसंतानी यांच्या व्याख्येत नमूद केल्याप्रमाणे शास्त्र हे 'तथ्यांविषयीचे ज्ञान' असते आणि ते

'सुव्यवस्थितरित्या संघटित केलेले' ज्ञान असते. 'शास्त्रा'चा अर्थ समजण्यासाठी या मुद्यांचे अधिक तपशीलवार विवेचन आवश्यक आहे.

१) **शास्त्र – घटना किंवा तथ्यांविषयीचे ज्ञान** (Science : Factual Knowledge) :

प्रत्यक्ष घडणाऱ्या घटना किंवा तथ्ये (facts) हा शास्त्राचा अभ्यासविषय असल्याने तथ्यांविषयीचे ज्ञान म्हणजे शास्त्र असे म्हणता येईल. आता तथ्य म्हणजे काय? जे जे स्वतंत्रपणे अस्तित्वात आहे आणि जे जे अनुभवाच्या कक्षेत येऊ शकते असे काहीही म्हणजे तथ्य होय. घटनांचे किंवा तथ्यांचे ज्ञान निरीक्षणाने होते, म्हणून जे जे निरीक्षण करण्याजोगे आहे त्याचा अभ्यास शास्त्र करते. याचा अर्थ असा की तथ्ये कोणती असावीत यावर शास्त्राचे कोणतेही बंधन नसते. निरीक्षणक्षम अशा भौतिक (Physical), जैविक (Biological), मानसिक (Psychological), सामाजिक (Social), अथवा सांस्कृतिक (Cultural) घटना अथवा तथ्यांबाबतची शास्त्रे असू शकतात; नव्हे ती प्रत्यक्षात अस्तित्वात आली आहेत.

आपणाला ज्ञानेंद्रियांच्या सहाय्याने घटनांचे किंवा तथ्यांचे प्रत्यक्ष निरीक्षण करता येते. त्याचप्रमाणे काही शास्त्रीय उपकरणांच्या (उदा. सूक्ष्मदर्शक, दूरदर्शक इ.) मदतीनेही निरीक्षण करता येते. शास्त्रीय उपकरणांचा निरीक्षणासाठी वापर केल्याने निरीक्षणाची व्याप्ती आणि अचुकता वाढविता येते. उपकरणांच्या सहाय्याने केल्या जाणाऱ्या निरीक्षणाचाही शास्त्रीय निरीक्षणात समावेश होतो. ज्ञानेंद्रियांना स्वत:च्या बळावर किंवा उपकरणांच्या मदतीने ज्या तथ्यांचे ज्ञान होऊ शकते त्यांना 'निरीक्षित तथ्ये' (Observed facts) म्हणतात. तथ्ये निरीक्षित (Observed) तसेच अनुमानित (Inferred) अशा दोन्ही स्वरूपाची असतात. ज्या तथ्यांचे ज्ञान अनुमाने होते, त्यांना 'अनुमानित तथ्ये' (Inferred facts) म्हणतात. उदा. – पाण्याचे ज्ञान आपल्याला प्रत्यक्ष निरीक्षणाने होऊ शकते. पाण्याच्या थेंबाकडे सूक्ष्मदर्शकाच्या सहाय्याने पाहिले तर त्याचे अधिक चांगले ज्ञान होते. पण तरीही हे ज्ञान निरीक्षित तथ्यांच्या स्वरूपाचेच आहे. पण पाणी हायड्रोजन व ऑक्सिजन यांच्या संयोगाने बनते हे तथ्य निरीक्षित तसेच अनुमानित आहे. कोणत्याही शास्त्रातील नियम ही अनुमानित तथ्येच असतात. सारांश, **निरीक्षित आणि अनुमानित अशा दोन्ही प्रकारच्या तथ्यांविषयीचे ज्ञान म्हणजे शास्त्रीय ज्ञान होय.**

ज्या बाबींचे ज्ञान निरीक्षणाने मिळविता येत नाही, ज्यांचे निरीक्षण आणि मापन शक्य नसते अशा बाबींचे शास्त्र असू शकत नाही. उदा. – 'भूत', 'देव' या बाबी निरीक्षणक्षम नाहीत, मानवी कल्पना, श्रद्धा याहून निराळे स्वतंत्र आणि निरीक्षणक्षम अस्तित्व या बाबीना नाही. म्हणूनच त्यांचे शास्त्रीय अध्ययन शक्य नाही.

२) **शास्त्र : तथ्यांविषयीच्या ज्ञानाचे सुव्यवस्थित संघटन** (Science : Systematically organized factual knowledge) :

शास्त्र म्हणजे तथ्यांचे किंवा माहितीचे केवळ संकलन नव्हे. शास्त्र ही तथ्यांची एक व्यवस्था किंवा रचना आहे. शास्त्र म्हणजे तथ्यांविषयीच्या ज्ञानाचे सुसंबद्ध संघटन होय. शास्त्रातील नियम वा सामान्यीकरण म्हणजे तथ्यांचे एक प्रकारचे संघटनच असते. तथ्यांच्या निरीक्षणाच्या आधारे त्यांच्या गुणवैशिष्ट्यांच्या

आधारे कोणत्याही शास्त्रात 'संकल्पना' (Concepts) तयार केल्या जातात. आता निरीक्षित तथ्यांविषयीचे ज्ञान संकल्पनांच्या रूपाने संघटित झालेलेच ज्ञान असते. असे अनेक शास्त्रीय नियम एकमेकांशी विशिष्ट पद्धतीने जोडून त्यांची एक रचना वा व्यवस्था निर्माण करणे हेही शास्त्राचे कार्य आहे. शास्त्रातील सिद्धांत म्हणजे कमी-अधिक व्याप्तीच्या अनेक शास्त्रीय नियमांची एक व्यवस्थाच असते. अशा विविध सिद्धांतांची मिळून बनलेली ज्ञानाची व्यापक व्यवस्था निर्माण करणे हे शास्त्राचे उद्दिष्ट असते. शास्त्रीय ज्ञानाची अशी व्यवस्था (order) दोन प्रकारे करता येते. शास्त्रातील संकल्पनांच्या सहाय्याने निर्माण होणाऱ्या व्यवस्थेला समस्तर संघटन (horizontal organisation) म्हणतात, तर सिद्धांतामुळे निर्माण होणाऱ्या व्यवस्थेला स्तंभीय संघटन (vertical organisation) असे म्हणतात. सारांश, शास्त्रीय ज्ञान संघटित असते.

३) **शास्त्र : शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करून मिळविलेले ज्ञान** (Science : Knowledge collected by means of the scientific method):

शास्त्र म्हणजे विशिष्ट स्वरूपाचे ज्ञान आहे. त्याचप्रमाणे शास्त्र ही ज्ञान मिळविण्याची एक विशिष्ट स्वरूपाची पद्धतीही आहे. शास्त्रीय ज्ञान मिळविण्यासाठी जी पद्धती वापरली जाते तीच ज्ञान मिळविण्याची एकमेव पद्धती आहे असे मात्र नाही. आपल्याला अन्यही विविध मार्गानी ज्ञान उपलब्ध होत असते. सवय (Habit), अंतर्ज्ञान (Intuition) सामान्यज्ञान (Common Sense), आणि अधिकार (Authority) हेही ज्ञानाचे चार प्रमुख उगमस्रोत आहेत. पण या चार मार्गांना 'ज्ञानाचे अशास्त्रीय उगमस्रोत' (Non-scientific Sources of Knowledge) असे म्हटले जाते. याचे कारण असे की, वरील मार्गांनी मिळणारे ज्ञान काही वेळा उपयुक्त ठरत असले तरी पुष्कळदा ते अविश्वसनीय (Unreliable) आणि असत्य किंवा सबळ वस्तुनिष्ठ पुराव्याचा आधार नसलेले (Invalid) असते. या मार्गांनी मिळणाऱ्या ज्ञानाला आव्हान देऊन त्याचा खरेखोटेपणा क्वचितच तपासून पाहिला जातो.

विश्वसनीय स्वरूपाचे ज्ञान मिळविण्यासाठी शास्त्रज्ञांनी एक विशिष्ट स्वरूपाची पद्धती विकसित केली आहे. शास्त्रीय पद्धती (Scientific Method) या नावाने ही पद्धती ओळखली जाते.

शास्त्रीय पद्धतीचे महत्त्व विशद करताना कार्ल पीअर्सन(Karl Pearson) "The Grammar of Science" या आपल्या ग्रंथात म्हणतात, ''सत्याचे आकलन होण्यासाठी जवळचा रस्ता नाही... विश्वाबाबतचे ज्ञान शास्त्रीय पद्धतीच्या गवाक्षातून करून घेण्याखेरीज दुसरा पर्याय नाही... शास्त्रांच्या सर्व शाखांसाठी शास्त्रीय पद्धत एकच आहे... तथ्ये म्हणजे शास्त्र नव्हे तर तथ्यांना हाताळण्याची पद्धतच शास्त्र आहे.'' याचा अर्थ असा की कोणत्याही अभ्यासविषयाचे वा ज्ञानशाखेचे (discipline) शास्त्रीयत्व त्यात कोणत्या विषयाचा अभ्यास होतो यावर अवलंबून नसते तर कोणत्या पद्धतीने अभ्यास केला जातो यावर अवलंबून असते. म्हणूनच शास्त्रीय पद्धतीच्या सहाय्याने मिळविलेले ज्ञान म्हणजे शास्त्र अशीही शास्त्राची व्याख्या केली जाते.

थोडक्यात, शास्त्र म्हणजे काय यासंबंधीच्या वरील विवेचनावरून तीन बाबी ठळकपणे लक्षात येतात : १) शास्त्र म्हणजे तथ्यांविषयीचे ज्ञान होय, २) तथ्यांविषयीचे हे ज्ञान शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करून मिळविलेले असते. आणि ३) शास्त्रीय ज्ञान विस्कळीत नसून सुसंघटित असते.

**शास्त्रीय पद्धतीतील प्रमुख अवस्था किंवा पायऱ्या** (Major stages or steps involved in the scientific method) :

कोणत्याही ज्ञानशाखेचे शास्त्रीयत्त्व ज्ञान मिळविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धतीवर अवलंबून असते; त्या ज्ञानशाखेच्या अभ्यासविषयावर नव्हे. संशोधन करताना शास्त्रज्ञ ज्या संशोधन-रीतीचा अवलंब करतात तिला शास्त्रीय पद्धती म्हणतात. विशिष्ट समस्येविषयी संशोधन करताना जेव्हा शास्त्रीय पद्धतीचा अवलंब केला जातो तेव्हा तीत काही अवस्था अथवा पायऱ्या (Stages or Steps) असल्याचे दिसते. शास्त्रीय पद्धतीचे स्वरूप थोडे अधिक स्पष्ट व्हावे म्हणून, फारशा तपशिलात न जाता, शास्त्रीय पद्धतीतील या अवस्थांचा थोडक्यात परिचय खालीलप्रमाणे करून घेता येईल.

**१) समस्येचे सुसूत्रीकरण** (Formulation of the problem) ही संशोधनातील पहिली अवस्था होय. संशोधकाला प्रथम समस्याप्रधान परिस्थितीची जाणीव होते. त्याला एखादी संशोधनयोग्य अशी समस्या सुचते. त्याच्या निरीक्षणावरून, निरीक्षणाधारित मर्मदृष्टिमूलक अशा त्याच्या विचारशक्तीमुळे (Insightful thinking) अथवा संबंधित क्षेत्रातील त्याच्या अभ्यासावरून संशोधक-शास्त्रज्ञाला अशी समस्या सुचू शकते. आता संशोधन करता येऊ शकेल अशा रीतीने त्या समस्येची त्याला मांडणी करावी लागते किंवा तिचे सुसूत्रीकरण करावे लागते. अशी मांडणी अथवा सुसूत्रीकरण करताना शास्त्रज्ञ सुसंबद्ध असा एखादा सिद्धांत आणि त्या विशिष्ट समस्येसंबंधी आधीच झालेल्या संशोधनांच्या निष्कर्षांचे सर्वेक्षण (Review of previous research findings) आणि परीक्षणही करीत असतो. या त्याच्या अभ्यासावरून त्याला त्याने निवडलेल्या समस्येच्या विविध पैलूंबाबतचे ज्ञान होते. याच्या आधारे त्या समस्येची संभाव्य उत्तरे कोणती असू शकतील? या दिशेने शास्त्रज्ञ विचार करू लागतो. अशा विचारातून त्याला काही अभ्युपगम (Hypotheses) अगर सिद्धांतकल्पना सुचतात.

**२) अभ्युपगमांची मांडणी किंवा सुसूत्रीकरण** (Formulation of Hypotheses) ही संशोधनातील दुसरी पायरी आहे. **संशोधन समस्येचे तात्पुरते गृहीत धरलेले संभाव्य उत्तर किंवा स्पष्टीकरण म्हणून मांडण्यात आलेले विधान म्हणजे अभ्युपगम होय.** घटनांमधील कार्यकारणासंबंधाविषयीचे असे हे विधान असते. घटनांचे स्पष्टीकरण व्हावे असा हेतू त्यामागे असतो. पण हे विधान तात्पुरते गृहीत धरलेले (Tentative) संभाव्य स्पष्टीकरण असते. अभ्युपगमस्वरूपी विधानाचा खरेखोटेपणा पुढील संशोधनप्रक्रियेत तपासून पहावयाचा असतो. अभ्युपगम निर्मिती हा संशोधनातील महत्त्वपूर्ण टप्पा असतो. कारण त्यामुळेच पुढील संशोधनाला निश्चित अशी दिशा मिळत असते. पुढील संशोधनात संबंधित पुराव्याच्या आधारे असे अभ्युपगम खरे ठरण्याची जशी शक्यता असते तसे ते खोटे ठरण्याची देखील शक्यता असते. ज्यांचे प्रत्यक्ष अनुभवात प्रत्यंतरण घेता येऊ शकेल अशा स्वरूपातील अभ्युपगमांची मांडणी किंवा सुसूत्रीकरण

(Formulation of Hypotheses) ही शास्त्रीय संशोधनातील महत्त्वाची पायरी होय. अर्थात प्रत्येक संशोधनात अभ्युपगमांची मांडणी केली जातेच असे नाही. संशोधनाच्या उद्दिष्टावर हे अवलंबून असते. उदा. – घटना, वस्तू वा प्रक्रियांचा परिचय करून घेणे हेही संशोधनाचे उद्दिष्ट असू शकते. अशा संशोधनाला अन्वेषणात्मक वा परिचयात्मक (Exploratory) संशोधन म्हणतात. अशा संशोधनात प्रारंभी अभ्युपगम मांडले जातातच असे नाही. अशा संशोधनामुळे मात्र संबंधित समस्येसंबंधी भविष्यकाळातील अन्य संशोधनात तपासून पाहता येण्यासारखे काही अभ्युपगम सुचू शकतात. पण कोणतेही शास्त्रीय संशोधन सुरू करण्यासाठी संशोधकाला संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of Research) मात्र निश्चित करावीच लागतात. संशोधन प्रक्रियेतील पुढील अवस्था या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी असतात.

**३) संशोधनाचा आराखडा विकसित करणे** (Development of Research Design) : ही संशोधनप्रक्रियेतील तिसरी प्रमुख अवस्था होय. घर बांधण्यापूर्वी वास्तुशास्त्रज्ञ ज्याप्रमाणे पुढे बांधण्यात यावयाच्या घराच्या रचनेचा नकाशा तयार करतो त्याप्रमाणे संशोधकही सर्व संबंधित तपशिलासह संशोधन–आराखडा तयार करतो. मांडलेले अभ्युपगम आणि / किंवा संशोधनाची उद्दिष्टे हा आराखडा तयार करताना केंद्रस्थानी राहतात. हाती घेतलेल्या **संशोधनाच्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी, तथ्यसंकलनाच्या** (data collection) **कार्यपद्धतीसंबंधी घेण्यात आलेल्या निर्णयांचा, नमुना–निवडीच्या** (sampling) **बाबतीत घेण्यात आलेल्या निर्णयांचा व तथ्यांच्या विश्लेषणासाठी** (analysis of data) **योजण्यात येणाऱ्या कार्यपद्धती बाबतच्या निर्णयांचा अंतर्भाव करून बनविण्यात आलेली योजना म्हणजेच संशोधन–आराखडा** (research design) **होय.** थोडक्यात सांगावयाचे झाल्यास संशोधन प्रक्रियेविषयीचे पद्धतशीर नियोजन संशोधन–आराखड्याच्या रूपाने केले जाते.

**४) माहितीचे संकलन करणे** (Data collection) : ही शास्त्रीय संशोधनातील चौथी अवस्था होय. संशोधन आराखडा तयार करताना घेतलेल्या निर्णयाप्रमाणे संशोधनाच्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी आवश्यक अशी माहिती अत्यंत काळजीपूर्वक पद्धतीने शास्त्रज्ञ जमा करतो. माहितीचे संकलन करताना संशोधक वस्तुनिष्ठ पद्धतीने अशी माहिती गोळा करतो.

**५) माहितीचे वर्गीकरण आणि विश्लेषण** (Classification and Analysis of Data): ही पाचवी अवस्था होय. वर्गीकरण ही मिळविलेल्या माहितीची विशिष्ट पद्धतीने केलेली विभागणी असते. असे वर्गीकरण विविध निकषांवर आधारलेले असते. वर्गीकरणामुळे माहितीला सुसंबद्ध स्वरूप येते व गोळा केलेल्या माहितीला अर्थ प्राप्त होतो. विश्लेषणाच्या सहाय्याने माहितीत दडलेला अर्थ संशोधक उलगडून सांगतो. प्रत्यक्ष गोळा केलेली माहिती मांडलेल्या अभ्युपगमांना पाठिंबा देणारी आहे की ते चुकीचे आहेत हे निदर्शनास आणून देणारी आहे, यासंबंधीचे विश्लेषण या अवस्थेत केले जाते.

**६) संशोधनाचे निष्कर्ष मांडणे आणि अहवाल लेखन** (A Statement of conclusions and report writing) : ही संशोधनातील सहावी अवस्था होय. या अवस्थेत, मांडलेले अभ्युपगम स्विकारले वा नाकारले जातात. त्याचप्रमाणे संशोधनाचे निष्कर्ष संबंधित सिद्धांताशी अथवा आधीच्या संशोधनांच्या

निष्कर्षांशी अर्थपूर्णरित्या जोडले जातात. संशोधनाच्या निष्कर्षांमुळे एकतर आधीच्या सिद्धांताला बळकटी प्राप्त होते अथवा त्यात बदल सुचविले जाऊ शकतात. एखादे संशोधन एखाद्या नव्या सिद्धांतालाही जन्म देऊ शकते. संशोधनाचे निष्कर्ष नेमके कोणते हे सांगणे ही संशोधनातील महत्त्वपूर्ण अवस्था आहे. अर्थात संपूर्ण संशोधन प्रक्रिया पूर्ण झाल्यावर शास्त्रम आपल्या संशोधनाविषयीचा अहवाल सर्व संबंधित तपशीलासह तयार करतो. अहवाल-लेखन (Report-writing) ही संशोधन प्रक्रियेतील अंतिम अवस्था असते.

वर सांगितलेल्या शास्त्रीय पद्धतीतील अवस्था या संशोधकांना दिशादर्शक ठरतील अशा आदर्श (Ideal) अवस्था आहेत. प्रत्येक शास्त्रज्ञ प्रत्येक संशोधनात वरील सर्वच्या सर्व अवस्थांचे अगदी काटेकोर पालन करीलच असे नव्हे. पण तरीही, वरील संशोधन-रीत अनुसरण्याचा प्रयत्न मात्र प्रत्येक संशोधकाचा असतो.

तथ्यनिष्ठा किंवा अनुभवप्रामाण्य (Faithfulness to the facts), वस्तुनिष्ठता (Objectivity) आणि प्रत्यंतरण क्षमता (Verifiability) ही शास्त्रीय पद्धतीची अत्यंत महत्त्वाची वैशिष्ट्ये होत. संशोधनावर प्रतिकूल परिणाम होऊ शकेल अशा सर्व संभाव्य पूर्वकल्पना (pre-conceptions) आणि पूर्वग्रहांना जाणीवपूर्वक बाजूला ठेवून संशोधक तथ्यांविषयीची खरीखुरी माहिती मिळवीत असतो. घटना जशा आहेत त्याच स्वरूपातील, पूर्वग्रहविरहित अशा त्यासंबंधीच्या ज्ञानाला वस्तुनिष्ठ ज्ञान म्हणतात. शिवाय शास्त्रात असे ज्ञान पुन:पुन्हा तपासून पाहिले जाते. विशिष्ट निष्कर्षाप्रत येण्यासाठी जी विशिष्ट संशोधनाची रीत शास्त्रज्ञ वापरतो त्याचीही पद्धतशीर नोंद शास्त्रज्ञ ठेवीत असतो. त्यामुळे त्याच संशोधनविषयासंबंधी तीच संशोधन रीत वापरून इतर संशोधक आधीच्या निष्कर्षांचा खरेखोटेपणा पुन्हा पुन्हा तपासून पाहू शकतात. याचाच अर्थ असा की, शास्त्रीय ज्ञान प्रत्यंतरणक्षम (Verifiable) असते. शास्त्रीय पद्धतीने मिळविलेले ज्ञान म्हणूनच भक्कम पुराव्याचे पाठबळ असलेले असते. यामुळेच ते अधिक विश्वसनीयही ठरते. पण असे असूनही एकदा प्रस्थापित झालेले शास्त्रीय निष्कर्ष म्हणजे 'काळ्या दगडावरची रेघ' अथवा 'अंतिम सत्य' (Final truth) असे मात्र शास्त्रज्ञ कधीही मानीत नाहीत. जर नव्या शास्त्रीय संशोधनामुळे उजेडात आलेल्या पुराव्याने जुने शास्त्रीय नियम चुकीचे आहेत अथवा त्यात काही त्रुटी आहेत असे दिसून आले तर जुने सिद्धांत इतिहासजमा होतात वा त्यांत गरजेप्रमाणे आवश्यक ते बदल केले जातात. नवे सिद्धांतदेखील जुन्या सिद्धान्ताची जागा घेऊ शकतात. म्हणजेच शास्त्र प्रवाही असते; ती सतत चालणारी एक प्रक्रिया असून शास्त्राचे स्वरूप स्व-सुधारणात्मक (Self-corrective) असते.

**शास्त्रीय ज्ञानाची वैशिष्ट्ये** (Characteristics of Scientific Knowledge):

शास्त्रीय पद्धतीतील प्रमुख अवस्थांचे अध्ययन केल्यावर आता आपण शास्त्रीय ज्ञानाची वैशिष्ट्ये कोणती ते पाहू. शास्त्रीय ज्ञान हे शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करून मिळविलेले ज्ञान असल्याने आणि शास्त्रीय पद्धतीलाच शास्त्र समजले जात असल्याने, शास्त्रीय ज्ञानाची खाली नमूद केलेली वैशिष्ट्ये ही शास्त्रीय पद्धतीची तसेच शास्त्राचीही वैशिष्ट्ये ठरतात. शास्त्रीय ज्ञानाची/शास्त्रीय पद्धतीची/शास्त्राची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :

१) **वस्तुनिष्ठता** (Objectivity) : शास्त्रीय ज्ञान वस्तुनिष्ठ असते. म्हणजे घटना जशा आहेत त्याच स्वरूपात त्याचे निरीक्षण करून ते मिळविलेले असते. वस्तुनिष्ठ ज्ञान मिळविण्यासाठी शास्त्रज्ञाला त्याच्या सर्व पूर्वकल्पना (pre-conceptions), पूर्वग्रह (prejudices), श्रद्धा (beliefs), व्यक्तिगत मूल्ये (personal values), व्यक्तिनिष्ठ हितसंबंध आणि पंसती-नापसंती किंवा आवडी-निवडी या बाबीना जाणीवपूर्वक बाजूला ठेवून घटनांचे निरीक्षण करावे लागते.

२) **प्रत्यंतरणक्षमता** (Verifiability) : शास्त्रीय ज्ञान प्रत्यंतरणक्षम असते. म्हणजे त्याच शास्त्रज्ञाला किंवा अन्य कोणत्याही शास्त्रज्ञाला, आधीचीच संशोधन रीत वापरून एखाद्या संशोधनाच्या निष्कर्षांचे पुन:पुन्हा प्रत्यंतर किंवा पडताळणी करता येते. निष्कर्षांचा खरेखोटेपणा (किंवा अचूकता) तपासून पाहता येतो.

३) **नैतिक तटस्थता** (Ethical Neutrality) : शास्त्रीय ज्ञान नैतिकदृष्ट्या तटस्थ असते. म्हणजे संशोधन समस्येची निवड करताना, तथ्य संकलन करताना अथवा संशोधनाचे निष्कर्ष मांडताना स्वत:च्या किंवा समाजात प्रचलित असणाऱ्या चांगले-वाईटपणाबद्दलच्या कल्पना, योग्य-अयोग्य याबाबतच्या कल्पना बाजूला ठेवतो. उदा. - एखादा समाजशास्त्रज्ञ धर्माविषयी संशोधन करील, तर दुसरा एखादा 'वेश्याव्यवसाय', 'एडस्', 'बाल गुन्हेगारी' अशा एखाद्या विषयाची निवड करील व त्यासंबंधी तटस्थपणे संशोधन करून वस्तुनिष्ठ निष्कर्षांची मांडणी करेल.

४) **विश्वसनीयता** (Reliability) : शास्त्रीय ज्ञान विश्वसनीय असते. वारंवार केलेल्या निरीक्षणांवर ते आधारलेले असते.

५) **तंतोतंतपणा/नि:संदिग्धता आणि अचुकता** (Precision and Accuracy) : शास्त्रीय ज्ञान नि:संदिग्धता, तंतोतंत आणि अचूक असते. शास्त्रात काटेकोर मापनास महत्त्व असते. शास्त्रीय निष्कर्षांच्या मांडणीतही तंतोतंतपणा, नि:संदिग्धता आणि अचूकपणा यांना महत्त्व असते.

६) **अमूर्तता** (Abstractness) : शास्त्रीय ज्ञान अमूर्त असते. शास्त्रीय ज्ञानाची मांडणी संकल्पनांच्या, नियमांच्या, सामान्यीकरणांच्या आणि सिद्धांतांच्या रूपात होते. जेव्हा विशिष्ट घटनांच्या निरीक्षणाच्या आधारे सामान्य संकल्पना तयार होतात किंवा सामान्यीकरणांची प्रस्थापना होते तेव्हाच अमूर्तीकरणाच्या प्रक्रियेला प्रारंभ होतो.

७) **भविष्यकथनक्षमता** (Predictability) : शास्त्रीय ज्ञान भविष्यकथनक्षम असते. भूतकालीन आणि वर्तमानकालीन घटनांबाबतच्या निरीक्षित तथ्यांच्या आधारे शास्त्रज्ञ भविष्यकालीन स्थितीविषयीचे पूर्वकथन करतात. उदा. खगोलशास्त्रज्ञ सूर्यग्रहण, चंद्रग्रहण कधी होईल याबाबत भविष्यकथन करतात. लोकसंख्याशास्त्रज्ञ भविष्यातील लोकसंख्यावाढीच्या प्रवाहाबाबत अंदाज व्यक्त करतात.

८) **संघटित ज्ञान** (Organized Knowledge) : शास्त्रीय ज्ञान हे संघटित ज्ञान असते. विविध घटनांबाबतची सुटी सुटी (isolated) निरीक्षणे शास्त्रात केली जात असली तरी या निरीक्षणांच्या

आधारावरच संकल्पना सामान्यीकरणे, नियम आणि सिद्धांत या रूपात शास्त्रीय ज्ञानाचे संघटन झालेले असते.

**समाजशास्त्राचे शास्त्रीय स्वरुप** (Sociology as a Science) :

शास्त्र, शास्त्रीय पद्धती, शास्त्रीय ज्ञान यांचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये समजून घेतल्यानंतर या पार्श्वभूमीवर आता आपण समाजशास्त्राचे शास्त्रीय स्वरूप समजून घेणार आहोत.

आज समाजशास्त्राला एक शास्त्र म्हणून मान्यता मिळाली असली तरी समाजशास्त्राचा उदय आणि विकासाच्या प्रारंभिक काळात अनेक टीकाकार समाजशास्त्राला एक स्वतंत्र सामाजिक शास्त्र मानावयास तयार नव्हते. त्यांच्या मते, समाजशास्त्र शास्त्राच्या कसोटीस पात्र नव्हते कारण :

१) समाजशास्त्रात प्रायोगिक संशोधन पद्धतीचा अवलंब होत नाही आणि नैसर्गिक शास्त्रांतल्याप्रमाणे (उदा. पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, जीवशास्त्र इ.) समाजशास्त्राच्या प्रयोगशाळा नाहीत.

२) समाजशास्त्रीय ज्ञानात वस्तुनिष्ठता नसते.

३) समाजशास्त्रीय संशोधनात सामाजिक परिवर्त्यांचे अचूक, काटेकोर मापन होत नाही. त्यामुळे समाजशास्त्रीय ज्ञान नि:संदिग्ध आणि अचूक नसते.

४) समाजशास्त्र भविष्यकथनक्षम नाही.

समाजशास्त्राच्या शास्त्रीय स्वरूपाबाबत टीकाकारानी वरील मुद्दे उपस्थित करून आक्षेप घेतले असले तरी या आक्षेपांमध्ये फारसे तथ्य नाही. समाजशास्त्रज्ञानी वरील आक्षेपांचे खंडन केले आहे.

समाजशास्त्राच्या शास्त्रीयत्त्वाबद्दलच्या वरील आक्षेपांचे मूळ कारण म्हणजे समाजशास्त्राच्या अभ्यासविषयाचे संकीर्ण स्वरूप हे आहे. भौतिक आणि जैविक (नैसर्गिक) शास्त्रांमध्ये ज्या विषयांचा अभ्यास होतो ते विषय सापेक्षत: कमी गुंतागुंतीचे आहेत. विविध धातू, जड निर्जीव पदार्थ, विविध वनस्पती, ग्रह, तारे, भूगर्भातील खनिजे व मानवेतर प्राणी इ. विषयांचा अभ्यास विविध नैसर्गिक शास्त्रांमध्ये होतो. या बाबींवर प्रयोगशाळेत प्रयोग करणे, नियंत्रित परिस्थितीत त्यांचे निरीक्षण करणे, अभ्यासविषयातील विविध बाबींचे काटेकोर मापन करणे हे शक्य आहे. नैसर्गिक शास्त्रांमधील अभ्यास-घटकाना 'मन', 'प्रेरणा', 'भावना', 'अभिवृत्ती', 'उद्दिष्ट्ये', 'विचारप्रणाली' इ. वैशिष्ट्यांनी युक्त 'आतील बाजू' (inner side) नसते. या तुलनेत, समाजशास्त्राचा अभ्यासविषय कितीतरी अधिक गुंतागुंतीचा आहे. समूहाच्या संदर्भात मानवी वर्तनाचा अभ्यास समाजशास्त्रात होतो. मानवाला 'आतील बाजू' असते. मानवाजवळ बुद्धिमत्ता, प्रेरणा, भावना, अभिवृत्ती, मूल्ये, उद्दिष्ट्ये, हेतू, जाणीव असते. या सर्वांचा मानवी वर्तनावर प्रभाव पडतो. मानवी वर्तन प्रभावित करणाऱ्या प्रेरणा, भावना, अभिवृत्ती, मूल्ये यांचे यथातथ्य, काटेकोर, तंतोतंत मापन करणे ही गोष्ट अतिशय कठीण होते. या बाबींचा अभ्यास करण्यासाठी प्रयोग पद्धतीचा अवलंब करण्यासही मर्यादा आहेत. त्यामुळे मानवाचे सामाजिक वर्तन प्रभावित करणारे घटकच गुंतागुंतीचे असल्याने, त्यांचे मापन करणे कठीण आहे. समाजशास्त्रात प्रयोगपद्धतीचा सर्रास वापर करणे शक्य नाही.

म्हणून समाजशास्त्रात नैसर्गिक शास्त्रांसारख्या प्रयोगशाळा नाहीत. शिवाय, मानवाच्या नैसर्गिक स्वरूपातील सामूहिक जीवनाच्या अमूर्त वैशिष्ट्यांचे अध्ययन करण्यासाठी 'प्रयोगशाळा' उपयुक्तही नाहीत. (उदा. जमाव वर्तनाचे अध्ययन प्रयोगशाळेत करता येणे शक्य नाही.) समाज हीच समाजशास्त्रासाठी प्रयोगशाळा असते. अभ्यासविषयांच्या गुंतागुंतीच्या आणि सतत बदलत्या स्वरुपामुळे समाजशास्त्रीय ज्ञानात नैसर्गिक शास्त्रातल्याप्रमाणे काटेकोरपणा व अचूकताही शक्य नसते. हीच बाब वस्तुनिष्ठतेच्या बाबतीतही खरी आहे. शास्त्रज्ञ हाही समाजाचाच घटक असल्याने, समाजाच्या मूल्यांचा तसेच त्याच्या व्यक्तिगत मते, मूल्ये, अभिवृत्ती इ. चा कळत न कळत त्यांच्या संशोधन-विषयाच्या निवडीवर आणि संशोधनाच्या निष्कर्षावर थोडाफार प्रभाव पडणे शक्य असते. त्यामुळे समाजशास्त्रीय ज्ञान भौतिकशास्त्रातल्या ज्ञानाप्रमाणे शंभर टक्के वस्तुनिष्ठ असत नाही. अभ्यासविषयाच्या गुंतागुंतीमुळे समाजशास्त्राची भविष्यकथनक्षमताही नैसर्गिक शास्त्रांच्या तुलनेत कमी आहे. सारांश, समाजशास्त्राच्या अभ्यासविषयाच्या गुंतागुंतीच्या स्वरूपामुळे प्रयोग, मापन, निष्कर्षांची अचूकता व भविष्यकथनक्षमता याबाबत समाजशास्त्राला काही मर्यादा आहेत.

एक शास्त्र या दृष्टीने नैसर्गिक शास्त्रांच्या तुलनेत समाजशास्त्राला प्रयोग पद्धतीच्या वापराबाबत काही मर्यादा असल्या तरी त्यामुळे त्याच्या शास्त्रीयत्त्वाला फारशी बाधा येत नाही. कारण 'प्रयोगशालीय प्रयोग' (Laboratory experiments) ही संशोधनाची एक काटेकोर आणि अचूक पद्धती असली तरी तीच एकमेव संशोधन पद्धती मात्र नाही. समाजशास्त्रज्ञ जेथे शक्य आहे तेथे क्षेत्रीय प्रयोग पद्धतीचा (field experiments) अवलंब करतात. शिवाय निरीक्षण (observation), व्यष्टी अध्ययन (case study), सामाजिक सर्वेक्षण (social surveys) या सामाजिक संशोधनातील शास्त्रीय पद्धतींचा अवलंब समाजशास्त्रज्ञ करीत असतात. मुलाखत (interview), मुलाखत अनुसूची (interview schedule), प्रश्नावली (questionnaire) यासारख्या माहिती संकलनाच्या तंत्रांचा अवलंब करून समाजशास्त्रात तथ्यसंकलन केले जाते. सर्व शास्त्रांमध्ये वापरली जाणारी संशोधनाची रीत (Scientific procedure) समाजशास्त्रज्ञही अवलंबितात. समाजशास्त्रात शास्त्रीय संशोधन पद्धतींचा अवलंब होत असल्याने समाजशास्त्र हे शास्त्र आहे. विविध समाजशास्त्रीय परिवर्त्यांचे जास्तीत जास्त काटेकोर आणि अचूक मापन (measurement) करण्याचाही समाजशास्त्रज्ञ प्रयत्न करतात. विविध मापनपट्ट्या (Scales) समाजशास्त्रज्ञानी विकसित केल्या आहेत. (उदा. अभिवृत्ती मापन तंत्रे). विविध सांख्यिकीय तंत्रांचा (Statistical techniques) उपयोग करून समाजशास्त्रज्ञ त्यांच्या निष्कर्षात अधिकाधिक अचुकता आणि काटेकोरपणा आणण्याचाही प्रयत्न करतात. मानवी स्वभावाच्या गुंतागुंतीच्या स्वरूपामुळे समाजशास्त्रज्ञाला पूर्णपणे वस्तुनिष्ठ संशोधन करण्यास काही मर्यादा असल्या तरी त्याच विषयावर अनेक शास्त्रज्ञांनी वारंवार संशोधन करून समाजशास्त्रीय संशोधनातही वस्तुनिष्ठता आणता येते. समाजशास्त्रज्ञ जाणीवपूर्वक आपले संशोधन वस्तुनिष्ठ राहील यासाठी प्रयत्न करतात. नैसर्गिक शास्त्रांइतक्या प्रमाणातील काटेकोर भविष्यकथनक्षमता समाजशास्त्रीय संशोधनात शक्य नसली तरी शक्य असेल तिथे समाजशास्त्रज्ञही समाजातील भविष्यकालीन घडामोडींचे कल कसे राहतील याबाबत पूर्वकथनही करतात. वरील सर्व विवेचनावरून समाजशास्त्र हे शास्त्र आहे हे स्पष्ट होते. एक सामाजिक शास्त्र म्हणून समाजशास्त्राला आज

जगभर मान्यता लाभली आहे. शास्त्राची कोणती लक्षणे समाजशास्त्रात दिसून येतात? याबाबतच्या खाली दिलेल्या मुद्यांवरून एक शास्त्र म्हणून समाजशास्त्राचे स्वरूप नेमकेपणे स्पष्ट होण्यास मदत होईल.

१) **निरीक्षणक्षम असा अभ्यासविषय** (Observable Subjectmatter) : जे जे निरीक्षण करण्याजोगे आहे, जे जे अनुभवाच्या कक्षेत येते त्याचा अभ्यास शास्त्र करते. सामाजिक क्रिया वा वर्तन, सामाजिक संबंध, विविध प्रकारच्या सामाजिक घटना हा समाजशास्त्राचा अभ्यासविषय निरीक्षणक्षम/अनुभवकक्षेत येणारा, असाच आहे. मानवा-मानवातील परस्परसंबंधांची कल्पना त्यांच्या वर्तनावरून येते. म्हणून प्रत्यक्ष घडणाऱ्या मानवी वर्तनाचे, सामाजिक घटनांचे निरीक्षण करून त्यावर आधारित असे सामाजिक संबंधाविषयीचे सामान्य नियम समाजशास्त्रज्ञ प्रतिपादन करतात. समाजशास्त्रीय ज्ञान अनुभवसिद्ध पुराव्यावर अवलंबून असते. म्हणूनच समाजशास्त्र हे अनुभवनिष्ठ (empirical) शास्त्र आहे.

२) **शास्त्रीय संशोधन पद्धतीचा अवलंब** (Use of Scientific Method) : कोणत्याही अभ्यासविषयाचे किंवा ज्ञानशाखेचे (discipline) शास्त्रीयत्व त्यात कोणत्या विषयाचा अभ्यास होतो यावर अवलंबून नसते, तर अभ्यासासाठी कोणती पद्धत वापरली जाते यावर अवलंबून असते. समाजशास्त्राने आपल्या अभ्यासविषयाच्या अध्ययनासाठी शास्त्रीय पद्धतीचाच अंगिकार केलेला आहे. म्हणून समाजशास्त्रज्ञ आपल्या अध्ययनकक्षेतील विविध विषयांचा अभ्यास करताना शास्त्रीय संशोधन रीतीचा अवलंब करीत असल्यामुळेच समाजशास्त्र हे शास्त्र आहे.

३) **समाजाबद्दलचे सुव्यवस्थित किंवा संघटित ज्ञान** (Organised Knowledge about Society): शास्त्र म्हणजे घडणाऱ्या घटनांबद्दलच्या माहितीचे केवळ संकलन नव्हे. शास्त्र ही तथ्यांची एक व्यवस्था किंवा रचना असते. शास्त्र म्हणजे तथ्यांबद्दलच्या ज्ञानाचे सुसंबद्ध संघटन होय. या दृष्टीने समाजशास्त्राकडे पाहिल्यास असे दिसून येईल की, सामाजिक संबंधाविषयीचे, समग्र समाजाविषयीचे जे ज्ञान समाजशास्त्रज्ञ मिळवितात ते विस्कळित नसून सुसंघटित स्वरूपातच त्याची मांडणी केलेली असते.

सामाजिक संरचना, समाजव्यवस्था, सामाजिक स्तरीकरण, सामाजिक परिवर्तन, समाजीकरण, सामाजिक नियंत्रण इ. समाजशास्त्रातील संकल्पना म्हणजे ज्ञानाचे एक प्रकारचे संघटनच आहे. त्याचप्रमाणे समाजशास्त्रात विविध सिद्धांत देखील मांडलेले आहेत. सिद्धांत म्हणजे संघटित स्वरूपातीलच ज्ञान असते. सारांश, समाजशास्त्रीय ज्ञान संघटित किंवा सुव्यवस्थित (organized or systematized) असल्याने समाजशास्त्र हे शास्त्र आहे.

४) **समाजशास्त्रीय ज्ञान प्रत्यंतरणक्षम असते** (Sociological Knowledge is Verifiable) : कोणत्याही शास्त्रात एकदा प्रतिपादन केलेले नियम अगर सिद्धांत अंतिम सत्य म्हणून स्वीकारले जात नाहीत. समाजशास्त्रीय ज्ञान प्रत्यंतरणक्षम आहे. वारंवार संशोधन करून आधीच्या निष्कर्षांचा खरेखोटेपणा तपासून पाहता येतो. नव्या पुराव्याच्या उजेडात आधी मांडलेले सिद्धांत पुन्हा पुन्हा तपासून पहाण्याची प्रक्रिया सातत्याने सुरूच असते. संशोधनातून सातत्याने उजेडात येणाऱ्या नव्या माहितीच्या उजेडात जुने नियम किंवा

सिद्धांत वारंवार तपासून पाहिल्यामुळे शास्त्रात प्रमाणित ज्ञानाचा अविरत संचय होत असतो. समाजशास्त्रात देखील प्रस्थापित सिद्धांताचे वा सामाजिक घटनांबाबतच्या नियमांचे असे वारंवार परीक्षण केले जाण्याची प्रक्रिया सुरू असल्याने त्यात प्रमाणित स्वरूपाच्या संचित (Cumulative) ज्ञानाचा अविरत ओघ सुरू असतो. एक शास्त्र म्हणून समाजशास्त्राचे हे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होय.

५) **नैतिक तटस्थता** (Ethical Neutrality) : अध्ययन-विषयाबाबतची नैतिक तटस्थता हा सर्वच शास्त्रांचा समान असा गुणधर्म आहे. समाजशास्त्रही नैतिक प्रश्नांवर कोणताच पक्ष घेत नाही. एखादी गोष्ट नैतिकदृष्ट्या योग्य वा अयोग्य आहे याविषयीचा अभिप्राय देणे समाजशास्त्रज्ञ वर्ज्य मानतात. भ्रष्टाचार, वेश्यावृत्ती, गुन्हेगारी यासारख्या विषयांचा तटस्थ आणि वस्तुनिष्ठ दृष्टिकोणातून अभ्यास करून त्यांचे स्पष्टीकरण करण्यावर समाजशास्त्रज्ञ भर देतात.

६) **समाजशास्त्र काही प्रमाणात भविष्यकथनक्षम आहे** (Sociology can make predictions to some extent) : भूतकालीन घटनांचे पुनर्विलोकन आणि समकालीन सामाजिक घटनांची निरीक्षणे यांच्या आधारावर सामाजिक घटनांचे भविष्यकालीन कल (trends) कसे असतील याविषयीचे भाकित समाजशास्त्रात केले जाते. उदा. सामाजिक लोकसंख्याशास्त्रज्ञ लोकसंख्येतील वाढ आणि संरचना याबाबत भविष्यकथन करतात.

७) **समाजशास्त्र हे सापेक्षतः अमूर्त शास्त्र आहे** (Sociology is relatively abstract science): एखाद्या विशिष्ट मूर्त सामाजिक घटनेच्या अभ्यासात समाजशास्त्राला रस नाही. उदा. कुटूंब, विवाह, सामाजिक समूह हे समाजशास्त्राच्या अध्ययन क्षेत्रातील काही घटक आहेत. याचा अर्थ एखाद्या विशिष्ट कुटुंबाच्या, विवाहाच्या अथवा समूहाच्या अभ्यासात समाजशास्त्रज्ञाना रस नसतो तर कुटूंब, विवाह, समूह आदींच्या अमूर्त लक्षणांच्या अभ्यासात समाजशास्त्रज्ञाना रस असतो.

८) **समाजशास्त्र मूलतः 'शुद्ध' शास्त्र आहे** (Sociology is basically a pure science) : 'शुद्ध' आणि 'व्यावहारिक' शास्त्र अशी शास्त्रांची विभागणी केली जाते. ज्ञान संपादन करणे हे शुद्ध शास्त्राचे मुख्य उद्दिष्ट असते. उपलब्ध ज्ञानाचा व्यक्ती आणि समाजाच्या फायद्यासाठी उपयोग करणे हे व्यावहारिक शास्त्राचे मुख्य उद्दिष्ट असते. या दृष्टीने विचार केल्यास, समाजशास्त्र हे मूलत: 'शुद्ध' शास्त्र आहे. मानवी समाजांबद्दलचे ज्ञान संपादन करणे हे समाजशास्त्राचे मुख्य उद्दिष्ट आहे. पण समाजशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग होत नाही असा मात्र याचा अर्थ नाही. सामाजिक जीवन समजून घेण्यासाठी, सामाजिक धोरणे ठरविण्यासाठी, सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी इ. विविध प्रकारे समाजशास्त्रीय ज्ञानाचा व्यावहारिक उपयोग केला जातो. या प्रकरणातील शेवटच्या घटकात आपण समाजशास्त्राचे उपयोग अभ्यासणार आहोत. तेव्हा समाजशास्त्रीय ज्ञान कसे उपयुक्त आहे हे आणखी स्पष्ट होईल.

९) **समाजशास्त्र हे नियमनात्मक वा आदर्शवादी** (Normative) **विज्ञान नाही :** 'काय आहे' (what is) हे जाणून घेण्यावर समाजशास्त्राचा भर असतो, 'काय असावे' (what ought to be) या विषयी समाजशास्त्र मतप्रदर्शन करीत नाही. समाजातील व्यक्ती अगर समूह परस्परांशी कसे वागतात? सामाजिक

संबंधांचे वा घटनांचे स्वरूप काय आहे याचा वस्तुनिष्ठ (objective) दृष्टिकोणातून ऊहापोह समाजशास्त्रात केला जात असल्याने ते एक वास्तविक विज्ञान (positive science) आहे. माणसांनी वा मानवी समूहांनी परस्परांशी कसे वागावे याविषयीचे आदेश समाजशास्त्रात दिले जात नाहीत. म्हणूनच नीतिशास्त्र, सौंदर्यशास्त्र यासारखे नियमनात्मक किंवा आदर्शवादी (Normative) असे समाजशास्त्राचे स्वरूप नाही ही देखील ध्यानात ठेवण्यासारखी बाब आहे. अलीकडच्या काळात समाजातील दुर्बल, शोषितांची बाजू घेऊन त्यांना न्याय मिळावा अशी भूमिका घेऊन समाजशास्त्रीय लिखाण करणारे समाजशास्त्रज्ञही पहावयास मिळतात.

**१०) समाजशास्त्र हे एक सामाजिक शास्त्र आहे** (Sociology is a Social Science) : अनुभवनिष्ठ शास्त्रांचे 'नैसर्गिक शास्त्रे' (Natural Sciences) आणि 'सामाजिक शास्त्रे' (Social Sciences) असे स्थूल वर्गीकरण केले जाते. हे वर्गीकरण या शास्त्रांच्या अभ्यासविषयावर आधारलेले आहे. भौतिक तसेच जैविक स्वरुपाच्या नैसर्गिक घटनांचा अभ्यास नैसर्गिक शास्त्रांमध्ये होतो. पदार्थविज्ञान (किंवा भौतिकशास्त्र), रसायनशास्त्र, जीवशास्त्र, भूगर्भशास्त्र, खगोलशास्त्र इत्यादी ही नैसर्गिक शास्त्रे आहेत. समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, मानवशास्त्र, मानसशास्त्र इ. ही सामाजिक शास्त्रे आहेत.

व्यापक अर्थाने 'समाजातील माणूस' हा सामाजिक शास्त्रांच्या अध्ययनाचा केंद्रवर्ती विषय आहे. 'माणसाचे समाजातील वर्तन' अभ्यासणे हे सर्वच सामाजिक शास्त्रांचे उद्दिष्ट आहे. विविध सामाजिक शास्त्रे मानवी वर्तनाच्या विविध पैलूंचा त्यांच्या विशिष्ट परिप्रेक्ष्यातून आणि विशिष्ट अभ्यासतंत्रे वापरून अभ्यास करतात. उदा. *अर्थशास्त्रात* (Economics) विविध वस्तू, सेवा, संपत्ती यांची निर्मिती कशी होते, त्यांचे वितरण आणि उपभोग इत्यादींचा अभ्यास होतो. *राज्यशास्त्रात* (Political Science) सत्ता, शासन, राजकीय पक्ष, राजकारण आणि विविध राजकीय प्रक्रियांचा अभ्यास केला जातो. *मानवशास्त्रात* (Authropology) मानवाची सामाजिक, सांस्कृतिक, जैविक, शारीरिक वैशिष्ट्ये, मानवी प्रगती आणि विकास यांचा तौलनिक स्वरुपात अभ्यास होतो. *इतिहास* (History) मानवी समाज, संस्कृती आणि सभ्यतांचा, त्यातील ऐतिहासिक घटनांचा अभ्यास होतो. *मानसशास्त्रात* (Psychology) मानवी वर्तनाचा आणि माणसाच्या व्यक्तिमत्त्व वैशिष्ट्यांचा अभ्यास होतो. *समाज कार्य* (Social work) हे मूलत: व्यावहारिक शास्त्र (Applied Science) असून त्यात सामाजिक शास्त्रांतील ज्ञानाचा व्यक्तिगत आणि सामाजिक समस्या सोडविण्यासाठी वापर करण्यावर भर असतो.

प्रत्येक सामाजिक शास्त्राचा विशिष्ट असा अभ्यासविषय असला तरी विविध सामाजिक शास्त्रांच्या सीमारेषा काटेकोरपणे वेगळ्या करता येत नाहीत. अनेक विषय असे आहेत की ज्यांचा अभ्यास सर्वच सामाजिक शास्त्रांमध्ये केला जातो (उदा. संस्कृती). म्हणजे, सामाजिक शास्त्रांच्या सीमारेषा पुसट आहेत त्यामुळे विविध सामाजिक शास्त्रांत आदान-प्रदान किंवा देवाण-घेवाण चालते. शिवाय, सामाजिक घटनांचा सर्वांगीण अभ्यास कोणत्याही एका सामाजिक शास्त्राला करता येणे शक्य नाही. त्यामुळेच अलीकडच्या काळात काही विषयांवरील संशोधनाबाबत विविध सामाजिक शास्त्रांमध्ये आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन (Interdisciplinary Approach) अवलंबिण्यात येतो.

एक सामाजिक शास्त्र म्हणून समाजशास्त्राचा विचार करताना एक महत्त्वाची बाब लक्षात घेणे जरूरीचे आहे. ती म्हणजे विविध सामाजिक शास्त्रे सामाजिक जीवनाच्या विवक्षित किंवा विशिष्ट पैलूंवर लक्ष केंद्रित करतात. पण समाजशास्त्राचे मात्र तसे नाही. समाजशास्त्रात मानवी सामाजिक जीवनाच्या सामूहिक वैशिष्ट्यांचा, समग्र सामाजिक जीवनाचा समाज हाच एकक मानून अभ्यास होतो. त्यात समाज जीवनाच्या कोणत्यातरी एकाच पैलूचा अभ्यास होत नाही. त्यामुळेच समाजशास्त्र हे सामान्य (general), साररूप (synoptic) सामाजिक शास्त्र आहे.

### १.२.२ समाजशास्त्राचा उदय आणि विकास : रूपरेषा

**सामाजिक विचारांचा थोडक्यात इतिहास आणि समाजशास्त्राचा प्रारंभ :**

समाजशास्त्राला फार मोठा भूतकाळ आहे पण अल्पसा इतिहास लाभला आहे असे म्हटले जाते. त्याचे कारण असे की, समाजासंबंधीचे मानवाचे विचार समाजाइतकेच जुने आहेत, पण समाजासंबंधीचे शास्त्रीय विचार मात्र अलीकडच्या काळातीलच आहेत.

सर्व प्राचीन सभ्यतांमध्ये (civilizations) सामाजिक विचार दिसून येतात. अनेक नामवंत विचारवंतांनी त्यांच्या ग्रंथातून आदर्श समाजाबद्दलचे आपले विचार मांडले आहेत. समाजाविषयीच्या किंवा सामाजिक जीवनाबद्दलच्या अशा विचारांचा आणि त्यांच्या वैशिष्ट्यांचा थोडक्यात आढावा आता आपण घेऊ.

प्राचीन काळातील प्लेटो, ॲरिस्टॉटल, मनू, कौटिल्य, कॉन्फ्युशियस, सिरेरो या आणि अशा नामवंत तत्त्वज्ञांच्या लिखाणातून सामाजिक विचार मांडलेले दिसून येतात. त्यांनी समाजाचे स्वरूप आणि संघटन, अर्थव्यवस्था, कायदे, नियम, धर्म, नीतीशास्त्र, तत्त्वज्ञान अशा विषयांवर आपापली मते मांडली आहेत. समाजाबद्दल आणि समाजातील विविध संस्थांबद्दलचे हे विचार असल्याने ते सामाजिक विचार ठरतात. प्लेटोचा 'रिपब्लिक', ॲरिस्टॉटलचे 'एथिक्स' आणि 'पॉलिटिक्स', कौटिल्याचा 'अर्थशास्त्र', 'मनुस्मृती', कॉन्फ्युशियसचा 'ॲनोलेक्टस्', सिसेरोचा 'ऑन जस्टिस' इ. या ग्रंथांचा सामाजिक विचारांचे प्राचीन उगमस्त्रोत म्हणून उल्लेख करता येईल. या ग्रंथांमधील विचार समाज, कायदा, अर्थव्यवस्था, नीतीशास्त्र, राज्यसंस्था, न्यायव्यवस्था आदी विषयांवरील असले तरी त्यांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातून आदर्श समाजव्यवस्थेबद्दलचे (ideal social order) चित्रण आढळून येते. त्यांचे स्वरूप सामाजिक असले तरी त्या विचाराना आजच्या अर्थाने 'शास्त्रीय' बैठक मात्र नव्हती.

मध्ययुगीन कालखंडातील सामाजिक विचार प्रामुख्याने धार्मिक स्वरूपाचे विचार होते. चर्च किंवा धार्मिक तत्त्वज्ञानाचा प्रचंड प्रभाव मध्ययुगीन कालखंडातील विचारांवर पडला होता. या विचारांचे वैशिष्ट्य म्हणजे ते आध्यात्मिक स्वरूपाचे स्वैर चिंतन किंवा तत्त्वज्ञान होते.

सोळाव्या शतकानंतरच्या कालखंडातील विचारवंतांचे सामाजिक विचार अधिक प्रगल्भ आणि सुव्यवस्थित रीतीने मांडलेले दिसून येतात. Machiavelli यांचा "The Prince", Thomas Hobbs यांचा "Leviathan", Rousseau यांचा "Social Contract", Adam Smith यांचा "Wealth of

Nations", Condorcet यांचा "Historical Sketch of the Progress of Human Mind" इ. ही विचारवंतांची आणि त्यांच्या ग्रंथांची अशी काही उदाहरणे आहेत की ज्यांमधून समाज, अर्थव्यवस्था, राजव्यवस्था आणि एकंदर समाजजीवन याविषयीचे सूत्रबद्ध आणि अत्यंत सुव्यवस्थित विचार मांडलेले दिसून येतात. याशिवाय, Sir Thomas More यांचा *"Utopia"*, Thomas Campanella यांचा *"City of the Sun"*, Sir Francis Bacon यांचा *"New Atlantis"*, H. G. Wells यांचा *"A Modern Utopia"* इ. या ग्रंथांमधून त्या त्या विचारवंतानी सर्व वैगुण्यांपासून मुक्त अशा आदर्श समाजाबद्दलचे विचार व्यक्त केलेले आढळतात. वर उल्लेख केलेल्या या विचारांची दोन प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे हे विचार प्रामुख्याने तात्विक (Philosophical) आणि आदर्शवादी (Idealistic) स्वरुपाचे होते. असे असूनदेखील पुढील काळात समाजशास्त्राच्या उदय आणि विकासावर अशा विचारांचा प्रभाव पडल्याचे विद्वानांनी निदर्शनास आणले आहे.

ज्यांचे लिखाण समाजाविषयीचे सुव्यवस्थित आकलन करून घेण्यासाठी अधिक समर्पक होते अशा दोन विद्वानांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. पहिला विचारवंत म्हणजे इटलीमधील विको (Vico). फ्रान्सिस बेकनच्या विचारांचा विकोवर प्रभाव होता. विकोच्या मते, नैसर्गिक घटनांच्या अभ्यासासाठी बेकनने ज्या शास्त्रीय अभ्यास पद्धतीचा पुरस्कार केला तीच पद्धती वापरून मानवी समाजाचा आणि इतिहासाचा अभ्यास करणे शक्य आहे. विकोने त्याच्या *"The New Science"* या ग्रंथात असे म्हटले आहे की, समाजाला निश्चित असे नियम लागू आहेत, तसेच वस्तुनिष्ठ निरीक्षण आणि पद्धतशीर अभ्यासाच्या सहाय्याने त्यांचा अभ्यास करता येणे शक्य आहे. त्याने असेही म्हटले आहे की, ज्याप्रमाणे नैसर्गिक जगात व्यवस्था, नियमितता आणि कार्यकारण संबंध या बाबी दिसून येतात, त्याप्रमाणेच सामाजिक जीवनातही या बाबींचे अस्तित्व आहे. असे प्रगत विचार विकोने व्यक्त केले असले तरीही मनाने मात्र तो मध्ययुगीन कालखंडातील धार्मिक दृष्टिकोनाचा पुरस्कार करणाराच विचारवंत होता. प्रगती आणि मुक्ती या बाबी परमेश्वरी कृपेवरच अवलंबून आहेत अशी त्याची श्रद्धा होती. इटली देशाबाहेर विकोला त्या काळात फारसे कोणी ओळखत नव्हते.

दुसरा महत्त्वाचा विचारवंत माँटेस्क्यू (Montesquieu) हा होय. आधुनिक काळात समाज आणि इतिहास याबाबतचे एक तत्त्वज्ञान मांडणारा तो विचारवंत होता. त्याने *"The Spirit of Laws"* हा सुप्रसिद्ध ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्याने सामाजिक जीवनातील नियमितता आणि सामाजिक आणि ऐतिहासिक विकासाच्या नियमांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. त्याचे पद्धतीशास्त्रीय विचारही मोलाचे होते. त्याच्या मते घटना किंवा तथ्यांचे निरीक्षण केवळ त्या घटना समजून घेण्यापुरतेच करता कामा नये तर त्या घटना ज्या नियमानी बद्ध आहेत त्यांचा शोध घेण्यासाठी घटनांचे निरीक्षण केले पाहिजे. या पद्धतीशास्त्रीय दृष्टिकोनाचा अवलंब करून त्याने शासनव्यवस्थेची रूपे (forms of government) शोधून काढली. प्रजासत्ताक व्यवस्था (Republic), बड्या लोकांचे राज्य (Aristocracy), जुलूमशाही (Despotism) आणि राजसत्ताक पद्धती (Monarchy) ही त्याने प्रतिपादन केलेली शासनव्यवस्थेची रूपे होत. हे समाजव्यवस्थेतील संरचनात्मक घटक असून त्याने या शासनव्यवस्थांच्या तत्वांचाही शोध घेतला. माँटेस्क्यूचे

समाजसंरचनेबाबतचे विचारही प्रगत होते. ज्या संस्थानी समाज बनतो त्या सर्व संस्था परस्परसंबंधित असतात, त्यांच्यात परस्परपूरक संबंध असून त्या समग्र समाजाच्या रूपावर अवलंबून असतात, असा मॉंटेस्क्यूचा दृष्टिकोन होता. आय.एम. झैटलिन या समाजशास्त्रज्ञाने असे म्हटले आहे की, समाजशास्त्रीय सिद्धांत आणि पद्धतीचा विकास होत असल्याची प्रथम वर्दी देणारा विचारवंत (Forerunner) म्हणून मॉंटेस्क्यूला मानले पाहिजे.

विको आणि मॉंटेस्क्यू यांच्या व्यतिरिक्त, रुसो, हेगेल, बोनाल्ड, मैस्त्रे, सैं-सीमो ह्या विचारवंतांच्या कल्पनांचा आणि तत्त्वज्ञानांचा समाजाविषयीचे आकलन समृद्ध होण्यावर आणि समाजशास्त्राचा उदय आणि प्रारंभिक विकासावर खूपच मोठा प्रभाव पडला होता.

औपचारिक अर्थाने एक स्वतंत्र शास्त्र म्हणून समाजशास्त्राचा उदय १९ व्या शतकात झाला. सुप्रसिद्ध फ्रेंच तत्त्वज्ञ ऑगस्त कॉम्त (१७९८-१८५७) यानी त्यांच्या *"Positive Philosophy"* या ग्रंथात "Sociology" ही संज्ञा १८३९ साली सर्वप्रथम वापरली. ऑगस्त कॉम्तला ''समाजशास्त्राचा जनक'' (Father of Sociology) समजले जाते. शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करूनच समाजाचा अभ्यास केला जाणे आवश्यक आहे असे कॉम्तचे आग्रही प्रतिपादन होते. त्याने असेही स्पष्ट केले की नैसर्गिक घटनांच्या अभ्यासासाठी नैसर्गिक शास्त्रांमध्ये ज्या शास्त्रीय पद्धतीचा अवलंब होतो त्याच शास्त्रीय किंवा प्रत्यक्षवादी अभ्यास पद्धतीचा (Positivistic Method) वापर समाजाच्या अभ्यासासाठीही होणे आवश्यक आहे. भौतिक शास्त्राच्या धर्तीवर समाजशास्त्राची निर्मिती आणि विकास ऑगस्त कॉम्तला अभिप्रेत होता. खरे म्हणजे समाजाविषयीच्या या नव्या अध्ययनक्षेत्राला प्रारंभी त्याने "Social Physics" (सामाजिक भौतिकशास्त्र) हीच संज्ञा वापरली होती. पण क्विटलेट नावाच्या एका बेल्जियम विद्वानाने त्याच्या एका शोधनिबंधाच्या शीर्षकात "An Essay on Social Physics" असा शब्दप्रयोग वापरल्याने कॉम्तला नवी संज्ञा वापरणे भाग पडले. मोठ्या नाईलाजाने आणि नाखुषीनेच कॉम्तने "Social Physics" ऐवजी "Sociology" अशी नवी संज्ञा वापरली. कॉम्तप्रमाणेच हर्बर्ट स्पेन्सर यांच्या लिखाणाचाही समाजशास्त्राच्या प्रारंभिक विकासावर प्रभाव पडला होता. १७५० ते १८५० हा सुमारे शंभर वर्षांचा कालखंड (किंवा मॉंटेस्क्यूच्या लिखाणापासून ते कॉम्त आणि स्पेन्सरच्या लिखाणापर्यंतचा कालखंड) हा समाजशास्त्राच्या पूर्वेतिहासाचा कालखंड (Pre-history of Sociology) मानता येईल.

समाजशास्त्राची उगमस्थाने (origins) नेमकी कोणत्या बाबीत सापडतात? व्यापक अर्थाने अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि एकोणीसाव्या शतकाच्या आरंभीच्या काळातील राजकीय तत्त्वज्ञान, इतिहासाचे तत्त्वज्ञान, उत्क्रांतीविषयक सिद्धांत आणि युरोपीय समाजातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवनातील ज्या घडामोडीनीं समाजव्यवस्थेत प्रचंड उलथापालथ घडवून आणली त्या घटना या बाबींत समाजशास्त्राच्या उदयाची उगमस्थाने शोधता येतात.

यापुढील विभागात, सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि बौद्धिक क्षेत्रातील ज्या शक्ती समाजशास्त्राचा उदय आणि विकास होण्यासाठी जबाबदार ठरल्या त्यांचे थोडक्यात विवेचन केले आहे.

**समाजशास्त्राच्या उदय आणि प्रारंभिक विकासातील सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि बौद्धिक–तात्त्विक घटक :**

ज्ञानाच्या सर्वच क्षेत्रांवर त्या त्या काळातील सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि बौद्धिक क्षेत्रातील घटनांचा प्रभाव पडतो. समाजशास्त्रही याला अपवाद नाही, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातील आणि २० व्या शतकाच्या प्रारंभिक कालखंडातील सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि बौद्धिक–तात्त्विक क्षेत्रातील अनेक घडामोडी समाजशास्त्राचा उदय आणि प्रारंभिक विकास होण्यासाठी जबाबदार ठरल्या. अशा काही घटकांची चर्चा या विभागात करण्यात आली आहे.

**अ) समाजशास्त्राच्या विकासातील सामाजिक–राजकीय आणि आर्थिक शक्ती** (Socio-Political and Economic forces in the Development of Sociology) :

फ्रेंच राज्यक्रांती, औद्योगिक क्रांती आणि भांडवलशाहीचा उदय, नागरीकरण, समाजवाद, धार्मिक क्षेत्रातील बदल आणि नैसर्गिक शास्त्रांची वाढ हे समाजशास्त्राच्या प्रारंभिक विकासावर प्रभाव टाकणारे महत्त्वाचे घटक होत. या घटकांचे थोडक्यात विवेचन खाली दिले आहे.

**१) फ्रेंच राज्यक्रांती** (French Revolution) :

१८७९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीने प्रारंभ झालेल्या १९ व्या शतकातील अनेक राजकीय क्रांत्यांची मालिका हा समाजशास्त्राच्या उदयातील महत्त्वपूर्ण घटक होता, असे जॉर्ज रिटझर यानी म्हटले आहे. या राजकीय क्रांत्यांचा समाजजीवनावर खूपच मोठा प्रभाव पडला आणि समाज–जीवनात सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही स्वरूपाचे बदल घडून आले. विशेषत: राजकीय क्रांत्यांच्या नकारात्मक परिणामानी अनेक विचारवंतांचे लक्ष वेधून घेतले. फ्रान्समधील समाजजीवन राजकीय क्रांत्यांनी ढवळून निघाले होते. त्यामुळे समाजात गोंधळ आणि अव्यवस्थेची स्थिती निर्माण झाली. त्यामुळे विचारवंत अस्वस्थ झाले. राजकीय क्रांत्यांनी उध्वस्त झालेली समाजाची व्यवस्था पुन्हा पूर्वपदावर आणणे विचारवंताना आवश्यक वाटत होते. मध्ययुगीन कालखंडात जशी स्थैर्यप्रधान व्यवस्था समाजात होती त्याप्रमाणेच पुन्हा समाजात व्यवस्था व्हावी असे काहींना वाटत होते. तर काही विचारवंताना पुन्हा मध्ययुगीन कालखंडाप्रमाणे समाजव्यवस्था बनविणे अशक्य वाटत होते. त्यांच्या मते झालेले बदल इतके प्रचंड मोठे होते की पुन्हा ‘मागे जाणे’ अशक्यप्राय होते. थोडक्यात ‘समाजव्यवस्था’ हा कॉम्तसारख्या अनेकांच्या चिंतनाचा मुख्य विषय बनला. त्यामुळे समाजात व्यवस्था कशी निर्माण होते, समाजव्यवस्थेचे आधारस्तंभ कोणते याविषयीचे विचार मांडण्यात येऊ लागले.

**२) औद्योगिक क्रांती आणि भांडवलशाहीचा उदय** (The Industrial Revolution and the Rise of Capitalism) :

१९ व्या आणि २० व्या शतकाच्या प्रारंभिक काळात अनेक पाश्चात्य देशात औद्योगिक क्रांतीची लाट आली. औद्योगिक क्रांती हा एकच सुटा प्रसंग नव्हता. औद्योगिक क्रांती ही अनेक पदरी आणि गुंतागुंतीची घटना होती की ज्यामुळे पाश्चात्य शेतीप्रधान देशांचे औद्योगिक समाजात रूपांतर घडून आले. अनेक

लोकांनी शेतीव्यवसाय सोडून दिला आणि उद्योग–व्यवसायातील, कारखान्यातील नवी कामे स्वीकारली. तंत्रविज्ञानातील प्रगतीमुळे कारखाना उत्पादन पद्धतीतही अनेक सुधारणा घडून आल्या. कारखाना उत्पादन पद्धतीला सुसंगत आणि पोषक ठरणाऱ्या अनेक नोकरशाही संघटना, आर्थिक आणि वित्तीय संस्था तसेच नव्या बाजारपेठा अस्तित्वात आल्या. त्यातूनच पुढे भांडवलशाही व्यवस्थेचा उदय झाला. नफा कमविणारा भांडवलदारांचा वर्ग जसा उदयास आला तसाच कारखान्यातील श्रमावर उपजीविका करणारा श्रमजीवी किंवा कामगार वर्गही उदयास आला. कामगारांचे जीवन जसे अधिकाधिक कष्टप्रद बनले तशी कामगार चळवळ जन्माला आली. औद्योगिक क्रांती, भांडवलशाहीचा उदय आणि या दोहोना झालेली श्रमिकांची प्रतिक्रिया यामुळे पाश्चात्य समाजात प्रचंड उलथा–पालथ झाली. या बाबीनी अनेक विचारवंतांचे लक्ष वेधून घेतले. कार्ल मार्क्स, एमिल दुरखीम, मॅक्स वेबर आणि जॉर्ज सिम्मेल यासारख्या विचारवंतांच्या लेखनातून त्याचे प्रतिबिंब दिसून येते.

३) **नागरीकरण** (Urbanization) :

औद्योगिकीकरणाबरोबरच नागरीकरण प्रक्रियेला चालना मिळाली. उद्योगधंद्यांची केंद्रे जशी निर्माण होत गेली आणि विकसित झाली त्याबरोबरच ग्रामीण भागातील लोकांचे मोठ्या प्रमाणावर औद्योगिक केंद्रांच्या / शहरांच्या दिशेने स्थलांतर घडून आले. कारखान्यातील नव्या नोकऱ्यांच्या शोधात लोक ग्रामीण भागातून औद्योगिक शहरांकडे स्थलांतर करू लागले. याचा नागरी तसेच ग्रामीण समाजांवरही अनेक–पदरी परिणाम झाला. स्थलांतरितांच्या जीवनावरही याचा परिणाम झाला. त्यांना शहरातील परिस्थितीशी जुळवून घेताना अनेक अडचणीना तोंड द्यावे लागले. शहरांच्या समस्या तीव्र बनल्या. प्रचंड लोकसंख्येचे केंद्रीकरण, नागरी सुविधांचा अभाव, मोठी वाहतूक व्यवस्था, विविध प्रकारचे प्रदूषण, गुन्हेगारीतील वाढ इ. समस्यानी नगरांना ग्रासले. त्यामुळे अनेक विचारवंत नागरी जीवनाच्या आणि नागरी समस्यांच्या अभ्यासाकडे वळले.

४) **समाजवाद** (Socialism) :

औद्योगिक उत्पादन व्यवस्थेचे आणि भांडवलशाही व्यवस्थेचे अनेक नकारात्मक परिणाम समाजावर होऊ लागल्याचे विचारवंतांच्या प्रकर्षाने ध्यानात येऊ लागले. त्यामुळे भांडवलशाहीला पर्याय म्हणून 'समाजवाद' (Socialism) ही विचारसरणी अनेकांना आकर्षित करू लागली. कार्ल मार्क्स हा प्रतिभाशाली विचारवंत 'समाजवादी' विचारसरणीचा प्रमुख प्रणेता होता. भांडवलशाही व्यवस्था उलथून टाकून समाजवादी व्यवस्था निर्माण होणे आवश्यक आहे असे मार्क्सचे आग्रही प्रतिपादन होते. यासाठी क्रांतीच्या मार्गाने परिवर्तन घडवून आणले जावे अशी त्याची भूमिका होती. पण काही इतर विचारवंतांनी, समाजात क्रांती घडवून आणण्याऐवजी भांडवलशाही व्यवस्थेअंतर्गतच काही सुधारणा घडवून आणल्या जाव्यात अशी भूमिका मांडली. भांडवलशाहीचा पुरस्कार करणारे आणि समाजवादाचा पुरस्कार करणारे असा विचारप्रणालीत भेद असणाऱ्या विचारवंतांनी जे लेखन केले त्यामुळे समाजशास्त्राच्या विकासाला हातभार लाभला.

५) **धार्मिकतेतील बदल** (Religious Change):

औद्योगीकरण, नागरीकरण, विज्ञान आणि तंत्रज्ञानातील विकास यामुळे लोकांच्या धर्माविषयीच्या आणि परमेश्वराविषयीच्या दृष्टिकोनात बदल घडून आला. लोकांचा दृष्टिकोन अधिक चिकित्सक आणि शास्त्रीय बनू लागला. परिणामी, अतिनैसर्गिक शक्तीं, परमेश्वर यावरील लोकांची श्रद्धा ढळू लागली. लोकांची धार्मिक मनोवृत्ती हळूहळू बदलू लागली. लोकांच्या मनावरील आणि एकंदर समाजावरील धर्माचे वर्चस्व हळू हळू कमी होऊ लागले. प्रारंभिक काळातील अनेक समाजशास्त्रज्ञ धार्मिक पार्श्वभूमी लाभलेले होते. त्यामुळे 'धर्म' हा त्यांच्या समाजशास्त्रीय चिंतनाचा एक मुख्य विषय बनला. ऑगस्त कॉम्त, एमिल दुरखीम, मॅक्स वेबर यांनी धर्माचा अभ्यास केल्याचे दिसून येते.

६) **नैसर्गिक शास्त्रांचा विकास** (The Growth of Natural Sciences) :

ज्या काळात समाजशास्त्राचा उदय आणि प्रारंभिक विकास होत होता त्या काळात भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, रसायनशास्त्र इ. नैसर्गिक शास्त्रांचा विकास झपाट्याने होत होता. ही शास्त्रे आणि त्यातील शास्त्रज्ञ यांना समाजात मानाचे स्थान मिळत होते, प्रसिद्धी मिळत होती. नैसर्गिक घटनांच्या अभ्यासासाठी ही शास्त्रे शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करीत होती. त्यांच्या प्रभावामुळे कॉम्त, दुरखीमसारखे विचारवंत शास्त्रीय/प्रत्यक्षवादी संशोधन पद्धतीचा अवलंब समाजाच्या अभ्यासासाठी देखील केला जावा असे आग्रही प्रतिपादन करीत होते. पण, नैसर्गिक जग व सामाजिक जीवन यात भेद आहेत; त्यामुळे नैसर्गिक शास्त्रात वापरल्या जाणाऱ्या अभ्यासपद्धतीचा सरसकट वापर समाजजीवनाच्या अभ्यासासाठी करण्यात अडचणी आहेत आणि हे विवेकीपणाचे ठरणार नाही, अशी मते मॅक्स वेबरसारख्या विचारवंतानी व्यक्त केली. त्यामुळे पद्धतीशास्त्रीय वाद-विवाद घडून आला. अशाप्रकारे नैसर्गिक शास्त्रांचा विकास, या शास्त्रातील शास्त्रज्ञांची लोकप्रियता तसेच या शास्त्रातील अभ्यासपद्धती सामाजिक शास्त्रांना कितपत उपयुक्त आहेत याविषयी झालेला वाद-विवाद या बाबींचा समाजशास्त्राच्या विकासावर प्रभाव पडला.

ब) **समाजशास्त्राच्या विकासातील बौद्धिक आणि तात्विक घटक** (Intellectnal and Philosophical forces in the Development of Sociology) :

प्रबोधनयुगातील कल्पना, प्रत्यक्षवाद, उत्क्रांतीवाद आणि मानवतावादी विचारप्रणाली यांचाही समाजशास्त्राच्या विकासावर प्रभाव पडला होता. समाजशास्त्राच्या विकासावर या घटकांचा कसा प्रभाव पडला याविषयीचे थोडक्यात विवेचन खाली दिले आहे.

१) ''**प्रबोधनयुग**'' (The "Enlightenment") :

झैटलिन यांच्या मते समाजशास्त्रीय सैद्धांतिक विकासाची उगमस्थाने प्रबोधन युगात सापडतात. वेबस्टर शब्दकोषानुसार, प्रबोधन युग हा १७ व्या आणि १८ व्या शतकातील तत्त्वज्ञान आणि सांस्कृतिक क्षेत्रातील चळवळीचा कालखंड होय. प्रस्थापित परंपरागत श्रद्धांविषयी चिकित्सक वृत्तीने प्रश्न उपस्थित करणे, विवेकबुद्धीचा मुक्त वापर, अनुभवनिष्ठ शास्त्रीय पद्धतीचा/दृष्टिकोनाचा विकास आणि मानवी कल्याणाबद्दलची आस्था ही प्रबोधनयुगाची ठळक लक्षणे आहेत. प्रबोधनयुगात अनेक मोठे विचारवंत होऊन

गेले. त्या काळातील विचारवंतांनी ज्या नव्या कल्पना मांडल्या त्या समाजशास्त्राच्या उदय आणि विकासासाठी मोठ्या प्रमाणात पोषक ठरल्या. प्रबोधन युगातील अशा प्रमुख कल्पना किंवा नवे विचार पुढीलप्रमाणे : (१) मानवी मन (बुद्धी) जगाचे आकलन करून घेण्यासाठी सक्षम आहे. (२) नैसर्गिक अगर सामाजिक वास्तविकतेचे ज्ञान करून घेण्यासाठी विवेकबुद्धी (reason) आणि निरीक्षण (observation) या दोहोंचा समन्वय ज्या शास्त्रीय पद्धतीत झाला आहे. तिचा अवलंब करणे आवश्यक आहे. (३) मानवी जीवनाच्या सर्व पैलूंचे आणि मानवी कृतींचे चिकित्सक परीक्षण केले पाहिजे. (४) विवेक आणि विज्ञान या दोहोंच्या माध्यमातून माणसाला अधिकाधिक स्वातंत्र्य मिळू शकते आणि परिणामी त्याला अधिकाधिक प्रगती साधता येईल. झैटलिन यांच्या मते प्रबोधनयुगीन विचाराना चिकित्सक आणि नकारात्मक तसेच सकारात्मक अशा दोन्ही बाजू होत्या. प्रबोधन युगात निर्माण झालेल्या विचारांमुळे समाज आणि इतिहास यांचे अध्ययन करण्यासाठी शास्त्रीय पद्धतीचा अवलंब केला जाणे आवश्यक आहे या विचाराला बळकटी आली आणि त्यामुळेच समाजाविषयीचे नवे शास्त्र (समाजशास्त्र) निर्माण होऊ शकले. पाश्चिमात्य देशातील समाजशास्त्राचा उदय आणि विकास ही प्रबोधनयुगाला झालेली प्रतिक्रिया होती, असेही झैटलिन यांनी म्हटले आहे.

२) **प्रत्यक्षवाद** (Positivism) :

प्रत्यक्षवाद हा पद्धतीशास्त्रीय दृष्टिकोन असून त्यात नैसर्गिक शास्त्रात जी शास्त्रीय पद्धती वापरली जाते तीच सामाजिक शास्त्रात वापरली जावी यावर मुख्य भर आहे. कॉम्त हा प्रत्यक्षवादी विचारवंत होता. त्याने नैसर्गिक शास्त्रातील संशोधन पद्धतीचा अवलंब करून सामाजिक घटनांचा अभ्यास केला पाहिजे असे आग्रही प्रतिपादन केले. कॉम्तप्रमाणेच इतरही काही समाजशास्त्रज्ञ प्रत्यक्षवादाचा पुरस्कार करणारे होते. या पद्धतीशास्त्रीय दृष्टिकोनाचा समाजशास्त्राचा उदय आणि विकासावर प्रभाव पडला.

३) **उत्क्रांतीवाद** (Evolutionism) :

जीवशास्त्रात उत्क्रांतीवादी दृष्टिकोन प्रथम विकसित झाला. सजीवांचा विकास उत्क्रांती प्रक्रियेत झाला असा डार्विनचा सुप्रसिद्ध सिद्धांत आहे. उत्क्रांतीवादी दृष्टिकोनाची छाप अनेक सामाजिक शास्त्रज्ञांच्या विचारांवरही पडली. ज्या समाजशास्त्रज्ञांना समाजाच्या विकासाचा आणि प्रगतीचा अभ्यास करावयाचा होता त्यानीही 'उत्क्रांती' या संकल्पनेचा वापर केला. उत्क्रांतीवादी दृष्टिकोनानुसार कोणत्याही गोष्टीत टप्प्या-टप्प्याने किंवा विविध अवस्थांतून बदल होत जातो, या प्रक्रियेत साध्या गोष्टी अधिकाधिक संकीर्ण बनत जातात आणि हा बदल नेहमी प्रगतीच्या दिशेने होतो. ऑगस्त कॉम्त, हर्बर्ट स्पेन्सर आणि एमिल दुरखीम यांच्या लिखाणात उत्क्रांतीवादी विचारांचे प्रतिबिंब पडलेले दिसते.

४) **मानवतावाद** (Humanitarianism) :

मानवी प्रगती आणि कल्याण यावर भर देणारी विचारप्रणाली म्हणजे मानवतावादी विचारप्रणाली होय. प्रारंभीच्या काळात सर्व सामाजिक शास्त्रांचा अंतिम हेतू मानवी जीवनात प्रगती घडवून आणणे आणि

मानवकल्याण साधणे हाच मानला जात होता. प्रबोधन युगातील विचारांमध्ये मानवतावादी विचार प्रबळ होता. समाजशास्त्राच्या प्रारंभिक विकासावर मानवतावादी विचारांचाही प्रभाव होता.

**अभिजात समाजशास्त्रज्ञांचे समाजशास्त्राच्या प्रारंभिक विकासातील योगदान** (Contributions of Classical Sociologists to the Development of Early Sociology) :

ऑगस्त कॉम्त, हर्बर्ट स्पेन्सर, एमिल दुरखीम, कार्ल मार्क्स आणि मॅक्स वेबर हे अग्रणी समाजशास्त्रज्ञ होते. एक शास्त्र म्हणून समाजशास्त्राचा पाया घालण्याचे आणि प्रारंभिक विकास करण्याचे श्रेय या अग्रेसर (Pioneers) अभिजात (Classical) समाजशास्त्रज्ञांकडे जाते. त्यांचे समाजशास्त्राच्या विकासातील योगदान समजून घेणे म्हणूनच महत्त्वाचे आहे.

१) **ऑगस्त कॉम्त** (Auguste Comte, 1798-1857) :

समाजाचा अभ्यास करणाऱ्या नव्या शास्त्राला 'Sociology' हे नाव देणे, सामाजिक घटनांच्या अभ्यासासाठी नैसर्गिक शास्त्रातील शास्त्रीय पद्धतीचा अवलंब केला पाहिजे असे आग्रही प्रतिपादन करणे, याशिवायही ऑगस्त कॉम्तने समाजशास्त्राला विविध प्रकारे योगदान केले आहे. कॉम्तने 'सामाजिक स्थितीशास्त्र' (Social Statics) आणि 'सामाजिक गतिशास्त्र' (Social Dynamics) अशा दोन भागात समाजशास्त्राच्या अभ्यासविषयाची विभागणी केली. कॉम्तला प्रत्यक्षवादाचा जनक म्हणूनही ओळखले जाते. त्याचा तीन अवस्थांचा नियमही समाजाविषयीचा उत्क्रांतिवादी सिद्धांत म्हणून प्रसिद्ध आहे. मानवी बुद्धिमत्तेचा विकास धर्मशास्त्रीय, आध्यात्मिक आणि प्रत्यक्ष अवस्था (Theological, Metaphysical and Postivistic) या तीन अवस्थातून होतो आणि मानवी समाजाच्या विकासाच्या देखील अशाच अवस्था आहेत हे सांगून प्रथम अवस्थेत समाज-संघटन सैनिकी (Military) दुसऱ्या अवस्थेत न्यायशास्त्रीय (Juristic), तर तिसऱ्या अवस्थेत औद्योगिक (industrial) स्वरूपाचे असते हे स्पष्ट केले. समाज निश्चित अवस्थांमधून प्रगतीच्या दिशेने उत्क्रांत होत जातात, हा विचार त्याने मांडला. बौद्धिक क्षेत्रातील प्रगती आणि सामाजिक प्रगती या दोहोतील संबंध तीन अवस्थांच्या सिद्धांताद्वारे स्पष्ट झाला. कॉम्तने शास्त्रांची वर्चस्वश्रेणी (hierarchy) तयार केली. कॉम्तच्या दृष्टीने समाजशास्त्र हे केवळ 'शुद्ध' शास्त्र नाही तर ते 'उपयोजित' शास्त्रही आहे. समाजशास्त्राचा सामाजिक समस्या सोडविण्यासाठी उपयोग झाला पाहिजे असे त्याचे प्रतिपादन होते. कॉम्तने समाजातील नैतिक व्यवस्थेवर (Moral order) भर दिला. *'Positive Philosophy'* आणि *'Positve Polity'* हे त्याचे महत्त्वपूर्ण ग्रंथ मानले जातात.

२) **हर्बर्ट स्पेन्सर** (Herbert Spencer, 1820-1903) :

हर्बर्ट स्पेन्सर हा ब्रिटिश समाजशास्त्रज्ञ होय. त्याचेही समाजशास्त्राच्या विकासातील योगदान महत्त्वपूर्ण आहे. समाजाविषयीचे स्वतंत्र शास्त्र निर्माण करणे गरजेचे आहे, असे त्याने प्रतिपादन केले. कुटूंब, राज्यसंस्था, धर्म, सामाजिक नियंत्रण, उद्योग, मंडळे, समुदाय, श्रमविभाजन, सामाजिक विभेदन, सामाजिक स्तरीकरण, कला, शास्त्र, सौंदर्यशास्त्र इ. विषयांचा त्याने समाजशास्त्राच्या अध्ययनकक्षेत समावेश केला. समाजाचे विविध भाग परस्परसंबंधित आणि परस्परावलंबी असतात आणि समग्र समाज हाच समाजशास्त्रीय

अभ्यासाचा एकक मानावा असे कॉम्तप्रमाणे त्याचेही मत होते. उत्क्रांतिवादी सिद्धांतासाठी आणि समाजाविषयीच्या सेंद्रीय सिद्धांतासाठी समाजशास्त्रात तो विशेष प्रसिद्ध आहे. विश्वातील सेंद्रीय, अ-सेंद्रीय, अति-सेंद्रीय अशा सर्वच घटकांना उत्क्रांतीचा नियम लागू होतो, असा व्यापक उत्क्रांतीविषयक सिद्धांत त्याने मांडला. मानवी समाज देखील उत्क्रांत होत जातात आणि ही उत्क्रांती साधेपणाकडून संकीर्णतेकडे होते, असे त्याचे प्रतिपादन होते. समाज हा सजीव शरीरासारखा असून समाजव्यवस्था ही जीवसेंद्रीय व्यवस्थेसारखीच असते ही कल्पना त्याने मांडली. सजीवाशी त्याने मानवी समाजाची तुलना केली. सजीव (organism) आणि समाज (society) या दोहोतील साम्यभेद त्याने स्पष्ट केले. हा त्याचा समाजाविषयीचा सेंद्रीय सिद्धांत होय. 'सैनिकी समाज' आणि 'औद्योगिक समाज' असे सामाजिक संघटनावर आधारलेले समाजाचे दोन प्रकारही स्पेन्सरने सांगितले. स्पेन्सर हा 'व्यक्तीवादावर' (individualism) भर देणारा विचारवंत होता. *'First Principle', 'The study of sociology', 'Principles of Ethics', 'Principles of sociology'* आणि *"The man versus the state"* हे त्याचे प्रमुख ग्रंथ आहेत.

**३) कार्ल मार्क्स** (Karl Marx; 1818-1883):

कार्ल मार्क्स या जर्मन विद्वानाने समाजशास्त्रासह सर्वच सामाजिक शास्त्रातील विश्लेषणाला आपल्या मूलगामी विचारांमुळे एक नवी दिशा दिली. एक क्रांतिकारक विचारवंत म्हणून तो जगप्रसिद्ध आहे. तो स्वत:ला समाजशास्त्रज्ञ म्हणवून घेत नसला तरी समाजशास्त्रीय विश्लेषणात त्याचे विचार अत्यंत महत्त्वाचे असेच आहेत. समाजशास्त्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या योगदानाचाच आपण इथे थोडक्यात उल्लेख करणार आहोत. समाजशास्त्रातील संघर्षवादी दृष्टिकोनाचा आद्य प्रवर्तक म्हणून कार्ल मार्क्स प्रसिद्ध आहे. त्याने वर्ग संघर्षविषयक सिद्धांत मांडला. जगाचे वर्णन करणे एवढ्यापुरतेच सामाजिक शास्त्रज्ञाचे कार्य मर्यादित नसून त्यात परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणे हेही महत्त्वाचे आहे असे त्याचे ठाम प्रतिपादन होते. ऐतिहासिक भौतिकवादी सिद्धांत, द्वंद्वात्मक विकासाची संकल्पना, उत्पादन-प्रणालीची संकल्पना (Concept of mode of production), वर्गाची संकल्पना, परात्मतेचा सिद्धांत (Theory of Alienation), भांडवलशाही व्यवस्थेचे टीकात्मक विश्लेषण, क्रांतिकारक परिवर्तनाची संकल्पना इ. मूलगामी विचारांसाठी समाजशास्त्रातील कार्ल मार्क्सचे योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते. आर्थिक व्यवस्था हा समग्र समाजव्यवस्थेचा पाया (base) असून आर्थिक व्यवस्थाच त्यावर आधारलेल्या उर्वरित उर्ध्वसंरचनेला (superstructure), म्हणजे समाजातील धर्म, राज्य, तत्त्वज्ञान, विज्ञान, कायदा आदी सर्व बाबीना निर्धारित करते असा विचार कार्ल मार्क्स यानी मांडला. मानवी समाजांचा इतिहास हा वर्ग-संघर्षाचाच इतिहास असल्याचे त्याचे प्रतिपादन होते. कामगार वर्गाकडून भांडवलशाही व्यवस्था उलथून टाकली जाईल असे त्याचे भाकित होते. मार्क्सच्या विचारानी इतर अनेक विचारवंताना प्रभावित केले. आजच्या समाजशास्त्रातही मार्क्स प्रणित विचाराना महत्त्व आहे. मार्क्स आणि एंगल्स या दोघानी अनेक ग्रंथ लिहिले. *'Capital'*, *'A Contribution to the Critique of Political Economy'*, *'Critique of Hegel's Philosophy of Right'*, *'The Economic and Philosophic Mannscripts of 1844'* आणि *'Poverty of Philosophy'* इ. हे मार्क्सचे काही महत्त्वपूर्ण ग्रंथ आहेत.

४) **एमिल दुरखीम** (Emile Durkheim; 1858-1917) :

एमिल दुरखीम हा अभिजात समाजशास्त्रज्ञ खऱ्या अर्थाने शैक्षणिक विश्वातील समाजशास्त्रज्ञ होता. दुरखीमचे समाजशास्त्रातील योगदान अनेक पदरी, मूलगामी आणि अत्यंत महत्त्वपूर्ण असे होते. एक स्वतंत्र शास्त्र म्हणून समाजशास्त्राचा पाया घालण्याचे काम दुरखीमने केले. त्याने समाजशास्त्राची व्याख्या केली, समाजशास्त्राचा नेमका अभ्यासविषय कोणता ह्याचे सुस्पष्ट विवेचन केले, समाजशास्त्रीय संशोधनासाठीचे नियम प्रतिपादन केले आणि समाजशास्त्रीय संशोधन करून समाजशास्त्रात विविध सिद्धांत मांडले. 'सामाजिक तथ्ये' (Social facts) हाच समाजशास्त्राचा अभ्यासविषय आहे असे त्याचे प्रतिपादन आहे. सर्व सामाजिक संस्था ही सामाजिक तथ्ये आहेत असा त्याचा दृष्टिकोन होता. सामाजिक तथ्यांचे निरीक्षण, वर्गीकरण, अन्वयार्थ किंवा स्पष्टीकरण कसे करावे याविषयीचे म्हणजेच समाजशास्त्रीय संशोधनाविषयीचे नियम त्याने प्रतिपादन केले. तौलनिक अभ्यासपद्धतीचे समाजशास्त्रातील महत्त्व दुरखीमने स्पष्ट केले. *"L Annee Sociologique"* (1897-98) या समाजशास्त्रातील पहिल्या संशोधन नियतकालिकाचा तो संस्थापक संपादक होता. समाजातील श्रमविभाजनाविषयीचा सिद्धांत, आत्महत्येविषयीचा सामाजिक सिद्धांत, धर्माचा सिद्धांत इ. हे त्याचे समाजशास्त्रातील महत्त्वपूर्ण सैद्धांतिक योगदान आहे. *'The Division of Labour in Society'*, *'The Rules of Sociological Method'*, *'Suicide'* आणि *'The Elementary Forms of Religious Life'* इ. हे त्याचे प्रमुख समाजशास्त्रीय ग्रंथ आहेत.

५) **मॅक्स वेबर** (Max Weber 1864-1920) :

मॅक्स वेबर हा जर्मन विचारवंत एक सुप्रसिद्ध सामाजिक शास्त्रज्ञ आहे. वेबरने केवळ समाजशास्त्रालाच नव्हे तर राज्यशास्त्रासारख्या इतरही सामाजिक शास्त्राना महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. समाजशास्त्रावरील त्याच्या लिखाणाचा प्रभाव व्यापक प्रमाणावरील असून तो आजही टिकून आहे. वेबरने समाजशास्त्राची व्याख्या केली, नैसर्गिक आणि सामाजिक शास्त्रातील भेद स्पष्ट केले आणि या दोन प्रकारच्या शास्त्रातील पद्धतीशास्त्रविषयक वाद-विवादात मोलाचे योगदान दिले. 'Verstehen' आणि 'Ideal types' या पद्धतीशास्त्रीय संकल्पना मांडल्या आणि काही महत्त्वपूर्ण सिद्धांत मांडले. वेबरच्या मते समाजशास्त्र हे सामाजिक क्रियांचे (Social Actions) अन्वयार्थात्मक आकलन करून घेणारे शास्त्र आहे. सामाजिक क्रिया म्हणजे काय हे स्पष्ट करून सामाजिक क्रियांचे प्रकार त्याने स्पष्ट केले. विशेषत: कर्त्याने आपल्या क्रियेला दिलेल्या अर्थाला वेबरने सामाजिक क्रियेच्या स्पष्टीकरणात महत्त्व दिले. वेबरच्या सामाजिक क्रियेच्या सिद्धांताबरोबरच (Theory of Social Action) त्याचा नोकरशाहीविषयक सिद्धांत (Theory of Bureaucracy), अधिकाराबाबतचा सिद्धांतही (Theory of Authority) समाजशास्त्रात प्रसिद्ध आहे. धार्मिक मूल्यव्यवस्थेचा भांडवलशाहीच्या विकासावर कसा प्रभाव पडतो हे स्पष्ट करणारा त्याचा सिद्धांतही विशेष महत्त्वपूर्ण आहे. सामाजिक शास्त्रातील संशोधन वस्तुनिष्ठ आणि मूल्यमुक्त असावे असा त्याने आग्रह धरला. आर्थिक घटकांच्या आधारे समाजात स्तर पडतात हे मान्य करतानाच प्रतिष्ठा (prestige) आणि सत्ता (power) हेही स्तरीकरणाचे महत्त्वपूर्ण आधार असल्याचे वेबरने प्रतिपादन केले. वेबरने विवेकीकरण (Rationalization), धर्म (Religion) आणि भांडवलशाहीचा विकास (development of capitalism)

या विषयांवरही लेखन केले. *'The Methodology of the social sciences', 'Essays in Sociology', 'Economy and Society', 'The Protestant Ethic and the Spirit of Capitalism, 'The City', 'Sociology of Religion', 'The Religion of India'* आणि *'Theory of Social and Economic Organization'* इ. हे त्याचे महत्त्वपूर्ण ग्रंथ आहेत.

निवडक अभिजात समाजशास्त्रज्ञांच्या समाजशास्त्राच्या प्रारंभिक विकासातील योगदानाचा आपण अगदी थोडक्यात परिचय करून घेतला आहे. त्यांच्या विचारात दिसून येणारे काही साम्याचे मुद्दे आहेत. एकतर समाजशास्त्र या समाजाविषयीचा अभ्यास करणाऱ्या नव्या स्वतंत्र ज्ञानशाखेची गरज आहे हे सर्व प्रारंभिक समाजशास्त्रज्ञानी आग्रहपूर्वक प्रतिपादन केले. समाजशास्त्राची व्याख्या करण्याचा त्यांनी प्रयत्न केला तसेच समाजशास्त्राची अभ्यासपद्धती कशी असावी याबद्दलही त्यांनी आपली भूमिका मांडली. समाजशास्त्रात सामाजिक घटनांचा, सामाजिक संबंधांचा, सामाजिक संस्थांचा, सामाजिक संस्थांमधील परस्परसंबंधांचा आणि समग्र समाजाचा अभ्यास केला जावा, याबाबत बहुतेक प्रारंभिक समाजशास्त्रज्ञांमध्ये एकमत होते. शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करूनच समाजाचा अभ्यास केला जावा असेही सर्वानी आग्रहपूर्वक प्रतिपादन केले. सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ Bottomore T. B. यांनी प्रारंभिक समाजशास्त्राची काही वैशिष्ट्ये सांगितली आहेत. त्यांच्या मते प्रारंभिक समाजशास्त्र अत्यंत व्यापक (encyclopedic) होते. (कारण त्यात समग्र मानवी सामाजिक जीवनाचाच अभ्यास अभिप्रेत होता.) प्रारंभिक समाजशास्त्र उत्क्रांतिवादी (evolutionary) होते (कारण प्रारंभिक समाजशास्त्रज्ञांनी समाजाची उत्क्रांती कशी होत गेली याचे विश्लेषण करण्यावर लक्ष केंद्रित केले). समाजशास्त्र प्रत्यक्षवादी विज्ञान (Positive) आहे अशी समाजशास्त्रज्ञांची संकल्पना होती. (कारण नैसर्गिक शास्त्रांप्रमाणेच समाजशास्त्रातही त्यांना विकसित करावयाचे होते).

समाजशास्त्राचा उदय फ्रान्समध्ये झाला. त्याचा विकास जर्मनी, इंग्लंड, इटली, अमेरिका आणि जगातील अन्य देशांमधूनही यथावकाश झाला. समाजशास्त्राच्या विकासात ज्यांचे मोलाचे योगदान लाभले त्यापैकी काही निवडक समाजशास्त्रज्ञांची नावे (त्यांच्या जीवनकाळासहीत) खाली दिली आहेत.

Taylor E.B. (1832-1917), Lester F. Ward (1841-1913), Vilfredo Pareto (1848-1923), J. G. Frazer (1854-1941), Georg Simmel (1868-1918), Gabrial Tarde (1843-1904), Small (1854-1926), Giddings (1855-1931), Thorstein B. Veblen (1857-1929), C.H. Cooley (1864-1929), James Ward (1843-1925), Lloyd Morgan (1852-1932), Sigmund Freud (1856-1939), Hobbhouse (1864-1929) and E.A. Westermark (1862-1939).

ज्या विद्वानांच्या लेखनाचा समाजशास्त्रातील प्रभाव २० व्या शतकाच्या उत्तरार्धात विशेष नोंद घेण्यासारखा होता त्यापैकी काही प्रमुख विद्वान पुढीलप्रमाणे G.H. Mead (1863-1931), A. R. Radcliffe-Brown (1881-1955), Bronislaw Malinowski (1884-1942) , Alfred Schutz (1899-1959), Talcott Parsons (1902-1979), Robert K. Merton (1910), Homans George C. (1910-1989), C. Wright Mills (1916-1962), Nikalas Luhmann (1927-1998), Peter Blau (1918), Anthony Giddens (1938), Jurgen Habermas (1929), Herbert

Blumer (1900-1987), Ervin Goffman (1922-1982), James S. Coleman (1926-1995), Dorothy E. Smith (1926), P.H. Collins (1948), Michel Foucault (1926-1984) and Immanuel Wallerstein.

भारतात दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात समाजशास्त्र हा विषय मानवशास्त्र या विषयाच्या जोडीने शिकविण्यास प्रारंभ झाला. प्रारंभी मुंबई, कलकत्ता, लखनौ आणि आग्रा ही चारच समाजशास्त्राच्या विद्यापीठीय पातळीवरील अध्यापन-अध्ययनाची केंद्रे होती. नंतरच्या काळात मात्र समाजशास्त्र हा विषय अनेक भारतीय विद्यापीठात शिकविण्यास प्रारंभ झाला. जी. एस. घुर्ये, आर. के. मुखर्जी, डी. पी. मुखर्जी, के. एम्. कपाडिया, आर. एन. सक्सेना, ए. आर. देसाई, इरावती कर्वे, बी. के. सरकार, अे. आयप्पन, डी. एन. मजुमदार, एम्. एन. श्रीनिवास, एम.एस. गोरे, एस. सी. दुबे, पी.एन. प्रभू इ. हे प्रारंभिक काळातील काही प्रमुख भारतीय समाजशास्त्रज्ञ आहेत.

### १.२.३ समाजशास्त्राच्या अभ्यासाचे महत्त्व

समाजशास्त्र हे मानवाच्या समाज जीवनाच्या प्रत्येक बाबीशी निगडित असे शास्त्र आहे. मानवी समाजाच्या विकासाकरता समाजशास्त्राचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. समाजशास्त्र केवळ ज्ञानाचा विषय न राहता समाजाच्या प्रत्येक समस्येचा अभ्यास करून त्या समस्येवर उपाय सुचवण्याची जबाबदारी पार पाडत असते. समाजशास्त्र प्रत्येक क्षेत्रामध्ये महत्वपूर्ण अशी भूमिका पार पाडत असते. समाजशास्त्र हे उपयोगितावादी होणे आवश्यक आहे.

**१) मानवी समाजाचे वस्तुनिष्ठ आकलन:**

समाजशास्त्रामध्ये मानवी संबंधांचा अभ्यास केला जातो. त्याचबरोबर समाजशास्त्रामध्ये सामाजिक संरचना, सांस्कृति, मानवी संबंध, , सामाजिक परिवर्तन, सामाजिक विचलन, सामाजिक समस्या यांचे वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून अध्ययन केले जाते. यामुळे यथार्थ वस्तुनिष्ठ आक्रमण होणे आवश्यक झाले आहे. समाजाच्या वस्तुनिष्ठ अध्ययनाचा उपयोग सामाजिक प्रश्न सोडवणे त्याचबरोबर सामाजिक विकास करण्यासाठी केला जातो.

**२) सामाजिक समस्यांचा अभ्यास:**

समाजामध्ये अनेक सामाजिक समस्या निर्माण होत असतात. मानवी समाज आणि मानवी समाज जीवन गुंतागुंतीचे असल्याने समाजामध्ये सामाजिक अडथळे निर्माण होत असतात अशा प्रसंगी समाजशास्त्र अत्यंत मूलभूत असे शास्त्र आहे जे समस्यांची उकल शोधून काढते व शास्त्रोक्त पद्धतीने समाजातील विविध प्रश्नांचा अभ्यास करते. समाजशास्त्र समाजातील वास्तव व सत्य शोधण्याचे काम करत असते त्याचबरोबर समाजातील अनेक समस्यांचे निराकरण करत असते.

**३) सामाजिक कल्याण:**

समाजकल्याण करण्याकरता समाजशास्त्राचे खूपच महत्त्व आहे. समाजामध्ये सर्वच घटकांचा एक समान विकास होत नसतो. सामाजिक परिवर्तन होण्यासाठी अनेक वर्षाचा कालखंड जाऊ शकतो. आजच्या

आधुनिक युगामध्ये शासकीय ध्येय धोरणे शेवटच्या घटकापर्यंत पोहोचू शकत नाही त्यामुळे समाजामध्ये मागासलेपपणा वाढीस लागतो. वर्षानुवर्षे आदिवासी अनुसूचित जाती जमाती चे घटक राजकीय संस्कृत दृष्ट्या मागास राहतात आणि राहिलेले आहेत. कामगार, छोटे व्यावसायिक लोकांचे अनेक प्रश्न आहेत. या सर्वांच्या हिताकरता समाजशास्त्राचे विशेष अध्ययन करून वृद्ध, महिला, बालक, कामगार आणि मागास सामाजिक घटकाच्या कल्याणाकरता योजना तयार करण्यात शासनास समाजशास्त्राची मदत घ्यावी लागते.

**४) सामाजिक नियोजन:**

समाजाच्या विशिष्ट दिशेने अपेक्षित विकास करण्यासाठी आराखडा तयार करणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे आर्थिक नियोजन केले जाते त्याचप्रमाणे समाजाचे ही नियोजन केले जाते. सध्यकालीन काळ नियोजनाचा समजला जातो. त्यामुळे सामाजिक नियोजन होणे महत्त्वाचे आहे. याकरता सामाजिक घटकांची सत्य व कनिष्ठ माहिती मिळवल्याशिवाय समस्यांची जाणीव होऊ शकत नाही. याकरता समाजशास्त्राचा अभ्यास अत्यंत महत्त्वाचा आहे

**५) मानवी समाजाचा अभ्यास :**

मानवी विकास करण्यासाठी समाजशास्त्रातील दृष्टिकोन अतिशय महत्त्वाचे आहेत. मानवी समाजामध्ये विविध प्रकारच्या रुढी, प्रथा, परंपरा, चाली रिती, धार्मिक परंपरा, अंधश्रद्धा आणि अवैज्ञानिक रूढी अस्तित्वात असतात. यामुळे सामाजिक विकास होऊ शकत नाही. म्हणून सामाजिक घटकांचा अभ्यास समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून केला जातो. यामुळे समाजातील अनिष्ट घटकांची जाणीव होते. यामुळे मानवी प्रगती करून घेण्यास समाजशास्त्राची मदत होते.

**६) व्यावसायिक महत्व:**

आजच्या काळात समाजशास्त्र ही समाजाचा विकास घडवून आणण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या अशी शाखा बनलेली आहे. समाजशास्त्र विषयाच्या अनुषंगाने समाजातील प्रत्येक क्षेत्राचा वेध घेतला जातो. समाजशास्त्राच्या अभ्यास करताना अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध झालेल्या आहेत. त्याचा उल्लेख आपण समाजशास्त्राचा उपयोग यामध्ये करणार आहोत यामध्ये औद्योगिक क्षेत्रात सामाजिक सुरक्षा, विमा योजना, सामाजिक सुरक्षा योजना, गुन्हा सुधार क्षेत्र, बाल सुधार केंद्र, समाज कल्याण, न्याय विभाग, आरोग्य सुधारणा, सामाजिक शिक्षण, प्रौढ शिक्षण, महिला सुधार केंद्र, आश्रम कुटुंब नियोजन यासारख्या अनेक उपयोगी क्षेत्रात समाजशास्त्र विषयाला व्यावसायिक महत्त्व आले आहे.

**७) सामाजिक एकता निर्माण करणे:**

सामाजिक जीवनात सांस्कृतिक, धार्मिक, भाषिक, प्रादेशिक भिन्नता दिसून येते. एकाच देशातील समाजात ही विविधता दिसून येते. त्यामुळे सामाजिक धार्मिक आणि भाषिक प्रश्नावरून अनेक समस्या निर्माण होतात म्हणून सामाजिक धार्मिक एकता निर्माण करणे आवश्यक आहे. समाजशास्त्राच्या अभ्यासामध्ये विविध जाती धर्म जीवन यांचे वैज्ञानिक दृष्टिकोनातून सखोल अध्ययन केले जाते. तसेच सामाजिक जीवन

आणि धर्माचा परस्परांमध्ये संबंध आणि महत्व समाजशास्त्रात स्पष्ट होते. समाजशास्त्राचे व्यापक अध्ययन आणि संशोधनामुळे समस्या आणि प्रश्न सोडवले जाऊन सामाजिक एकता निर्माण होण्यास मदत होते. सदर घटकात आपण समाजशास्त्राचे महत्त्व अभ्यासताना अधिक माहितीसाठी समाजशास्त्रीय विषयाचा उपयोग या मुद्द्यांच्या अनुषंगाने पुढील बाबींची चर्चा करू.

**समाजशास्त्राचे उपयोग**

**समाजशास्त्राचे उपयोग** (Uses of Sociology):

समाजशास्त्राचे विविध उपयोग कोणते याचे विवेचन या घटकात चार मुद्यांच्या आधारे केले आहे. (१) सामाजिक जीवनाचे शास्त्रीय आकलन करून घेण्यासाठी समाजशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग (२) सामाजिक धोरणांची आखणी आणि सामाजिक नियोजनासाठी समाजशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग (३) उपयोजित समाजशास्त्राची क्षेत्रे (४) विविध व्यवसायात प्रवेश करण्यासाठी समाजशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग.

**१) सामाजिक जीवनाचे आकलन करून घेण्यासाठी समाजशास्त्राचा उपयोग :**

कोणत्याही बाबतीतले अज्ञान ही व्यक्तीची कमतरता असते तर ज्ञान ही तिची शक्ती असते. ज्ञान ही शक्ती असते कारण ज्ञानाच्या आधारे आपण आपले जीवन अधिक चांगल्या पद्धतीने समजून घेऊ शकतो आणि त्यावर नियंत्रण ठेवता येणे शक्य होते. समाजशास्त्रीय ज्ञान सामाजिक वर्तन आणि सामाजिक जीवनाबद्दलची आपली समज समृद्ध बनविते. मानवी परस्परसंबंध, विविध सामाजिक संस्था, त्यांची कार्ये, समाजाची कार्यपद्धती, अर्थसंस्था, राजकारण, नोकरशाही, संस्कृती, सामाजिक विषमता, सामाजिक समस्या, सामाजिक चळवळी, सामाजिक परिवर्तन इ. सामाजिक जीवनाच्या विविध पैलूंविषयीचे शास्त्रीय ज्ञान समाजशास्त्र उपलब्ध करते. या ज्ञानामुळे आपल्या समाजाविषयीची आपली समज अधिक समृद्ध होते आणि याचा व्यक्ती आणि एकंदर समाज याना विविध प्रकारे उपयोग होतो. हा उपयोग पुढीलप्रकारे होऊ शकतो.

(१) समाजशास्त्रीय ज्ञानामुळे सभोवताली घडणाऱ्या सामाजिक घटना समजून घेण्याची मर्मदृष्टी प्राप्त होते. त्यामुळे व्यक्तीचा दृष्टीकोन अधिक व्यापक आणि विवेकी होतो.

(२) समाजशास्त्रीय ज्ञानामुळे विविध सामाजिक घटनांकडे व्यक्तीला वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून पाहता येते, स्वत:चे समाजातील स्थान, भूमिका याचे वास्तव भान येते. त्यामुळे आत्म-प्रबोधन होते आणि स्व-आकलन वाढते.

(३) समाजशास्त्रीय ज्ञानामुळे व्यक्तीला स्वत:चा समाज आणि सामाजिक जीवन यांचे यथार्थ आकलन होते. मॅक्स वेबरने असे म्हटले आहे की, व्यक्तीनी कोणती मूल्ये स्वीकारावीत हे कदाचित समाजशास्त्र सांगू शकणार नाही पण स्वत:च्या समाजातील ज्या बाबी व्यक्तींवर नियंत्रण आणतात आणि व्यक्तीला समाजात ज्या ज्या गोष्टी करणे शक्य आहे, त्यांची जाणीव मात्र समाजशास्त्रामुळे निश्चित होते.

(४) आपल्याच समाजातील इतर समूह आणि समुदायांच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनाची चांगली जाण समाजशास्त्रीय ज्ञानामुळे निर्माण होते. त्यामुळे इतरांच्या दृष्टिकोनातून वस्तुस्थितीकडे आपण पाहू शकतो. परिणामी इतरांच्या समस्या कोणत्या आहेत, आपण इतरांशी कसे व्यवहार केले पाहिजेत हे आपल्याला उमगते.

(५) समाजशास्त्रीय ज्ञानामुळे इतर समाजांच्या आणि समुदायांच्या संस्कृतीची आपल्याला माहिती होते. समाजा-समाजातील सांस्कृतिक साम्य-भेदांची माहिती होते. जीवन जगण्याचे वेगवेगळे मार्ग असू शकतात याची कल्पना येते. अशा प्रकारच्या ज्ञानामुळे इतर समाज आणि समुदायांविषयीचे आपले पूर्वग्रह नष्ट होण्यास मदत होते आणि स्वसमूहश्रेष्ठतावादी दृष्टिकोनाला लगाम बसतो.

(६) समाजशास्त्रीय ज्ञानामुळे विविध सामाजिक समस्यांचे स्वरूप, त्यांची कारणे, त्यांचे परिणाम इ. विषयीची जाणीव वाढते आणि त्यावरील उपाययोजना अंमलात आणणे सुकर होते.

(७) समाजशास्त्रीय ज्ञानाला शैक्षणिक मूल्य आहे. इतर समाजांच्या अनुभवांविषयीचे समाजशास्त्रीय ज्ञान आपल्या समाजात इच्छित बदल घडवून आणण्यास उपयुक्त ठरू शकते. तौलनिक समाजशास्त्रीय अभ्यासांद्वारे असे ज्ञान उपलब्ध होते.

(८) सामाजिक जीवनाच्या सर्वच क्षेत्रात समाजशास्त्रीय ज्ञानाचा व्यावहारिक उपयोग शक्य आहे. शासन, सार्वजनिक जीवन, प्रसार माध्यमे, आर्थिक क्षेत्रे, सामाजिक चळवळी, विविध भाषिक आणि वांशिक समूहांच्या समस्यांचे निराकरण आदी बाबतीत समाजशास्त्रीय ज्ञान उपयुक्त ठरू शकते असे पीटर हॅमिल्टन आणि केनेथ थॉमसन यांनी आपल्या ग्रंथात दाखवून दिले आहे.

**२) सामाजिक धोरणे आणि सामाजिक नियोजन यासाठी समाजशास्त्राचा उपयोग** (Use of Sociology for Formulation of Social Policies and Social Planning) :

आधुनिक काळातील सर्व देशातील सरकारे सामाजिक परिवर्तनाला योग्य ती दिशा देण्यासाठी, समाजात अपेक्षित बदल आणि प्रगती घडवून आणण्यासाठी, सामाजिक धोरणे आखतात आणि सामाजिक नियोजनाचा अवलंब करतात. सामाजिक जीवनाच्या एखाद्या विशिष्ट क्षेत्रात अपेक्षित दिशेने बदल घडवून आणण्यासाठी नेमके काय केले पाहिजे याविषयीच्या विचारपूर्वक निश्चित केलेल्या कल्पनांचा संच म्हणजे सामाजिक धोरण असे म्हणता येईल. 'सामाजिक नियोजन' या संज्ञेचा अर्थ 'सामाजिक धोरण' या संकल्पनेहून वेगळा आहे. धोरणात्मक निर्णयांची विधाने सर्वसामान्य स्वरूपाची असतात. पण सामाजिक नियोजनात मात्र कोणती मूर्त उद्दिष्ट्ये प्राप्त करावयाची आहेत, त्यासाठी कोणते कार्यक्रम राबवावे लागतील, ते कार्यक्रम कोणत्या पद्धतीने राबवावयाचे आहेत याविषयीची तपशीलवार माहिती तयार करावी लागते. सामाजिक नियोजनात उद्दिष्ट्ये ठरविणे, कार्यक्रम ठरविणे, त्यासाठी आवश्यक त्या साधनसामग्रीचा अंदाज बांधणे, योग्य तेवढी आर्थिक तरतूद करणे, नियोजनाप्रमाणे कार्यक्रमांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्याची रीत ठरविणे आदी बाबींचा अंतर्भाव होतो. सामाजिक धोरणांची निश्चिती करताना, सामाजिक नियोजनाच्या

प्रक्रियेत, तसेच सामाजिक धोरणांचे, सामाजिक नियोजनाचे आणि विविध शासकीय कार्यक्रमांचे मूल्यमापन करण्यासाठी समाजशास्त्राचा उपयोग होतो.

लोकसंख्याविषयक धोरण, आरोग्यविषयक धोरण, शिक्षणविषयक धोरण, रोजगारविषयक धोरण, घरबांधणी विषयक धोरण, ग्रामीण, नागरी आणि आदिवासींच्या विकासाविषयीची धोरणे, समाजातील कमकुवत गटांच्या (SCs, STs, Women and the Aged) विकासासाठीची धोरणे आणि दुष्ट सामाजिक प्रथांच्या (जसे हुंडा प्रथा, बालविवाह प्रथा, अंधश्रद्धा) निर्मूलनाविषयीची धोरणे आदी सामाजिक क्षेत्रात मोडणाऱ्या विविध धोरणांची आखणी करण्यासाठी समाजशास्त्रीय ज्ञानाचा विविध प्रकारे उपयोग होतो. उदा. – धोरणांच्या निश्चितीसाठी सद्यस्थिती नेमकी काय आहे, समस्यांचे नेमके स्वरूप काय आहे यासंबंधीची विश्वसनीय माहिती सामाजिक सर्वेक्षणाद्वारे समाजशास्त्रज्ञ उपलब्ध करून देतात. सर्वेक्षणाद्वारे सामाजिक नियोजनासाठी आवश्यक असलेली माहितीही समाजशास्त्रज्ञ उपलब्ध करून देऊ शकतात. त्याचप्रमाणे सामाजिक धोरणांचे, सामाजिक नियोजनाचे आणि शासनाच्या कल्याण किंवा विकास कार्यक्रमांचे नेमके कोणते परिणाम झाले? धोरणांची अंमलबजावणी, नियोजन केल्याप्रमाणे विकास कार्यक्रमांची प्रत्यक्षात अंमलबजावणी होत आहे किंवा नाही? योजनांचा लाभ ज्या समूहाना होणे अपेक्षित होते त्याना त्यांचा कितपत प्रत्यक्षात लाभ होतो? याविषयीही समाजशास्त्रीय संशोधने केली जातात. अशा अभ्यासाना मूल्यमापनात्मक अभ्यास (Evaluative studies) असे म्हणतात. मूल्यमापनात्मक अभ्यासाद्वारे जी माहिती उपलब्ध होते तिच्या आधारे धोरणांमध्ये, नियोजन प्रक्रियेमध्ये, अंमलबजावणीच्या शासकीय यंत्रणेमध्ये, तसेच विकास कार्यक्रमांमध्ये योग्य ते बदल केले जाऊ शकतात. म्हणजे सामाजिक धोरणे आखण्यासाठी, नियोजन करण्यासाठी, तसेच त्यांचे मूल्यमापन करून त्यात बदल सुचविण्यासाठी देखील समाजशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग होतो. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने राबविलेल्या समुदाय विकास योजना, एकात्मिक ग्रामीण विकासाची योजना, आदिवासी विकास कार्यक्रम अशा अनेक बाबींचे मूल्यमापनात्मक अभ्यास समाजशास्त्रज्ञानी केले आहेत.

### ३) **उपयोजित समाजशास्त्राची विविध क्षेत्रे** (Fields of Applied Sociology) :

या आधीच स्पष्ट केल्याप्रमाणे, उपयोजित शास्त्रात संकलित केलेल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या फायद्यासाठी करून घेतला जातो. उपयोजित समाजशास्त्रीय ज्ञानाचाही उपयोग सामाजिक जीवनात अपेक्षित बदल घडवून आणण्यासाठी आणि सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी केला जातो. 'शुद्ध' समाजशास्त्रात सामाजिक वस्तुस्थितीविषयीचे ज्ञान मिळविले जाते. उदा. समाजशास्त्रज्ञ शहरातील झोपडपट्टीचा अभ्यास करतात. झोपडपट्टीत नेमकी काय वस्तुस्थिती आहे? याविषयीचे ते निष्कर्ष काढतात. एखादा समाजशास्त्रज्ञ असे निष्कर्ष काढतो की, बहुसंख्य झोपडपट्टीवासीय ग्रामीण भागातून स्थलांतर करून आले आहेत, बहुतांशी झोपडपट्टीवासीय अनुसूचित जाती, जमाती, भूमीहीन आणि गरीब आहेत, झोपडपट्टीतील आरोग्यविषयक स्थिती अत्यंत खालावलेली आहे, त्यामुळे झोपडपट्टीवासीयांना विविध आजाराना वारंवार तोंड द्यावे लागते. अनेक झोपडपट्टीवासीय व्यसनांनी ग्रस्त आहेत, गुन्हेगारीचे प्रमाण अधिक आहे इ. हे संशोधन 'शुद्ध' समाजशास्त्रीय संशोधन आहे. कारण झोपडपट्टीतील वस्तुस्थिती नेमकी

काय आहे हे जाणून घेणे, एवढाच संशोधनाचा हेतू होता. पण एखाद्या समाजशास्त्रज्ञाने जर झोपडपट्टीच्या विकासाचा कार्यक्रम कसा आखता येईल, तेथील दारिद्र्य कसे नष्ट करता येईल, तेथील लोकांना कोणत्या व्यवसायांचे प्रशिक्षण देता येईल, गुन्हेगारी वर्तनावर कसे नियंत्रण राखता येईल या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी संशोधन करावयाचे ठरविले तर मात्र ते उपयोजित समाजशास्त्रीय संशोधन होईल. समाजशास्त्रज्ञ अनेक क्षेत्रात उपयोजित संशोधन करतात. उपयोजित समाजशास्त्राची अशी क्षेत्रे पुढीलप्रमाणे :

१) **सामाजिक अभियांत्रिकी** (Social Engineering) :

सामाजिक जीवनाचा आराखडा नव्याने तयार करता येईल, बिघडलेली सामाजिक परिस्थिती पूर्वपदावर आणता येईल, किंवा आपल्या नियोजनाप्रमाणे सामाजिक जीवनालाही शास्त्रीय ज्ञानाच्या आधारावर अपेक्षित वळण लावता येणे शक्य आहे, हे सामाजिक अभियांत्रिकीचे मुख्य गृहीतक आहे. ज्याप्रमाणे एखादा सिव्हिल इंजिनीयर घराच्या दुरूस्तीचा, पुलाच्या दुरूस्तीचा आराखडा तयार करतो त्याप्रमाणेच समाजशास्त्रज्ञ देखील समाजाच्या बिघडलेल्या स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठीचा आराखडा तयार करू शकतात. जे समाजशास्त्रज्ञ सामाजिक धोरणे आखण्यासाठी, सामाजिक नियोजन करण्यासाठी आणि समाजविकासाच्या विविध कार्यक्रमांची आखणी करण्यासाठी संशोधन करीत असतात, त्यांना एका अर्थाने 'सोशल इंजिनीअर्स' असे म्हणता येईल.

२) **समाज कार्य** (Social Work) :

समाजशास्त्र आणि समाज कार्य या दोहोंत भेद आहेत. या दोन स्वतंत्र ज्ञानशाखा आहेत. समाजकार्य ही समाजशास्त्राची उपयोजित शाखाच आहे, असे काही समाजशास्त्रज्ञ मानतात. याचे कारण असे की मूलभूत समाजशास्त्रीय संशोधनातून जे ज्ञान प्राप्त होते त्याचा व्यावहारिक उपयोग सामाजिक समस्या सोडविण्यासाठी समाजकार्यात होतो. समाजातील व्यक्तीना विविध समस्यानी ग्रासलेले असते. (उदा. मादक द्रव्याधीनता, कौटुंबिक कलह, विषमायोजनाच्या समस्या) त्याचप्रमाणे काही गंभीर सामाजिक समस्यानी समग्र समाजासमोरच काही आव्हाने तयार केलेली असतात. (उदा. गुन्हेगारी, हुंडाबळी, भ्रष्टाचार, एडस् इ.) प्रशिक्षित सामाजिक कार्यकर्ते अशा समस्यांची सोडवणूक करण्यासाठी समाजशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग करतात.

३) **व्यावहारिक सामाजिक संशोधन** (Applied Social Research) :

जे संशोधन व्यावहारिक सामाजिक समस्या सोडविण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून केले जाते ते व्यावहारिक सामाजिक संशोधन होय. अशा प्रकारचे संशोधन सामाजिक धोरण निश्चिती, सामाजिक नियोजन, विकास कार्यक्रमांची आखणी, समाजकार्य, जाहिरात संशोधन, बाजारपेठेचे संशोधन, माध्यम संशोधन अशा विविध क्षेत्रात केले जाते.

४) **कृतीशील समाजशास्त्र** (Action Sociology) :

हे उपयोजित समाजशास्त्राचे आणखी एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. कृतीशील समाजशास्त्रात, संशोधक समाजशास्त्रज्ञ स्वत:च विकास कार्यक्रमात सहभागी होतो आणि संशोधनही करीत असतो. एखाद्या समूहाच्या

प्रगतीसाठी एखादा कार्यक्रम राबविला जात असताना समाजशास्त्रज्ञ त्या प्रक्रियेत सहभाग घेतो, कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत कोणत्या अडचणी किंवा समस्या येतात याचे संशोधन करतो, त्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना सुचवितो, त्यांची पुन्हा अंमलबजावणी करीत असताना त्यातही तो सहभागी होत असतो. अशाप्रकारे कृतीशील समाजशास्त्रात प्रारंभी समस्यांचे निदान करणे, समस्या सोडविण्यासाठी नियोजन करणे, त्यासाठी कार्यक्रमाची आखणी करणे, त्याची अंमलबजावणी करणे, अंमलबजावणीतील समस्या शोधणे, त्यावर पुन्हा उपाय सुचविणे आणि पुन्हा त्यांची अंमलबजावणी करणे, कार्यक्रम पूर्ण झाल्यावर त्याचे मूल्यमापन करणे अशा सर्व टप्प्यांमध्ये समाजशास्त्रज्ञाचा सहभाग असतो. कृतीशील समाजशास्त्रज्ञ केवळ समाजशास्त्रज्ञच असत नाही तर तो परिवर्तनाचा घटक (change agent) देखील असतो. अलीकडच्या काळात कृतीशील समाजशास्त्राला खूपच महत्त्व आले आहे.

५) **रोगचिकित्सालयीन समाजशास्त्र** (Clinical Sociology) :

१९३१ मध्ये लुई वर्थ (Louis Wirth) यांनी 'Clinical Sociology' ही संज्ञा सर्वप्रथम वापरली. समाज कार्यकर्ते, मानसशास्त्रज्ञ आणि मनोचिकित्सा तज्ञ (Psychiatrists) यांच्या समवेत चिकित्सालयात काम करणाऱ्या समाजशास्त्रज्ञांच्या कार्याच्या संदर्भात या संज्ञेचा वापर करण्यात आला. रोगांचे निदान, उपचार, आरोग्य शिक्षण आणि संशोधन या चिकित्सालयीन कामांमध्ये समाजशास्त्रज्ञांचा सहभाग असतो. विशेषकरून परदेशातील चिकित्सालयांमध्ये हे दिसून येते. कामगारांच्या मनोधैर्याचा अभ्यास करून त्यात सुधारणा सुचविण्याचे कामही चिकित्सालयीन समाजशास्त्रज्ञ करतात.

अशाप्रकारे सामाजिक अभियांत्रिकी, समाजकार्य, उपयोजित सामाजिक संशोधन, कृतीशील समाजशास्त्र आणि रोगचिकित्सालयीन समाजशास्त्र ही उपयोजित समाजशास्त्राची काही महत्त्वपूर्ण क्षेत्रे आहेत.

**४) व्यावसायिक क्षेत्रातील विविध संधी प्राप्त करण्यासाठी समाजशास्त्राचा विद्यार्थ्यांना होणारा उपयोग (Use of Sociology for Students to Prepare for Variety of Careers)**:

समाजशास्त्रीय ज्ञान विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील व्यवसायात पदार्पण करण्यासाठी उपयुक्त ठरते. समाजशास्त्र हा एक व्यवसाय (Profession) आहे. कोणत्याही व्यवसायात आपल्याजवळील ज्ञान आणि कौशल्याचा आपल्या उदरनिर्वाहाचे साधन म्हणून वापर करून समाजातील विशिष्ट भूमिका व्यक्तींना वठवाव्या लागतात. समाजशास्त्रीय ज्ञानाचा विविध व्यवसायात पदार्पण करण्यासाठी विद्यार्थ्यांना उपयोग होतो. आजकाल एखाद्या विद्यार्थ्याने समाजशास्त्र विषयात बी. ए. अथवा एम. ए. ही पदवी मिळविली म्हणजे तेवढ्याच शैक्षणिक पात्रतेवर त्याला चांगली नोकरी मिळेल अशी शक्यता नाही. पण समाजशास्त्रातील पदवी (B.A.) किंवा पदव्युत्तर पदवी (M.A.) मिळवून, नंतर विविध क्षेत्रातील व्यवसायात पदार्पण करण्यासाठी आवश्यक असलेल्या स्पर्धा परीक्षांत यश मिळविले, किंवा विशिष्ट व्यवसायाशी निगडित असलेल्या अन्य पदव्या संपादन केल्या, तर मात्र विद्यार्थ्यांना अनेक क्षेत्रात रोजगाराच्या / व्यवसायांच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. आजचे युग हे स्पर्धेचे आणि एखाद्या क्षेत्रातील विशेष ज्ञानाला

महत्त्व असणारे युग आहे. आजच्या युगात समाजशास्त्राचे विद्यार्थी ज्या ज्या क्षेत्रात व्यवसायाच्या संधी शोधू शकतात अशी व्यवसायाची काही महत्त्वाची क्षेत्रे खाली दिलेली आहेत.

१) **अध्यापनाचे क्षेत्र** (The Field of Teaching) :

कनिष्ठ महाविद्यालये, वरिष्ठ किंवा ज्येष्ठ महाविद्यालये आणि विद्यापीठे या शैक्षणिक संस्थांमधून समाजशास्त्र विषयाचे शिक्षक म्हणून समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांना व्यवसायाची संधी उपलब्ध होऊ शकते. त्यासाठी शैक्षणिक अर्हतेच्या विहित अटी पूर्ण कराव्या लागतात. समाजशास्त्र विषयातील एम. ए. तसेच बी.एड्./एम.एड्. पदवी (कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक पदासाठी आवश्यक आहे.) एम. ए. नंतर यु.जी.सी. द्वारा घेतली जाणारी NET/SET परीक्षा उत्तीर्ण होणे, M.Phil. किंवा Ph.D. पदवी प्राप्त केलेली असणे, या अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारास वरिष्ठ महाविद्यालयात अथवा विद्यापीठात समाजशास्त्राचा अधिव्याख्याता म्हणून नोकरी मिळू शकते.

२) **सामाजिक संशोधन क्षेत्र** (The Field of Social Research) :

सामाजिक संशोधन करण्यात गुंतलेल्या काही संशोधन संस्था आहेत. एम.ए. समाजशास्त्र तसेच पीएच.डी. पदवी संपादन करून दर्जेदार समाजशास्त्रीय नियतकालिकात काही संशोधन लेखांचे प्रकाशन करणाऱ्या उमेदवारास सामाजिक संशोधनात गुंतलेल्या संस्थांमध्ये संशोधक म्हणून व्यवसायाची संधी उपलब्ध होऊ शकते.

३) **समाजकार्य** (Social Work) :

समाजशास्त्र विषयात पदवी परीक्षा उत्तीर्ण होऊन त्यानंतर समाज कार्य विषयातील पदव्युत्तर पदवी (MSW) प्राप्त केल्यानंतर सामाजिक कार्यकर्ता म्हणून शासनाच्या विविध विभागांमध्ये तसेच बिगर शासकीय संस्थांमध्ये व्यवसायाची संधी मिळू शकते.

४) **उद्योग आणि व्यापार क्षेत्र** (Jobs in Industries and Business Organizations):

समाजशास्त्र विषयातील पदवी किंवा पदव्युत्तर पदवी तसेच विशिष्ट व्यवसायाशी संबंधित असणारी आणखी एखादी पदवी असेल तर विविध खाजगी, सरकारी उद्योग तसेच व्यापारी संघटनांमध्ये कामगार कल्याण अधिकारी, व्यवस्थापक, संशोधन अधिकारी अशा व्यवसायाच्या संधी प्राप्त होऊ शकतात.

५) **सार्वजनिक प्रशासकीय सेवा क्षेत्र** (Public Administration) :

M.P.S.C. आणि U.P.S.C. या स्पर्धा परीक्षांसाठी समाजशास्त्र हा ऐच्छिक विषय निवडता येतो. प्रथम समाजशास्त्र विषयातील पदवी परीक्षा पास होऊन या स्पर्धा परीक्षांसाठी समाजशास्त्र हा एक वैकल्पिक विषय घेऊन या परीक्षेत यश संपादन केल्यास, राज्य आणि केंद्र शासनाच्या विविध प्रशासकीय विभागात सेवेची संधी उपलब्ध होऊ शकते.

**६) सल्लागार** (Job as Consultant) :

समाजशास्त्रज्ञ म्हणून ख्याती मिळविलेल्या तज्ञ समाजशास्त्रज्ञाना विविध शासकीय प्रकल्पांसाठी, आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये सल्लागार म्हणून काम करण्यासाठी निमंत्रित केले जाते.

**७) माध्यमातील व्यावसायिक संधी** (Jobs in Media) :

समाजशास्त्र विषयातील पदवी अगर पदव्युत्तर पदवी संपादन करून माध्यमविद्येतील व्यावसायिक पदवी (उदा. बी.जे.सी., एम.जे.सी., एम. ए. इन. मास कम्युनिकेशन) प्राप्त केल्यावर वर्तमानपत्रे, दूरचित्रवाहिन्या या क्षेत्रात पत्रकार, वार्ताहर, संपादक किंवा माध्यम संशोधक म्हणून व्यवसायाची संधी मिळू शकते.

**८) बिगर–शासकीय संस्थांमधील व्यावसायिक संधी** (Jobs in NGOs) :

आजकाल अनेक क्षेत्रात काम करणाऱ्या बिगर शासकीय सेवाभावी संस्था निर्माण झाल्या आहेत. या संस्था शिक्षण , समाजकल्याण, समाजातील कमकुवत गट, आदिवासी विकास, ग्रामीण विकास, आरोग्य आदी क्षेत्रात काम करतात. या संस्था विविध विकासप्रकल्प हाती घेतात. एखादा प्रकल्प हाती घेण्यासारखा आहे किंवा नाही, प्रत्यक्षात प्रकल्पाची अंमलबजावणी करणे, प्रकल्पाचे मूल्यमापन करणे यासाठी त्यांना मनुष्यबळाची गरज असते. समाजशास्त्र विषयात पदवी/पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना अशा बिगर–शासकीय सेवाभावी संस्थांमध्ये काम करण्याची संधी मिळू शकते.

**स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न** (Check Your Progress )

खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा :

१) 'Sociology' या शब्दाची भाषाशास्त्रीय व्युत्पत्ती सांगा.

२) एमिल दुरखीम यांची समाजशास्त्राची व्याख्या लिहा.

३) मॅक्स वेबर यांची समाजशास्त्राची व्याख्या लिहा.

४) मॅकायव्हर आणि पेज यांची समाजशास्त्राची व्याख्या लिहा.

५) 'सामाजिक क्रिया' या संज्ञेचा अर्थ सांगा.

६) सामाजिक आंतरक्रियांची तीन उदाहरणे द्या.

७) सामाजिक समूहांची तीन उदाहरणे द्या.

८) समाजशास्त्राच्या अभ्यासक्षेत्रात महत्त्वपूर्ण मानले जाणारे कोणतेही चार अभ्यास घटक सांगा.

९) समाजशास्त्रीय दृष्टिकोनाची कोणतीही दोन ठळक वैशिष्ट्ये सांगा.

१०) 'शास्त्र' या संज्ञेची व्याख्या द्या.

११) वरील विवेचनातील शास्त्राच्या तीन वैशिष्ट्यांची यादी करा.

१२) तथ्यांविषयीच्या कोणत्याही ज्ञानशाखेचे शास्त्रीयत्व कोणत्या बाबीने निर्धारित होते?

१३) शास्त्रीय पद्धतीतील प्रमुख अवस्था किंवा पायऱ्या कोणत्या?

१४) वस्तुनिष्ठ ज्ञान मिळविण्यासाठी शास्त्रज्ञाला काय करावे लागते?

१५) शास्त्रीय ज्ञानाचे संघटन कोणत्या स्वरूपात झालेले असते?

१६) शास्त्रीय ज्ञानाच्या वैशिष्ट्यांची यादी तयार करा.

१७) समाजशास्त्राच्या शास्त्रीय स्वरूपाबाबतच्या टीकेतील मुख्य मुद्दे कोणते होते?

१८) एक शास्त्र म्हणून समाजशास्त्राची कोणतीही चार प्रमुख वैशिष्ट्ये सांगा.

१९) सामाजिक विचाराचे कोणतेही तीन प्राचीन उगमस्त्रोत सांगा.

२०) मध्ययुगीन काळातील सामाजिक विचारांची दोन वैशिष्ट्ये सांगा.

२१) ऑगस्त कॉम्त पूर्वीच्या ज्या विचारवंतांच्या लिखाणात शास्त्रीय कल्पना आणि समाज आणि इतिहास याविषयीचा सुव्यवस्थित दृष्टिकोन दिसून येतो अशा दोन विचारवंतांची नावे लिहा.

२२) कोणत्या ग्रंथात ऑगस्त कॉम्तने 'Sociology' ही संज्ञा सर्वप्रथम वापरली?

२३) समाजशास्त्राच्या विकासातील कोणतेही चार सामाजिक,राजकीय आणि आर्थिक घटक सांगा?

२४) 'प्रबोधनयुगात' कोणत्या प्रमुख कल्पना (किंवा विचार) मांडण्यात आल्या?

२५) समाजशास्त्राच्या प्रारंभिक विकासातील कोणतेही तीन बौद्धिक-तात्त्विक घटक सांगा?

२६) ऑगस्त कॉम्तने समाजशास्त्राचा अभ्यासविषय कोणत्या दोन भागात विभागला?

२७) उत्क्रांतीचे नियम आणि समाजाविषयीच्या सेंद्रीय सिद्धांतासाठी कोण प्रसिद्ध आहे?

२८) वर्ग-संघर्ष विषयक सिद्धांतासाठी कोण प्रसिद्ध आहे?

२९) एमिल दुरखीम आणि मॅक्स वेबर यानी सांगितलेले समाजशास्त्राचे अभ्यासविषय कोणते?

३०) ज्यांच्या लिखाणाचा प्रभाव २० व्या शतकाच्या दुसऱ्या भागात प्रकर्षाने जाणवला अशा तीन समाजशास्त्रज्ञांची नावे लिहा?

३१) कोणत्याही तीन भारतीय समाजशास्त्रज्ञांची नावे लिहा.

३२) शास्त्राची प्रमुख दोन उद्दिष्ट्ये कोणती?

३३) समाजशास्त्रीय ज्ञानाचे व्यक्तीला होणारे कोणतेही दोन उपयोग सांगा.

३४) सामाजिक धोरणे ठरविताना समाजशास्त्रीय ज्ञानाचा कसा उपयोग होतो?

३५) उपयोजित समाजशास्त्राची कोणतीही तीन क्षेत्रे सांगा.

३६) समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होऊ शकणारी व्यवसायाची कोणतीही तीन क्षेत्रे सांगा.

## **१.३ सारांश** (Let Us Sum Up) :

या घटकात समाजशास्त्राची व्याख्या आणि अभ्यासविषय यांचा अभ्यास आपण केला. या घटकात आपण अभ्यासलेले ठळक मुद्दे खालीलप्रमाणे :

'समाजशास्त्र' (Sociology) ही संज्ञा सर्वप्रथम ऑगस्त कॉम्त या फ्रेंच तत्त्वज्ञाने त्याच्या 'Positive Philosophy' या ग्रंथात १८३९ साली वापरली. त्याला 'समाजशास्त्राचा जनक' म्हणून ओळखले जाते. 'Sociology' हा इंग्रजी शब्द 'socious' या लॅटिन आणि 'logos' (किंवा 'ology') या ग्रीक भाषेतील शब्दांपासून तयार झाला आहे. 'मानवी साहचर्याचा अभ्यास' असा Sociology या शब्दाचा अर्थ होतो. विविध समाजशास्त्रज्ञानी वेगवेगळी शब्दयोजना वापरून समाजशास्त्राची व्याख्या केली आहे. आपण समाजशास्त्राच्या विविध समाजशास्त्रज्ञानी केलेल्या व्याख्यांचा या घटकात अभ्यास केला आहे. व्याख्यांचा अभ्यास केला असता असे दिसून आले की, 'अभ्यासपद्धती' आणि 'अभ्यासविषय' या दोन मुद्यांच्या संदर्भात समाजशास्त्राच्या व्याख्या करण्यात आल्या आहेत. 'समाज', 'सामाजिक जीवन', 'सामाजिक घटना', 'सामाजिक संस्था', 'सामाजिक समूह', 'सामाजिक संरचना', 'सामाजिक क्रिया', 'सामाजिक आंतरक्रिया' आणि 'सामाजिक संबंध' अशा संज्ञा समाजशास्त्राच्या अभ्यास क्षेत्राचा निर्देश करण्यासाठी विविध व्याख्यांमधून वापरण्यात आल्या आहेत. वरील विविध बाबींचा अभ्यास शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करून समाजशास्त्रात होत असल्याचेही सर्वच व्याख्यांतून अधोरेखित करण्यात आले आहे.

समाजशास्त्राचा अभ्यासविषय विशद करताना प्रथम आपण ऑगस्त कॉम्त, एमिल दुरखीम, जॉर्ज सिम्मेल, मॅक्स वेबर आणि ॲलेक्स इंकेल्स यानी समाजशास्त्राच्या अभ्यासविषयासंबंधी व्यक्त केलेल्या विचारांचा थोडक्यात आढावा घेतला आहे. समाजशास्त्राच्या विविध व्याख्यांमधील अभ्यासविषयाबाबतचे मुद्दे आणि नामवंत समाजशास्त्रज्ञांची मते या दोहोंच्या आधारे समाजशास्त्रात महत्त्वाचे मानले गेलेले अभ्यासविषय कोणते हे आपण समजून घेतले आहे. समाजशास्त्राच्या अभ्यासविषयाचा गाभा मानले गेलेले हे मुद्दे पुढीलप्रमाणे : १) सामाजिक क्रिया आणि आंतरक्रियांचा अभ्यास, २) सामाजिक संबंधांचा अभ्यास, ३) सामाजिक संस्थांचा अभ्यास, ४) सामाजिक समूहांचा अभ्यास, ५) मानवी सामाजिक जीवनाचा अभ्यास आणि ६) समग्र समाजाचा अभ्यास.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनाच्या किंवा परिप्रेक्ष्याच्या (Sociological Perspective) प्रमुख वैशिष्ट्यांचाही अभ्यास आपण या घटकात केला आहे. समाजशास्त्राचा सामाजिक वास्तविकतेकडे पाहण्याचा एक विशिष्ट असा दृष्टिकोन आहे. या दृष्टिकोनाची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे : १) विशिष्ट सामाजिक घटनेच्या अभ्यासात समाजशास्त्राला स्वारस्य नाही; सामूहिक जीवनात वारंवार घडून येणाऱ्या घटनांच्या किंवा वर्तनप्रबंधांच्या अमूर्त लक्षणांच्या अभ्यासात समाजशास्त्राला स्वारस्य आहे, २) समाजाला तसेच समाजव्यवस्थेच्या घटकांना व्यक्तींहून निराळे स्वतंत्र अस्तित्व असून या बाबी संरचित असतात, तसेच समाज त्यातील व्यक्तींच्या बेरजेहून अधिक काहीतरी असतो, असा समाजशास्त्राचा दृष्टिकोन आहे, ३)

समूहाच्या संदर्भातच व्यक्तीवर्तनाचा अभ्यास समाजशास्त्रात होतो. (४) सूक्ष्मलक्ष्यी (Micro) तसेच समग्रलक्ष्यी (Macro) अशा दोन्ही दृष्टीनी सामाजिक वास्तविकतेचा अभ्यास समाजशास्त्रात होतो, तो सर्वसमावेशक (Holistic) तसेच सापेक्ष (Relative) अशा दोन्ही स्वरूपाचा असतो; गुणात्मक आणि संख्याशास्त्रीय अशा दोन्ही अभ्यासपद्धतींचा अवलंब त्यासाठी केला जातो, ५) सामाजिक शक्तींद्वारा व्यक्तींचे वर्तन कसे प्रभावित होते याचा जसा समाजशास्त्रात अभ्यास होतो त्याप्रमाणेच व्यक्तीच समाज जीवनाची निर्मिती आणि पुनर्निर्मिती कशी करतात व त्याद्वारे व्यक्तीचे वर्तन कसे प्रभावित होते याचाही अभ्यास समाजशास्त्रात होतो.

या घटकात आपण एक शास्त्र म्हणून समाजशास्त्राचे स्वरूप अभ्यासले आहे. समाजशास्त्राचे शास्त्रीय स्वरूप समजून घेण्यासाठी प्रारंभी आपण 'शास्त्र' या संज्ञेचा अर्थ, शास्त्रीय पद्धतीतील विविध अवस्था, शास्त्रीय ज्ञानाची वैशिष्ट्ये समजून घेतली. या पार्श्वभूमीवर समाजशास्त्राचे शास्त्रीय स्वरूप समजून घेताना प्रथम आपण समाजशास्त्राच्या शास्त्रीय स्वरूपाबाबत टीकाकारानी उपस्थित केलेले मुद्दे विचारात घेतले. या मुद्यांचे समाजशास्त्रज्ञानी केलेले खंडनही आपण विचारात घेतले. त्यानंतर एक शास्त्र म्हणून समाजशास्त्राचे स्वरूप स्पष्ट करणारे विविध मुद्दे आपण अभ्यासले. या घटकात ज्या मुद्यांचे आपण अध्ययन केले ते खालीलप्रमाणे -

१) कोणत्याही अनुभवनिष्ठ शास्त्रात तथ्यांचा अभ्यास होतो. तथ्यांचा अभ्यास करण्यासाठी शास्त्रीय पद्धतीचा अवलंब केला जातो. त्यामुळे संशोधन पद्धतीलाच विज्ञान मानले जाते. शास्त्रात ज्ञानाचे संघटन केले जाते.

२) सर्व शास्त्रांमध्ये संशोधन करण्यासाठी ज्या पद्धतीचा अवलंब केला जातो तिला शास्त्रीय पद्धती असे म्हणतात. शास्त्रीय संशोधन पद्धतीत काही अवस्था किंवा पायऱ्या असतात त्या अशा : (१) समस्या-सूत्रण (२) सिद्धांतकल्पना किंवा उद्दिष्टे निश्चित करणे (३) संशोधनाचा आराखडा तयार करणे (४) तथ्य-संकलन करणे (५) तथ्यांचे वर्गीकरण आणि विश्लेषण करणे (६) निष्कर्षांची मांडणी आणि अहवाल लेखन करणे.

३) (१) वस्तुनिष्ठता (२) प्रत्यंतरणक्षमता (३) नैतिक तटस्थता (४) नि:संदिग्धता आणि काटेकोरपणा / अचूकता (५) अमूर्तता (६) भविष्यकथनक्षमता आणि (७) व्यवस्थीकरण आणि संघटन ही शास्त्रीय ज्ञानाची वैशिष्ट्ये आहेत. हीच शास्त्रीय पद्धतीची किंवा शास्त्राची वैशिष्ट्ये मानली जातात.

४) आजकाल समाजशास्त्राला एक शास्त्र म्हणून मान्यता लाभली असली तरी प्रारंभीच्या काळात काही विद्वानांनी समाजशास्त्राच्या शास्त्रीय स्वरूपाबाबत टीका केली होती. या टीकेतील प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे - (१) अध्ययनात प्रयोग पद्धतीच्या अवलंबाचा आणि प्रयोगशाळांचा अभाव (२) वस्तुनिष्ठतेचा अभाव (३) काटेकोरपणा आणि अचूकतेचा अभाव (४) भविष्य कथनक्षमतेचा अभाव. समाजशास्त्राच्या अभ्यासविषयाचे गुंतागुंतीचे स्वरूप हे या टीकेचे मूळ कारण आहे.

५) पुढील वैशिष्ट्यांवरून समाजशास्त्राचे एक शास्त्र म्हणून असलेले स्वरूप अधिक स्पष्ट होते. - (१) निरीक्षणक्षम अभ्यासविषय (२) संशोधनासाठी शास्त्रीय पद्धतीचा अवलंब (३) समाजशास्त्रीय ज्ञान हे संघटित असते (४) समाजशास्त्रीय ज्ञान प्रत्यंतरणक्षम असते (५) नैतिक तटस्थता (६) समाजशास्त्र काही प्रमाणात भविष्यकथनही करू शकते (७) समाजशास्त्र हे अमूर्त स्वरूपाचे शास्त्र आहे (८) समाजशास्त्र मूलत: 'शुद्ध' शास्त्र आहे. (९) समाजशास्त्र हे आदर्शवादी विज्ञान नाही (१०) समाजशास्त्र हे सामान्य, साररूप विज्ञान आहे आणि (११) समाजशास्त्र एक सामाजिक शास्त्र आहे.

या घटकात आपण समाजशास्त्राचा उदय आणि प्रारंभिक काळातील विकास याविषयी थोडक्यात परिचय करून घेतला आहे. आपण अभ्यासलेले ठळक मुद्दे खालीलप्रमाणे :

समाजासंबंधीचे मानवाचे विचार फार जुने आहेत. पण समाजाविषयीचे शास्त्रीय विचार मात्र अलीकडच्या काळातीलच आहेत. प्राचीन काळातील प्लेटो, ॲरिस्टॉटल, कौटिल्य, कॉन्फ्युशियस अशा विचारवंतांनी लिहिलेल्या ग्रंथातून सामाजिक विचार मांडल्याचे दिसून येते. हे विचार समाज, अर्थव्यवस्था, राज्यसंस्था, कायदा, न्याय आदि सामाजिक विषयांबाबतचे होते. या प्राचीन विचारांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातून आदर्श समाजव्यवस्थेबद्दलचे चित्रण आढळून येते आणि त्याना शास्त्रीय बैठक मात्र नव्हती. मध्ययुगीन कालखंडातील सामाजिक विचार एकतर धार्मिक स्वरूपाचे होते आणि ते आध्यात्मिक स्वरूपाचे आणि स्वैर चिंतनावर आधारलेले होते. सोळाव्या शतकानंतरच्या कालखंडातील विचारवंतांचे विचार अधिक प्रगल्भ आणि सुव्यवस्थितरित्या मांडलेले दिसून येतात. हे विचार देखील प्रामुख्याने तत्त्वज्ञानात्मक (Philosophical) आणि आदर्शवादी (Idealistic) स्वरूपाचे होते. समाजशास्त्राच्या उदयापूर्वीचे दोन प्रमुख विचारवंत म्हणजे विको आणि माँटेस्क्यू. या दोन विचारवंताशिवाय रुसो, हेगेल, बोनाल्ड, मैस्त्रे, सैं सीमो या विचारवंतांच्या कल्पनांचा आणि तत्त्वज्ञानाचा समाजाविषयीचे आकलन अधिक समृद्ध होण्यासाठी तसेच समाजशास्त्राचा उदय आणि प्रारंभिक विकास यावर खूपच मोठा प्रभाव पडला होता.

औपचारिक अर्थाने एक स्वतंत्र शास्त्र म्हणून समाजशास्त्राचा उदय १९ व्या शतकात झाला. ऑगस्त कॉम्तने त्याच्या *'Positive Philosophy'* या ग्रंथात 'Sociology' ही संज्ञा सर्वप्रथम वापरली. तो समाजशास्त्राचा जनक मानला जातो. ढोबळ मानाने १७५० ते १८५० ही शंभर वर्षे (माँटेस्क्यूच्या लिखाणापासून ते कॉम्त आणि स्पेन्सरच्या लिखाणापर्यंतचा कालखंड) हा समाजशास्त्राच्या पूर्वेतिहासाचा कालखंड मानला जातो. या काळातील राजकीय तत्त्वज्ञान, इतिहासाचे तत्त्वज्ञान, उत्क्रांतिविषयक सिद्धांत आणि युरोपीय समाजातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घडामोडी या बाबीत समाजशास्त्राच्या उदयाची उगमस्थाने शोधता येतात.

समाजशास्त्राच्या विकासासाठी जबाबदार असणाऱ्या सामाजिक-राजकीय, आर्थिक आणि बौद्धिक-तात्विक घटकांचाही अभ्यास आपण या घटकाच्या दुसऱ्या विभागात केला. फ्रेंच राज्यक्रांती, औद्योगिक क्रांती आणि भांडवलशाहीचा उदय, नागरीकरण, समाजवाद, धार्मिक प्रवृत्तीतील बदल आणि नैसर्गिक शास्त्रांचा विकास हे समाजशास्त्राच्या विकासातील प्रमुख सामाजिक, राजकीय आणि आर्थिक घटक होते.

समाजशास्त्राच्या प्रारंभिक विकासावर बौद्धिक आणि तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील ज्या विचारप्रवाहांचा प्रभाव पडला त्यात प्रबोधन युगीन विचार, प्रत्यक्षवाद, उत्क्रांतीवाद आणि मानवतावाद यांचा अंतर्भाव होता.

ऑगस्त कॉम्त, हर्बर्ट स्पेन्सर, एमिल दुरखीम, कार्ल मार्क्स आणि मॅक्स वेबर या प्रमुख अभिजात कालखंडातील समाजशास्त्रज्ञांचे समाजशास्त्राचा उदय आणि प्रारंभिक विकासात मोलाचे योगदान होते. त्यांच्या योगदानाचा अल्पपरिचय आपण या घटकातील तिसऱ्या विभागात करून घेतला. समाजशास्त्राचा उदय फ्रान्समध्ये झाला आणि जर्मनी, इटली, इंग्लंड, अमेरिका आणि जगातील इतर देशातही समाजशास्त्राचा यथावकाश विकास झाला. ज्या समाजशास्त्रज्ञानी १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २० व्या शतकात समाजशास्त्राच्या विकासात मोलाचे योगदान दिले त्यापैकी निवडक विचारवंतांच्या नावांची आपण नोंद घेतली. प्रमुख भारतीय समाजशास्त्रज्ञांच्या नावांचीही आपण नोंद घेतली आहे.

या घटकात आपण समाजशास्त्राचे विविध उपयोग आणि समाजशास्त्र अभ्यासाचे महत्त्व कोणते याचा अभ्यास केला आहे. आपण अभ्यासलेले प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे –

समाजशास्त्र मानवी जीवनासाठी एक अत्यंत महत्त्वाचे शास्त्र आहे. समाजशास्त्राची व्यापकता प्रचंड आहे. मानवी जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे. समाजशास्त्राचे महत्त्व समजून घेत असताना समाजशास्त्रानी विवेकी दृष्टीकोनाचे आणि वैज्ञानिक तटस्थतेचे व्यक्तीला आकलन होणे गरजेचे आहे म्हणून सदर अभ्यासाचे महत्त्व समजून घेता येईल.

सामाजिक जीवनाचे शास्त्रीय आकलन करून घेण्यासाठी समाजशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग होतो. समाजशास्त्रीय ज्ञानामुळे व्यक्तीचा दृष्टिकोन अधिक व्यापक, विवेकी आणि वस्तुनिष्ठ होतो. समाज आणि सामाजिक जीवनाचे यथार्थ आकलन होते. आपल्या समाजातील इतर समूह आणि समुदायांच्या सामाजिक–सांस्कृतिक जीवनाची चांगली जाण निर्माण होते. इतरांच्या दृष्टिकोनातून आपण वस्तुस्थितीकडे पाहू शकतो. इतरांशी कसे व्यवहार केले पाहिजेत हे आपल्याला उमगते. समाजशास्त्रीय ज्ञानामुळे इतर समाजांच्या आणि समुदायांच्या संस्कृतीची आपल्याला माहिती होते. त्यामुळे इतर समाजांबद्दलचे/समुदायांबद्दलचे आपले पूर्वग्रह नाहीसे होण्यास मदत होते. सामाजिक समस्यांविषयीची चांगली जाणीव समाजशास्त्रीय ज्ञानामुळे होते आणि त्यावरील उपाययोजना अंमलात आणणे सुलभ होते. समाजशास्त्रीय ज्ञानाला शैक्षणिक मूल्यही आहे. सार्वजनिक जीवनाच्या सर्वच क्षेत्रात समाजशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग होऊ शकतो.

सामाजिक धोरणे ठरविणे, सामाजिक नियोजन करणे यासाठीदेखील समाजशास्त्राचा उपयोग होतो. सामाजिक सर्वेक्षणातून उपलब्ध होणारी माहिती विविध सामाजिक धोरणांच्या निश्चितीसाठी आणि सामाजिक नियोजनासाठी तसेच समाज विकासाचे विविध कार्यक्रम ठरविण्यासाठी उपयुक्त ठरते. सामाजिक धोरणांचे, सामाजिक नियोजनाचे आणि विकास कार्यक्रमांचे मूल्यमापन करण्यासाठी आणि संबंधित बाबींमध्ये सुधारणा करण्यासाठीही समाजशास्त्रीय संशोधने उपयुक्त ठरतात.

सामाजिक अभियांत्रिकी, समाज–कार्य, उपयोजित सामाजिक संशोधन, कृतीशील समाजशास्त्र आणि रोगचिकित्सालयीन समाजशास्त्र ही उपयोजित समाजशास्त्राची विविध क्षेत्रे आहेत.

समाजशास्त्राचे अध्ययन करून पदवी आणि पदव्युत्तर पदवी मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना व्यवसायाची निरनिराळी क्षेत्रे उपलब्ध आहेत. मात्र त्यासाठी आजकाल समाजशास्त्र विषयातील पदवी व्यतिरिक्त संबंधित व्यवसायक्षेत्रातील प्रशिक्षणाचीही पदवी असणे आवश्यक ठरत आहे. समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांना ज्या क्षेत्रात व्यवसायाच्या संधी उपलब्ध होऊ शकतात अशी काही क्षेत्रे पुढीलप्रमाणे : अध्यापनाचे क्षेत्र, सामाजिक संशोधाचे क्षेत्र, समाजकार्याचे क्षेत्र, उद्योग आणि व्यापारी संस्था, राज्य आणि केंद्र सरकारच्या सार्वजनिक प्रशासकीय सेवा, सल्लागार म्हणून विविध संस्थातील कामे, प्रसार माध्यमातील व्यवसाय आणि बिगर शासकीय संस्थांमधील रोजगाराच्या संधी.

## **१.४ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे** (Answers to Check Your Progress) :

१) 'Sociology' हा शब्द 'Socius' या लॅटिन आणि 'logos' या ग्रीक भाषेतील शब्दांपासून तयार झालेला इंग्रजी भाषेतील संकरित शब्द आहे.

२) ''संस्था, त्यांची उगमस्थाने आणि त्यांचे कार्य यांच्याविषयीचे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र'' अशी एमिल दुरखीम यांनी समाजशास्त्राची व्याख्या केली आहे.

३) ''सामाजिक क्रियांचे अन्वयार्थात्मक आकलन करण्याचा प्रयत्न करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र होय.'' अशी मॅक्स वेबर यांनी समाजशास्त्राची व्याख्या केली आहे.

४) समाजशास्त्र हे 'सामाजिक संबंधांचा', सामाजिक संबंधांच्या जाळ्याचा अभ्यास करणारे शास्त्र आहे, सामाजिक परस्परसंबंधाच्या जाळ्यालाच आपण 'समाज' म्हणतो. अशी मॅकायव्हर आणि पेज यांनी समाजशास्त्राची व्याख्या केली आहे.

५) इतर व्यक्तींच्या वर्तनाच्या संदर्भात, इतराना अनुलक्षून केलेली आणि कर्त्याच्या दृष्टीने अर्थपूर्ण असणारी कृती म्हणजे सामाजिक क्रिया होय.

६) वडील आणि मुलगा यांच्यातील संवाद, राजकीय नेत्याची पत्रकार परिषद आणि दोन संघातील क्रिकेटचा सामना ही सामाजिक आंतरक्रियांची तीन उदाहरणे आहेत.

७) कुटूंब, राजकीय पक्ष आणि कामगार संघटना ही सामाजिक समूहांची तीन उदाहरणे आहेत.

८) समाजशास्त्राच्या अध्ययनकक्षेतील चार महत्त्वपूर्ण विषय पुढीलप्रमाणे : १) सामाजिक क्रियांचा आणि आंतरक्रियांचा अभ्यास, २) सामाजिक संबंधांचा अभ्यास, ३) सामाजिक संस्थांचा अभ्यास, ४) समग्र समाजाचा अभ्यास.

९) समाजशास्त्रीय दृष्टिकोनाची (परिप्रेक्ष्याची) दोन ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे : १) सामूहिक जीवनात वारंवार घडून येणाऱ्या घटनांच्या किंवा वर्तनप्रबंधांच्या अमूर्त वैशिष्ट्यांच्या अभ्यासात समाजशास्त्राला विशेष स्वारस्य आहे. २) समाज, सामाजिक संस्था आणि सामाजिक संबंध या बाबीना संरचना असते असा समाजशास्त्राचा दृष्टिकोन आहे.

१०) ''शास्त्रीय पद्धतीने मिळविलेल्या घटनांच्या किंवा तथ्यांच्या ज्ञानाचे सुव्यवस्थित संघटन म्हणजे शास्त्र होय'' अशी के.टी. बसंतानी यांनी शास्त्र या संज्ञेची व्याख्या केली आहे.

११) शास्त्राची तीन वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे - १) शास्त्र म्हणजे तथ्यांविषयीचे ज्ञान होय. २) तथ्यांविषयीचे ज्ञान शास्त्रीय पद्धतीने मिळविलेले असते. ३) शास्त्रीय ज्ञान विस्कळित नसून ते सुसंघटित असते.

१२) तथ्यांविषयीच्या कोणत्याही ज्ञानशाखेचे शास्त्रीयत्व ज्ञान मिळविण्यासाठी वापरलेल्या अभ्यासपद्धतीवर अवलंबून असते; त्या ज्ञानशाखेच्या अभ्यासविषयावर ते अवलंबून नसते.

१३) (१) समस्यासूत्रण (२) सिद्धांतकल्पनांची निश्चिती (३) संशोधनाचा आराखडा विकसित करणे (४) तथ्य संकलन करणे (५) तथ्यांचे वर्गीकरण आणि विश्लेषण करणे (६) निष्कर्षांची मांडणी आणि अहवाल लेखन या शास्त्रीय पद्धतीतील प्रमुख पायऱ्या किंवा अवस्था आहेत.

१४) वस्तुनिष्ठ ज्ञान मिळविण्यासाठी शास्त्रज्ञाला त्याच्या सर्व पूर्व-कल्पना, पूर्वग्रह, श्रद्धा, व्यक्तिगत मूल्ये, हितसंबंध आणि आवडी-निवडी या बाबींना जाणीवपूर्वक बाजूला ठेवून घटनांचे निरीक्षण करावे लागते.

१५) शास्त्रीय संकल्पना, सामान्यीकरणे, शास्त्रीय नियम आणि सिद्धांत या स्वरूपात शास्त्रीय ज्ञानाचे संघटन झालेले असते.

१६) शास्त्रीय ज्ञानाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे : (१) वस्तुनिष्ठता (२) प्रत्यंतरणक्षमता (३) नि:संदिग्धता आणि अचूकता (४) नैतिक तटस्थता (५) अमूर्तता (६) भविष्यकथनक्षमता (७) व्यवस्थीकरण आणि संघटन.

१७) समाजशास्त्राच्या शास्त्रीय स्वरुपाबाबतच्या टीकेतील प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे : (१) अध्ययनात प्रयोग पद्धतीच्या अवलंबाचा आणि प्रयोगशाळांचा अभाव (२) वस्तुनिष्ठतेचा अभाव (३) काटेकोरपणा आणि अचूकतेचा अभाव आणि (४) भविष्यकथनक्षमतेचा अभाव.

१८) एक शास्त्र म्हणून समाजशास्त्राची चार प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे : (१) निरीक्षणक्षम अभ्यासविषय (२) शास्त्रीय संशोधन पद्धतीचा वापर (३) प्रत्यंतरणक्षम ज्ञान आणि (४) नैतिक तटस्थता

१९) प्लेटोचा 'Republic' ॲरिस्टॉटलचा 'Ethics' आणि 'Politics' आणि कौटिल्याचा 'Arthashastra' हे सामाजिक विचारांचे तीन प्राचीन उगमस्त्रोत आहेत.

२०) मध्ययुगीन काळातील विचारांची दोन प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे (१) हे विचार धार्मिक स्वरूपाचे होते आणि (२) ते प्रामुख्याने आध्यात्मिक आणि स्वैर चिंतनावर आधारलेले होते.

२१) विको आणि मॉंटेस्क्यू हे कॉम्तपूर्वीचे असे विचारवंत होते की ज्यांच्या लिखाणात शास्त्रीय संकल्पना आणि समाजाविषयीचा सुव्यवस्थित दृष्टिकोन दिसून येतो.

२२) 'Positive Philosophy' (1839) या ग्रंथात कॉम्तने 'Sociology' ही संज्ञा सर्वप्रथम वापरली.

२३) फ्रेंच राज्यक्रांती, औद्योगिक क्रांती आणि भांडवलशाहीचा उदय, नागरीकरण आणि समाजवादी विचारसरणी हे समाजशास्त्राच्या प्रारंभिक विकासातील चार घटक होते.

२४) मानवी मन (बुद्धी) जगाचे आकलन करून घेण्यास सक्षम आहे, नैसर्गिक तसेच सामाजिक वास्तविकतेचे ज्ञान करून घेण्यासाठी विवेक आणि निरीक्षण यांच्या समन्वयाचा (शास्त्रीय पद्धतीचा) अवलंब करणे आवश्यक आहे, मानवी जीवनाच्या सर्व पैलूंचे आणि कृतींचे चिकित्सक परीक्षण केले पाहिजे, आणि विवेक आणि विज्ञान या दोहोंच्या माध्यमातून मानवी प्रगती आणि मानव कल्याण साधता येईल या प्रबोधन युगातील चार प्रमुख कल्पना आहेत.

२५) प्रबोधन युग, प्रत्यक्षवाद आणि उत्क्रांतीवाद हे समाजशास्त्राच्या प्रारंभिक विकासातील तीन प्रमुख बौद्धिक-तात्त्विक घटक आहेत.

२६) सामाजिक स्थितीशास्त्र आणि सामाजिक गतिशास्त्र (Social Statics and Social Dynamics) अशा दोन भागात कॉम्तने समाजशास्त्राच्या अभ्यासविषयाची विभागणी केली.

२७) हर्बर्ट स्पेन्सर हा समाजशास्त्रज्ञ उत्क्रांतीचे नियम आणि समाजाबद्दलच्या सेंद्रीय सिद्धांतासाठी सुप्रसिद्ध आहे.

२८) कार्ल मार्क्स हा त्याच्या वर्ग-संघर्ष विषयक सिद्धांतासाठी सुप्रसिद्ध आहे.

२९) दुरखीमने 'सामाजिक तथ्ये' (Social Facts) तर मॅक्स वेबरने 'सामाजिक क्रिया' (Social Action) हा समाजशास्त्राचा अभ्यासविषय असल्याचे प्रतिपादन केले आहे.

३०) जॉर्ज होमान्स (१९१०-१९८९), सी. राईट मिल्स (१९१६-१९६२) आणि टालकॉट पार्सन्स (१९०२-१९७९) या विचारवंतांच्या विचारांचा समाजशास्त्रावरील प्रभाव २० व्या शतकाच्या दुसऱ्या भागात प्रकर्षाने जाणवला.

३१) जी. एस. घुर्ये, आर. के. मुखर्जी आणि एम. एन. श्रीनिवास हे तीन भारतीय समाजशास्त्रज्ञ आहेत.

३२) घटना समजून घेण्यासाठी ज्ञान संपादन करणे आणि समाजात सुधारणा किंवा प्रगती घडवून आणण्यासाठी ज्ञान मिळविणे किंवा ज्ञानाचा उपयोग करणे ही शास्त्राची दोन उद्दिष्ट्ये आहेत.

३३) समाजशास्त्रीय ज्ञानामुळे व्यक्तीचा दृष्टिकोन व्यापक आणि विवेकी बनतो आणि व्यक्ती वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून सामाजिक वास्तवाचे आकलन करून घेऊ शकते, हे समाजशास्त्रीय ज्ञानाचे व्यक्तीला होणारे दोन उपयोग आहेत.

३४) सामाजिक धोरणे आखण्यासाठी आवश्यक असलेली मूलभूत माहिती सामाजिक सर्वेक्षणातून उपलब्ध होते आणि सामाजिक धोरणांचा प्रभाव अभ्यासण्यासाठी किंवा मूल्यमापन करण्यासाठी समाजशास्त्रीय संशोधने उपयुक्त ठरतात. याप्रकारे सामाजिक धोरणे ठरविताना समाजशास्त्राचा उपयोग होतो.

३५) सामाजिक अभियांत्रिकी, समाजकार्य आणि उपयोजित सामाजिक संशोधन ही उपयोजित समाजशास्त्राची तीन क्षेत्रे आहेत.

३६) अध्यापन क्षेत्र, सामाजिक संशोधनाचे क्षेत्र आणि राज्य आणि केंद्र शासनाच्या विविध प्रशासकीय सेवा ही समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांना उपलब्ध असणारी तीन व्यवसायक्षेत्रे आहेत.

## **१.५ सरावासाठी प्रश्न / गृहपाठ** (Exercise / Home Assignment) :

खालील प्रश्नांची उत्तरे तयार करा.

१) समाजशास्त्राची व्याख्या देऊन तिचा अर्थ स्पष्ट करा.

२) समाजशास्त्राचा अभ्यासविषय स्पष्ट करा.

३) समाजशास्त्रीय दृष्टिकोनाची (परिप्रेक्ष्याची) ठळक वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

४) 'शास्त्र' या संज्ञेची व्याख्या देऊन शास्त्राच्या तीन प्रमुख वैशिष्ट्यांचे स्पष्टीकरण करा.

५) शास्त्रीय संशोधन पद्धतीतील प्रमुख अवस्थांचे वर्णन करा.

६) शास्त्रीय ज्ञानाच्या वैशिष्ट्यांचे स्पष्टीकरण करा.

७) एक शास्त्र म्हणून समाजशास्त्राच्या वैशिष्ट्यांचे स्पष्टीकरण करा.

८) समाजशास्त्राच्या उदयापूर्वीच्या सामाजिक विचारांच्या इतिहासाचा सारांश थोडक्यात लिहा.

९) समाजशास्त्राच्या प्रारंभिक विकासातील सामाजिक, राजकीय आणि आर्थिक घटकांचे स्पष्टीकरण करा.

१०) समाजशास्त्राच्या प्रारंभिक विकासातील बौद्धिक-तात्विक घटकांचे स्पष्टीकरण करा.

११) कोणत्याही तीन अभिजात समाजशास्त्रज्ञांच्या समाजशास्त्राच्या प्रारंभिक विकासातील योगदानाची थोडक्यात रूपरेषा द्या.

१२) समाजशास्त्रीय ज्ञानाचा सामाजिक जीवनाचे आकलन करून घेण्यासाठी कसा उपयोग होतो हे स्पष्ट करा?

१३) सामाजिक धोरणे आणि सामाजिक नियोजन या संदर्भात समाजशास्त्राची उपयुक्तता कशी आहे हे सांगा?

१४) उपयोजित समाजशास्त्राच्या विविध क्षेत्रांचे थोडक्यात विवेचन करा?

१५) समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेली व्यवसायाची विविध क्षेत्रे विशद करा.

## १.६ चिंतन आणि कृती (Reflection and Action) :

आपल्याला परिचित असलेल्या समाजशास्त्र विषयाच्या शिक्षकांशी चर्चा करा आणि भारतातील आणि महाराष्ट्रातील प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञांच्या नावांची यादी तयार करा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings) :


१) साळुंखे सर्जेराव : समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना, नरेंद्र प्रकाशन, पुणे, २००३.

२) Rawat, H.K. : *Sociology,* Rawat Publications, Jaipur, 2007.

३) Inkeles Alex : *What is Sociology?,* Inglewood Cliffs, Inc., Prentice Hall, New Delhi 1964.

४) Shankar Rao C.N. : *Sociology (5th Edition),* S. Chand and Co. Ltd., New Delhi, 2006.

५) Johnson, Harry M. : *Sociology - A Systematic Introduction,* Allied Publishers, Pvt. Ltd., Bombay New 1970.

६) Tischler, H.L., Whitten, Phillip & Hunter, David E.K. : *Introduction to Sociology,* Holt, Rinehart and Winston, 1983.

७) Geoge Ritzer : Sociological Theory, (5th Edition) International Edition, 2000

८) Peter Hamilton and Keneth Thompson : The Uses of Sociology, Blackwell Publishing, UK, 2002.


❑❑❑

## घटक–२
# समाजशास्त्रामधील मूलभूत संकल्पना
(Basic Concepts in Sociology)

**घटक–संरचना :**

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ विषय – विवेचन

२.२.१ सामाजिक आंतरक्रिया : अर्थ आणि प्रकार

२.२.२ समाज : अ) मानवी समाजाचा अर्थ आणि वैशिष्ट्ये

ब) समाजाचे प्रकार

स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

२.३ सारांश

२.४ स्वयं–अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे

२.५ सरावासाठी प्रश्न

२.६ चिंतन आणि कार्य

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.० उद्दिष्ट्ये (Objectives) :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला :

- सामाजिक आंतरक्रियेचा अर्थ आणि प्रकार समजून घेता येईल.
- मानवी समाजाचा अर्थ आणि वैशिष्ट्ये समजून घेता येतील.
- समाजाचे प्रकार समजून घेता येईल.

## २.१ प्रस्तावना (Introduction) :

समाजशास्त्रामध्ये 'सामाजिक आंतरक्रिया' (Social Interaction) ही एक महत्त्वाची संकल्पना आहे. समाज म्हणजे सामाजिक संबंधाचे जाळे होय. हे जाळे आंतरक्रिया करणाऱ्या व्यक्तीमधील संबंधांनी बनलेले

असते. म्हणूनच आंतरक्रिया हा मानवी समाजाचा महत्त्वाचा पैलू आहे. सामाजिक आंतरक्रिया हाच मानवी सामाजिक जीवनाचा महत्त्वाचा आधार आहे. व्यक्ती ही एकटी स्वतंत्रपणे राहू शकत नाही. व्यक्तीला कोणत्या तरी सामाजिक समूहाचा सभासद असणे गरजेचे असते. तिला समूहातील सदस्यांबरोबर आंतरक्रिया कराव्या लागतात. सामाजिक आंतरक्रियांशिवाय सामाजिक जीवन अशक्यच आहे. जर आंतरक्रिया होत नसतील तर समाजही अस्तित्वात राहू शकणार नाही. तात्पर्य सामाजिक आंतरक्रिया ही सामाजिक जीवनातील एक महत्त्वाची बाब आहे. या पार्श्वभूमीवर आपण 'सामाजिक आंतरक्रिया' ही संकल्पना समजून घेणार आहोत. या घटकात आपण 'सामाजिक आंतरक्रियेचा अर्थ, व्याख्या वैशिष्ट्ये आणि प्रकार यांचा अभ्यास करणार आहोत.

## २.२ विषय – विवेचन (Presentation of Subject-matter) :

या घटकात पहिल्या विभागात समाजशास्त्रज्ञांनी 'सामाजिक आंतरक्रिया' या संज्ञेच्या केलेल्या व्याख्यांच्या आधारे त्या संज्ञेचा अर्थ स्पष्ट करून सामाजिक आंतरक्रियेच्या पूर्वअटी आणि स्वरूप स्पष्ट करण्यात आले आहे. दुसऱ्या भागात, सहकार्य, स्पर्धा, संघर्ष, समायोजन, समावेशन आणि विनिमय या सामाजिक आंतरक्रियांच्या प्रकारांची / रुपांची किंवा सामाजिक प्रक्रियांची चर्चा केली आहे. सुरुवातीला आपण सामाजिक आंतरक्रियेचा अर्थ आणि स्वरुप समजून घेऊया. त्याचबरोबर आंतरक्रियेचे प्रकार मानवी समाज आणि मानवी समाजाचे स्वरूप समजून घेणार आहोत.

### २.२.१ सामाजिक आंतरक्रिया अर्थ आणि प्रकार

**सामाजिक आंतरक्रिया : व्याख्या आणि स्वरूप – लक्षणे** (Social Interaction : Definitions and characteristic features) :

'सामाजिक आंतरक्रिया' या संकल्पनेच्या काही सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्या खाली दिलेल्या आहेत. या व्याख्यांचा अर्थ स्पष्ट करून सामाजिक आंतरक्रियांचे स्वरूप आपण समजून घेऊ.

**अ) सामाजिक आंतरक्रिया : व्याख्या** (Social Interaction : Definitions) :

**१) शेपर्ड, ओडोम आणि ब्रुटन :– ''जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती परस्परांचे वर्तन प्रभावित करतात तेव्हा सामाजिक आंतरक्रिया अस्तित्वात येते.''** ("Social interaction exists when two or more persons mutually influence each other's behaviour" - Shepard, Odom and Bruton)

**२) टिशलेर, व्हायटन आणि हंटर :– ''जेव्हा एका व्यक्तीच्या क्रियेचा (वर्तनाचा) किमान दुसऱ्या एखाद्या व्यक्तीच्या क्रियेवर (वर्तनावर) प्रभाव पडतो तेव्हा आंतरक्रिया घडून येते.''** ("When the actions of one individual affect the actions of at least one other individual, interaction... is taking place" - Tischler, Whitten and Hunter)

**३) ड्रेसलर आणि विलिस :–** **''जेव्हा जेव्हा मानवी व्यक्ती इतर व्यक्तीच्या क्रियांना प्रतिक्रिया करतात तेव्हा घडून येणाऱ्या प्रक्रियेला मानवी आंतरक्रिया असे म्हणतात.''** ("Human interaction is the process that occurs whenever human beings respond to the actions of other human beings" - David Dressler and William M. Willis - Jr.)

**४) मेरिल आणि एल्डरेज :–** **''ज्या दोन किंवा अधिक व्यक्तीत अर्थपूर्ण सामाजिक संपर्क प्रस्थापित होतो व त्याचा परिणाम म्हणून त्यांची वर्तने थोड्याफार प्रमाणात का होईना बदलतात. अशा सामान्य प्रक्रियेला सामाजिक आंतरक्रिया म्हणतात.''** ("Social interaction is the general process whereby two or more persons are in meaningful contact, as a result of which their behaviours are modified however slightly" - Merill and Eldridge)

**५) ब्रूम आणि सेल्झनिक :–** **''इतरांची जाणीव ठेऊन आणि इतरांच्या प्रतिक्रियांशी आपल्या प्रतिक्रिया जुळवून घेऊन वर्तन करण्याच्या प्रक्रियेला सामाजिक आंतरक्रिया असे म्हणतात.''** ("The process of acting in awareness of others and adjusting responses to the way other respond is called social interaction" - Broom and Selznick)

**६) डॉसन आणि गेट्टीज :–** **''सामाजिक आंतरक्रिया ही एक अशी प्रक्रिया आहे की ज्यामध्ये व्यक्ती एकमेकांच्या मनात शिरकाव करतात.''** ("Social interaction is a process whereby men interpenetrate the minds of each other" - Dawson and Gettys)

**७) गिस्ट :–** **''आंतर–उद्दीपन आणि प्रतिक्रियांद्वारे ज्यात व्यक्ती परस्परांवर प्रभाव पाडतात त्या क्रियेला सामाजिक आंतरक्रिया असे म्हणतात.''** ("Social interaction is a reciprocal influnce human beings exert on each other through inter-stimulation and response" - Gist)

वरील व्याख्यांचे दोन ते तीन वेळा काळजीपूर्वक अध्ययन केल्यावर असे लक्षात येईल की या व्याख्या सामाजिक आंतरक्रियांच्या पूर्वावश्यकता (Pre-requisites), अर्थ आणि स्वरुप या संबंधीच्या काही ठळक बाबींवर विशेष भर देतात. आता आपण सामाजिक आंतरक्रियेच्या वरील व्याख्यामधील प्रमुख मुद्दे विचारात घेऊन सामाजिक आंतरक्रियेचे स्वरूप समजून घेऊ.

**ब) सामाजिक आंतरक्रियांची स्वरूप – लक्षणे** (Characteristic features of social interacation)**:**

**१) कमीत कमी दोन व्यक्तींची आवश्यकता** (Minimum requirment of two persons)**:–** सामाजिक आंतरक्रिया अस्तित्वात येण्यासाठी कमीत कमी दोन व्यक्तींची आवश्यकता असते. दोनपेक्षा कितीही अधिक व्यक्ती आंतरक्रियेमध्ये सहभागी असू शकतात.

**२) परस्परांची जाणीव** (Mutual Awareness) **:–** व्यक्तींमध्ये अन्योन्य किंवा परस्परांविषयीची जाणीव असलीच पाहिजे. सामाजिक आंतरक्रिया घडून येण्यासाठीची ही दुसरी महत्त्वाची आवश्यकता किंवा

गरज आहे. समजा एखाद्या बसस्थानकावरती दोन अनोळखी व्यक्ती उभ्या आहेत त्यांना परस्परांची जाणीव नसेल तर त्यांच्यामध्ये आंतरक्रिया घडून येणार नाही.

३) **परस्परांना उद्देशून वर्तन करणे** (Mutually Directed Behaviour) **:–** सामाजिक आंतरक्रिया घडून येण्यासाठी एका व्यक्तीने एखाद्या प्रकारचे वर्तन हे दुसऱ्याला उद्देशून केलेच पाहिजे व दुसऱ्या व्यक्तीने त्याला प्रतिसाद दिलाच पाहिजे. ही आंतरक्रिया घडून येण्यासाठीची तिसरी महत्त्वाची आवश्यकता आहे. समजा बसस्थानकावरील एखाद्या व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला 'बस केव्हा येणार आहे?' असे विचारले आणि त्या व्यक्तीने पहिल्या व्यक्तीच्या प्रश्नाला कोणतेही उत्तर (उदा. 'बसची वेळ सांगणे', 'माहित नाही' असे सांगणे किंवा नकारार्थी मान डोलावणे) दिले तर त्यांच्यात आंतरक्रिया घडून आली असे म्हणता येईल. सामाजिक आंतरक्रिया घडून येण्यासाठी परस्पर सामाजिक संपर्क आणि संज्ञापन या दोन महत्त्वाच्या पूर्वावश्यकता आहेत.

अशाप्रकारे सामाजिक आंतरक्रिया घडून येण्यासाठी दोन व्यक्ती, त्यांच्यामध्ये परस्परांविषयी जाणीव असणे आणि त्या व्यक्तींमध्ये कोणत्यातरी प्रकारचा विनिमय घडून येणे (भाषेद्वारे, हावभावाद्वारे, खुणेद्वारे) या प्रमुख पूर्वावश्यकता आहेत. आता आपण सामाजिक आंतरक्रियांचा अर्थ आणि स्वरुप यावर प्रकाश टाकणारे आणखी काही मुद्दे पाहू.

४) **अर्थपूर्ण सामाजिक संपर्क** (Meaningful Social Contact) **:–** कोणत्याही आंतरक्रियेत व्यक्ती जेव्हा कोणताही शब्द वापरते, हावभाव करते किंवा एखादी वस्तू दुसऱ्या व्यक्तीला देते त्याला निश्चितच काही अर्थ असतो. तो अर्थ दुसरी व्यक्ती समजून घेते. अशा प्रकारे शब्द, हावभाव व वस्तू देण्याच्या क्रियेचा अर्थ समजूनच व्यक्ती इतरांना प्रतिक्रिया करते. एखाद्या व्यक्तीने पुरस्कार मिळाल्याबद्दल जर दुसऱ्या व्यक्तीला पुष्पगुच्छ दिला तर ती त्याचा अर्थ लगेच समजून घेते आणि 'आभारी आहे' अशी प्रतिक्रिया देते. अशाप्रकारे सामाजिक आंतरक्रियेत अर्थपूर्ण सामाजिक संपर्क प्रस्थापित होतो. जर व्यक्ती इतरांच्या वर्तनाचा अर्थ समजून घेण्याच्या स्थितीत नसेल तर ती प्रतिक्रिया देऊ शकत नाही. परिणामी आंतरक्रिया घडून येऊ शकत नाही. उदा. एखादी व्यक्तीची भाषा आपणास समजत नसेल तर तिला आपण प्रतिक्रिया देऊ शकत नाही.

५) **आंतरक्रियांमध्ये उद्दीपक आणि प्रतिक्रिया यांची साखळी असते** (Chain of Stimulus and Response) **:–** सामाजिक आंतरक्रियेमध्ये एका व्यक्तीचे वर्तन हे दुसऱ्या व्यक्तीसाठी उद्दीपक ठरत असते. तर पहिल्या व्यक्तीच्या वर्तनाला दुसऱ्या व्यक्तीची जी प्रतिक्रिया होते ती पहिल्या व्यक्तीसाठी उद्दीपक ठरत असते. अशाप्रकारे सातत्यपूर्ण सामाजिक आंतरक्रियेत उद्दीपन आणि प्रतिक्रिया यांची साखळी निर्माण होत असते. जसे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारला तर ते विद्यार्थ्यांसाठी उद्दीपक स्वरुपी असते. जर विद्यार्थ्यांनी त्या प्रश्नाचे उत्तर दिले तर ते उत्तर म्हणजे शिक्षकासाठी उद्दीपक ठरत असते. या उत्तरानंतर पुन्हा शिक्षक दुसरा प्रश्न विचारतो.

**६) सामाजिक आंतरक्रियांमध्ये इतरांच्या प्रभावामुळे वर्तनामध्ये बदल होतो** (Behaviour Changes due to other's Influence) **:** सामाजिक आंतरक्रियांमध्ये व्यक्ती एकमेकांच्या वर्तनावर प्रभाव पाडतात. परिणामी व्यक्तींच्या वर्तनात बदल घडून येतो. उदा. एखाद्या विषयावर दोन व्यक्ती चर्चा करतात आधी ते परस्परांचे मित्र असतात पण त्यांची मते परस्परांहून भिन्न असतात. त्यामुळे जेव्हा एक व्यक्ती दुसऱ्याचा अपमान होईल असे शब्द वापरते तेव्हा दुसरी व्यक्तीही पहिल्या व्यक्तीला अपमानित करते. अंतिमत: चर्चा थांबविण्याचा आणि परस्परांशी न बोलण्याचा निर्णय घेऊन त्या दोन व्यक्ती मैत्री संपुष्टात आणण्याचा निर्णय घेतात. मैत्री संपुष्टात आणणे याचा अर्थ पूर्वीच्या वर्तनात बदल घडून येणे. हे आंतरक्रियेत घडून येते. अशाच प्रकारे आधी शत्रुत्व असणाऱ्या व्यक्ती आंतरक्रियेत सहभागी झाल्यावर मित्रही बनू शकतात. सामाजिक आंतरक्रियेत सहभागी होणाऱ्या व्यक्ती परस्परांवर प्रभाव पाडतात. त्यामुळे त्यांची वर्तने बदलतात. वरील उदाहरणांवरून असेही दिसून येते की, आंतरक्रियेत व्यक्ती परस्परांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करताना किंवा दुसऱ्या व्यक्तीच्या प्रतिक्रिया काय आहेत त्यानुसार व्यक्ती परस्परांना प्रतिक्रिया करतात. उदा. आपल्याकडे पाहून इतर कोणी स्मितहास्य केले तर आपणही हसून त्याला प्रतिसाद देतो. याउलट आपणाला उद्देशून जर कोणी अपमानास्पद शब्द वापरत असेल तर आपणही तसाच प्रतिसाद त्यास देतो.

**७) सामाजिक आंतरक्रियेचे स्वरुप प्रतीकात्मक** (Symbolic) **असते :** सामाजिक आंतरक्रियेमध्ये विविध प्रतीकांचा वापर होतो. प्रतीक म्हणजे असे काहीतरी की जे दुसऱ्या कशाचे तरी प्रतिनिधित्व करते. भाषेतील विविध शब्द. हावभाव ही सर्व प्रतीकेच असतात. त्यांना संस्कृतीसापेक्ष विशिष्ट असा अर्थ असतो. सामाजिक आंतरक्रियेत इतरांच्या वर्तनाला केवळ यांत्रिकपणे प्रतिक्रिया मिळत नाहीत. सामाजिक आंतरक्रिया विशिष्ट सामाजिक परिस्थितीत घडून येतात. विशिष्ट आंतरक्रियेच्यापूर्वी भूतकाळात काही घटना घडलेल्या असतात. भविष्यकाळातही काही घटना घडण्याची शक्यता असते. या सर्वाचा साकल्याने विचार करून इतरांनी वर्तन केल्यावर योग्य त्या संदर्भात त्या वर्तनाचा अर्थ व्यक्ती लावते. प्रसंगी काल्पनिक पातळीवर इतर व्यक्तीच्या ठिकाणी आपणच आहोत असे समजून किंवा समोरच्या व्यक्तीच्या भूमिकेत शिरून (role taking) तिच्या वर्तनाचा अर्थ लावला जातो. समोरच्या व्यक्तीच्या वर्तनाचा अशाप्रकारे अर्थ समजून घेतल्यानंतर मग समोरच्या व्यक्तीशी नेमके कसे वागावे हे ठरविण्यासाठी विविध पर्यायी वर्तन प्रकारांची कल्पनात्मक पातळीवर उजळणी (Imaginative rehearsal) व्यक्ती करते. स्वत:चे मूल्यमापन ती व्यक्ती करते. त्यानंतर मगच दुसऱ्या व्यक्तीशी योग्यरित्या जुळवून घेता येईल असे प्रतीकात्मक वर्तन व्यक्ती करत असते. प्रतीकांचा वापर आणि त्यांचा अन्वयार्थ लावण्याची प्रक्रिया आंतरक्रियेत असते. आंतरक्रियेत अशी प्रतिकात्मक मध्यस्थी असते. म्हणून आंतरक्रियेचे स्वरुप प्रतीकात्मक (Symbolic) असते.

डावसन आणि गेट्टेस यांनी त्यांच्या व्याख्येत म्हटल्याप्रमाणे सामाजिक आंतरक्रियेत व्यक्ती एकमेकांच्या मनात प्रवेश करतात. याचा अर्थ असा की, व्यक्ती काल्पनिक पातळीवर इतरांच्या भूमिकेत

शिरून त्यांच्या दृष्टिकोणातून विचार करतात आणि त्या शब्दांचा आणि हावभावांचा अन्वयार्थ लावतात. मगच व्यक्ती इतरांना प्रतिक्रिया करतात.

८) **सामाजिक आंतरक्रिया तीन पातळीवर घडून येतात** (Social interactions occur at three levels) **:** आंतरक्रियेच्या तीन पातळ्या खालीलप्रमाणे :

**अ) व्यक्ती–व्यक्तीतील आंतरक्रिया** (Interaction between individuals) उदा. दोन मित्रातील चर्चा, पती–पत्नीतील संवाद इ.

**ब) व्यक्ती व समूह यांच्यातील आंतरक्रिया** (Interaction between an individual and group): जेव्हा एक व्यक्ती आणि एक समूह हे आंतरक्रियेचे एकक असतात तेव्हा ही आंतरक्रिया घडून येते. यामध्ये एक व्यक्ती ही समूहाबरोबर आंतरक्रिया करत असते. उदा. नेत्याची सभा, शिक्षकाचे व्याख्यान इ.

**क) समूहा–समूहातील आंतरक्रिया** (Interaction between groups) **:** जेव्हा आंतरक्रियेचे एकक दोन समूह असतात तेव्हा अशी आंतरक्रिया घडून येते. यामध्ये आंतरक्रिया ही दोन गटामध्ये घडून येते. उदा. क्रिकेट खेळणारे संघ, दोन देशातील संबंध इ.

सामाजिक आंतरक्रियेचे महत्त्व लक्षात घेऊन आपण या भागाचा शेवट करू या. सामाजिक आंतरक्रिया ही सामाजिक जीवनातील सर्वात मूलभूत सामाजिक घटना आहे. सामाजिक जीवन अस्तित्वात येण्यासाठी आवश्यक अशी ही एक पूर्वअट आहे. आपण सामाजिक आंतरक्रियेशिवाय 'समाज' या संकल्पनेचा विचारच करू शकत नाही. सामाजिक आंतरक्रियेद्वारेच सामाजिक संबंध विकसित होतात, ते स्थिर होतात. सामाजिक आंतरक्रियात्मक प्रक्रियांमुळेच सामाजिक समूह तयार होतात, नष्टही होतात. जेव्हा समाजातील व्यक्ती पारस्पारिक आंतरक्रिया चालू ठेवतात त्यावेळी समाज अस्तित्वात येतो. म्हणून सामाजिक आंतरक्रिया हाच समाजाचा मूलभूत पाया आहे. सामाजिक आंतरक्रियेद्वारेच व्यक्तीला तिचे सामाजिक स्वरूप (मानवी स्वभाव) प्राप्त होते. सामाजिक आंतरक्रियेद्वाराच व्यक्तीची 'स्व' संकल्पना (Self Concept) आणि तिचे व्यक्तीमत्त्व विकसित होते. सामाजिक आंतरक्रिया ह्या त्या विशिष्ट समाजातील मूल्ये, प्रमाणके व संस्कृती यांच्या संदर्भातच घडत असतात. सामाजिक आंतरक्रिया ह्या समाजजीवनाला गतीशील बनवितात. सामाजिक संरचनेचा विकास आणि त्यात बदल घडून येण्यासाठी सामाजिक आंतरक्रिया महत्त्वाची भूमिका पार पाडतात. सामाजिक जीवनाचे स्थैर्य आणि बदल या महत्त्वाच्या बाजूंचे (aspects) निर्धारण करण्याचे महत्त्वाचे कार्य सामाजिक आंतरक्रियेच्या स्वरुपाद्वारे ठरते.

**सामाजिक आंतरक्रियांचे प्रकार किंवा रूपे** (Types or Forms of Social Interactions) :

यापूर्वी आपण पाहिल्याप्रमाणे सामाजिक आंतरक्रिया हा समाज व्यवस्थेचा पाया आहे. सामूहिक जीवन हे सामाजिक आंतरक्रियेशिवाय अस्तित्वात येवूच शकत नाही. सामाजिक आंतरक्रियांमुळेच समाजाचे स्वरूप गतिशील बनते. सामाजिक आंतरक्रिया ह्या वेगवेगळ्या रीतीने / प्रकारात समाजात घडून येत असतात. असे

असले तरी, आंतरक्रियांच्या या सर्वच रीतींचा किंवा प्रकारांचा अभ्यास करणे अशक्य असते. म्हणूनच समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक आंतरक्रियांचा काही प्रकारांचा किंवा रूपांचा अभ्यास केला आहे. सामाजिक आंतरक्रियांच्या वेगवेगळ्या प्रकाराना किंवा रूपांनाच 'सामाजिक प्रक्रिया' असे म्हणतात. या उपविभागात आपण सामाजिक आंतरक्रियांच्या विविध प्रकारांचा किंवा रूपांचा थोडक्यात परिचय करून घेणार आहोत. प्रथम आपण 'सामाजिक प्रक्रिया' या संकल्पनेचा अर्थ समजून घेऊ.

**१) मॅकायव्हर – ''एकदा एकत्रित आल्यावर, समूहाच्या सदस्यामंधील संबंधाना ज्या प्रक्रियेत निश्चित असे विभेदक स्वरूप प्राप्त होते त्या प्रक्रियेला सामाजिक प्रक्रिया असे म्हणतात.''** ("Social process is the manner in which the relations of the members of a group, once brought together acquire a certain distinctive character" - MacIver)

**२) मॉरिस गिसबर्ग – ''व्यक्ती वा समूहामध्ये घडून येणाऱ्या आंतरक्रियांचे विविध प्रकार म्हणजे सामाजिक प्रक्रिया होय.''** ("Social processes means the various modes of Interaction between Individuals or groups" - Morris Ginsberg)

**३) हॉर्टन आणि हंट – ''सामाजिक जीवनात वारंवार घडून येणाऱ्या वर्तनाच्या रूपाना सामाजिक प्रक्रिया असे म्हणतात.''** ("Repetitive forms of behaviour which are commonly found in social life" - Horton and Hunt)

ज्या विविध नमुन्यात सामाजिक आंतरक्रिया घडून येतात त्यानुसार त्यांचे वर्गीकरण करता येते. ज्यावेळी आंतरक्रिया पुन्हा पुन्हा एका विशिष्ट पद्धतीने घडतात तेव्हा त्यांना विशिष्ट रूप प्राप्त होते. आंतरक्रियांना अशी विविध रूपे प्राप्त होण्याच्या प्रक्रियेला सामाजिक प्रक्रिया असे म्हणतात. सामाजिक आंतरक्रियांच्या विविध रूपाना किंवा प्रकारानाच सामाजिक प्रक्रिया म्हणतात. 'प्रक्रिया' हा शब्द सुद्धा सातत्य दर्शवितो. म्हणजेच विशिष्ट प्रकारची आंतरक्रिया पुन्हा पुन्हा त्याचप्रकारे घडून येते.

**सामाजिक आंतरक्रियेचे प्रकार किंवा सामाजिक प्रक्रिया** (Types of Social Interaction or Social Processes)

सहकार्य, स्पर्धा, संघर्ष, समायोजन, सन्मीलन, विनिमय इ. हे सामाजिक आंतरक्रियांचे विविध प्रकार किंवा रूपे आहेत. त्यांनाच सामाजिक प्रक्रिया म्हणतात. आता आपण सामाजिक आंतरक्रियांच्या विविध रूपांचा किंवा सामाजिक प्रक्रियांचा थोडक्यात परिचय करून घेऊ.

१. **सहकार्य** (Co-operation) :

सहकार्य हा सामाजिक प्रक्रियेचा महत्त्वाचा वैश्विक (Universal) आणि सतत Continuous आढळून येणारा प्रकार आहे. समाजजीवनाच्या प्रत्येक कृतीमध्ये सहकार्य दिसून येते. सहकार्य हा प्रत्येक संघटनेचा आधार आहे. आपला समाज सहकार्याच्या तत्वावरच कार्यरत असतो. गटामध्ये एकत्र राहण्यासाठी सहकार्य आवश्यक आहे.

**अ) सहकार्याचा अर्थ** (Meaning of Co-operation) **:**

सहकार्य हा शब्द लॅटिनमधील 'को' (Co) म्हणजे 'एकत्र' आणि 'ऑपेरारी' (operari) म्हणजे 'कार्य' या दोन शब्दांपासून तयार झाला आहे. अशाप्रकारे सहकार्य म्हणजे एकत्र काम करणे. 'सहकार्य' या संज्ञेचा समाजशास्त्रीय अर्थ समजण्यासाठी आपण सहकार्याच्या दोन व्याख्या अभ्यासू.

**१) मेरिल आणि एल्ड्रेज – ''सहकार्य हे सामाजिक आंतरक्रियेचे असे रूप आहे की ज्यात दोन किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्ती समान ध्येये मिळवण्यासाठी एकत्र काम करतात.''** ("Co-operation is a form of social interaction where in two or more persons work together to gain a common end"- Merril and Endridge)

**२) चाईल्ड फेअर – ''सहकार्य ही एक अशी प्रक्रिया आहे की ज्या योगे व्यक्ती किंवा समूह कमी अधिक संघटित मार्गाने समान उद्दिष्ट साध्य करण्यासाठी एकत्र प्रयत्न करतात.''** ("Co-operation is the process by which individuals or groups combine their efforts in more or less organised way for the attainment of common objective" - Fairchild)

**३) रॉबर्ट निसबेट – ''सर्वांचा हितसंबंध गुंतलेल्या समान उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी केलेला सामूहिक किंवा एकत्रित प्रयत्न म्हणजे सहकार्य होय.''** ("It is joint or collaborative behaviour toward some goal in which there is common interest"-Robert Nisbet)

वरील सर्व व्याख्या सहकार्य या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करतात. एका ध्येयासाठी एकत्र काम करणे म्हणजे सहकार्य होय. सहकार्याच्या संकल्पनेत तीन घटक गुंतलेले आहेत.

१) दोन किंवा दोनपेक्षा अधिक व्यक्ती.

२) समान ध्येय किंवा साध्य, आणि

३) समान ध्येय साध्य करण्यासाठी केले जाणारे संघटित प्रयत्न.

**ब) सहकार्याचे प्रकार** (Types of Co-operation) :

वेगवेगळ्या समाजशास्त्रज्ञांनी सहकार्याचे वेगवेगळे प्रकार सांगितलेले आहेत. असे असले तरी सहकार्याचे काही प्रकार सर्वसाधारणपणे सर्वत्र आढळणारे आहेत. रॉबर्ट निसबेट आणि राबर्ट पेरित यांनी सांगितलेले सहकार्याचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

**१) उस्फूर्त सहकार्य** (Spontaneous Co-operation) **:**

ह्या प्रकारचे सहकार्य हे आपोआप उदयास येते कारण विशिष्ट परिस्थितीच अशा सहकार्याची मागणी करते. उदा. अपघात झाल्यानंतर तिथे हजर असणाऱ्या व्यक्ती अपघातग्रस्त व्यक्तींना वेगवेगळ्या प्रकारे मदत करतात. कोणी त्यांना तेथून बाहेर काढतो, तर कोणी पोलीसांना याची कल्पना देतो, तर कोणी त्यांना दवाखान्यामध्ये उपचारासाठी नेण्यास सहकार्य करतो.

२) **पारंपरिक सहकार्य** (Traditional Co-operation) **:**

सहकार्याचे जे वर्तन प्रबंध परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होतात त्यांना पारंपरिक सहकार्य म्हणतात. उदा. कोल्हापूर जिल्ह्यातील 'भिशी'ची पद्धत किंवा ऊस लागवडीचा 'फड' पद्धत.

३) **मार्गदर्शित सहकार्य** (Directed Co-operation) **:**

अधिकार असणाऱ्या व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली आणि नियंत्रणाखाली ज्यावेळी समान ध्येयासाठी विविध व्यक्ती एकत्र काम करतात तेव्हा त्यास मार्गदर्शित सहकार्य म्हणतात. या प्रकारचे सहकार्य नेहमीच नियोजित असते आणि यासाठी नेतृत्वाची गरज असते. उदा. रेल्वे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अभियंत्याचा गट एखाद्या अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली काम करतो.

४) **करारात्मक सहकार्य** (Contractual Co-operation) **:**

या प्रकारच्या सहकार्यामध्ये सुद्धा नियोजन आणि समान ध्येय पूर्ण करण्यासाठी करार असतो. यामध्ये व्यक्ती करारातील अटीनुसार कामपूर्ण करण्यासाठी एकत्र काम करतात. उदा. प्रकाशक आणि वेगवेगळे लेखक यांच्यातील पुस्तक तयार करण्यासाठी आणि प्रकाशित करण्यासाठीचा करार.

या व्यतिरिक्त, सर्वत्रपणे आढळणारे सहकार्याचे आणखी दोन प्रकार पुढीलप्रमाणे –

१) **प्रत्यक्ष सहकार्य** (Direct Co-operation) **:**

लोक ज्यावेळी एखाद्या ठिकाणी परस्परांच्या प्रत्यक्ष संपर्कात राहून काम करतात त्याला प्रत्यक्ष सहकार्य म्हणतात. प्राथमिक गटामध्ये प्रत्यक्ष स्वरूपाचे सहकार्य दिसून येते. उदा. कुटूंब, कामगारांचा कारखान्यातील समूह, जेथे लोक एकत्र काम करतात व एकमेकास मदत करतात. उदा. शेतकरी कुटुंबामध्ये शेतीमध्ये वेगवेगळी कामे एकत्रित पद्धतीने केली जातात. त्यातून व्यक्तींना सामाजिक समाधान (Social Satisfaction) लाभत असते.

२) **अप्रत्यक्ष सहकार्य** (Indirect Co-operation) **:**

या प्रकारच्या सहकार्यामध्ये व्यक्ती ह्या स्वतंत्ररित्या आपापली कामे पार पाडीत असतात. असे असले तरी त्यांना आपण समाजाच्या एका समान ध्येयासाठी कार्य पार पाडत आहोत याची जाणीव नसते. यामध्ये सर्व कामांचे विभाजन वेगवेगळ्या व्यक्तींमध्ये केलेले असते. समाजातील वेगवेगळे लोक शिक्षक, डॉक्टर, अभियंता, शेतकरी, कामगार, व्यवस्थापक, वकिल, सफाई कामगार इ. कामे करत असतात. यापैकी प्रत्येकाला असे वाटते की आपण आपल्या स्वहितासाठी काम करत आहोत. परंतु त्यांना याची जाणीव नसते की, ते अप्रत्यक्षपणे श्रमविभाजनाद्वारे समाजाचे सार्वत्रिक ध्येय साध्य करण्यासाठी काम करीत आहेत. समाजातील अशा प्रकारच्या श्रमविभाजनामुळे परस्परावलंबन वाढते व त्यामुळे समाजात जैविक सामाजिक एकात्मता निर्माण होते व टिकून रहाते.

**२) स्पर्धा** (Competition) **:**

सहकार्यासारखीच स्पर्धा ही देखील एक मूलभूत सामाजिक प्रक्रिया आहे. स्पर्धेमध्ये दोन किंवा अधिक व्यक्ती समान ध्येयासाठी संघर्ष करतात. जेव्हा मौल्यवान वस्तू दुर्मिळ असतात किंवा त्या कमी प्रमाणात उपलब्ध असतात आणि त्या मिळवण्यासाठी इच्छूक व्यक्तींची संख्या मात्र अधिक असते. अशावेळी स्पर्धा निर्माण होते. म्हणून स्पर्धा आणि मौल्यवान वस्तूंचा तुटवडा (Scarcity) यांचा जवळचा संबंध आहे.

**अ) स्पर्धेचा अर्थ** (Meaning of Competition) **:**

स्पर्धा या संकल्पनेचा अर्थ समजून घेण्यासाठी आपण काही व्याख्या पाहू या.

**१) बीसान्झ – ''ज्या गोष्टी मर्यादित प्रमाणात उपलब्ध असतात आणि ज्या वाटून घेता येत नाहीत अशा गोष्टी प्राप्त करण्यासाठी जेव्हा व्यक्ती झगडतात तेव्हा त्याला स्पर्धा म्हणतात.''** ("Competition is the striving of two or more persons for the same goal which is limited so that all cannot share it" - Biesanz)

**२) अँडरसन आणि पार्कर – ''स्पर्धा हे सामाजिक वृत्तीचे असे रूप आहे की ज्यामध्ये मर्यादित असणाऱ्या भौतिक आणि अभौतिक गोष्टी मिळविण्यासाठी किंवा त्यांचा वापर करण्यासाठी आपण एकमेकांविरुद्ध झगडतो.''** (Competition is that form of social action in which we strive against each other for the possession of or use of so limited material or non-material goods" - Anderson and Parker)

**३) हॉर्टन आणि हंट – ''स्पर्धा म्हणजे पारितोषिके (विशेषत: ज्या गोष्टी दुर्मिळ असतात त्या) मिळवण्यासाठीचा संघर्ष होय.''** ("Competition is the struggle for possion of rewards which are limited in supply, goods, status, powar, love, anything"- Horton and Hunt)

वरील व्याख्यांवरून आपणास स्पर्धा या संज्ञेचा अर्थ स्पष्टपणे समजतो. ज्यावेळी लोक मर्यादित असणाऱ्या वस्तू किंवा गोष्टी मिळवण्यासाठी संघर्ष करतात त्यालाच स्पर्धा असे म्हणतात. उदा. ज्यावेळी दोन पात्र व्यक्ती एकाच जागेसाठी मुलाखत देतात त्याला स्पर्धा असे म्हणता येईल. ज्यावेळी कोणत्याही प्रकारच्या मर्यादित भौतिक किंवा अभौतिक गोष्टींचे (भौतिक वस्तू उदा. जमिन, संपत्ती इतर तंत्रज्ञान, अभौतिक बाबी, उदा. सत्ता, सामाजिक दर्जा, प्रेम, प्रतिष्ठा इ.) दुर्भिक्ष्य असते आणि त्यांची मागणी जास्त असते त्यावेळी स्पर्धा घडून येते.

**ब) स्पर्धेची ठळक वैशिष्ट्ये** (Characteristics of Competition) **:**

आता आपण स्पर्धेची काही ठळक वैशिष्ट्ये लक्षात घेऊ. ती थोडक्यात खालीलप्रमाणे आहेत.

**१) स्पर्धा ही दुर्भिक्ष्यामुळे उदयास येते** (Competition arises due to scarcity) **:** म्हणजेच जोपर्यंत असणाऱ्या वस्तू वा गोष्टी यांचा पुरवठा मर्यादित असतो तोपर्यंत स्पर्धा ही घडून येत असते. मानवी

गरजा या अमर्यादित आहेत तर संसाधने ही मर्यादित आहेत म्हणून दुर्मिळ अशी संसाधने स्वत:लाच मिळावीत यासाठी स्पर्धा घडून येते.

२) **स्पर्धा ही वैश्विक प्रक्रिया आहे** (Competition is a Universal Process) **:** स्पर्धा ही समाजजीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये असते. त्याप्रमाणे स्पर्धा ही सर्व प्रकारच्या (उदा. आदिम, ग्रामीण, किंवा नागरी; प्रगत किंवा अप्रगत) मानवी समाजांमध्ये अस्तित्वात असते. म्हणून स्पर्धा ही वैश्विक (Universal) बाब आहे.

३) **स्पर्धा सतत चालू असते** (Competition is Continuous) **:** स्पर्धा ही कधीही न संपणारी सामाजिक प्रक्रिया आहे. सामाजिक जीवनाच्या सर्वच क्षेत्रात ती सातत्याने सुरू असते.

४) **स्पर्धेमुळे समाजात गतिशीलता निर्माण होते** (Competition Creates Dynamism in Society) **:** स्पर्धा ही समाजाची प्रगती आणि परिवर्तनासाठी महत्त्वाचे योगदान देते. स्पर्धेमुळे समाज गतिशील बनतो. काही वेळा स्पर्धा ही अवैयक्तिक स्वरुपाची असते. स्पर्धा ही व्यक्तीला काही मिळवण्यासाठी आपल्यातील गुणांना सिद्ध करण्यास भाग पाडते. उदा. स्पर्धेमुळे विद्यार्थ्याला परीक्षेत जास्त गुण व उच्चश्रेणी मिळवण्यासाठी इतरांपेक्षा जास्त मेहनत घ्यावी लागते.

५) **स्पर्धा ही अवैयक्तिक असू शकते** (Competition may be impersonal) **:** काही वेळा स्पर्धेचे स्वरूप हे अवयैक्तिक स्वरूपाचे असते. जेंव्हा आपणास आपला स्पर्धक माहित नसतो तेव्हा त्याला अवयैक्तिक स्वरूपाची स्पर्धा असे म्हणतात. उदा. केंद्रिय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या आय्.ए.एस्., आय्.पी.एस्., आय्.एफ्.एस्. यासारख्या पदांसाठी घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षेसाठी देशभरातून अनेक विद्यार्थी या परिक्षेला बसतात. हे सर्व स्पर्धक एकमेकांच्या ओळखीचे नसतात. पण इतरांपेक्षा अधिक गुण मिळविण्यासाठी ते स्पर्धा करीत असतात.

६) **स्पर्धा ही प्रमाणकाद्वारे नियंत्रित केली जाते** (Competition is governed by norms) **:** स्पर्धा ही नियम, प्रमाणके शिस्तबद्धता याद्वारे नियंत्रित केली जाते. प्रत्येकजण स्पर्धेच्या नियमांकडे व्यवस्थित लक्ष देतो. इतर स्पर्धक सुद्धा हे नियम पाळत आहेत का? हे पाहिले जाते. इतरानीही स्पर्धेचे नियम पाळण्याची अपेक्षा ठेवली जाते.

आजच्या आधुनिक जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये आपणास स्पर्धा दिसून येते. सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक जीवनामध्ये सुद्धा स्पर्धा अस्तित्वात असते. स्पर्धा ही सामाजिक परिवर्तनाचे महत्त्वाचे कारण आहे. स्पर्धा ही समाजामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडते. निकोप स्पर्धेशिवाय समाजाची प्रगती व विकास योग्य पद्धतीने होवू शकत नाही. उर्ध्वगामी सामाजिक गतिशिलता (Upward Social Mobility) हा स्पर्धेचाच परिणाम आहे. स्पर्धेमुळे योग्य आणि लायक व्यक्ती त्या पदांवर येतात. स्पर्धा ही व्यक्तींना त्यांच्यातील गुणांना वाव व प्रेरणा देते. शेवटी या सर्वांचा फायदा समाजाला होतो.

३. **संघर्ष** (Conflict) **:**

आतापर्यंत आपण सहकार्य, आणि स्पर्धा या सामाजिक प्रक्रियांचा किंवा सामाजिक आंतरक्रियेच्या दोन प्रकारांचा अभ्यास केला आहे. आता आपण संघर्ष या संकल्पनेचा अभ्यास करणार आहोत. संघर्षसुद्धा वैश्विक प्रक्रिया (Universal Process) आहे. संघर्ष सर्व समाजामध्ये अस्तित्वात असतो. बऱ्याचवेळा संघर्ष हा स्पर्धेशी संबंधित असतो. कारण ज्यावेळी व्यक्ती सपर्धेच्या नियमांचे उल्लंघन करून काही मिळवण्याचा प्रयत्न करतात त्यावेळी संघर्ष घडून येतो.

**अ) 'संघर्ष' या संकल्पनेचा अर्थ** (Meaning of Conflict) **:**

संघर्ष म्हणजे असुदृढ स्पर्धेचा परिणाम होय. आता आपण संघर्ष या संकल्पनेच्या काही महत्त्वाच्या व्याख्या पाहू.

**१) हॉर्टन आणि हंट – ''इतर स्पर्धकांना स्पर्धेतून बाद करून किंवा त्यांना कमकुवत करून पारितोषिकांवर केवळ आपलीच एकाधिकारशाही निर्माण करण्याचा प्रयत्न म्हणजे संघर्ष होय.''** ("Conflict is a process of seeking to monoplize rewards by eliminating or weakening the competitiors" - Horton and Hunt)

**२) गिलिन आणि गिलिन – ''संघर्ष ही एक अशी सामाजिक प्रक्रिया आहे की ज्यामध्ये व्यक्ती किंवा समूह हे आपले ध्येय प्रत्यक्ष आव्हानाने, हिंसेने किंवा हिंसेच्या धमकीने मिळवण्याचा प्रयत्न करतात.''** ("Conflict is the social process in which individuals or groups seek their ends by directly challenging the antagonist by violence or threat of violence" - Gillin and Gillin)

**३) ग्रीन ए. डब्लु. – ''संघर्ष म्हणजे एखाद्या स्पर्धकाला किंवा इतरांना जाणिवपूर्वक विरोध करण्याचा, प्रतिकार करण्याचा किंवा इतरांवर बळजबरी करण्याचा प्रयत्न होय.''** ("Conflict is the deliberate attempt to oppose, resist or coerce the will of another or others" - Green A. W.)

वरील व्याख्यांचे अध्ययन केल्यानंतर आपल्या हे लक्षात येईल की, संघर्ष हा नेहमीच सहकार्याच्या विरोधी असतो. संघर्षामध्ये सतत बक्षिसे, दुर्लभ असणाऱ्या इतर वस्तू इ. वर एकाधिकारशाही प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो. यामध्ये स्पर्धकाला कमकुवत करण्याचा प्रयत्न केला जातो. संघर्षात विरोध, हिंसा तसेच धमकीचा वापर केला जातो.

**ब) संघर्षाची वैशिष्ट्ये** (Characteristics of conflict) **:**

संघर्षाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :

**१) संघर्ष हा वैश्विक असतो** (Conflict is Universal) **:**

संघर्षापासून मुक्त अशा मानवी समाजाची आपण केवळ कल्पनाच करू शकतो. आधुनिक काळात ज्यात स्पर्धा नाही असा समाज पृथ्वीतलावरती कोठेही सापडणार नाही. याचा अर्थ असा की संघर्ष हा सर्वच समाजामध्ये अस्तित्वामध्ये असतो. म्हणूनच जर्मन समाजशास्त्रज्ञ सिम्मेल या संदर्भात असे म्हणतो की

''मतभेदा शिवाय विश्व हे काल्पनिक बाब आहे. (A frictionless universe is a myth.) या संदर्भात कार्ल मार्क्सने असे म्हटले आहे की, मानव समाजाचा इतिहास हा वर्ग संघर्षाचाच इतिहास आहे. तात्पर्य, संघर्ष ही वैश्विक बाब आहे.

२) **संघर्ष हा प्रकट किंवा अप्रकट स्वरूपाचा असतो** (Conflict may be 'Overt' or 'Latent')**:**

आपणास संघर्षाशिवाय समाज कोठेही आढळणार नाही. अशाप्रकारे संघर्ष हा सर्वच समाजामध्ये आढळून येत असला तरी प्रत्येकवेळी तो उघडपणे दिसून येतोच असे नाही. काहीवेळा तो स्पष्टपणे दिसतो तर काही वेळा तो सूप्त (Latent) असतो. सूप्त असलेला किंवा अप्रकट संघर्ष प्रत्यक्षात बाहेर दिसून येत नाही.

३) **प्रकट संघर्ष हा सतत अस्तित्वात नसतो** (Overt Conflict is not Continuous) **:**

दोन गटातील संघर्ष हिंसेद्वारे प्रकट होतो. पण अशी हिंसा सतत टिकून रहात नाही. एकदा ती परिस्थिती संपली की संघर्ष संपतो. उदा. दोन राज्यातील पाण्याच्या वादावरून तयार झालेला संघर्ष केंद्र सरकार किंवा न्यायालयाने योग्य मार्गदर्शक तत्त्वे घालून दिल्यास असा संघर्ष संपुष्टात येवू शकतो.

४) **संघर्ष ही एक जाणीवपूर्वक केली जाणारी कृती आहे** (Conflict is Conscious action) **:**

पार्क आणि बर्गेस यांच्या मतानुसार संघर्षामध्ये सहभागी असणाऱ्या व्यक्ती आणि समूह यांना त्यांच्या कृतीची जाणीव असते.

५) **असुरक्षितता, निराशा या बाबी संघर्षाला चालना देतात** (Insecurity disappointment promote conflict) **:**

ज्यावेळी काही व्यक्ती आपल्या गरजा पूर्ण करू शकत नाहीत परंतू इतर व्यक्ती नियमांचे पालन न करता आपल्या गरजा पूर्ण करतात हे दिसून येते. अशावेळी संघर्ष घडून येतो. ज्यावेळी समाजात उच्च सामाजिक दर्जा मिळवण्यासाठीच्या संधी उपलब्ध नसतात त्यावेळी संघर्ष घडून येतो. ज्यावेळी समाज हा नियमनहीन होतो किंवा समस्याग्रस्त होतो त्यावेळी संघर्ष घडून येतो. विशेषत: जेव्हा व्यक्तीना असुरक्षिततेचा किंवा नैराश्याचा अनुभव येतो तेंव्हा संघर्षजन्य परिस्थिती उद्‌भवण्याची शक्यता वाढते.

६) **संघर्ष हा सांस्कृतिक परिस्थितीने अभिसंहित झालेला असतो** (Conflict is Conditioned by Culture) **:**

संघर्ष हा सांस्कृतिक परिस्थितीकडून अभिसंहित झालेला असतो. म्हणजेच संघर्ष हा विशिष्ट समाजाच्या किंवा त्यातील समूहाच्या संस्कृतीने प्रभावित झालेला असतो.

७) **संघर्षाला अनेक कारणे जबाबदार असतात** (Conflict is multi-causal phenomena) **:**

कोणताही संघर्ष हा कधीही एकाच कारणामुळे घडून येत नाही, तर त्यासाठी विविध कारणे जबाबदार असतात. काही वेळा व्यक्तींची संपत्ती, सत्ता, प्रतिष्ठा, स्थान मिळवण्यासाठीची अकार्यक्षमता सुद्धा संघर्षास कारणीभूत ठरते.

**क) संघर्षाचे प्रकार** (Types of Conflict) **:**

अनेक समाजशास्त्रज्ञांनी संघर्षाचे अनेक प्रकार सांगितलेले आहेत. त्यापैकी जॉर्ज सिम्मेल या समाजशास्त्रज्ञाने सांगितलेले संघर्षाचे प्रकार आपण पाहणार आहोत.

जर्मन समाजशास्त्रज्ञ जॉर्ज सिमेल यांनी संघर्षाचे चार प्रमुख प्रकार सांगितले आहेत. ते थोडक्यात पुढीलप्रमाणे.

**१) युद्ध** (War) **:**

युद्ध म्हणजे दोन मोठ्या गटातील (उदा. दोन राष्ट्रे) संघर्ष होय. विशेषत: दोन देशातील लोकांच्या मनात खोलवर रुजलेल्या शत्रुत्त्ववृत्तीचा परिपाक युद्धात दिसून येतो.

**२) गटांतर्गत दुफळी** (Factional Strife) **:**

हा एक गटांतर्गत संघर्ष होय. मोठ्या समूहातील काही लोकांच्या एखाद्या गटाला ज्यावेळी आपल्यावर अन्याय झाला असे वाटते तेव्हा असा संघर्ष घडून येतो.

**३) दावा किंवा खटला** (Litigation) **:**

ह्या प्रकारचा संघर्ष व्यक्ती व्यक्ती किंवा समूहा समूहामध्ये घडून येतो आणि तो न्यायालयात लढला जातो.

**४) अवैयक्तिक आदर्शांसाठीचा संघर्ष** (Conflict of Impersonal Ideas) **:**

या प्रकारच्या संघर्षात व्यक्ती किंवा समूह स्वत:साठी लढत नाहीत तर काही ध्येयासाठी किंवा आदर्शांसाठी लढतात. ही ध्येये आणि आदर्श समूहाच्या फायद्याचे आहेत अशी त्यांची धारणा असते.

**ड) संघर्षाचे समाजावरील परिणाम** (Impact of Conflict on Society) **:**

संघर्ष हा समाजात नेहमीच महत्त्वाची भूमिका पार पाडतो. संघर्ष हा सामाजिक परिवर्तनाचा महत्त्वाचा उगमस्त्रोत (Source) आहे. संघर्षाचे संपूर्ण समाजाच्या दृष्टीने सकारात्मक आणि नकारात्मक (Positive & Negative) अशा दोन्ही स्वरुपाचे परिणाम घडून येऊ शकतात. समूहाअंतर्गत संघर्ष काही मर्यादेपर्यंत असेल तर त्यामुळे त्या समूहात एकता, एकात्मता निर्माण होते आणि समूहाचे स्थैर्य टिकवून ठेवले जाते. एखाद्या समूहाचा दुसऱ्या एखाद्या समूहाशी संघर्ष सुरू असेल तर समूहात त्यामुळे एकात्मता निर्माण होते. व्यक्तीगत संघर्ष कित्येकदा सामाजिक वर्चस्वश्रेणीतील वरिष्ठ पातळीवरील स्थान संपादन करण्यासाठी व्यक्तीला प्रेरित करतो. संघर्ष तीव्र असेल तर आणि दीर्घकाळ टिकून रहाणारा असेल तर समाजावार त्याचे नकारात्मक (Negative) परिणाम होतात. मोठा संघर्ष समाजातील एकता नष्ट करतो. काही वेळा संघर्ष समाजात गोंधळाची स्थिती निर्माण करतो. काही वेळा तर संघर्ष हा समुदाय, समूह, आणि व्यक्ती यांच्यातील सौहार्दपूर्ण संबंध बिघडवतो. समाजांतर्गत लहान लहान गटातील संघर्ष तीव्र असेल तर सामाजिक एकता खिळखिळी होते. गटांतर्गत संघर्षामुळे गटाचे नीतीधैर्य खचते.

### ४) **समायोजन** (Accommodation) **:**

समायोजन ही आणखी एक महत्त्वाची सामाजिक प्रक्रिया किंवा सामाजिक आंतरक्रियेचा प्रकार आहे. सहकार्य सारखीच समायोजन सुद्धा एक वैश्विक प्रक्रिया आहे. समायोजनामुळे संघर्ष काही प्रमाणात कमी करता येतो. समायोजन हा तडजोडीचा एक महत्त्वाचा मार्ग आहे. इतर व्यक्तींबरोबर संघर्ष सुरू असून सुद्धा त्यांचेबरोबर संबंध ठेवण्याचा समायोजन हा एक मार्ग आहे. समायोजन हा संघर्ष मिटवण्याचा एक मार्ग आहे. समायोजन प्रक्रियेमुळे समाजात काही एक व्यवस्था टिकवून ठेवता येते. समूह टिकून रहाण्यासाठी समायोजन प्रक्रिया महत्त्वाची आहे. समायोजन ही एक समूहांना एकत्रित राहण्यासाठीची महत्त्वाची सामाजिक यंत्रणा असते. समायोजन प्रक्रियेमुळे संघर्षानंतर शांतता प्रस्थापित करता येते. उदा. कारखान्यातील कामगार व व्यवस्थापन यांच्यातील संघर्ष तडजोडीने मिटवणे हा समायोजनाचाच एक प्रकार आहे, असे म्हणता येईल. समाजात सतत संघर्ष घडतो, परंतु तो जास्त काळ अस्तित्वात असणे कोणाच्याही फायद्याचे नसते. म्हणून तडजोडीने संघर्ष मिटवणेच अंतिमत: महत्त्वाचे असते. आता आपण समायोजन या संज्ञेच्या काही व्याख्या पाहू. त्यामुळे आपणास या संकल्पनेचा अर्थ समजून येईल.

#### अ) **'समायोजन' या संज्ञेच्या व्याख्या** (Definitions of Accommodation) **:**

समायोजन या संज्ञेच्या व्याख्या खालीलप्रमाणे

१) **ऑगबर्न आणि निमकॉफ – ''समायोजन ही संज्ञा समाजशास्त्रज्ञांनी परस्परांविषयी शत्रुत्ववृत्ती धारण करणाऱ्या व्यक्ती किंवा समूहातील लोकानी परस्परांशी जुळवून घेण्याच्या प्रक्रियेचे वर्णन करण्यासाठी वापरली आहे.''** ("Accommodation is a term used by the sociologists to describe the adjustment of hostile individuals or groups" - Ogburn and Nimkoff)

२) **हॉर्टन आणि हंट – ''परस्परांशी संघर्ष करणाऱ्या व्यक्ती व समूह यांच्यामध्ये तात्पुरती कामचलावू सहमती निर्माण होण्याची प्रक्रिया म्हणजे समायोजन होय.''** ("Accommodation is the process of developing temporary working agreements between conflicting individuals or groups" - Horton and Hunt)

३) **सुदरलँड – ''समायोजन ही एक अशी प्रक्रिया आहे की ज्यामुळे एकेकाळी संघर्ष करणारे लोक समान उद्दिष्टांसाठी एकत्र काम करू शकतात.''** ("Accommodation is the process by which those once in conflict can work together in common enterprises" - Sutherland)

वरील व्याख्यांद्वारे आपणास समायोजन या संकल्पनेचा स्पष्ट अर्थ समजण्यास मदत होते. समायोजन ही एक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेद्वारे संघर्ष करणाऱ्या व्यक्ती व समूह यांच्यामध्ये तात्पुरते कामचलावू मतैक्य विकसित केले जावू शकते. त्याचबरोबर समायोजनामुळे संघर्ष करणाऱ्या व्यक्ती किंवा समूह समान ध्येयासाठी एकत्र येऊन काम करू शकतात. समायोजन ही प्रक्रिया अधिक चांगल्या पद्धतीने समजून घेण्यासाठी आपण या प्रक्रियेच्या काही महत्त्वाच्या वैशिष्ट्यांचे अध्ययन करू.

**ब) समायोजनाची वैशिष्ट्ये** (Characteristics of Accommodation) **:**

समायोजन प्रक्रियेची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :

**१) समायोजन ही वैश्विक प्रक्रिया आहे** (Accommodation is a universal process) **:**

समायोजन ही प्रक्रिया जगातील प्रत्येक समाजामध्ये सातत्याने अस्तित्वात असल्याचे दिसते. समायोजनाशिवाय समाजातील विभिन्न समूहाना एकत्रितपणे जीवन जगणे अशक्य बाब आहे. संघर्ष हा सुद्धा वैश्विक असल्याने तो काही प्रमाणात नियंत्रित करण्यासाठी समायोजन ही प्रक्रिया महत्त्वाची आहे.

**२) समायोजन सातत्यपूर्ण आहे** (Accommodation is continuous) **:**

समायोजन ही एक सातत्य असणारी प्रक्रिया आहे. व्यक्ती समूहातील इतर सदस्यांशी, एकाच समाजातील विभिन्न समूह परस्परांशी, तसेच विविध समाज परस्परांशी जुळवून घेण्यासाठी त्यांच्या जीवनकाळातील विविध प्रसंगात समायोजनाचा वारंवार अवलंब करतात.

**३) समायोजन संघर्षाचा परिणाम असू शकतो** (Accommodation may be the outcome of conflict) **:**

जेव्हा केव्हा व्यक्ती-व्यक्तीत आणि समूहा-समूहात संघर्ष असतो त्यावेळी त्यांच्यात काही प्रमाणात तडजोड असणे गरजेचे असते. अन्यथा संघर्षाचे स्वरूप दोन्ही पक्षांसाठी विनाशकारी असू शकते. अंतिमत: संघर्ष मिटवणे हे व्यक्ती व समाजाच्या हिताचे असते. म्हणून व्यक्ती किंवा समूह सततचा संघर्ष मिटवण्यासाठी तडजोडीद्वारे समायोजन घडवून आणतात.

**४) समायोजन जाणीवपूर्वक किंवा अजाणतेपणी घडून येणारी प्रक्रिया असू शकते** (Accommodation may be conscious or unconscious) **:**

संघर्षमान व्यक्ती किंवा समूह जेंव्हा हेतूपूर्वक संघर्ष मिटविण्याचा, आपले प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करतात किंवा युद्ध सुरू असणाऱ्या राष्ट्रांचे प्रमुख जेंव्हा परस्पर वाटाघाटी करून युद्ध थांबवितात तेंव्हा घडून येणारी तडजोड हे जाणीवपूर्वक केलेल्या समायोजनाचे उदाहरण ठरते. पण परस्पर संघर्ष असूनही जेंव्हा दोन समूह कित्येक वर्षे एकत्र राहतात तेंव्हा त्यांच्या नकळत अजाणतेपणीच त्या दोन समूहात समायोजन प्रक्रिया घडून येते.

**क) समायोजनाची रूपे किंवा प्रकार** (Forms or Types of Accommodation) **:**

समायोजनाची प्रक्रिया ही वेगवेगळ्या रूपात किंवा प्रकारात घडत असते. गिलिन आणि गिलिन यांनी समायोजनाचे सात प्रकार सांगितले आहेत, ते थोडक्यात पुढीलप्रमाणे.

**१) तडजोड** (Compromise) **:**

ज्यावेळी दोन तुल्यबळ समूहांमध्ये संघर्ष निर्माण होतो त्यावेळी तो संघर्ष तडजोडीने मिटवता येतो. संघर्ष दीर्घकाळ चालू राहिला तर त्याचा फायदा कोणालाही होणार नाही, याची जाणीव जेंव्हा दोन्ही समूहांना होते त्यावेळी ते समायोजनाचा मार्ग स्वीकारतात. यामध्ये दोन्ही गट काहीतरी मिळवण्यासाठी

काहीतरी गमविण्याची तयारी ठेवतात. उदा. भारतातील दोन राज्यातील पाणी वाटपाचा प्रश्न हा याप्रकारच्या समायोजनाद्वारे सोडवता येऊ शकतो.

२) **दबावाला शरण जाणे** (Yielding to coercion) **:**

दबाव म्हणजे बळाचा वापर. ज्यावेळी संघर्षात दोन असमान गट असतात म्हणजे ज्यावेळी एक गट शक्तीशाली तर दुसरा सापेक्षत: दुबळा असतो. त्यावेळी लहान कमकुवत गट हा मोठ्या गटाला स्वत:च्या अस्तित्वासाठी शरण जातो आणि बलवान गटाच्या अटी मान्य करतो. याठिकाणी समायोजन एका गटाने दुसऱ्या गटाला शरण जाण्यामुळे घडते.

३) **सहिष्णुता** (Toleration) **:**

या प्रकारच्या समायोजनामध्ये, व्यक्ती आणि समूह कोणत्याही औपचारिक कराराशिवाय संघर्ष टाळण्यासाठी प्रयत्न करतात. थोडक्यात 'जगा आणि जगू द्या' या तत्त्वाचा अवलंब केला जातो.

४) **मतांतर** (Conversion) **:**

या प्रकारच्या समायोजनाच्या मध्ये व्यक्ती स्वत:च्या समूहाच्या प्रथा, परंपरा, धर्म, निती, रितीरिवाज इ. चा त्याग करतात आणि दुसऱ्या समूहाच्या श्रद्धा, परंपरा, निती, रितीरिवाज इ. बाबींचा स्वीकार करतात. अशावेळी याला मतांतर करून झालेले समायोजन असे म्हणतात येईल.

५) **उदात्तीकरण** (Sublimation) **:**

या प्रकारच्या समायोजनामध्ये व्यक्ती आक्रमक वर्तन बदलून समाजाला मान्य अशा शांततापूर्ण वर्तन प्रकारांचा स्विकार करते. अशा प्रकारचे समायोजन व्यक्तिगत तसेच सामूहिक पातळीवर घडून येऊ शकते.

६) **तार्किकीकरण** (Rationalization) **:**

या प्रकारच्या समायोजनामध्ये व्यक्ती किंवा समूह आपल्या चुकीच्या वर्तनाचे इतरांना पटेल असे समर्थन करतात. उदा. लष्करीदृष्ट्या सामर्थ्यवान देश इतर देशांवर आक्रमण करतात तेंव्हा त्या देशातील आण्विक शस्त्रे नाहीशी करण्यासाठी किंवा तेथील दहशतवाद संपविण्यासाठी असा हल्ला आवश्यक असल्याचे समर्थन करतात.

७) **तिसऱ्या पक्षाच्या मध्यस्तीमुळे होणारे समायोजन** (Accommodation through the third party intervention) **:**

या प्रकारच्या समायोजनात तीन उपप्रकार आहेत ते थोडक्यात पुढीलप्रमाणे –

अ) **लवाद** (Arbitration) **:**

लवाद ही संघर्षमान अशा दोन समूहात उभयताना मान्य अशा तिसऱ्या पक्षामार्फत तडजोड घडवून आणण्याची महत्त्वाची यंत्रणा आहे. यामध्ये दोन समूहातील किंवा गटातील संघर्ष लवादामार्फत सोडवला

जावू शकतो. परंतु यामध्ये संघर्ष करीत असलेल्या दोन्ही पक्षाना लवादाने दिलेला निर्णय मान्य करावा लागतो. यामध्ये तडजोडीद्वारे निर्णय दिला जातो.

**ब) मध्यस्थी** (Mediation) **:**

लवादाप्रमाणेच मध्यस्थाची भूमिका महत्त्वाची असते. मध्यस्थ हा संघर्ष करीत असलेल्या दोन्ही व्यक्तींना किंवा समूहांना सल्ला देतो. पण मध्यस्थाने दिलेला सल्ला मानणे हे दोन्ही पक्षाना बंधनकारक मात्र नसते.

**क) मन वळवणे** (Conciliation) **:**

मन वळवणे हा समायोजनाचा प्रकार तडजोड या प्रकाराशी अतिशय जवळचा आहे. या प्रकारात तिसरी व्यक्ती संघर्ष करीत असलेल्या दोन पक्षाना एकत्र आणून त्यांचे मन वळवून त्या दोहोत मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित करण्याचे प्रयत्न करते.

वरील विवेचनावरून समायोजन या सामाजिक प्रक्रियेचे समाजातील महत्त्व समजून येते. संघर्ष करीत असलेल्या पक्षात समायोजन घडून येणे हे शांततामय समाज जीवनासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. समायोजनामुळे संघर्ष नियंत्रणात आणता येतो आणि संघर्षाचे नकारात्मक परिणाम टाळता येतात. समायोजनामुळे एकेकाळी टोकाचा संघर्ष करणारे समूह सहकार्ययुक्त सहजीवन जगू शकतात. संघर्षामुळे निर्माण होणारी हिंसा, नाश, कटुता इ. टाळून समाजात व्यवस्था निर्माण करण्याचे कार्य समायोजन प्रक्रियेमुळे होऊ शकते.

**५) समावेशन** (Assimilation) **:**

समावेशन ही एक महत्त्वाची सामाजिक प्रक्रिया किंवा सामाजिक आंतरक्रियेचा प्रकार आहे. दोन समूहाना परस्परांशी जुळवून घेण्याची ही आणखी एक महत्त्वाची यंत्रणा आहे. समावेशन हा समायोजनाचा एक प्रकार असला तरी त्यामुळे होणारी दोन समूहातील तडजोड ही दीर्घकाळ टिकणारी असते. समावेशन ही अशी सामाजिक प्रक्रिया आहे की ज्यामध्ये एखादा समूह दुसऱ्या समूहाची संस्कृती, मूल्ये, जीवन पद्धती जवळजवळ पूर्णपणे स्विकारते. एकप्रकारे समावेशन प्रक्रिया म्हणजे एका समूहाने दुसऱ्या समूहाच्या संस्कृतीचे अनुकरण करून तिचे आत्मसातीकरण करण्याची प्रक्रिया असते. उदा. युरोपियन देशातील भारतीयांची मुले ही तेथील लोकांचे वागणे, बोलणे, कपडे, जीवनशैली स्विकारतात आणि त्यांच्यासारखे बनतात. या प्रकारची समावेशनाची प्रक्रिया समूह जीवनात मूलभूत प्रकारचे बदल घडवून आणते. या प्रक्रियेत समूहाकडून दुसऱ्या संस्कृतीचा पूर्ण स्विकार होतो. दुधात पाणी मिसळले तर पाणी जसे वेगळे दिसत नाही त्याप्रमाणे एक संस्कृती दुसऱ्या संस्कृतीत विलीन होते.

**अ) 'समावेशन' या संकल्पनेचा अर्थ** (Meaning of Assimilation) **:**

समावेशन या संकल्पनेचा अर्थ स्पष्टपणे समजून घेण्यासाठी आपण या संकल्पनेच्या काही व्याख्या पाहू. त्या खालीलप्रमाणे –

**१) सॅम्युअल कोईनिग – ''समावेशन ही एक अशी प्रक्रिया आहे की ज्यामध्ये व्यक्ती आणि समूह हे दुसऱ्या समूहाची संस्कृती पूर्णपणे स्विकारतात.''** ("Assimilation is the process whereby persons and groups acquire the culture of another group" - Samuel Koenig)

**२) बीसान्झ – ''समावेशन ही एक अशी सामाजिक प्रक्रिया आहे की ज्याद्वारे व्यक्ती आणि समूह यांच्यात भावनिक सारखेपणा येतो.''** ("Assimilation is the social process whereby individuals and groups come to share the same sentiments" - Biesanz)

**३) मार्क आणि यंग – ''समावेशन म्हणजे पूर्वी वेगवेगळ्या असणाऱ्या समूहांचे एकजीवीकरण किंवा एकत्रीकरण होय.''** ("Assimilation is the fusion or blending of two previously distinct groups into one" - Mark and Young)

**४) ऑगबर्न आणि निमकॉफ – ''समावेशन ही एक अशी प्रक्रिया आहे की ज्यायोगे एकेकाळी वेगवेगळे असणारे व्यक्ती आणि समूह हे एक सारखेच होतात आणि त्यांचे हितसंबंध आणि दृष्टिकोन समान बनतात.''** ("Assimilation is the process whereby individuals and groups once dissimilar become similar and identified in their interest and outlook" - Ogburn and Nimkoff)

वरील व्याख्यांचे काळजीपूर्वक अध्ययन केल्यानंतर आपल्या हे लक्षात येते की 'समावेशन' म्हणजे एका गटाने दुसऱ्या गटाच्या संस्कृतीचा स्विकार करणे होय. त्यामुळे ते दोन्ही गट एक होतात, त्यांचे हितसंबंध व दृष्टिकोन सारखे बनतात. समावेशनचा अर्थ समजून घेतल्यावर आता आपण या प्रक्रियेची वैशिष्ट्ये अभ्यासू.

**ब) 'समावेशन' प्रकियेची वैशिष्ट्ये** (Characteristics of Assimilation) **:**

१) **समावेशन ही संथ गतीने घडून येणारी प्रक्रिया आहे.** (Assimilation is a slow and gradual process)

समावेशन हे अचानक घडून येत नाही. या प्रक्रियेला प्रदीर्घ कालावधी लागतो. समावेशन किती जलद अथवा संथ गतीने घडून येईल हे त्या दोन समूहांच्या संस्कृतीत किती भेद आहेत आणि त्या दोन समूहातील संपर्काचे स्वरूप आणि वारंवारितेवर अवलंबून असते. जर दोन समूहात वारंवार आणि घनिष्ठ संबंध येत असतील तर समावेशन जलद गतीने घडून येईल. पण दोहोंमधील संबंध जर कमी प्रमाणात असतील आणि संबंधात आपलेपणा नसेल तर समावेशनाला दीर्घ कालावधी लागेल.

**२) बहुधा समावेशन हे अजाणतेपणे घडून येते** (Assimilation, in most cases, is unconscious)**:**

बहुधा समावेशन प्रक्रिया ही अजाणतेपणे घडून येते. ही प्रक्रिया जाणीवपूर्वक किंवा नियोजनाने घडत नाही. एक समूह आपली संपूर्ण संस्कृती विसरतो आणि दुसऱ्या गटाची संस्कृती स्विकारतो त्याला बराच काळ लागतो. हे अनेक समूहांच्या बाबत अजाणतेपणी (unconsciously) घडून येते.

**३) समावेशन ही द्विमार्गी प्रक्रिया आहे** (Assimilation is a two way process) **:**

समावेशन या प्रक्रियेमध्ये काही प्रमाणात ''देव-घेव'' घडून येते. म्हणजेच ही प्रक्रिया एकमार्गी नाही. यामध्ये दोन्ही समूह एकमेकांकडून काहीतरी घेतात. ज्यावेळी एक समूह दुसऱ्या समूहाची संस्कृती, मूल्ये, जीवनपद्धती, स्वीकारतो त्यावेळी दुसरा समूहसुद्धा पहिल्या समूहाच्या काही गोष्टी स्विकारतो.

**४) समावेशन ही प्रक्रिया एखाद्या विशिष्ट क्षेत्राशी मर्यादित असत नाही** (Assimilation is not confined to any specific field) **:**

समावेशन ही एक अशी प्रक्रिया आहे की जी विविध क्षेत्रामध्ये घडून येते. जसे भाषेचे अनुकरण, धार्मिक गोष्टीचे अनुकरण, सांस्कृतिक मूल्यांचे अनुकरण म्हणून ही प्रक्रिया कोणत्याही एका क्षेत्राशी मर्यादित नाही.

समावेशन प्रक्रियेला चालना देणारे अनेक घटक आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने सहिष्णुता, संबंधातींल घनिष्ठता, दोन्ही समूहांच्यामधील सांस्कृतिक सारखेपणा, शिक्षण, संधीची समानता इ. घटकांचा समावेश होतो. याउलट काही घटक असे असतात की जे समावेशन प्रक्रियेत अडथळा आणू शकतात. दोन्ही समूहातील संपर्क कमी असणे, दोन्ही संस्कृतीत भेद अधिक असणे, परस्पर पूर्वग्रह असणे, दोन्ही समूहात संघर्ष असणे इ. हे घटक समावेशन प्रक्रियेला अडथळा आणणारे घटक आहेत.

समावेशन ही एक महत्त्वाची सामाजिक प्रक्रिया आहे. एखाद्या मोठ्या समाजातील विभिन्न समूहांमधील सांस्कृतिक भेद कमी करून त्यांच्यात सारखेपणा वाढीस लावणारी ही प्रक्रिया आहे. त्यामुळे समाजात एकात्मता आणि ऐक्यभाव वाढीस लागतो. संघर्षाची शक्यता कमी होते. अशाप्रकारे, समावेशन प्रक्रियेमुळे शांततामय सामाजिक जीवन शक्य होते.

**६) विनिमय** (Exchange) **:**

विनिमय हा सुद्धा एक महत्त्वाचा सामाजिक आंतरक्रियेचा प्रकार आहे. पीटर ब्लाऊ या समाजशास्त्रज्ञाच्या मते - विनिमयात्मक स्वरूपाची आंतरक्रिया ही एक मूलभूत सामाजिक प्रक्रिया असून ती समाजीवनाच्या सर्व क्षेत्रात आढळते.

**अ) 'विनिमय' या संज्ञेचा अर्थ** (Meaning of Exchange) **:**

वेगवेगळ्या समाजशास्त्रज्ञानी विनिमय या संज्ञेच्या अनेक व्याख्या दिलेल्या आहेत. आपण येथे सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ पीटर ब्लाऊ यांनी केलेल्या व्याख्येवरून विनिमय ही संज्ञा समजून घेऊ.

**पीटर ब्लाऊ - ''काहीतरी परत मिळावे या अपेक्षेने किंवा प्रेरणेने व्यक्तीनी इतरांशी केलेल्या ऐच्छिक क्रिया म्हणजे सामाजिक विनिमय होय. आणि या प्रक्रियेत व्यक्तीना इतरांकडून त्यांच्या अपेक्षेप्रमाणे काही लाभ मिळतातही.''** ("Social exchange refers to voluntary actions of individuals that are motivated by the returns they are expected to bring and typically do in fact bring from others" - Peter Blau)

अशाप्रकारे व्यक्ती जेव्हा काहीतरी परत मिळवण्याच्या उद्देशाने कृती करतात त्यालाच विनिमय असे म्हणता येईल. उदा. भारतातील बलुतेदारी पद्धत ही एक विनिमय पद्धत होती. विनिमय ही एक अशी प्रक्रिया आहे की, ज्याद्वारे दोन व्यक्ती किंवा दोन समूह हे इतरांसाठी काहीतरी कार्य करतात व इतरांच्याकडून त्याच मूल्याचे (equal value) काहीतरी मिळवण्याची अपेक्षा करतात. जर विनिमयाचेच स्वरूप व्यवस्थित असेल तर या आंतरक्रिया समाजाच्या संघटनेसाठी योग्य योगदान देऊ शकतात. अन्यथा यामुळे संघर्ष व विघटनकारी गोष्टी देखील घडून येऊ शकतात.

आर्थिक जीवनामध्ये विनिमयाचे स्वरूप स्पष्टपणे दिसून येते. परंतु सामाजिक जीवनामध्ये सुद्धा विनिमय घडून येतो. या दोन्ही विनिमयामध्ये फरक आहे. आर्थिक जीवनात विनिमयाचे स्वरूप निश्चित असते. जसे पैसा व त्या किंमतीच्या वस्तू. परंतु सामाजिक विनिमयाचे स्वरूप असे स्पष्टपणे दिसून येत नाही. सामाजिक विनिमयात जी देवाण घेवाण होते त्याचे पैशाप्रमाणे मोजमाप करता येत नाही. सामाजिक विनिमय काही वेळा सामाजिक मान्यतेसाठी असतो. भावनिक सुरक्षितता मिळावी, प्रतिष्ठा मिळावी यासाठी देखील सामाजिक विनिमय घडून येतो. आर्थिक विनिमय व्यक्तिनिरपेक्ष असतो. पण सामाजिक विनिमय अधिक व्यक्तिनिष्ठ असतो. सामाजिक विनिमयात मानसिक प्रक्रिया गुंतलेल्या असतात. या प्रक्रियेत परस्परात जेंव्हा देवाण-घेवाण होते तेंव्हा परस्परांशी आकर्षण निर्माण होते आणि परस्परांकडून काही प्राप्त व्हावे अशी अपेक्षा व्यक्ती ठेवतात.

**ब) विनिमयाची वैशिष्ट्ये** (Characterisitcs of Exchange) **:**

विनिमयाची खालील वैशिष्ट्ये सांगता येतील.

**१) बक्षिसाची अपेक्षा** (Expectation of Reward) **:**

विनिमय प्रक्रियेत आंतरक्रिया करणाऱ्या व्यक्तींचा मुख्य उद्देश हा नेहमीच इतराकडून काही बक्षिस किंवा पारितोषिक मिळवण्याचाच असतो.

**२) विनिमय हा परस्परातील देवाण-घेवाणीवर आधारित असतो** (Exchange is based on reciprocity) **:**

विनिमय ही प्रक्रिया साधारणत: देवाण-घेवाण या तत्त्वावर चालत असते. यामध्ये व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीने केलेल्या कृतीला प्रतिसाद देणे अपेक्षितच असते. उदा. एखाद्याला पुष्पगुच्छ दिल्यावर त्याबद्दल त्याने आभार मानणे अपेक्षितच असते.

**३) विनिमयामध्ये 'किंमत' आणि 'फायदा' या गोष्टींचा हिशोब अपेक्षित असतो** (Exchange may involve calculation of 'cost' and 'benefits') **:**

विनिमय संबंधांमध्ये सहभागी होण्यापूर्वी व्यक्ती 'किंमत' आणि 'फायदा' या गोष्टीचा नेहमीच तौलनिक विचार करते. विनिमय संबंधात व्यक्ती तर्कसंगत विचाराने वागते.

**४) बक्षिसामुळे विनिमय संबंध दृढ होतात** (Reward strengthens exchange behaviour)**:**

जर एखाद्या व्यक्तीला तिच्या वर्तनाबद्दल काही ना काही स्वरूपात बक्षिस (Reward) मिळाले तर ती व्यक्ती ते विनिमय संबंध टिकवून ठेवते.

**५) सामाजिक विनिमय ही प्रत्यक्ष परताव्यासाठी जाणीवपूर्वक केलेली कृती नसू शकते** (Social exchange may not be a conscious activity for direct return) **:**

सामाजिक विनिमयामध्ये एखादी व्यक्ती ही कोणत्याही प्रकारच्या प्रत्यक्ष लाभाची जाणीवपूर्वक अपेक्षा न करताही आपले कार्य करते. उदा. – एखादा निवृत्त शिक्षक कोणतीही फी न घेता अनाथाश्रमातील मुलांना शिकवीत असेल तर त्या शिक्षकाला कोणताच प्रत्यक्ष आर्थिक फायदा मिळत नाही हे उघड आहे. पण त्या शिक्षकाची समाजातील प्रतिमा उंचावणे, प्रतिष्ठा वाढणे हा फायदा मिळतोच. अशाप्रकारे सामाजिक आंतरक्रियांच्या सहा मुख्य प्रकारांचा किंवा सहा प्रमुख सामाजिक प्रक्रियांचा थोडक्यात परिचय आपण करून घेतला आहे.

समाजशास्त्रज्ञानी सामाजिक प्रक्रियांचे दोन स्थूल गटात वर्गीकरणही केले आहे. हे वर्गीकरण कसे आहे, हे आता आपण थोडक्यात पाहू.

**साहचर्यात्मक आणि विघटनात्मक सामाजिक प्रक्रिया** (Associative and Disassociative Processes) **:**

समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक प्रक्रियांचे खालील दोन प्रकारात विभाजन केले आहे.

**१) साहचर्यात्मक / एकात्मीकरणात्मक सामाजिक प्रक्रिया** (Associative or integrative social processes) **:**

ज्या सामाजिक प्रक्रिया व्यक्ती आणि समूहांना एकत्र आणतात त्यांना साहचर्यात्मक किंवा एकात्मीकरणात्मक सामाजिक प्रक्रिया असे म्हणतात. उदा. सहकार्य, समायोजन, समावेशन आणि विनिमय या प्रक्रिया.

**२) असाहचर्यात्मक किंवा विघटनात्मक सामाजिक प्रक्रिया** (Disassociative or disintegrative social processes) **:**

या सामाजिक प्रक्रिया साहचर्यात्मक किंवा एकात्मीककरणात्मक सामाजिक प्रक्रियांच्या विरोधी प्रक्रिया आहेत. ज्या सामाजिक प्रक्रिया व्यक्ती–व्यक्ती किंवा समूहा–समूहात दुरावा निर्माण करतात, समाजात विघटन घडवून आणतात त्यांना अ–साहचार्यात्मक किंवा विघटनात्मक सामाजिक प्रक्रिया असे म्हणतात. उदा. स्पर्धा आणि संघर्ष

२.२.२ समाज

अ) **मानवी समाजाचा अर्थ आणि वैशिष्ट्ये** (Society : Definition and Meaning) **:**

'समाज' या संकल्पनेचा समाजशास्त्रीय अर्थ समजून घेण्यासाठी आपण काही व्याख्यांचा अभ्यास करू.

अ) **'समाज' या संकल्पनेच्या व्याख्या** ('Society' : Definitions) **:**

१) **मॅकायव्हर – ''समाज म्हणजे सामाजिक संबंधाचे जाळे होय''** ("Society is a web of social relationshisps." - MacIver)

२) **मॅकायव्हर आणि पेज – ''अधिकार आणि पारस्पारिक मदत, विविध गट आणि विभाजन, मानवी वर्तनावरील नियंत्रण आणि स्वातंत्र्य याबाबतच्या रूढी आणि रितीरिवाजांची सातत्याने बदलत राहणारी गुंतागुंतीची व्यवस्था म्हणजे समाज होय.''** ("Society is a system of usages and procedures of authority and mutual aid, of many groupings and divisions, of control of human behaviour and of liberties. This ever changing, complex system we call society." - MacIver and Page).

३) **टिशलर, व्हायटन, आणि हंटर – ''समाज म्हणजे व्यापक व सर्वसमावेशक अशी प्रत्यक्षात अस्तित्वात असणारी एक सामाजिक व्यवस्था होय. समाजात बहुतांशी सदस्यांची भरती करण्याची अंतर्गत व्यवस्था असते, ती पिढ्यान् पिढ्या टिकून राहते. समाजाला स्वत:ची सर्व सदस्यांसाठी समान अशी संस्कृती आणि विशिष्ट भूप्रदेश असतो.''** (Society is the largest and most inclusive social system that exists. A society recruits most of its members from within, sustains itself across generations, shares a culture and occupies a territory." - Tischler, Whitten and Hunter)

४) **ड्रेसलर आणि विलिस – ''समाज म्हणजे समान संस्कृती असणाऱ्या आणि आपण सर्वजण एक आहोत असे मानणाऱ्या व्यक्तींचा समूह होय.''** ("A Society is a group of people who share a culture and think of themeselves as united." - Dressler and Willis)

५) **थिओडोर कॅपलो – ''समाज म्हणजे सर्व वयोगटातील स्त्री–पुरुषांचा समावेश असणारी स्वयंपूर्ण आणि स्वयंसातत्यशील अशी सामाजिक व्यवस्था होय.''** ("A Society is a self safficient, self-perpetuating social system that includes persons of both sexes and all ages." - Theodore Caplow)

६) **मॉरिस गिन्सबर्ग – इतरांपेक्षा वेगळ्या असलेल्या ''निश्चित स्वरुपाच्या संबंधानी किंवा वर्तन प्रकारानी एकात्म झालेला व्यक्तींचा समुच्चय म्हणजे समाज होय.''** ("A Society is a collection of individuals united by certain relations or mode of behaiour which mark them off from

others who do not enter those relations or who differ from them in behaviour" - Morris Ginsborg)

**७) डब्ल्यु. जी. सम्नेर – ''समाज म्हणजे मानवाचा असा समूह की जो सहकारी प्रयत्नांद्वारे उपजीविकेची साधने मिळवितो आणि मानव जातीचे अस्तित्व टिकवितो.''** ("Society is a group of human beings living in co-operative efforts to win subsistence and perpetuate the species" - W. G. Sumner)

समाजशास्त्रामध्ये 'समाज' संकल्पनेच्या अनेक व्याख्या आहेत. त्यापैकी काही व्याख्या आपण वर अभ्यासल्या आहेत. या व्याख्या आपण काळजीपूर्वक पुन्हा वाचा आणि 'समाज' या संकल्पनेच्या वेगवेगळ्या अर्थछटा शोधण्याचा प्रयत्न करा. आपणास असे आढळून येईल की, विविध समाजशास्त्रज्ञानी व्याख्या करताना समाजाच्या वेगवेगळ्या पैलूंवर भर देऊन समाज ही संकल्पना शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. वरील व्याख्यांचे विश्लेषण करून 'समाज' या संकल्पनेच्या विविध अर्थछटा कोणत्या याचे विवेचन खाली दिले आहे.

**ब) समाज या संज्ञेचा अर्थ** (Meaning of the term 'Society') **:**

'समाज' या संकल्पनेच्या वरील व्याख्यांमध्ये 'समाज म्हणजे काय' हे स्पष्ट करणाऱ्या खालील अर्थछटा दिसून येतात.

१) समाजशास्त्रज्ञांनी समाजाची व्याख्या दोन दृष्टिकोनातून केलेली दिसून येते. – (अ) 'एक अमूर्त बाब' (as an abstract entity) या दृष्टीने काही समाजशास्त्रज्ञांनी समाजाकडे पाहिले आहे. तर (ब) एक मूर्त वास्तविकता (concrete reality) यादृष्टीनेही समाजशास्त्रज्ञ त्याकडे पाहतात.

२) समाज सामाजिक सबंधाचे जाळे आहे. किंवा सामाजिक संबंधाची ती एक व्यवस्था आहे. या दृष्टीने समाजशास्त्रज्ञ समाजाकडे पाहतात. या दृष्टीकोणातून समाज हा 'अमूर्त' आहे. कारण आपण सामाजिक संबंध किंवा सामाजिक संबंधांची व्यवस्था प्रत्यक्ष निरीक्षण करू शकत नाही. लोकांच्या वर्तनाचे निरीक्षण करून आपणाला सामाजिक संबंधाच्या व्यवस्थेविषयीची अनुमाने (inferences) काढावी लागतात. एक मूर्त वास्तविकता यादृष्टीने समाजाकडे पहाताना, 'निश्चित भूप्रदेशावर वास्तव्य करणारा विशाल मानवी समूह किंवा लोकांचे संघटन' म्हणजे समाज, अशी समाजशास्त्रज्ञांची धारणा आहे.

३) समाज ही वर्तनविषयक नियमांची आणि रीतीरिवाजांची एक गुंतागुंतीची व्यवस्था असून त्यात विविध समूह, त्यांचे विभाजन आणि सामाजिक नियंत्रणाच्या यंत्रणांचा समावेश असतो.

४) समाज हा एक विशाल समूह असतो आणि त्याअंतर्गत सापेक्षत: लहान गटांचा समावेश होतो.

५) समाज निश्चित भूप्रदेशावर वसलेला असतो.

६) प्रत्येक समाजाला त्याची स्वत:ची अशी संस्कृती असते.

७) आपण सर्व एक आहोत, इतर समाजातील व्यक्तींपेक्षा आपण वेगळे आहोत, आणि आपल्या वर्तनपद्धती इतरांहून वेगळ्या आहेत अशी समाजसदस्यांची धारणा असते.

८) नव्या सदस्यांची भरती करण्याची व्यवस्था समाजातच असते, समाजात सर्व वयोगटातील स्त्री-पुरूष सदस्यांचा समावेश असतो आणि पिढ्यान पिढ्या टिकून राहण्याची क्षमता समाजात असते.

९) सभासदांच्या उपजीविकेच्या गरजा भागविण्याची स्वतःची यंत्रणा प्रत्येक समाजात असते. समाज ही एक स्वयंपूर्ण आणि स्वयं-सातत्यशील व्यवस्था आहे.

१०) समाज कधीही स्थितीशील (Static) नसतो, त्यात सातत्याने बदल होत असतात. समाजशास्त्रज्ञ 'समाज' ही संकल्पना वरील अर्थाने वापरतात.

**मानवी समाजाची वैशिष्ट्ये** (Characteristics of Human Society) **:**

समाज या संज्ञेचा अर्थ समजून घेतल्यानंतर आता आपण मानवी समाजाची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये लक्षात घेऊ.

मानवी समाजाची महत्त्वाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :

**१) समाज हे सामाजिक संबंधांचे जाळे आहे** (Society is a web of social relationship)**:**

समाज हा आंतरक्रिया करणाऱ्या व्यक्तींचा आणि समूहांचा बनलेला असतो. समाज हा व्यक्तींच्या आंतरक्रियांशिवाय अस्तित्वात येवू शकत नाही. अशा प्रकारच्या सामाजिक आंतरक्रिया आधीपासूनच अस्तित्वात असणाऱ्या वर्तनविषयक नियमने (सामाजिक प्रमाणके) आणि काही वर्तनविषयक सर्वसामान्य स्वरूपाचे आदर्श (मूल्ये) यानुसार घडतात. आंतरक्रियांमुळेच व्यक्ती आणि समूहात सामाजिक संबंध प्रस्थापित होतात, टिकून राहतात किंवा बदलतात. समाज हा अशाच सामाजिक संबंधाच्या जाळ्याचा बनलेला असतो. म्हणजेच व्यक्ती आणि समूहातील परस्परसंबंध सुटे-सुटे नसतात. तर त्या संबंधांची एक व्यवस्था तयार झालेली असते. ज्याप्रमाणे एकमेकांत गुंफण झालेल्या उभ्या आणि आडव्या धाग्यांमुळे कापड बनते तसेच समाज सुद्धा एकमेकांत गुंतलेल्या सामाजिक संबंधातून तयार झालेल्या जाळ्याप्रमाणेच असतो.

**२) समाज वेगवेगळी सामाजिक स्थाने असणाऱ्या व्यक्तींचा बनलेला असतो** (Society consists of individuals holding different positions) **:**

समाज एक विशाल सामाजिक समूह आहे. तो अनेक व्यक्तींचा मिळून बनलेला असतो. असे असले तरी या सर्व व्यक्ती एकमेकांपासून विभक्त नसतात. समाजातील विविध व्यक्ती वेगवेगळ्या प्रकारच्या सामाजिक संबंधानी एकत्र बांधलेल्या असतात. समाजातील या व्यक्ती वेगवेगळ्या सामाजिक स्थानांवर असतात. उदा. 'आई', 'वडील', 'शिक्षक', 'कामगार', 'इंजिनियर', 'डॉक्टर' इ. ही समाजातील वेगवेगळी सामाजिक स्थाने आहेत. समाजातील विविध व्यक्ती अशी विविध स्थाने भूषवित असतात.

**३) समाज हा सापेक्षत: मोठा आणि स्वतंत्र समूह असतो** (Society is a relatively large and independent group) **:**

समाज हा सर्वसमावेशक समूह असतो आणि तो सापेक्षत: विशाल किंवा मोठा असतो. समाज स्वतंत्र समूह असतो; म्हणजेच विशिष्ट समाज हा दुसऱ्या एखाद्या समूहाचा घटक नसतो, तर याउलट, विशाल अशा समाजात त्याहून लहान आकाराच्या अनेक समूहांचा अंतर्भाव असतो. उदाहरणार्थ भारतीय समाज हा वेगवेगळ्या जाती-समूहांचा, वेगवेगळ्या भाषिक समूहांचा, विविध धार्मिक समूहांचा बनलेला विशाल समाज आहे.

**४) निश्चित भूप्रदेश** (Definite Territory) **:**

समाज हा साधारणपणे भूप्रदेशीय समूह असतो. प्रत्येक समाजाला निश्चित भूप्रदेश असतो. त्या संदर्भातील जवळ जवळ सर्व लोक त्या भू-प्रदेशावरच आपले संपूर्ण जीवन जगतात. समाजाला भौगोलिक मर्यादा असतात असा याचा अर्थ आहे. प्रत्येक समाजाच्या भू-प्रदेशाच्या सीमारेषा ठरलेल्या असतात. निश्चित भूप्रदेश आणि त्याच्या भौगोलिक वैशिष्ट्यांचा त्या समाजाच्या संस्कृतीवर प्रभाव पडलेला दिसून येतो.

**५) व्यापक संस्कृती** (Comprehensive Culture) **:**

प्रत्येक समाजाची स्वत:ची अशी वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती असते. संस्कृती म्हणजे समग्र समाजाची एक जीवनपद्धती किंवा जीवनमार्ग होय. मानवनिर्मित अशा सर्व भौतिक आणि अभौतिक गोष्टींचा समावेश संस्कृतीमध्ये होतो. सर एडवर्ड बी. टायलर यांच्या मते, ''संस्कृती ही अशी संकीर्ण समग्रता असते की ज्यात ज्ञान, कला, श्रद्धा, नीती, कायदा, रूढी या व अशा इतर पात्रतांचा व सवयींचा समावेश होतो आणि या गोष्टी व्यक्तीने समाजाचा सभासद या नात्याने संपादित केलेल्या असतात.'' संस्कृतीमुळेच समाजाचे सातत्य टिकून राहते.

**६) समाजाच्या सदस्यांमध्ये सारखेपणा, भिन्नता आणि परस्परावलंबन असते** (Likeness and difference and Interdependence among members) **:**

समाज हा वेगवेगळ्या स्वभावाच्या, गुणाच्या व्यक्तींचा बनलेला असतो. समाजातील सदस्यांमध्ये काही बाबतीत सारखेपणा तर काही बाबतीत वेगळेपणा दिसून येतो. उदा. सर्वच सभासद हे संस्कृतीद्वारे घडवले जातात किंवा त्यांचे साधारणपणे एकाच पद्धतीने समाजीकरण केले जाते. समाजीकरण हे कमी जास्त प्रमाणात सारखेपणानेच केले जाते त्यामुळे समाजाच्या सदस्यात सारखेपणा किंवा समानता दिसून येते. ज्यावेळी सर्वच सभासद सारखीच प्रमाणके, मूल्ये, प्रथा, परंपरा यांचे पालन करतात, तेव्हा त्यांच्यात काही किमान सारखेपणा येतो. समाज - सदस्यांमधील अशा सारखेपणामुळेच सामाजिक संघटन किंवा समाज व्यवस्थेचे मजबूतीकरण घडून येते. स्थिरता आणि सातत्य हे सभासदांमधील अशा सारखेपणावर अवलंबून असते. समाजातील सभासदांत भिन्नता देखील असते. समाजातील लोकांत काही किमान सारखेपणा असला

तरी ते यंत्राप्रमाणे एकसारखेच वागतात असे नाही. समजाची गुंतागुंत ही समाजातील सभासदांमध्ये असणाऱ्या विविधतेवर अवलंबून असते. समाजाच्या सदस्यांमधील ही विविधता किंवा हे वेगळेपण लिंग, वय, जैविक गुण (उदा. बुद्धीमत्ता), कार्यक्षमता, कृती आणि संगोपनातील वेगळेपण इ. घटकांमुळे निर्माण होते. समाजातील सदस्यांमधील या वेगळेपणाची अंतिम परिणती परस्परपूरक आणि परस्परावलंबी सामाजिक संबंधात होते. भिन्न भिन्न गुणवैशिष्ट्ये आणि पात्रता लाभलेल्या व्यक्ती भिन्न भिन्न कामे पार पाडतात. एकमेकांच्या गरजा भागविण्यासाठी लोक परस्परांवर अवलंबून राहतात. म्हणजेच लोकांमध्ये परस्परावलंबन वाढते. परस्परावलंबनामुळे लोक परस्पराना सहकार्य करतात. त्यामुळेच सामाजिक जीवन शक्य होते.

७) **श्रमविभाजनाची व्यवस्था** (System of Division of Labour) **:**

श्रमविभाजनाची व्यवस्था हे सर्वच समाजांचे एक वैशिष्ट्य आहे. एक माणूस सर्व कामे करू शकत नाही आणि सर्व माणसाना एकसारखेच काम करून चालत नाही. म्हणून समाज विविध कामे विविध व्यक्तीना वाटून देतो. हेच श्रमविभाजन होय. उदा. शेतकरी, डॉक्टर्स, परिचारिका, अभियंता, व्यावसाईक, न्यायाधीश, नेते, शिक्षक, सैनिक, पोलिस इ. सामाजिक स्थानावरील व्यक्ती वेगवेगळी कामे पार पाडीत असल्याचे दिसून येते. समाजातील विविध व्यक्ती वरील विविध विशिष्ट कामे करीत असताना स्वत:च्या, इतरांच्या तसेच समग्र समाजाच्या गरजा भागवित असतात. अशाप्रकारे समाजामध्ये विविध सभासदांत कार्याचे विभाजन झालेले असते. आपल्या गरजा जसजशा वाढत जातील तसे तसे आपले इतरांवरील अवलंबित्व वाढत जाते. साध्या समाजांमध्ये (Simple Societies) श्रमविभाजनाचे स्वरूपही साधेच असते. पण मोठ्या संकीर्ण (Complex) समाजात गुंतागुंतीचे श्रमविभाजन असते. श्रमविभाजनामुळेच समाजातील सदस्यांमध्ये परस्परावलंबन आणि परस्पर सहकार्य निर्माण होते.

८) **समाजात लैंगिक पुनरुत्पादनाद्वारे नव्या सभासदांची भरती** (Recruitment of new members throught sexual reproduction) **:**

समाजाचे अस्तित्व त्यातील जिवंत सदस्यांवर अवलंबून असते. मानवी व्यक्ती जन्मतात, वाढतात, वृद्ध होतात आणि मृत्यू पावतात. कोणत्याही मानवी व्यक्तीच्या जीवनाचा कालावधी सापेक्षत: कमी आहे. समाजाच्या सातत्यासाठी म्हणूनच नवीन सभासदाची सातत्याने भरती होणे गरजेचे असते. प्रत्येक समाजातच नव्या सभासदांची भरती करण्याची व्यवस्था असते. समाजातील विवाहसंस्था ही लैंगिक पुनरुत्पादनाला सामाजिक मान्यता देते. अशा समाजमान्य लैंगिक पुनरुत्पादनाद्वारे समाजात नव्या सभासदांची भरती केली जाते. विवाह आणि कुटुंबसंस्था ह्या सामाजिक संस्था याबाबतची काळजी घेतात. हाच प्रत्येक समाजातील सभासद मिळविण्याचा मूलभूत मार्ग आहे.

९) **समाज ही सापेक्षत: स्वयंपूर्ण व्यवस्था आहे** (Society is relatively self sufficient system)**:**

प्रत्येक समाज ही सापेक्षत: स्वयंपूर्ण व्यवस्था असते. म्हणजेच सभासदांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठीची व्यवस्था समाजाने निर्माण केलेली असते. उदा. सभासदांना आवश्यक असे अन्नधान्य, कपडे, घरे आणि इतर उपभोगाच्या वस्तू आणि शिक्षण, आरोग्य, संरक्षण यासारख्या सेवा यांची पूर्ती

करण्याची पर्याप्त व्यवस्था प्रत्येक समाजात अस्तित्वात असते. याशिवाय, काही पूर्वावश्यकता किंवा गरजा भागविणे समाजाच्या अस्तित्वासाठीच आवश्यक असते. उदा. (१) योग्य प्रमाणात लोकसंख्या अबाधित ठेवणे, (२) सभासदांमध्ये कार्यांच्या वाटपाची यंत्रणा किंवा 'श्रमविभाजन' निर्माण करणे. (३) समाजाची एकता अबाधित ठेवणे आणि (४) समाजाचे सातत्य अबाधित ठेवणे प्रत्येक समाज ह्या गरजा पूर्ण करण्यासाठीच्या यंत्रणा विकसित करतो. अर्थातच समाजातील विविध सामाजिक संस्था, कुटूंब, विवाह, शिक्षण, धर्म, अर्थव्यवस्था, राजकारण समाजाच्या वरील गरजा पूर्ण करणाऱ्या महत्त्वाच्या यंत्रणा आहेत. अशाप्रकारे प्रत्येक समाज हा सापेक्षत: स्वयंपूर्ण असतो असे असले तरी समाज हे सापेक्षत: स्वयंपूर्ण असतात. कारण काही गरजा पूर्ण करण्यासाठी विशिष्ट समाजाला इतर समाजांवर अवलंबून रहावे लागते. उदा. अन्न धान्याची कमतरता भासल्यास धान्य आयात करावे लागते.

**१०) समाज ही स्वयं-सातत्यशील व्यवस्था आहे** (Society is a self perpetuating system)**:**

प्रत्येक समाजात स्वत:चे सातत्य टिकवून ठेवण्याची व्यवस्था असते. यामुळेच समाज पिढ्यान पिढ्या अस्तित्वात राहतो. लोक जन्मतात आणि मृत्यू पावतात परंतु समाज मात्र अस्तित्वात असतो. हे दोन गोष्टीमुळे घडते. (१) नवीन सभासद हे लैंगिक पुनरूत्पादनाद्वारे भरती केले जातात व लोकसंख्या अबाधित ठेवली जाते. हे विवाह आणि कुटुंबाद्वारे साध्य केले जाते. (२) समाजात स्वत:ची संस्कृती किंवा जीवन जगण्याचा मार्ग टिकवून ठेवण्याची यंत्रणाही असते. संस्कृतीच्या संक्रामणाच्या काही यंत्रणा (उदा. समाजीकरण, शिक्षण) समाजात कार्यरत असतात. या यंत्रणांद्वारे समाजाच्या नव्या सभासदांना संस्कृती शिकविली जाते. त्यामुळे समाजाची जीवनरीत टिकून राहते.

**११) सामाजिक नियंत्रणाच्या यंत्रणा** (Mechanisms of Social Control) **:**

सदस्यांच्या सामाजिक वर्तनावर नियंत्रण ठेवण्याच्या यंत्रणा प्रत्येक समाजात असतात. सभासदांच्या अनेक इच्छा, आकांक्षा व गरजा असतात आणि त्यांची पूर्ती करण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून होतो. या प्रयत्नात व्यक्ती-व्यक्तीने संघर्ष निर्माण होण्याची शक्यता असते. समाजाची नियमने आणि मूल्ये यांच्या विरोधात जाऊन व्यक्ती आपल्या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न करते, तेव्हा ते वर्तन विचलित वर्तन (deviant behaviour) ठरते. अशा विचलनात्मक वर्तनामुळे सामाजिक संघटन धोक्यात येते. त्यामुळे त्यावर नियंत्रण ठेवणे गरजेचे असते. समाजात व्यवस्था आणि स्थैर्य टिकविण्यासाठी विचलनात्मक वर्तनावर नियंत्रण ठेवणे आवश्यक असते. त्यातच समाजाचे हित असते म्हणूनच समाजात सामाजिक नियंत्रणाच्या औपचारिक आणि अनौपचारिक यंत्रणा (उदा. समाजीकरण, कायदा) अस्तित्वात असतात. सामाजिक नियंत्रणांच्या अशा यंत्रणा, संस्कृतीच्या संक्रामणाच्या यंत्रणा याद्वारेच सामाजिक व्यवस्था आणि स्थैर्य टिकवून ठेवले जाते.

**१२) समाज ही संरचनात्मक व्यवस्था आहे** (Society is a structured entity) **:**

प्रत्येक समाजाला स्वत:ची संरचना असते. समाजातील सामाजिक संबंधांची रचना ही सुव्यवस्थित असते. समाज विविध घटकानी मिळून बनलेला असतो. समाजाच्या घटकांमधील परस्परसंबंधांची सापेक्षत:

टिकावू अशी व्यवस्था म्हणजे सामाजिक संरचना होय. सामाजिक दर्जा व भूमिका, समूह आणि उपसमूह, सामाजिक नियमने आणि सांस्कृतिक मूल्ये हे सर्व सामाजिक संरचनेचे घटक आहेत ते सापेक्षत: स्थिर असतात.

**१३) समाज गतिशील आहे, तो सतत बदलत असतो** (Society is dynamic it is ever changing)**:**

सामाजिक स्थैर्य आणि सामाजिक परिवर्तन ही समग्र समाजाची परस्परविरोधी वाटणारी दोन वैशिष्ट्ये आहेत. समाज सापेक्षत: स्थिर असतो हे सत्य आहे. परंतु समाज हा सतत बदलत असतो. तो गतिशील असतो हेही सत्य आहे. समाजांतर्गत विविध घडामोडी तसेच समाजबाह्य परिस्थितीतील कारणांमुळे समाजात सातत्याने परिवर्तन किंवा बदल होत असतात. सामाजिक संरचनेच्या घटकात होणाऱ्या परिवर्तनामुळे समाज बदलत असतो. उदा. शिक्षण व्यवस्था, तंत्रज्ञान, विज्ञान, समाजाचा इतर समाजाशी होणारा संपर्क, लोकसंख्याशास्त्रीय बदल, सामाजिक धोरणे, कायदे इ. घटकांमुळे समाजात सातत्याने परिवर्तन घडून येते.

## ब) समाजाचे प्रकार (Types of Society)

मानव व मानवेत्तर प्राण्यांच्या समाजात आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी आपल्या गरजांचे निराकरण करत असतात. परंतु मानव व मानवेतर प्राण्यांच्या गरजांच्या निराकरणात मूलभूत अर्थाने भिन्नत्व आहे. कारण मानवेतर प्राण्यांचा समाज आपल्या गरजाचे निराकरण अनुवंशिकतेच्या तंत्राने करतात तर मानव प्राणी आपल्या गरजांची पूर्तता संस्कृतींच्या साहाय्याने करतात. पृथ्वीवर निरनिराळ्या प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या मानवाने आपल्या प्राथमिक अवस्थेपासून अनेक प्रकारच्या आर्थिक क्रिया विकसीत केल्या. समाजाच्या या विकास प्रक्रियेत निरनिराळ्या टप्प्यावर निरनिराळ्या प्रकारच्या आर्थिक क्रियांभोवती मानवी समाज संघटित झाले. अशा विविध वैशिष्ट्यपूर्ण आर्थिक क्रियांनी प्रभावित झालेले समाजाचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

### १. शिकार व अन्नसंकलन करणारे समाज (Hunting and Food-Gathering Societies).:-

मानवाच्या प्रारंभिक अवस्थेत शिकार व वनस्पतीजन्य खाद्यपदार्थांचे संकलन करणे हा या समाजातील लोकांचा उदरनिर्वाहाचा प्रमुख मार्ग होता. प्राथमिक अवस्थेत धान्य पेरणे, शेती करणे, पशुपालनाची उपयुक्तता याचे ज्ञान नसल्याने ते दैनंदिन गरजेपुरतेच अन्नसंकलन व शिकार करीत. हे समाज अन्नसंकलनासाठी अत्यंत अप्रगत साधने म्हणजेच अणकुचीदार दगड, लाकूड आणि मृत प्राण्यांच्या हाडांपासून अवजारे बनवून त्याचा वापर करीत. असे अत्यंत साधे समाज जगाच्या पाठीवरून जवळजवळ नष्ट झाले आहेत. परंतु अत्यंत अल्प प्रमाणात ऑस्ट्रेलिया, आफ्रिका व दक्षिण अमेरिकेत आजही काही समाज उदरनिर्वाहप्रधान जीवन जगताना आढळतात. अशा प्रकारे शिकार व अन्नसंकलन करणाऱ्या समाजाचे स्वरूप अत्यंत साधे व अप्रगत असे आहे.

हा समाज प्रामुख्याने डोंगराळ प्रदेश, घनदाट अरण्ये व जंगलांमध्ये वास्तव्य करीत असे. अत्यंत लहान आकाराचे हे समाज अन्नसंकलनाच्या शोधार्थ दुसऱ्या प्रदेशात भटकत जात. अन्नधान्य वा वस्तूंचा

साठा करण्याकडे त्यांची प्रवृत्ती नसल्याने अत्यंत कमी वेळ ते अन्नसंकल्पनासाठी देत. त्यांच्या जीवनात स्थैर्य नसले तरी त्यांची जीवनपध्दती वैशिष्ट्यपूर्ण आहे. या समाजात जास्तीत जास्त वेळ एकमेकांच्या सोबत व नव्या सदस्यांच्या संगोपनात व समाजीकरणात घालवत असत. या समाजातील लोकांचे परस्परसंबंध समानतेच्या पातळीवरचे असत. या समाजात वर्गीय विभेदन आढळत नाही. स्त्री-पुरुषांच्या कामाचे स्वरूप वेगळे असले तरी दोघांची कामे सारखीच महत्त्वाची मानली जातात. त्यामुळे स्त्री-पुरुष संबंध समानतेच्या पातळीवरचे असत. मुलांचे पालनपोषण हे स्त्रियांचे महत्त्वाचे काम मानले जाते. परंतु अन्न संकलनामध्ये स्त्रियाही पुरुषांच्या बरोबरीने सहभागी असत. शिकार करणे, समूहाचे संरक्षण करणे ही पुरुषांची मुख्य जबाबदारी असते. कोणत्या ना कोणत्या स्वरूपात विवाह संस्था या समाजात दिसते. एक पत्नी विवाह हा या समाजातील प्रमुख विवाह प्रकार होय.

### २. **बागायती समाज (Horticultural Societies) :-**

उदरनिर्वाहाचे नवे साधन गवसलेला हा समाज ज्याने बागा व शेती करण्यासाठी मानवी शक्ती व हाताने वापरावयाच्या साधनांचा उपयोग केला. बिया मातीमध्ये रुजविल्यास जास्त प्रमाणात अन्नधान्य उत्पादन घेता येते. याचे ज्ञान या समाजास आले. हा अन्न उत्पादनाचा नवा क्रांतीकारक शोध स्त्रियांनी लावला असे मानले जाते. भविष्यकाळातील अन्नधान्याची तरतूदही करता येईल या हेतूने निरनिराळ्या वनस्पतींच्या बियांची लागवड करून उत्पादन घेण्यात आले. शिकार व अन्न संकलनापेक्षा या विकासाच्या टप्प्यामध्ये बागायती समाजास खात्रीशीर उत्पादनाचा मार्ग गवसला. अर्थातच खतांचा वापर, फेरपीक पध्दती, सिंचन व्यवस्था अशा सुविधा भरघोस उत्पादन देऊ शकतात. या ज्ञानाचा या समाजात अभाव होता.

बागायती समाज प्रारंभी तीन वेगवेगळ्या प्रदेशात विकसीत झाले. त्यामध्ये अति पूर्वेकडील थायलंडमध्ये सुमारे अकरा हजार वर्षापूर्वी भाताचे पीक घेण्यास प्रारंभ झाला. त्यानंतर दहा हजार वर्षापूर्वी मध्य-पूर्वेकडील प्रदेशात गहू, सातू व राय याचे उत्पादन घेण्यात आले. तर सुमारे सहा ते नऊ हजार वर्षापूर्वी मेसो अमेरिकेत मक्याचे पीक घेण्यास सुरुवात झाली. त्यानंतरच्या काळात जगाच्या विविध भागात बागा व शेती करणारे समाज विकसीत झाले.

शेती व बागायती समाजात उत्पादन घेण्यासाठी अधिक वेळ लोकांना काम करावे लागत असे. बागायती समाजामध्ये स्त्रियांवरील कामाचे ओझे वाढले. त्या पेरणीपूर्व मशागत, पेरणी, पिकांची देशभाल, कापणी यासारखी कामे करू लागल्या. तर शेतीसाठी झाडे-झुडपे तोडून जमीन तयार करण्याचे शारीरिक कष्टाचे काम पुरुष करू लागले. या समाजात लिंगभेदावर आधारित श्रमविभाजनास प्रारंभ झाला. शेतीकामामध्ये स्त्रियांचे महत्व वाढल्याने अधिक स्त्रिया उपलब्ध व्हाव्यात या हेतूने या समाजात बहुपत्नीत्वाची प्रथा रुजल्याचे दिसते.

बागायती उत्पादन पद्धतीचे दोन प्रकार दिसतात. एक म्हणजे केवळ उदरनिर्वाहापुरती शेती करून उत्पादन घेणारे समूह. असे समूह उष्ण कटिबंधात ज्या ठिकाणी शेतीस पोषक प्रदेश नाहीत अशा ठिकाणी दिसून येतात. जंगल तोडून शेतीसाठी कसण्यास योग्य जमीन तयार करून पुन्हा नव्या ठिकाणी स्थलांतरित

शेती करत. असे समाज आकाराने लहान असतात, त्यांना शेतजमिनीच्या संपादनासाठी नेहमीच संघर्ष करावा लागतो. या समाजातील राजकीय व्यवस्था त्या-त्या समाजापुरती मर्यादित असते. ही राजकीय व्यवस्था पुरुषप्रधान आप्तसंबंध व्यवस्थेभोवती संघटित झालेली दिसते. या समाजात स्त्री-पुरुष दर्जामध्ये भेद असला तरी स्त्री-पुरुष संबंधामध्ये समानता दिसते.

दुसऱ्या प्रकारचे समाज उदरनिर्वाहाच्या गरजेपेक्षा अधिक उत्पादन शेतीतून घेतात. या समाजातील आर्थिक, राजकीय व सामाजिक व्यवस्था भिन्न स्वरूपाची असल्याचे दिसते. असे समाज आकाराने मोठे व ज्या ठिकाणी शेतीस पोषक पर्यावरण आहे अशा प्रदेशात दिसतात. हे समाज कायमच्या वसाहती करून राहतात. या समाजात पुरुषप्रधान आप्तसंबंध व्यवस्थेभोवती संघटित झालेली अधिक विकसीत स्वरूपाची राजकीय व्यवस्था दिसते. व्यावसायिक विशेषीकरणामुळे व्यवसायानुसार वेगवेगळी प्रतिष्ठा मिळू लागली. त्यातूनच या समाजात सामाजिक स्तरीकरण व्यवस्था निर्माण झाली. ज्यांच्याकडे जास्त जमीन व ज्यांचा श्रमिकांवर ताबा असे गट समाजात प्रभावशाली ठरू लागले. त्यामुळेच या समाजात संघटित लष्करी ताकद दिसते.

### ३. **पशुपालक समाज (Pastoral Societies) :-**

या समाजातील लोक जीवनावश्यक अशा अन्न, वस्त्र, अशा गरजांच्यापूर्ती साठी पशुपालन व पशुसंवर्धन करतात त्यांना पशुपालक समाज म्हणतात. या समाजाने प्राण्यांचे दूध, कातडी, केस, शेण यांचा उपयोग आपल्या विविध गरजा भागविण्यासाठी केला. ज्याठिकाणी गवताळ प्रदेश आहे व जिथे जनावरांच्या चारा-पाण्याची सोय होते. अशा प्रदेशात पशुपालक समाज बहुसंख्येने दिसतात. युरोप, आशियातील गवताळ प्रदेश, तसेच पूर्व आफ्रिकेच्या काही भागात हे समाज आढळतात. हे समाज काही प्रमाणात शेतीही करतात. बहुतांशी पशुपालक समाज भटके जीवन जगतात, कारण त्यांना चारा-पाण्याच्या शोधार्थ प्राण्यांचे कळप घेवून भटकंती करावी लागते. त्यामुळेच हा समाज गतिशील व आकाराने लहान आहे.

पशुपालक समाज पुरुषप्रधान आप्तसंबंध व्यवस्थेभोवती संघटित झालेले दिसतात. मुबलक साधनसंपत्ती असलेल्या या स्थिर जीवन जगणाऱ्या पशुपालक समाजाची राजकीय सत्ता कुणा एका प्रमुखाच्या हाती एकवटल्याचे दिसते. जे पशुपालक समाज चारा-पाण्याच्या शोधात भटकंती करतात ते विघटीत होतात. या समाजातून राजकीय नेतृत्वाचा अभाव असतो.

### ४. **शेतीव्यवसाय करणारे समाज (Agricultural Societies) :-**

अन्नधान्य पिकवण्यासाठी नांगराचा व त्यासारख्या पर्यायी साधनांचा वापर करून अधिक प्रमाणात उत्पादन घेणाऱ्या समाजांना शेती व्यवसाय करणारे समाज असे म्हटले जाते. बागायती समाज मानवी शक्ती व हाताने वापरायच्या साधनांद्वारे उत्पादन घेत असत. परंतु शेतीव्यवसाय करणाऱ्या समाजात अधिक विकसीत नांगरासारखे साधन शेतीची मशागत करण्यासाठी वापरण्याचे ज्ञान मानवास झाले, त्यामुळे बागायती समाजापेक्षा अतिरिक्त उत्पादन घेण्याचे कसब या समाजाने हस्तगत केले. शेतीस उपयुक्त अशा ज्ञानामुळे मानवाच्या उपजीविकेच्या साधनांमध्ये बदल झाला. पशुपालनाचे महत्त्व वाढले. शेतीखालील जमीनीचे क्षेत्र

वाढले. शेतीस उपयुक्त ऋतु, हवामान, कसण्यास योग्य जमीन, सकस बियाणांची ओळख, पेरणीच्या तंत्रापासून पीक सुरक्षित ठेवण्याच्या ज्ञानामुळे मानवास शेतीतून भरघोस उत्पादन घेता येऊ लागले.

शेती व्यवसायाचे सामाजिक संघटनावर परस्परसंबंधी असे अनेक परिणाम झाले. नद्यांच्या सुपीक प्रदेशात मोठ्या प्रमाणात लोकसंख्या एकवटली, त्या ठिकाणी शहरे अस्तित्वात आली. या समाजातूनच समाज संघटनांची इतर रुपे अथवा प्रकार विकसीत झाले. सुतार, लोहार, चांभार, कुंभार यांच्या वैशिष्ट्यपूर्ण कामातून शेतीपूरक व्यवसाय निर्माण झाले. शेतीपूरक कामांमध्ये विशेषीकरण, व्यवस्था निर्माण झाली. समाजात विभेदन होऊन राजकीय, आर्थिक, धार्मिक संस्था विकसीत झाल्या.

शेतीव्यवसायामुळे जमीन मौल्यवान साधनसामग्री बनली. ज्यांच्याकडे जमीन अधिक तो श्रीमंत आणि सत्ताधीश बनला. साहजिकच समाजामध्ये वर्गव्यवस्था निर्माण झाली. यापूर्वी विकसीत झालेल्या समाजांच्या तुलनेत शेतीव्यवसाय करणाऱ्या समाजामध्ये सामाजिक, आर्थिक, धार्मिकदृष्ट्या अधिक संघटित अशी समाजव्यवस्था निर्माण झाली.

### ५. औद्योगिक समाज (Industrial Societies) :-

तंत्रज्ञानात झालेल्या क्रांतीकारक बदलानंतर औद्योगिक समाज विकसीत झाले. वस्तूंच्या उत्पादना-करिता यंत्रांचा वापर, विनिमयावर आधारित परस्पर संबंध, वर्गीय विभाजन, धर्मनिरपेक्षता, नोकरशाही संघटना, कुशल कामगार व विशेषतज्ञांची असणारी गरज अशी वैशिष्ट्ये असणाऱ्या समाजाला औद्योगिक समाज म्हणतात. इतर समाजांच्या तुलनेत पूर्णत: वेगळा, वैशिष्ट्यपूर्ण असा समाजसंघटनेचा प्रकार औद्योगिक समाजाच्या रूपात विकसीत झाला. या समाजात कारखाना उत्पादन पध्दतीचे महत्त्व वाढल्याने त्यासाठी आवश्यक सुशिक्षित, कुशल व तज्ञ कामगारांची गरज निर्माण झाली. सर्वांसाठी खुली असलेली शिक्षण व्यवस्था हे या समाजाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य होय. औद्योगिकीकरणामुळे कच्च्या मालाचे पुरवठादार व कारखानदार, उत्पादक व उपभोक्ते यांच्यात वस्तुविनिमयाची संघटीत व्यवस्था निर्माण झाली. त्यासाठी आवश्यक मोठ्या वित्तीय संस्था मोठमोठ्या बाजारपेठा या समाजात विकसीत झाल्या.

कारखाना उत्पादन पध्दतीमुळे खाजगी मालमत्तेचा अधिकार व्यक्तिंना प्राप्त झाला. त्यातून भांडवलशाही व्यवस्था अस्तित्वात आली. या भांडवलशाही व्यवस्थेने कामगार व भांडवलदार असे दोन वर्ग निर्माण झाले. त्यामुळेच वर्गीय, विभेदन औद्योगिक समाजाचे प्रमुख लक्षण होय.

औद्योगिक समाजात मानवतावादी मूल्यांचे महत्त्व वाढले. समाजातील सर्व घटकांना विकासाची संधी मिळू लागल्याने सामाजिक गतिशीलता वाढली. औद्योगिक समाजातील परस्पर संबंधाचे स्वरूप सामान्य, औपचारिक व व्यक्तिनिरपेक्ष झाल्याचे दिसते.

### ६. औद्योगिकोत्तर समाज (Post Industrial Societies) :-

औद्योगिक समाजातील परिवर्तनाचा वेग व त्याचे स्वरूप पाहता काही समाजशास्त्रज्ञांनी औद्योगिकोत्तर समाजाची संकल्पना मांडली आहे. औद्योगिक समाज हे विविध शोध व कारागिरांनी केलेल्या

प्रगतीवर अवलंबून असतात. तर औद्योगिकोत्तर समाज त्या शोधांच्या आधारे तंत्रज्ञानात्मक प्रगती घडवून आणणाऱ्या विशेषीत ज्ञानावर अवलंबून असतात. संगणक उद्योगाचा वाढणारा विकास हे औद्योगिकोत्तर समाजाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. इंटरनेटच्या माध्यमातून ऑनलाईन व्यवहारांमुळे निर्माण होणाऱ्या क्षेत्रांकडे लक्ष वेधले जात आहे. जागतिकीकरणानंतर इंटरनेट सुविधा व फॅक्स ही साधने क्षणार्धात जगाच्या कानाकोपऱ्यात माहिती पोहचवू लागली आहेत. त्यामुळे नवीन ग्राहक संस्कृती उदयास आली आहे. तात्काळ सेवा-सुविधा जागतिक घडामोडींचे ज्ञान व त्यामधला सहभाग वाढू लागला आहे. एकूणच औद्योगिकोत्तर समाज भविष्यात संगणकाची क्षमता वाढवून त्याचा प्रसार व उपयोगावरच अवलंबून राहणार आहे. या समाजातील बदलाचा वेग पाहता या समाजाची अर्थव्यवस्था सेवाभिमुख असेल असे वर्तविले जात आहे.

औद्योगिकोत्तर समाजातील तंत्रविद्यात्मक प्रगती काही प्रश्न, समस्या निर्माण करेल. बेकारी व त्यासारख्या इतर समस्या सोडविण्यासाठी शासन व्यवस्थेला नोकऱ्या उपलब्ध करून देण्याची भूमिका घ्यावी लागेल, नवीन धोरणे ठरवावी लागतील. औद्योगिकोत्तर समाजात उच्चशिक्षित लोक, प्रशिक्षित शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ व सामाजिक विचारवंतांचे महत्त्व वाढेल अशी काहींची धारणा आहे. संगणकाचा मानवी जीवनावरील प्रभाव माणसाला गजबजलेली शहरे सोडून शांत ठिकाणी स्थलांतर करण्यास प्रवृत्त करेल. याची सुरुवात आज झालेली दिसत आहे. अर्थात औद्योगिकोत्तर समाजाचे स्वरूप कसे असेल याचे स्पष्ट चित्र आताच स्पष्ट होत नसले तरी समाजावरील संगणकाचा प्रभाव पाहता आजच्या औद्योगिक समाजात खूपच क्रांतीकारक परिवर्तने घडून येतील असा अंदाज वर्तविला जात आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न** (Check Your Progress ) :

खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) सामाजिक आंतरक्रियेची कोणतीही एक व्याख्या द्या.

२) सामाजिक आंतरक्रिया घडून येण्यासाठीची महत्त्वाची पूर्वअट सांगा.

३) सामाजिक आंतरक्रियेचे स्वरूप प्रतीकात्मक आहे असे का म्हटले जाते?

४) सामाजिक आंतरक्रियेचे विविध स्तर सांगा.

५) सामाजिक आंतरक्रियेची कोणतीही तीन उदाहरणे द्या.

६) सहकार्याची कोणतीही एक व्याख्या द्या.

७) स्पर्धेची कोणतीही दोन वैशिष्ट्ये सांगा.

८) समायोजनाची कोणतीही एक व्याख्या द्या.

९) 'समावेशन' या संज्ञेचा अर्थ सांगा.

१०) विनिमय म्हणजे काय?

११) संघर्ष म्हणजे काय?

१२) 'समाज हा सामाजिक संबंधाचे जाळे आहे' असे कोणी म्हटले?

१३) 'समाज' ही संकल्पना अमूर्त का आहे?

१४) समाज या संकल्पनेच्या व्याख्येतील तीन महत्त्वाचे मुद्दे लिहा?

१५) समाजाची महत्त्वाची तीन वैशिष्ट्ये सांगा?

१६) संस्कृती हे मानवी समाजाचे विभेदक वैशिष्ट्य का ठरते?

१७) समाजातील श्रमविभाजनामुळे काय घडते?

१८) समाज ही स्वयं सातत्यशिल व्यवस्था कशी आहे?

१९) समग्र समाजाची परस्पर विरोधी वाटणारी दोन वैशिष्ट्ये कोणती?

## २.३ सारांश (Let Us Sum Up) :

सामाजिक आंतरक्रिया ही समाजशास्त्रातील एक महत्त्वाची मूलभूत संकल्पना आहे. समाज हा विविध आंतरक्रिया करणाऱ्या व्यक्तींचा बनलेला असतो. म्हणून सामाजिक आंतरक्रिया हाच समाजाच्या अस्तित्वाचा मुख्य आधार आहे. या एककामध्ये आपण सामाजिक आंतरक्रिया या संकल्पनेचा अर्थ सामाजिक आंतरक्रियेचे प्रकार किंवा रूपे त्यांचा अर्थ व वैशिष्ट्ये इ. बाबींचा अभ्यास केला आहे. दोन किंवा अधिक व्यक्ती, त्यांच्यात असणारी परस्परांविषयीची जाणीव आणि त्यांच्यात होणारा कोणत्या ना कोणत्या स्वरुपाचा विनिमय या बाबी सामाजिक आंतरक्रिया घडून येण्यासाठीच्या पूर्व अटी आहेत. सामाजिक आंतरक्रियेत एक व्यक्ती इतरांच्या वर्तनाला प्रतिसाद देते. कारण ती त्याच्या वर्तनाचा अर्थ समजून घेते. अशाप्रकारे सामाजिक आंतरक्रियेत अर्थपूर्ण सामाजिक संबंधाचा समावेश होतो. सामाजिक आंतरक्रियेत व्यक्तीच्या वर्तनामध्ये इतरांच्या प्रभावामुळे बदल घडून येतो. या प्रक्रियेत व्यक्ती इतरांच्या वर्तनाशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करते. आंतरक्रियेत व्यक्ती इतरांच्या प्रतिसादानुसार वर्तन करतात. सामाजिक आंतरक्रियेत परस्पर उद्दीपन आणि परस्पर प्रतिक्रिया यांची साखळी अस्तित्वात येते. प्रतिकांचा वापर आणि अन्वयार्थ लावण्याची प्रक्रिया हा सामाजिक आंतरक्रियेतील मुख्य आशय असतो. त्यामुळेच सामाजिक आंतरक्रियेचे स्वरूप प्रतीकात्मक असते.

सामाजिक जीवनामध्ये सामाजिक आंतरक्रियेचे तीन स्तर दिसून येतात. व्यक्ती व्यक्तीतील आंतरक्रिया, व्यक्ती व समूह यांच्यातील आंतरक्रिया आणि समूहा समूहातील आंतरक्रिया हे सामाजिक आंतरक्रियेचे तीन स्तर होत.

सामाजिक आंतरक्रिया ज्या वेगवेगळ्या मार्गानी घडून येतात त्यांनाच 'सामाजिक प्रक्रिया' (Social Processes) किंवा सामाजिक आंतरक्रियेचे प्रकार (Types of social interaction) म्हणून ओळखले जाते. ह्या घटकामध्ये आपण काही महत्त्वाच्या सामाजिक प्रक्रियांचा देखील अभ्यास केला आहे. या सर्व

सामाजिक क्रिया व्यक्ती आणि समूहांमध्ये परस्पर संबंध प्रस्थापित करण्याचे मूलभूत मार्ग आहेत. या प्रकरणात आपण सहकार्य, स्पर्धा, संघर्ष, समायोजन, समावेशन आणि विनिमयाचा प्रमुख सामाजिक आंतरक्रियांच्या प्रकारांचा किंवा सामाजिक प्रक्रियांचा अभ्यास केला आहे. साहचर्यात्मक किंवा एकात्मीकरणात्मक सामाजिक प्रक्रिया आणि अ-साहचर्यात्मक किंवा विघटनात्मक सामाजिक प्रक्रिया हे सामाजिक प्रक्रियांचे स्थूल वर्गीकरणही आपण थोडक्यात समजून घेतले आहे.

समाज ही समाजशास्त्रातील एक मूलभूत संकल्पना आहे. ऑगस्त कॉम्तने समाजशास्त्र हे 'समाजाचा अभ्यास करणारे शास्त्र' (Science of Society) अशीच व्याख्या केली आहे. 'समाज' हा शब्द नेहमीच आपण दैनंदिन जीवनात वापरतो. दैनंदिन जीवनात 'समाज' हा शब्द कोणकोणत्या अर्थाने वापरला जातो हे आपण या घटकात अभ्यासले. समाजशास्त्रात 'समाज' या शब्दाला वेगळा अर्थ आहे. या घटकामध्ये आपण 'समाज' या संकल्पनेच्या विविध समाजशास्त्रज्ञांनी दिलेल्या व्याख्यांचा अभ्यास केला आहे. तसेच त्या व्याख्यामधून ध्वनित होणारा 'समाज' या संकल्पनेचा अर्थ समजून घेतला आहे. समाजशास्त्रज्ञांनी एक अमूर्त बाब या दृष्टीने समाजाकडे पाहिले आहे. 'समाज' हे 'सामाजिक परस्परसंबंधाचे जाळे' आहे असे समाजशास्त्रज्ञानी म्हटले आहे. एक मूर्त वास्तविकता या दृष्टीनेही समाजशास्त्रज्ञांनी समाजाचे वर्णन केले आहे. 'निश्चित भूप्रदेशावर वास्तव्य करणारा विशाल मानवी समूह म्हणजे समाज' अशीही समाजाची व्याख्या समाजशास्त्रज्ञ करतात.

मानवी समाजाच्या विविध वैशिष्ट्यांचा अभ्यासही आपण या घटकात केला आहे. (१) समाज हे सामाजिक संबंधांचे जाळे आहे, (२) समाज वेगवेगळी स्थाने असणाऱ्या व्यक्तींचा बनलेला असतो, (३) समाज हा सापेक्षत: मोठा आणि स्वतंत्र समूह असतो, (४) निश्चित भूप्रदेश, (५) व्यापक संस्कृती, (६) समाजाच्या सदस्यांमध्ये सारखेपणा, भिन्नता आणि परस्परावलंबन असते, (७) श्रम विभाजनाची व्यवस्था, (८) समाजात लैंगिक पुनरूत्पादनाद्वारे नव्या सभासदांची भरती होते, (९) समाज ही सापेक्षत: स्वयंपूर्ण व्यवस्था आहे, (१०) समाज ही स्वयंसातत्यशील व्यवस्था आहे, (११) समाजात सामाजिक नियंत्रणाच्या यंत्रणा असतात, (१२) समाज ही संरचनात्मक व्यवस्था आहे, (१३) समाज गतिशील आहे, तो सतत बदलत असतो. इ. समाजाची वैशिष्ट्ये आहेत.

## २.४ स्वयं अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे (Answers to check your progress) :

१) बूम आणि सेल्झनिक, ''इतरांची जाणीव ठेऊन आणि इतरांच्या प्रतिक्रियांशी आपल्या प्रतिक्रिया जुळवून घेऊन वर्तन करण्याच्या प्रक्रियेला सामाजिक आंतरक्रिया म्हणतात.''

२) सामाजिक आंतरक्रिया घडून येण्यासाठी किमान दोन व्यक्ती की ज्यांच्यामध्ये एकमेकांविषयीची जाणीव आणि काही प्रमाणात भाषा, चिन्ह किंवा स्वभावाचा विनिमय होणे याही पूर्व अटी असणे आवश्यक असते.

३) कारण सामाजिक आंतरक्रियेत विविध प्रतिकांचा व प्रतीकात्मक प्रक्रियांचा वापर होतो. म्हणून सामाजिक आंतरक्रियेचे स्वरूप प्रतिकात्मक आहे असे म्हटले जाते.

४) सामाजिक आंतरक्रियेचे स्तर १) व्यक्ती-व्यक्तीतील आंतरक्रिया, २) व्यक्ती व समूह यांच्यातील आंतरक्रिया, ३) समूहा-समूहातील आंतरक्रिया इ.

५) सामाजिक आंतरक्रियेची तीन उदाहरणे १) आई आणि मूल यांच्यातील संभाषण, २) दुकानदार आणि ग्राहक यांच्यातील संभाषण, ३) दोन देशातील प्रतिनिधीच्या सभेतील चर्चा इ.

६) रॉबर्ट निसबेट, ''सर्वांचा हितसंबंध गुंतलेल्या समान उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी केलेला सामूहिक किंवा एकत्रित प्रयत्न म्हणजे सहकार्य होय.''

७) १) स्पर्धा ही मौल्यवान वस्तूंच्या कमतरतेमुळे किंवा दुर्भिक्ष्यामुळे उदयास येते, २) स्पर्धा ही वैश्विक प्रक्रिया आहे.

८) हॉर्टन आणि हंट, ''परस्परांशी संघर्ष करणाऱ्या व्यक्ती व समूहांमध्ये तात्पुरती कामचलाऊ सहमती निर्माण होण्याची प्रक्रिया म्हणजे समायोजन होय.

९) सॅम्युअल कोईनिग, ''समावेशन ही एक अशी प्रक्रिया आहे की ज्यामध्ये व्यक्ती आणि समूह हे दुसऱ्या समूहाची संस्कृती पूर्णपणे स्विकारतात.''

१०) ज्यावेळी दोन व्यक्ती काहीतरी बक्षिसाची अपेक्षा ठेऊन एकमेकांशी आंतरक्रिया करतात त्यावेळी विनिमय घडून येतो.

११) हॉर्टन आणि हंट, 'इतर स्पर्धकाना स्पर्धेतून बाद करून किंवा त्यांना कमकुवत करून पारितोषिकांवर केवळ आपलीच एकाधिकारशाही निर्माण करण्याचा प्रयत्न म्हणजे संघर्ष होय.''

१२) 'समाज हा सामाजिक संबंधाचे जाळे' आहे असे मॅकायव्हर या समाजशास्त्रज्ञाने म्हटले आहे.

१३) कारण आपण व्यक्तीमधील संबंधाचे जाळे पाहू शकत नाही. म्हणून समाज ही अमूर्त संकल्पना आहे.

१४) समाज या संकल्पनेच्या व्याख्येतील तीन मुद्दे (१) सामाजिक संबंधाची व्यवस्था, (२) स्वयं सातत्यशिल व्यवस्था, (३) श्रम विभाजनाची व्यवस्था

१५) समाज या संकल्पनेची तीन वैशिष्ट्ये - (१) सामाजिक संबंधाचे जाळे, (२) व्यापक संस्कृती, (३) स्वयं सातत्यशील व्यवस्था ही आहेत.

१६) संस्कृती ही मानवी समाजाचे विभेदक वैशिष्ट्ये आहे कारण संस्कृती ही मानवी समाजातच असते.

१७) समाजातील श्रमविभाजनामुळे समाजातील सभासदामध्ये परस्परावलंबन आणि सहकार्य वाढते.

१८) प्रत्येक समाजामध्ये नवीन सभासद व सामाजिक नियंत्रणाची यंत्रणा असल्यामुळे समाज ही स्वयंसातत्यशील व्यवस्था आहे.

१९) समग्र समाजाची परस्पर विरोधी करणारी दोन वैशिष्ट्ये (१) सामाजिक स्थैर्य (२) सामाजिक परिवर्तन ही आहेत.

## २.५ सरावासाठी प्रश्न (Excercise / Home assignment) :

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) सामाजिक आंतरक्रियेचा अर्थ आणि स्वरूप स्पष्ट करा.

२) सामाजिक प्रक्रिया म्हणजे काय हे सांगून एक सामाजिक प्रक्रिया म्हणून संघर्षाचे विवेचन करा.

३) खालील विषयावर टीपा लिहा.

अ) सहकार्य ब) स्पर्धा क) संघर्ष ड) समायोजन इ) समावेशन ई) विनिमय

४) समाज म्हणजे काय? अर्थ स्पष्ट करा.

५) 'समाज' या संकल्पनेच्या वैशिष्ट्यांचे वर्णन करा.

## २.६ चिंतन आणि कार्य (Reflection and Action) :

१) आज तुम्ही इतरांशी केलेल्या आंतरक्रियांची यादी करा. आपल्याशी आंतरक्रियेत कोण-कोण व्यक्ती सहभागी झाल्या होत्या? त्या आंतरक्रियांमुळे तुमचा कोणता फायदा झाला? टिपण तयार करा.

२) इमारतीचे बांधकाम चालू असताना व्यवस्थित निरीक्षण करा. वेगवेगळ्या व्यक्तींच्या कार्यांची यादी तयार करा. इमारत पूर्ण करण्यासाठी त्यांच्यातील सहकार्य लक्षात घ्या.

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings) :

१) Rawat, H. K. : *Sociology*, Rawat Publications, Jaipur, 2007.

२) Shankar Rao : *Sociology*, *Primary Principles*, S. Chand and Co. Ltd. New Delhi, 2004.

३) MacIver, R. M. and Page C. H. : *Society* : *An introductiory Analysis*, Mac Millan India limited, Madras, 1986.

४) डॉ. सर्जेराव साळुंखे : समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना, नरेंद्र प्रकाशन, पुणे १९९६.

५) Harry Johnson M. : *Sociology* : *A Systematic Introduction*, Allied Publishers, Bombay, 1970.

❑❑❑

# घटक–३
# सामाजिक संस्था
(Social Institutions)

**घटक–संरचना :**

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ विषय – विवेचन

३.२.१ सामाजिक संस्था : अर्थ आणि वैशिष्ट्ये

३.२.२ सामाजिक संस्थेचे महत्त्व

३.३.३ सामाजिक संस्था आणि त्याची कार्ये (कुटुंब, विवाह, धर्म आणि शिक्षण)

स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

३.३ सारांश

३.४ स्वयं–अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे

३.५ सरावासाठी प्रश्न/गृहपाठ

३.६ चिंतन आणि कार्य

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.० उद्दिष्ट्ये (Objectives) :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला :

- सामाजिक संस्था अर्थ आणि वैशिष्ट्ये समजून घेता येतील
- सामाजिक संस्थांचे महत्त्व समजून घेता येईल.
- सामाजिक संस्थांची कार्ये समजून घेता येतील.

## ३.१ प्रस्तावना (Introduction) :

समाजशास्त्र या विषयातील विशेष महत्त्वाच्या संकल्पनापैकी 'सामाजिक संस्था' ही एक संकल्पना आहे. ही संकल्पना इतकी महत्त्वाची आहे की सुप्रसिद्ध फ्रेंच समाजशास्त्रज्ञ एमिल दुरखीम यांनी

समाजशास्त्राची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, 'समाजशास्त्र हे सामाजिक संस्थांबाबतचे विज्ञान आहे'. जी. एच. गिडींग्ज यांच्या मते, 'मानवी वंशाच्या भूतकाळात जे जे उत्कृष्ट होते ते जतन करून ठेवणारे समाजाचे अवयव म्हणजे संस्था होत.' सामाजिक संस्थांचा तसेच विविध सामाजिक संस्थांमधील परस्परसंबंधांचा अभ्यास हा भाग समाजशास्त्राच्या अभ्यास विषयाचा गाभा मानला जातो. म्हणूनच समाजशास्त्राच्या प्रत्येक विद्यार्थ्याने सामाजिक संस्था या संज्ञेचा अर्थ समजून घेणे महत्त्वाचे ठरते.

प्रथमदर्शनी संस्था हा शब्द आपल्याला अत्यंत परिचित असा वाटतो. आपल्या दैनंदिन व्यवहारात हा शब्द आपण वारंवार वापरतो. मात्र दैनंदिन जीवनात हा शब्द वेगवेगळ्या संदर्भात निरनिराळ्या अर्थाने वापरला जातो. 'संस्था' हा शब्द सर्वसामान्य लोक विशिष्ट हेतू किंवा उद्देश असलेले संघटन, मंडळ किंवा समूहाच्या संदर्भात वापरतात. उदा. संस्था हा शब्द महाविद्यालय किंवा दवाखाना यासारख्या संघटना बाबतही वापरला जातो. पण संस्था म्हणजे एखादी संघटना किंवा समूह नव्हे. समाजशास्त्रात 'सामाजिक संस्था' ही संज्ञा अधिक काटेकोर आणि निश्चित अर्थाने वापरली जाते. या घटकामध्ये 'सामाजिक संस्था' या संकल्पनेचा समाजशास्त्रीय अर्थ तसेच सामाजिक संस्थांची प्रभेदक वैशिष्ट्ये ही आपण समजून घेणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन (Presentation of Subject-Matter) :

प्रस्तुत घटकात आपण सामाजिक संस्था या संकल्पनेचा अर्थ व वैशिष्ट्ये समजून घेणार आहोत. घटकाची विभागणी दोन भागात केली आहे. सामाजिक संस्थांच्या व्याख्या, त्यांचे स्पष्टीकरण, प्रमुख सामाजिक संस्था व त्यांचे वर्गीकरण याविषयीचे विवेचन पहिल्या विभागात आहे. तर दुसऱ्या विभागात, सामाजिक संस्थांच्या वैशिष्ट्यांचे विवेचन केले आहे.

### ३.२.१ सामाजिक संस्था : अर्थ आणि वैशिष्ट्ये

**सामाजिक संस्था – व्याख्या, अर्थ आणि प्रकार** (Social Institutions Definition, Meaning and Typology) **:**

अनेक विचारवंतानी 'सामाजिक संस्था' या संज्ञेच्या व्याख्या केल्या आहेत. या ठिकाणी काही महत्त्वाच्या व्याख्या दिल्या आहेत. या व्याख्यांचा बारकाईने अभ्यास केल्यानंतर आपल्याला सामाजिक संस्थांचा समाजशास्त्रीय अर्थ समजून येईल.

**१) किंग्जले डेव्हिस – ''एका किंवा अनेक कार्यांच्या भोवती परस्परांत गोवल्या गेलेल्या लोकरूढी, लोकनीती आणि कायदे यांचा संच म्हणजे संस्था होय.''** ("An institution may be defined as a set of interwoven folkways, mores and laws built around one or more functions." - Kingslay Davis)

**२) हॉर्टन आणि हंट – ''संस्था म्हणजे सामाजिक संबंधांची संघटित अशी व्यवस्था की ज्यामध्ये काही समान मूल्ये आणि वर्तनरीतींचा समावेश होतो आणि जी समाजाच्या काही मूलभूत गरजा भागविते.''**

("An institution is an organised system of social relationships which embodies certain common values and procedures and meets certain basic needs of the society - Hurton and Hunt)

३) **हॅरी जॉन्सन – ''सामाजिक संस्था म्हणजे सर्वज्ञात अशी नियमनात्मक व्यवस्था (प्रबंध) होय. या अर्थाने, सामाजिक संबंधांच्या विशिष्ट प्रवर्गाच्या संबंधात ही संकल्पना वापरली जाते.''** ("Social Institution is a recognized normative pattern. As such, it applies to a particular category of relationships."- Harry Johnson)

४) **ऑग्बर्न व निमकॉफ – ''काही मूलभूत मानवी गरजा भागविण्याचे संघटित आणि प्रस्थापित असे मार्ग म्हणजे सामाजिक संस्था होत.''** ("Social institutions are organised and established ways of satisfying certain basic human needs." - Ogburn and Nimkoff)

५) **टिशलेर, व्हायटन आणि हंटर – ''समाजाच्या मूलभूत सामाजिक गरजा भागविणाऱ्या क्रियांचे संघटन करणाऱ्या मूल्ये, नियमने, दर्जे आणि भूमिका यातून निर्माण होणाऱ्या सुव्यवस्थित सामाजिक संबंधांना सामाजिक संस्था असे म्हणतात.''** ("The ordered social relationships that grow out of the values, norms, statuses and roles that organize those activities that fulfill society's fundamental needs." - Tischler, Whitten and Hunter)

६) **हर्टझलर जॉयस ओ – ''विविध व्यक्तींनी बनलेल्या लोकसमुदायाचे कार्य सुरळीत चालावे म्हणून व्यक्तींच्या आणि समाजाच्या गरजा भागविण्यासाठी अजाणतेपणी निर्माण झालेल्या किंवा हेतूपर्वक निर्माण केलेल्या नियमनात्मक आणि म्हणूनच प्राथमिक सांस्कृतिक व्यवस्था म्हणजे सामाजिक संस्था होय. सामाजिक संस्था विविध संकेत, नियम, विचारप्रणाली तसेच प्रतीकात्मक, संघटनात्मक आणि भौतिक अंमलबजावणी संबंधी घटकानी बनलेल्या असतात.''** ("Social institutions are purposive, regulatory and consequently primary cultural configurations, formed uncousciously and / or deliberately to satisfy individual wants and social needs bound up with the efficient functioning of any plurality of persons. They consist of codes rules and ideologies and essential symbolic organizational and material implementations." - Joyce O. Hertzler)

वरील व्याख्यांवरून सामाजिक संस्थांचा अर्थ आपणास समजून घेता येईल. वरील व्याख्यांचे विश्लेषण करून त्यातील प्रमुख मुद्दे खाली दिले आहेत. त्या मुद्यावरून 'सामाजिक संस्था' या संकल्पनेचा अर्थ स्पष्टपणे समजून येईल.

१) सामाजिक संस्था म्हणजे लोकरुढी, लोकनीती, कायदे, सर्वसामान्य मूल्ये, दंडक, नियम, कल्पना, शिकवण आणि कार्यपद्धती या सर्वांची एकत्र गुंफण असलेली व्यवस्था असते. उदा. पारंपारिक हिंदू विवाहसंस्था अनेक लोकरुढींनी नियमित केलेली दिसून येईल. उदा. साखरपुडा, मंगलाक्षता, कन्यादान इ.

तसेच वैवाहिक संबंधातील निष्ठा व विश्वसनीयता या मूल्यांनी विवाहसंस्था नियंत्रित झाली आहे. विवाहाचे वय, घटस्फोट, मालमत्तेचे हस्तांतर इ. विषयक कायद्यांनीही विवाहसंस्था नियंत्रित झाली आहे.

२) वरील व्याख्यांमधून सामाजिक संस्थांचे वर्णन करण्यासाठी विविध शब्दप्रयोग वापरले आहेत. उदा. 'सामाजिक संबंधाची व्यवस्था' किंवा 'नियमनात्मक व्यवस्था' किंवा 'सामाजिक संबंधांची संघटित व्यवस्था' किंवा 'संघटित आणि प्रस्थापित मार्ग' आणि 'सांस्कृतिक रचना'. वरील शब्दप्रयोगातून, सामाजिक संस्था म्हणजे सामाजिक परस्परसंबंधांची संघटित व्यवस्था असून हे संबंध नियमने आणि सांस्कृतिक मूल्ये यानी नियंत्रित झालेले असतात हेच सूचित होते. या दृष्टिकोनातून पाहता एक सामाजिक संस्था म्हणून कुटूंब संस्थेचे उदाहरण देता येईल. कुटूंब ही नियमित संघटित अशी कुटुंबातील सदस्यांच्या परस्परसंबंधांची व्यवस्था असते आणि ती सांस्कृतिक मूल्ये आणि नियमनांच्या संचाने नियंत्रित केलेली असते, असे म्हणता येईल.

३) संस्था अजाणतेपणे निर्माण होतात किंवा त्या विशिष्ट हेतूने निर्माण केल्या जातात. बहुसंख्य सामाजिक संस्था नियोजनपूर्वक निर्माण केलेल्या नसतात. सामाजिक उत्क्रांतीच्या प्रक्रियेत त्या हळूहळू उदयास येतात. समाजातील सदस्यांच्या मानवी गरजांचे समाधान करण्याचा प्रयत्न त्या वर्षानुवर्षे करीत आलेल्या असतात. या प्रक्रियेतून काही वर्तनरीती नियमने मूल्ये या बाबी रूढ होतात, त्या स्थिर होऊन त्यांचे संस्थीकरण होते आणि त्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित केल्या जातात. अशा तऱ्हेने सामाजिक संस्था अजाणतेपणे व अनियोजनबद्ध पद्धतीने निर्माण झालेल्या असतात. कोणतीही एखादी विशिष्ट व्यक्ती सामाजिक संस्था निर्माण करीत नाही. तर सामूहिक प्रयत्नातून सामाजिक संस्था निर्माण होतात. काही संस्था मात्र जाणीवपूर्वक निर्माण केल्या जातात. उदा. आधुनिक समाजातील कायदे. कायदे हेतूपुरस्सरच निर्माण केले जातात. व्यक्तिगत आणि सामूहिक वर्तनाचे प्रभावी नियंत्रण आणि समाजात शांतता व सुव्यवस्था राखणे हा त्यांच्या निर्मितीमागचा उद्देश असतो.

४) सर्वच संस्थाचे निश्चित असे कार्य असते. व्यक्तिगत आणि सामाजिक गरजांचे समाधान करणे, सदस्यांच्या वर्तणुकीचे नियमन करून समाजात सुव्यवस्था प्रस्थापित करणे इ. अशा सामाजिक गरजांची पूर्तता सामाजिक संस्था करतात.

५) सामाजिक संस्था म्हणजे एकप्रकारे सांस्कृतिकदृष्ट्या मान्य केलेले वर्तनप्रकार असतात. सामाजिक संस्थांद्वारे विविध क्रिया करण्याच्या पद्धती निश्चित केल्या जातात. जेव्हा अनेक परस्परसंबंधीत सांस्कृतिक पुंज (Cultural complexes) एखाद्या मानवी कृतींच्या भोवती एकत्रित होतात तेव्हा संस्था आस्तित्वात येतात. उदा. भारतीय हिंदू समाजातील 'आयोजित विवाह' (Arranged marriage in Hindu Society) हा परस्परसंबंधित अशा अनेक सांस्कृतिक पुंजानी बनलेला आहे. उदा. मुलगा किंवा मुलगी यांच्या घरी भेट देऊन त्यांना पाहणे म्हणजेच वरपरीक्षा, वधूपरीक्षा संकुल, साखरपुडा संकुल, विवाहविधी संकुल, मधुचंद्र संकुल इ.

६) सामाजिक संस्था म्हणजे सामाजिक वर्तनाचा समूहमान्य रीतीच असतात. त्यात समाजाच्या संस्कृतीने मान्य केलेल्या वर्तन प्रकारांचे संच असतात. सामाजिक संस्था व्यक्ती व समूह यांच्यातील सामाजिक संबंधांचे नियमन करतात. उदा. आईवडील व त्यांची मुले यांच्यामधील परस्पर वर्तन कसे असावे हे कुटुंबसंस्थेने नियमित केलेले असते. त्याचप्रमाणे एखादा पुरूष आणि त्याची पत्नी किंवा त्याच्या अनेक पत्नी यांच्यातील संबंधांचे नियमन विवाहसंस्थेने केले आहे. विवाह संस्था म्हणजे नियमनांचा संच किंवा वर्तणुकीचे नियम असतात आणि ते विशिष्ट समूहातील किंवा उपसमूहातील सर्वच विवाहांना लागू होतात.

७) सामाजिक संस्था आपल्या दैनंदीन सामाजिक वर्तनाचे नियमन किंवा नियंत्रण करतात. त्यामुळे समाजाचे सुयोग्य संघटन तयार होते. सामाजिक संस्था म्हणजे मान्यताप्राप्त आणि सुप्रस्थापित नियमनांचे संच असतात आणि ते प्रत्येक समूहातील विशिष्ट संबंधांच्या प्रकारांना लागू होतात. ज्या ज्या वेळी आपण इतिहासाचा आढावा घेतो, किंवा समकालीन जगभरातील परिस्थिती पहातो, त्यावेळी असे दिसून येते की, अत्यंत मागासलेल्या आदिवासींप्रमाणेच खूप सुधारलेल्या आधुनिक लोकांचे सामाजिक जीवनही फार मोठ्या प्रमाणात सामाजिक संस्थानी नियंत्रित केले आहे. जे कोणी या संस्थांनी ठरवून दिलेल्या नियमांच्या विरोधी वर्तन करतात त्यांना समाजाकडून कोणत्यातरी प्रकारची शिक्षा दिली जाते.

८) सामाजिक संस्थांचे चार महत्त्वाचे पैलू पुढीलप्रमाणे आहेत :

१) **संरचना :–** दर्जे आणि भूमिका, नियमने आणि मूल्ये इ. नी मिळून संस्थांची संरचना बनते.

२) **हेतू :–** काही वैयक्तिक गरजांची पूर्तता किंवा वर्तणूकीचे नियमन करणे हा संस्थांचा हेतू असतो.

३) **यंत्रणा :–** विशिष्ट बाबींची पूर्तता करण्यासाठी प्रमाणित अशी कार्यपद्धती सामाजिक संस्थांद्वारे अस्तित्वात आलेली असते.

४) **कार्य :–** संपूर्ण समाजाचे अस्तित्व आणि सातत्य राखण्यासाठी सकारात्मक योगदान देणे हे सामाजिक संस्थांचे कार्य असते.

वरील सर्व मुद्द्यांचा साकल्याने/एकत्रितपणे विचार केल्यास 'सामाजिक संस्था' या संकल्पनेच्या अर्थाचा उलगडा होईल.

आता, सामाजिक संस्था ही संकल्पना आणखी स्पष्ट व्हावी म्हणून, समाजातील प्रमुख सामाजिक संस्था कोणत्या, त्यांची कार्ये कोणती तसेच सामाजिक संस्थांचे प्रकार कोणते याविषयीची अगदी थोडक्यात माहिती आपण करून घेऊ.

**सामाजिक संस्थांची वैशिष्ट्ये** (Characteristics of Social Institutions) **:**

सामाजिक संस्थांची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

**१) सामुदायिक सामाजिक जीवनातून संस्थांची निर्मिती होते** (Institutions are products of collective social life) **:**

सर्व सामाजिक संस्थांच्या निर्मितीचे मूळ समाजाच्या सामुदायिक जीवनात असते. कोणतीही एखादी व्यक्ती सामाजिक संस्था निर्माण करीत नाही. व्यक्तिगत आणि सामाजिक गरजांच्या पूर्ततेसाठी सामूदायिक प्रयत्नातून संस्था निर्माण होतात. नियम आणि कार्यपद्धतीचे संच, परंपरा, चालीरिती आणि नियमने ही समूहातील सदस्यांच्या सामूहिक कृतीतून निर्माण होतात. या सर्व बाबी दिर्घ काळापासून पुन्हा पुन्हा तपासून पाहिल्या जातात. सामाजिक गरजांच्या पूर्ततेसाठी विशिष्ट मार्गाने विशिष्ट गोष्टी करण्याचे मार्ग एकदा मान्य होऊन ते प्रस्थापित झाले की ते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होतात. या सर्वात समाजाचा सहभाग महत्त्वाचा असतो. अशा प्रकारे सामाजिक संस्थांचे स्वरूपच प्रामुख्याने सामाजिक असते.

२) **सामाजिक संस्था सार्वत्रिक असतात परंतु समाजानुसार त्यांचे स्वरूप भिन्न असते** (Social institutions are universal but their nature differs from society to society) **:**

सर्वच समाजात सामाजिक संस्था दिसून येतात. सर्वच कालखंडात सर्वच प्रकारच्या समाजात संस्थांचे अस्तित्व आढळले आहे. त्यामुळेच आदिवासी, शेतीप्रधान ग्रामीण किंवा आधुनिक औद्योगिक समाजात सामाजिक संस्था अस्तित्वात असतात. म्हणजेच सामाजिक संस्था सार्वत्रिक असतात. तरीसुद्धा नियमनांच्या संचाचे स्वरुप आणि सामाजिक संस्थांची वैशिष्ट्ये समाजा-समाजानुसार भिन्न भिन्न आढळतात. उदा. - भारतीय समाजातील विवाहसंस्था, अर्थव्यवस्था, कुटुंबसंस्था या संस्थाबाबतच्या नियमनांचे संच अमेरिकन समाजात वेगळे आहेत आणि चीनमध्ये निराळे आहेत. इतकेच नव्हे तर भारतातील आदिवासी समाजातील सामाजिक संस्थांचे स्वरूप इतर समाजांपेक्षा (म्हणजेच ग्रामीण व शहरी समाजातल्या पेक्षा) वेगळे आहे. अशाप्रकारे जरी सर्व समाजात सामाजिक संस्था दिसून येत असल्या तरी त्यांचे स्वरूप समाजा समाजानुसार वेगवेगळे असते.

३) **सामाजिक संस्थात प्रस्थापित नियमनांचे संच, मूल्ये व कार्यपद्धती यांचा समावेश असतो** (Institutions consist of established patterns of norms, values and procedures)**:**

प्रामुख्याने सामाजिक संस्था म्हणजे प्रमाणित, मान्यताप्राप्त नियमनांचे संच, मूल्ये व कार्यपद्धती असतात. प्रत्येक संस्थेमध्ये लोकरूढी, लोकनीती, कायदे, तसेच मूल्ये, नियम, उपदेश, शिकवण आणि कार्यपद्धती अंतर्भूत असतात. विविध गोष्टी करण्याचे मार्ग किंवा रीती संस्था ठरवून देतात. तेच योग्य व मान्यताप्राप्त मार्ग मानले गेलेले असतात. त्यात समाजाच्या कल्याणाचा विचार अंतर्भूत असतो.

४) **सामाजिक संस्था गरजपूर्तीची साधने असतात** (Social institutions are means of satisfying needs) **:**

समाजातील सदस्यांच्या विविध गरजांचे समाधान करण्याच्या उद्देशाने संस्था अस्तित्वात आलेल्या असतात. सदस्यांच्या लैंगिक संबंधांचे नियमन व नियंत्रण करण्यासाठी तसेच समाजात सातत्याने नवीन सदस्यांची भर पडावी या उद्देशाने विवाहसंस्था अस्तित्वात आली. त्याचप्रमाणे बालकांचे पालनपोषण व संगोपन करण्यासाठी कुटुंबसंस्था निर्माण झाली. थोडक्यात सामाजिक संस्था समाजातील सदस्यांच्या मूलभूत व महत्त्वाच्या गरजांचे समाधान करतात.

**५) सामाजिक संस्था सामाजिक नियंत्रणाच्या यंत्रणा असतात** (Social institutions are mechanisms of social control) **:**

सामाजिक संस्थांत नियमनांचा संच, मूल्ये, नियम व कार्यपद्धती यांचा अंतर्भाव असतो. त्यांना संपूर्ण समाजाचा पाठिंबा असतो. त्यामुळेच या समाजाने मान्य केलेल्या वर्तनप्रकारांविरुद्ध सदस्यांनी केलेले वर्तन समाज सहन करीत नाही. संस्थांचे नियम सदस्यांना सामाजिक आंतरक्रियाबाबत मार्गदर्शन करीत असतात. त्यामुळे सदस्यही अशा नियमाविरोधी वर्तन करण्याचे धाडस करीत नाहीत. हे नियम नैतिकदृष्ट्या वैध आणि सदस्यांवर बंधनकारक असतात. सामाजिक संस्थांच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या सदस्यांना कोणत्या तरी प्रकारच्या शिक्षेला सामोरे जावे लागते या पद्धतीने सामाजिक संस्था समाजातील विचलनात्मक वर्तनाचे नियंत्रण करतात आणि सामाजिक संघटन मजबूत करतात. म्हणूनच सामाजिक संस्था म्हणजे सामाजिक नियंत्रणाच्या व्यवस्था असतात.

**६) सर्व सामाजिक संस्था परस्पर संबंधित असतात** (All social institutions are interrelated)**:**

सामाजिक संस्था समाजात सुट्या सुट्या किंवा विभक्त नसतात. त्या परस्परसंबंधित असून एकमेकांवर प्रभाव पाडतात. उदा. – धर्म संस्थेचा विवाहसंस्थेवर प्रभाव असतो. विवाहविधी पुरोहिताकडूनच संपन्न केले जातात. तो वधूवरांना परमेश्वराचा आशीर्वाद मिळावा यासाठी प्रार्थना करतो. अशाच पद्धतीने शिक्षणसंस्था, विवाहसंस्था व अर्थव्यवस्था यांचा एकमेकांवर प्रभाव दिसून येतो.

**७) सामाजिक संस्था सापेक्षत: स्थिर असतात; त्यांच्यात अंत्यत मंद गतीने बदल होतात** (Social institutions are realtively stable; they change very slowly) **:**

सामान्यत: सामाजिक संस्था सापेक्षत: स्थिर असतात. त्या ताठर (rigid) आणि टिकाऊ असतात. समाजात या संस्थांच्या सातत्याची यंत्रणा असते. सामाजिक संस्था मौखिक व लिखित परंपरेद्वारे अखंडपणे टिकून राहतात. आदिवासींसारख्या पारंपारिक समाजात संस्था मौखिक स्वरुपात पुढे चालू राहतात तर आधुनिक संकीर्ण समाजात त्यांना लिखित परंपरेचा फायदा मिळतो, किंवा दोन्ही स्वरुपात त्या टिकून रहातात. अशा पद्धतीने सामाजिक संस्था स्थिर राहतात. उदा. – हजारो वर्षापूर्वी निर्माण झालेल्या विवाहसंस्था, कुटुंबसंस्था व धर्मसंस्था इ. संस्थात आजपर्यंत फार मोठे बदल झालेले नाहीत. सामाजिक संस्थात बदल होणे अपरिहार्य असले तरी हे बदल अगदी हळूवारपणे होतात. उदा. – आधुनिकीकरणाच्या लाटेत गेल्या ५० वर्षात विवाहसंस्था आणि कुटुंबसंस्था यात काही बदल झाले आहेत. तरीसुद्धा एकंदरीत परिस्थिती पाहता आपण असे म्हणू शकतो की सामाजिक संस्था सापेक्षत: स्थायी असतात आणि त्या हळूहळू किंवा मंदगतीने बदलणाऱ्या असतात.

**८) सामाजिक संस्थांची काही प्रतीके असतात** (Institutions may have symbols) **:**

सामाजिक संस्थांना भौतिक, अभौतिक स्वरूपाची काही प्रतिके असतात. उदा. भारताचा तिरंगी राष्ट्रीय ध्वज. अंगठी आणि मंगळसूत्र ही विवाहसंस्थेची प्रतीके आहेत. धर्माची सुद्धा काही चिन्हे असतात. उदा.

स्वस्तिक, तसेच आर्थिक संस्थांची सुद्धा विशिष्ट चिन्हे व प्रतीके असतात. त्यावरून समाजात त्या संस्था ओळखल्या जातात.

**९) संस्था अमूर्त स्वरूपाच्या असतात** (Institutions are abstract in nature) **:**

सामाजिक संस्था मूर्त स्वरुपाच्या नसतात. आपण त्यांचे बाह्य व दृश्य स्वरुप डोळ्यांनी पाहू शकत नाही. मात्र त्या ज्या वर्तनप्रकारांचे नियंत्रण करतात त्यावरून त्या ओळखता येतात. उदा. धर्म आपण प्रत्यक्षात पाहू शकत नसलो तरी परमेश्वराची भक्ती, पूजा याद्वारे तो प्रतीत होत असतो. त्याविषयी आपणाला अनुमान काढता येते.

**१०) सामाजिक संस्था समाजासाठी काही प्रकट तर काही अप्रकट कार्ये पार पाडतात** (Social institutions perform both manifest and latent functions) **:**

समग्र समाजाच्या दृष्टीने सामाजिक संस्था काही कार्ये पार पाडीत असतात. सर्व सामाजिक संस्थाच्या अत्यंत महत्त्वाच्या अशा कार्यांमध्ये पुढील कार्यांचा समावेश होतो : (१) मानवी वर्तनावर नियंत्रण ठेवणे आणि समूह आणि व्यक्ती यांच्यामधील परस्पर संबंधाचे नियमन करणे. (२) समाज-व्यवस्थेचे सातत्य आणि स्थैर्य टिकवून ठेवणे. (३) समाजातील व्यक्तींच्या गरजांची पूर्तता करणे, आणि (४) समाज जीवनातील ऐक्य आणि एकसंघता टिकवून ठेवणे इ.

सामाजिक संस्थांचे निरीक्षण करता येण्यासारखे जे वस्तुनिष्ठ परिणाम समग्र समाजव्यवस्थेच्या अभियोजनासाठी सकारात्मक योगदान देतात आणि जे व्यवस्थेत सहभागी होणाऱ्या सदस्यांनी हेतूपूर्वक घडवून आणलेले असतात आणि त्यांना अभिज्ञात असतात (both intended and recognised) त्यांना प्रकट कार्ये (Manifest functions) असे म्हणतात. अप्रकट किंवा सूप्त कार्ये (Latent functions) म्हणजे संस्थांचे असे परिणाम की जे सदस्यांनी हेतूपूर्वक घडवून आणलेले नसतात आणि ते घडून येतात हे त्यांना माहितही असत नाही (those consequences which are both unintended and unrecognised). उदा. समाजसदस्यांना ज्ञान आणि कौशल्ये प्राप्त करून घेण्याची संधी प्राप्त करून देणे हे शिक्षणाचे प्रकट कार्य आहे. तर मुलांवरील पालकांचे नियंत्रण कमी होणे आणि समाजाच्या वर्गीय स्तरीकरणात बदल घडून येणे हे 'शिक्षण' या सामाजिक संस्थेचे अप्रकट परिणाम किंवा कार्ये असू शकतात. अशाप्रकारे सर्व सामाजिक संस्थांची समग्र समाजव्यवस्थेच्या दृष्टीने काही प्रकट तर काही अप्रकट कार्ये असतात.

**प्रमुख सामाजिक संस्था आणि संस्थांचे प्रकार :**

काही महत्त्वाच्या सामाजिक संस्था आणि समाजाच्या गरजांचे त्यांच्याकडून केले जाणारे समाधान (म्हणजेच त्यांची सामाजिक कार्ये) या बाबतची माहिती पुढीलप्रमाणे :

**१) कुटुंबसंस्था :–** समाजाच्या नवीन सदस्यांचे संगोपन त्यांचे पालनपोषण करणे आणि भविष्यकाळात ते समूहांचे कार्यक्षम सदस्य व्हावेत यासाठी त्यांची पूर्वतयारी करून त्यांचे समाजीकरण घडवून आणणे.

**२) विवाहसंस्था :–** प्रजोत्पादन, लैंगिक वर्तनाचे नियंत्रण आणि पती-पत्नीमध्ये नैतिक संबंध प्रस्थापित करणे.

**३) अर्थव्यवस्था :–** समाज सदस्यांच्या अन्न, वस्त्र व निवारा या गरजांची सोय करणे तसेच विविध वस्तू व सेवा यांची निर्मिती करून त्यांचे समाजातील सदस्यांमध्ये वाटप किंवा वितरण करणे.

**४) राज्यव्यवस्था :–** समाजात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे व ती टिकवून ठेवणे.

**५) शिक्षणव्यवस्था :–** समाजाच्या संस्कृतीचे संक्रामण करणे. समाजातील नवीन पिढीला विविध कौशल्ये विविध व्यवसाय आणि समाजातील विविध भूमिकांबद्दलची माहिती देणे.

**६) धर्मसंस्था :–** सामाजिक एकात्मता व सामाजिक नियंत्रण साध्य करणे.

**७) मनोरंजन :–** करमणूक व मनोरंजन या बाबतच्या मानवी अपेक्षांचे समाधान करणे. मोकळ्या वेळात समाजातील सदस्यांना गुंतवून ठेवणे. त्यासाठी खेळ, नृत्य, नाट्य आणि अशा अनेक बाबी निर्माण झालेल्या असतात.

वरील सर्व सामाजिक संस्था सामान्यत: सर्व समाजात दिसून येतात. तरीसुद्धा सामाजिक संस्थांचे प्रकार आणि त्यांचे वेगवेगळे मार्ग समाजा समाजानुसार भिन्न भिन्न असतात. आता आपण समाजशास्त्रज्ञानी सामाजिक संस्थांचे वर्गीकरण कसे केले आहे, हे थोडक्यात पाहू.

समाजशास्त्रज्ञानी वेगवेगळ्या निकषांच्या आधारे सामाजिक संस्थांचे वर्गीकरण केले आहे.

१) डब्ल्यू. जी. सम्नर यांनी सामाजिक संस्थांचे दोन प्रकारात वर्गीकरण केले आहे. संस्था कशा अस्तित्वात येतात या निकषावर ते आधारीत आहे. वर्धमान सामाजिक संस्था आणि विधीसंम्मत सामाजिक संस्था हे ते दोन प्रकार आहेत.

सम्नर यांच्या मते **वर्धमान सामाजिक संस्था** म्हणजे अशा सामाजिक संस्था असतात की ज्या उत्स्फूर्तपणे व अजाणतेपणे अस्तित्वात येतात. मानव समाजाच्या विकासाबरोबर त्या हळूहळू उदयास येतात. अशा संस्था उत्क्रांत होतात. त्या हेतूपुरस्सर निर्माण केलेल्या नसतात. विवाहसंस्था, कुटुंबसंस्था आणि धर्मसंस्था ही अशा संस्थांची उदाहरणे आहेत. तर दुसऱ्या बाजूला **विधीस्थापित सामाजिक संस्था** म्हणजे अशा संस्था की ज्या जाणीवपूर्वक व तर्कशुद्ध पद्धतीने विशिष्ट काळात विशिष्ट उद्देश समोर ठेवून निर्माण केल्या जातात. या सामाजिक संस्था जाणीवपूर्वक अस्तित्वात आणल्या जातात. सामाजिक जीवन नियमित व विकसित करण्यासाठी त्या स्थापन केल्या जातात. कायदे व न्यायालये ही अशा संस्थांची उदाहरणे आहेत.

२)  इ. डब्ल्यू. बर्गेस यांनी सामाजिक संस्थांचे त्यांच्या प्रमुख कार्यांच्या प्रकारावरून वर्गीकरण केले आहे. हे चार प्रकार म्हणजे १) सांस्कृतीक संस्था, २) आर्थिक संस्था, ३) मनोरंजनात्मक संस्था, ४) सामाजिक नियंत्रणात्मक संस्था असे आहेत.

३)  काही समाजशास्त्रज्ञ सामाजिक संस्थांच्या कार्यांचे समाजातील महत्त्व या आधारे सामाजिक संस्थांचे वर्गीकरण करतात. या आधारावर केलेले सामाजिक संस्थांचे दोन प्रकार म्हणजे : (१) प्राथमिक संस्था व (२) दुय्यम संस्था.

प्राथमिक सामाजिक संस्था म्हणजे अशा संस्था की ज्यांच्यावर मनुष्य आपल्या मूलभूत गरजांच्या समाधानासाठी अवलंबून असतो. त्यामुळेच तर त्या प्राथमिक महत्त्वाच्या संस्था समजल्या जातात. सर्वसाधारणपणे कुटुंबसंस्था, विवाहसंस्था आणि अर्थसंस्था ह्या प्राथमिक सामाजिक संस्था समजल्या जातात. या संस्थांशिवाय मनुष्य जगूच शकत नाही. दुय्यम सामाजिक संस्था या दुय्यम महत्त्वाच्या असतात. मानवाचे सामाजिक जीवन समृद्ध करण्यामध्ये त्यांचा सहभाग असतो. माणसाचे जीवन त्या अधिक प्रगतशील विकसीत, प्रगल्भ आणि इतर प्राणीमात्रापेक्षा वेगळ्या स्वरुपाचे बनवतात. या गटात धर्मसंस्था, मनोरंजनात्मक संस्था व शिक्षणसंस्था या संस्थांचा समावेश केला जातो.

### ३.२.२ सामाजिक संस्थांचे महत्व (कार्ये/भूमिका)

व्यक्ती आणि समाज या दोघांच्याही दृष्टीने सामाजिक संस्था अनेक महत्वपूर्ण कार्ये पार पाडतात. कारण समाजाच्या आवश्यक गरजा पूर्ण करण्याकरिता संस्थेची निर्मिती झाली आहे. सामाजिक कार्य आणि ते साध्य करून घेण्यासाठी लागणरे प्रस्थापित वर्तन प्रकार हीच कोणत्याही सामाजिक संस्थेची दोन प्रमुख अंगे आहेत. समाजातील हेतू व उद्देश सफल करून घेण्यासाठी सामाजिक संस्था अस्तित्वात आलेल्या असतात. म्हणूनच कोणत्याही समाजाचा त्या अविभाज्य अंग ठरतात. समाजातील प्रत्येक व्यक्तीचा विविध सामाजिक संस्थांशी संबंध येतो व त्याद्वारेच व्यक्तीचे वर्तनप्रकार घडविले जातात. उदा. कुटूंब, विवाह, धर्म, शिक्षणसंस्था या संकल्पनेच्या अर्थाबरोबरच सामाजिक संस्थेचे महत्व (कार्ये) समजून घेणे आवश्यक ठरते. व्यक्ती आणि समाज या दोहोंच्या दृष्टीने सामाजिक संस्था जी कार्ये पार पाडतात त्यातच त्यांचे महत्व सामाविलेले आहे. विशिष्ट कार्याच्या पूर्तीसाठीच विशिष्ट संस्था निर्माण होत असल्या किंवा केल्या जात असल्या तरी सर्व सामाजिक संस्थांची सामाजातील सर्वसाधारण महत्व किंवा कार्ये खालीलप्रमाणे विशद करता येईल.

**१)  संस्था मानवी गरजापूर्ती आणि कार्यास दिशा देते :**

सामाजिक संस्था हया व्यक्तीच्या तसेच समाजाच्या विविध गरजांची पूर्तता करतात. अन्न, वस्त्र, निवारा, कामवासनेची तृप्ती, प्रजोत्पादन, बालसंगोपन, समाजीकरण, सामाजिक नियंत्रण, संस्कृती संक्रमण, समाजसंरक्षण, समाजात शांतता व सुव्यवस्था राखणे, अलौकीक शक्तीशी संपर्क साधणे, मनोरंजन इत्यादी मूलभूत गरजा पूर्ण करण्याचे कार्य सामाजिक संस्था करीत असतात. त्यामुळेच मानवास आपले अस्तित्व टिकविणे व सुखसमाधनाचे जीवन जगणे शक्य होते.

**२) संस्था व्यक्तीच्या दर्जाचे व भूमिकेचे निर्धारण करते :**

सामाजिक संस्था हया व्यक्तीच्या समाजातील किंवा समूहातील स्थान किंवा दर्जा व भूमिका निर्धारित करतात. सामाजिक संस्था व्यक्तीला निश्चित दर्जा (हक्क व अधिकार) व त्या दर्जाला अनुरूप अशी भूमिका (कर्तव्ये व जबाबदाऱ्या) प्रदान करतात. उदा. विवाहसंस्था स्त्रीला पत्नी व पुरूषाला पती हा दर्जा देते व त्या त्या दर्जाची भूमिका पार पाडण्यास तयार करते. शिक्षणसंस्था व्यक्तींना शिक्षक, विद्यार्थी असे दर्जे प्रदान करून त्या दर्जाची भूमिका पार पाडण्यास तयार करते.

**३) संस्था सामाजिक व्यवहारात सुलभता निर्माण करते :**

विविध सामाजिक प्रसंगात, विशिष्ट दर्जावरील व्यक्तींनी कसे वागावे याची निश्चिती सामाजिक संस्था करतात. प्रत्येकाला आपापले हक्क व कर्तव्ये कोणती याचे सुस्पष्ट मार्गदर्शन संस्था ज्या नियमनांनी बनते त्यामुळे होत असल्याने सामाजिक व्यवहारात सुलभता निर्माण होते. प्रत्यक्षात वागताना व्यक्तींना सामान्यत: गोंधळाच्या स्थितीला तोंड द्यावे लागत नाही. सामाजिक व्यवहार भविष्यकथनक्षम होतात, त्यात नियमितता येते.

**४) संस्था व्यक्ती वर्तनाचे नियमन किंवा नियंत्रण करते :**

सामाजिक संस्था व्यक्तीच्या वर्तनाचे नियमन करतात किंवा त्या व्यक्ती वर्तनावर नियंत्रण प्रस्थापित करतात. कसे वागावे व वागू नये याविषयीचे स्पष्ट दिग्दर्शन संस्था करतात. त्यामुळे व्यक्तीच्या स्वैराचारी वृत्तीला व अनियंत्रित वर्तनाला आळा घातला जातो.

**५) संस्था ही संस्कृतीची वाहक आहे :**

सामाजिक संस्थेद्वारे संस्कृतीचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतर होत असते. उदा. कुटूंब या सामाजिक संस्थेद्वारे मुलांना आपल्या संस्कृती विषयीचे ज्ञान दिले जाते.

**६) संस्था सामाजिक परिवर्तनाचे कारण बनू शकते :**

संस्था ही परंपरा आणि प्रथेतूनच निर्माण होते. त्यामुळे ती रूढी परंपरेला चिकटून असते. बदलत्या परिस्थितीत आवश्यकतांची पूर्ती करणे तिला शक्य नसते. म्हणून सामाजिक संस्थेत बदल करण्याचा प्रयत्न केला जातो. या बदलामुळे सामाजिक परिवर्तन घडून आली आहेत.

**७) संस्था व्यक्तीमत्वाच्या विकासास सहाय्यक ठरते :**

सामाजिक संस्थांचा व्यक्तीच्या व्यक्तिमत्वावर फार मोठा प्रभाव असतो. सामाजिक संस्थांच्या प्रमाणकांनुसार वर्तन करण्याचा व्यक्ती प्रयत्न करते. कारण त्याशिवाय आवश्यक गरजांची पूर्ती करणे शक्य नसते. संस्थेतील भूमिका व्यक्ती योग्यप्रकारे वठविण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे तिच्या व्यक्तीमत्वाचा विकास घडून येतो.

**८) संस्था समाजाचे अस्तित्व आणि सातत्य टिकविते :**

संस्था व्यक्ती व समाजाच्या मूलभूत गरजांची पूर्ती करतात व त्यायोगे समाजसातत्यास हातभार लावतात. संस्था सापेक्षत: स्थिर असल्यामुळे सामाजालाही स्थैर्य लाभते. व्यक्तीवर्तनावर व सामाजिक व्यवहारांवर संस्था नियंत्रण ठेवीत असल्यामुळे समाजात गोंधळ किंवा अव्यवस्था निर्माण होत नाही. समाजाला सामाजिक संस्थांमुळेच संघटित स्वरूप प्राप्त होते वा रचना लाभते. समाजातील व्यवस्था (order) टिकवून ठेवण्यातील सामाजिक संस्थांची भूमिका म्हणूनच महत्वाची आहे.

**९) संस्था समाजीकरणचे कार्य पार पाडतात :**

मनुष्य प्राण्याचे सामाजिक प्राण्यात रूपांतर करण्याची प्रक्रिया म्हणजे समाजीकरण होय. हे समाजीकरण करण्यामध्ये विविध व्यक्ती, समूह, संस्था इ. चा सहभाग असतो. उदा. कुटुंबामध्ये व्यक्तीवर मुलभूत शिस्तीचे संस्कार होतात. पण त्याचबरोबर सार्वजनिक जीवनात विविा भूमिका पार पाडण्यासाठी सक्षम करण्याचेही काम विविध संस्था उदा. धर्म, शिक्षण, जातीसंस्था इ. करीत असतात. समाजीकरणाची ही प्रक्रिया अखेरपर्यत चालूच असते. आपल्या विविध गरजा भागविण्यासाठी माणसाचा या संस्थांशी नित्य संबंध येत असतो. त्या माध्यमातून समाजीकरणाचे कार्य होत असते.

**१०) संस्था इतर संस्थांना बळकटी आणण्याचे काम करतात :**

एकूणच समग्र सामाजिक जीवनात एक समन्वय साधण्याचे कार्य संस्था करतात. कोणतीही संस्था पूर्णत: अलिप्त, स्वतंत्र व स्वावलंबी असू शकत नाही. समाजातील विविध संस्था या परस्परावलंबी व परस्परपूरक असतात. याचा परिणाम म्हणजे या संस्था सामाजिक जीवन सुसहय व सुसंगत करण्याचे कार्य पार पाडतात. थोडक्यात या संस्था एकूणच समग्र सामाजिक सुसंगती निर्माण करण्याचे कार्य करतात.

अशाप्रकारे सामाजिक संस्थेचे महत्व (कार्य) आहे. सामाजिक संस्था मानवी समाजासाठी लाभदायक आहे.

## ३.३.३ सामाजिक संस्था आणि त्यांची कार्ये (कुटुंब, विवाह, धर्म आणि शिक्षण)

### अ) कुटुंब

**कुटुंबाची व्याख्या** (Definition of Family) **:**

या घटकाच्या प्रस्तावनेमध्येच आपण 'कुटूंब' हा समाजातील आकाराने लहान असणारा समूह आहे हे आपण समजून घेतले आहे. कुटूंब ही मूलभूत आणि प्राथमिक स्वरूपाची संस्था असून ती नवजात बालकाचे पालण-पोषण आणि देखभाल करीत असते. व्यक्तीच्या सामाजीकरणासाठी देखील मदत करीत असते. कुटुंबामुळे मानवी प्रवृत्ती आणि व्यक्तीमत्त्वाची जडण-घडण होत असते. आपल्या जन्मापासून ते मृत्यू पर्यंतच्या काळात मानवी स्वभावावर कुटुंबाची एक प्रकारची छाप पडलेली असते. आपण काही प्रख्यात, समाजशास्त्रज्ञांनी 'कुटूंब' या संज्ञेच्या केलेल्या व्याख्यांचा विचार करणार आहोत.

खाली दिलेल्या व्याख्या काळजीपूर्वक वाचा कारण प्रत्येक व्याख्येमधून तुम्हाला कुटुंबसंस्थेसंबंधीची वेगवेगळी वैशिष्ट्ये समजून येतील.

१) **क्लॅरे – ''कुटूंब म्हणजे आई–वडील (पालक) आणि त्यांची मुले यांच्यामध्ये अस्तित्वात असणाऱ्या परस्पर संबंधाची व्यवस्था आहे.''** (Family is "a system of relationships existing between parents and children" - Clare)

२) **एम. एफ. निमकॉफ – ''अपत्य असणाऱ्या किंवा नसणाऱ्या, मुलांसहित किंवा मुलांशिवाय, कमी अधिक कालावधीपर्यंत टिकून राहणारा, पती–पत्नींचा किंवा स्त्री व मुले अथवा पुरुष व मुले यांचा समूह म्हणजे कुटूंब होय.''** ("Family is more or less durable association of husband and wife with or without children or of a man or woman alone with children." - M. F. Nimkoff)

३) **एलियट आणि मेरिल – ''कुटूंब म्हणजे पती–पत्नी आणि त्यांची मुले या सर्वांचा मिळून बनलेला एक जैविक व सामाजिक समूह होय.''** ("Family is the biological, social unit composed of husband, wife and children." - Elliot and Merrill)

४) **अँडरसन आणि पारकर :– ''कुटूंब म्हणजे एक असा समाजमान्य घटक आहे की ज्यामधील व्यक्ती विवाह, कायदा आणि नातेसंबंधामुळे परस्परांशी बांधल्या गेलेल्या असतात.''** ("Family is a socially recoqnized unit of people related to each other by kinship, marital and legal ties." - Anderson and Parker)

५) **मॅकायव्हर – ''प्रजोत्पादन आणि जन्माला येणाऱ्या मुलांचे संगोपन व्हावे यासाठी ज्या समूहात टिकाऊ स्वरुपाच्या लैंगिक संबंधाचे पर्याप्त काटेकोरपणे निश्चितीकरण झालेले असते, असा समूह म्हणजे कुटूंब होय.''** ("Family is a group defined by sex relationship sufficiently precise and enduring to provide for the procreation and up brivging of children." - MacIver)

६) **किंग्जले डेव्हिस – ''कुटूंब म्हणजे असा समूह की ज्यामधील व्यक्तींचे असणारे परस्परसंबंध हे रक्तसंबंधावर आधारित असल्याने ते परस्परांचे नातलग किंवा आप्त असतात.''** ("Family is a group of persons whose relations to one another are based upon consanguinity and who are therefore kin to one another" - Kingsley Davis)

७) **बर्गेस आणि लॉक – ''कुटूंब म्हणजे विवाह बंधन, रक्तसंबंध किंवा दत्तक म्हणून एकत्रित आलेल्या व्यक्तींचा असा समूह की, ज्या सूमहातील पती आणि पत्नी, वडील आणि मुलगा, मुलगा आणि मुलगी, भाऊ आणि बहिण हे सर्व त्यांच्या सामाजिक भूमिकेच्या अनुषंगाने आंतरक्रिया आणि परस्परसंवाद साधण्यासाठी एकाच निवासस्थानाची स्थापना करतात.''** ("Family is a group of persons united by ties of marriage blood, or adoption constituting a single household interacting and inter communicating with each other in their respective social roles of husband and wife, father and mother, son and doughter, brother and sister." - Burgess and Locke)

वरील व्याख्यांचा अभ्यास केल्यानंतर आपणास कुटुंबाचा समाजशास्त्रीय अर्थ समजून येतो. क्लॅरे यांच्या पहिल्या व्याख्येत त्यांनी कुटूंब ही कशी सामाजिक संस्था आहे यावर भर देत असताना 'आई–वडील आणि मुले यांच्यामधील आंतर संबंधांची व्यवस्था म्हणजे कुटूंब होय' याचा त्यांनी विशेष उल्लेख केला आहे. इतर सर्व व्याख्यांच्यामध्ये 'कुटूंब हा जैविक आणि सामाजिक घटक कसा आहे' यावर अधिक भर दिला आहे. जैविक घटक म्हणून जर कुटुंबाचा अर्थ जाणून घेण्याचा प्रयत्न केला तर असे म्हणता येईल की, कुटुंबातील स्त्री आणि पुरुषाला समाजमान्य लैंगिक संबंधाच्या आधारे संतती किंवा अपत्य मिळवता येते. सामाजिक घटक म्हणून जर कुटुंबाचा अर्थ विचारात घेतला तर, कुटूंब म्हणजे असा समूह की ज्यामधील स्त्री आणि पुरूष विवाह, रक्तसंबंध अथवा दत्तक म्हणून परस्परांनी जोडले गेलेले असतात. कुटुंबातील सदस्य वय, लिंग यानुसार त्यांच्या भूमिका पार पाडीत असतात व त्यांचे निवासस्थान एकच असते. सामाजिक संस्था म्हणून अथवा समूह म्हणून कुटुंबाची असणारी काही वैशिष्ट्ये वरील व्याख्यांच्या मध्ये आढळून येतात. विवाह संस्थेच्या माध्यमातून ज्यावेळी स्त्री आणि पुरुष यांच्यामध्ये लैंगिक संबंध अस्तित्वात येतात त्यावेळी कुटुंबसंस्था उदयास येत असते. प्रत्येक कुटुंबाचे स्वत:चे असे एक स्वतंत्र नाव असते की ज्यामुळे इतरांना त्या कुटुंबाचा परिचय होत असतो. तसेच प्रत्येक कुटुंबाचे स्वतंत्र कूळ आणि वंश असतो व असे कूळ अथवा वंशपरंपरा पुरूष अथवा स्त्री या दोन्हीपैकी कोणत्यातरी एका बाजूने चालत आलेली असते. प्रत्येक कुटुंबासाठी एकत्रित असे निवासस्थान असते. कुटुंबामार्फत सदस्यांच्या शारिरीक, आर्थिक, मानसिक आणि सामाजिक गरजांची पूर्तता होत असते. त्याचबरोबर कुटुंबाद्वारे समग्र समाजाच्या दृष्टिकोनातूनदेखील काही कार्ये पार पाडली जातात.

'कुटूंब' या संज्ञेच्या व्याख्या आणि अर्थ समजून घेतल्यावर आता आपण कुटुंबाच्या प्रभेदक वैशिष्ट्यांच्या अध्ययनाकडे वळू या. कुटुंबाची काही महत्त्वाची प्रभेदक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.

### १) **सार्वत्रिकता** (Universality) :

मरडॉक यांनी विविध समाजातील अनेक कुटुंबांचे सर्वेक्षण करून असा निष्कर्ष काढला आहे की, कुटूंब ही एक सार्वत्रिक स्वरूपाची संस्था आहे. अगदी आदिम कालखंडापासून ते आजच्या वर्तमान, समकालीन समाज व्यवस्थेपर्यंत कोणत्या ना कोणत्या स्वरुपाच्या कुटुंबाशिवाय असणारा समाज सापडत नाही. त्यामुळे कुटुंबाचे अस्तित्व सर्व समाजात सर्व कालखंडामध्ये दिसून येते. प्रख्यात विचारवंत मॅलीनोस्की यांनी असे नमूद केले आहे की, मानवी विकासाच्या अगदी रानटी अप्रगत अशा अवस्थेपासून ते प्रगत सुसंस्कृत समाजापर्यंतच्या सर्व अवस्थांमध्ये कुटुंबसंस्था अस्तित्वात असल्याचे दिसून येते. मुलांचे संगोपन आणि निगा घेण्याची गरज ही मूलभूत मानवी गरज असल्यामुळे कुटुंबसंस्था ही सार्वत्रिक स्वरूपाची संस्था बनत गेली. प्राणी जगताशी मानवाची जर तुलना केली तर प्राण्यापेक्षा मानवामध्ये तीव्र लैंगिक प्रेरणा दिसते. तसेच प्राण्यांच्यामधील लैंगिक वासना विशिष्ट ऋतूमध्येच क्रियाशील होते, याउलट मानवामधील लैंगिक इच्छाशक्ती सातत्यपूर्ण असते. शिवाय प्राण्यांच्या बाबतीत एक गोष्ट प्रकर्षाने आढळून येते ती म्हणजे नवजात किंवा नुकतेच जन्माला आलेले लहान प्राणी अल्पावधीमध्येच स्वतंत्रपणे राहू शकतात किंवा

ते स्वत:ची काळजी स्वत: घेवू शकतात. मानवी नवजात बालकाबाबत मात्र असे घडून येत नाही. मानवी जगतामध्ये नवजात बालकावर तारुण्यापर्यंत आणि त्यानंतरही सतत लक्ष ठेवून त्याची काळजी घ्यावी लागते. तरुण अवस्थेत असताना मुलांचे आईवडील त्याला रोजगार कसा मिळेल इथपर्यंत काळजी घेतात. म्हणून जवळच्या नाते संबंधामधील लैंगिक संबंधाचे नियमन करण्याच्या उद्देशाने आणि मुला-मुलींचे परिपक्व होईपर्यंत संगोपन करण्याच्या गरजेतून कुटूंब ही मूलभूत आणि सार्वत्रिक संस्था उदयास आलेली आहे.

२) **मर्यादित आकार** (Limited Size) **:**

कुटूंब हा अत्यंत लहान आकाराचा सामाजिक घटक आहे. तरीसुद्धा विस्तृत आणि व्यापक स्वरूपाच्या समाजाची वैशिष्ट्ये कुटुंबासारख्या लहान घटकामध्ये दिसून येत असल्याने कुटुंबाला नेहमीच व्यापक समाजाची प्रतिकृती म्हणून संबोधले जाते. कोणत्याही कुटुंबातील बहुतेक सदस्यांचे परस्परांशी असणारे संबंध रक्तसंबंधीय स्वरूपाचे आढळून येतात. असे असले तरी समाजातील इतर सामाजिक समूहांशी तुलना करता कुटूंब हा लहान आकाराचा सामाजिक समूह असलेला दिसतो. विवाह करून कोणीही व्यक्ती कुटुंबाची सदस्य होऊ शकते. आणि म्हणून कुटूंब आणि विवाह यांचा परस्पर संबंध असतो. प्रामुख्याने शेतीवर आधारित ग्रामीण समाजामध्ये अनादीकालापासून शेती मशागतीसाठी आणि शेतजमिनीवर असणाऱ्या मालकीचे विभाजन होऊ नये यासाठी म्हणून आकाराने मोठी असणारी संयुक्त कुटुंबपद्धती अस्तित्वात आली. भारतामध्ये शेती व्यवसायावर आधारित असणाऱ्या अशा वैशिष्ट्यपूर्ण संयुक्त कुटुंबपद्धती आढळून येतात तरीसुद्धा इतर समूहाशी तुलना करता कुटुंबसंस्थेचा आकार लहान दिसून येतो. आधुनिक समाज व्यवस्थेमध्ये तर कुटुंबसंस्थेचा आकार अधिकच कमी कमी होत चालला आहे.

३) **कुटूंब हा मूलत: रक्तसंबंधियांचा समूह आहे** (Family is basically a group of blood-relatives)**:**

कुटुंबातील सर्व सदस्य परस्परांशी विवाह अथवा रक्तसंबंधाने जोडले गेलेले असतात. हे कुटुंबाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. पितृसत्ताक समाजव्यवस्थेमध्ये विवाह करून स्त्री कुटुंबामध्ये प्रवेश करीत असली तरी कुटुंबातील इतर सदस्यांचा जन्म मात्र त्याच कुटुंबात झालेला असतो. कुटुंबातील बहुतांश सदस्य हे एकाच पूर्वजापासूनचे असतात. भारतामध्ये कुटुंबातील सदस्य परस्परांशी कशाप्रकारे संबंधित आहेत याची कल्पना गोत्रा (Gotra) वरून येते.

४) **सदस्यांमधील कायमस्वरूपी संबंध** (Permanent relationship among the members) **:**

कुटुंबातील सदस्यांमध्ये प्रस्थापित झालेले अथवा विकसित होणारे परस्पर संबंध हे आजन्म किंवा कायमस्वरूपी असतात. अशा स्वरूपाचे संबंध हे कुटुंबातील व्यक्तीच्या मृत्यूपर्यंत टिकून असतात. आणि म्हणून व्यक्तीच्या जन्मापासून ते तिच्या मृत्यूपर्यंत कुटुंबसंस्थेची तिला सोबत असते. एखाद्या स्त्रीच्या विवाहानंतर देखील तिचे माहेरच्या कुटुंबाशी असणारे संबंध टिकून असतात. शिक्षण किंवा नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने परगावी गेलेली कुटुंबातील मुले विविध सण, उत्सव आणि सामाजिक समारंभाच्या

निमित्ताने परस्परांना भेटत असतात. एकंदरीत कुटुंबाद्वारे कुटुंबातील सदस्यांमध्ये कायमस्वरूपी संबंध प्रस्थापित करण्याचे कार्य होत असते.

**५) कुटूंब सदस्यांसाठी निवाऱ्याची–व्यवस्था** (Provision of shelter for members) **:**

आपण आपल्या 'घरा'शी नेहमी जोडले गेलेलो असतो. दिवसभरामध्ये कार्यालयीन कामासाठी म्हणून अथवा शाळेत गेल्यानंतर आपण कधी एकदा घरी कुटुंबाकडे मागे परत जातो याची आपल्याला ओढ लागलेली असते. कुटूंब हे सर्व सदस्यांना निवाऱ्याची सोय उपलब्ध करून देत असते. प्रत्येक स्त्री-पुरूष आणि मुलांच्यामध्ये आपले स्वत:चे निवासस्थान अथवा घर असावे अशी सूप्त इच्छा असते. अशा निवासामध्ये अथवा घरामध्ये आपल्याला केवळ आश्रयच मिळतो असे नाही तर त्या ठिकाणी व्यक्तीला संरक्षण, प्रेम, शांती आणि जवळीकता देखील लाभत असते.

**६) प्रजोत्पादन** (Reproduction) **:**

प्रजोत्पादन किंवा संतती-निर्मिती हे कुटुंबाचे मूलभूत कार्य आहे. लैंगिक समाधान हा कुटुंबाचा प्रमुख हेतू असतो. किंबहुना कुटुंबाचे ते प्रथम उद्दिष्ट असते. विवाह आणि कुटुंबसंस्थेशिवाय समाजामध्ये जरी अपत्ये जन्माला घालता येऊ शकत असली तरी, सभ्य अथवा सुसंस्कृत समाजात अशा कृत्याला मान्यता नसते. प्रजोत्पादन प्रक्रियेचे कुटुंबसंस्थेमुळे संस्थीकरण झालेले असते. कुटूंब आणि विवाहसंस्थेखेरीज लैंगिक संबंधांचे नियंत्रण होऊ शकत नाही आणि त्यामुळे या दोन संस्था जर समाजात नसतील तर स्वैर लैंगिक संबंधाचा एकूण समाजरचनेवर वाईट परिणाम होऊ शकतो. कुटुंबामध्ये मुलांच्या मधील लैंगिक सहजप्रवृत्तीची काळजी पालकाकडून घेऊन ती समाजमान्य मार्गाने पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो. या संदर्भात ग्रीक तत्त्ववेत्ता ॲरिस्टॉटल असे म्हणतो की, ''मूलाच्या रुपात आपली प्रतिमा राखून ठेवणे ही मानवाची नैसर्गिक प्रवृत्ती आहे.'' अशाप्रकारे कुटुंबसंस्था ही नेहमीच प्रजोत्पादन अथवा संतती कार्याशी निगडीत असते आणि म्हणून कुटूंब संस्थेला प्रजोत्पादनाच्या दृष्टीने असणारे महत्त्व हे अनन्य साधारण आहे.

**७) मुलांचे पालण–पोषण** (Rearing of Children) **:**

कुटुंबातील लहान मुलांची काळजी घेणे हे कुटुंबाचे एक प्रमुख कार्य आहे. प्राणीजगतामधील लहान प्राण्यांच्या तुलनेत मानवी जगतामधील लहान मुलांच्या पालण-पोषणाचा कालावधी अधिक जास्त असतो हे आपण या पूर्वीच्या अभ्यासामध्ये नमूद केले आहेच. नवजात बालकाच्या वाढीसाठीचा कालावधी दीर्घ स्वरुपाचा असतो. या कालावधीमध्ये बालक असहाय्य असते आणि त्याला किमान दोन वर्षापर्यंत त्याच्या मातेची मदत आवश्यक असते. पक्ष्याचे लहान पिल्लू घरट्यातून अल्पावधीतच भरारी घेत असते. आणि जर का ते भरारी घेत नसेल तर त्या पक्ष्याची आई पिलाला भरारी घेण्याचा सराव व्हावा यासाठी त्याला घरट्यातून ढकलून देत असते. हे सर्व मानवी जगतामधील नवजात बालकाबाबत शक्य नसते. नवजात बालकाची सतत काळजी घेवून त्याच्याकडे लक्ष द्यावे लागते. मानवी बालक आजारी पडण्याची शक्यता असते. म्हणून बालक चांगले तरुण होईतोपर्यंत त्याला पुरेसा आहार देऊन, त्याची वारंवार देखरेख करावी लागते. हे सर्व झाल्यानंतरही पालकांची जबाबदारी पूर्ण होत नसते. कारण, त्यानंतर मुलांना स्वतंत्रपणे

वावरण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा या गरजांच्या खेरीज इतर स्वरूपाची अधिक मदत आवश्यक असते. कुटुंबातील आई-वडिलांचे संरक्षण ही एक प्रथम गरज असते आणि ती केवळ कुटुंबातच मिळत असते.

**८) कुटूंब समाजीकरणाचे एक साधन असते** (Family as an agency of socialization) **:**

मुलांच्या समाजीकरणाच्या प्रक्रियेमध्ये कुटुंबाची असणारी भूमिका आणि तिचे महत्त्व किती असते हे स्वतंत्रपणे सांगण्याची आवश्यकता नाही. कारण, कुटुंबाद्वारेच समाजातील संस्कृतीचे सातत्य टिकवून ठेवले जाते. कुटूंब हे एक असे महत्त्वाचे साधन आहे की, ज्यामार्फत सामाजिक नियमनांचे, सांस्कृतिक मूल्यांचे, श्रद्धांचे, लोकरुढींचे आणि आचार-विचारांचे हस्तांतर एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे होत असते. नवजात बालकाला भाषा अवगत होण्यासाठी, धार्मिक विधी समजून येण्यासाठी आणि तो योग्य असा समाजशील मानव होण्यासाठी त्याला कुटुंबाची मदत आवश्यक असते. तुम्हाला 'कमला' आणि 'अमला' या दोन बहिणी आणि रामू ही मानवी अपत्ये दूर जंगलात लांडग्यासोबत रहात होती त्याबद्दलची कथा आपणास माहित असेलच. ही सर्व मानवी मुले असूनसुद्धा त्यांचे वर्तन प्राण्यांसारखे घडून येत होते. कारण त्यांना कुटुंबातील पालन-पोषणाचे फायदे मिळालेले नव्हते. त्यांच्या सोबत कोणी कुटुंबातील सदस्य सामाजिक वर्तन शिकवण्यासाठी नसल्याने, अशा मुलांच्यामध्ये सामाजिक गुण-वैशिष्ट्यांचा अभाव आढळून आला. तात्पर्य, कुटुंब-सदस्यांच्या संपर्कात राहूनच मुलाचे योग्य समाजीकरण घडून येणे सुलभ होते.

कुटूंब हा एक प्राथमिक समूह आहे. कुटुंबातील सदस्यांमध्ये समोरा-समोरचे संबंध असतात. अशा संबंधामुळे आपलेपणाची भावना निर्माण होते. ती समाजीकरणासाठी उपयुक्त ठरते. खऱ्या अर्थाने, सामाजीकरणाचा पायाभूत आधार कुटूंब हाच असतो. कुटुंबातील समाजीकरणामुळे समाजीकरण करणाऱ्या इतर साधनांचे कार्य सोपे होण्यास मदत होते. उदा. मुलगा शाळेत जाऊन भाषेचे ज्ञान मिळविण्यापूर्वी आणि योग्य सवयी अंगीकृत करण्यापूर्वी अनेक गोष्टी तो कुटुंबातच सर्वप्रथम आत्मसात करीत असतो. शाळेमध्ये मुलांना औपचारिक शिक्षण मात्र योग्य पद्धतीने मिळत असते. आणि या कारणामुळेच आपण ''माता ही मुलाची प्रथम शिक्षिका असते'' ("Mother is the first teacher of the child") असे नेहमी म्हणत असतो. या अर्थाने पाहिले तर मुलांच्या समाजीकरणामध्ये दुसरा इतर कोणताही सामाजिक समूह कुटुंबाशी स्पर्धा करू शकत नाही. कुटुंबातील आई- वडील, भाऊ-बहिण, आजी-आजोबा इ. सर्व सदस्य समाजीकरणाच्या प्रक्रियेशी संबंधित असतात. थोडक्यात, मुलांच्या समाजीकरणामध्ये कुटूंब महत्त्वाची भूमिका पार पाडीत असते.

**९) कुटूंब ही नियमन अथवा शिस्त ठेवणारी संस्था असते** (Family as a regulating institution)**:**

कुटूंब संस्था नेहमी आपल्या कुटुंबातील सदस्यांसाठी वर्तनविषयक मापदंड किंवा आदर्श घालून देत असते. कुटुंबाची प्रमुख व्यक्ती नेहमी आपल्या सदस्यांना शिस्त लागावी म्हणून प्रयत्न करीत असते. कुटुंबातील मुले वयाने मोठी होत जातात. तसतसे त्यांना नैतिक आणि सामाजिक वर्तनासंबंधीच्या मापदंडांची, आदर्शाची शिकवण दिली जाते. कुटुंबातील मुलांना योग्य वर्तनासंबंधीची नेहमीच कल्पना असते असे नाही. आणि म्हणून त्यांना एक आदर्श नागरीक तयार करण्याच्या हेतूने द्याव्या लागणाऱ्या योग्य

वर्तनाची जबाबदारी ही त्या कुटुंबातील आईवडिलांची असते. या अर्थाने पाहिले तर कुटुंबातच मुले नैतिक मूल्यांचे, रितीरिवाजांचे, परंपरा आणि लोकरुढींचे शिक्षण घेत असतात. या प्रक्रियेलाच समाजीकरण किंवा 'सामाजिक नियमनांच्या आंतरीकरणाची'(Internalization of social norms) प्रक्रिया असे म्हणतात. म्हणूनच कुटुंबाला 'नागरी सद्‌गुणांची शाळा' (School of civic virtures) म्हणून संबोधले जाते. कारण अशा कुटुंबरूपी शाळेतच मुलांना प्रेम, सहकार्य, सहनशीलता, त्याग, शिस्त आणि नम्रता इ. सारख्या गुणांचे शिक्षण मिळत असते.

१०) **सामाजिक स्थाननिश्चिती** (Social Placement) **:**

व्यक्तीला समाजामध्ये सनदशीर अथवा कायदेशीर दर्जा मिळवून देण्याचे कार्य कुटुंबामार्फत होत असते. कौटुंबिक पार्श्वभूमीच्या आधारावर व्यक्तीची सामाजिक ओळख होत असते. प्रामुख्याने पारंपारिक समाज व्यवस्थांच्यामध्ये असे आढळून येते. कुटुंबाकडूनच आपल्याला आपले नांव आणि आडनाव मिळालेले असते. वारसापद्धतीने कुटुंबाकडूनच आपल्याला सामाजिक दर्जा आणि भौतिक मालमत्ता प्राप्त होत असते. कुटुंबाद्वारे आपले 'सामाजिक नामाभिदान' अथवा तादात्मीकरण (Societal identification) होत असते. पारंपारिक समाजामध्ये आपण कोणत्या प्रकारचा व्यवसाय करतो तो व्यवसायसुद्धा कुटुंबाकडून आलेला असतो. अशा कुटुंबामध्ये मुलांना व्यावसायिक प्रशिक्षण हे त्या कुटुंबाकडूनच प्राप्त होत असते. तसेच, आपला सामाजिक दर्जा, धार्मिक दर्जा, शैक्षणिक दर्जा आपले राष्ट्रीयत्व या सर्व बाबी आपल्या कुटुंबाकडूनच आपल्याला बहाल होत असतात.

११) **कुटुंबसंस्था विविध प्रकारांमध्ये आढळते** (Family exists in different forms) **:**

कुटूंब प्रकारांच्या अनुषंगाने, कुटुंबसंस्थेची वैशिष्ट्ये बदलत असतात. विविध निकषांच्या आधारावर समाजशास्त्रज्ञांनी कुटुंबसंस्थेचे वर्गीकरण केले आहे. आता आपण, कुटुंबसंस्थेच्या काही प्रमुख प्रकारांचे स्वरूप पाहू.

**ब) विवाह**

**अ) विवाह–बंधनामध्ये असणाऱ्या व्यक्तींची संख्या** (Number of persons involved in the matrimovial alliances) **:**

विवाह बंधन होत असताना, त्यामध्ये किती व्यक्तींचा सहभाग आहे, यावरून कुटुंबाचे वर्गीकरण केले जाते ते प्रामुख्याने तीन प्रकारचे आहेत.

**१) एक–विवाही कुटूंब** (Monogamous family) : या प्रकारच्या कुटुंबामध्ये एकावेळी एक व्यक्ती एका स्त्रीशी विवाह करीत असते. एक विवाह पद्धतीमधून अथवा त्याचा परिणाम म्हणून अस्तित्वात आलेल्या कुटुंबाला 'एक–विवाह कुटूंब' म्हणतात.

२) **बहुपत्नी-विवाहोत्पन्न कुटूंब** (Polygamous family) : जर पुरूष व्यक्ती, एकाच वेळी एकापेक्षा अधिक स्त्रियांशी विवाह करीत असेल, म्हणजेच कुटुंबप्रमुख म्हणून त्याला एकाहून जास्त पत्नी असतील तर त्या कुटुंबाला बहुपत्नी-विवाहोत्पन्न कुटूंब असे म्हणतात.

३) **बहुपती-विवाहोत्पन्न कुटूंब** (Polyandrous family) : या प्रकारच्या कुटुंबामध्ये एक स्त्री अनेक पुरुषांशी विवाह करते (हे अनेक पुरूष एकमेकांचे भाऊ असतात.) आणि त्यांच्या समवेत राहते किंवा त्यापैकी प्रत्येकाकडे आळीपाळीने रहावयास जाते. या प्रकारच्या कुटुंबाला बहुपती-विवाहोत्पन्न कुटूंब असे म्हणतात.

**ब) विवाहानंतर असणाऱ्या निवासाचे ठिकाण** (Place of residence after marriage) **:**

विवाहानंतर नव-विवाहित जोडी नेमक्या कोणत्या ठिकाणी वास्तव्य करतात, या आधारावरती, समाजशास्त्रज्ञांनी कुटुंबाचे वर्गीकरण खालील दोन प्रकारांमध्ये केलेले आहे.

१) **पितृ-स्थानीय कुटूंब** (Patri-local families) : ज्या प्रकारच्या कुटुंबामध्ये विवाहानंतर पत्नी पतीसमवेत पतीच्या घरी रहावयास जाते त्याला पितृ-स्थानीय कुटूंब असे म्हणतात.

२) **मातृ-स्थानीय कुटूंब** (Matri-local families) : ज्या प्रकारच्या कुटुंबामध्ये विवाहानंतर पती पत्नीसमवेत तिच्या घरी रहावयास जातो त्याला मातृ-स्थानीय कुटूंब असे म्हणतात.

**क) सत्ता किंवा अधिकार** (Authority) **:**

कौटुंबिक सत्ता अथवा अधिकार कोणाकडे असतात, या आधारावरती कुटुंबाचे वर्गीकरण खालील दोन प्रकारांमध्ये आढळून येते.

१) **पितृसत्ताक कुटूंब** (Patriarchal Family) : पितृसत्ताक कुटुंबामध्ये कुटुंबाचे अधिकार वडिलांच्याकडे असतात व त्यांच्या अनुपस्थितीमध्ये अथवा त्यांच्या पश्चात ते अधिकार त्यांच्या थोरल्या मुलाकडे दिले जातात.

२) **मातृसत्ताक कुटूंब** (Matriarchal Family) : मातृसत्ताक कुटुंबामध्ये कुटुंबाचे अधिकार आईकडे असतात.

**ड) वंशावळ किंवा वारसापद्धती** (Ancestry or Descent) **:**

वारसा पद्धतीनुसार कुटुंबाचे दोन प्रकारांमध्ये वर्गीकरण केले जाते.

१) **पितृवंशीय कुटूंब** (Patrilineal family) : या प्रकारामध्ये वारसा हक्क हा वडिलांकडून किंवा पुरुष, व्यक्तीकडून चालत आलेला असतो. त्यामुळे कुटुंबातील मुलांना वारसा पद्धतीने वडिलांची मालमत्ता मिळत असते.

२) **मातृवंशीय कुटूंब** (Matrilineal family) : या प्रकारांमध्ये वारसा हक्क हा मातेकडून किंवा महिलेकडून चालत आलेला असतो. त्यामुळे कुटुंबातील मुलींना वारसा पद्धतीने मातेची मालमत्ता मिळत असते.

**इ) कुटुंबाचा आकार आणि रचना** (Size and structure of family) **:**

कुटुंबाचा आकार आणि कुटुंबाची रचना हे दोन घटक विचारात घेवून, कुटुंबाचे खालील दोन प्रकारांमध्ये वर्गीकरण केले जाते.

१) **केंद्र अथवा विभक्त कुटूंब** (Nuclear family) : केंद्रित किंवा विभक्त कुटूंब म्हणजे असे कुटूंब की, ज्यामध्ये पती-पत्नी आणि त्यांची अविवाहित मुले यांचा समावेश होतो. 'लहान आकार' हे एक केंद्रित कुटुंबाचे एक वैशिष्ट्य असते. प्रामुख्याने महानगरांच्या मध्ये आढळून येणारी आधुनिक स्वरूपाची कुटुंबे या प्रकाराची असतात.

२) **संयुक्त अथवा अविभक्त कुटूंब** (The joint or undivided family) : या प्रकारच्या कुटुंबांमध्ये तीन पिढ्यांपर्यंतचे सर्व स्त्री आणि पुरूष एकत्रितपणे रहात असतात. त्यामुळे केंद्रित कुटुंबाच्या तुलनेने संयुक्त कुटुंबाचा आकार मोठा दिसून येतो. समान निवास-स्थान, समान स्वयंपाक घर, सामाईक मालमत्ता, एकत्रित मिळून होणारी पूजा-अर्चा इ. ही सर्व हिंदू संयुक्त कुटूंब पद्धतीची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. अशा संयुक्त कुटूंब पद्धतीची प्रमुख वैशिष्ट्ये ही आपणास प्रामुख्याने भारतातील पारंपारिक ग्रामीण समुदायामध्ये अधिक प्रकर्षाने आढळून येतात.

**फ) कुटूंब सदस्यांमधील संबंधांचे स्वरूप** (Nature of relationship among family members)**:**

कुटूंब सदस्यांमधील संबंधांच्या स्वरूपाचा आधार घेऊन, कुटुंबाचे खालील प्रकारांमध्ये वर्गीकरण केले जाते.

१) **वैवाहिक कुटूंब** (The conjugal family) : या प्रकारच्या कुटुंबात विवाहित प्रौढ सदस्यांचा समावेश असतो व त्यांच्यामध्ये लैंगिक संबंध आढळून येतात.

२) **जन्माधारित कुटूंब** (The consanguine family) : या प्रकारच्या कुटुंबामधील सदस्यांमध्ये रक्त संबंधीय स्वरूपाचे संबंध असतात. उदा. भाऊ, बहिण, वडिल, मुलगा इ.

**कुटुंबाची बदलती वैशिष्ट्ये** (Changing features of family) **:**

सामाजिक संस्थांचे स्वरूप स्थिर नसून गतीशील असते हे आपण यापूर्वीच अभ्यासले आहे. कुटुंबसंस्था देखील या नियमाला अपवाद नाही. विवाह आणि कुटूंब या परस्परसंबंधीत अशा सामाजिक संस्था आहेत. ज्यावेळी एका संस्थेमध्ये बदल घडून येतो, त्याचवेळी दुसऱ्या संस्थेमध्येदेखील बदल घडून येतो. जलदगतीने होणारे औद्योगिकरण, नागरीकरणाचे वाढते प्रमाण, ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे स्थलांतर, वाढता व्यक्तीवाद, उच्च शिक्षणाचा प्रसार, महिलांचे शिक्षण, महिलांचे विविध व्यवसायातील

पदार्पण यासारख्या बदलांचा परिणाम म्हणून कुटूंब संस्थेमध्ये बदल घडून आलेले दिसतात. गेल्या शतकामध्ये कुटुंबसंस्थेमध्ये अतिशय मोठ्या स्वरूपाचे बदल संपूर्ण जगभर घडून आले आहेत, असा समाजशास्त्रज्ञांचा दावा आहे. आता आपण कुटुंबसंस्थेच्या बदलत्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणार आहोत.

**१) कुटुंबाच्या आकारमानामध्ये झालेली घट** (Decrease in the size of the family) **:**

कुटुंबाचा आकार कमी-कमी होत चालला आहे. संपूर्ण विश्वामध्ये कुटुंबाचे सरासरी आकारमान कमी होत चालले आहे. मर्यादित अथवा लहान कुटूंब ठेवण्यासाठीच्या नियमनांचा काटेकोरपणे केलेला पाठपुरावा आणि जन्मदर नियंत्रित ठेवण्यासाठीच्या पद्धतींच्या वापरामुळे कुटुंबाचे आकारमान घटत असलेले दिसते. १९५० मध्ये भारताने कुटूंब-नियोजन कार्यक्रमाची सुरवात केली. चीनने सुद्धा त्यांच्या लोकसंख्या वाढीचा दर खाली आणण्यासाठी 'एक मूल हा नियम' (one child norm) अधिक काटेकोरपणे अंमलात आणला. पाश्चिमात्य देशांमध्ये बहुतांशी विवाहित व्यक्ती त्यांच्या मर्जीनुसार अपत्याशिवाय (Childless) रहाणे पसंत करतात. पाश्चात्य समाज-व्यवस्थेमध्ये विवाहितांना अपत्य नसल्याने त्यांच्यावर कसलाही कलंक लावला जात नाही. पाश्चिमात्त्य समाजात नोकरी करणाऱ्या उच्चशिक्षीत महिला मूल सांभाळणे म्हणजे अकारण आपल्या व्यावसायिक कारकीर्दीवर अतिरिक्त भार लादणे असे समजतात. सामाजिक मूल्यांच्यामध्ये बदल घडून येत आहे. भारतामध्ये अनेक विवाहितांना एकच मूल आहे. मग ती मुलगी सुद्धा असू शकते. अशाप्रकारे जन्मदर नियंत्रित करण्यावरील उपाय, महिलांचे शिक्षण आणि बदलती सामाजिक मूल्ये इ. कारणांच्यामुळे आधुनिक कुटुंबाचा आकार हळूहळू कमी होत चालला आहे.

**२) संयुक्त कुटुंबाचे केंद्रित कुटुंबांच्यामध्ये होणारे विभाजन** (Joint families are being broken to form the nuclear families) **:**

एकेकाळी शेती हा प्रमुख व्यवसाय होता आणि त्यासाठी संयुक्त कुटुंबपद्धती उपयुक्त होती. शेतजमिनीची विभागणी टाळण्याच्या हेतूने आणि शेती कामातल्या श्रमविभाजनाच्या पद्धतीमुळे संयुक्त कुटुंबपद्धती अधिक प्रमाणात रुढ होत गेली. शेती व्यवसायातील उत्पादन घेण्यासाठी संख्येने अधिक प्रमाणात असणाऱ्या संयुक्त कुटुंबातील सदस्यांची मदत होत होती. सद्य:स्थितीला ग्रामीण समुदायांमध्ये देखील बदल घडून येत आहेत, शेती मशागतीसाठी सुरू करण्यात आलेल्या तांत्रिक पद्धती, वारसा पद्धतीने आलेल्या शेत जमिनींचे होणारे कायदेशीर विभाजन, चांगले उच्चशिक्षण आणि व्यावसायिक संधींच्या शोधासाठी तरुणांचे खेड्याकडून शहरांकडे होणारे स्थलांतर इ. कारणांमुळे संयुक्त कुटुंबपद्धती मोडकळीस आलेली दिसते. भारतीय खेड्यांच्यामधील संयुक्त कुटुंबपद्धती आता वेगाने कमी-कमी होत आहे. भारतातील मोठ्या शहरांच्यामध्ये देखील तीच अवस्था आहे. तरुण पिढी विवाहानंतर स्वतःचे वेगळे कुटुंब स्थापन करू लागल्याने, अशा नवविवाहितांना त्यांच्या कुटुंबात आई-वडिलांचा हस्तक्षेप आवडेनासा झाला आहे. ग्रामीण भागातील संयुक्त कुटुंबातील सदस्य नोकरी-व्यवसायासाठी शहरांकडे धाव घेत आहेत. शहरात अनेक सदनिका असणारी निवासी संकुले निर्माण होत आहेत. तेथे सदनिका घेण्यासाठी कर्जपुरवठा करणाऱ्या वित्तीय संस्था आहेत. शहरात रहाण्याची सोय झाल्यावर, आरंभी एकटी रहाणारी व्यक्ती स्वतःचे

स्वतंत्र कुटूंब तेथे निर्माण करते. संयुक्त कुटुंबांचे विभाजन होऊन विभक्त किंवा केंद्र कुटुंबे निर्माण होणे हा कुटुंबसंस्थेमधील रचनात्मक बदल आहे.

**३) कुटुंबातील महिलांच्या स्थानामध्ये झालेला बदल** (Change in the position of women in family) **:**

पारंपारिक संयुक्त कुटुंबपद्धतीमधल्या कुटुंबातील महिलांचे कार्य चार भिंतीच्या आत बंदिस्त होते. त्यांच्या कार्यांवर मर्यादा होत्या. आता मात्र, महिलांच्या शिक्षणामध्ये होत असलेली वाढ आणि केंद्रित कुटुंबाचे वाढते प्रमाण यामुळे कुटुंबातील महिलांचे सामाजिक स्थान कमालीचे बदललेले दिसते. आधुनिक केंद्रित कुटुंबातील पती आपल्या पत्नीला समानतेची वागणूक देतो. शिवाय तो आपल्या मुलीच्या शिक्षणाकडेही अधिक गांभीर्याने लक्ष देतो. कुटुंबातील पत्नीचे स्थान आता बदललेले असून तिचे शिक्षण आणि पात्रता विचारात घेऊन तिला कुटुंबामध्ये आदर आणि सन्मान मिळू लागला आहे. अनेक महानगरांच्यामध्ये माता महत्त्वाची भूमिका पार पाडत असताना दिसते. प्रामुख्याने ज्यावेळी पती नोकरी–व्यवसायामुळे कुटुंबात नसतो, त्यावेळी 'माता' महत्त्वाची भूमिका पार पाडते. कुटुंबाचे आर्थिक निर्णय, मुलांचे शिक्षण, आणि कुटुंबाशी संबंधित दैनंदिन घडामोडींची दखल ती स्वत:च घेत असते. पती–पत्नी आणि आई–वडील व मुले यांच्यातील संबंधांमध्ये फार मोठा गुणात्मक बदल घडून आलेला दिसतो.

**४) आधुनिक कुटुंबातील लोकतंत्रात्मक स्वरुप** (Democratic features in modern families)**:**

पारंपरिक आणि एकाधिकार तंत्रावर आधारित कुटुंबाच्या तुलनेत, आधुनिक कुटुंबे ही जास्त लोकतंत्रात्मक स्वरूपाची आहेत. जरी कुटुंबामध्ये वडील हा सत्तास्थानी असला तरी स्वत:चा मुलगा मोठा झाल्यानंतर कौटुंबिक बाबींच्यामध्ये त्याला आपले मत मांडण्याचे स्वातंत्र्य देतो. मातादेखील शिक्षित असल्यामुळे ती महत्त्वाची भूमिका पार पाडते. जर ती व्यावसायिक आणि रोजगारासाठी पात्र असेल तर कुटुंबाच्या उत्पन्नामध्ये भर घालण्यास ती मदत करते. त्यामुळे तिचा कुटुंबातील दर्जा उंचावण्यास मदत होते. पत्नी आणि पती संयुक्तपणे निर्णय घेत असतात. हे आधुनिक कुटुंबपद्धतीचे लोकतंत्रात्मक स्वरूप एक रचनात्मक वैशिष्ट्य आहे.

**५) कुटुंबाच्या पारंपारिक कार्यांमध्ये झालेली घट** (Reduction in Traditional functions of family)**:**

पुरातन काळात कुटूंब हे उत्पादन, वितरण आणि उदरनिर्वाहाचे केंद्र होते. परंतु आधुनिकीकरण आणि जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे कुटुंबरचनेमध्ये वेगाने बदल घडून येत आहेत. उद्योगांच्या उभारणीमुळे उत्पादनाचे कार्य कारखाने करीत आहेत. वर्तमानकालीन कुटूंब हे एकप्रकारचे 'उपभोक्ता केंद्र' आहे. एकेकाळी कुटुंबात वृद्ध आणि आजारी व्यक्तींची सेवा केली जात असे, आता मात्र कुटुंबाचे हे कार्य रुग्णालयांकडे गेले आहे किंवा वृद्धाश्रमाकडे सोपवले गेले आहे. एकेकाळी करमणूकीची गरज कुटुंबातच पूर्ण केली जाई. पारंपरिक गीतगाणे, आजीकडून कथा ऐकणे पारंपरिक खेळ खेळणे इ. सारख्या पारंपारिक करमणूकीच्या सुविधा होत्या. आता त्या सर्व भूतकाळात जमा झालेल्या आहेत. आधुनिक करमणूकीच्या

साधनांमध्ये सिनेमागृह, नाट्यगृह, दूरदर्शन, रेडिओ इ. करमणूकीची साधने निर्माण आहेत. त्यांनी पारंपरिक कुटुंबाच्या करमणूक कार्याची जागा घेतली आहे. सुरुवातीच्या काळातील लोकांच्या गरजा मर्यादित आणि साध्या स्वरुपाच्या होत्या. पारंपरिक व्यवसायाचे प्रशिक्षण देण्याचे कुटूंब हे एक केंद्रच होते. आता हे कार्य शिक्षणाच्या औपचारिक तांत्रिक संस्थांच्या माध्यमातून होत असते. कुटुंबाची इतरही काही पारंपरिक कार्ये, शासकीय आणि निमशासकीय संस्थांच्या माध्यमातून सुरू केलेल्या विविध योजनांच्यामुळे मागे पडली आहेत. उदा. विमा महामंडळ, विधवा महिलांसाठी पेन्शन, वृद्धाश्रमांची स्थापना, निराधार बालकांसाठी स्वयंसेवी संस्था, सेवानिवृत्त व्यक्तींच्यासाठी पेन्शन इ. योजनांमुळे पारंपारिक कुटुंबाची कार्ये मागे पडली आहेत. अशाप्रकारे जी अनेक कार्ये सुरूवातीच्या काळातील कुटुंबसंस्थेच्यामार्फत पार पाडली जात होती, ती सर्व कार्ये आता आधुनिक विशेषज्ञ अशा संस्थांच्या माध्यमातून केली जातात. असे असले तरी, अजूनही कुटूंबसंस्था एक महत्त्वाची संस्था आहे. व्यक्तीचे प्राथमिक समाजीकरण कुटुंबात घडून येत असते.

**क) धर्म**

**'धर्मा'ची व्याख्याआणि स्वरूपलक्षणे** (Definition and Characteristic Features of 'Religion') **:**

वेगवेगळ्या समाजशास्त्रज्ञांनी धर्माचे स्वरुप वेगवेगळ्या पद्धतीने जाणून घेतले आहे. धर्मासंबंधी असणारी विविध वैशिष्ट्ये अधोरेखित करीत असताना अभ्यासकांनी आपली वेगवेगळी मते स्पष्ट केली आहेत. सर्व समाजशास्त्रज्ञांना मान्य होईल अशा समाधानकारक स्वरुपाची व्याख्या अजूनही मांडता आलेली नाही. विद्वानांनी धर्माच्या अनेक व्याख्या केलेल्या आहेत. धर्म या संस्थेची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये जाणून घेण्यासाठी आपण धर्माच्या काही व्याख्या अभ्यासणार आहोत. त्या खालीलप्रमाणे :

**१) एमिल दुरखीम – ''ज्या पवित्र वस्तूना ऐहिक जीवनापासून वेगळे केले जाते आणि ऐहिक जीवनातून वर्ज्य मानले जाते त्या पवित्र वस्तूंशी निगडित असलेल्या श्रद्धा आणि विधींची एकात्म व्यवस्था म्हणजे धर्म होय''** (Religion is "a unified system of beliefs and practices relative to sacred things, that is to say, things set a part and forbidden" - Emil Durkheim)

**२) गिलिन आणि गिलिन – ''एक सामाजिक क्षेत्र म्हणून धर्माच्या क्षेत्रात, एखाद्या समूहात प्रचलित असणाऱ्या अतिनैसर्गिक शक्ती विषयीच्या भावनेने भारलेल्या श्रद्धा आणि त्या श्रद्धांशी संबंधित असलेले बाह्य वर्तनप्रकार, भौतिक वस्तू आणि प्रतीके इ. चा समावेश होतो.''** ("The social field of religion may be regarded as including emotionalized beliefs prevalent in a social group concerning the supernatural plus the overt behaviour, material objects and symbols associated with such beliefs." - Gillin and Gillin)

**३) ऑगबर्न आणि निमकॉफ – ''अतिमानवी शक्तीविषयी असणाऱ्या मानवी अभिवृत्ती म्हणजे धर्म होय.''** ("Religion is an attitude towards superhuman powers." - Ogburn and Nimkoff)

**४) मॅकायव्हर आणि पेज – ''धर्म या संज्ञेअंतर्गत केवळ व्यक्ती–व्यक्तींच्या मधील परस्परसंबंध अपेक्षित नसून त्यामध्ये व्यक्ती आणि एखादी श्रेष्ठ शक्ती यांच्यामधील संबंधही अभिप्रेत आहेत.''**

("Religion implies a relationship not merely between man and man but also between man and some higher power." - MacIver)

**५) जॉन्सन एच. एम. – ''वस्तू, शक्ती, स्थळे आणि इतर बाबीं यासंदर्भातील अलौकिक व्यवस्थेशी सबंधित श्रद्धा आणि विधींची कमी अधिक संघटित व्यवस्था म्हणजे धर्म होय''** ("Religinon is more or less coherent system of beliefs and practices concerning supernatural order of things, forces, places, or other entities" - Johnson H. M.)

**६) जेम्स जी. फ्रेझर – ''धर्म म्हणजे मानवापेक्षा श्रेष्ठ असणाऱ्या अशा शक्तींवरील श्रद्धा की ज्या शक्ती मानवी जीवनाला दिशा देऊन त्यावर नियंत्रण ठेवतात अशी लोकांची धारणा असते.''** (Religion is "a belief in powers superiour to man which are believed to direct and control and control the course of nature of human life" - J. G. Frazer)

**७) ग्रहर्ड लेन्स्की – ''ज्या नैसर्गिक शक्तींच्यामुळे अंतिमत: व्यक्तीचे नशिब अथवा दैव** (destiny) **घडविले जाते अशा नैसर्गिक शक्तीच्या स्वरूपाबाबत समूहातील लोकांमध्ये असणारी श्रद्धांची व्यवस्था व अशा श्रद्धांच्या अनुषंगाने समूहातील सदस्यांचे होणारे आचरण म्हणजे धर्म होय.''** ("A system of beliefs about the nature of force (s) ultimately shaping man's destiny, and the practice associated therewith, shared by the members of the group" - Gerhard Lenski)

**८) इ. बी. टॉयलर – ''आध्यात्मिक शक्तीवर असणारी श्रद्धा आणि अशा श्रद्धांशी संबंधित असलेल्या संस्था, विधी आणि आचरण म्हणजे धर्म होय.''** (Religion is "The belief in spiritual beings and the institutions and practices associated with these beliefs - E. B. Tylor)

वरील व्याख्यांच्या आधारे आपण धर्माची काही स्वरूप-लक्षणे (Characteristic features) जाणून घेऊ शकतो. 'धर्म' म्हणजे काय हे अधिक तपशीलाने स्पष्ट होण्यासाठी आपण आता धर्माच्या स्वरुप लक्षणांचे अध्ययन करूया .

**१) धर्मामध्ये श्रद्धांची सुसंगत व्यवस्था असते** (Religion consists of a coherent system of beliefs)**:**

धर्माच्या या वैशिष्ट्याचा संदर्भ वर निर्देशित केलेल्या सर्व व्याख्यांमध्ये आलेला आहे. कोणत्याही धर्मात, त्या धर्मातील विविध बाबींशी संबंधित असलेल्या श्रद्धांचा एक संच असतो. अशा श्रद्धांच्या मध्ये, अलौकिक शक्तीचे अस्तित्व, मानवी जीवनातील वस्तूंना प्रभावित करण्याची अलौकिक शक्तीकडे असणारी क्षमता, धर्मासंबंधीची तत्त्वे, धर्माशी संबंधित असणारे संकेत, पवित्र वस्तू, धार्मिक ग्रंथ, विशिष्ट धार्मिक ठिकाणे, मृत्यूनंतरचे विश्व, इ. बाबतच्या श्रद्धांचा समावेश होतो. या सर्व श्रद्धा स्वतंत्रपणे किंवा सुट्या सुट्या अस्तित्वात नसतात तर त्या अर्थपूर्णरित्या परस्परांशी संबंधित असतात. त्यांची एक सुसंगत अशी व्यवस्था निर्माण झालेली असते. धर्मव्यवस्थेअंतर्गत असणाऱ्या अशा श्रद्धा भावनेने भारलेल्या

(emotionally charged) असतात. त्यामुळेच अशा श्रद्धांशी सुसंगत विधी आणि वर्तनप्रकार यांचे तंतोतंत पालन करण्याकडे धर्मश्रद्ध लोकांचा कल असतो.

**२) संस्कार, विधी आणि आचरणाचा संच धर्मामध्ये असतो** (Religion consists of a set of practices; rites and rituals) **:**

ज्या अलौकिक शक्तीमुळे मानवी जीवन आणि विश्वातील घटना प्रभावित होत असतात अशी श्रद्धा असते, त्या अलौकिक शक्तीला प्रसन्न करून घेण्यासंबंधीचे विशिष्ट मार्ग बहुतेक सर्व धर्मांच्यामध्ये स्पष्ट केलेले असतात. त्यामध्ये प्रामुख्याने विशिष्ट स्वरुपाचे धार्मिक विधी, पूजा-अर्चा करण्याच्या पद्धती, धार्मिक तीर्थयात्रांना जाणे किंवा समाजसेवेसाठी दान करणे इ. चा समावेश होतो. अशा स्वरूपाच्या कृती मंदिरामध्ये पुजाऱ्यांच्या साह्याने, तर चर्चमध्ये धर्मगुरुंच्या मदतीने केल्या जातात.

**३) धर्मात श्रद्धाळू व्यक्तींचा समूह अभिप्रेत असतो** (Religion implies a group of believers)**:**

अतिनैसर्गिक आणि अलौकिक शक्तींवरील श्रद्धा विशिष्ट धार्मिक समाजातील सर्व सदस्यांमध्ये असतात. कोणत्याही धर्माला जर अनुयायी नसतील तर त्या धर्माचे अस्तित्व टिकून राहणे शक्य नाही. यासंबंधी समाजशास्त्रज्ञ दुरखीम यांनी धर्माचे एक प्रभेदक वैशिष्ट्य स्पष्ट करताना असे म्हटले आहे की, धर्म ही एक अशी संस्था आहे की ज्यात धर्माच्या अनुयायांचे संघटन झालेले असते. उदा. ज्या व्यक्ती ख्रिश्चन धर्मावर श्रद्धा ठेवणाऱ्या असतात त्यांचे संघटन म्हणजे 'चर्च' होय.

**४) धर्मात 'पवित्र' आणि 'ऐहिक' वस्तूंमधील भेदांबाबतच्या कल्पना असतात** (Religion concerns the idea of sacred and profane) **:**

दुरखीम यांच्या मते, पवित्र (sacred) आणि ऐहिक (profane) वस्तूंमध्ये केला जाणारा भेद हे सर्व धर्मांचे एक सार्वत्रिक स्वरुपाचे वैशिष्ट्य आहे. एखादा धर्म 'ईश्वर' या संकल्पनेशिवाय अस्तित्वात येऊ शकतो. (उदा. बौद्ध धर्म) परंतु, प्रत्येक धर्मामध्ये 'पवित्र' आणि 'ऐहिक' वस्तूंच्यामध्ये भेद हा केलेलाच असतो. 'पवित्र' मानल्या जाणाऱ्या वस्तूंना मौल्यवान समजून त्यांना अधिक महत्त्व दिले जाते. अशा वस्तूंकडे केवळ उपयुक्ततावादी (Utilitarian) दृष्टिकोनातून पाहिले जात नाही. दैनंदिन व्यावहारिक जीवनापासून त्यांना अलग ठेवले जाते. त्यांची पूजा केली जाते व त्या 'पवित्र' वस्तूंविषयी व्यक्तींच्या मनात आदरयुक्त भिती असते. अशा पवित्र वस्तूत प्रत्यक्ष अलौकिक शक्ती, अलौकिक शक्तींची प्रतिमा, धर्मासंबंधी असणारे चिन्ह, धार्मिक ग्रंथ, पवित्र ठिकाणे इ. चा समावेश होतो. अशा पवित्र वस्तूसंबंधी असणाऱ्या श्रद्धांची संघटित व्यवस्था म्हणजेच धर्म होय. पवित्र मानल्या गेलेल्या वस्तूंव्यतिरिक्त धर्मबाह्य विश्वातील सर्व वस्तू ऐहिक (profane) किंवा पवित्रेतर ठरतात. अशा वस्तूंकडे उपयुक्ततावादी दृष्टिकोनातून पाहिले जाऊ शकते.

**५) धर्म पवित्र ग्रंथ आणि तत्वज्ञानाशी संबंधित असतो** (Religion concerns a set of sacred books and philosophy) **:**

प्रमुख धर्मांचे काही धार्मिक ग्रंथ आहेत, त्यामध्ये बायबल, भगवतगीता, कुराण, महाभारत, रामायण यासारखी महाकाव्ये, वेद उपनिषदे यासारख्या पवित्र ग्रंथाचा समावेश होतो. प्रत्येक धर्माचे वैशिष्ट्य पूर्ण अशा स्वरूपाचे तत्त्वज्ञान देखील आढळते. अशा तत्त्वज्ञानामध्ये प्रत्येक धर्माचा विश्वाकडे पाहण्याचा एक वैशिष्ट्यपूर्ण दृष्टीकोन तयार झालेला असतो की ज्यामध्ये मानवी जीवनातील भूतकालीन, वर्तमानकालीन व भविष्यकालीन घटनांचाही समावेश होतो.

**६) सर्व धर्मांमध्ये अनुयायांसाठी आचारसंहिता स्पष्ट केलेली असते** (All religions prescribe a code of conduct for followers) **:**

समाजात व्यक्तीने योग्य मार्गाने जीवन जगण्यासंबंधीचा उपदेश सर्व धर्मांमध्ये समाविष्ट असतो. बहुतेक सर्व धर्म हे त्या त्या धर्मातील विशिष्ट अशा वैश्विक दृष्टीकोनावर आणि धार्मिक श्रद्धांच्यावर आधारित असे मार्गदर्शन करीत असतात. समाजातील व्यक्तींनी परस्परांशी कशा स्वरूपाचे वर्तन करावे या विषयीचे हे मार्गदर्शन असते. धार्मिक श्रद्धांच्या माध्यमातून देखील मानवी वर्तनाचे स्वरूप निश्चित होत असते. नैतिकदृष्ट्या कोणते वर्तन योग्य व कोणते अयोग्य, कोणते चांगले व कोणते वाईट या संबंधीची शिकवण धार्मिक श्रद्धांमधून मिळते. उदा. ख्रिश्चन धर्मीयांच्यामध्ये 'दहा ईश्वरी आज्ञां'मुळे (Ten commandments) व्यभिचार, हत्या, अप्रामाणिकता इ. सारख्या सामाजिक वर्तन प्रकारांवर किंवा आचरणावर प्रतिबंध घातला जातो.

थोडक्यात, अब्राहम यांनी नमूद केल्याप्रमाणे, धर्मामध्ये खालील घटक समाविष्ट असतात, (१) ईश्वर, टोटेम किंवा धार्मिक चिन्ह, अलौकिक शक्ती, ईश्वर शक्ती किंवा मूळशक्ती इ. सारख्या पवित्र शक्तींच्या श्रद्धेची व्यक्ती आणि समूहावरील पकड, (२) धार्मिक चिन्हे किंवा प्रतीके (उदा. त्रिशूल, क्रूस, इ.), (३) धर्माच्या अनुयायांच्या सामाजिक स्वरुपाच्या यंत्रणांचे जाळे (धर्मगुरु, पुजारी, मंदिरे, चर्च, पवित्र धार्मिक स्थळे, मठ इ.) (४) नैतिक तत्त्वज्ञान, (५) पवित्र धार्मिक ग्रंथामध्ये समाविष्ट असणारी धार्मिक तत्त्वे, श्रद्धा आणि मानवी वर्तनासंबंधीची आचारसंहिता, (६) विविध धार्मिक विधीची व्यवस्था की ज्यामध्ये सण, समारंभ, प्रार्थना, मेजवानी, त्यागवृत्ती, उपवास इ. चा समावेश होतो, (७) धर्माची सांस्कृतिक अभिव्यक्ती की ज्यामध्ये नृत्य, गायन, प्रार्थना आराधना मिरवणूक इ. चा समावेश असतो, (८) एकत्रितपणे होणाऱ्या धार्मिक कृती (उदा. धर्मसभा, परस्परात होणारा धार्मिक विचार-विनिमय, संघटितपणे होणारे धार्मिक विधी इ. चा समावेश होतो.)

**धर्माची कार्ये** (Functions of Religion) **:**

धर्माची व्याख्या आणि धर्माची वैशिष्ट्ये किंवा स्वरूप-लक्षणे पाहिल्यावर आता आपण धर्मसंस्थेच्या कार्यांचे अध्ययन करणार आहोत. समाजामध्ये धर्म महत्त्वाची भूमिका किंवा कार्ये पार पाडीत असतो. आदिम समाज व्यवस्थेपासून ते आधुनिक प्रगत समाजापर्यंत धर्माचे टिकून असणारे अस्तित्व आणि सातत्य हा त्यासंबंधीचा पुरावाच आहे. समाजशास्त्राचे जनक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ऑगस्त कॉम्त आणि

एमिल दुरखीम यांची अशी ठाम भूमिका होती की, समाजामध्ये धर्मसंस्था ही महत्त्वाची भूमिका पार पाडीत असते. धर्माची काही महत्त्वाची कार्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.

**१) धर्मामुळे सामाजिक ऐक्य आणि समूह सदस्यांमधील परस्पर आकर्षणाला बळकटी येते** (Religion strengthens social solidarity and group cohesion) **:**

एखाद्या धर्माशी संबंधित असणाऱ्या सर्व अनुयायांच्या एकाच परमेश्वरा संबंधी असणाऱ्या श्रद्धांच्यामुळे त्या अनुयायांना एकत्रितपणे ठेवण्यामध्ये धर्मसंस्थेला नेहमी यश येते. समान धार्मिक श्रद्धांमुळे लोक परस्परांशी बांधले जातात, ते एक होतात. त्यामुळे समूहातील सामाजिक ऐक्यास बळकटी येते. समूह भावना टिकवणे, समूहाचे ऐक्य आणि सामाजिक ऐक्यामध्ये वाढ करणे ही धर्माची सामाजिक कार्ये असतात असे एमिल दुरखीम यांनी नमूद केले आहे. त्यांच्या मते, धर्माशी संबंधित असणाऱ्या समान स्वरूपाच्या श्रद्धा, धार्मिक सण-समारंभ, विधी आणि संस्कार इ. च्या मुळे ऐक्य टिकवून ठेवणे शक्य होते. ए. डब्ल्यू. ग्रीन यांच्या मते, ''धर्म म्हणजे मानवी समाजात ऐक्य प्रस्थापित करणारी सर्वश्रेष्ठ शक्ती आहे.'' पूजा-पाठ करण्यामधील समानता, समान श्रद्धा, आणि समान स्वरूपाच्या धर्मभावनेमुळे धर्म व्यक्तींच्या मध्ये ऐक्य निर्माण करतो. धर्म समाजातील व्यक्तीना परस्परांशी जोडणारी एक शक्ती असते. अशाप्रकारे समूहातील व्यक्तींना एकत्रित ठेवण्याचे कार्य धर्मसंस्था करीत असते. लोकांनी वारंवार एकत्र यावे यावर जगातील अनेक धर्म भर देतात. उदा. रविवारी सकाळी ख्रिश्चन बांधव एकत्रितपणे चर्चकडे जातात तर मुस्लिम बांधव विशेषत: शुक्रवारी नमाजासाठी एकत्र येतात. अशा वारंवार एकत्र येण्यामुळे धर्माच्या अनुयायांमध्ये सामाजिक ऐक्यभावाची निर्मिती होते.

**२) धर्मामुळे समाजातल्या नैतिक व्यवस्थेला बळकटी प्राप्त होते** (Religion strengthens the moral order of the society) **:**

प्रत्येक धर्मामध्ये योग्य-अयोग्य वर्तनासंबंधीचे नियम स्पष्टपणे घालून दिलेले असतात. नैतिक आचरणाविरुद्ध अथवा योग्य वर्तना विरुद्ध होणाऱ्या कोणत्याही नियमबाह्य वर्तनाला समाजाकडून विरोध केला जातो. कारण सर्व नैतिक मार्गदर्शक तत्त्वांना धर्माची मान्यता आणि पाठबळ असते. जी व्यक्ती धर्माने निश्चित केलेल्या नैतिक मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करते अशा व्यक्तीला समाजमान्यता मिळते.

**३) धर्म विचलनात्मक वर्तनावर नियंत्रण ठेवण्यास मदत करतो** (Religion helps to control social deviance) **:**

धर्म एक सामाजिक नियंत्रणाचे अनौपचारिक साधन आहे. प्रत्येक व्यक्ती त्याच्या अथवा तिच्या बालपणातील समाजीकरणाद्वारे अनेक प्रकारच्या धार्मिक श्रद्धा आणि विधी शिकलेली असते. अशा धार्मिक श्रद्धांचे व्यक्तीकडून आंतरीकरण झालेले असते. त्यामुळे त्या व्यक्तींच्या व्यक्तिमत्वाचा एक भाग बनून गेलेल्या असतात. अशा प्रकारे आंतरीकरण झालेल्या धार्मिक श्रद्धांच्यामुळे व्यक्तींच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य व्यक्तीच्या 'आतूनच' होत असते. उदा. हिंदू धर्मातील मोक्ष, पाप-पुण्य, स्वर्ग-नरक, पुर्नजन्म इ. सारख्या श्रद्धांच्यामुळे व्यक्तीचे वर्तन प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे नियंत्रित होते. जो कोणी धर्माने घालून

दिलेल्या नैतिक मार्गदर्शक तत्त्वाचे उल्लंघन करतो, त्याला 'ईश्वर' किंवा अलौकिक शक्तीकडून शिक्षा मिळते, अशी व्यक्तींची धारणा असते. ईश्वरशक्तीच्या कोपासंबंधी व्यक्तीच्या मनात जी भीती असते त्यामुळे ती धर्माने योग्य मानलेले वर्तन करीत असते. धर्माने अयोग्य मानलेले वर्तन करण्याचे व्यक्ती टाळते. अशाप्रकारे धर्म विचलनात्मक वर्तनावर नियंत्रण ठेवण्यास मदत करतो.

४) **धर्मामुळे मन:शांती मिळते** (Religion provides peace of mind) **:**

मानवी जीवन, चिंता, काळजी, भीती, अडचणी इ. सारख्या क्लेशकारक अनुभवानी भरलेले असते. व्यक्तीला तिच्या स्वत:च्या जीवनात अशा असंख्य घटनांच्यामुळे दु:खदायक आणि कटू प्रसंग येत असतात. कारण मुळातच मानवी जीवनात निश्चिततेपेक्षा अनिश्चतता अधिक असते. कुटुंबियांच्या आणि मित्रांच्याकडून जरी व्यक्तीला कठीणप्रसंगी थोडीफार सहानुभूती आणि दिलासा मिळत असला तरी, तो कायम मिळतोच असे नाही. मानसिक ताण-तणावाच्या प्रसंगी व्यक्तीच्या जीवनातील दु:ख आणि क्लेश कमी करण्याचे कार्य धर्म करीत असतो. ईश्वराची प्रार्थना केल्यामुळे आपल्या सर्व चिंता कमी होतात अशी व्यक्तींची धारणा असते. आपल्या अशा श्रद्धा आणि समजूती असतात की, ईश्वर हा सर्वत्र सामावलेला असून तो आपल्या सर्व कृतींचे निरीक्षण करीत असतो. त्यामुळे आपण केलेली प्रार्थना ऐकून तो आपल्याला कठीण प्रसंगामध्ये मदत करेल, अशी भावना व्यक्तीमध्ये निर्माण होते. त्यामुळे तिचे मनोबल वाढविण्यास धर्म एकप्रकारे मदत करतो. अशाप्रकारे व्यक्तीच्या जीवनात वारंवार निर्माण होणाऱ्या चिंता आणि काळजी यांच्यापासून व्यक्तीला तात्पुरते का होईना मानसिक स्वास्थ्य देण्याचे कार्य धर्म करीत असतो. पूजा केल्यावर मंदिरात जाऊन आल्यावर धर्मश्रद्ध व्यक्तीला मानसिक समाधानाचा अनुभव येतो.

५) **धर्मामुळे समाजजीवनातील मूल्यांना बळकटी येते** (Religion strengthens the values in social life) **:**

ज्या मूल्यांच्यामुळे समूहजीवनाला चालना मिळते, अशा मूल्यांचे जतन आणि संरक्षण करण्याचे धर्म हे एक प्रभावी साधन आहे. सामाजिक, नैतिक आणि आध्यात्मिक मूल्यांना धर्माचा नेहमीच आधार मिळत असतो. धार्मिक मूल्यांचा व्यक्ती-वर्तनावर जबरदस्त प्रभाव पडतो. कुटूंब, चर्च, धर्मगुरु, धार्मिक नेता इ. माध्यमापासून धर्म व्यक्ती वर्तनावर प्रभाव पाडीत असतो. धर्म प्रौढ व्यक्तीना मार्गदर्शन करतो त्याप्रमाणेच समाजीकरणाच्या प्रक्रियेद्वारे मुलांच्यामध्ये चांगली मूल्ये विकसित करण्याचे कार्य करीत असतो. धर्मामुळे व्यक्तिगत हितापेक्षा समूहाच्या ध्येयांना अधिक महत्त्व देण्याची वृत्ती जोपासली जाते. व्यक्तीच्या अंगी त्यागी वृत्ती निर्माण करण्यास देखील चालना मिळत असते.

६) **धर्मामुळे वैशिष्ट्यपूर्ण अशा मानसिक आणि भावनिक घटनांचा अनुभव येतो** (Religion provides unique psychological and emotional experiences) **:**

धर्माचे हे एक मूलभूत कार्य आहे. प्रार्थना, पूजापाठ करणे, उपवास, ध्यानधारणा, समाधीस्थ होणे इ. या काही धार्मिक कृती आहेत. ज्यावेळी व्यक्ती मनापासून परमेश्वराची प्रार्थना करीत असते. अनेकांना तर परमेश्वराची पूजा-अर्चा आणि ध्यानधारणा केल्यामुळे वैशिष्ट्यपूर्ण अशा स्वरूपाचे व्यक्तिगत अनुभव

येतात. अशा अनुभवांच्या आधारेच व्यक्ती केवळ परमेश्वराचाच आदर आणि सन्मान करीत नसते तर समाजात इतरांशी वर्तन करताना देखील ती त्याच पद्धतीने वागत असते. व्यक्तीचे व्यक्तीगत जीवन अधिक अर्थपूर्ण करण्याच्या दृष्टीने धर्म महत्त्वाची भूमिका पार पाडतो.

७) **धर्म समाजकल्याणाला चालना देतो** (Religion promotes social welfare) **:**

धार्मिक संघटनांकडून समाजातील व्यक्तींच्यासाठी सेवा पुरविल्या जातात आणि त्यामुळे समाजकल्याणाला चालना मिळत असते. परस्परांशी दया, सहानुभूती, सेवाभावी वृत्ती, करूणा आणि सहकार्य वृत्तीने वागण्याचे आवाहन धर्म करीत असतो. धर्म व्यक्तीच्या ठिकाणी असणाऱ्या मानवहितवादी वृत्तींना चालना देण्याचा प्रयत्न करतो. समाजातील गरीब, आजारी, कंगाल, विकलांग, दयनीय अवस्थेत असणाऱ्या आणि निराधार व्यक्तींना मदत करण्याचे आणि त्यांची काळजी घेण्याची शिकवण धर्म देत असतो. काही धर्म अशा व्यक्तींची सेवा करण्यामध्ये समाधान मानतात. यासंदर्भात आपणाला मदर तेरेसा आणि त्यांच्या सेवाभावी संस्थेत काम करणाऱ्या इतर महिलांची केलेल्या कार्याची आठवण येईल. त्यांनी रस्त्यावरील गरीब, रुग्ण व्यक्तींना जवळ करून त्यांची सेवा-सुश्रुषा केली आणि त्यांना चांगले आरोग्य दिले. अशाच पद्धतीने इतर सर्व धर्मातील धार्मिक संघटना सामाजिक, शैक्षणिक आणि लोकहिताच्या दृष्टीने कार्यरत असलेल्या दिसतात.

८) **धर्मामुळे करमणूक होत असते** (Religion Provides Recreation) **:**

व्यक्तीसाठी करमणूकीचे साधन म्हणून देखील धर्म महत्त्वाचे कार्य पार पाडीत असतो. पुराणातील देव-देवतांच्या कथा ऐकणे वा इतरांना सांगणे, किर्तन, नाटक, भक्तीगीत गायन, धार्मिक सण, उत्सव, जत्रा इ. सारख्या बाबीनी व्यक्तींचे मनोरंजन होत असते. घरातील वयोवृद्ध स्त्री-पुरुष जवळच्या देवालयामध्ये कीर्तन ऐकण्यासाठी जातात त्यावेळी त्यांचे एकप्रकारे समाजीकरण होऊन त्यांच्या धार्मिक गरजांची पूर्तता होत असते. घरातील लहान मुले आजी-आजोबांभोवती दंतकथेतील नायकांच्या कथा ऐकण्यासाठी गोळा होतात. अशाप्रकारे धर्म हे एक करमणूकीचे साधन देखील आहे.

९) **धर्म वाङ्मय, कला, सौंदर्यदृष्टी इ. ना चालना देतो** (Religion promotes art, literature, and aesthetic activities) **:**

विविध देवदेवता, दंतकथेतील नायक आणि संत महात्मे यांच्या जीवनावर आधारीत अनेक नृत्य नाट्य प्रकार समाजात असतात. नृत्य, नाट्य यासारख्या कलांना आणि भक्तीसंगीत कलेला चालना देण्याचे कार्य धर्म करतो. पवित्र ग्रंथाशी संबंधित असणारे लिखाण, पुस्तक लेखन किंवा तात्विक स्वरुपातील लिखाणाला प्रोत्साहन देण्याचे कार्य धर्म करतो. ऐतिहासिक काळातील जी मंदिरे, चर्च, मशिदी, गुरुद्वारा, स्तूप ज्या वास्तूशास्त्राच्या आधारे उभारली गेली त्या वास्तूशास्त्राचा प्रमुख आधार धर्म होता. या सर्व पवित्र वास्तूंचे रंगकाम, मूर्तीकाम अत्यंत आकर्षक अशा स्वरूपाचे आहे. अशाप्रकारे वाङ्मय, कला, वास्तूशास्त्र, संगीत, नृत्य, नाट्य या कलांच्या विकासाला धर्मामुळे चालना मिळते.

**धर्माची अप–कार्ये** (Dysfunctions of Religion) **:**

धर्म ही समाजातील अत्यंत महत्त्वाची अशी एक संस्था आहे. धर्मसंस्थेकडून समाजहिताच्या दृष्टीने अनेक प्रकारची सकारात्मक कार्ये पार पाडली जातात याविषयी कुणाचेच दुमत असण्याचे कारण नाही. परंतू अनेकवेळा समाजातील व्यक्तींच्याकडून धर्मसंस्थेचा दुरुपयोग देखील होत असतो. उदा. धर्मामुळे एका समूहातील लोकांना एकत्र आणून त्यांच्यात ऐक्य निर्माण करण्याचे कार्य एका बाजूला केले जाते. पण दुसऱ्या बाजूला याच एकत्र आलेल्या व्यक्ती दुसऱ्या एखाद्या धर्माच्या समुदायातील व्यक्तींना इजा पोहचविण्याचा प्रयत्न करतानाही दिसतात. या अर्थाने वेगवेगळ्या धार्मिक समुदायातील व्यक्तींना परस्परांशी संघर्ष आणि कलह करण्यासाठी धर्म कारणीभूत ठरत असतो धर्मामुळे समाजातील व्यक्तींच्यामध्ये स्वसमूहश्रेष्ठत्ववादाची भावना आणि धर्मांधता विकसित झाली तर, समाजामध्ये असणाऱ्या विविध धार्मिक समुदायांच्या मधील शांती आणि सलोख्याच्या संबंधाना बाधा निर्माण होऊन सामाजिक संतुलन धोक्यात येते. तुम्ही दूरदर्शनच्या बातम्यांमध्ये वारंवार हे पाहिलेच असेल की, धर्माच्या नावाखाली निष्पाप, निरागस आणि चांगल्या व्यक्तींना अनेकदा लक्ष्य बनवले जाते. आता, आपण धर्मजन्य अशा समाजावरील काही नकारात्मक परिणामांचा विचार करुया.

१) **मार्क्सवादी दृष्टीकोन** (The Marxist View) **:**

कार्ल मार्क्स हा एक असा समाजशास्त्रज्ञ होता, की ज्याने धर्मासंबंधीच्या नकारात्मक कार्यांची मांडणी केली होती. त्यांच्या मते, धर्म म्हणजे 'सर्वसामान्य व्यक्तींसाठी अफूची गोळी' (opium of the masses) आहे की जी त्यांची चौकसबुद्धी बोथट करते आणि त्याना कायमस्वरूपी अवनत रहाणीमानामध्ये रहाण्यास भाग पाडते. मार्क्स यांनी असेही म्हटले आहे की, समाजातील आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या सबळ असणाऱ्या वर्गातील व्यक्तींच्या हातामध्ये असणारे धर्म हे एक असे साधन आहे की, ज्याचा उपयोग ते समाजातील खालच्या स्तरातील वर्गांच्या व्यक्तींना कायमस्वरूपी हालाखीच्या परिस्थितीमध्ये ठेवण्यासाठी करतात. मार्क्स यांनी धर्मसंस्थेवर टीका करून साम्यवादी व्यवस्थेमध्ये धर्मसंस्थेला महत्त्व असणार नाही असे प्रतिपादन केले. धर्मामुळे समाजात अन्याय आणि असमानता यांचे समर्थन केले जाते, समाजातील श्रीमंत वर्गाच्या हाती असणारे धर्म हे एक पिळवणूकीचे साधन आहे, असेही मार्क्सचे मत होते. समाजातील दुर्बल घटकांची दयनीय परिस्थिती आणि त्यांच्यावर होणारा जुलूम यासंबंधीची जाणीव धर्मामुळे दुर्बल घटकांना होऊ दिली जात नाही. त्यामुळे समाजातील वर्चस्व असणाऱ्या वर्गाची सत्ता उलथून टाकण्यासाठी क्रांती करण्याच्या मार्गापासून दुर्बल वर्गातील लोकांना धर्म अलग ठेवण्याचा प्रयत्न करतो, अशीही कार्ल मार्क्स यांची धारणा होती.

२) **धर्मामुळे धर्मांधतेला आणि सनातनवादी (मूलतत्त्ववादी) वृत्तीला चालना मिळू शकते** (Religion may promote fanaticism and fundamentalism) **:**

धर्मसंस्थेला प्रमाणापेक्षा अधिक महत्त्व दिले गेल्यास, समाजातील व्यक्तींच्या मधील स्वसमूहश्रेष्ठत्ववादाला (ethnocentrism) चालना मिळून धर्मांधता वाढू शकते. धर्माच्या नावाखाली

अनेक प्रकारची दहशतवादी कृत्ये आणि हिंसा करण्याचे प्रकार कसे घडतात हे आपण वृत्तपत्रांच्यामध्ये वाचले असेल किंवा दूरदर्शनच्या विविध वाहिन्यांच्या बातम्यांमध्ये अलीकडच्या काही दशकात पाहिले असेल. काही राज्यकर्त्यांनी एखाद्या युद्धात यश मिळाल्यावर त्या ठिकाणच्या पवित्र मंदिरांची नासधूस केल्याच्या घटना इतिहासात नोंद झालेल्या आहेत. म्हणजेच धर्मामुळे अप्रत्यक्षपणे व्यक्तीच्या असहनशक्तीला चालनाच मिळाल्याचे दिसते. म्हणजेच धार्मिक श्रद्धांचा अतिरेक व्यक्तीला संकुचित वृत्तीचा बनवतो आणि तिच्यामध्ये अशी भावना निर्माण करतो की, केवळ आपला स्वत:चाच धर्म श्रेष्ठ असून, इतर धर्मांना महत्त्व नाही. हीच परिस्थिती भिन्न-भिन्न धार्मिक समुदायातील व्यक्तींच्या मध्ये द्वेष निर्माण करण्यास कारणीभूत ठरते. या सर्व घटना धार्मिक असहिष्णुततेतून आणि धर्मांध प्रवृत्तीतून निर्माण होतात.

**३) धार्मिक श्रद्धा स्वतंत्र तार्किक विचार आणि सामाजिक प्रगतीमधील अडथळा बनू शकतात** (Religious beliefs may hinder independent rational thinking and social progress)**:**

धार्मिक श्रद्धांचा पगडा असणारी व्यक्ती स्वतंत्र, तार्किकदृष्ट्या सुसंगत असा विचार करण्यास कमी पडते. धर्मात सांगितलेले चुकीचे असूच शकत नाही. अशी तिची धारणा बनते. एखाद्या धर्माशी संबंधित चालत आलेल्या परंपरागत श्रद्धांना रुढी-परंपरांना किंवा धार्मिक विधींना अधिक चौकसबुद्धीने जाणून घेण्याचा किंवा त्या विषयी चिकित्सक वृत्तीने पाहण्याचा प्रयत्न किंवा श्रद्धांचा खरेखोटेपणा तपासण्याचा प्रयत्न म्हणजे त्या धर्माविरुद्ध जाणे किंवा पाप करणे असे धर्मश्रद्ध व्यक्तीकडून समजले जाते. म्हणजे धार्मिक श्रद्धांमुळे चौकसबुद्धी, तर्कबुद्धीच्या वापराला मर्यादा येतात. वैज्ञानिक प्रगतीच्या मार्गातील धर्म हा एक महत्त्वाचा अडथळा ठरल्याची उदाहरणे आहेत. ज्या वैज्ञानिकांनी पवित्र धर्मग्रंथातील आशयाविरुद्ध जाऊन आपले वैज्ञानिक शोध लावले, त्यापैकी काहीना तुरुंगवासाची शिक्षा दिली गेली तर काहीना जिवंत जाळण्यात आले. ख्रिश्चन धर्मामध्ये विज्ञान किंवा शास्त्र हे धर्माच्या अस्तित्वासाठीचा मोठा अडथळा समजला जात असे. धर्माशी संबंधित असणाऱ्या परंपरागत श्रद्धा बदलण्यास किंवा त्यांचा त्याग करण्यास व्यक्ती सहजासहजी तयार नसत. धर्म हा मूलत:च स्थितीवादी प्रवृत्तीचा समजला जातो. अंधश्रध्देला धर्माचा मिळणारा आधार समाजासाठी अनेकदा हानीकारक ठरतो. उदा. 'मुले ही देवाघरची भेट' म्हणून कुटूंब नियोजनच्या कृतीला पाप समजले जाते.

**४) धर्म दैववादाला आणि पलायनवादाला चालना देतो** (Religion Promotes fatalism and escapism) :

'नशिबा'संबंधीच्या किंवा 'विधीलिखीत असण्यासंबंधीच्या' अंधश्रद्धाना धर्मामुळे चालना मिळते. त्यामुळे व्यक्ती तिच्या अंगी असणारे सामर्थ्य आणि गुण यांच्याकडे दुर्लक्ष करते. आपल्या नशिबाचा भाग म्हणून व्यक्ती तिच्यावर झालेले अन्याय, शोषण, सामाजिक पिळवणूक निमूटपणे सहन करीत असते. तिची अशी ठाम श्रद्धा असते की, या सर्व घटना म्हणजे मागील जन्मी केलेल्या पापाची परमेश्वरांनी दिलेली एक प्रकारची शिक्षा आहे. अशा स्वरुपाच्या वृत्तीमुळे व्यक्ती महत्त्वाकांक्षी रहात नाहीत. त्या अधिकच दैववादीवृत्तीच्या बनत जातात. मॅक्स वेबर यांनी भारत, इटली, स्पेन या देशातील हिंदू आणि कॅथॉलिक धर्मीयांच्या अभ्यासातून असा निष्कर्ष काढला होता की, या धर्मांच्या अनुयायांमध्ये प्रमाणापेक्षा अधिकची

संपत्ती अथवा पैसा कमविणे हे पाप आहे अशी श्रद्धा होती. त्यामुळे हे देश आर्थिकदृष्ट्या मागासलेले दिसून येतात. कारण या देशातील धार्मिकतेचा परिणाम म्हणून या ठिकाणचा व्यापार, उद्योग आणि आर्थिक प्रगती इतर देशांच्या तुनलेत सापेक्षत: कमी प्रमाणात असलेली दिसून येते.

५) **धर्म विविध सामाजिक अप-प्रवृत्तींना चालना देऊ शकतो** (Religion may promotes several social evils) :

धर्माच्या नावांखाली समाजामध्ये अनेक वाईट रुढी परंपरा निर्माण केल्या जातात. देवदासीची प्रथा, वेश्या व्यवसाय, विधवांना दिली जाणारी वागणूक, गुलामगिरी, अस्पृश्यता, वांशिक भेद, सती प्रथा इ. सारख्या, सामाजिक अप-प्रवृत्तींना धर्मामुळे चालना मिळालेली दिसते. वरीलपैकी अनेक सामाजिक अप-प्रवृत्तींना धर्माचा आधार असलेला दिसतो. अशा अप-प्रवृत्तीना समाजातून कायमचे नष्ट करण्याचा प्रयत्न समाजसुधारकांकडून झाला. भारतामध्ये, धर्माच्या नावांखाली चालत आलेल्या अशा अप-प्रवृत्ती नष्ट करण्याचे कार्य बसवेश्वर, राजा राममोहन रॉय, न्यायमूर्ती रानडे, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छ. शाहू महाराज या सारख्या अनेक समाजसुधारकांनी आणि क्रांतीकारक विचारवंतानी केले आहे.

६) **धर्मामुळे पैशाची उधळपट्टी होऊ शकते** (Religion promotes liberal spending) :

काही विशिष्ट बाबींसाठी पैसा खर्च करण्याच्या बाबतीमध्ये अनेकदा धर्माचे धोरण शिथिल असते. ऐतिहासिक कालखंडात, लोकांच्याकडून कर स्वरुपात जमा केलेला पैसा, हा मंदिरे, चर्च, मशिदी सारख्या पवित्र इमारतीच्या बांधकामासाठी खर्च केला जात असे. तसेच अशा बांधकामासाठी कामगार म्हणून गुलामांना घेतले जात असे. एका बाजूला अशा भव्य-दिव्य वास्तूंच्या उभारणीवर मोठ्या प्रमाणात खर्च करताना सामाजिक विकास आणि व्यक्तींच्या महत्त्वाच्या असणाऱ्या मूलभूत गरजांकडे मात्र दुर्लक्ष केले जात होते. आज सुद्धा व्यक्तिगत आणि सामाजिक स्तरावर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करत असताना त्यावर मोठ्या प्रमाणात आर्थिक खर्च केला जात असताना दिसतो.

७) **धर्मामुळे संघर्षाला चालना मिळू शकते** (Religion may lead to conflicts) :

जर आपण जगाचा इतिहास वाचला तर आपणास असे आढळून येते की, अनेक राजानी आणि राजसत्तानी त्यांच्या धर्मासाठी म्हणून युद्ध आणि लढाया केलेल्या होत्या. अशा युद्ध आणि लढायांचा परिणाम म्हणून मानववंश हत्या, असहिष्णुता, द्वेष, विध्वंस आणि विनाश झालेला होता. युरोपमध्ये ख्रिश्चन आणि मुस्लिम धर्मामध्ये अनेक शतकांपासून चालू असलेला संघर्ष आपल्या सर्वांना परिचित आहेच. अशा सर्व युद्धांना 'धर्मयुद्ध' म्हणून संबोधले जाते.

**ड) शिक्षण**

**शिक्षण : व्याख्या आणि अर्थ** (Education : Definitions and Meaning) **:**

अनेक समाजशास्त्रज्ञांनी आणि शिक्षणतज्ञांनी 'शिक्षण' या संज्ञेची व्याख्या केली आहे. आता आपण काही निवडक व्याख्यांचा अभ्यास करू. या व्याख्या अभ्यासल्यानंतर आपणाला 'शिक्षण' या संज्ञेचा अर्थ समजण्यास मदत होईल.

१) एमिल दुरखाईम – ''शिक्षण म्हणजे 'नव्या पिढीचे समाजीकरण' होय. मुलांना ज्या बाबी स्वयंस्फूर्तपणे अवगत करता येऊ शकल्या नसत्या त्या बाबी, म्हणजे सभोवतालच्या विश्वातील घटनांकडे पाहण्याच्या पद्धती किंवा दृष्टिकोन, समाजमान्य असे वर्तनाचे आणि भावनांच्या अनुभवाचे आणि आविष्काराचे प्रकार, मुलाच्या मनावर बिंबविण्याचे सातत्यपूर्ण प्रयत्न म्हणजे शिक्षण होय.'' ("Education is 'the socialization of young generation.'.... It is "a continuous effort to impose on the child ways of seeing, feeling and acting which he could not have arrived spontaneously." - Emile Durkheim)

२) सॅम्युअल कोईनिग – ''ज्या प्रक्रियेत समूहाचा सामाजिक वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित केला जातो, तसेच मुलांचे त्यांच्या समूहात समाजीकरण होते (की ज्यात ती स्वत: जन्मलेल्या समूहाचे वर्तन विषयक नियम शिकून घेतात) त्या प्रक्रियेस शिक्षण असे म्हणता येईल.'' ("Education may be defined as the process whereby the social heriage of a group is passed on from one generation to another, as well as the process whereby the child becomes socialized i.e. learns the rules of behariour of the group into which he is born." - Samuel Koenig)

३) सम्नेर – ''समूहाच्या लोकनीती मुलांच्याकडे हस्तांतरीत करण्याचा प्रयत्न म्हणजे शिक्षण होय. अशा शिक्षणातून मुलांना कोणते वर्तन समूहाला मान्य असलेले आणि कोणते वर्तन समूहाला अमान्य असलेले आहे, हे समजते, तसेच मुलांनी विविध प्रकारच्या सर्व प्रसंगांमध्ये कसे वर्तन करावे आणि कशावर श्रद्धा ठेवावी व कशावर श्रद्धा ठेवू नये याचे शिक्षण मिळते.'' ("Education is an attempt to transmit to the child the mores of the group so that he learns what conduct is approved and what is disapproved.... how he ought to behave in all kinds of cases; what he ought to believe and reject." - Sumner)

४) ब्राऊन एफ् जे. आणि जे. एस्. रॉऊक – ''शिक्षण म्हणजे अशा अनुभवांची गोळाबेरीज की जे अनुभव प्रौढ व्यक्ती आणि मुलांच्या अभिवृत्ती घडवून त्यांचे सामाजिक वर्तन निश्चित करतात.'' ("Education is the sum total of the experience which moulds the attitudes and determines the conduct of both the child and adult." - Brown, F. J. and J. S. Roucek)

५) ए. डब्ल्यू ग्रीन – ''ऐतिहासिकदृष्ट्या तरुणांना नंतर प्रौढपणीच्या भूमिका स्वीकारता याव्यात यासाठी दिले गेलेले जाणीवपूर्वक प्रशिक्षण म्हणजे शिक्षण होय. पण, आधुनिक संकेतानुसार शिक्षण म्हणजे शाळेसारख्या औपचारिक संघटनांमध्ये विशेषज्ञांकडून दिले जाणारे औपचारिक प्रशिक्षण होय.'' ("Historically, it (Education) has meant the conscious training of the young for the later adoption of adult roles. By modern convention, however, education has come to mean formal training by specialist within the formal organization of the school" - Green A. W.)

वरील व्याख्यावरून आपण शिक्षणाच्या समाजशास्त्रीय अर्थांच्या विविध छटा खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील. (१) तरुण पिढीच्या समाजीकरणाची प्रक्रिया म्हणून शिक्षणाकडे पाहिले जाते. (२) प्रौढ वयातील व्यक्तींच्या भूमिका नंतर त्यांना स्वीकारता याव्यात यासाठी लहानपणापासून दिले गेलेले जाणीवपूर्वक स्वरुपाचे प्रशिक्षण म्हणजे शिक्षण होय. (३) ज्या प्रक्रियेमध्ये समूहाचा सामाजिक वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित केला जातो त्या प्रक्रियेला शिक्षण म्हटले जाते. वेगळ्या शब्दात, शिक्षण हे संस्कृती संक्रामणाचे एक साधन आहे. (४) ज्या प्रक्रियेत समूहाचा सामाजिक वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित केला जातो, तसेच मुलांचे त्यांच्या समूहात समाजीकरण होते (की ज्यात ती स्वत: जन्मलेल्या समूहाचे वर्तन विषयक नियम शिकून घेतात) त्या प्रक्रियेस शिक्षण असे म्हणता येईल. (५) शिक्षणाच्या प्रक्रियेद्वारे, मुले समूहाच्या चालीरीतींचे शिक्षण घेतात, त्यामुळे मुलांना समूहात कोणते आचरण स्वीकृत व कोणते अस्वीकृत आहे हे समजते. तसेच सर्व प्रसंगांमध्ये कसे वर्तन करावे, तसेच कोणत्या बाबींवर श्रद्धा ठेवावी व कोणत्या बाबींवर श्रद्धा ठेवू नये याचे शिक्षण मिळते. (६) शिक्षण ही व्यक्तीच्या आयुष्यात निरंतरपणे चालणारी प्रक्रिया असून ती समाजातील व्यक्तींचे वर्तन आणि अभिवृत्ती घडवण्यामध्ये आणि निश्चीत करण्यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडते. शिक्षण या संज्ञेचा अर्थ आणि व्याख्या समजून घेतल्यानंतर, आता आपण शिक्षणाची विविध कार्ये जाणून घेणार आहोत.

**शिक्षणाची सामाजिक कार्ये** (Social Functions of Education) **:**

एक सामाजिक संस्था म्हणून 'शिक्षण' समाजव्यवस्थेच्या अस्तित्वासाठी, सातत्यासाठी आणि प्रगतीसाठीची अनेक महत्त्वाची कार्ये पार पाडते. शिक्षणाची काही महत्त्वाची कार्ये खालीलप्रमाणे आहेत.

**१) शिक्षण समाजातील सदस्यांचे समाजीकरण घडवून आणते** (Education socializes the members of society) **:**

समाजीकरण ही एक शिक्षणाची प्रक्रिया असून, त्याद्वारे समाजातील व्यक्तींना समाजातील विविध भूमिका पार पाडण्याच्या दृष्टीने सक्षम केले जाते. नुकतेच जन्माला आलेले मूल सुरूवातीला असहाय्य अवस्थेत असते. पण, समाजीकरण प्रक्रियेत त्याला स्वत:ची जाणीव होते. समाजात रहाण्यासंबंधीचे आवश्यक ते ज्ञान त्याला मिळते. ज्या समाजात ते जन्मते त्याच्या सांस्कृतिक कौशल्यांचे संपादन त्यांच्याकडून होते. समाजीकरणाची सुरूवात जरी कुटुंबापासून होत असली तरी शालेय, महाविद्यालयीन आणि त्यापुढील आयुष्यातही समाजीकरणाचे सातत्य टिकून राहते. समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून, समाजीकरणाच्या प्रक्रियेमध्ये शिक्षण महत्त्वाची भूमिका पार पाडते. शिक्षण, मग ते औपचारिक असो अथवा अनौपचारिक, ही एक अशी प्रक्रिया आहे की, जी व्यक्तीला तिच्या जीवनात येणारी आव्हाने पेलण्यासाठी आणि समाजातील विविध स्वरूपाच्या भूमिका पार पाडण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सामाजिक, मानसिक आणि व्यावसायिक कौशल्यांचे प्रशिक्षण देत असते. शाळेमध्ये प्रथमच शिक्षक, शाळा आणि समाजाने घालून दिलेल्या व्यक्तिनिरपेक्ष (impersonal) स्वरूपाच्या नियमांचा परिचय मुलांना होत असतो. या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारची सामाजिक आर्थिक पार्श्वभूमी असणाऱ्या मुलांच्या संपर्कामध्ये मूल येते.

शाळेमध्ये मुलाला सवंगडी अथवा समवयस्क मुले-मुली यांची मैत्री मिळते. अशा समवयस्क मित्रांच्या समूहाचा (peer group) प्रभाव मुलांवर होतो त्यामुळे त्याला विशिष्ट सामाजिक नितीमूल्ये आणि वर्तन शिकण्याची संधी प्राप्त होते. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे यासारख्या औपचारिक शिक्षण व्यवस्थेमुळेच आधुनिक गुंता-गुंतीच्या समाजात आवश्यक असलेल्या इंजिनिअर्स, डॉक्टर्स, प्रशासक, अधिकारी, संशोधक-शास्त्रज्ञ इ. सारख्या प्रौढ वयातील भूमिकांसाठी व्यक्तींना तयार करून घेता येते.

२) **शिक्षणव्यवस्था संस्कृतीचा वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रामित करते** (Education transmits the cultural heritage from one generation to the next) **:**

शिक्षणाच्या प्रक्रियेद्वारे संस्कृतीचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतर होते. नीतीमूल्ये, कौशल्ये, ज्ञान, वाङ्मय, तत्त्वज्ञान, धर्म, संगीत, शास्त्र, तंत्रविद्या, कला इ. घटकांचा विकास होऊन त्याचा संचय अथवा यासारख्या ज्या बाबी समाजाच्या भूतकालीन काळात विकसित झालेल्या असतात आणि ज्यांचा साठा झालेला असतो त्यालाच समाजाची संस्कृती किंवा सामाजिक वारसा (social heritage) असे म्हणतात.

हा समाजाचा सांस्कृतिक वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत करण्याचे कार्य शिक्षण करते. संस्कृतीच्या वरील विविध घटकांचे व्यक्तीला संपादन करावे लागते किंवा संस्कृती व्यक्तीला शिकावी लागते. समाजातील शिक्षणाच्या माध्यमातून (अनौपचारिक आणि औपचारिक) संस्कृती शिकविली जाते. शाळांच्यामधून पारंपारिक विचारपद्धती आणि वर्तनपद्धतींचे शिक्षण देत असतानाच, त्यासोबत व्यक्तीला आत्मसन्मान, स्पर्धा, कठोर परिश्रम, ध्येये, स्वयंशिस्त आणि व्यक्तीवादाचे देखील शिक्षण दिले जाते. अशाप्रकारे व्यक्तीचे सामाजिक व्यक्तिमत्त्व घडवण्यामध्ये शिक्षणाची भूमिका महत्त्वाची असते.

३) **सामाजिक नियंत्रणाचे एक साधन म्हणून शिक्षण कार्य करते** (Education acts as a mechanism of social control) **:**

सामाजिक नियमने आणि सामाजिक मूल्यांना अनुसरून व्यक्तीचे वर्तन घडून येण्यासाठी तिला तसे वर्तन करण्यास भाग पाडणारी प्रक्रिया म्हणजे सामाजिक नियंत्रण होय. या प्रक्रियेच्या माध्यमातून समाजामध्ये व्यवस्था निर्माण करून ती टिकवून ठेवली जाते. व्यक्तीचे समाजीकरण घडवून आणून आणि समाजातील संस्कृतीचे एकापिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतर करून शिक्षण एक प्रकारे सामाजिक नियंत्रणाचे कार्य करीत असते. समाजातील सामाजिक नियमने आणि सामाजिक मूल्यांचे शिक्षण समाजीकरणातून मिळते, हे आपण अभ्यासले आहेच. ज्यावेळी शिक्षण आणि समाजाच्या संस्कृतीच्या माध्यमातून व्यक्तीचे समाजीकरण होत असते, त्यावेळी व्यक्तीला समाजाच्या एकूण सामाजिक नियमनांचे आणि मूल्यांचे शिक्षण दिले गेलेले असते. त्यामुळे व्यक्तीला समाजाची मूल्ये आणि नियमनांच्या प्रमाणे वर्तन करणे भाग पाडले जाते. तसेच जर शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या संस्कृतीचे योग्य प्रकारे हस्तांतर झाले असेल तर, त्यामुळे समाजाची व्यवस्था, स्थैर्य आणि सातत्य टिकून रहाते. अशा रितीने शिक्षण सामाजिक नियंत्रणाचे एक साधन म्हणून कार्य करते.

४) **आधुनिक समाजातील तर्कसंगत श्रमविभाजनास शिक्षण मदत करते** (Education helps rational division of labour in modern society) **:**

शिकार आणि अन्न-संकलन करणाऱ्या पारंपारिक समाजव्यवस्थेमधील श्रमविभाजनाचे स्वरूप अत्यंत साध्या स्वरूपाचे होते. अशा प्रकारच्या समाजव्यस्थेमध्ये विविध प्रकारच्या कार्याची विभागणी करत असताना व्यक्तीचे वय, लिंग आणि व्यक्तीकडे असणारे शारीरिक सामर्थ्य विचारात घेऊन विविध व्यक्तींना कामे वाटून दिली जात असत. त्या काळात व्यक्तीनी करावयाच्या कामांची संख्या कमी होती (The Jobs were few in number) कामासंबंधीचे विशेषीकरण विकसित झालेले नव्हते. समाजातील वृद्ध सदस्य, नव्या पिढीतील सदस्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देत असत. मात्र पुढे समाज शेती आणि औद्योगिक क्षेत्रात जस-जसा प्रगत होत गेला तस तसे कामाचे स्वरुप बदलले आणि विशेषीकरणाला जास्त गती मिळाली. श्रमविभाजनाचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे बनत गेले. आज समाजातील विविध प्रकारची कामे करण्यासाठी विशिष्ट कौशल्ये आणि पात्रता असणाऱ्या व्यक्तींची गरज आहे. अशा विविध कामांसाठी योग्य आणि आवश्यक अशी व्यावसायिक कौशल्ये असणाऱ्या व्यक्तींच्या नेमणूका करण्यासाठी शिक्षण संस्था मदत करते. म्हणून श्रमविभाजनाच्या कार्याला शिक्षण अशा प्रकारे मदत करते की, ज्यामुळे योग्य कामांसाठी योग्य व्यक्तींची निवड होऊन व्यक्तीच्या पात्रतेप्रमाणे तिला काम मिळते.

५) **शिक्षण उर्ध्वगामी सामाजिक गतीशीलतेला चालना देते** (Education promotes upward social mobility) **:**

शहरी, औद्योगिक समाजांमध्ये, आधुनिक अर्थव्यवस्थेशी संबंधित असणाऱ्या रोजगार संधी प्राप्त करण्यासाठी औपचारिक उच्चशिक्षण आणि क्षमता असणे महत्त्वाचे झाले आहे. आधुनिक अर्थ व्यवस्थेमध्ये कामाचे स्वरुप, मिळणारे वेतन आणि दर्जा एकसारखा आढळून येत नाही. उदा. अकुशल कामगार, कुशल कामगार, टायपिस्ट, क्लर्क, मॅनेजर, ऑफीसर, इंजिनिअर, डॉक्टर, लष्करातील अधिकारी, प्रशासक इ. सारख्या कामांसाठी वेगवेगळी पात्रता, कौशल्ये, आणि गुणांची आवश्यकता असते. शिक्षणामुळे व्यक्तींच्या अंगी असणाऱ्या सूप्त गुणांना वाव मिळतो. व्यक्तींच्या अंगी असणारे गुण आणि कौशल्ये विकसित करण्याचे कार्य शिक्षणामुळे होते. आधुनिक समाजातील विविध प्रकारच्या कामांसाठी व्यक्तीला घडविण्याचे कार्य शिक्षण करते. शिक्षण समाजातील व्यक्तीला तिचा दर्जा उंचाविण्यास आणि समाजामध्ये अधिक वरच्या स्तरात जाण्यासाठी प्रेरणा देते. समाजातील ज्या व्यक्ती उच्च शिक्षित आहेत, ज्यांनी आवश्यक अशी पात्रता आणि विशेष कौशल्ये मिळविली आहेत, त्या व्यक्ती उच्च स्तरावरील नोकरीसाठी पात्र ठरतात. अशा उच्च स्तरावरील नोकरीमुळे त्या व्यक्तीचा आर्थिक आणि सामाजिक दर्जा देखील उंचावत असतो. या अर्थाने, व्यक्तीला कनिष्ठ सामाजिक आर्थिक वर्गाकडून मध्यम वर्गाकडे आणि मध्यम वर्गाकडून उच्चवर्गाच्या दिशेने आपल्या दर्जात उर्ध्वगामी गतिशीलता घडवून आणण्यास शिक्षण मदत करते. म्हणून शिक्षण उर्ध्वगामी सामाजिक गतीशीलतेला चालना देते, असे म्हटले जाते.

**६) शिक्षण समान मूल्यांना चालना देऊन सामाजिक एकात्मतेचे साधन म्हणजे कार्य करते** (Education promotes common values and acts as an integrative force) **:**

कोणत्याही समाजातील ऐक्य आणि एकात्मता ही त्या समाजातील समान मूल्यांमुळेच निर्माण होत असते. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे इ. ठिकाणच्या औपचारिक शिक्षणाच्या माध्यमातून समानता, स्वातंत्र्य, बंधुत्व, सहकार्य, लोकशाही इ. स्वरुपाची आधुनिक मूल्ये, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात रुजविली जातात. समग्र समाजाचा विचार करता, अशा स्वरूपाची मूल्ये ही समान स्वरुपाची मूल्ये म्हणून ओळखली जातात. अशाप्रकारे शिक्षण समान मूल्यांना चालना देऊन सामाजिक एकात्मतेचे साधन म्हणून समाजामध्ये कार्य करते.

**७) सामाजिक परिवर्तन आणि विकासाचे साधन म्हणून शिक्षण कार्य करते** (Education acts as an instrument of social change and development) **:**

शिक्षण हे केवळ संस्कृतीच्या हस्तांतरणाद्वारे आपला प्राचीन सामाजिक वारसाच जतन करते असे नाही, तर कालबाह्य झालेली सामाजिक नियमने आणि सामाजिक प्रथा यात परिवर्तन घडवून आणण्याच्या दृष्टीने देखील मदत करते. समाजाला विकासाच्या नव्या मार्गावर घेवून जाण्यास शिक्षण मदत करते. सामाजिक परिवर्तन आणि विकासाचे एक साधन म्हणून वेगवेगळ्या प्रकारे शिक्षण मदत करते. अनेक वाईट सामाजिक घटनांचे मूळ अज्ञानामध्ये आढळते. अस्पृश्यता, बालविवाह, स्त्री-पुरुष असमानता इ. सारख्या वाईट सामाजिक पारंपारिक प्रथा इ. संबंधीची माहिती, त्याची कारणे आणि त्यामुळे होणाऱ्या परिणामांचे ज्ञान व्यक्तीला शिक्षणातूनच मिळत असते. अशा वाईट सामाजिक प्रथा-परंपरासंबंधीची जाणीव-जागृती मुला-मुलींच्यामध्ये शिक्षणामुळे निर्माण होते. त्यामुळे अशा वाईट सामाजिक प्रथा-परंपरांचे आणि सामाजिक समस्यांचे निर्मूलन करण्यास मदत होते. शिक्षणामुळेच विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीला चालना देण्याचे कार्य पार पाडले जाते. परिणामी, शिक्षणाची समाजाच्या विकासाला मदत होत असते. विद्यार्थ्यांमधील सहकार्य, स्पर्धा इ. सारख्या सूप्त गुणांना उत्तेजन देण्याचे कार्य शिक्षण करते. देशाच्या उत्पादकतेला अशा विद्यार्थ्यांचे योगदान असते. अशाप्रकारे, समाजातील वाईट प्रथा-परंपरा, सामाजिक समस्या इ. चे निर्मूलन करण्यासाठी शिक्षण कार्य करते. विज्ञान आणि तांत्रिक क्षेत्राशी संबंधित ज्ञानामध्ये वाढ करून देशातील नागरिकांच्यामध्ये सहकार्य आणि स्पर्धा यासारख्या प्रवृत्ती रुजवण्यासाठी देखील शिक्षण कार्य करीत असते. अशाप्रकारे समाजाच्या सामाजिक, आर्थिक विकासाचे आणि समाज परिवर्तनाचे साधन म्हणून शिक्षण महत्त्वाची भूमिका पार पाडते.

**८) शिक्षण नाविन्यपूर्ण कल्पना आणि चिकित्सक विचार करण्याची पात्रता विकसित करते** (Education develops innovative ideas and ability to think critically) **:**

शिक्षण केवळ  मागील काळात संचय करून ठेवलेल्या ज्ञानाचेच हस्तांतर करीत नाही, तर ते नव-नवीन विचारांना नव्या कल्पनांना आणि चिकित्सकपणे विचार करण्याच्या पद्धतींना प्रोत्साहन देते. आपल्या सभोवताली घडणाऱ्या विविध घटनांसंबंधी चिकित्सक स्वरूपाचे प्रश्न विचारण्यासाठी उत्तेजन शिक्षण देते.

नाविन्यपूर्ण कल्पना विकसित करण्यासाठी शिक्षण उत्तेजन देते. वैज्ञानिक संशोधन हे शिक्षणाचे प्रमुख कार्य असून त्यामुळे नव-नवीन विचार, विकसित होण्यास मदत होते. तसेच त्यामुळे तार्किक आणि चिकित्सक विचार करण्याची क्षमता विकसित होते.

**शिक्षणाचे प्रकार** (Types of Education) **:**

शिक्षणाचा आशय आणि विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण जाण्याचे मार्ग या निकषांच्या आधारे समाजशास्त्रज्ञांनी शिक्षणाचे सामान्य वर्गीकरण केले आहे. आता आपण शिक्षणाचे सामान्य प्रकार पाहू.

१) **धार्मिक शिक्षण** (Religious Education) **:**

शिक्षणाचा आशय धार्मिक असेल, तर त्याला 'धार्मिक शिक्षण' असे म्हटले जाते. अनेक शतकांपासून धर्मांमुळे शिक्षण प्रभावित होत आलेले दिसते. अगदी अलीकडच्या कालखंडापर्यंत मंदिर, चर्च, मशीद, मठ इ. सारख्या धार्मिक ठिकाणी शिक्षण दिले जात होते. धार्मिक शिक्षणामध्ये धर्म-संस्कार आणि विधी, नितीतत्वे, विश्वासंबंधी असणारा धर्माचा दृष्टीकोन, धार्मिक तत्त्वज्ञान इ. चा अंतर्भाव होतो. असे धार्मिक शिक्षण अनुयायांना देण्याचे कार्य धार्मिक नेते करीत असत / करतात. पारंपारिक समाजातील धार्मिक शिक्षण समाजातील सर्वांच्यासाठी खुले नव्हते; ते केवळ समाजातील विशिष्ट उच्च वर्गातील व्यक्तींना दिले जात असे. सामान्यपणे महिलांना धार्मिक शिक्षणामधून वगळण्यात आले होते.

२) **धर्मनिरपेक्ष शिक्षण** (Secular Education) **:**

धर्मनिरपेक्ष शिक्षण म्हणजे असे शिक्षण, की जे कोणत्याही एखाद्या विशिष्ट धर्माच्या प्रभावाखाली नसते. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमधून दिल्या जाणाऱ्या आधुनिक शिक्षणाला धर्मनिरपेक्ष शिक्षण म्हणतात. आधुनिक समाजांमध्ये शिक्षण व्यवस्थेचे पर्यवेक्षण किंवा देखरेख शासनसंस्था करते. अशा प्रकारच्या शिक्षणात औपचारिक स्वरूपाचा अभ्यासक्रम असतो. समाजातील सर्वांच्यासाठी धर्मनिरपेक्ष शिक्षण खुले असते. १८२० दरम्यान भारतात ब्रिटीशांनी औपचारिक शिक्षण संस्थांची स्थापना करून पाश्चात्य पद्धतीचे धर्मनिरपेक्ष शिक्षण देण्यास प्रारंभ केला. यथावकाश, कलकत्ता, मुंबई, आणि मद्रास या ठिकाणी विद्यापीठे सुरू झाली. अशाप्रकारे, आधुनिक शिक्षण हे धर्मनिरपेक्ष, मानवतावादी आणि व्यावसायिक स्वरूपाचे बनले. धर्मनिरपेक्ष व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षित शिक्षकांकडून औपचारिक शिक्षण संस्थांमध्ये दिले जाते.

३) **अनौपचारिक शिक्षण** (Informal Education) **:**

जे शिक्षण अनौपचारिक अशा सामाजिक संपर्काद्वारे दिले जाते ते अनौपचारिक शिक्षण होय. अशा शिक्षणासाठी शाळा, महाविद्यालयासारख्या आपैचारिक शिक्षण संस्थामध्ये नोंदणी करावी लागत नाही, त्याला विशिष्ट अभ्यासक्रम नसतो, प्रशिक्षित असा शिक्षक वर्ग नसतो, विद्यार्थ्यांसाठी औपचारिक परीक्षापद्धती नसते आणि त्यांची श्रेणी ठरविली जात नाही. वरील वैशिष्ट्यानी युक्त अशा शिक्षणाला अनौपचारिक शिक्षण असे म्हणतात. साध्या आणि आदिम समाजव्यवस्थांमध्ये शिक्षण हे प्रामुख्याने

अनौपचारिक पद्धतीने दिले जात असे. प्राचीन समाजांमध्ये ज्ञानाचा संबंध जगण्याच्या कौशल्याशी होता. कुटुंबातील आई वडील आणि इतर सदस्य, त्याचप्रमाणे नातेवाईक आणि समाजातील वयस्क व्यक्ती असे शिक्षण देण्याचे काम करीत होत्या. समाजाची नितीमूल्ये आणि विविध स्वरूपाची व्यावसायिक कौशल्ये हस्तांतरित करणे हेच शिक्षणाचे स्वरूप होते. व्यक्तीच्या उदरनिर्वाहासाठी आणि सामाजिक जीवनासाठी अशा स्वरूपाच्या बाबी आवश्यक मानल्या जात असत. वयाने प्रौढ असणारे पुरुष मुलांना शिकार करण्याचे कौशल्य शिकवत असत. त्याचप्रमाणे त्यांना जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या तांत्रिक बाबींचे आणि सभोवतालच्या पर्यावरणाशी कसे जुळवून घ्यावे याविषयीचे शिक्षण दिले जात असे. पुरुषांप्रमाणे वयाने प्रौढ असणाऱ्या महिलादेखील लहान मुलींना आणि युवतींना अन्नाचा साठा कसा करावा, प्रसूती, मुलांचे संगोपन इ. विषयीचे शिक्षण देत असत. या प्रकारचे शिक्षण सर्वप्रकारच्या समाजांमध्ये प्रचलित असल्याचे दिसते. आधुनिक समाजांमध्ये देखील कुटुंबातील व्यक्ती अनेक गोष्टी कुटुंबातील सदस्यांकडून अनौपचारिक मार्गाने शिकून घेत असते. त्याचप्रमाणे समवयस्क मित्रांचा समूह, शेजारी, नातलग यांच्याकडून देखील व्यक्ती अनेक बाबी अनौपचारिक मार्गाने शिकून घेत असते.

४) **औपचारिक शिक्षण** (Formal Education) **:**

औपचारिक शिक्षण संस्थाच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या शिक्षणास औपचारिक शिक्षण असे म्हणतात. समाज जसा अधिका-अधिक मोठा आणि गुंतागुंतीचा बनत जातो, त्यावेळी अनौपचारिक माध्यमातून सर्वांना शिक्षण देणे शक्य होत नाही. आकाराने विस्तृत आणि गुंतागुंतीच्या समाज-व्यवस्थांमध्ये श्रमविभाजनाचे स्वरुप गुंतागुंतीचे झालेले असते. व्यवसायामधील विशेषीकरण अधिक विकसित झाल्याने, त्यासाठी औपचारिक शिक्षण व्यवस्था गरजेची झालेली असते. औद्योगिकरण आणि शहरीकरणाच्या वाढीमुळे, अनेक प्रकारच्या रोजगार संधी निर्माण झालेल्या असतात. अशा रोजगारांना आवश्यक असणारे प्रशिक्षण व्यक्तींना देण्यासाठी म्हणून औपचारिक शिक्षण संस्थाच्यामधून शिक्षण देणे गरजेचे असते. मोठ्या प्रमाणावर शिक्षण देण्याची व्यवस्था ही आवश्यक बाब बनत जाते. मोठ्या प्रमाणावरील शिक्षण देण्यासाठी शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे, तंत्र-शिक्षण संस्था अस्तित्वात येतात. त्यानंतर त्यामध्ये शिक्षकांची होणारी भरती, आणि त्यांना दिले जाणारे प्रशिक्षण ही देखील एक प्राथमिक गरज बनते. त्याठिकाणी नव-नवीन विद्याशाखा आणि त्यांचे अभ्यासक्रम विकसित होतात. परीक्षा पद्धती आणि श्रेणी पद्धती अस्तित्वात येते. भाषा, कला आणि वाङ्मय, चित्रकला, सामाजिक शास्त्रे, भौतिक आणि जीवशास्त्रे, शेतीशास्त्र, वैद्यकीय शास्त्र, तांत्रिक शिक्षण इ. सारख्या विविध ज्ञानशाखा निर्माण केल्या जातात. आधुनिक समाजात या औपचारिक यंत्रणेतून जे शिक्षण देण्यात येते त्याला औपचारिक शिक्षण म्हणतात.

५) **प्रौढ आणि निरंतर शिक्षण** (Adult and Continuing Education) **:**

हा शिक्षणाचा एक नवा आणि अलीकडचा प्रकार आहे. ज्या देशांच्यामध्ये अशिक्षित लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे, अशा देशांच्यामध्ये या प्रकारचे शिक्षण अलीकडच्या काळात सुरू केले आहे. एखाद्या समाजामध्ये प्रौढ व्यक्तींच्यामध्ये निरक्षरतेचे प्रमाण अधिक असण्याची अनेक कारणे आहेत. त्यामध्ये,

दारिद्र्य, शाळेत हजर रहाण्यासाठी म्हणून असणाऱ्या संधीचा अभाव, कुटुंबाला हातभार लावण्यासाठी काम करण्याच्या आवश्यकतेचा दबाव इ. चा समावेश होतो. शासनाच्या असे लक्षात आले की, जर देशातील निरक्षर लोकसंख्येचे प्रमाण अधिक वाढत गेले तर देशाचा विकास होणार नाही. यासाठी, ज्या कोणाला त्यांच्या सुरूवातीच्या आयुष्यात शाळेत जाऊन शिक्षण घेण्याची संधी मिळाली नाही, त्यांना शिक्षणाची संधी मिळावी या उद्देशाने अनेक शैक्षणिक योजनांची अंमलबजावणी करण्यात आली. प्रौढ आणि निरंतर शिक्षण योजनेचा उद्देश हा लिहिता-वाचता येणाऱ्या साक्षरांच्या संख्येत वाढ करण्याचा होता. भारताच्या प्रत्येक राज्यात एकूण साक्षरतेचे प्रमाण वाढावे म्हणून ही योजना कार्यवाहीत आणली गेली. या प्रकारच्या शिक्षणपद्धतीमधील वर्ग, पुरुष आणि महिलांच्या सोयीप्रमाणे भरविले जातात. (उदा. रात्रशाळा) त्यांच्या रोजच्या कामामध्ये अशा शिक्षणामुळे काही अडथळा येवू नये हाच उद्देश ठेवून सोयीच्या वेळी प्रौढांना शिक्षण देण्यात येते. कार्यात्मक साक्षरता (Functional Literacy) निर्माण करणे व ती टिकवून ठेवणे हे अशा शिक्षणाचे उद्दिष्ट असते.

**६) दूर शिक्षण पद्धती** (Distance Education) **:**

उच्च शिक्षण प्रसारामध्ये ही एक नवी संकल्पना आली आहे. याप्रकारच्या शिक्षणामध्ये, ज्या व्यक्तींना महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय शिक्षण घेण्याची संधी मिळाली नाही, परंतू ते आपले उच्चशिक्षण पूर्ण करू इच्छितात, अशांच्यासाठी ही शिक्षणपद्धती सुरू करण्यात आली आहे. या प्रकारच्या शिक्षण पद्धतीमध्ये वर्ग सुरू करण्यासाठी खोली अथवा शिक्षक असत नाहीत. विद्यार्थ्यांना आवश्यक असलेले अभ्यासासाठीचे अथवा वाचनासाठीचे साहित्य (Study Material) खास पद्धतीने तयार केले जाते. अशी वाचन-सामग्री (पुस्तके) त्यांना पुरविली जाते. या वाचनसामग्रीच्या आधारावर विद्यार्थ्यांने स्वत: अभ्यास करावयाचा असतो. ज्या विद्यापीठांमध्ये अशा स्वरूपाचे उच्चशिक्षणातील अभ्यासक्रम सुरू केले आहेत, त्या ठिकाणी, काहीवेळा अल्पकालावधीचे संपर्क कार्यक्रम (Short duration contact programmes) आयोजित करून त्या-त्या विषयातील तज्ञ शिक्षकांचे अधिक मार्गदर्शन विद्यार्थ्यांना दिले जाते. त्यानंतर विद्यार्थी संबंधित विद्यापीठाची परीक्षा देतो. परीक्षेत उत्तीर्ण झाल्यावर विद्यापीठ त्याला पदवी प्रमाणपत्र बहाल करते. भारतामध्ये अशा प्रकारच्या विद्यापीठांना 'मुक्त विद्यापीठे' (Open Universites) या नावाने ओळखले जाते. उदा. - इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ (IGNOU) हे भारतातील राष्ट्रीय पातळीवरील एक मुक्त विद्यापीठ आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न** (Check Your Progress) **:**

अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) सामाजिक संस्थेची कोणतीही एक व्याख्या सांगा.

२) सामाजिक संस्थेचे चार पैलू कोणते ते सांगा.

३) सर्व मानवी समाजात आढळणाऱ्या महत्त्वाच्या सामाजिक संस्था कोणत्या?

४) वर्धमान सामाजिक संस्था म्हणजे काय?

५) विधीसंम्मत सामाजिक संस्था म्हणजे काय?

६) प्राथमिक व दुय्यम सामाजिक संस्थांची कोणतीही दोन उदाहरणे सांगा.

७) सामाजिक संस्थांची कोणतीही तीन महत्त्वाची वैशिष्ट्ये सांगा.

८) कोणत्याही दोन सामाजिक संस्था कोणत्या सामाजिक गरजांची पूर्तता करतात ते सांगा.

९) सामाजिक संस्थांचा नियमनात्मक गाभा कोणता?

१०) सामूहिक सामाजिक जीवन हे सामाजिक संस्थांच्या निर्मितीचे मूळ आहे असे का म्हटले जाते?

११) समग्र समाजव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाची असणारी सामाजिक संस्थांची कोणतीही दोन कार्ये सांगा.

१२) 'Family' हा शब्द कोणत्या लॅटीन शब्दापासून तयार झाला आहे?

१३) 'कुटूंब' हा प्राथमिक समूह म्हणून का समजला जातो?

१४) 'क्लॅरे' यांची कुटुंबाची व्याख्या द्या.

१५) एलिएट आणि मेरील यांची कुटुंबाची व्याख्या द्या.

१६) मॅकायव्हर यांची कुटुंबाची व्याख्या द्या.

१७) कुटुंबाची कोणतीही चार वैशिष्ट्ये सांगा.

१८) कुटुंबाची कोणतीही महत्त्वाची तीन कार्ये सांगा.

१९) विवाह बंधनामध्ये सहभागी असणाऱ्या व्यक्तींच्या संस्थेवरून होणाऱ्या कुटुंबाचे प्रकार सांगा.

२०) विवाहित जोडीच्या निवास करण्याच्या जागेवरून होणाऱ्या कुटुंबाचे प्रकार सांगा.

२१) संयुक्त कुटूंब म्हणजे काय?

२२) कोणत्या कारणांमुळे पारंपारिक कुटुंबपद्धतीमध्ये रचनात्मक आणि कार्यात्मक बदल घडून येत आहेत?

२३) बदलत्या कुटूंब पद्धतीची कोणतीही चार वैशिष्ट्ये सांगा.

२४) पारंपारिक संयुक्त कुटुंबपद्धतीचे विघटन होऊन केंद्र कुटुंबे का निर्माण होत आहेत?

२५) पारंपारिक कुटुंबांची कोणती कार्ये इतर माध्यमांनी घेतली आहेत?

२६) दुरखीमची धर्माची व्याख्या द्या.

२७) जॉन्सन यांची धर्माची व्याख्या लिहा.

२८) धर्माची कोणतीही तीन वैशिष्ट्ये सांगा.

२९) दुरखीम यांच्या मते धर्माचे सामाजिक कार्य कोणते?

३०) धर्माची कोणतीही चार कार्ये सांगा.

३१) धर्म हे करमणूकीचे साधन कसे आहे?

३२) धर्माचा मार्क्सवादी दृष्टीकोन कोणता?

३३) मुळ धार्मिक श्रद्धांच्या अतिरेकातून निर्माण होणारी कोणतीही चार अप-कार्ये सांगा?

३४) कोणत्या लॅटीन शब्दापासून 'शिक्षण' (education) या संज्ञेची व्युत्पत्ती झाली आहे?

३५) एमिल दुरखाईम यांनी दिलेली शिक्षणाची व्याख्या सांगा.

३६) ए.डब्ल्यू. ग्रीन यांनी दिलेली शिक्षणाची व्याख्या लिहा.

३७) शिक्षणाची कोणतीही तीन प्रमुख सामाजिक कार्ये लिहा.

३८) शिक्षण केवळ प्राचीन संस्कृतीचेच हस्तांतर नविन पिढीकडे करीत असते का?

३९) शिक्षण कशाप्रकारे सामाजिक परिवर्तन आणि विकास घडवून आणते?

४०) शिक्षण सामाजिक एकात्मतेचे साधन म्हणून कशाप्रकारे कार्य करते?

४१) धर्मनिरपेक्ष शिक्षण म्हणजे काय?

४२) अनौपचारिक शिक्षण म्हणजे काय?

४३) दूरशिक्षण म्हणजे काय?

४४) या घटकामध्ये अभ्यासलेले शिक्षणाचे विविध प्रकार सांगा.

ब) योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.

१. व्यक्ती आणि समाज या दोघांच्याही दृष्टीने .........................चे महत्व आहे.

अ) सामाजिक संस्था ब) सामाजिक समूह

क) सामाजिक नियंत्रण ड) सामाजिक विचलन

२. सामाजिक संस्था हया व्यक्तीच्या समाजातील ............ व ............. निर्धारित करतात.

अ) नियमने व मूल्ये ब) दर्जा व भूमिका

क) लोकरूढी व लोकनिती ड) वरीलपैकी नाही

३. पुढीलपैकी ................हे सामाजिक संस्थेचे कार्य आहे.

अ) गरजापूर्ती ब) सामाजिक नियंत्रण

क) दर्जा व भूमिकेचे निर्धारण ड) वरील सर्व

## **३.३ सारांश** (Let Us Sum Up) :

या घटकामध्ये आपण 'सामाजिक संस्था' या संकल्पनेच्या व्याख्या समजून घेऊन समाजातील प्रमुख सामाजिक संस्था, त्यांचे प्रकार व सामाजिक संस्थांची वैशिष्ट्ये यांचे अध्ययन केले आहे. प्रस्तुत घटकातील प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे :

'सामाजिक संस्था' ही समाजशास्त्रातील एक महत्त्वाची संकल्पना असून तिला विशिष्ट असा अर्थ आहे. सामाजिक संस्था म्हणजे सामाजिक संबंधांची अशी व्यवस्था की ज्यामध्ये काही मूलभूत समान मूल्ये आणि वर्तनरितींचा समावेश होतो आणि जी समाजाच्या मूलभूत गरजा भागविते. सामाजिक संस्था या संज्ञेचा संबंध नियमित सामाजिक संबंध किंवा सामाजिक संबंधांची संघटित पद्धती किंवा संघटित व प्रस्थापित मार्ग आणि संस्कृतीचे प्राथमिक बाह्य स्वरूप यांच्याशी जोडला जातो. सामाजिक संस्था म्हणजे सामाजिक नियमने, लोकरुढी, लोकनीती, कायदे, मूल्ये, नियम, कल्पना, तत्त्वे, शिकवण व पद्धती या सर्वांची एकत्र गुंफण होऊन निर्माण झालेल्या मानवाच्या आणि मानवी समाजाच्या गरजा भागविण्याचे संघटित आणि प्रस्थापित मार्ग होत. सामाजिक संस्था अजाणतेपणे निर्माण होतात तसेच त्या जाणीवपूर्वक निर्माणही केल्या जातात. सर्व सामाजिक संस्थांची निश्चित अशी उद्दिष्टे असतात. सामाजिक संस्था सामाजिक वर्तनाच्या सामूहिक पद्धती असतात. त्यांच्यात सांस्कृतिकदृष्ट्या मान्य केलेल्या किंवा मंजूर केलेल्या वर्तनाचा अंतर्भाव होतो. त्यामुळे त्या व्यक्ती आणि समूह यांच्यातील संबंधाचे नियंत्रण करतात. संरचना, उद्दिष्टे, यंत्रणा आणि कार्ये हे सामाजिक संस्थांचे चार महत्त्वपूर्ण पैलू आहेत. सर्व समाजात दिसून येणाऱ्या महत्त्वाच्या सार्वत्रिक सामाजिक संस्था म्हणजे कुटुंबसंस्था, राज्यसंस्था, अर्थसंस्था, शिक्षणसंस्था, धर्मसंस्था, मनोरंजनात्मक संस्था इ. या होत. डब्ल्यू जी. सम्नर यांनी सामाजिक संस्थांचे दोन प्रकार सांगितले आहेत. ते म्हणजे वर्धमान सामाजिक संस्था व विधीस्थापित सामाजिक संस्था. यापैकी वर्धमान सामाजिक संस्था, उत्स्फूर्तपणे, अजाणतेपणे अस्तित्वात येतात. आणि त्या मानवी जीवनाच्या विकासाबरोबरच उत्क्रांत होत जातात. त्या हेतूपुरस्सर निर्माण केलेल्या नसतात. विधीस्थापित सामाजिक संस्था विशिष्ट काळात विशिष्ट हेतूने जाणीवपूर्वक सारासार विवेकबुद्धीने निर्माण केल्या जातात. जाणीवपूर्वक नियोजनातून त्या अस्तित्वात येतात आणि सामाजिक जीवन विकसीत व नियंत्रित व्हावे यासाठी त्यांचा विस्तार केला जातो. इ. डब्ल्यू. बर्जेस यांनी कार्यांच्या आधारावर संस्थांचे चार प्रकार सांगितले आहेत ते म्हणजे (१) सांस्कृतीक संस्था (२) आर्थिक संस्था (३) मनोरंजनात्मक संस्था (४) सामाजिक नियंत्रणात्मक संस्था. काही समाजशास्त्रज्ञ सामाजिक संस्थांच्या कार्यांचे महत्त्व या आधारावर (१) प्राथमिक संस्था व (२) दुय्यम संस्था असेही वर्गीकरण करतात.

सामाजिक संस्थांची काही प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे – (१) सामाजिक संस्था सामूहीक सामाजिक जीवनातून निर्माण होतात. (२) सामाजिक संस्था सार्वत्रिक स्वरूपाच्या असतात परंतु त्यांचे स्वरूप समाजा समाजानुसार बदलते. (३) प्रस्थापित मूल्ये, नियमने व कार्यपद्धती यांचा सामाजिक संस्थेत समावेश होतो. (४) सामाजिक संस्था म्हणजे गरजपूर्तीची साधने असतात. (५) संस्था सामाजिक नियंत्रणाची यंत्रणा असतात. (६) सर्व सामाजिक संस्था परस्पर संबंधीत असतात. (७) सामाजिक संस्था सापेक्षतः स्थिर स्वरुपाच्या असतात त्यांच्यात मंद गतीने बदल होतो. (८) संस्थांची काही प्रतीके व चिन्हे असतात. (९) संस्था अमूर्त स्वरुपाच्या असतात. (१०) सामाजिक संस्था निश्चित अशी कार्ये करतात.

या घटकाच्या प्रस्तावनेमध्ये आपण कुटूंब व्यक्तीच्या जीवनामध्ये कशी महत्त्वाची भूमिका पार पाडते, कुटूंब हा महत्त्वाचा प्राथमिक समूह कसा आहे, तो समाजाचा एक महत्त्वाचा मूलभूत घटक कसा आहे याचा

अल्प परिचय करून घेतला. तरुण मुलांच्या समाजीकरणाच्या प्रकियेमध्ये तसेच व्यक्तीच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाच्या अशा कालखंडात मानवी स्वभावाला आकार देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य कुटुंबसंस्था पार पाडते, हेही आपण पाहिले.

'कुटुंबाचा' समाजशास्त्रीय अर्थ समजण्यासाठी आपण नामवंत अशा समाजशास्त्रज्ञांनी दिलेल्या व्याख्यांचा अभ्यास केला आहे. कुटूंब ही एक संस्था म्हणून आई-वडील आणि त्यांची मुले यांच्यामधील परस्पर संबंधाची व्यवस्था असते. एक जैविक घटक म्हणून, कुटूंब ही, स्त्री आणि पुरुष यांच्या लैंगिक संबंधाची समाजमान्य व्यवस्था असते. त्यात अपत्यांचे संगोपन करण्याची व्यवस्था असते. एक सामाजिक घटक या अर्थाने कुटूंब म्हणजे अशा व्यक्तींचा समूह असतो की ज्यामध्ये स्त्री-पुरूष विवाहसंबंधांनी एकत्र आलेले असतात आणि त्यातील सदस्य वय आणि लिंगसापेक्ष भेदानुसार आपली सामाजिक भूमिका पार पाडीत असतात. प्रत्येक कुटुंबाचे स्वत:चे असे नाव असते. ते कशाप्रकारे आले हे शोधण्यासंबंधीची त्यांची स्वत:ची एकपद्धती असते. कुटुंबाचे एकत्रित असे निवासस्थान असते, की ज्या ठिकाणी सदस्य रहात असतात. कुटुंबाद्वारे एकूण समाजासाठीची म्हणून जशी काही कार्ये पार पाडली जातात, त्या प्रमाणेच कुटुंबातील सदस्यांच्या शारिरीक, आर्थिक, मानसिक आणि इतर गरजांची देखील पूर्तता होत असते.

कुटुंबाच्या प्रभेदक अशा वैशिष्ट्यांमध्ये १) सार्वत्रिकता, २) मर्यादित आकार, ३) रक्तसंबंधीय संबंधाचा प्रभाव, ४) सदस्यांमधील कायमस्वरूपी संबंध इ. चा समावेश होतो. कुटुंबाच्या कार्यात्मक वैशिष्ट्यांमध्ये १) सदस्यांसाठी निवास अथवा आश्रय, २) प्रजोत्पादन, ३) मुलांचे संगोपन, ४) समाजीकरण, ५) सामाजिक शिस्तीचे नियमन, ६) सामाजिक स्थाननिश्चिती इ. चा समावेश होतो.

कुटुंबाचे विविध प्रकार आहेत. *विवाहबंधनामध्ये सहभागी असणाऱ्या व्यक्तींच्या संख्येनुसार* कुटुंबाचे तीन प्रकारामध्ये वर्गीकरण केले जाते १) एक विवाही कुटूंब, २) बहुपत्नी-विवाहोत्पन्न कुटूंब, ३) बहुपती-विवाहोत्पन्न कुटूंब; *विवाहानंतर नवविवाहित व्यक्ती नेमक्या कोणत्या ठिकाणी रहातात या आधारावर* १) पितृ-स्थानीय कुटूंब आणि २) मातृ-स्थानीय कुटूंब असे वर्गीकरण केले आहे. *कुटुंबामध्ये असणारे अधिकार अथवा सत्ता या घटकाच्या आधारावर* कुटुंबाचे १) पितृसत्ताक कुटूंब आणि २) मातृसत्ताक कुटूंब असे वर्गीकरण केले आहे. *वारसा पद्धतीनुसार* होणाऱ्या कुटुंबाच्या दोन प्रकारामध्ये १) पितृ-वंशीय कुटूंब आणि २) मातृ-वंशीय कुटुंबाचा समावेश होतो. *कुटूंबाचा आकार आणि रचना या घटकाच्या आधारावर* १) केंद्रित कुटूंब आणि २) संयुक्त अथवा अविभक्त कुटूंब असे दोन प्रकार केले जातात. *कुटूंब सदस्यांमधील संबंधाच्या स्वरुपावरून* दोन प्रकारामध्ये वर्गीकरण केले जाते : १) वैवाहिक कुटूंब, २) जन्माधारित कुटूंब.

पारंपरिक कुटुंबपद्धतीच्या वैशिष्ट्यांमध्ये बदल घडून येत आहे. एक सामाजिक संस्था म्हणून कुटुंबसंस्था स्थिर नसून ती गतीशील स्वरूपाची असते. समाजातील एकूण परिस्थिती बदलत असल्याने कुटुंबामध्ये देखील परिवर्तन घडून येत असते. वेगाने घडून येणारे औद्योगिकरण, नागरीकरणाचे वाढते प्रमाण, ग्रामीण भागाकडून शहरांकडे होणारे स्थलांतर, महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य, वाढता व्यक्तीवाद, उच्च

शिक्षणाचा प्रसार, महिलांचे शिक्षण, महिलांचे विविध व्यवसायांमध्ये होणारे पदार्पण इ. प्रकारच्या सामाजिक परिवर्तनाच्या कारणांमुळे कुटुंबसंस्थेमध्ये बदल घडून येत आहेत.

आधुनिक बदलत्या कुटूंब संस्थेच्या वैशिष्ट्यांमध्ये १) कुटुंबाच्या आकारमानामध्ये झालेली घट, २) संयुक्त कुटुंबाचे केंद्रित कुटूंब पद्धतीमध्ये होणारे विभाजन, ३) कुटुंबातील महिलांच्या स्थानामध्ये झालेला सकारात्मक बदल, ४) कुटुंबाचे होणारे अधिकाधिक लोकतांत्रीकरण, ५) पारंपारिक कुटुंबपद्धतीच्या कार्यात हळूहळू झालेली घट इ. सारखा रचनात्मक आणि कार्यात्मक बदल पारंपारिक कुटुंबपद्धतीमध्ये घडून येत आहे. असे असले तरी, मानवी समाजामध्ये अत्यंत मूलभूत स्वरूपाची आणि प्राथमिक स्वरुपाची संस्था म्हणून अजूनही तिचे स्थान टिकून आहे व ती संपूर्ण समाजव्यवस्थेच्या आणि कुटुंबातील सदस्यांच्या महत्त्वाच्या गरजांची पूर्तता करीत आहे.

या घटकांमध्ये आपण धर्मसंस्थेचा अभ्यास केलेला आहे. आपण प्रामुख्याने, धर्माची व्याख्या, वैशिष्ट्ये, धर्माची कार्ये आणि धर्मजन्य अप-कार्ये इ. घटकांवर लक्ष केंद्रित केले आहे.

धर्म ही एक सार्वत्रिक स्वरुपाची सामाजिक संस्था आहे. ज्ञात अशा सर्व समाज व्यवस्थांच्यामध्ये धर्मसंस्था या ना त्या स्वरुपात आढळून येते. मानवी समाजामध्ये धर्म महत्त्वाची भूमिका पार पाडतो. धर्माचा समाजातील इतर सामाजिक संस्थांशी संबंध असलेला दिसतो. त्यामुळे समाजातील इतर सामाजिक संस्थांवर धर्माचा प्रभाव पडलेला दिसतो. केवळ समाजशास्त्राचे अभ्यासकच नव्हे तर, मानववंशशास्त्रज्ञ, तत्वज्ञ हे देखील धर्माच्या अभ्यासासाठी उत्सुक असतात. अज्ञाताच्या भीतीमुळे अथवा अलौकिक शक्तींवर असणाऱ्या श्रद्धेतून धर्म अस्तित्वात आलेला असतो. मानवाची एक अशी श्रद्धा असते की, व्यक्तीचे भविष्य अथवा नशीब हे त्याच्याहून श्रेष्ठ असणाऱ्या शक्तीकडून नियंत्रित होत असते. मानवाची अशी श्रद्धा असते की, त्याच्या सभोवतालच्या सर्व वस्तूंची आणि मानवाचीदेखील उत्पत्ती मानवाहून श्रेष्ठ अशा शक्तीने केलेली असते. अतिमानवी शक्ती अथवा अलौकिक शक्तीवर असणारी श्रद्धा म्हणजे धर्म होय, अशी काही समाजशास्त्रज्ञांनी धर्माची व्याख्या केली आहे. मानव या ना त्या स्वरुपात सातत्याने, अलौकिक शक्तीला प्रसन्न करून घेण्याचा प्रयत्न करत असतो. प्रत्येक धर्मामध्ये विशिष्ट स्वरुपाच्या श्रद्धा आणि विधी यांचा संच असतो. विविध धर्मातील अनुयायी वेगवेगळ्या प्रकारे त्यांच्या-त्यांच्या धर्माचे आचरण करीत असतात. प्रत्येक धर्माला काही प्रतीके असतात. प्रत्येक धर्मातील अनुयायांच्या संघटना असतात. धर्मगुरु हा ईश्वराची पूजा अर्चा करणारा आणि धर्माशी संबंधित अशा विधींची माहिती असणारा ज्ञानी समजला जातो. अलौकिक शक्तीवरील श्रद्धा, 'पवित्र' आणि 'ऐहिक' वस्तूंमधील भेद, विधी, आचारपद्धती, पवित्रस्थळांशी संबंधित होणाऱ्या यात्रा, धर्मगुरु आणि संत, अलौकिक शक्तींशी संबंधित असणाऱ्या विविध कथा, दंतकथा आणि महाकाव्ये, धर्मग्रंथ इ. बाबींचा अंतर्भाव धर्मात होतो.

धर्माची जी प्रमुख वैशिष्ट्ये आढळून येतात त्यामध्ये (१) धर्मामध्ये श्रद्धांची सुसंगत व्यवस्था असते. (२) संस्कार आणि विधीसंबंधी आचरणाचा संच धर्मामध्ये असतो. (३) धर्म श्रद्धाळू व्यक्तींचा समूह असतो. (४) पवित्र-अपवित्रतेच्या कल्पनाधि धर्माशी संबंधित असतात. (५) पवित्र ग्रंथ आणि तत्त्वज्ञान या

बाबी धर्माशी संबंधित असतात. (६) सर्व धर्मांच्यामध्ये अनुयायांसाठी आचारसंहिता स्पष्ट केलेली असते, या वैशिष्ट्यांचा समावेश आहे, हे आपण समजून घेतले आहे.

धर्माची काही कार्ये आपण अभ्यासली आहेत त्यामध्ये (१) धर्मामुळे सामाजिक ऐक्य आणि समूहभावनेला बळकटी येते. (२) धर्मामुळे समाजातील नैतिक व्यवस्थेला बळकटी प्राप्त हाते. (३) विचलनात्मक वर्तनावर नियंत्रण ठेवण्यास धर्म मदत करतो (४) व्यक्तीला धर्मामुळे मानसिक स्वास्थ्य प्राप्त होते. (५) धर्मामुळे समाज जीवनातील मूल्यांना बळकटी येते. (६) धर्मामुळे वैशिष्ट्यपूर्ण अशा मानसिक आणि भावनिक घटनांचा अनुभव येतो. (७) धर्म समाजकल्याणाला चालना देतो (८) धर्मामुळे करमणूक होत असते. (९) धर्मामुळे वाङ्मय, कला, सौंदर्य इ. बाबींना चालना मिळते. ही कार्ये आपण समजून घेतली आहेत.

धर्मजन्य अशी काही अपकार्ये देखील आपण या घटकात अभ्यासली आहेत. त्यामध्ये (१) मार्क्सवादी दृष्टीकोनानुसार, धर्मामुळे समाजातील असमानता आणि अन्याय यांचे समर्थन होत असते व धर्म पिळवणूकीचे एक साधन या अर्थाने काम करीत असतो. (२) धर्मामुळे धर्मांधता आणि सनातनवादी वृत्तीला चालना मिळू शकते. (३) धार्मिक श्रद्धा स्वतंत्र तार्किक विचार आणि सामाजिक प्रगतीमधला अडथळा बनू शकतात. (४) धर्म दैववादाला आणि पलायनवादाला चालना देतो. (५) धर्म विविध सामाजिक अप-प्रवृत्तींना चालना देतो. (६) धर्मामुळे पैशाची उधळपट्टी होऊ शकते, (७) धर्मामुळे संघर्षाला चालना मिळू शकते. या बाबी समजून घेतल्या आहेत.

या घटकामध्ये आपण शिक्षण संस्थेचा अभ्यास केला आहे. शिक्षण या संज्ञेच्या व्याख्या आणि अर्थ, शिक्षणाची सामाजिक कार्ये आणि शिक्षणाचे प्रकार इ. प्रमुख उप-घटकांचा अभ्यास आपण या घटकात केला आहे. बहुतांशी मानवी वर्तन हे संपादित किंवा शिकून घेतलेले असते. कोणत्याही समाजाला आपल्या सदस्यांना समाजात रहाण्यासाठी लायक बनवावे लागते. त्याचप्रमाणे समाजातील प्रत्येक सदस्यालाही आपले अस्तित्व टिकविण्यासाठी आणि सामाजिक जीवन जगण्यासाठी आवश्यक अशी कौशल्ये, ज्ञान, आणि तंत्रज्ञान शिकून घेणे गरजेचे असते. शिक्षण ही अध्ययन आणि अध्यापनाची एक अशी प्रक्रिया आहे की, ज्याद्वारे समाजातील व्यक्तींना त्याचे समाजातील अस्तित्व टिकविण्यासाठी आवश्यक असणारी कौशल्ये शिकविली जातात. 'educare' या लॅटीन शब्दापासून 'education' या शब्दाची व्युत्पत्ती झाली असून 'educere' या शब्दाचा अर्थ 'Bringing Up' म्हणजे शिक्षण देणे अथवा 'संगोपन करणे' असा आहे. शिक्षणामुळे व्यक्तीच्या अंगी सूप्त अवस्थेत असणारी कौशल्ये आणि पात्रतांचे प्रकटीकरण केले जाऊन त्यांना समाजात राहण्याच्या दृष्टीने सक्षम केले जाते. व्यक्ती समाजाची चांगला नागरिक व्हावी यासाठी व्यक्ती वर्तनाला आकार देण्याचे, व्यक्तीचा मानसिक विकास करण्याचे, तिच्यामध्ये जीवनाची मूल्ये आणि आदर्श रुजवण्याचे, तिचे गुण आणि व्यक्तिमत्त्व विकसित करण्याचे कार्य शिक्षण करते. या घटकात आपण शिक्षणाचा समाजशास्त्रीय अर्थ समजून घेतला आहे. तरुण पिढीच्या समाजीकरणाची प्रक्रिया या अर्थाने शिक्षणाकडे पाहिले जाते. प्रौढपणीच्या भूमिका पार पाडता येण्यासाठी नव्या पिढीला हेतूपुरस्सर दिले जाणारे प्रशिक्षण म्हणजे शिक्षण होय. शिक्षण म्हणजे अशी प्रक्रिया की ज्याद्वारे एखाद्या समूहाचा सामाजिक वारसा

किंवा संस्कृती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रामित केली जाते. दुसऱ्या शब्दांत, समाजशास्त्रीय दृष्ट्या, शिक्षण हे संस्कृती हस्तांतरणाचे साधन ठरते. शिक्षण ही एक अशी प्रक्रिया आहे की, ज्यामध्ये मुलांना अनेक गोष्टी शिकविल्या जातात. शिक्षण ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया असून त्याद्वारे व्यक्तींच्या अभिवृत्तीना आकार मिळत असतो, तसेच समाजातील सदस्यांचे वर्तन निश्चित केले जाते.

या घटकात आपण शिक्षणाची पुढील सामाजिक कार्ये समजून घेतली आहेत : (१) शिक्षण समाजातील सदस्यांचे समाजीकरण करते, (२) शिक्षण संस्कृतीचा वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रामित करते, (३) शिक्षण सामाजिक नियंत्रणाचे एक साधन म्हणून कार्य करते, (४) आधुनिक समाजांमध्ये तर्कसंगत श्रमविभाजनास शिक्षण मदत करते, (५) उर्ध्वगामी सामाजिक गतीशीलतेला शिक्षण चालना देते, (६) शिक्षण समान मूल्यांना चालना देऊन एकात्मतेचे साधन म्हणून कार्य करते, (७) सामाजिक परिवर्तन आणि विकासाचे साधन म्हणून शिक्षण कार्य करते आणि (८) शिक्षण नाविन्यपूर्ण कल्पना आणि चिकित्सक विचार करण्याची पात्रता विकसित करते.

या घटकात शिक्षणाचे पुढील प्रकारही आपण अभ्यासले आहेत : (१) धार्मिक शिक्षण, (२) धर्मनिरपेक्ष शिक्षण, (३) अनौपचारिक शिक्षण, (४) औपचारिक शिक्षण, (५) प्रौढ आणि निरंतर शिक्षण आणि (६) दूर शिक्षण पद्धती.

या घटकात सामाजिक संस्थांचे महत्व व्यक्ती व समाजाच्या दृष्टीने समजावून घेतलेल्या आहात. सामाजिक संस्था मानवी गरजांची पूर्तता, सामाजिक व्यवहारात सुलभता, व्यक्ती वर्तनाचे नियमन आणि नियंत्रण, व्यक्तीच्या दर्जाचे व भूमिकेचे निर्धारण, व्यक्तिमत्व विकास, समाजीकरण, समाजाचे अस्तित्व आणि सातत्य, सामाजिक परिवर्तनाचे साधन या सर्व दृष्टीने सामाजिक संस्थांचे महत्व (कार्य) आहे.

### ३.४ स्वयं – अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to check your progress) :

अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) हॉर्टन आणि हंट - ''संस्था म्हणजे सामाजिक संबंधांची संघटित अशी व्यवस्था की ज्यामध्ये काही समान मूल्ये आणि वर्तनरितींचा समावेश होतो आणि जी समाजाच्या काही मूलभूत गरजा भागविते.''

२) सामाजिक संस्थांचे चार महत्त्वाचे पैलू म्हणजे संरचना, हेतू, यंत्रणा आणि कार्ये.

३) कुटुंबसंस्था, विवाहसंस्था, अर्थव्यवस्था, राज्यसंस्था, शिक्षणसंस्था, धर्मसंस्था आणि मनोरंजनात्मक संस्था या सर्व समाजात दिसून येणाऱ्या काही महत्त्वाच्या सामाजिक संस्था आहेत.

४) ज्या संस्था उत्स्फूर्तपणे व अजाणतेपणे अस्तित्वात येतात आणि मानव समाजाच्या विकासाबरोबर हळूहळू त्यांची वाढ होते त्यांना वर्धमान सामाजिक संस्था म्हणतात.

५) ज्या संस्था जाणूनबुजून व सूज्ञपणाने विशिष्ट काळात विशिष्ट हेतू साध्य करण्यासाठी निर्माण केलेल्या असतात त्यांना विधिस्थापित सामाजिक संस्था म्हणतात.

६) प्राथमिक सामाजिक संस्थात विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, अर्थव्यवस्था यांचा समावेश होतो, तर धर्मसंस्था, शिक्षणसंस्था आणि मनोरंजनात्मक संस्थांचा दुय्यम सामाजिक संस्थात समावेश होतो.

७) सार्वत्रिकता, व्यक्ती आणि समूहांच्या वर्तनाचे नियंत्रण आणि मानवी गरजांचे समाधान करणे ही सामाजिक संस्थांची तीन वैशिष्ट्ये आहेत.

८) विवाहसंस्था लैंगिक संबंधांचे नियमन व नियंत्रण करण्याचे काम करते तर समाजात नवीन सदस्यांची भर टाकणे आणि बालकांचे संगोपन व पालनपोषण करणे ही कुटुंबसंस्थेची कार्ये आहेत.

९) नियमने, मूल्ये, नियम आणि प्रस्थापित कार्यपद्धती हा सामाजिक संस्थांचा नियमनात्मक गाभा आहे.

१०) कारण कोणतीही एखादी व्यक्ती सामाजिक संस्था निर्माण करीत नाही तर व्यक्तिच्या आणि समाजाच्या गरजांच्या पूर्ततेसाठी जे सामुदायिक प्रयत्न केले जातात त्यातून संस्था हळूहळू विकसित होतात.

११) सामाजिक संस्थांची दोन प्रमुख कार्ये पुढीलप्रमाणे : १) सामाजिक संस्था मानवी वर्तनाचे आणि व्यक्ती व समूहातील परस्परसंबंधांचे नियमन करतात. २) समाजव्यवस्थेचे सातत्य व स्थैर्य यासाठी सामाजिक संस्था सकारात्मक योगदान देतात.

१२) 'Family' हा इंग्रजी शब्द 'Famulus' या लॅटीन शब्दापासून तयार झाला आहे.

१३) कुटुंबाचा मर्यादित आकार, कुटुंबातील सदस्यांमध्ये वारंवारपणे येणारे समोरा-समोरचे संबंध आणि त्यांच्यामधील परस्पर-सहकार्य आणि मानवी सामाजिक वर्तनाच्या विकासामध्ये असणारे महत्त्व इ. कारणांमुळे सी. एच्. कूले यांनी कुटुंबाला 'प्राथमिक समूह' म्हटले आहे.

१४) क्लॅरेच्या मते, ''कुटूंब म्हणजे आई-वडील आणि त्यांची मुले यांच्यामध्ये अस्तित्वात असणाऱ्या परस्पर संबंधाची व्यवस्था आहे.''

१५) एलियट आणि मेरील यांच्या मते, ''कुटूंब म्हणजे पती-पत्नी आणि त्यांची मुले या सर्वांचा मिळून बनलेला एक जैविक व सामाजिक समूह होय.''

१६) मॅकायव्हर - ''प्रजोत्पादन आणि जन्माला येणाऱ्या मुलांचे संगोपन व्हावे यासाठी ज्या समूहात टिकाऊ स्वरुपाच्या लैंगिक संबंधाचे पर्याप्त काटेकोरपणे निश्चितीकरण झालेले असते, असा समूह म्हणजे कुटूंब होय.''

१७) सार्वत्रिकता, प्रजोत्पादन, मर्यादित आकार, मुलांचे पालण-पोषण ही कुटुंबाची चार वैशिष्ट्ये आहेत.

१८) कुटुंबातील सदस्यांचे समाजीकरण करणे, कुटुंब सदस्यांना वर्तनविषयक मापदंड किंवा आदर्श घालून देणे, व्यक्तीची सामाजिक स्थाननिश्चिती करणे ही कुटुंबाची तीन कार्ये सांगता येतील.

१९) विवाह बंधनामध्ये सहभागी असणाऱ्या व्यक्तींच्या संख्येवरून कुटुंबाचे १) एकविवाही कुटूंब, २) बहुपत्नी- विवाहोत्पन्न कुटूंब आणि, ३) बहुपती-विवाहोत्पन्न कुटूंब असे तीन प्रकार पडतात.

२०) विवाहित जोडीचे निवास करण्याच्या ठिकाणावरून १) पितृ-स्थानीय कुटूंब आणि, २) मातृ-स्थानीय कुटूंब असे दोन प्रकारामध्ये वर्गीकरण केले जाते.

२१) संयुक्त कुटूंब म्हणजे ज्या कुटुंबामध्ये, तीन पिढ्यांपर्यंतचे सर्व स्त्री आणि पुरुष एकत्रितपणे रहात असतात असे कुटूंब होय.

२२) जलदगतीने होणारे औद्योगीकरण, नागरीकरणाचे वाढते प्रमाण, ग्रामीण भागाकडून शहरांकडे होणारे स्थलांतर, महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य, वाढता व्यक्तीवाद, उच्च शिक्षणाचा प्रसार, महिलांचे शिक्षण आणि विविध व्यवसायांमध्ये महिलांचे होणारे पदार्पण इ. कारणांमुळे पारंपारिक कुटुंबामध्ये रचनात्मक, कार्यात्मक बदल घडून येत आहेत.

२३) बदलत्या कुटूंब संस्थेच्या वैशिष्ट्यांमध्ये १) कुटुंबाच्या आकारमानामध्ये झालेली घट, २) संयुक्त कुटूंब पद्धतीचे केंद्रित कुटुंबपद्धतीमध्ये झालेले रूपांतर, ३) कुटुंबातील महिलांच्या दर्जामध्ये झालेला सकारात्मक बदल, ४) पारंपारिक कुटुंबपद्धतीच्या कार्यांचे कमी होत असलेले प्रमाण इ. चा समावेश होतो.

२४) शेती व्यवसायाचे यांत्रिकीकरण, वारसा हक्काने मिळालेल्या शेत जमिनींचे कायदेशीर विभाजन, रोजगार संधीच्या शोधात आणि चांगल्या शिक्षणाच्या निमित्ताने कुटुंबातील तरुण सदस्यांचे ग्रामीण भागाकडून शहरांकडे होणारे स्थलांतर इ. कारणांच्यामुळे संयुक्त कुटुंबपद्धती विभागून ती केंद्रित कुटूंब म्हणून आकार घेत आहे.

२५) पारंपारिक कुटूंब हे उत्पादनाचे केंद्र होते, कुटुंबातील तरुणांना पारंपारिक व्यवसायाचे प्रशिक्षण मिळत होते व कुटुंबातील आजारी आणि वृद्ध व्यक्तींची सेवा केली जात होती. ही सर्व पारंपारिक कार्ये आता कुटुंबाशिवाय इतर संस्थांकडून केली जातात.

२६) एमिल दुरखीम ''ज्या पवित्र वस्तूना ऐहिक जीवनापासून वेगळे केले जाते आणि ऐहिक जीवनातून वर्ज्य मानले जाते त्या पवित्र वस्तूंशी निगडित असलेल्या श्रद्धा आणि विधींची एकात्म व्यवस्था म्हणजे धर्म होय''

२७) जॉन्सन एच. एम्. ''वस्तू, शक्ती, स्थळे आणि इतर बाबीं यासंदर्भातील अलौकिक व्यवस्थेशी सबंधित श्रद्धा आणि विधींची कमी अधिक संघटित व्यवस्था म्हणजे धर्म होय''

२८) धर्माची प्रमुख तीन वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे : (१) संस्कार आणि विधीसंबंधी आचरणाचा संच धर्मामध्ये असतो. (२) धर्म श्रद्धाळू व्यक्तींचा समूह असतो. (३) धर्म पवित्र आणि ऐहिक वस्तूंच्यामध्ये फरक करतो.

२९) दुरखीम यांच्या मते सामाजिक ऐक्य निर्माण करणे, सामाजिक एकात्मता आणि समूह भावनेला बळकटी प्राप्त करून देणे हे धर्माचे सामाजिक कार्य आहे.

३०) धर्माची प्रमुख चार कार्ये पुढीलप्रमाणे (१) धर्मामुळे सामाजिक ऐक्य आणि समूह भावनेला बळकटी प्राप्त होते. (२) धर्मामुळे समाजातील नैतिक व्यवस्थेला बळकटी येते. (३) धर्म विचलनात्मक वर्तनावर नियंत्रण ठेवतो. (४) सामाजिक नियंत्रणाचे एक साधन म्हणून धर्म कार्य करीत असतो.

३१) पुराणातील देव-देवतांच्या कथा, किर्तन, भक्तीगायन, नृत्य, नाटक, धार्मिक सण, उत्सव, जत्रा इ. सारख्या कला प्रकारांतून धर्म मनोरंजनाचे कार्य पार पाडतो.

३२) मार्क्सवादी दृष्टीकोणानुसार धर्माद्वारे समाजातील असमानतेचे आणि अन्यायाचे समर्थन केले जाते आणि पिळवणूकीचे एक साधन म्हणून धर्माचा वापर केला जातो.

३३) धर्मजन्य स्वरूपाच्या चार अप-कार्यांच्या मध्ये (१) धर्मामुळे धर्मांधता आणि सनातनवादी वृत्तीला चालना मिळू शकते. (२) धार्मिक श्रद्धा स्वतंत्र तार्किक विचार आणि सामाजिक प्रगतीमधला अडथळा बनू शकतात. (३) धर्म दैववादाला आणि पलायनवादाला चालना देतो. (४) धर्म विविध सामाजिक अप-प्रवृत्तींना चालना देतो. या बाबींचा उल्लेख करता येईल.

३४) 'Education' या शब्दाची व्युत्पत्ती 'educare' या लॅटीन शब्दापासून झाली असून 'educare' या शब्दाचा अर्थ 'Bringing Up' म्हणजे 'शिक्षण देणे' किंवा 'संगोपन करणे' असा घेतला जातो.

३५) एमिल दुरखाईम - ''शिक्षण म्हणजे 'नव्या पिढीचे समाजीकरण' होय. मुलांना ज्या बाबी स्वयंपूर्णपणे अवगत करता येऊ शकल्या नसत्या त्या बाबी, म्हणजे सभोवतालच्या विश्वातील घटनांकडे पहाण्याच्या पद्धती किंवा दृष्टिकोन, समाजमान्य असे वर्तनाचे आणि भावनांच्या अनुभवाचे आणि आविष्काराचे प्रकार मुलाच्या मनावर बिंबविण्याचे सातत्यपूर्ण प्रयत्न म्हणजे शिक्षण होय.''

३६) ए. डब्ल्यू ग्रीन - ''ऐतिहासिकदृष्ट्या तरुणांना नंतर प्रौढपणीच्या भूमिका स्वीकारता याव्यात यासाठी दिले गेलेले जाणीवपूर्वक प्रशिक्षण म्हणजे शिक्षण होय. पण, आधुनिक संकेतानुसार शिक्षण म्हणजे शाळेसारख्या औपचारिक संघटनांमध्ये विशेषज्ञांकडून दिले जाणारे औपचारिक प्रशिक्षण होय.''

३७) शिक्षणाच्या प्रमुख तीन सामाजिक कार्यांमध्ये : (१) शिक्षण समाजातील सदस्यांचे सामाजीकरण करते, (२) शिक्षण संस्कृतीचा वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रामित करते आणि (३) सामाजिक नियंत्रणाचे एक साधन म्हणून शिक्षण कार्य करते, यांचा समावेश होतो.

३८) नाही. शिक्षण केवळ मागील काळात संचय करून ठेवलेल्या ज्ञानाचेच हस्तांतर करीत नाही, तर ते नव-नवीन विचारांना, नव्या कल्पनांना आणि चिकित्सकपणे विचार करण्याच्या पद्धतींना प्रोत्साहन देते.

३९) समाजातील सामाजिक समस्या, कालबाह्य सामाजिक प्रथा आणि वाईट स्वरूपाच्या सामाजिक प्रथांचे निर्मूलन करण्यासाठी शिक्षण मदत करते; विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील ज्ञान वाढविण्यासाठी शिक्षण प्रयत्न करते, देशातील नागरिकांच्यामध्ये सहकार्य आणि स्पर्धा यासारखी मूल्ये रुजवण्याचे कार्य करते. अशाप्रकारे समाजाचा विकास आणि परिवर्तनाचे एक साधन म्हणून शिक्षण कार्य करते.

४०) शिक्षण समान मूल्यांना चालना देऊन सामाजिक एकात्मतेचे साधन म्हणून कार्य करते.

४१) धर्मनिरपेक्ष शिक्षण म्हणजे असे शिक्षण की जे कोणत्याही एका विशिष्ट धर्माच्या प्रभावाखाली नसते. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमधून दिल्या जाणाऱ्या आधुनिक शिक्षणाला धर्मनिरपेक्ष शिक्षण म्हटले जाते.

४२) अनौपचारिक शिक्षण हे अनौपचारिक अशा सामाजिक संपर्कातून दिले जाते. अशा शिक्षणासाठी शाळा, महाविद्यालयांसारख्या शिक्षण संस्थांमध्ये नोंदणी असावी लागत नाही, तसेच त्यासाठी विशिष्ट अभ्यासक्रम, प्रशिक्षित शिक्षकवर्ग, विद्यार्थ्यांसाठी औपचारिक परीक्षापद्धती आणि श्रेणी पद्धती नसते.

४३) उच्च शिक्षणाच्या प्रसारामधील दूर-शिक्षण ही एक संकल्पना असून त्यामध्ये विद्यार्थ्यांना अभ्यासासाठीचे अथवा वाचनासाठीचे साहित्य (Study Material) पुरविले जाते व त्याच्या आधारे विद्यार्थ्यांनी स्वत:च अभ्यास करून परीक्षा देऊन पदवी संपादन करावयाची असते.

४४) शिक्षणाच्या विविध प्रकारांमध्ये (१) धार्मिक शिक्षण (२) धर्मनिरपेक्ष शिक्षण (३) अनौपचारिक शिक्षण (४) औपचारिक शिक्षण, (५) प्रौढ आणि निरंतर शिक्षण आणि (६) दूर शिक्षण पद्धती यांचा समावेश होतो.

ब) योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.

१. अ) सामाजिक संस्था

२. ब) दर्जा व भूमिका

३. ड) वरील सर्व

## ३.५ सरावासाठी प्रश्न / गृहपाठ (Exercise / Home Assignment) :

१) सामाजिक संस्थाची व्याख्या सांगून त्यांचा अर्थ स्पष्ट करा.

२) सामाजिक संस्थांच्या महत्त्वाच्या वैशिष्ट्यांची थोडक्यात चर्चा करा.

३) टिपणे तयार करा.

अ) सामाजिक संस्थांचे प्रमुख पैलू.

ब) सामाजिक संस्था आणि समग्र समाजव्यवस्था.

क) वर्धमान सामाजिक संस्था आणि विधिस्थापित संस्था.

ड) प्रमुख सार्वत्रिक सामाजिक संस्था आणि त्यांची कार्ये.

४) कुटुंबाची व्याख्या देऊन एक सामाजिक संस्था, एक जैविक एकक आणि एक सामाजिक घटक म्हणून कुटुंबाचे स्वरूप स्पष्ट करा.

५) कुटुंबाची प्रभेदक वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

६) कुटुंबाचे वेगवेगळे प्रकार स्पष्ट करा.

७) कुटूंब संस्थेच्या बदलत्या वैशिष्ट्यांवर टीप लिहा.

८) एकूण समाजरचनेच्या आणि कुटुंबातील सदस्यांच्या दृष्टीने असणाऱ्या कुटुंबाच्या महत्त्वावर टीप लिहा.

९) धर्माची कोणतीही एक व्याख्या देऊन, धर्माची प्रभेदक वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

१०) समाजातील धर्माची विविध कार्ये स्पष्ट करा.

११) 'धर्माची अप-कार्ये' या विषयावर टीप लिहा.

१२) शिक्षणाची व्याख्या देऊन त्याचा समाजशास्त्रीय अर्थ स्पष्ट करा.

१३) शिक्षणाची सामाजिक कार्ये स्पष्ट करा.

१४) शिक्षणाच्या विविध प्रकारांवर टीप लिहा.

१५) सामाजिक संस्थेचे महत्व सविस्तर विशद करा.

१६) टिपा लिहा.

१) सामाजिक संस्थेचे महतव

## ३.६ चिंतन व कार्य (Reflections and Actions) :

१) एक सामाजिक संस्था म्हणून कुटुंबसंस्थेचे तुम्ही निरीक्षण करा आणि केंद्र कुटुंबातील परिस्थिती, आई वडील व त्यांची मुले यांच्यातील संबंधांचे नियंत्रण करणारी नियमने आणि कुटुंबाकडून केली जाणारी कार्ये विशद करा.

२) समकालीन भारतीय समाजातील विवाहसंस्थेमध्ये कस-कसा बदल होत आहे याचा अभ्यास करून त्याबाबत एक टिपण तयार करा.

३) जर तुम्ही लहान शहर अथवा नगरांमध्ये रहात असाल तर त्या ठिकाणचे कुटुंबप्रकार शोधून काढण्याचा प्रयत्न करा. तसेच तुमच्या शहरातील कुटुंबसंस्थेमध्ये घडून येत असलेल्या बदलांचे स्वरूप माहित करून घेण्याचा प्रयत्न करा. तुमच्या स्वत:च्या निरीक्षणाच्या आधारावर त्यासंबंधी एक टीप तयार करा.

४) जर तुम्ही ग्रामीण भागातील असाल तर तुमच्या खेड्यातील कुटूंब प्रकाराचा अभ्यास करा. ग्रामीण भागातील कुटुंबाच्यामध्ये देखील बदल घडून येत आहे असे तुम्हाला वाटते का? आणि जर बदल घडून येत असेल तर तो कोणत्या संदर्भात बदल घडून येत आहे? तो का घडून येत आहे? तुमच्या स्वत:च्या निरीक्षणाच्या आधारावर या सर्व घटकांवर आधारीत एक टीप तयार करा.

## ३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings) :


1) MacIver, R.M. and C.H. Page: *Society: An Introductory Analysis*, MacMillan India Ltd., Madras, 1986.
2) Gisbert, P.: *Fundamentals of Sociology,* Orient Longmans, III Ed., Bombay 1973.
3) Johnson Harry M.: *Sociology: A Systematic Introduction*, Allied Publishers Ltd., New Delhi, 1960.
4) Vidaya Bhushan & Sachdeva: *An Introduction to Sociology*, Kitab Mahal, Allahabad, 1993.
5) Shankar Rao, C.N.: *Sociology: Primary Principles,* S Chand & Co., New Delhi, 2004.
6) Perry John & Erna K. Perry: *Contemporary Society: An Introduction to Social Science*, Allyn & Bacon, Boston, 2000.
7) Barnes, Harry Elmer: *Social Institutions*, Prentice Hall, New York, 1984.
8) Sumner, W.G. and Keller: *The Science of Society,* Ginn and Co., New York, 1980.
9) Sharma, R.N.: *Principles of Sociology,* Asia Pub. House, Bombay, 1968.
10) Mitchell, Duncan G.: *A New Dictionary of Sociology*, Routledge, London, 1989.

११) डॉ. सर्जेराव साळुंखे – समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना, नरेंद्र प्रकाशन पुणे.

१२) डॉ. प्रदीप आगलावे – समाजशास्त्र, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

१३) प्रा. चंद्रकांत खंडागळे – मूलभूत समाजशास्त्र, प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे

१४) डॉ. माणिक माने – सुबोध समाजशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर.

१५) डॉ. सुमन बेहरे – भारतीय सामाजिक संस्था, विद्या प्रकाशन, नागपूर.


❑❑❑

**घटक–४**

# सामाजिक समूह

(Social Groups)

**संरचना** (Structure) :

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

४.२.१ सामाजिक समूहाचा अर्थ व वैशिष्ट्ये

४.२.२ सामाजिक समूहाच्या वर्गिकरणाचे निकष

४.२.३ प्राथमिक व दुय्यम समूह

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

४.३ सारांश

४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांचे उत्तरे

४.५ सरावासाठीचे प्रश्न

४.६ चिंतन आणि कृती

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्ट्ये (Objectives) :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास,

- सामाजिक समूह अर्थ आणि वैशिष्ट्ये समजून घेता येईल.
- सामाजिकीकरणाच्या समूहाचे वर्गीकरणाचे निकष समजून घेता येतील.
- प्राथमिक आणि द्वितीय समुहाविषयी माहिती घेता येईल.

## ४.१ प्रस्तावना (Introduction) :

तुम्ही अनेक वाघ, हत्ती, माकड यासारखे वन्य प्राणी पाहिले असतील की, ते सुद्धा समूह करून राहतात. मानव हा समाजशील प्राणी आहे, आणि तो सुद्धा समूह करून राहतो. समूह जीवनासंबंधीचे विविध

घटक असून त्यापैकी भौगोलिक, सांस्कृतिक, राजकीय, धर्मिक, मानसशास्त्रीय इत्यादी सारख्या घटकांच्या माध्यमातून व्यक्तींना एकत्रित ठेवून समूहाच्या निर्मितीसाठी वरील विविध घटक नेहमीच कार्यरत असतात. व्यक्तीचे एकांतातील अस्तित्त्व ही केवळ आपली कल्पना आहे आणि म्हणून प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ जॉर्ज सिमेल यांनी म्हटल्याप्रमाणे 'स्व-अस्तीत्त्ववाद' (Salipsism) ही एक मोठी समाजशास्त्रीय काल्पनिकता आहे. सामान्यता: कोणतीही व्यक्ती एकटी राहू शकत नाही. प्राचीन ग्रिक विचारवंत ॲरिस्टॉटल यांनी म्हटल्याप्रमाणे, जो कोणी समाजामध्ये राहत नसतो तो एक तर नरपशू किंवा देवदूत असतो याचा अर्थ समाजातील सर्व व्यक्ती ह्या समूहामध्येच राहत असतात. सामाजिक जीवन हेच खऱ्या अर्थाने समूह जीवन असते.

या घटकाअंतर्गत आपण सामाजिक समूहाचा अर्थ, वैशिष्ट्ये आणि महत्त्व यांचा अभ्यास करणार आहोत.

## **४.२ विषय विवेचन** (Presentation of Subject Matter) :

या घटकामध्ये अभ्यासविषयाची मांडणी खालील तीन विभागात करता येईल. उदा.- पहिल्या विभागामध्ये सामाजिक समूह संकल्पनेचा अर्थ आणि व्याख्या याची चर्चा करता येईल. दुसऱ्या विभागात सामाजिक समूहाची प्रमूख वैशिष्ट्ये विचारात घेता येतील आणि तिसऱ्या विभागामध्ये मानवी जीवनात सामाजिक समूहाचे असणारे महत्त्व विशद करता येईल.

### **४.२.१ सामाजिक समुहाचा अर्थ आणि वैशिष्ट्ये** (The concept of social group definitions):

''सामाजिक समूह'' या संकल्पनेच्या व्याख्या विविध पद्धतीने वेगवेगळ्या समाजशास्त्रज्ञांनी स्पष्ट केल्या आहेत. त्यापैकी काही नामवंत समाजशास्त्रज्ञांच्या व्याख्या खाली दिलेल्या आहेत व अशा व्याख्यांच्या आधारे प्रथम आपण 'सामाजिक समूह' या संकल्पनेचा अर्थ जाणून घेऊ या.

१) **हॅरी जॉन्सन :** ''सामाजिक आंतरक्रियेची व्यवस्था म्हणजे सामाजिक समूह होय.''

(A social group is a system of social interaction) – Harry Johnson.

२) **हॉर्टन व हंट :** ''सदस्यत्वाची व आंतरक्रियांची जाणीव असणारे कितीही लोक म्हणजे सामाजिक समूह होय.''

(Any number of persons who share a consciousness of membership and of interaction) – Horton and Hunt.

३) **मार्शल जोन्स :** ''दोन किंवा त्यापेक्षा अधिक अशा व्यक्तींच्यामध्ये स्थापित झालेल्या आंतरक्रियेची व्यवस्था म्हणजे सामाजिक समूह होय.''

(A social group is two or more persons between whom there is an established pattern of interaction)- Marshall Jones.

४) **टिशेलर, व्हायटन व इंटर :** ''आपण एक विभिन्न सामाजिक एकक असण्याची जाणीव असणाऱ्या व समाज संघटनांच्या एखाद्या प्रतिमानानुसार वारंवार आंतरक्रिया करणाऱ्या दोन किंवा अधिक व्यक्तींचा सामाजिक समूहात समावेश होतो.''

(Social group consists of two or more individuals who interact recurrently according to some pattern of social organization and who recognize that they constitute a distinct social unit)- Tischler, Whitten and Hunter.

५) **एलि चिनॉय :** ''परस्पर संबंधित भूमिका आणि दर्जाच्या संचावर ज्यांच्यामधील संबंध अवलंबून असतात अशा व्यक्तींचा समावेश सामाजिक समूहात होतो.''

(A social group consists of number of persons whose relationships are based upon a set of interrelated roles and statuses)- Ely Chinoy.

६) **ऑगबर्न व निमकॉफ :** ''जेंव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती एकत्र येतात आणि एकमेकांवर प्रभाव पाडतात तेंव्हा समूह निर्माण होतो.''

(Whenever two or more individuals come together and influence one another they may be said to constitute a social group)- Ogburn and Nimkoff.

७) **डेव्हीड ड्रेसलर :** ''परस्पर आंतरक्रियांचा परिणाम म्हणून आपण सर्वजण संबंधित आहोत अशा प्रकारची भावना जेंव्हा अनेक व्यक्तींच्यामध्ये निर्माण होते तेंव्हा समूह अस्तित्त्वात येतो.''

(A group exists when a sense of relatedness is shared by a number of individuals as a consequence of their interacting or having interacted with one another)- Devid Dressler.

८) **बोगार्डस इ. ए. :** ''दोन किंवा दोन पेक्षा अधिक व्यक्तींचा समजला जाणारा असा समूह की, ज्यामधील व्यक्तींचे समाज उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित झालेले असते, जे परस्परांना प्रेरणा देतात आणि ज्यांच्यामध्ये सामूहिक स्वरुपाची निष्ठा असून कधी एकाच प्रकारच्या कृतीत सहभागी झालेल्या असतात. त्याला सामाजिक समूह असे म्हटले जाते.''

(A social group may be thought of as a number of persons, two or more, who have some common objects of attantion, who are stimulating to each other, who have common loyalty and participate in similar activities)- Borardus E. A.

९) **किंबाल यंग :** ''दोन किंवा दोहोपेक्षा अधिक व्यक्तींच्या मधील आंतरक्रियेने समूह निर्माण होतो.''

(Two or more persons in interaction constitute a group)- Kimball Young.

**सामाजिक समूहाचा अर्थ** (Meaning of Social Gropu) :

जर आपण सामाजिक समूहाच्या संदर्भातील वरील विविध महत्त्वपूर्ण व्याख्यांचे काळजीपूर्वक वाचन केले तर आपणास असे दिसून येईल की, वरील व्याख्यांमधून सामाजिक समूह या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करणारे खालील मुद्दे असे आहेत.

१) सामाजिक समूह अस्तीत्त्वात येण्यासाठी किमान दोन व्यक्तींची आवश्यकता असते.

२) एखाद्या विशिष्ट समूहामध्ये कितीही व्यक्ती असू शकतात.

३) व्यक्तींच्यामध्ये परस्पर आंतरक्रिया घडून येणे आवश्यक असते.

४) समूहातील व्यक्तींना आंतरक्रियांची जाणीव असावी लागते.

५) आंतरक्रियेत समाविष्ट असणाऱ्या व्यक्तींना, अगर या आंतरक्रिया अर्थपूर्ण आहेत असे त्यांना वाटावे लागते.

६) एका समूहाचे सदस्य म्हणून आंतरक्रियेत समाविष्ट असणाऱ्या व्यक्तींना त्यांच्याबद्दल आणि इतरांच्याबद्दल जाणीव असणे गरजेचे आहे.

७) समूहामध्ये प्रत्येक व्यक्तीला विशिष्ट पद (दर्जा आणि भूमिका) असले पाहिजे. सामान्यता: कोणत्याही समूहातील सर्व पदे, स्थाने व भूमिका परस्पर संबंधित असून व्यक्तीचे वर्तन भूमिकांना अनुसरून होत असते.

८) समूहातील सदस्यांनी तसेच समूहाची स्वत:ची काही उद्दिष्टे किंवा हेतू असतात आणि समूहाचे सदस्य एकमेकांच्या सहकार्याने ती उद्दिष्टे पार पाडीत असतात.

९) समूहातील सर्व प्रकारची पदे परस्पर संबंधित असतात की ज्यामुळे समूहाची निश्चित अशी रचना तयार होत असते.

१०) लोकांचा समुच्चय (Social Aggregation) आणि सामाजिक प्रवर्ग (Social Category) या दोन संकल्पनाहून सामाजिक समूह ही संकल्पना वेगळी आहे.

**लोकांचा समुच्चय** म्हणजे एखाद्या विशिष्ट वेळी एकमेकांच्या निकट शारीरिक सानिध्यात असलेल्या कितीही व्यक्ती होय. उदा. प्लॅटफॉर्मवर थांबलेले प्रवासी तर सामाजिक प्रवर्ग (Social Category) म्हणजे एखाद्या विशिष्ट समान गुणधर्माने युक्त अशा कितीही व्यक्तींचा समावेश होय. उदा.- स्त्रिया, पुरुष, विद्यार्थी इत्यादी थोडक्यात लोकसमुच्चय आणि सामाजिक प्रवर्ग हे सामाजिक समूह बनू शकतात मात्र त्यांच्यामध्ये आंतरक्रिया घडाव्या लागतात.

**सामाजिक समूहाची वैशिष्ट्ये** (Characteristics of Social Group)

'सामाजिक समूह' या संकल्पनेचे भिन्न भिन्न अर्थ आणि नामवंत समाजशास्त्रज्ञांनी सांगितलेल्या सामाजिक समूहाच्या विविध व्याख्यांच्या आधारे सामाजिक समूहांची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आढळून येतात.

**१) किमान दोन किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश सामाजिक समूहात होतो**

(A social group consists of two or more individuals)

समूह अस्तीत्त्वात येण्यासाठी किमान दोन व्यक्तींची आवश्यकता असते, याचा अर्थ समूहाच्या निर्मितीसाठी किमान दोन व्यक्ती एकत्रित याव्या लागतात, त्याखेरीज समूहाची निर्मिती होऊ शकत नाही. दोन व्यक्तींचा समूह हा लहानात लहान सामाजिक समूह होय, अशा समूहाना विल्यम सम्नर यांनी अ 'Dyad' असे संबोधिले तर तीन व्यक्तींच्या समूहाला त्रिकूट (Triad) असे म्हटले सम्नरच्या मते, जस जशी समूहातील सदस्य संख्या वाढत जाते. तसतशी समूह रचनेतील गुंतागुंत देखील वाढत जाते. समूहामध्ये सदस्यांची संख्या कितीही असू शकते. कुटूंब अथवा नवदांपत्य हे लहान समूहाचे जसे उदाहरण देता येते त्याचप्रमाणे शहर, महानगर, अथवा राष्ट्र यांना देखील समूह म्हणता येईल.

**२) सामाजिक आंतरक्रिया व त्यांची जाणीव :** (Social interactions and awareness)

सामाजिक समूहाचे सामाजिक आंतरक्रिया व त्यांची जाणीव हे दुसरे ठळक वैशिष्ट्य आढळून येते. जेंव्हा लोकांच्यामध्ये आंतरक्रिया घडून येतील आणि अशा आंतरक्रियांची स्पष्ट जाणीव त्यांच्यात असेल तेंव्हाच खऱ्या अर्थाने सामाजिक समूह अस्तित्त्वात येतो. थोडक्यात केवळ व्यक्ती एकत्रित आल्या म्हणून समूह निर्माण होत नाही तर त्यांच्यामध्ये परस्पर आंतरक्रिया झाल्याच पाहिजेत. उदा.- बसस्टॉपवर बसची वाट पहात असणाऱ्या प्रवाशांच्या केवळ तेथील उपस्थितीमुळे सामाजिक समूहाची निर्मिती होत नाही. जर बसस्टॉपवरील प्रवाशी बस उशिरा येण्यासंबंधीच्या संभाव्य कारणासंबंधी परस्पराशी चर्चा करत असतील तर त्याठिकाणी समूह आकारण येतो. त्यांच्यामध्ये परस्पराविषयी जाणीव निर्माण झाल्यानेच त्यांच्यात आंतरक्रिया घडून येत असते. यातूनच समूहाची निर्मिती होते. सदस्यांमधील सामाजिक आंतरक्रिया आणि परस्पराविषयची जाणीव समूह निर्मितीसाठी आवश्यक अट समजली जाते.

**३) सदस्यामधील सापेक्षत: टिकाऊ संपर्क :**

(Relatively parmenant contact amoung the members)

सदस्यांमधील संबंध हे केवळ प्रासंगिक स्वरुपाचे अथवा तात्पुरत्या स्वरुपाचे असतील तरच तो खऱ्या अर्थाने सामाजिक समूह म्हणता येणार नाही. उदा.- प्रवास करतेवेळी सोबत असणाऱ्या इतर प्रवाशांच्यामुळे जो समूह निर्माण होतो तो तात्पुरत्या स्वरुपाचा समूह (Temporary) असतो. ज्यावेळी प्रवाशी अपापल्या गांवी जाण्यासाठी त्यांच्या स्टेशनवर उतरतात तेंव्हा त्यांचा समूह नाहीसा होतो. असे तात्पुरते संबंध

समूहाच्या स्थैर्याच्या दृष्टीने निरुपयोगी ठरतात. अर्थात समूहातील सदस्यांत कायमचे भौतिक सानिध्य असावेत असे नाही पण कोणत्या ना कोणत्या स्वरुपात अशा संपर्कामुळे समान हेतू साध्य करता येतात. सापेक्षत: टिकाऊ संपर्क मात्र हवा. त्यामुळे टिकाऊ संपर्क हे एक सामाजिक समूहाचे वैशिष्ट्य आहे.

**४) समान हेतू ध्येय अथवा समान उद्दिष्ट :** (Common Purpose, similar Goals)

कोणत्याही समूहातील सदस्यांचे विशिष्ट हेतू, ध्येय अथवा उद्दिष्ट्ये असतात. अशा हेतू, ध्येय आणि उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी किंवा ती साध्य करून घेण्यासाठी म्हणून सदस्य एकत्रित येवून समूहाची स्थापना करीत असतात.

थोडक्यात असे समान हेतू, ध्येय अथवा उद्दिष्ट साध्य करण्यासाठीच समूहाची स्थापना केली जाते. उदा. कामगारांनी त्यांच्या न्याय मागण्यांच्या पूर्ततेसाठी आणि स्वत:च्या संरक्षणासाठी म्हणून कामगार संघटनेची स्थापना केलेली असते. त्याचप्रमाणे राजकीय समूह, धार्मिक समूह, शैक्षणिक व आर्थिक समूह हे आपल्या समूहातील सदस्यांच्या विविध गरजांची पूर्तता करण्यासाठीच निर्माण झालेले असतात. समान उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठीच व्यक्ती एकत्र येतात, त्यांच्यात आंतरक्रिया घडून येते आणि त्यातूनच सामाजिक समूहाची निर्मिती होते. समूह अस्तीत्त्वात राहण्यासाठी समूहाच्या उद्दिष्टांबाबत अशा समूहाच्या सर्व सदस्यांमध्ये किमान मतैक्य असणे आवश्यक असते.

**५) आपलेपणाची भावना, समूहातील ऐक्य किंवा सदस्यांमधील ऐक्य भावना :**

(We feeling, Group Solidarity or Unity among mambers)

सामान्यत: समूहातील सदस्यांच्यामध्ये आपलेपणाची भावना किंवा समूहाबद्दलची तीव्र आपुलकी असते, समूहातील सदस्यांची आपलेपणाची प्रवृत्ती त्या समूहाशी निगडीत असते. अशा स्वरुपाची समूह भावना अथवा आपलेपणाची वृत्ती समूहाची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी मदत करणे. त्यामधून समूहातील ऐक्य किंवा ऐक्य भावना दिसून येते. समूहामध्ये असणारे ऐक्य आणि ऐक्यभावनेचे स्वरुप यावरून समूहाची स्थिरता व सातत्य निश्चित होत असते.

थोडक्यात समूहातील सर्व सभासदांच्या ठिकाणी आपण सर्वजण एक आहोत ही जाणिव फार मोठ्या प्रमाणात असते. समान वर्तनातूनच एकतेची जाणिव आकाराला येते.

**६) स्वत:ची एक संरचना** (Structure of their Own) :

प्रत्येक सामाजिक समूहाची स्वत:ची अशी एक संरचना असते व अशी संरचना त्या समूहामध्ये असणाऱ्या विविध परस्पर संबंधित अशा सामाजिक पदांनी (दर्जा व भूमिका) मिळून तयार झालेली असते. याचा अर्थ समूहातील प्रत्येक व्यक्तीला समूहात निश्चित असे स्थान असते. त्या स्थानानुरुप किंवा दर्जानुरूप व्यक्तीला आपल्या भूमिका वठवाव्या लागतात. समूहातील असे दर्जे आणि भूमिका परस्पर संबंधित असतात. त्यांचा आशय सामाजिक नियमनानी व्यापलेला असतो अशी नियमने सदस्यांचे कार्य नियंत्रित

करतात. त्यामुळेच समूहातील व्यक्तींच्या परस्परसंबंधाना टिकाऊ स्वरुप प्राप्त होते. उदा.- कुटुंब, महाविद्यालय, यासारख्या सर्वच समूहांना संरचना असते.

समूहातील सदस्य जेंव्हा विविध पदांवर काम करीत असतात त्यावेळी त्यांना आपल्या पदाला साजेशी अथवा योग्य अशी भूमिका पार पाडावी अशी अपेक्षा असते. त्यामुळे समूहातील पदांचे स्वरुप नियमनात्मक असते. यातूनच अनेक समूहाला स्वत:ची एक संरचना प्राप्त झाल्याचे आढळते. समूहातील नियम जसे लिखित व अलिखीत स्वरुपात असतात तसेच ते काही वेळा एकत्रित स्वरुपात देखील असतात, उदा.- दोन मित्रांचा समूह हा अलिखीत नियमनावर कार्यरत असतो तर कामगार संघटनेला लिखीत घटना असते. याऊलट कुटुंबासारख्या समूह सदस्यांचे संबंध हे अलिखीत नियमानी नियंत्रीत होत असतात.

७) **समूहाचे स्वतंत्र अस्तित्व** (Independent Existence) :

जरी व्यक्तींच्यामुळे समूह तयार होत असला तरी, सामाजिक समूहाना समूहाअंतर्गत असणाऱ्या व्यक्तींच्या गोळा बेरजेपेक्षा वेगळे स्थान असते. याचा अर्थ व्यक्तींची केवळ गोळाबेरीज म्हणजे समूह नव्हे. समूह त्याहून अधिक काहीतरी असतो. त्यामुळे समूहातील व्यक्ती जरी भौतिकदृष्ट्या अलग झाल्या तरी समुह संपुष्टात येत नाही. त्याचे अस्तित्त्व टिकून राहते. म्हणजेच समूहातील व्यक्ती बदलतात परंतु समूह मात्र स्थिर असतात, त्यांना स्वतंत्र अस्तित्व असते.

८) **समूहाचे स्वरुप गतिशील असते** (Dynamic Nature) :

समूहाचे स्वरुप स्थिर नसून ते गतिशील असते, ते कायमस्वरुपी एकच स्थितीत रहात नाहीत. याचा अर्थ काळाच्या ओघात समूहाच्या संरचनेत म्हणजेच समूहातील दर्जा, भूमिका, नियमने व मूल्ये इत्यादी रचनात्मक घटकात बदल होत असतात. काळाच्या ओघात समूहाची ध्येये कार्यपद्धती आणि उद्दिष्ट्ये यामध्ये देखील बदल घडून येवू शकतो. समूहाचा आकारही बदलू शकतो. या अनेक अर्थानी समूहाचे स्वरुप गतिशील असल्याचे आढळून येते.

९) **सहकार्य** (Cooperation) :

समूहाची जी उद्दिष्ट्ये असतात ती प्राप्त करण्यासाठी समूहातील सदस्यांनी एकमेकांना सहकार्य केले पाहिजे तरच समूह उद्दिष्ट प्राप्तीकडे वाटचाल करू शकतो. याचा अर्थ समूहातील सदस्यांच्यामध्ये किमान सहकार्य असल्याशिवाय समूह टिकणे आणि त्याची उद्दिष्ट्ये साध्य होणे शक्य नसते. सहकार्य हे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपाचे असू शकते, समूहात मतभेद, स्पर्धा व संघर्ष इत्यादी प्रकारच्या आंतरक्रिया घडून येत असल्या तरी कोणत्याही समूहाला सहकार्य हाच खरा आधार आहे.

**सामाजिक समूहाचे महत्त्व** (Importance of Social Group) :

ज्याप्रमाणे सामाजिक समूह व्यक्तीच्या जीवनात एक व्यक्ती म्हणून महत्त्वाची भूमिका पार पाडतो त्याचप्रमाणे समाजामध्ये व्यक्तीचे असणारे विशिष्ट स्थान या अर्थाने देखील समूह विशिष्ट भूमिका पार पाडत

असतो. त्यामुळे समूहाचे महत्त्व या उप-विभागामध्ये आपणास विस्ताराने खालील बाबींचा उहापोह करावा लागेल.

१. **समूह व्यक्तीच्या जीवनातील सामाजिक व मानसिक गरजांची पूर्तता करतात.** (Groups fulfil individuals necessities of life social and phychological needs):

कोणताही मानव हा सातत्याने त्याच्या अस्तित्त्वासाठी मूलभूत अशा सामाजिक व मानसिक गरजांची पूर्तता करीत आला आहे. अन्न, वस्त्र, निवारा, संरक्षण, प्रेम, आपुलकी, माया, दर्जा, मानसन्मान यासारख्या काही इतर महत्त्वाच्या मानवी गरजा असून या सर्वांची पुर्तता समूहामध्ये राहूनच पूर्ण करता येते. त्यामुळे आपणास असे म्हणता येईल की, समूहाची निर्मिती ही प्रामुख्याने विशिष्ट शारीरिक व मानसिक गरजांच्या पूर्ततेसाठी आणि सामाजिक जीवनासाठीच झाली आहे.

२. **समूह हे व्यक्तीमत्त्व विकासासाठी मदत करतात** (Groups helps the development of personality):

समूहाकडून ज्याप्रमाणे व्यक्तीच्या जीवनातील सामाजिक व मानसिक गरजांची पूर्तता केली जाते त्याचप्रमाणे समूहाकडून व्यक्तीचे व्यक्तीमत्त्व विकसीत करण्यासाठी मदत केली जाते. प्रत्येक व्यक्तीजवळ असणाऱ्या स्व:त्वाचा विकास हा शेवटी समूह जीवनाचाच परिणाम असतो. आपले सामाजिक वर्तन आणि व्यक्तीमत्त्व यांची जडण-घडण आपण ज्या समूहाचे घटक असतो त्या समूहाद्वारेच होत असते.

३. **समूह हे सामाजीकरणाच्या प्रक्रियेला मदत करतात** (Groups help the process of socialization) :

समाजाची मूल्ये, रुढी, नियमने इत्यादी आत्मसात करण्याची आणि अंगी बाळगण्याची प्रक्रिया म्हणजे समाजीकरण होय. ज्यावेळी व्यक्ती इतर व्यक्तींच्या सहवासात म्हणजेच समूहामध्ये राहू लागते त्याचवेळी तिच्या मानवी गुणांचा विकास होत असतो. या अर्थाने विचार करता सामाजिक समूह हे समाजीकरणाच्या प्रक्रियेत मदत करताना आढळून येतात.

४. **समूहाकडून समाजातील व्यक्तीचे वर्तन नियंत्रीत केले जाते.** (Gropus reglate the schaviour of individuals in society):

सामाजिक समूह समूहातील सदस्यांवर सामाजिक नियमनांच्या आधारे काही प्रमाणात नियंत्रण आणि दबाव ठेवण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे व्यक्ती अथवा समूहानुसार समुहातील लोकरुढी, लोकनीती, योग्य अयोग्यतेच्या कल्पना, चुका आणि बरोबर आत्मसात करण्याचा प्रयत्न करते.

अशाप्रकारे समूह व्यक्तींच्यामध्ये सामाजिक बांधीलकी निर्माण करण्याबरोबरच अयोग्य कृतीवर नियंत्रण ठेवण्याचे देखील कार्य करीत असतात. समूहामध्ये वास्तव्य केल्याने व्यक्तीला स्वयंशिस्त लागते. शेवटी आपणास असे म्हणता येईल की, सामाजिक नियंत्रणाचे एक प्रभावी साधन या अर्थाने समूह योग्य आणि

शिस्तबद्ध अशा समाजाच्या निर्मितीसाठी तसेच व्यक्तीला जबाबदार नागरिक बनविण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतात.

### ४.२.२ सामाजिक समूहाच्या वर्गीकरणाचे निकष/आधार :

समाजशास्त्र संशोधनातील सामाजिक समूहाचा अभ्यास हे एक महत्त्वाचे संशोधन क्षेत्र आहे. मानवी समाजामध्ये जे विविध प्रकारचे सामाजिक समूह आढळून येतात. ते समजावून घेत असताना त्या समूहांच्यामध्ये असणारी समानता आणि त्यांच्यामध्ये दिसून येणारा भेद याचा अभ्यास करावा लागतो. असा अभ्यास सामाजिक समूहांच्या वर्गीकरणाद्वारे शक्य होतो.

कोणत्याही स्वरुपाचे वर्गीकरण हे विशिष्ट अशा निकषांवर अथवा आधारभूत अशा घटकांवर अवलंबून असते. सामाजिक समूह हे अनेक अर्थाने परस्परापासून भिन्न असतात हे आपण सुरुवातीलाच पाहिले आहे. एक समूह हा दुसऱ्या समूहापासून कसा वेगळा आहे हे स्पष्ट करताना या संबंधीची वैशिष्ट्ये वेगवेगळ्या समाजशास्त्रज्ञानी सिद्ध करुन दाखविली आहेत व त्यालाच समूह वर्गीकरणाचे निकष अथवा प्रमुख आधार असे म्हटले आहे.

मानव समाजात आढळून येणाऱ्या सामाजिक समूहामध्ये जे भेद अथवा भिन्नता आढळून येते अशा भिन्नतेला/भेदानाच समाजशास्त्रज्ञानी समूहाच्या वर्गीकरणाचे आधार समजले. सामाजिक समूहांच्या वर्गीकरणाचे आधार आणि त्यावर आधारित अशी वर्गीकरण याचा थोडक्यात परिचय खालीलप्रमाणे करुन घेता येईल.

नामवंत समाजशास्त्रज्ञांनी विविध निकषानुसार सामाजिक समूहांचे केलेले वर्गीकरण –

| अ.नं. | समाजशास्त्रज्ञाचे नांव | समूह वर्गीकरणाचे निकष | समूह प्रकार | समुहांची उदाहरणे |
|---|---|---|---|---|
| १. | जॉन सिम्मेल | समूहाचा आकार | लहान व मोठा समूह | कुटुंबे आणि राष्ट्र |
| २. | विल्यम सम्नर | व्यक्तीची समूहावरून होणारी ओळख | आमचा समूह व इतरांचा समूह | आपले कुटुंब व इतरांचे कुटुंब |
| ३. | सी. एच. कुले | समूहाशी असणारा संपर्क व परस्पर संबंधातील जवळीकता | प्राथमिक समूह व दुय्यम समूह | कुटुंब व कामगार संघटना |
| ४. | लेन्स्टर वार्ड व गिडींग्ज | समूह सदस्यत्वाचे स्वरूप | ऐच्छिक समूह अनैच्छिक समूह | नाट्य मंडळ कुटुंब, जात |
| ५. | पार्क व बर्जेस | भौगोलिक सिमारेषा | प्रादेशिक समूह अप्रादेशीक समूह | |
| ६. | एस. एम. मिलर | समूहातील सभासदांचा दर्जा | समस्तरीय समूह असमस्तरीय समूह | कामगार संघटना, भाविकांचे भक्त |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७. | मॅक आयव्हर व पेज | समूहातील हितसंबंधाची जोपासना | स्थिर समूह अस्थिर समूह | समूदाय/वर्ग जमाव/गर्दी |

वरील माहितीनुसार, समूहाचे वर्गीकरण करण्यासाठी वेगवेगळ्या समाजशास्त्रज्ञानी वेगवेगळे निकष सुचविलेले दिसतात.

१९५७ मध्ये G. Gurwich यांनी त्यांच्या "La Vocation actuella deal sociologic" या ग्रंथमध्ये समूह वर्गीकरणाचे निकष अधिक विस्ताराने देत असताना जवळपास १५ निकष सांगितले होते, त्यांनी सांगितलेल्या १५ निकषामध्ये १) आशय २) आकार ३) कालावधी ४) ताल ५) जवळीकता ६) माहितीचा आधार ७) मार्ग (सुख व बंदिस्त) ८) समूहातील संघटनांचे प्रमाण ९) कार्ये १०) परिचय ११) समावेश असणाऱ्या समाजाशी नाते १२) इतर समूदायाशी असणारे संबंध १३) सामाजिक नियंत्रणाचे प्रकार १४) सत्तेचे प्रकार १५) समूहातील ऐक्याचे प्रमाण.

याखेरीज, इतर काही समाजशास्त्रज्ञांनी देखील समूह वर्गीकरणाचे निकष सुचविलेले आहेत की त्यामुळे समूहाचे वर्गीकरण करता येते त्यामध्ये १) इच्छेने स्वरूप, २) आवडीचा कालावधी, ३) समूहाचे सदस्यत्त्व, ४) समूहातील संघटनांचे प्रमाण, ५) व्यक्ती प्रवृत्तीवर आधरीत सदस्यत्व.

वर नमूद केलेला समूह वर्गीकरणाच्या निकषापेक्षा काही इतर वेगळ्या परंतु महत्त्वाच्या अशा समूह वर्गीकरण निकषांचा अभ्यास करुया.

**वेगवेगळ्या निकषांवर आधारित काही समूहांचे वर्गीकरण** (Some classification of social groups based on different criteria)

विविध समाजशास्त्रज्ञानी समूह वर्गीकरणासाठीचे वेगवेगळे निकष विचारात घेऊन त्याच्या आधारे वर्गीकरण केले आहे. त्याचा थोडक्यात परिचय खालीलप्रमाणे करुन घेता येईल.

**१) समूहाचा आकार** (Size of the Group) :

कोणत्याही समूहातील सदस्यांच्या संख्येवरुन त्या समूहाचाआकार ठरतो, जर्मन समाजशास्त्रज्ञ जॉर्ज सिम्मेल यांनी समूहाच्या आकारावरुन समूहाचे दोन प्रकारात वर्गीकरण केले आहे. उदा.- १) लहान समूह आणि २) मोठा समूह. तुलनात्मकदृष्ट्या ज्या समूहातील सदस्य संख्या कमी असते त्याला लहान समूह आणि ज्या समूहातील सदस्य संख्या जास्त असते त्याला विशाल किंवा मोठा समूह असे म्हणतात. समूहाला आकार हा तुलनात्मक निकष आहे. सम्नर यांनी म्हटल्याप्रमाणे, दोन व्यक्तींचा द्विजा समूह (Dyad) हा लहान समूह असतो कारण समूह अस्तित्त्वात येण्यासाठी किमान दोन व्यक्तींची आवश्यकता असते. ज्या समूहामध्ये दोन पेक्षा अधिक व्यक्ती आहेत त्याना आपण मोठा समूह म्हणतो.

ज्यावेळी, आपण तीन सदस्य असणाऱ्या त्रिकुट (Triad) समूहाची तुलना द्विजा समूहाशी करतो त्यावेळी तो मोठा समूह असतो. अर्थात समूहाचा आकार ही सापेक्ष बाब आहे. समूहाचा आकार हा

त्याच्या उद्दिष्टाशी आणि कार्याशी निगडीत असतो. जस जसा समूहाचा आकार वाढत जातो तस तसे समूहातील गुंतागुंतीचे स्वरुप देखील वाढते.

२) **हितसंबंधाची व्याप्ती किंवा विस्तार** (Range of Interests) :

समूहातील सर्व सदस्यांना समान असणाऱ्या हितसंबंधाच्या व्याप्तीच्या संदर्भात समूहासमूहात भेद दिसून येतात त्यावरुन समूहाचे वेगवेगळे प्रकार पडतात. काही समूहांचे हितसंबंध मर्यादित किंवा विशिष्ट स्वरुपाचे असतात, अशा समूहाना विशिष्ट हितसंबंधित समूह असे म्हणतात. उदा. नाट्यमंडळ, भजनी मंडळ इत्यादी अशा समूहातील सदस्य विशिष्ट हितसंबंधाच्या पूर्तीपुरतेच एकत्रित येतात. याउलट काही सामाजिक समूहांच्या हितसंबंधाची व्याप्ती विशाल असते. सामान्यत: एकाहून अधिक हितसंबंध अशा समूहात गुंतलेले असतात. अशा लायक हितसंबंधांची जोपासना करणाऱ्या सामाजिक समूहाना 'समावेशक हितसंबंधित समूह' असे म्हणतात. उदा.- कुटुंबाकडून व्यक्तीला प्रेम, दया, सहकार्य, मुलाचे पालनपोषण आणि मानसिक सुरक्षितता मिळवून दिली जाते. त्यामुळे कुटुंबाकडे समावेशक हितसंबंधित समूह म्हणून पाहिले जाते. कुटुंबाकडून समूहातील व्यक्तींच्या विविध हितसंबंधाची काळजी घेतली जाते. त्यामुळे कुटुंबाला व्यापक हितसंबंधित समूह (Inclusive Interest Groups) असेही म्हटले जाते.

३) **हितसंबंधांचा कालावधी** (Duration of Interests) :

समूहातील सदस्यांच्या हितसंबंधाचा कालावधी विचारात घेवून समूहाचे खालील दोन प्रकारात वर्गीकरण केले आहे. १) अस्थायी समूह (Temporary Groups) २) स्थायी समूह (Permanent Groups) जो समूह विशिष्ट उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अस्तित्त्वात येतात आणि उद्दिष्ट साध्य झाले की ते नष्ट होतात अशा समूहाना अस्थायी समूह (Temporary Groups) ही संज्ञा दिली जाते. उदा.- नळाला पाणी आले नाही म्हणून एकत्र येवून रिकामी भांडी हातात घेऊन नगरपालिकेवर मोर्चा नेणाऱ्या स्त्रिया अथवा गांवातील मागण्यांचे निवेदन घेऊन मुख्यमंत्र्यांना भेटणारे शिष्टमंडळ हे अस्थायी समूह होत. नगरपालिका अधिकाऱ्याकडून पाणी पुरवठा नियमित करण्याचे तसेच मुख्यमंत्र्यांनी गावातील लोकांच्या मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिल्यानंतर असे समूह नष्ट होतात.

याउलट काही समूहाची उद्दिष्ट्ये पूर्ण करण्यासाठी दीर्घ कालखंडाची आवश्यकता असते. अशा समूहातील सदस्य दीर्घ काळासाठी सहभागी झालेले असतात किंबहुना ते मरेपर्यंत अशा समूहामध्ये रहात असतात, व्यापक समाजाच्या गरजांची पूर्तता होण्यासठी अशा स्वरुपाच्या समूहाचे अस्तित्त्व आवश्यक असते. अशा समूहाना स्थायी समूह (Permanent Groups) असे म्हणतात. उदा. कुटुंब, शाळा, लष्करी संघटन, कारखाना, कामगार संघटना इत्यादी.

४) **संघटनांचे प्रमाण** (Degree of Organization)

समूहाच्या संघटनाच्या प्रमाणाबाबत समूहा समूहात भेद असतो. कोणताही सामाजिक समूह पूर्णत: असंघटित असत नाही. तरी देखील समूहातील संघटनांची मात्रा किंवा प्रमाण कमी-अधिक असू शकते.

त्यामुळे समूहातील संघटनावर आधारीत समूहाचे दोन प्रकारामध्ये वर्गीकरण केले जाते. सापेक्षत: असंघटित समूह (Relatively Unorganized Groups) आणि अधिक प्रमाणात संघटन झालेले समूह (Highly Organized Groups) ज्या समूहामध्ये कायम स्वरुपी संघटन किंवा रचनेचा अभाव असतो तसेच विविध कृती पार पाडण्यासाठी नियमने अथवा पद्धतींचा अभाव असतो त्यांना सापेक्षत: असंघटित समूह असे म्हणतात. उदा. दंगल करणाऱ्या व्यक्तींचा समूह.

याउलट स्थिती विशेष संघटित समूहात दिसते. अशा समूहांना कायम स्वरुपी संघटनात्मक रचना असते. समूहातील सदस्यांच्या वर्तनाला मार्गदर्शक करण्यासाठीची नियमने अस्तित्त्वात असतात. अशा समूहातील व्यक्ती ज्या पदावर काम करीत असतात त्या पदांशी संबंधित हक्क, कर्तव्ये आणि अधिकार सुस्पष्ट केलेले असतात. अशा समूहांची उद्दिष्टये देखील सुस्पष्ट असतात. उदा.- कामगार संघटना, लष्करी संघटन हे समूह विशेष संघटित समूह म्हणून ओळखले जातात.

५) **सदस्यांमधील परस्परसंबंधाचे स्वरूप** (Nature of Relationships among members) :

या निकषावर आधारित समूहाचे अनौपचारिक समूह (Internal Groups) आणि औपचारिक समूह (Formal Groups) असे प्रकार केले जातात. ज्या समूहातील सदस्यांच्या परस्परसंबंधाचे स्वरुप अनौपचारीक स्वरुपाचे असते अशा समूहांना अनौपचारिक समूह असे म्हणतात. उदा.- मित्रांना अथवा जोडीदारांचा समूह याउलट ज्या समूहातील सदस्यांचे परस्परसंबंध लिखीत नियम व कायदे यांच्यामुळे नियंत्रीत केलेले असते त्याला अनौपचारीक समूह असे म्हणतात. उदा.- नोकरशाही व्यवस्था अथवा नोकरशाही संघटन.

६) **सदस्यत्त्वाचे स्वरुप** (Nature of Membership) :

व्यक्तीला समूहाचे सदस्यत्त्व कसे प्राप्त होते या विचारावरुन अमेरिकन समाजशास्त्रज्ञ लेस्टर वॉर्ड आणि एफ.एच.गिडींग्ज यांनी समूहाचे ऐच्छिक समूह (Voluntary Groups) आणि अनिवार्य समूह (Involmentary Groups) असे वर्गीकरण केले आहे. ज्या समूहात व्यक्तीला तिच्या इच्छेनुसार सदस्यत्व प्राप्त होते, त्यांना ऐच्छिक समूह असे म्हणतात. अशा समूहाचे सदस्य व्हायचे किंवा नाही याचे स्वातंत्र्य व्यक्तीला असते. उदा.- नाट्यमंडळ, महिला मंडळ, क्रिडा समूह, याउलट समाजात काही समूह असे असतात की, ज्यांचे सभासदत्त्व व्यक्तीच्या इच्छेवर अवलंबून नसून व्यक्तीला सक्तीने अशा समूहाचे सभासदत्त्व स्विकारावे लागते. अशा समूहांना अनिवार्य समूह असे म्हणतात. उदा.- कुटुंब, जात, वांशिक समूह इत्यादी अनिवार्य समूह होत.

७) **सदस्यांच्या समूहाबद्दल व्यक्तीगत दृष्टीकोन** (Individual View point towards groups):

विल्यम सम्नर यांनी सदस्यांच्या समूहाबद्दलचा व्यक्तीगत दृष्टीकोन या विषयावर आधरित समूहाचे अंत:समूह/ आमचासमूह (In grouops) आणि बहि:समूह/ इतरांचा समूह (Out Groups) असे वर्गीकरण केले आहे. व्यक्ती ज्या समूहाची सभासद असते तो तिच्या दृष्टीने अंत:समूह होय. उदा.- व्यक्तीचे स्वत:चे

कुटुंब, तिचे महाविद्यालय, तिचा देश तिच्या दृष्टीने अंत:समूह असतो याच व्यक्तीच्या दृष्टीने इतरांचे कुटुंब, इतर महाविद्यालये आणि दुसरा देश अथवा राष्ट्र हे बहि:समुह असतात. अशा समूहाविषयी व्यक्तीच्या मनात दूरत्वाची भावना असते.

थोडक्यात समूहाबद्दलच्या या व्यक्तीगत भावना व्यक्ती ज्या ज्या समूहांची सभासद असते. त्या समूहाबाबत विशेष प्रकर्षाने जाणवते. अंत: समूहाविषयी आपलेपणाची अथवा आम्हीची (We feelings) भावना असते. याउलट परक्या अथवा बहि:समूहाबद्दल व्यक्तीच्या मनात आपलेपणाची भावना नसते तर तिरस्काराची भावना वाढीस लागते. उदा.– आपण सर्व भारतीय एक आहोत अशी भारतीयांबद्दलची आपली भावना असते तर पाकिस्तान हा भारतीयांच्या दृष्टीने परक्यांचा समूह होय.

**८) संपर्काचे स्वरुप व संबंधाची घनिष्टता** (Nature of contact and invitimacy of Relationships)

अमेरिकन समाजशास्त्रज्ञ चार्लस हॉर्टन कूले यांनी १९०९ मध्ये सामाजिक संघटन (Social Organization) हा ग्रंथ लिहून त्यामध्ये संपर्काचे स्वरुप व संबंधाची घनिष्टता या निकषावर आधारित समूहाचे प्राथमिक समूह आणि दुय्यम समूह असे वर्गीकरण केले. कूले यांच्या मते, प्राथमिक समूह म्हणजे, ज्या समूहातील सदस्यांचे संबंध अत्यंत घनिष्ट, आत्मीयतेचे आणि सहकार्यावर आधारित असतात असे समूह होय. असे समूह आकाराने लहान असतात, परस्पर सानिध्यामुळे सदस्यांचा एकमेकांशी सातत्त्यशील संपर्क येतो. उदा. – कुटुंब, शेजार, समवयस्कांचा समूह, लहान खेडेगांव इत्यादी प्राथमिक समूहाची उदाहरणे देता येतील. हे समूह व्यक्तीमत्त्व विकासाला आकार देण्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडतात. तसेच व्यक्तीने आदर्श आणि सामाजिक स्वरुप घडविण्यामध्ये असे समूह मूलभूत स्वरुपाचे कार्य पार पाडतात.

प्राथमिक समूहाच्या विरोधी लक्षणे आढळणाऱ्या समूहांना इतर समाजशास्त्रज्ञांनी ‘दुय्यम समूह’ ही संज्ञा वापरण्यास प्रारंभ केला. दुय्यम समूह आकाराने मोठे असतात, त्यामधील सदस्यांचे तितकेसे घनिष्ठ संबंध नसतात आणि ते व्यक्तीनिरपेक्ष असतात. उदा.–कारखाना, कामगार संघटना, नोकरशाही संघटना. पुढील घटकामध्ये, आपण या दोन समूहातील असणारा फरक अभ्यासणार आहोत.

### ४.२.३ प्राथमिक आणि दुय्यम समूह

**प्राथमिक समूहाचा अर्थ, वैशिष्ट्ये आणि महत्त्व :**

(Meaning, Characteristics and Importance of Primary Group)

या घटकामध्ये आपण प्राथमिक समूहाचा अर्थ वैशिष्ट्ये आणि महत्त्व अभ्यासणार आहोत. प्रथम प्राथमिक समूह या संज्ञेचा अर्थ समजावून घेवू.

**प्राथमिक समूहाचा अर्थ :** (Meaning of Primary Group)

प्राथमिक समूहाचा अर्थ समजावून घेण्यासाठी आपण या संकल्पनेच्या खालील दोन व्याख्या अभ्यासणार आहोत.

१. **सी. एच. कुले :** ''माझ्या मते प्राथमिक समूह म्हणजे ज्यामध्ये प्रत्यक्ष, समोरासमोरचे घनिष्ट, दीर्घकाळ टिकाणारे आणि प्रामुख्याने सहकार्यावर आधारित असे संबंध असतात. असे समूह अनेक अर्थाने प्राथमिक असले तरी मुख्यत: असे समूह व्यक्तीचे आदर्श आणि सामाजिक स्वरुप निश्चित करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडतात आणि ते याच अर्थाने प्राथमिक ठरतात.''

(By primary group I mean thouse characterised by intimate, face to face association and co-operation. They are primary in several senses, but chiefly they are fundamental in forming the social nature and ideals of the individuals.) – C. H. Cooley

२. **किंग्जले डेव्हिस :** ''प्राथमिक समूह म्हणजे असा सामाजिक समूह की, ज्या समूहाची परस्परता सहकारिता आणि समोरासमोरचे संबंध अशी वैशिष्ट्ये आढळून येतात.''

(Primary group is a social group characterised by face to face relationship, natural aid and componionship) – Kingslay Davis

चार्लस कूले यांनी इ.स. १९०९ सामाजिक संघटन (Social Organization) हा ग्रंथ लिहून त्यामध्ये प्राथमिक समूह (Primary Group) ही संकल्पना सर्वप्रथम मांडली. समूहातील सदस्यांमधील परस्परसंबंधाचे गुणात्मक स्वरुप हा कूले यांच्या प्राथमिक समूह या संकल्पनेचा खरा गाभा आहे. मानवी व्यक्तिमत्त्व आणि स्वभावाच्या जडणघडणीमधील अशा समूहाचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण असे असते. समाजाची ओळख व्यक्तीला अशा समूहाकडूनच करुन दिली जाते. त्यामध्ये कुटूंबाचा वाटा फार मोठा असल्याचे नमूद केले.

कूलेच्या मते प्राथमिक समूह मानवी सामाजिक विकास प्रक्रियेवर स्वत्व संकल्पनेवर आणि व्यक्तीच्या जीवनातील आदर्शवर मोठ्या प्रमाणात प्रभाव पाडीत असतात. यामुळेच कूले अशा समूहाना 'मानवी स्वभावाची अंगणवाडी' (Nursery of Human Nature) या नावाने संबोधतात.

**प्राथमिक समूहाची ठळक वैशिष्ट्ये** (Salient Characteristics of Primary Group) :

प्राथमिक समूह अस्तित्त्वात येण्यासाठी आवश्यक अशा भौतिक अटी आणि विविध समाजशास्त्रज्ञांनी सांगितलेल्या व्याख्या विचारात घेता अशा समूहाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आढळून येतात यांची चर्चा आता आपण करु.

**१) सदस्यांमधील भौतिक सानिध्य** (Physical Proximity) :

सदस्यांमधील भौतिक सानिध्य हे प्राथमिक समूहाचे सर्वात महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य समजले जाते एका विशिष्ट अशा ठिकाणी प्राथमिक समूहातील सदस्य दीर्घकाळपर्यंत वास्तव्य करुन रहात असतात. त्यांच्यामध्ये घनिष्ठ संबंध येत असतात अशा भौतिक सानिध्यामुळे अप्रत्यक्षपणे समूहातील सदस्यांचे व्यक्तिगत आणि समोरासमोरचे संबंध विकसीत होण्यास मदत होत असते.

२)　**समूहाचा लहान आकार** (Small Size) :

समूहाचा लहान आकार हे देखील एक प्राथमिक समूहाचे ठळक वैशिष्ट्य आहे. आकाराने लहान असणारे कुटुंबासारखे प्राथमिक समूह सदस्यांमधील परस्पर आंतरक्रिया व त्यांच्यामधील संपर्क वारंवारपणे घडून येण्याच्या दृष्टीने सदस्यांना उपयुक्त असतात या समूहातील सदस्यसंख्या मर्यादीत असते. परंतु त्यांच्यातील आंतरक्रियांची घनता, अधिक असल्यामुळे एकमेकांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा परस्परांना जवळून परिचय होतो. तसेच एकमेकांसाठी त्याग करण्याची वृत्ती निर्माण होते.

३)　**संबंधामधील सातत्य** (Durability in relationships) :

प्राथमिक समूह सापेक्ष अर्थाने स्थायी अथवा स्थीर स्वरुपाचे समूह असतात. याठिकाणी संख्येने मर्यादित असणाऱ्या त्या त्याच व्यक्ती समूहातील प्रत्येक सदस्यांशी दीर्घकाळपर्यंत आंतरक्रिया करीत असतात. म्हणूनच प्राथमिक समूहातील सदस्यांच्या संबंधातील टिकाऊपणा आणि सातत्यता हे अशा समूहाचे ठळक वैशिष्ट्य समजले जाते. कुटूंबासारख्या प्राथमिक समूहात व्यक्ती जन्मापासून मृत्यूपर्यंत एकमेकांच्या सानिध्यात रहात असल्याने कुटूंबातील व्यक्तींच्या मध्ये सातत्याचे संबंध आढळून येतात.

४)　**सदस्यांमधील समोरा समोरचे संबंध** (Face to Face relationships) :

समोरासमोरील संबंध हे एक प्राथमिक समूहाचे ठळक वैशिष्ट्य आढळून येते. अशा समूहातील सदस्यांच्यामध्ये प्रत्यक्ष आणि व्यक्तिगत स्वरुपाचे संबंध आढळून येतात. प्रत्येक सदस्य प्रत्येकाला व्यक्तीशः ओळखत असतो. त्यामुळे स्वाभाविकपणे त्यांच्यात समोरासमोरचे प्रत्यक्ष संबंध आढळून येतात. सहकार्ययुक्त भावनिक असे संबंध खूप उपयुक्त असतात.

५)　**सदस्यांमधील व्यक्तिगत संबंध** (Personal relationships) :

सदस्यांच्यामध्ये असणारे व्यक्तिगत संबंध हे एक प्राथमिक समूहाचे ठळक वैशिष्ट्य आहे. याचा अर्थ समूहातील व्यक्ती व्यक्तिगतरित्या परस्परांशी संबंधित असतात. अशा समूहातील व्यक्ती परस्परांच्याकडे विशिष्ट ध्येय साध्य करण्याचे साधन म्हणून पहात नसतात तर एक व्यक्ती म्हणून त्या परस्परांकडे पहात असतात. सबंधाचे स्वरुप हे सामान्यतः निस्वार्थी स्वरुपाचे असते.

६)　**स्वयंस्फूर्त संबंध** (Spontaneous relationship) :

प्राथमिक समूहातील सदस्यांचे संबंध स्वाभाविक आणि उस्फुर्त स्वरुपाचे असतात. अशा संबंधाची निर्मिती मुद्दाम हेतुपूर्वक अथवा जाणीवपूर्वक झालेली नसते तर ती स्वाभाविकरित्या होत असते, उदा.- दोन मित्रामध्ये मैत्री आपोआप घडून येते ती घडवून आणली जात नाही. तसेच पती-पत्नीतील संबंध स्वयंस्फुर्त असतात.

७)　**सर्वसमावेशक संबंध** (Inclusive relationships) :

प्राथमिक समूहातील सदस्यांचे संबंध सर्वसमावेशक असे असतात. याचा अर्थ अशा स्वरुपाच्या संबंधामध्ये व्यक्तीच्या सर्वांगिण व्यक्तीमत्त्वाचा समावेश होतो. व्यक्तीमत्त्वाच्या एका विशिष्ट अंगाचा विचार

त्यामध्ये अपेक्षित नसतो. व्यक्तीचा स्वीकार हा त्या व्यक्तीच्या अंगी असणाऱ्या सर्व गुणदोषसहित समूहातील इतर व्यक्तींनी केलेला असतो. उदा.– कुटुंबातील सर्वजण एकमेकांच्या सुखदु:खात मनापासून सहभागी झालेले असतात, व्यक्तींची भावनीक अथवा मानसिक गुंतवणूक एकमेकांत झालेली असते.

**८) अहस्तांतरणीय संबंध** (Relationship is not transferable) :

किंग्जले डेव्हीस यांच्या मते, प्राथमिक समूहामध्ये असणाऱ्या संबंधाचे स्वरुप हे न बदलणारे आणि अबाधित स्वरुपाचे असते. म्हणजेच यातील व्यक्तीचे संबंध हे अहस्तांतरणीय असतात. अशा संबंधातील व्यक्तीची जागा दुसरी कोणतीही व्यक्ती घेऊ शकत नाही. एखादी व्यक्ती मृत झाली तर तिची कायमचीच उणीव भासते. उदा.– कुटुंबातील आई मृत झाल्यानंतर आईची जागा दुसऱ्या कितीही प्रेमळ व्यक्तीकडून घेतली जाऊ शकत नाही. इतर समूहात मात्र असे अहस्तांतरणीय स्वरुपाचे संबंध नसतात उदा.– एखादे शिक्षक रिटायर झाले तर त्यांची जागा दुसरे शिक्षक भरुन काढतात.

**९) आम्हीची भावना** (Strong we feeling) :

प्राथमिक समूहातील सदस्यांच्यामध्ये मी ऐवजी आम्ही अशी भावना आढळून येते. अशा स्वरुपाची भावना सदस्यांमध्ये असणारे भौतिक सानिध्य, जिव्हाळा, घनिष्टता सर्वसमावेशकता, उदिष्टामध्ये असणारी एकवाक्यता इत्यादीमुळे निर्माण होत असते. समूहासाठी व्यक्ती कोणताही त्याग करायला तयार असतात. आम्हीची अथवा सर्वजण एक असल्याची तीव्र भावना सदस्यांच्यामध्ये आढळून येते.

**१०) उद्दिष्टांची एकवाक्यता** (Identity of Ends or Aims) :

प्राथमिक समूहातील व्यक्तींच्या उद्दिष्टांमध्ये एकवाक्यता किंवा अनन्यता दिसते. प्रत्येक सदस्य वेगवेगळी उद्दिष्ट्ये मनात बाळगत नाहीत. याचा अर्थ समूहातील सदस्यांचे हितसंबंध आणि ध्येये यांच्यामध्ये द्बध्र्दृडऊँ‍ध्र प्रमाणात सारखेपणा दिसून येतो. उदा.– समूहातील सदस्यांच्या अभिव्यक्ती इच्छा आकांक्षा, मूल्ये आणि उद्दिष्ट्ये यांच्यामध्ये सारखेपणा दिसतो. प्राथमिक समूहांची विविध ठळक वैशिष्ट्ये वरीलप्रमाणे सांगता येतील. ही सर्व वैशिष्ट्ये परस्पर संबंधित असल्याचे दिसून येते.

**प्राथमिक समूहांचे महत्त्व** (Importance of Primary Groups) :

कोणत्याही समाजात प्राथमिक समूहाला अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे दिसून येते. या समूहातच व्यक्तीला मानवी स्वभावाची प्राप्ती होते. समाजाच्या ध्येय धोरणाची कल्पना येते. तसेच व्यक्ती कुटुंबासारख्या प्राथमिक समूहात राहिल्यामुळे समाजाचा सभासद होण्याची पात्रता व्यक्तीमध्ये येत असते. यादृष्टीने विचार करता प्राथमिक समूहाला व्यक्ती जीवनात खूप महत्त्वाचे स्थान आहे. आदिवासी समाजासारख्या आरंभीच्या समाजात देखील व्यक्तींचे संबंध प्राथमिक स्वरुपाचे होते आणि म्हणूनच एडवर्ड शिलस (Edward Shills) यांनी यापूर्वीच्या समूहांना Primordial Primary Groups असे संबांधिले आहे. आधुनिक समाजात देखील प्राथमिक समूह व्यक्तीच्या आणि त्याचबरोबर एकूण समाजाच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका पार पाडीत असतात. चार्लस कूले यांनी अगदी सुंदर शब्दात प्राथमिक समूहांचे महत्त्व

खालीलप्रमाणे अधोरेखित केले आहे. त्यांच्या मते, ''प्राथमिक समूह हे केवळ व्यक्तीसाठीच नव्हे तर सामाजिक संस्थांसाठीचे जिवंत झरे आहेत.'' आता आपण प्राथमिक समूहांच्या कार्यातूनच त्यांचे महत्त्व जाणून घेणार आहोत.

**१. प्राथमिक समूहांचे समाजीकरण प्रक्रियेतील महत्त्व :**

(Importance of Primary Groups in the Socialization Process)

समाजीकरणाचे अत्यंत महत्त्वपूर्ण साधन म्हणून प्राथमिक समूहाकडे पाहिले जाते. उदा.- कुटूंब हा प्राथमिक समूह असून कुटूंबात समाजीकरणाच्या प्रक्रियेस प्रारंभ होतो. याचा अर्थ व्यक्तीच्या समाजीकरणाची सुरुवात कुटुंबापासूनच होते. व्यक्तीच्या समाजीकरणामध्ये प्राथमिक समूहाचे असणारे महत्त्व स्वत: कूले यांनी मान्य केले आहे.

चार्लस कूलेच्या मते, प्राथमिक समूहातच व्यक्तीच्या सामाजिकतेला आकार मिळतो. तसेच व्यक्तीच्या जीवनातील आदर्श निश्चित होऊन त्यांना योग्य आकार दिला जातो आणि म्हणून त्यांनी अशा समूहाना ''मानवी स्वभावाची अंगणवाडी'' (Nursery of Human Nature) असे म्हंटले आहे. प्राथमिक समूह समाजीकरणाच्या प्रक्रियेद्वारे व्यक्तीवर संस्कृतीचे विविध घटक बिंबवितो किंवा उमटवतो उदा.- प्राथमिक समूहाद्वारे आपण आपली संस्कृती आत्मसात करतो, उपयोगात आणतो आणि त्यामध्ये योग्य असा बदल देखील घडवितो.

**२) व्यक्तीमत्त्व विकासातील प्राथमिक समूहाचे महत्त्व/ योगदान :**

(Importance of primary groups in the development of personality)

चार्लस कूले याच्या मते व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्यामध्ये कुटुंब हा प्रमुख स्वरुपाचा प्राथमिक समूह आहे. मानवी व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत प्राथमिक समूहाचा सिंहाचा वाटा असतो. त्याच्या व्यक्तिमत्त्वाला पैलू पाडण्याचे काम प्राथमिक समूहातील व्यक्तीच करीत असतात. याच समूहामध्ये व्यक्तिला तिच्या स्व:त्वाची ओळख करुन दिली जाते. याशिवाय व्यक्तीमत्त्व विकासामध्ये इतर अनेक सामाजिक गुण उमटविण्याचा प्रयत्न प्राथमिक समूहाकडूनच केला जातो. उदा.- व्यक्ती कुटुंबासारख्या प्राथमिक समूहामध्ये प्रेम, सहनशिलता परस्परांना मदत यासारख्या वृत्ती आत्मसात करते. अशा व्यक्तीमत्त्व विकासाच्या वैशिष्ट्यांचा उपयोग केवळ व्यक्तीच्या जीवनामध्येच नव्हे तर एकूण समाज जीवनामध्ये ऐक्य टिकविण्याच्या दृष्टीने होत असतो.

**३) व्यक्तीच्या मानसिक गरजांची पूर्तता** (Satisfaction of Individuals Psychological needs)

ज्याप्रमाणे व्यक्तीमत्त्व विकासामध्ये प्राथमिक समूहाची भूमिका महत्त्वाची असते त्याचप्रमाणे व्यक्तीच्या अनेक मानसिक गरजांची पूर्तता प्राथमिक समूह करीत असतात. प्राथमिक समूहाद्वारे व्यक्तीना मानसिक स्वास्थ्य सुरक्षितता आणि समाधान प्राप्त होते. तसेच सहानुभूती, वैचारिक देवाणघेवाण आणि

विचारांची मदत मिळत असते. याचा चांगला फायदा म्हणजे व्यक्तीला मानसिक सुरक्षितता लाभते, तिचे मानसिक संतुलन चांगले राहते व पुन्हा ती नव्याने आव्हाने स्वीकारायला तयार होते.

थोडक्यात मानसिक सुरक्षितता प्राप्त करुन देण्यामध्ये आणि ती टिकवून ठेवण्यामध्ये प्राथमिक समूहांचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. या अर्थाने विचार करता प्राथमिक समूहाकडे मानवी स्वभावाचे जन्मस्थान म्हणून पाहिले जाते.

**५) प्राथमिक समूह सामाजिक नियंत्रणाचे साधन म्हणून कार्य करते.**

(Primary Groups acts as the agencies of Social Control)

प्राथमिक समूहांचे समाजातील सामाजिक नियंत्रणाची साधने म्हणून असलेले महत्त्व देखील अनन्यसाधारण आहे. कारण या समूहाकडून बालकाला नियमने, मूल्ये, योग्य वर्तनप्रकार, चांगल्या वाईट सवयी इत्यादी गोष्टी शिकविल्या जातात. तसेच, समाजाच्या अपेक्षा काय आहेत? कोणते वागणे योग्य/ कोणते वागणे अयोग्य? याविषयीचे शिक्षण कुटुंबासारख्या प्राथमिक समूहामध्येच दिले जाते. त्यामुळे अशा समूहाकडे एक प्रकारे सामाजिक नियंत्रणाचे एक महत्त्वाचे साधन म्हणून पाहिले जाते.

थोडक्यात प्राथमिक समूह मानवी संबंधाचे नियमन करुन आपल्या वर्तनावर नियंत्रण ठेवतात सामाजिक आंतरक्रिया विषयी मार्गदर्शन करतात तसेच अत्यंत अनौपचारिक मार्गाने व्यक्तीचे वर्तन नियंत्रित करतात. साहजिकच असे अनौपचारिक नियंत्रण अत्यंत प्रभावी असते. या पार्श्वभूमिवर प्राथमिक समूहाकडे सामाजिक नियंत्रणाचे अनौपचारिक साधन म्हणून पाहिले जाते.

**दुय्यम समूहाचा अर्थ व वैशिष्ट्ये आणि महत्त्व :**

(Meaning, characteristics and importance of Secondary Group)

या घटकामध्ये आपण दुय्यम समूहाचा अर्थ वैशिष्ट्ये आणि महत्त्व अभ्यासणार आहोत. सर्वप्रथम दुय्यम समूह या संज्ञेचा अर्थ जाणून घेवू.

**दुय्यम समूहाचा अर्थ** (Meaning of Secondary Group) :

दुय्यम समूहाचा अर्थ जाणून घेण्यासाठी आपण या संकल्पनेच्या काही व्याख्या अभ्यासणार आहोत.

१. **ड्रेसर आणि विलीस :** ''ज्या समूहांच्या सदस्यांमधील संबंध सापेक्षत व्यक्तिनिरपेक्ष असतात त्याला दुय्यम समूह असे म्हणतात.''

(A group in which the relationship among the members is relatively impersonal)

२. **ऑगबर्न व निमकॉफ :** ''ज्या समूहामध्ये निकटतेचा अभाव असतो त्यांना दुय्यम समूह असे म्हणतात.''

(The groups which provide experience lacmking in intimacy are called secondary groups)

३. **टिशलेर, व्हायटन व हंटर :** ''जो समूह व्यक्तिनिरपेक्ष, औपचारिक संघटन आणि विशिष्ट उद्दिष्टे या वैशिष्ट्यांनी युक्त असतो त्याला दुय्यम समूह म्हणतात.''

(A group that it characterized by an impersonal formal organization with specific goals)

४. **एच. टी मजूमदार :** जेंव्हा सभासदांच्यामध्ये समोरासमोरचे संबंध नसतात तेंव्हा दुय्यम समूह अस्तित्त्वात येतो

(When face to face contacts are not present in the relationship of members, we have secondary group)

दुय्यम समूहाच्या वरील विविध व्याख्या विचारात घेता त्यावरून या समूहाचे वेगळेपण दर्शविणारे ठळक मुद्दे विविध विचारवंतांनी पुढीलप्रमाणे नमूद केले आहेत. उदा.- ड्रेसलर व विलीस यांच्या मते, दुय्यम समूहात व्यक्तींचे संबंध व्यक्तीनिरपेक्ष असतात. ऑगबर्न व निमकॉफच्या मते, दुय्यम समूहात निकटतेचा अभाव असतो, टिश्लेर व इंटरच्या मते दुय्यम समूहाकडे औपचारिक संघटन म्हणून पाहिले जाते. तर मजूमदार यांच्या मते, दुय्यम समूहातील सदस्यांच्यामध्ये समोरासमोरचे संबंध नसतात.

**दुय्यम समूहांची ठळक वैशिष्ट्ये** (Distinctive characteristics of secondary group) :

प्राथमिक समूहाच्या उलट वैशिष्ट्ये असणाऱ्या दुय्यम समूहांच्यावरील विविध व्याख्यांच्या आधारे दुय्यम समूहाची ठळक वैशिष्टये आपणास खालीलप्रमाणे सांगता येतील.

१. **सदस्यांमध्ये भौतिक सानिध्याचा अभाव** (Lack of physical proximity among the members)

प्राथमिक समूहातील सदस्यांप्रमाणे दुय्यम समूहातील सदस्य सामान्यत: एका विशिष्ट ठिकाणी दीर्घकाळपर्यंत वास्तव्य करुन रहात नाहीत. ते कदाचित एकमेकापासून दूर अंतरावर रहात असतात. साहजिकच अशा समूहातील व्यक्ती आपला दररोजचा वेळ परस्परांच्या सहवासामध्ये व्यतीत करीत नसतात, त्यामुळेच त्यांच्यामध्ये भौतिक सान्निध्याचा अभाव आढळून येतो.

२. **समूहाचा मोठा आकार** (Large size of group) :

प्राथमिक समूहाशी तुलना करता दुय्यम समूह आकाराने मोठे असतात. विस्तृत अशा भू-प्रदेशामध्ये लाखो-हजारोंच्या संख्येने अशा समूहातील सदस्य विखूरलेले असतात. काही वेळा तर तो संपूर्ण देशात अथवा जगात विखूरलेले असू शकतात. उदा.- लायन्स क्लब, रोटरी क्लब, रेड क्रॉस सोसायटी यासारख्या दुय्यम समूहातील सदस्य संपूर्ण जगभर विखूरलेले असतात. साहजिकच त्यामुळे अशा समूहाचा आकार अतिशय मोठा अथवा अमर्यादित असल्याचे दिसून येते.

३. **तुटक संबंध** (Discontinous relations)

ज्याप्रमाणे प्राथमिक समूहातील सदस्य दीर्घकाळपर्यंत एकमेकांच्या सानिध्यात रहातात. त्यामुळे त्यांच्यामध्ये संबंधाचे सातत्य आढळते. मात्र दुय्यम समूहातील सदस्य उदा.- राजकीय पक्ष, कामगार

संघटना दीर्घकाळपर्यंत एकमेकांच्या सहवासात रहात नसतात. त्यांच्यामध्ये परस्पर संबंध देखील घडून येत नसतो. तसेच त्यांच्यातील संबंधाचे स्वरुप तुटक स्वरुपाचे असते. कामाच्या निमित्ताने ते परस्परांच्या सहवासात येत असतात, शिवाय अशा समूहातील व्यक्ती आपली गरज संपली की, दुय्यम समूहाचे सभासदत्व रद्द करु शकतात. त्यामुळेच दुय्यम समूहातील संबंध तुटक असतात.

४. **सदस्यांमधील अप्रत्यक्ष संबंध** (Indirect relationship among members) :

दुय्यम समूहातील सदस्य क्वचितच एकत्रित आलेले दिसतात व त्यांच्यामध्ये समोरासमोरचे संबंध क्वचितच पहावयास मिळतात उदा.- कामगार संघटनेचे सदस्य वार्षिक सर्वसाधारण सभेला वर्षातून एकदा एकत्र येतात. मोठ मोठ्या समूहात तर टेलीफोन किंवा इंटरकॉम, पत्रव्यवहार इत्यादी संपर्क माध्यमांच्या सहाय्याने व्यक्तींचा अप्रत्यक्ष संबंध येत असतो. अशा प्रकारे दुय्यम समूहातील सदस्य संपूर्ण समूहाच्या दृष्टीने एकमेकांशी अप्रत्यक्ष संपर्क ठेवून असतात.

५. **सदस्यांमधील करारात्मक संबंध** (Contractual relations among members) :

दुय्यम समूहामध्ये सदस्यांच्या संबंधाचे स्वरुप करारात्मक असते. याचा अर्थ असे संबंध एका विशिष्ट हितसंबंधाभोवती निगडीत झालेले असतात. व्यक्तींच्या मनात असे संबंध ठेवल्याने काही निश्चित असा हेतू असतो. त्यामुळे काही समाजशास्त्रज्ञ दुय्यम समूहांना विशिष्ट हितसंबंधित समूह म्हणून संबोधतात. उदा. कामगार आणि कारखान्याचे मालक यांच्यातील संबंध हे एक प्रकारे कराराच्या स्वरुपाचे असून आपल्या उदिष्टापर्यंतच ते टिकवून ठेवले जातात. त्यानंतर ते संपुष्टात देखील आणले जातात.

६. **व्यक्तीनिरपेक्ष व हस्तांतरणीय संबंध** (Impersonal and transferable relations) :

दुय्यम समूहाचे हे एक ठळक वैशिष्टय आहे. या समूहात व्यक्ती म्हणून व्यक्तींचा विचार प्राधान्याने न होता विशिष्ट भूमिका पार पाडणारी व्यक्ती म्हणून जिच्याकडे पाहिले जाते, आपले काम संपले की त्या व्यक्तीला संबंध फारसा रहात नाही.

व्यक्तिनिरपेक्ष संबंधाप्रमाणे दुय्यम समूहातील व्यक्तींचे संबंध हस्तांतरणीय असे असतात म्हणजेच एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीची जागा अगदी सहजपणे घेऊ शकते. उदा.- कारखान्यातील एखादा कामगार नोकरी सोडून गेला तर त्याच्या जागी दुसरा कामगार नेमला जातो. प्राथमिक समूहात मात्र संबंधाचे स्वरुप हस्तांतरणीय असे नसते.

७. **साधन स्वरुप संबंध** (Means to an end) :

दुय्यम समूहातील व्यक्तींचे संबंध हे नेहमीच उद्दिष्टाभिमूख असतात. यातील व्यक्ती त्यांच्या व्यक्तिगत उद्दिष्टे अथवा ध्येयांच्या पूर्ततेसाठीच असे संबंध प्रस्थापित करतात. उदा.- आपल्याला भरपूर पगार अथवा वेतन मिळावे आणि त्यातून आपल्या जीवनावश्यक गरजांची पूर्तता चांगल्या प्रकारे व्हावी या उद्देशानेच कामगार विशिष्ट कारखान्यात नोकरी करीत असतात.

वरील विविध ठळक वैशिष्ट्ये विचारात घेता असे निदर्शनास येते की, दुय्यम समूहातील व्यक्तींचे परस्पर संबंध प्राथमिक समूहातील संबंधाप्रमाणे घनिष्ट, जिव्हाळ्याचे अथवा आपलेपणाचे नसतात, तर ते व्यक्तिनिरपेक्ष, हस्तांतरणीय आणि करारात्मक व तुटक स्वरुपाचे असतात. अशा समूहात व्यक्तीपेक्षा व्यक्तीच्या स्थानाला किंवा पदाला महत्त्व असते.

**आधुनिक समाजातील दुय्यम समूहाचे महत्त्व**

(Importance of secondary groups in modern societies)

वेगाने घडून येत असलेले औद्योगिकरण, नागरीकरणाची प्रक्रिया, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा झालेला विकास, संपर्काची विकसीत झालेली साधने आणि दळणवळण व्यवस्था, सामाजिक परिवर्तन आणि आधुनिकीकरण इत्यादीमुळे पारंपारिक समाजामध्ये वेगाने बदल घडून येत आहेत. याचा परिणाम म्हणजे शेती प्रधान समाजव्यवस्थेची जागा औद्योगिक समाज व्यवस्थेने घेतली आहे. अशा आधुनिक औद्योगिक समाजात दुय्यम समूहांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येते.

व्यक्ती आणि समाजाच्या काही महत्त्वाच्या गरजा दुय्यम समूहामुळे भागविल्या जात असल्याने आधुनिक औद्योगिक समाजात दुय्यम समूहांना अधिक महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसून येते. ते खालीलप्रमाणे सांगता येईल.

**१) विविध मानवी गरजांच्या पूर्ततेच्या दृष्टीने दुय्यम समूहाचे असणारे महत्त्व :**

आधुनिक समाजव्यवस्थेमधील व्यक्तींच्या विविध मानवी गरजांची आणि त्यांच्या इच्छा-आकांक्षांची पूर्तता करण्याचे दुय्यम समूह हे एक साधन आहे. मानवी गरजा विविध स्वरुपाच्या असून त्यामध्ये आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि धार्मिक गरजांचा समावेश होतो. अशा गरजांची पूर्तता औद्योगिक संघटना, राजकीय पक्ष, शैक्षणिक समूह, धार्मिक समूह, विशिष्ट संबंधित समूह आणि संघटनांच्याकडून होत असतो. त्यामुळेच अशा दुय्यम समूहाना महत्त्व प्राप्त झाल्याचे आढळून येते.

**२) समाजीकरणातील दुय्यम समुहाचे महत्त्व :**

ज्याप्रमाणे कुटुंबासारख्या प्राथमिक समूहाकडून व्यक्तीचे प्रारंभीचे समाजीकरण घडवून आणले जाते त्याचप्रमाणे दुय्यम समूह देखील व्यक्तीचे समाजीकरण घडून आणण्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडतात. उदा.- दुय्यम समूह व्यक्तीला गुण व कौशल्ये शिकवतात. शाळा, महाविद्यालये, कामगार संघटना, राजकीय पक्ष यासारखे दुय्यम समूह व्यक्तीच्या समाजीकरण प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

**३) बौद्धिक कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या संधी :**

दुय्यम समूह हे व्यक्तीच्या समाजीकरणाबरोबर व्यक्तीला तिच्या अंगी असणाऱ्या अप्रकट स्वरुपाच्या बौध्दिक कौशल्यांना विकसीत करण्याची संधी देतात. व्यक्तीच्या व्यक्तीमत्त्वाला विशिष्ट आकार देण्याचे ध्येय देखील दुय्यम समूह महत्त्वाची भूमिका पार पाडतात. अशा समूहांच्यामुळेच व्यक्तीचे विचार, त्यांची

विचारसरणी आणि इतरांविषयी असणाऱ्या प्रवृत्तीमध्ये बदल करुन त्यांना विशिष्ट आकार दिला जातो. यामुळे देखील दुय्यम समूहाला आधुनिक समाजात महत्त्व असल्याचे आढळून येते.

**४) आधुनिक समाजात दुय्यम समूह या कार्यक्षम संघटना आहेत.**

आधुनिक समाज हे गुंतागुंतीचे असतात, अशा समाजात दुय्यम समूह विविध गुंतागुंतीची प्रशासकीय कार्ये पार पाडण्याच्या दृष्टीने तसेच व्यापक पातळीवर सेवा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहेत. उदा.– स्थानिक पातळीवर प्रशासकीय कार्ये पार पाडण्यासाठी नगरपरिषदा जशा आवश्यक असतात त्याप्रमाणे आधुनिक समाजात शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे यासारखे दुय्यम समूह आवश्यक असतात. अशा समूहाना कार्यक्षम संघटना म्हणून ओळखले जाते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न** (Check your Progress) :

खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.

१. सामाजिक समूहाची कोणतीही एक व्याख्या द्या.

२. सामाजिक समूहाची कोणतीही चार महत्त्वाची वैशिष्ट्ये लिहा.

३. सामाजिक समूह महत्त्वाचे कां असतात?

४. समूह वर्गीकरणासाठी समाजशास्त्रज्ञांनी वापरलेले कोणतेही पाच निकष सांगा.

५. समूहाचा आकार या विषयावर आधारित समूहाचे प्रकार सांगा.

६. ऐच्छिक समूह आणि अनैच्छिक समूह याची उदाहरणे द्या.

७. संबंधाचे स्वरुप आणि समूहाचा कालावधी यावर आधारित समूहाचे प्रकार सांगा.

८. हितसंबंधाची व्याप्ती आणि संपर्काचे स्वास्थ्य यावर आधारित समूहाचे प्रकार सांगा.

९. सी.एच. कूले यांची प्राथमिक समूहाची व्याख्या लिहा.

१०. कूले यांनी प्राथमिक समूहांना (Nursery of Human Nature) असे कां संबोधिले आहे?

११. प्राथमिक समूहाची कोणतीही तीन उदाहरणे द्या.

१२. प्राथमिक समूहाची कोणतीही चार वैशिष्ट्ये प्ड़ण्ष्.

१३. प्राथमिक समूहाचे महत्त्व अधोरेखित करणारे कोणतेही तीन मुद्दे नमूद करा.

१४. दुय्यम समूहाची कोणतीही एक व्याख्या द्या.

१५. दुय्यम समूहाची कोणतीही तीन उदाहरणे द्या.

१६. दुय्यम समूहाची कोणतीही पाच वैशिष्टे प्ड़ण्ष्.

१७. दुय्यम समूहाचे महत्त्व अधोरेखीत होईल असे कोणतेही तीन मुद्दे सांगा.

## ४.३ सारांश (Let us sum up) :

मानव हा समाजशील (सामाजिक) प्राणी आहे. प्रत्येक व्यक्ती समूह, समुदाय अथवा समाजामध्ये राहणे पसंद करते आणि त्यामुळे समाजशास्त्रज्ञानी सामाजिक समूहाच्या अभ्यासाला अधिक महत्त्व दिले आहे. काही समाजशास्त्रज्ञानी त्याहीपुढे जाऊन समाजशास्त्राची व्याख्या करताना सामाजिक समूहांचा अभ्यास म्हणजे समाजशास्त्र असे म्हटले आहे, साहजिकच समूह ही एक समाजशास्त्रातील मूलभूत अशी संकल्पना म्हणून ओळखली जाते.

या घटकामध्ये आपण सामाजिक समूहाचा अर्थ, त्याची वैशिष्ट्ये आणि महत्त्व यांचा अभ्यास केला आहे. सोप्या शब्दात सांगावयाचे झाल्यास सामाजिक समूह ही एक मानवी आंतरक्रियांची व्यवस्था आहे. सामाजिक समूह म्हणजे अशा व्यक्तींचा संग्रह की जो आपल्या समूहातील सदस्यांसंबंधी तसेच त्याच्यामधील आंतरक्रियाविषयी संवेदनशील असतो.

सामाजिक समूहाची खालील ठळक वैशिष्ट्ये आढळतात. त्यामध्ये –

१) दोन किंवा अधिक व्यक्तींचा संग्रह. २) सदस्यांमधील आंतरक्रिया ३) समूहातील सदस्यांच्यामध्ये कायमस्वरुपी संपर्क ४) समान उद्दिष्ट्ये अथवा ध्येये. ५) ऐक्य किंवा आपलेपणाची भावना. ६) समूहाची संरचना ७) समूहाचे स्वतंत्र अस्तित्व. ८) गतीशिल स्वरुप. ९) सहकार्य.

एकूण समाजाच्या दृष्टीने तसेच व्यक्तीच्या दृष्टीने विचार करता सामाजिक समूह अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतात. कारण – १) सामाजिक समूह व्यक्ती जीवनातील सामाजिक व मानसिक गरजांची पूर्तता करतात. २) व्यक्तीमत्त्व विकासाला मदत करतात. ३) सामाजीकरण प्रक्रियेस मदत करतात. ४) सामाजिक नियंत्रणाने प्रभावी साधन म्हणून व्यक्तीचे समाजातील वर्तन नियंत्रित करतात.

तसेच या घटकामध्ये आपण विविध समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक समूह वर्गीकरणासाठी जे अनेक निकष अथवा आधार मांडले त्याचा आढावा घेतला आणि विविध निकषांवर आधारित काही महत्त्वाच्या समूह वर्गीकरणांचा अभ्यास केला. समाजशास्त्रज्ञांनी सुचविलेल्या सामाजिक समूह वर्गीकरणा संदर्भात जे अनेक निकष सांगितले त्यामध्ये १) समूहाचा आकार २) सदस्यांचे समूहाशी असणारे संबंध ३) संपर्काचे स्वरुप ४) जवळीकता ५) भौगोलिक सीमारेषा ६) हितसंबंधाची व्याप्ती ७) समूहाचा कालावधी ८) समूहातील संघटनेचे प्रमाण इत्यादींचा समावेश होतो.

विविध निकष अथवा आधाराद्वारे सामाजिक समूहांचे जे अनेक प्रकार आढळून येतात त्यांचा उदाहरणांच्या सहाय्याने खालील एक तक्ता तयार करण्यात आला आहे.

विविध निकषांवर आधारित निवडक सामाजिक समूहांचे वर्गीकरण.

| अ.नं. | निकष अथवा आधार | समूहांचे आकार | समूहाची उदाहरणे |
|---|---|---|---|
| १. | समूहाचा आकार | लहान समूह | कुटुंब, मित्रमंडळ |
| | | मोठा समूह | सैन्यदल, राजकीय पक्ष |
| २. | हितसंबंधाची व्याप्ती | विशिष्ट हितसंबंधित समूह | नाट्यमंडळ, कुटुंब |
| | | समावेशक हितसंबंधित समूह | |
| ३. | हितसंबंधाचा कालावधी | अस्थायी समूह | मोर्चा, शिष्टमंडळ |
| | | स्थायी समूह | कुटुंब, खेडेगाव |
| ४. | समूहातील संघटनाचे प्रमाण | सापेक्षत: असंघटीत समूह | पेन्शनरांचा गट |
| | | विशेष संघटित समूह | कामगार संघटना |
| ५. | सदस्यांमधील परस्पर संबंधाचे स्वरूप | ऐच्छिक समूह | नाट्यमंडळी |
| | | अनिवार्य समूह | कुटुंब, जात |
| ६. | समूहाबद्दलचा व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोन | आमचा समूह | आपले कुटुंब |
| | | इतरांचा समूह | इतरांचे कुटुंब |
| ७. | समूहाचे सदस्यत्व | सदस्यत्व समूह | आपण सभासद असतो |
| | | संदर्भ समूह | असा समूह |
| ८. | संपर्काचे स्वरुप अथवा घनिष्ठता | प्राथमिक समूह | कुटुंब, समवयस्क समूह |
| | | दुय्यम समूह | कामगार संघटना |

यानंतर सदर घटकामध्ये आपण प्राथमिक समूहाचा अर्थ, वैशिष्ट्ये आणि महत्त्व व दुय्यम समूहाचा अर्थ, वैशिष्ट्ये आणि महत्त्व यांचा अभ्यास केला. प्राथमिक समूह मानवीकरणाचे साधन म्हणून ज्याप्रमाणे कृती करतात त्याप्रमाणे व्यक्तीचे व्यक्तीमत्त्व विकसीत करण्यासाठी योगदान देखील करीत असतात. असे समूह सामाजिक नियंत्रणाचे आणि व्यक्तीला प्रोत्साहन देण्याचे साधन म्हणून देखील कार्य करतात.

याउलट आधुनिक औद्योगिक समाजात दुय्यम समूह खालील अनेक महत्त्वाची कार्ये पार पाडतात. उदा.- व्यक्तीकडे असणाऱ्या बौध्दिक गुणांना तसेच क्षमतांना आकार देण्यासाठीचे व्यासपीठ उपलब्ध करुन देतात. अनेक अर्थाने असे समूह व्यक्तीला सामाजिक बनवत असतात. व्यक्तीच्या दुय्यम गरजांची आणि इच्छा आकांक्षांची पूर्तता करतात. त्यामुळे आधुनिक समाजात अशा दुय्यम समूहाला अधिक महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसून येते.

प्राथमिक आणि दुय्यम समूहांच्या संदर्भात या घटकांमध्ये आपण अभ्यासलेल्या वरील विविध मुद्यांचा सारांश तुलनात्मक पद्धतीने खालील कोष्टकात मांडला आहे.

प्राथमिक आणि दुय्यम समूह यांच्यामधील तुलना

| अ.नं. | प्राथमिक समूह | दुय्यम समूह |
|---|---|---|
| अ. | **व्याख्या**<br>चार्लस कूले –<br>''ज्यामध्ये प्रत्यक्ष, समोरासमोरचे घनिष्ठ, दीर्घकाळ टिकणारे आणि प्रामुख्याने सहकार्यावर आधारित असे संबंध असतात त्यांना प्राथमिक समूह असे म्हणतात.'' | **व्याख्या**<br>टिशलेर, व्हायटन व इंटर –<br>''जो समूह व्यक्तीनिरपेक्ष, औपचारिक संघटन आणि विशिष्ट उद्दिष्टे या वैशिष्ट्यांनी युक्त असतो त्याला दुय्यम समूह असे म्हणतात.'' |
| ब. | **प्राथमिक समूहाची वैशिष्ट्ये** | **दुय्यम समुहाची वैशिष्ट्ये** |
| | १. सदस्यांमधील भौतिक सान्निध्य<br>२. समूहाचा लहान आकार<br>३. संबंधातील सातत्य<br>४. समोरासमोरील संबंध<br>५. सदस्यांमधील व्यक्तीगत संबंध<br>६. स्वयंस्फूर्त संबंध<br>७. सर्वसमावेशक संबंध<br>८. अहस्तांतरणीय संबंध<br>९. उद्दिष्टाची एकवाक्यता<br>१०. 'आम्ही'ची भावना | १. सदस्यांत भौतिक सान्निध्याचा अभाव<br>२. समूहाचा मोठा आधार<br>३. तुटक संबंध<br>४. अप्रत्यक्ष संबंध<br>५. सदस्यांमधील व्यक्तीनिरपेक्ष संबंध<br>६. करारात्मक संबंध<br>७. मर्यादित संबंध<br>८. अहस्तांतरणीय संबंध<br>९. साधन स्वरुप संबंध<br>१०. 'आम्ही' अशा भावनेचा अभाव |
| क. | **प्राथमिक समूहाचे महत्त्व** | **दुय्यम समूहांचे महत्त्व** |
| | १. समाजीकरणाच्या प्रक्रियेत प्राथमिक समूह महत्त्वाची भूमिका पार पाडतात. | १. विविध मानवी गरजांची पूर्तता दुय्यम समूह करतात. |
| | २. व्यक्तिमत्त्व विकासामध्ये प्राथमिक समूह महत्त्वाची भूमिका पार पाडतात. | २. दुय्यम समुहांना निश्चित अशी संरचना असते. |
| | ३. प्राथमिक समूह व्यक्तींच्या मानसिक गरजांची पूर्तता करतात. | ३. व्यक्तीच्या बौद्धिक आणि व्यक्तिगत विकासाला दुय्यम समूह संधी देतात |
| | ४. सामाजिक नियंत्रणाचे प्रभावी साधन म्हणून प्राथमिक समूह महत्त्वाचे कार्य करतात. | ४. आधुनिक समाजात दुय्यम समूहांचे प्रभावशाली संघटन दिसून येते. |

| | | |
|---|---|---|
| | ५. प्राथमिक समूह समाजव्यवस्थेच्या स्थैर्याला हातभार लावीत असतात. | ५. उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी व्यक्तीला विविध समूहांची निवड करण्याचे स्वातंत्र्य असते. |
| | ६. प्राथमिक समूहामुळे व्यक्तीला सामाजिक भूमिका चांगल्या प्रकारे वठविता येतात. | ६. आधुनिक समाजात दुय्यम समूहाची अनेक कारणांसाठी गरज असते. |

## ४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to check your progress):

१. हॉर्टन व हंट :

''सदस्यत्त्वाची व आंतरक्रियांची जाणीव असणारे कितीही लोक म्हणजे सामाजिक समूह होय.''

२. सामाजिक समूहाच्या चार प्रमुख वैशिष्ट्यामध्ये –

१) समुह सदस्यांमधील आंतरक्रिया व परस्परांविषयीची जाणीव

२) समुह सदस्यांमध्ये असणारा कायम स्वरुपी संपर्क.

३) समान हेतू, ध्येय व सदस्यांच्या समान आवडी निवडी.

४) सामाजिक समूहांचे गतिशील स्वरुप.

३) सामाजिक समूह महत्त्वाचे असतात कारण :

१) समूह व्यक्तीजीवनातील सामाजिक व मानसिक गरजांची पूर्तता करतात.

२) समूह व्यक्तीमत्त्व विकासाला मदत करतात.

३) समूह समाजीकरणाच्या प्रक्रियेला मदत करतात.

४) समूह सामाजिक नियंत्रणाचे एक साधन म्हणून समाजातील व्यक्ती वर्तनाचे नियंत्रण करतात.

४) सामाजिक समूहांचे वर्गीकरण करण्यासाठी समाजशास्त्रज्ञांनी उपयोगात आणलेले पाच निकष १) समूहाचा आकार २) सदस्यांची समूहाशी असणारी ओळख ३) संपर्काचे स्वरुप आणि लवचिकता ४) समूह सदस्यत्त्वाचे स्वरुप ५) भौगोलिक सीमा रेषा.

५) 'समूहाचा आकार' या निकषावर आधारित समूहाचे लहान समूह आणि मोठा समूह हे प्रकार पडतात.

६) 'संगीत मंडळ' हे ऐच्छिक समूहाचे उदाहरण आहे तर कुटुंब हे अनैच्छिक अथवा अनिवार्य समूहाचे उदाहरण आहे.

७) ‘संबंधाचे स्वरुप’ या निकषावर आधारित समूहाने ‘अनौपचारीक समूह’ आणि ‘औपचारीक समूह’ असे प्रकार आहेत. तर समूहाचा कालावधी या निकषावर आधारीत समूहाचे ‘अस्थायी समूह’ आणि ‘स्थायी समूह’ असे प्रकार आहेत.

८) ‘संबंधाची व्याप्ती’ या निकषावर आधारित समूहाचे विशिष्ट हितसंबंधीत समूह आणि समावेशक हितसंबंधीत समूह असे प्रकार आहेत, तर संपर्काचे स्वरुप व संबंधाची घनिष्ठता या घटकावर आधरित समूहाचे प्राथमिक समूह आणि दुय्यम समूह असे प्रकार आहेत.

९) चार्लस कुलेची प्राथमिक समूहाची व्याख्या ‘‘ज्यामध्ये प्रत्यक्ष, समोरासमोरचे कनिष्ठ, दीर्घकाळ टिकणारे आणि प्रामुख्याने सहकार्यावर आधारित असे संबंध असतात अशा समूहाला प्राथमिक समूह म्हटले जाते.

१०) सी. एच् कुले यांनी प्राथमिक समूहांना "Nursery of human nature" असे संबोधिले आहे, कारण मानवी स्वभावाचा सामाजिक विकास होण्याच्या प्रक्रियेमध्ये प्राथमिक समूह महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

११) कुटुंब, समवयस्क मुलांचा समूह व शेजार ही सर्व प्राथमिक समूहाची उदाहरणे आहेत.

१२) प्राथमिक समूहांच्या चार वैशिष्ट्यांमध्ये अ) सदस्यांमधील भौतिक सान्निध्य, ब) समूहाचा लहान आकार, क) संबंधातील सातत्य, ड) सदस्यांमधील समोरासमोरचे संबंध ही चार वैशिष्ट्ये आहेत.

१३) प्राथमिक समूहाचे महत्त्व अधोरेखीत करणारे तीन मुद्दे –

अ) समाजीकरण प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका

ब) व्यक्तिमत्त्व विकासामध्ये महत्त्वाची भूमिका

क) व्यक्तीच्या मानसिक गरजांची पूर्तता

१४) टिशलेर, व्हायटन व हंटर यांची दुय्यम समूहाची व्याख्या ‘‘जो समूह व्यक्तिनिरपेक्ष, औपचारिक संघटन आणि विशिष्ट उद्दिष्ट्ये या वैशिष्ट्यांनी युक्त असतो त्याला दुय्यम समूह असे म्हणतात.’’

१५) कामगार संघटना, महाविद्यालय आणि कारखाना ही सर्व दुय्यम समूहाची उदाहरणे आहेत.

१६) दुय्यम समूहांच्या पात्र वैशिष्ट्यांमध्ये – अ) सदस्यांत भौतिक सान्निध्याचा अभाव, ब) समूहाचा मोठा आकार, क) तुटक संबंध, ड) सदस्यांमधील अप्रत्यक्ष संबंध, इ) हस्तांतरणीय संबंध इ.चा समावेश होतो.

१७) दुय्यम समूहाचे महत्त्व अधोरेखीत करणारे तीन मुद्दे –

अ) मानवी विविध गरजांची पूर्तता ब) व्यक्तीचे समाजीकरण

क) व्यक्तीच्या बौध्दिक आणि व्यक्तिमत्त्व विकासाला संधी

## ४.५ सरावासाठी प्रश्न (Exercise/Home Assignment) :

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१. सामाजिक समूहाची कोणतीही एक व्याख्या द्या आणि त्याचा अर्थ स्पष्ट करा.

२. सामाजिक समूहाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

३. 'सामाजिक समूहाचे महत्त्व' यावर विस्ताराने चर्चा करा.

४. समूह वर्गीकरणासाठी समाजशास्त्रज्ञांनी उपयोगात आणलेल्या विविध निकषांची अथवा आधाराची यादी तयार करा.

५. विविध निकषांचा आधार घेऊन कोणत्याही पाच समूहांचे विश्लेषण करा.

६. प्राथमिक समूहाची व्याख्या देऊन प्राथमिक समूहाच्या वैशिष्ट्यांचे विश्लेषण करा.

७. दुय्यम समूहाची व्याख्या देऊन दुय्यम समुहाच्या वैशिष्ट्यांचे विश्लेषण करा.

८. प्राथमिक आणि दुय्यम समूह यांच्यातील फरक सांगा.

९. खालील टीपा लिहा.

   अ) प्राथमिक समूहाचे महत्त्व

   ब) दुय्यम समूहाचे महत्त्व

## ४.६ चिंतन आणि कार्य (Reflection and Action) :

तुम्ही ज्या समूहाचे सदस्य आहात अशा समूहाची यादी बनवा. या घटकामध्ये अभ्यासलेल्या सामाजिक समूहाची वैशिष्ट्ये आणि महत्त्व विचारात घेवून तुम्ही ज्या समूहाचे सदस्य आहात. त्या समूहाला ही वैशिष्ट्ये किती प्रमाणात लागू पडतात हे जाणून घेण्याचा प्रयत्न करा. त्याचबरोबर तुमच्या शहरातील विविध समूह शोधा आणि त्यांची यादी तयार करा. त्याचे प्राथमिक समूह व दुय्यम समूह तसेच औपचारिक समूह अनौपचारीक समूह यामध्ये वर्गीकरण करण्याचा प्रयत्न करा. अशा समूहांचा महत्त्वपूर्ण वैशिष्ट्यांची यादी बनवा. यानंतर कारखान्याला भेट देऊन (दुय्यम समूह) त्याठिकाणी कार्यरत असणाऱ्या कामगार संघटनेच्या रचनेचा अभ्यास करा. कामगार संघटना एक समूह म्हणून तुमच्या कुटुंबाशी (प्राथमिक समूह) तुलना करा. त्या दोन्ही समूहामधील फरक जाणून घेण्याचा प्रयत्न करा. तुमच्या स्वनिरीक्षणावर आधारित टीप तयार करा.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings) :


- Horton and Hunt : Sociology, Mac Graw Hill, Tokyo 1976.
- Johnson, Henry M. : Sociology - A systematic introduction, Allied Publishers, Pvt. Ltd., Bombay, 1970.
- Rawat, H. K. : Sociology, Rawat Publications, Jaipur, 2007.
- Tischler, H. L., Whitten, Phillip and Hunter, David, E. K. : Introduction to Sociology, Hold, Rinchard and Winston, 1983.
- Salunkhe, Sarjerao : Samajshastriya Moolbhoot Sankalpana (Marathi) Narendra Publication, Pune, 2006.
- Vidyabhushan and Sachdeva : Introduction to Sociology, Kitals Mahal, Allahabad, 1975.
- Shankar Rao C. N. : Sociology Primary Principles, S Chand and Log New Delhi, 2004.
- David Dressler and Willis, W. M. : Sociology- The Study of Human Interaction, Alfred A Knof, New York 1976.


❑❑❑

# घटक–१
# संस्कृती
(Cultural)

**घटक–संरचना :**

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२.१ संस्कृती – अर्थ आणि वैशिष्ट्ये

१.२.२ संस्कृतीचे घटक

१.२.३ संस्कृतीचे महत्त्व

१.३ सारांश

१.४ स्वयं–अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे

१.५ सरावासाठी प्रश्न

१.६ चिंतन आणि कृती

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.० उद्दिष्ट्ये (Obejctives) :

या घटकाच्या अध्ययनानंतर आपणास :

- संस्कृतीचा अर्थ आणि वैशिष्ट्ये समजून घेता येतील.
- संस्कृतीचे घटक समजून घेता येतील.
- संस्कृतीचे महत्त्व समजून घेता येईल.

## १.१ प्रस्तावना (Introduction) :

पृथ्वीतलावरील मानवाचे इतर सर्व मानवेतरांपासून असणारे वेगळेपण केवळ मानवालाच लाभलेल्या संस्कृतीमुळे स्पष्ट होते. दुसऱ्या शब्दात, संस्कृती हे मानवी समाजांचे एक प्रभेदक लक्षण आहे. यामुळेच सर्व सामाजिक शास्त्रातील एक महत्त्वपूर्ण संकल्पना म्हणून संस्कृतीचा विचार केला जातो. संस्कृती ही

समाजशास्त्रातील एक मूलभूत संकल्पना आहे. समाजशास्त्राचा परिचय करून घेताना संस्कृतीचा अर्थ जाणून घेणे क्रमप्राप्त ठरते. आपली नियमने, मूल्ये, श्रद्धा आणि सभोवतालच्या जगाकडे पाहण्याचा आपला दृष्टीकोन या सर्व बाबींची निश्चिती संस्कृतीकडून होत असते. इतकेच नव्हे तर या सर्व बाबींना योग्य आकार देण्याचे कार्य संस्कृतीच पार पाडत असते. ज्या असंख्य गोष्टी आपण पाहतो, जाणून घेतो आणि वापरतो त्या आपल्या संस्कृतीचे घटक आहेत. आपण काय खावे, कसे खावे, कोणता पेहराव करावा, कोणती भाषा वापरावी, एकमेकांना कसे भेटावे, इतरांशी कसे वागावे, विचार कसा करावा या आणि अशा अनेक बाबी संस्कृतीद्वारेच स्पष्ट व निश्चित केल्या जातात. थोडक्यात, आपल्या क्रिया, भावना आणि विचार इतकेच नव्हे तर आपले सामाजिक व्यक्तिमत्त्व यांची निश्चिती करुन त्यांना योग्य आकार देणारा एक महत्त्वाचा घटक म्हणजे संस्कृती होय. यामुळेच संस्कृतीची व्याख्या व वैशिष्ट्ये जाणून घेणे महत्त्वपूर्ण बनते.

सामान्य लोकांकडून बरेचदा एखाद्या व्यक्तीची कला, वाङ्मय अगर संगितातील उच्च अभिरुची स्पष्ट करण्यासाठी संस्कृती या संकल्पनेचा वापर केला जातो. पण सामान्य माणूस ज्या अर्थाने 'संस्कृती' हा शब्द वापरतो त्याहून निराळा असा या शब्दाचा अर्थ समाजशास्त्रात आहे.

समाजशास्त्रीयदृष्ट्या प्रत्येक मानव हा संस्कृतीच्या प्रभावाखाली असतो. सर्व मानवांचे-मग ते शिक्षित असोत अगर अशिक्षित, उच्च वर्गातील असोत अगर निम्न वर्गातील, व्यावसायिक असोत किंवा शारीरिक श्रमजिवी-वर्तन संस्कृतीद्वारेच निर्धारीत होते. समाजशास्त्रज्ञांकडून जेव्हा संस्कृती ही संकल्पना वापरली जाते तेव्हा त्यांना सर्व मानवी समूहांच्या एका सामान्य वैशिष्ट्याचा उल्लेख करावयाचा असतो. समाजशास्त्रज्ञांना अभिप्रेत असणारा संस्कृतीचा व्यापक अर्थ स्पष्ट करण्यासाठी या संकल्पनेचा अर्थ व वैशिष्ट्ये यांचा आढावा आपल्याला घ्यावा लागेल.

## **१.२ विषय-विवेचन** (Presentation of Subject-matter) :

या घटकाची दोन विभागात विभागणी केली आहे. पहिल्या विभागात आपण संस्कृती या संकल्पनेच्या काही व्याख्या पाहणार असून त्या आधारे संस्कृतीचा अर्थ जाणून घेणार आहोत. दुसऱ्या विभागात संस्कृतीच्या विविध वैशिष्ट्यांचा संक्षिप्त आढावा आपल्याला घ्यावयाचा आहे.

### **१.२.१ संस्कृती : अर्थ व वैशिष्ट्ये**

**संस्कृती – व्याख्या आणि अर्थ** (Definition and Meaning of Culture) :

संस्कृती या संकल्पनेचा अर्थ समजून घेण्यासाठी विविध विचारवंतानी या संकल्पनेच्या मांडलेल्या व्याख्या आपण समजून घेऊ.

१. **सर एडवर्ड बी. टायलर – ''संस्कृती ही एक अशी संकीर्ण समग्रता आहे की ज्यात ज्ञान, श्रद्धा, कला, नीती, कायदा, रुढी या व अशाच इतर पात्रतांचा व सवयींचा समावेश होतो आणि या गोष्टी व्यक्तीने समाजाचा सभासद या नात्याने संपादित केलेल्या असतात.''** ("Culture is that complex whole

which includes knowledge, beliefs, art, morals, customs and any other capabilities and habits acquired by man as a member of society." - Sir Edward B. Tylor)

२. **हॉर्टन आणि हंट – ''ज्याचे सामाजिक अध्ययन होते आणि ज्यात समाजातील सदस्यांचा सहभाग असतो असे सर्व काही म्हणजे संस्कृती होय.''** ("Culture is everything which is socially learnt and shared by the members of society." - Horton and Hunt)

३. **ड्रेसलर आणि विलिस – ''अनेक लोकांना समान असलेल्या आणि ज्यांचे लोकांकडून आपल्या मुलांकडे संक्रमण होते ती कौशल्ये, श्रद्धा, ज्ञान आणि उत्पादित वस्तू अशा सर्व गोष्टींचा संस्कृतीत समावेश होतो.''** (Culture consists of the sum total of skills beliefs, knowledge and products that are shared by a number of people and transmitted to their children." - Dressler and Willis)

४. **टिशलेर, व्हायटन आणि हंटर – ''मानवी व्यक्ती ज्या समूहाचा सभासद असतात त्यात त्या जे जे करावयास, वापरण्यास, उत्पादित करण्यास, माहीत करून घेण्यास आणि श्रद्धा ठेवण्यास शिकतात त्या सर्व गोष्टींना संस्कृती म्हणतात.''** (Culture is "all that human beings learn to do, to use, to produce, to know and to believe in the social groups to which they belong." - Thischler, Whitten and Hunter)

५. **नॉर्थ, सी. सी. – ''संस्कृती म्हणजे मानवनिर्मित अशी साधने की ज्यांच्यामार्फत मानवी गरजांची पूर्तता होत असते.''** ("Culture consists in the instruments constitued by men to assist him in satisfying his wants." - North, C. C.)

६. **रॉबर्ट बिअरस्टेड – ''आपण ज्या रीतीने विचार आणि विविध गोष्टी करतो आणि समाजाचे सभासद या नात्याने आपल्याजवळ जे जे काही असते अशा सर्व बाबींची संकीर्ण समग्रता म्हणजे संस्कृती होय.''** ("Culture is the complex whole that consists of all the ways we think and do and everything we have as a member of society." - Robert Bierstedt)

या व्याख्यांचे काळजीपूर्वक परीक्षण केले असता संस्कृती या संकल्पनेच्या अर्थावर अधिक प्रकाश टाकणारे खालील मुद्दे व्याख्यांत अधोरेखित केले गेल्याचे आपल्याला आढळून येते.

१. असंख्य गोष्टींचा समावेश असलेली संस्कृती ही एक संकीर्ण समग्रता आहे. संस्कृतीत मानवनिर्मित अशा सर्व भौतिक आणि अभौतिक घटकांचा समावेश होतो. मानवाने निर्माण केलेल्या सर्व भौतिक गोष्टी–अगदी सुईपासून ते विमानापर्यंत, हातरुमालापासून विविध प्रकारच्या वस्त्रांपर्यंत, केसांना लावायच्या साध्या पिनपासून असंख्य प्रकारच्या दाग–दागिन्यांपर्यंत, साध्या खोऱ्यापासून ट्रॅक्टरपर्यंत, गणनयंत्रापासून आधुनिक संगणकापर्यंत, साध्या बाणापासून युद्धात वापरल्या जाणाऱ्या क्षेपणास्त्रापर्यंत– संस्कृतीत समाविष्ट होतात. याबरोबरच ज्ञान, कौशल्ये, श्रद्धा, मूल्ये, नीतितत्त्वे या आणि अशाच इतर

अभौतिक गोष्टींचा संस्कृतीत समावेश होतो. थोडक्यात संस्कृती म्हणजे भौतिक आणि अभौतिक गोष्टींच्या समावेशातून निर्माण झालेली संकीर्ण समग्रता आहे.

२. समाजसदस्यांकडून संस्कृती शिकून आत्मसात केली जाते. संस्कृतीचे घटक व्यक्तीला अनुवंशिकतेने अगर जीवशास्त्रीयदृष्ट्या प्राप्त होत नाहीत. समाज अगर समूहाचा एक सदस्य या नात्याने व्यक्तीला संस्कृतीतील घटक शिकूनच आत्मसात करावे लागतात.

३. एखादा विशिष्ट समूह अगर समाजातील सर्वांसाठी संस्कृती समान असते, त्यात सर्वांचा सहभाग असतो.

४. संस्कृती हे मानवाच्या विविध गरजांच्या पूर्ततेचे एक साधन आहे.

५. संस्कृती हा समाजाचा सामाजिक वारसा असून तो एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित के ला जातो.

६. आपल्याकडून केल्या जाणाऱ्या सर्व क्रिया, आपली विचार करण्याची पद्धती, आपली वर्तनपद्धती, ज्यांच्यावर आपण विश्वास ठेवतो अशा सर्व गोष्टी आणि समाजाचा एक सदस्य या नात्याने आपण आत्मसात केलेल्या इतर सर्व गोष्टी यांचा संस्कृतीत समावेश होतो. या बाबींवर विविध व्याख्यांत भर देण्यात आला आहे. दुसऱ्या अधिक समर्पक अशा शब्दात Clyde Kluckhon यांच्या मते संस्कृती हा 'जीवन जगण्याचा आराखडा' आहे.

७. संस्कृती या संकल्पनेचा समाजशास्त्रीय अर्थ स्पष्ट करताना खालील मुद्देही विचारात घ्यावे लागतात.

१. समाजशास्त्रज्ञांनी जरी सर्व मानव समाजाना संस्कृती लाभलेली असते असे म्हटले असले तरी एका समाजाची संस्कृती दुसऱ्या समाजापेक्षा भिन्न असते. उदा. भारतीय समाजाची संस्कृती अमेरिकन समाजाच्या संस्कृतीपेक्षा भिन्न आहे.

२. संस्कृती ही मानवनिर्मित अशा भौतिक व अभौतिक घटकांच्या एकत्रीकरणातून निर्माण झालेली असते हे सत्य आहे, पण संस्कृतीतील अभौतिक घटक भौतिक घटकांपेक्षा अधिक महत्त्वपूर्ण असतात, कारण भौतिक गोष्टी तयार करण्यासाठी वापरण्यात आलेले ज्ञान, कौशल्ये आणि तंत्रज्ञान अभौतिक संस्कृतीचे घटक असतात. परिणामी जरी भौतिक वस्तू नामशेष झाल्या तरी त्या निर्माण करण्यासाठी आवश्यक असणारे ज्ञान व कौशल्य आपल्याकडे असेल तर जेव्हा हव्या तेव्हा आपण त्या वस्तूंची पुनर्निर्मिती करू शकतो.

३. संस्कृती एक नियमनात्मक व्यवस्था आहे. लोकरुढी, नीतितत्वे आणि कायदा हे नियमनांचे विविध प्रकार आहेत. विशिष्ट समाजातील सर्व नियमने परस्परसंबंधित असून त्यांच्यापासून एक संकीर्ण व्यवस्था अस्तित्वात येते. याबरोबरच समाजाच्या नियमन व्यवस्थेला आधार देणारी सांस्कृतिक मूल्येही प्रत्येक समाजात अस्तित्वात असतात. नियमने व मूल्ये यांची एक व्यवस्था या अर्थाने समाजशास्त्रज्ञ

संस्कृतीला महत्त्व देतात, कारण समाजातील स्थिरता आणि व्यवस्था मोठ्या प्रमाणात या नियमन व मूल्ये व्यवस्थेवरच अवलंबून असते.

**संस्कृतीची वैशिष्ट्ये** (Characteristics of Culture) :

संस्कृती या संकल्पनेच्या विविध व्याख्या व अर्थ यांचा अभ्यास केल्यानंतर आता संस्कृतीच्या काही महत्त्वाच्या वैशिष्ट्यांचा आपण अभ्यास करु. संस्कृतीची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे –

१. **संस्कृतीचे संपादन होते किंवा ती शिकून घेतली जाते** (Culture is acqired or learned) :

संस्कृती हा माणसाचा अनुवंशिक गुणधर्म नाही. समाज सदस्यांना संस्कृतीचे संपादन करावे लागते किंवा ती शिकून घ्यावी लागते. मानवेतर प्राणिजाती आणि मनुष्यप्राणी या दोहोंत काही महत्त्वाचे भेद आहेत. मानवेतर प्राणीजातींबाबत, त्यांचे बहुतेक वर्तन सहजप्रवृत्त (instinctual) असते, इतकेच नव्हे तर ते मुख्यत्वे अनुवंशानेच निर्धारीत होत असते. बहुसंख्य मानवेतरांकडून त्यांच्या मूलभूत जैविक गरजांची पूर्तता एका ठराविक पद्धतीने केली जाते आणि या पद्धती एका विशिष्ट मानवेतर प्राणीजातीतील सर्वांसाठी सारख्याच असतात. हा त्यांनी अनुवंशिकतेने प्राप्त केलेल्या अगर सहजप्रवृत्त वर्तन पद्धतीचा परिणाम आहे. मानवेतर प्राणी जातीत आढळून येणारे अशा प्रकारचे सहजप्रवृत्त वर्तन (उदा. कोळ्याकडून विणले जाणारे जाळे). त्या प्रजातीतील स्थल–काल परत्वे सर्व प्राण्यांकडून सारख्याच पद्धतीने घडून येते आणि त्यात फरक दिसून येत नाही.

मानवाबाबत मात्र हे खरे नाही. मानव प्राण्याच्या वर्तनात व्यक्ती आणि संस्कृतीपरत्वे खूप विविधता आणि परिवर्तनीयता आढळते. मानव आपल्या गरजांच्या पूर्तीसाठीची पद्धती व साधने संस्कृतीच्या माध्यमातून आत्मसात करत असतो. उदा. भूक ही सर्वच माणसांची एक मूलभूत गरज आहे. पण मानवाला आपली भूक कशी भागवावी हे शिकावे लागते. कोणते अन्न खावे, ते किती, कसे आणि केंव्हा खावे इ. या सर्व बाबी संस्कृतीद्वारे निर्धारीत केल्या जातात आणि संस्कृतीपरत्वे त्यात भिन्नताही आढळते. अशा सर्व बाबी व्यक्तीला शिकून घ्याव्या लागतात. केवळ आपल्या गरजांच्या पूर्ततेच्या पद्धतीच नव्हे तर ज्ञान, श्रद्धा, नीतितत्त्वे, मूल्ये, सवयी, कौशल्ये आणि संपूर्ण जीवनपद्धती या बाबी समाजाचा एक सदस्य या नात्याने सामाजिक आंतरक्रियांच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीला शिकून घ्याव्या लागतात. अशाप्रकारे संस्कृतीच्या आत्मसातीकरणानंतरच मानव प्राण्याचे 'मानवात' रूपांतर होते.

२. **संस्कृतीचे संक्रामण होते** (Culture is Transmitted) :

प्रत्येक समूहात संस्कृती ही जुन्या पिढीकडून नव्या पिढीकडे संक्रामित केली जाते. आपल्या गुणसूत्रांच्या माध्यमातून मानवाकडून वर्तन पद्धतींचे संक्रामण नव्या पिढीकडे केले जात नाही. याऐवजी सामाजिक आंतरक्रियांच्या सहाय्याने संस्कृती शिकवली जाते आणि शिकून आत्मसात केली जाते. कुटूंब, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे याबरोबरच रेडिओ, दूरदर्शन, वर्तमानपत्रे, मासिके ही प्रसारमाध्यमे, संस्कृतीच्या संक्रामणाच्या समाजातील यंत्रणाच आहेत. यामार्फत संस्कृतीचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे

सातत्याने हस्तांतरण होत असते. संस्कृतीच्या अशा सातत्यपूर्ण संक्रामणामुळे प्रत्येक नव्या पिढीला जीवन जगण्याचे नवे मार्ग दरवेळी शोधावे लागत नाहीत.

३. **संस्कृतीचे स्वरूप सामाजिक असते आणि त्यात सर्वांचा सहभाग असतो** (Culture is Social and Shared) :

संस्कृती ही व्यक्तिगत बाब नसून ती संपूर्ण समाजाची निर्मिती असते. हजारो वर्षांच्या कालावधीत समाज सदस्यांत होणाऱ्या सामाजिक आंतरक्रियांच्या सहाय्याने तिची निर्मिती झालेली असते. परिणामी सर्व समाज सदस्यांची सामायिक मालकी संस्कृतीवर असते. समाजातील इतर सदस्यांशी येणाऱ्या संबंधामुळे मानव संस्कृती आत्मसात करत असतो. थोडक्यात संस्कृतीच्या निर्मितीमध्ये आणि हस्तांतरणामध्ये संपूर्ण समाज सहभागी असतो म्हणूनच संस्कृती सामाजिक व सामायिक असते.

४. **संस्कृती समाजाची आदर्श जीवन रीत असते** (Culture is an ideal way of life of society):

संस्कृती, मग ती कोणत्याही समाजाची असो, त्या विशिष्ट समाजाच्या दृष्टीने 'आदर्श-जीवनरीत'च असते. विशिष्ट समाजाला हजारो वर्षापासून लाभलेल्या सामाजिक वारसारुपी संस्कृतीचे हस्तांतरण अखंडितपणे प्रत्येक पिढी नव्या पिढीकडे करत असते. परिणामी गत पिढ्यांनी अनुसरलेला जीवनमार्ग आपोआपच नव्या पिढीच्या दृष्टीनेदेखील 'आदर्श जीवनमार्ग'च बनतो. शिवाय आपल्या समाजातील मूल्ये, श्रद्धा, नियमने व वर्तनपद्धती आदर्श आहेत इतकेच नव्हे तर इतर समाजाच्या संस्कृतीपेक्षा आपलीच संस्कृती श्रेष्ठ आहे, तीच सर्वश्रेष्ठ आहे अशीच शिकवण समाजीकरणाच्या सहाय्याने नव्या पिढीला दिली जाते. उदा. भारतीय संस्कृती ही जगातील एक आदर्श संस्कृती आहे, असाच विचार आपण करतो, कारण असा विचार करायला आपल्याला शिकविलेले असते.

५. **संस्कृती संतोषप्रद आहे** (Culture is gratifying) :

सर्व प्राणीमात्रांप्रमाणेच मानवाच्याही काही जैविक गरजा असतात. तसे पाहता अन्न व विश्रांती ही मानवाची मूलभूत गरज आहे. त्याचप्रमाणे पर्यावरणीय बदलांत स्वत:चे संरक्षण करणे, आपल्या अपत्यांचे संरक्षण व संवर्धन करणे याही मानवाच्या गरजाच असून याशिवाय मानवी समाजाचे अस्तित्वच धोक्यात येईल याची पूर्ण जाणीव मानवाला आहे. या जैविक गरजांप्रमाणेच मानवाच्या असंख्य मानसिक व सामाजिक गरजाही असतात. प्रत्येक समाजाची संस्कृती आपल्या सदस्यांच्या जैविक, मानसिक व सामाजिक गरजांची पूर्तता करणाऱ्या यंत्रणांनी युक्त असते. विशिष्ट समाज सदस्यच नव्हे तर प्रत्येक नवी पिढी आपल्या गरजांच्या पूर्ततेसाठी संस्कृतीतील संस्थांनी निर्धारीत केलेल्या मार्गांचा अवलंब करताना आढळते. अशाप्रकारे आपल्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्याच्या विविध पद्धती व त्यासाठी आवश्यक असणारी साधने निर्माण करून प्रत्येक संस्कृती सदस्यांच्या गरजांची पूर्तता करण्याचा प्रयत्न करते म्हणूनच ती संतोषप्रद बनते.

६. **संस्कृती अभियोजनक्षम असते** (Culture is adaptive) :

माणूस हजारो वर्षांपासून सभोवतालच्या पर्यावरणाशी, त्यात होत गेलेल्या बदलांशी अभियोजन प्रक्रियेद्वारे जुळवून घेण्यात यशस्वी झाला आहे. अशा बदलांशी जुळवून घेण्याची मानवेतरांतील प्रक्रिया व

क्षमता अत्यंत संथ व अत्यल्प आहे. परिणामी पर्यावरणीय बदलांशी यशस्वीरित्या सामोरे जाऊ न शकलेले असंख्य मानवेतर प्राणी काळाच्या ओघात नष्ट झाले आहेत; कित्येक सजीव नाशाच्या उंबरठ्यावर आहेत. पण आपल्याला लाभलेल्या संस्कृतीच्या सहाय्याने मानवाने पर्यावरणीय बदलांशी केवळ अभियोजनच साधले असे नव्हे तर आपल्या सभोवतालच्या पर्यावरणावर नियंत्रण प्रस्थापित करण्याचा यशस्वी प्रयत्नही केला आहे. म्हणूनच पर्यावरणाशी अभियोजन साधण्याचा मानवाचा वेग मानवेतरांपेक्षा निश्चितच अधिक आहे. ही अभियोजनक्षमता विशेष प्राविण्य व सामान्य अभियोजन या दोन प्रकारांत होत असते. विश्वातील बहुसंख्य संस्कृती या दोन्ही प्रकारांचा वापर करण्याचे ज्ञान मानवाला देतात. विशिष्टीकृत अभियोजनात (Specialised Adaptation) विशिष्ट पर्यावरणाशी किंवा पर्यावरणीय परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी आवश्यक अशा अभियोजनपद्धतींचा समावेश होतो. उदा. एस्किमोंचे 'इग्लू' (Igloo) हा निवाऱ्याचा एक उत्तम नमुना आहे. घर बांधणीचा हा नमुना बर्फाळ प्रदेशात अत्यंत यशस्वी ठरतो पण 'सहारा वाळवंटात' तो कुचकामी आहे. सामान्य अभियोजनात (Generalized Adaptation) गुंतागुंतीच्या पण लवचिक अशा अभियोजन पद्धतींचा समावेश होतो. उदा. ट्रक, रेल्वे, विमान व जहाजे अशी विविध प्रकारची साधने असणारी आधुनिक औद्योगिक समाजातील वाहतूकीची व्यवस्था, वाळवंटातील भटक्या जमातींकडून वापरल्या जाणाऱ्या उंट या वाहतूकीच्या साधनापेक्षा कितीतरी पटीने गुंतागुंतीची तरीही लवचिक आहे. अशाप्रकारे मानवाला आपल्या पर्यावरणाशी प्रभावीपणे जुळवून घ्यायला मदत करणारी संस्कृती ही एक अत्यंत उपयुक्त अशी अभियोजनात्मक यंत्रणाच आहे.

७. **संस्कृती ही एकात्मता निर्माण करणारी यंत्रणा आहे** (Culture is an integrative mechanism):

संपूर्ण समाजाला एकसंघ व एकात्म ठेवण्याचे कार्य संस्कृती पार पाडते. संस्कृती ही नियमने आणि मूल्ये यांची एक संघटीत व्यवस्था असते. ही व्यवस्था सामाजिक संस्थांच्या स्वरुपात संघटीत झालेली असते आणि सर्व सामाजिक संस्था परस्परसंबंधीत व परस्परावलंबी असतात. अशा सामाजिक संस्थांनी निर्धारीत केलेल्या मार्गानेच समाजसदस्य आपापल्या भूमिका वठवत असतात. इतकेच नव्हे तर समाजसदस्यांतील व्यक्तिगत स्वरुपाचे वर्तनही मोठ्या प्रमाणात त्या समाजाच्या नियमन व मूल्य व्यवस्थेद्वारे नियंत्रित होत असते. थोडक्यात, संस्कृतीत समाविष्ट होणारी नियमन व मूल्यव्यवस्था समाजातील व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समूह व समूह-समूहातील संबंध प्रस्थापित करण्यास व अशा संबंधांवर नियंत्रण ठेवण्यास सहाय्यभूत ठरते. म्हणूनच समाजात एकात्मता निर्माण करणारी एक यंत्रणा असा संस्कृतीचा उल्लेख करावा लागतो.

८. **संस्कृती अमूर्त असते** (Culture is abstract) :

समाजशास्त्रात संस्कृती ही संकल्पना सामान्यपणे अभौतिक संस्कृती या अर्थानेच वापरली जाते. या अभौतिक संस्कृतीत नियमने, मूल्ये, श्रद्धा, ज्ञान, विचारसरणी अशा असंख्य गोष्टींचा समावेश होतो. या सर्व गोष्टी डोळ्यांना दिसत नाहीत. म्हणूनच संस्कृती अमूर्त असते. जरी आपण संस्कृतीमुळे प्रभावित झालेले व्यक्ती वर्तन सहजगत्या बघू शकत असलो तरी आपण संस्कृती प्रत्यक्ष बघू शकत नाही. पण तिच्याविषयी अनुमान बांधता येते. जरी संस्कृती अमूर्त व अदृश्य असली तरी तिचा व्यक्तीवर असणारा प्रभाव कधीच

वरवरचा अगर उथळ असत नाही. उदा. अन्न वर्जनतेबाबतच्या नियमाचे आत्मसातीकरण व्यक्तीकडून इतके तंतोतंतपणे झालेले असते की चुकून जरी निषिद्ध मानलेले अन्न पोटात गेले तर पचनसंस्थेकडून ते बाहेर फेकले जाते. एखादा अत्यंत क्रोधित झालेला मानवी समूह त्या समूह सदस्यांनी शिकलेल्या मूल्य व श्रद्धांप्रमाणेच वर्तन करतो.

९. **संस्कृती समाजपरत्वे बदलते** (Culture varies from society to society) :

संस्कृती हे सर्व मानव समाजाचे एक प्रभेदक लक्षण आहे. पण याचा अर्थ असा नाही की सर्व संस्कृती तंतोतंत सारख्याच आहेत. एखाद्या समाजाची संस्कृती दुसऱ्या कोणत्याही समाजाच्या संस्कृतीपेक्षा वेगळी असते. उदा. भारतीय संस्कृती अमेरिकन संस्कृतीपेक्षा भिन्न आहे. एकाच समाजात अस्तित्वात असणाऱ्या विविध समूहांच्या संस्कृतीतही तितकीच विविधता असल्याचे आढळून येते. उदा. भारतीय समाजातील हिंदू, मुस्लिम, जैन व इतर समुदायांकडून भिन्न भिन्न सांस्कृतिक परंपरांचे पालन केले जाते. हे जरी सत्य असले तरी सर्व संस्कृतीत काही समान बाबी असल्याचेही दिसून येते.

१०. **संस्कृती प्रतीकात्मक असते** (Culture is symbolic) :

प्रतीके या अशा वस्तू असतात की ज्या दुसऱ्या कशाचे तरी प्रतिनिधीत्व करतात. प्रतीकांमध्ये ते अभिव्यक्त करत असलेल्या वस्तूचे कोणतेही गुण असत नाहीत. लोक अशा प्रतीकांना मान्यता देतात म्हणूनच प्रतीके वस्तूची अभिव्यक्ती करतात. प्रत्येक संस्कृती प्रतीकांना आपल्या परीने अर्थ देत असते. उदा. काही पाश्चिमात्य राष्ट्रात अंत्यविधीच्या वेळी आपल्याला झालेले दु:ख व्यक्त करण्यासाठी लोक काळे कपडे वापरतात तर पूर्वेकडील राष्ट्रात शुभ्र वस्त्र परिधान करून दु:ख व्यक्त केले जाते. या ठिकाणी प्रतीक वेगळे असले तरी त्याला जोडण्यात आलेला अर्थ एकच आहे. संस्कृतीतील भौतिक-अभौतिक असे बहुतांशी घटक प्रतीकात्मक स्वरुपात असतात. परिणामी संस्कृतीत प्रतीकांच्यामार्फत व्यक्त झालेल्या अर्थ पद्धतींचा समावेश होतो असे म्हणावे लागेल. याबरोबरच एखाद्या व्यक्तीची अगर तिच्या घरातील भौतिक वस्तू या केवळ त्याचे पर्यावरणापासून संरक्षण करण्याची साधने नसून समाजाच्या वर्ग व्यवस्थेतील त्या व्यक्तीचा दर्जा निर्धारण करणारी प्रतीकेच असतात. कित्येक लोकांसाठी त्यांच्याकडे असणारी चारचाकी गाडी हे केवळ वाहतुकीचे साधनच नसते तर त्यांचा सामाजिक व आर्थिक दर्जा निर्देशित करण्याचे ते एक प्रतीक असते. संस्कृतीत अंतर्भूत असणाऱ्या सर्व प्रतीकांमध्ये 'शब्द' या प्रतीकांना फार महत्त्वाचे स्थान आहे. मानव भाषेतील प्रतीकांचा वापर करून त्याच्या सभोवतालच्या जगाचे बोधात्मक वर्गात वर्गिकरण करतो आणि परस्परांशी संवाद साधण्यासाठी त्यांचा वापर करतो. परिणामी नियमनात्मक व बोधात्मक संस्कृती शिकवणे व त्यात सहभागी होणे हे केवळ भाषेमुळेच शक्य होते. भाषा हेच संस्कृतीचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरण करण्याचे एक प्रमुख साधन आहे. मानवी भाषेतील शब्द ही प्रतीकेच असतात.

११. **संस्कृती सापेक्षत: स्थिर असते** (Culture tends to be relatively stable) :

कोणत्याही समाजाची संस्कृती ही सापेक्षत: स्थिर असते. तिच्यात सामान्यत: जलद गतीने बदल होत नाहीत. संस्कृतीत होणारे बदल हे अत्यंत संथ गतीने व दीर्घकाळात घडून येत असतात. विल्यम एफ् ऑग्बर्न

(William F. Ogburn) यांनी मांडलेली 'सांस्कृतिक गतीमंदतेची' किंवा 'सांस्कृतिक पश्चायनाची' (Cultural lag) संकल्पना ही बाब अधिक स्पष्ट करते. संस्कृतीत भौतिक संस्कृती व अभौतिक संस्कृती असे दोन घटक समाविष्ट झालेले असतात. भौतिक संस्कृतीत होणारा बदल हा अभौतिक संस्कृतीतील बदलांपेक्षा जलद गतीने होत असतो. ऑग्बर्न यांच्या मते तंत्रज्ञानात होणारा बदल अत्यंत जलद असतो, म्हणूनच भौतिक संस्कृतीत जलद बदल होतो. पण नियमने, मूल्ये व श्रद्धा या संस्कृतीच्या अभौतिक घटकांत होणारा बदल अत्यंत संथ असतो. अशा प्रकारे तंत्रज्ञानात होणाऱ्या गतिमान बदलांची परिणती सांस्कृतिक गतिमंदतेत होते. (The technological change results in cultural lag) असे ऑगबर्न यांनी म्हटले आहे.

### १.२.२ **संस्कृतीचे घटक** (Components of Culture) :

संस्कृतीतील भौतिक व अभौतिक घटकांचा उल्लेख संस्कृतीचे घटक म्हणून केला जातो.

### १) **भौतिक संस्कृती** (Material Culture) :

भौतिक संस्कृतीत मानवाने निर्माण केलेल्या व तो वापरीत असलेल्या सर्व वस्तूंचा समावेश होतो. सुई, विमाने, बोटी, संगणक, विविध हत्यारे, साधने, यंत्रे, खिळे, भांडी, कपडे, लाकडी फर्निचर, घड्याळे, घरे, दाग-दागिने, नाणी, रेडिओ, दूरदर्शनसंच ही आणि अशी असंख्य उदाहरणे भौतिक संस्कृतीत समाविष्ट होणाऱ्या वस्तूंची देता येतील. अशा भौतिक संस्कृतीविना मनुष्यजातीचे जिवंत राहणे अशक्य आहे. कारण पर्यावरणाचे मानवी जीवनावर होणारे आघात पचवण्याची वा परतवून लावण्याची क्षमता भौतिक संस्कृती मानवाला प्राप्त करून देते. मानव वापरत असलेले कपडे अगर त्याने केलेली घरांची निर्मिती त्याचे थंडी आणि प्रखर सुर्यप्रकाशापासून संरक्षण करते. आपल्या सभोवतालच्या पर्यावरणाशी जुळवून घेण्यासाठी त्यात आपल्याला हवे तसे बदल करण्यासाठी आणि आपल्या फायद्यासाठी पर्यावरणाचा उपयोग करण्यासाठी मानव प्रामुख्याने भौतिक संस्कृतीचा अवलंब करत आला आहे. मानवाने मोठमोठी धरणे बांधून, सिंचनासाठी कालवे काढून, पडिक जमीनही लागवडीस योग्य बनविली आहे. कोळसा आणि नैसर्गिक तेलाचे उर्जेत रूपांतर केले आहे. इतकेच नव्हे तर अशुद्ध स्वरुपातील धातूंवर प्रक्रिया करून त्यांना अमूल्य बनविले आहे, अष्टपैलूत्व प्राप्त करून दिले आहे. भौतिक संस्कृतीतील घटकांच्या सहाय्याने केवळ मानवच अत्यंत प्रतिकूल पर्यावरणावर मात करून सर्व हवामानात आणि सर्व भूखंडांवर आपल्या अस्तित्वाच्या पाऊलखुणा उमटवू शकला आहे. याबरोबरच चंद्राच्या भूपृष्ठावर आणि समुद्राच्या तळाशी चालण्यात व वावरण्यात मानवाला यश लाभले आहे ते केवळ भौतिक संस्कृतीमुळेच. मानवेतरांना अशा बाबतीत यश संपादन करण्यात यश मिळालेले नाही आणि पुढे मिळण्याची सुतराम शक्यताही नाही. म्हणूनच भौतिक संस्कृतीने मानवाला पृथ्वीतलावरील एका प्रभुत्वशाली जीवाचा दर्जा प्राप्त करून दिला आहे.

### २) **अभौतिक संस्कृती** (Non-Material Culture) :

भौतिक संस्कृतीत समाविष्ट होणाऱ्या विविध घटकांच्या वापराबाबतच्या कल्पना आणि नियमने, ज्ञान, श्रद्धा आणि मूल्ये यांचा अभौतिक संस्कृतीत समावेश होतो. भौतिक संस्कृतीतील घटकांना भौतिक अस्तित्त्व

असते, त्यांचे निरीक्षण केले जाऊ शकते. त्यांना स्पर्शही करता येतो. पण अभौतिक संस्कृतीतील घटक म्हणजे भौतिक संस्कृतीतील घटकांच्या वापराविषयीच्या कल्पना असल्याने त्यांना स्पर्श करता येत नाही, त्यांचे निरीक्षण करता येत नाही किंवा त्यांना भौतिक अस्तित्वच असत नाही. हिंदू धर्मात विवाहाप्रसंगी वधू–वरांना लावली जाणारी हळद असो अगर वाढदिवसादिवशी दिली जाणारी फुले असोत. या वस्तूंना भौतिक अस्तित्व निश्चितच असते. पण त्यांच्यामार्फत आपल्या संस्कृतीत असणाऱ्या श्रद्धा विवाहाच्यावेळी हळद लावल्याने वधू–वरांच्या आयुष्याचे सोने होते; अगर उमलत्या फुलांप्रमाणे त्यातील विविध रंग, गंधाप्रमाणे व्यक्तीचे आयुष्य फुलत अगर गंधीत होत राहो, यामधून मूल्ये व आपला दृष्टीकोण स्पष्ट होत असतो. अशी ही अभौतिक संस्कृती आपले ज्ञान, श्रध्दा, मूल्ये व आपण इतर समाजसदस्यांशी कशा आंतरक्रिया कराव्यात, आपल्या समस्यांचे कसे निराकरण करावे या विषयीच्या नियमनांपासून निर्माण होत असून कुटूंब, धर्म, शिक्षण, अर्थ व शासनसंस्था अशा संस्थांमार्फत तिचे हस्तांतरण होत असते. समाजसदस्य या संस्थांमार्फत अभौतिक संस्कृती शिकून आत्मसात करत असतात.

भौतिक संस्कृतीपेक्षा व्यापक असणाऱ्या आणि भौतिक संस्कृतीतील घटकांनाच नव्हे तर संपूर्ण मानवी जीवनाला योग्य अर्थ व दिशा प्राप्त करून देणाऱ्या अभौतिक संस्कृतीचे टिशलेर, व्हायटन आणि हंटर यांनी नियमनात्मक संस्कृती (Normative Culture) आणि बोधात्मक संस्कृती (Cognitive Culture) अशा दोन विभागात वर्गीकरण केले आहे. अभौतिक संस्कृतीच्या या दोन्ही विभागांचा आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.

**अ) नियमनात्मक संस्कृती** (Normative Culture) :

अभौतिक संस्कृतीचा एक महत्त्वाचा घटक म्हणून नियमनात्मक संस्कृतीचा उल्लेख करावा लागतो. सामाजिक नियमने नियमनात्मक संस्कृतीचे मूलघटक आहेत. नियमने ही वर्तनविषयक नियम असतात. हे नियम सकारात्मक स्वरूपाचे कोणत्या प्रकारे वागावे हे सांगणारे (उदा. आपले कर वेळेवर भरावेत) तसेच नकारात्मक किंवा निषेधात्मक स्वरूपाचे (उदा. विनाकरण कोणत्याही प्राण्यास किंवा माणसाला मारु नये) असतात. एखाद्या विशिष्ट संस्कृतीतील व्यक्तींच्या समाजस्वीकृत वर्तनाचे निर्धारण करणारी, त्या समाजाने स्वीकृत केलेली आणि सर्वांसाठी समान असणारी अशी ही नियमने असतात. अशा नियमनांद्वारे एखाद्या विशिष्ट परिस्थितीतील व्यक्तीचे वर्तन निश्चित केले जाते. परिणामी अशा नियमनांमुळेच समाजात व्यवस्था प्रस्थापित होते आणि विविध प्रसंगातील व्यक्तींचे वर्तन बऱ्याच अंशी पूर्वकथनक्षम बनते. उदाहरणार्थ, भारतीयांना प्रवास करताना वाहने रस्त्याच्या नेमक्या कोणत्या बाजूने चालवावीत असा प्रश्न पडत नाही. कारण भारतात वाहने रस्त्याच्या डाव्या बाजूनेच चालवावीत असा नियम आहे. याउलट अमेरिकेत ती उजव्या बाजूने चालवावीत असा नियम आहे. यापैकी कोणतेही वर्तन अधिक योग्य अगर बरोबर नसून प्रत्येक वर्तन त्या त्या संस्कृतीत बरोबरच आहे. सांस्कृतिक नियमने ही एखाद्या विशिष्ट संस्कृतीतील लोकांच्या अपेक्षित वर्तनाबाबतच्या समाजाच्या अपेक्षांचा संच असतो. एका अर्थी संस्कृती म्हणजे त्या समाजातील सदस्यांनी मान्य केलेल्या आणि अंमलात आणलेल्या नियमनांची व्यवस्थाच असते. अशी

नियमने विविध प्रकारची असून त्यांचे वर्गीकरण : लोकरीती (Folkways), लोकनीती (Mores) आणि कायदे (Laws) अशा तीन गटात केले जाते.

१) **लोकरीती** (Folkways) **:** वर्तनाच्या किंवा दैनंदिन जीवनात विविध गोष्टी करावयाच्या समाजाच्या समाजमान्यता लाभलेल्या रूढ रीती म्हणजे लोकरीती होय. लोकरीती म्हणजे दैनंदिन जीवनात कसे वागावे याविषयीचे असंख्य अनौपचारिक नियम असतात. संभाषण, भोजन, अभिवादन, पोशाख, दागदागिने यासंबंधीचे वर्तनप्रकार व पद्धती लोकरीतीच्या सदरात मोडतात. लोकरीती समाजातील सर्वच लोक कमी-अधिक स्वरूपात अवलंबित असतात. त्यामुळेच लोकांच्या दैनंदिन जीवनात समानता दिसते.

तसे पहाता सामाजिक जीवन हे असंख्य समस्यांनी युक्त असते. निसर्गाकडून उदरनिर्वाहाची साधने कशी प्राप्त करावीत, आपल्या श्रमाला योग्य फळे कशी मिळतील, दुसऱ्या बरोबर आणि इतर असंख्य लोकांबरोबर आपण कसे चांगले संबंध जुळवावेत या व अशा असंख्य समस्यांनी असे आपले सामाजिक जीवन भरलेले असते. अशा समस्यांच्या यशस्वीरित्या सोडवणूकीसाठी मानवाने शक्य असलेल्या सर्व पर्यायांचा विचार आणि वापर केला आहे. सर्व मानवी समाजानी अशा समस्या सोडविण्यासाठी उपयुक्त ठरु शकतील अशा विविध वर्तनपद्धतींचा शोध लावला आहे. एखाद्या समूहातील लोक दिवसातून एक वेळ, दोन वेळा अगर वारंवार भोजन करतील. भोजन करताना समूह सदस्य खुर्चीत बसतील, जमिनीवर बसतील अगर उभे राहूनच भोजनाचा आस्वाद घेतील. भोजनाचा आस्वाद ते एकत्रितपणे घेतील अगर प्रत्येकजण स्वतंत्रपणे घेतील. भोजन करताना हातांचा वापर करतील अगर त्यासाठी चमचा, काटे अशा काही साधनांचा वापर करतील. यापैकी कोणत्याही वर्तनपद्धतीचा वापर समूहाकडून भोजनप्रसंगी केला जाईल.

भोजनाबाबतीतल्या नियमांच्या विविधतेप्रमाणेच इतर अनेक बाबतीतही समाजा-समाजात विविधता आढळते. अशाच प्रकारे विविध वर्तनाबाबतचे असंख्य नियम समूहाकडून निश्चित केले जातात आणि ते पुढच्या पिढीकडे हस्तांतरित केले जातात. आणि ते रूढ होऊन त्यांनाच लोकरीतीचे स्वरूप प्राप्त होते. काळाच्या ओघात लोकरीतीत बदलही घडून येतो. 'एखाद्या समूहाच्या विविध गोष्टी करण्याच्या रुढ, सर्वसामान्य आणि सवयप्रधान रीती म्हणजे लोकरीती होत.' भेट झाल्यानंतर 'नमस्ते' करणे, उजव्या हाताने जेवणे, रस्त्याच्या डाव्या बाजूने वाहन चालवणे ही आपल्या समाजातील लोकरीतींची काही उदाहरणे आहेत. अशा लोकरीती समाजजीवनात अजाणतेपणाने निर्माण होतात.

नव्या पिढीकडून या लोकरीती बऱ्याच अंशी समाजजीवनात भाग घेताना आपोआप शिकून घेतल्या जातात तर काही अंशी त्या त्यांनी आत्मसात कराव्यात यासाठी जाणीवपूर्वक शिक्षणही दिले जाते. लहान मुले मोठ्या माणसांचे वर्तन पहात असतात. दैनंदिन जीवनात मोठ्या माणसांकडून विविध गोष्टी नेमक्या कोणत्या पद्धतीने केल्या जातात हे लहान मुलांकडून बघितले जाते व त्या आधारे अशा गोष्टी करण्याचे हेच मार्ग आहेत असा त्यांचा समज होतो. अशा प्रकारच्या शेकडो लोकरीती केवळ अत्यंत अप्रगत समजल्या जाणाऱ्या आदिवासी समाजात आढळतात असे नव्हे तर प्रगत औद्योगिक समाजात हजारो लोकरीती प्रचलित असल्याचे दिसून येते. समाजात प्रचलित असणाऱ्या लोकरीतींचे पालन सर्वांनी करावे अशी प्रत्येक

समाजाची अपेक्षा असते, पण एखाद्याकडून त्यांचे उल्लंघन झाले तरी ही फारशी गंभीर बाब मानली जात नाही. लोकरीतींच्या उल्लंघनापोटी समाजसदस्यांना कडक शासन केले जात नाही तर अशा व्यक्तींची प्रामुख्याने टिंगल-टवाळी केली जाते, टीका केली जाते.

**२) लोकनीती** (Mores) **:** समाजात प्रचलित असणाऱ्या लोकरीतींपैकी काही लोकरीती अत्यंत महत्त्वाच्या असतात. यावरून आपल्याला लोकरीतींचे दोन वर्गात विभाजन करता येईल. (१) आपले वर्तन शिष्टाचाराला धरून असावे आणि विनयशील असावे म्हणून ज्यांचे पालन केले जाते अशा लोकरीती आणि (२) अशा लोकरीती की ज्यांचे पालन करणे समूहाच्या कल्याणासाठी (Group Welfare) अत्यंत आवश्यक मानले जाते. या दुसऱ्या वर्गात समाविष्ट होणाऱ्या लोकरीतींना 'लोकनीती' असे म्हटले जाते. ज्या लोकरीतींशी समाजाकडून योग्यायोग्यतेच्या कल्पना जोडल्या जातात त्यांना लोकनीती असे म्हणतात. 'लोकनीती म्हणजे योग्य-अयोग्यतेबाबतच्या अशा सामर्थ्यशाली कल्पना की ज्या इतर क्रियांना पायबंद घालून निश्चित समाज संमत अशा क्रिया करण्यास भाग पाडतात.' जेवताना एखादी व्यक्ती उजव्या हाताऐवजी डाव्या हाताचा उपयोग करत असेल तर ही गोष्ट आपल्या समाजात फारशी गंभीर अगर महत्त्वपूर्ण मानली जात नाही. पण एखाद्या स्त्रीकडून विवाहपूर्व अगर विवाहबाह्य लैंगिक संबंध प्रस्थापित केले जात असतील तर मात्र ही बाब आपल्या समाजात गंभीर मानली जाते, अशा संबंधांचा तीव्र निषेध केला जातो इतकेच नव्हे तर अशा स्त्रीला आणि पुरुषाला शासनही केले जाते. याबरोबरच आर्थिक बंधने, मालमत्ता, वारसा विषयक अधिकार, कौटुंबिक संबंध, देशनिष्ठा या व अशा असंख्य बाबींविषयीचे प्रस्थापित सामाजिक नियम समाज व्यवस्थेचे सातत्य व अस्तित्व टिकविण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जातात. परिणामी या गोष्टींशी संबंधीत लोकनीतीचे पालन करणे अनिवार्य मानले जाते. लोकनीतीचे उल्लंघन झाले असता आपल्यावर एखादे संकट कोसळेल अशी समाजसदस्यांची श्रद्धा असते. लोकनीतींनी अयोग्य मानलेली कृती प्रत्यक्षात घातक असेलच असे नाही. जर लोकांना ती कृती घातक वाटत असेल तर लोकनीतींकडून अशा कृतीला विरोध केला जातो. थोडक्यात एखाद्या कृतीविषयीच्या योग्यायोग्यतेच्या श्रद्धा म्हणजे लोकनीती होय.

लोकनीतींबाबतच्या अतार्किकतेवर अतिशयोक्त भर दिला जाऊ नये. काही लोकनीती या कार्य-कारणभावावर आधारलेल्या असतात. उदा. ज्ञात असणाऱ्या सर्वच समाजांकडून कोणतेही कारण नसताना स्वैरपणे इतर समाज सदस्यांना ठार मारण्याला विरोध केला गेला आहे. कारण यामुळे समूह अस्तित्वावरच आघात होईल याची जाण सर्वांना आहे . जवळच्या रक्तसंबंधियांतील किंवा कुटुंबांतर्गत सदस्यांमधील लैंगिक संबंध सर्वच समाजात निषिद्ध मानले गेले आहेत कारण त्यामुळे कौटुंबिक एकतेला आणि पर्यायाने समाजाच्या अस्तित्वालाच धोका आहे. समाजाचे कल्याण साधले जावे या श्रद्धेपोटीच सर्व लोकनीती कांही मानवी कृत्ये अगर वर्तन योग्य मानतात तर काही वर्तन अगर क्रिया निषिद्ध मानतात.

लोकनीतींची निर्मिती जाणीवपूर्वक अगर विचारपूर्वक केली जात नाही. काही लोकांना त्या चांगल्या कल्पना वाटल्या म्हणूनही त्यांची निर्मिती होत नाही. लोकनीतींची निर्मिती मुख्यत्वे लोकांच्या परंपरागत वर्तनातून अहेतूक रीतीने सहजगत्या होत असते. समूहाच्या पारंपारिक वर्तनातून निर्माण झालेल्या एखाद्या

वर्तनाबाबतच्या अशा लोकनीती काळाच्या ओघात निरंकुश बनतात. दुसऱ्या शब्दात लोकनीती चिरस्थायी बनतात आणि पवित्र मानल्या जाऊ लागतात. त्यांच्या उपयुक्ततेबाबत प्रश्न विचारणे असभ्य मानले जाते. इतकेच नव्हे तर त्यांच्या उल्लंघनाचा प्रयत्नही सहन केला जात नाही. त्याचे उल्लंघन करणाऱ्यांना शासन देण्याची व्यवस्था प्रत्येक समाजात असते. लोकरीतीचे पालन काटेकोरपणे करण्याबाबत सर्वच समाज सतत दक्ष असतात.

**३) कायदा** (Law) **:** परंपरागत व एकजिनसी समाजात लोकरीती आणि लोकनीतींच्या सहाय्याने परिणामकारकपणे सामाजिक नियंत्रण घडवून आणले जात होते. लोकांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्याची क्षमता त्यांच्यात होती. पण जसजसे समाज व्यापक आणि संमिश्र बनत जातात. ते अधिकाधिक गुंतागुंतीचे बनत जातात, तसतसे लोकांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्याची लोकरीती व लोकनीतींची क्षमता कमी कमी होत जाते. आधुनिक समाजातही बहुसंख्य लोकांकडून योग्य वर्तन आपल्याकडून व्हावे यासाठी सहजगत्याच लोकरीतींचे पालन होताना आढळून येते. पण काही लोकांकडून त्यांचे उल्लंघन होते. अशा लोकांना कायद्याचा बडगा दाखवून लोकनीतीचे पालन व्हावे यासाठी सक्ती करणे गरजेचे बनते. म्हणूनच आधुनिक समाजात लोकनीती कायद्याच्या स्वरूपात रूपांतरित केल्या जातात. राज्य अगर कायदेमंडळाद्वारे औपचारिक आणि लिखित स्वरूपात मांडले गेलेले नियम म्हणजे कायदे होत. असे कायदे आधुनिक समाजातील लोकांच्या वर्तनावर औपचारिक नियंत्रण ठेवण्याचे कार्य पार पाडतात. याचाच अर्थ लोकनीतींच्या अंमलबजावणीसाठी कायदे मदत करतात. आधुनिक समाजात व्यापारविषयक कायदे, गुन्हेगारीसंबंधी कायदे, नागरी कायदे असे असंख्य प्रकारचे कायदे या गरजेतूनच जाणीवपूर्वक निर्माण करण्यात आले असून त्यांच्या अंमलबजावणीसाठी खास यंत्रणाही उत्क्रांत करण्यात आल्या आहेत. यामुळेच अत्यंत विजातीय अगर संमिश्र समाजातील लोकांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवून समाज सातत्य टिकविण्यात, समाजाची प्रगती साधण्यात आधुनिक समाज यशस्वी होताना दिसत आहेत.

**ब) बोधात्मक संस्कृती** (Cognitive Culture) :

बोधात्मक संस्कृती म्हणजे एक प्रकारचा वैचारिक नकाशाच असतो. या नकाशात आपल्या सभोवतालच्या जगाचे प्रतिनिधित्व करणारे घटक असतात. बोधात्मक संस्कृती हा संस्कृतीचा वैचारिक स्वरुपाचा घटक (Thinking Component of Culture) आहे. या घटकात प्रामुख्याने सर्वांसाठी समान असणारे ज्ञान, श्रद्धा व मूल्ये यांचा समावेश होतो. या घटकांचे वर्णन खालीलप्रमाणे –

**१) ज्ञान** (Knowledge) **:** ज्ञान हा बोधात्मक संस्कृतीचा एक महत्त्वाचा घटक आहे. ज्ञानामध्ये सभोवतालचे जग कसे आहे; काय खरे व काय खोटे आहे, काय अत्यंत महत्त्वाचे व काय दुय्यम महत्त्वाचे याविषयीच्या समाजाच्या कल्पनांचा समावेश होतो. आपल्या सभोवतालच्या पर्यावरणाशी समायोजन साधण्यासाठी आणि समाजातील आपले जीवन सुसह्य करण्यासाठी व्यक्तीला तंत्रज्ञान व भाषा याविषयीचे ज्ञान असावेच लागते. अत्यंत अप्रगत आदिवासी जमातींनाही केवळ आपले अस्तित्व टिकवण्यासाठी ज्ञान मिळवावे लागते. अर्थात त्यांचे ज्ञान हे त्यांच्या दैनंदिन जीवनातील संघर्षासाठी उपयुक्त असते. त्यांच्या

ज्ञानात प्रामुख्याने अन्न कसे मिळवावे, निवारा कसा उभारावा, प्रवास कसा करावा आणि जंगली श्वापदे व वादळांपासून स्वत:चे संरक्षण कसे करावे, इतर जमातींपासून आपली जमात कशी सुरक्षित ठेवावी. या गोष्टींचा समावेश असतो. असे जीवनावश्यक ज्ञान प्रत्येक पिढीला जाणीवपूर्वक शिकविले जाते. आधुनिक, प्रगत समाजात तर असंख्य विज्ञानांबाबत आणि तंत्रज्ञानाबाबत विस्तृत ज्ञान निर्माण झालेले असते. हे ज्ञान इतके संकीर्ण वा गुंतागुंतीचे असते की हे सर्व ज्ञान प्राप्त करण्याच्या फंदात न पडता प्रत्येक व्यक्ती यातील एखाद्या किंवा काही निवडक भागांविषयीचे ज्ञान संपादण्याचा प्रयत्न करते. भौतिक विश्वाविषयीच्या या विस्तृत ज्ञानाबरोबरच प्रत्येक समाजाच्या सामाजिक संघटनाबाबत आणि त्याच्या कार्यप्रणालीबाबत काही कल्पना असतात. याबाबतचे ज्ञान व्यक्तींना मिळवावे लागते. याचाच अर्थ भौतिक विश्वाविषयी असणाऱ्या सांस्कृतिक कल्पनांप्रमाणे सामाजिक जीवनाविषयीही सांस्कृतिक कल्पना असतात व त्याविषयीचे ज्ञान व्यक्तींना होणे समाजाच्या अस्तित्वासाठी व सातत्यासाठी अनिवार्य ठरते. म्हणूनच ज्ञान हा बोधात्मक संस्कृतीतील महत्त्वाचा घटक ठरतो.

**२) श्रद्धा** (Beliefs) **:** ज्ञानाबरोबरीनेच प्रत्येक समाजात आढळून येणाऱ्या श्रद्धा हाही बोधात्मक संस्कृतीचा एक घटक आहे. समाजातील लोकांनी खरे मानलेले वस्तुस्थिती विषयीचे विधान किंवा एखादी कल्पना म्हणजे श्रद्धा (belief) होय. श्रद्धा 'खरी' असावीच असे नसते. श्रद्धेचा खरे-खोटेपणा तपासून पहाता येण्यासारखा असावाच असेही नसते. जोपर्यंत लोक एखादी श्रद्धा किंवा विधान खरे मानतात तोपर्यंत ती श्रद्धा लोकांचे वर्तन प्रभावित करते. उदा. आत्मा अमर आहे, व्यक्तीचा पुनर्जन्म होतो, विश्वातील सर्व घडामोडींवर परमेश्वराचे नियंत्रण असते, भुतेखेते, शकून अपशकून यासंबंधीचे समज, मोक्षप्राप्ती, स्वर्ग-नरक यांचे अस्तित्व इ. या सर्व हिंदू धर्मातील श्रद्धा असून त्यांचा खरेखोटेपणा तपासून पाहण्याजोगा नाही. पण हिंदूचे वर्तन या श्रद्धांद्वारे निश्चितपणे प्रभावित होत असते.

**३) मूल्ये** (Values) **:** काय योग्य आणि काय अयोग्य आहे याविषयी आढळणाऱ्या अमूर्त स्वरुपाच्या कल्पना म्हणजे मूल्ये होत. समाजासाठी काय चांगले, काय वाईट, कोणती गोष्ट वांच्छनीय व कोणती अवांच्छनीय हे स्पष्ट करणाऱ्या कल्पना प्रत्येक समाजात अस्तित्वात असतात. हरलंबस (Haralambos) यांच्या मताप्रमाणे ''काय चांगले अगर वांच्छनीय याविषयी असणारी श्रद्धा म्हणजे मूल्य होय.'' जे समाजासाठी महत्त्वाचे व समाजसदस्यांकडून अपेक्षित आहे ते परिभाषित करण्याचे कार्य मूल्ये करत असतात. प्रामाणिकपणा, स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता ही मूल्यांची काही महत्त्वाची उदाहरणे आहेत. मूल्ये दिसत नाहीत पण मूल्यांनी प्रभावित झालेले, प्रत्यक्षात अविष्कृत होणारे वर्तन मात्र दिसते. प्रत्येक समाजात अशी वेगवेगळी मूल्ये असतात. समान मूल्ये हाच समाजाच्या एकतेचा मुख्य आधार असतो. मूल्ये हा बोधात्मक संस्कृतीचा महत्त्वाचा घटक आहे.

**भौतिक आणि अभौतिक संस्कृतीतील संबंध** (Relationship of material and non-material culture) **:**

भौतिक आणि अभौतिक संस्कृतीत अत्यंत जवळचा संबंध आहे. या दोन्हींचा परस्परांवर प्रभाव पडत असतो. बोधात्मक संस्कृतीने निर्धारीत केलेल्या मार्गांचा अवलंब करून लोक वस्तूंची निर्मिती करत असतात

व उपयोगात आणत असतात. पण भौतिक संस्कृती हा बोधात्मक संस्कृतीतील ज्ञानाचा विस्तार आहे असे आपण म्हणू शकत नाही. भौतिक संस्कृतीत निर्माण झालेली वस्तू लोकांच्या बोधात्मक संस्कृतीत बदल घडवून आणणारी ठरु शकते. उदा. शेतीसाठी वापरावयाच्या नांगराचा लागलेला शोध व सिंचनासाठी विहीरींची मानवाने केलेली निर्मिती हे अत्यंत महत्त्वाचे असे मानवाला लाभलेले यश आहे. यातून शेतीच्या झालेल्या विकासामुळे सभ्यतेचा विकास घडून आला हे आपणाला ज्ञात आहे. अत्यंत जलदगतीने गणना अगर हिशेब करण्यासाठी एक साधन म्हणून संगणकाचा विकास सुरुवातीला झाला पण त्याच पिढीकडून संगणकाचा वापर शास्त्र, कला इतकेच नव्हे तर तत्त्वज्ञानाच्या विकासासाठी करायला सुरुवात झाली. असे असले तरी अभौतिक संस्कृती ही भौतिक संस्कृतीपेक्षा महत्त्वाची आहे हे आपण लक्षात घेणे गरजेचे आहे. उदा. क्रिकेटच्या खेळात वापरले जाणारे बॅट व बॉल हे भौतिक संस्कृतीचे घटक आहेत पण क्रिकेटचे कौशल्य व खेळाचे नियमच (अभौतिक संस्कृतीचे घटक) आपणास माहिती नसतील तर भौतिक संस्कृतीचे बॅट व बॉल हे घटक निरर्थक बनतील. आपण उभा केलेली वास्तूरचना (भौतिक संस्कृती) विध्वंसक भूकंपात नामशेष झाली तरी आपल्याला वास्तूच्या उभारणीविषयी असणाऱ्या ज्ञानाच्या (अभौतिक संस्कृतीचा घटक) जोरावर आपण नव्याने वास्तू उभा करू शकतो. म्हणजेच अभौतिक संस्कृती हा संस्कृतीचा सापेक्षत: अधिक महत्त्वाचा घटक आहे.

**संस्कृतीची कार्ये** (Functions of Culture):

केवळ जैविक पातळीवर अस्तित्व लाभलेल्या मानव शरीरधारी प्राण्याचे मानवात रुपांतर करण्याचे कार्य संस्कृती पार पाडते. मानव त्याला लाभलेल्या अनुवंशिक गुणाच्या आधारावर नव्हे तर संस्कृतीच्या आधारावरच आपले जीवन व्यतीत करू शकतो. प्रत्येक समाजाला लाभलेली संस्कृती आपल्या समाज सदस्यांसाठी (व्यक्तींसाठी) व संपूर्ण समाजासाठी असंख्य कार्ये पार पाडत असते. आणि संस्कृतीच्या या भूमिकेवरच व्यक्ती व समाज या दोहोंचे अस्तित्व, सातत्य व प्रगती अवलंबून असते. संस्कृतीकडून या दोहोंच्या दृष्टीने पार पाडली जाणारी काही महत्त्वाची कार्ये पुढीलप्रमाणे –

**अ) समाज सदस्यांसाठी संस्कृतीकडून पार पाडली जाणारी कार्ये** (Functions of Culture for the members of society) **:**

समाजसदस्यांसाठी संस्कृतीकडून पार पाडली जाणारी काही महत्त्वाची कार्ये खालीलप्रमाणे –

**१) संस्कृती व्यक्तीवर्तनाला दिशा दर्शविते** (Culture provides direction to the individual behaviour) **:**

संस्कृती व्यक्ती–वर्तनाला दिशा दाखवते अगर मार्गदर्शन करते. नियमनात्मक संस्कृतीचे घटक असणाऱ्या लोकरीती, लोकनीती, कायदे अशी सामाजिक नियमने आपण यापूर्वीच अभ्यासली आहेत. विविध साधनांच्या व यंत्रणांच्या सहाय्याने ही सामाजिक नियमने प्रत्येक पिढी नव्या पिढीकडे हस्तांतरित करत असते. परिणामी विविध सामाजिक परिस्थितीत नेमके कसे वर्तन करावे असा प्रश्न नव्या पिढीतील सदस्यांसमोर उभा रहात नाही किंवा त्यांना स्वतंत्रपणे विचारही करावा लागत नाही. संस्कृती व्यक्तीची

भूमिका आणि दर्जाही निश्चित करते. संस्कृतीद्वारे व्यक्तीने गाठावयाची ध्येये निश्चित केली जातात. त्याप्रमाणेच ती ध्येये गाठण्यासाठी कोणते मार्ग अगर साधने वापरली पाहिजेत याचेही निर्धारण होते. परिणामी संस्कृतीने निश्चित केलेल्या अपेक्षांप्रमाणे व्यक्ती ध्येये ठरवू शकतात. ती सत्यात उतरवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करू शकतात. याचाच अर्थ संस्कृती केवळ मानवी वर्तनावर नियंत्रण ठेवत नसून मानवाजवळ असणाऱ्या सर्व क्षमता आणि मानवी क्रियांना मुक्त स्वातंत्र्यही देतात पण त्याला संस्कृतीच्या चौकटीची मर्यादा असते. कोणत्या प्रसंगी व्यक्तीने कोणाशी कसे वागावे हे निर्देशित करून, व्यक्तीच्या वर्तनाला दिशा देऊन, समाजमान्य रीतीने व्यक्ती वर्तनाला वळण लावण्याचे कार्य संस्कृतीद्वारा पार पाडले जाते.

**२) संस्कृती व्यक्तीना सभोवतालच्या पर्यावरणाशी अभियोजन साधण्यासाठी मदत करते** (Culture helps members to adapt to environment) **:**

संस्कृती हे ज्ञानाचे भांडार असते. ते समाजसदस्यांना अभियोजनक्षम बनविते. आपल्या शारीरिक, सामाजिक व बौद्धीक अस्तित्वासाठी आवश्यक असणारे ज्ञान मानवाला उपलब्ध करून देण्याचे कार्य संस्कृतीकडून पार पाडले जाते. पशू-पक्षी यांचे सर्व वर्तन उपजत असते. अनुवंशाने प्राप्त झालेल्या गुणवैशिष्ट्यांच्या सहाय्याने ते आपल्या सभोवतालच्या पर्यावरणाशी समायोजन साधण्याचा प्रयत्न करतात. पण मानव हा असा एकमेव प्राणी आहे की ज्याला अमर्यादित बौद्धिक क्षमता लाभली असून तिच्या जोडीला शिकण्याची क्षमता आणि स्मृतीची देणगीही लाभली आहे. या सर्व क्षमतांच्या सहाय्याने तो पर्यावरणाशी जुळवून घेतो इतकेच नव्हे तर आपल्याला हवे त्या प्रमाणे पर्यावरणात बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करतो. उदा. वाळवंटी प्रदेशात स्वप्रयत्नाने निसर्गावर मात करून मानवाने फुलवलेली शेती ही बाब मानवाला हजारो वर्षांपासून अखंडितपणे संक्रामित होत आलेल्या संस्कृतीमुळेच शक्य झाली आहे. म्हणूनच ज्ञानाचे जतन अगर संवर्धन करणे व ते ज्ञान नव्या पिढीकडे हस्तांतरित करून तिला पर्यावरणाशी समायोजन साधण्यासाठी योग्य कौशल्ये पुरविण्याचे कार्य संस्कृती पार पाडत असते. यासाठीच भाषेसारख्या सांकेतिक व्यवस्थेची निर्मिती संस्कृतीकडून होते. भाषेमुळेच विचार, भावना, संकल्पना यांची देवाण-घेवाण जलद होते. आंतरक्रियांची व्याप्ती व वेग वाढतो. परिणामी संस्कृतीतील अनुभवरुपी ज्ञानाचे भांडार जतन करणे व नव्या पिढीकडे हस्तांतरित करून तिचे जीवन अधिक सुखी व समृद्ध बनवणे हे संस्कृतीचे अनन्यसाधारण असे कार्य ठरते.

**३) संस्कृती समाजसदस्यांसाठी परिस्थितीची व्याख्या निश्चित करते** (Culture defines situations for the members of society) **:**

संस्कृती आपल्यासाठी सामाजिक परिस्थिती निश्चित करते. आपण कोणत्या प्रसंगी कोणते कपडे परिधान करावेत, काय खावे, किती खावे, काय प्यावे, हास्याचे कारंजे कधी व कसे फुलवावेत, दुःख कसे व कधी व्यक्त करावे, विश्रांती कधी घ्यावी, कोणते काम कधी व कसे करावे या व अशा बाबींची निश्चिती करण्याचे अगर आपल्या वर्तनावर मर्यादा घालण्याचेच काम संस्कृतीकडून केले जाते. विविध सामाजिक परिस्थिती नेमक्या कशा आहेत, त्या त्या परिस्थितीत आपली नेमकी भूमिका कोणती असायला हवी याही

बाबींची निश्चिती करण्याचे कार्य संस्कृतीकडूनच पार पाडले जाते. म्हणजेच आपल्यासाठी सामाजिक परिस्थितीचा अर्थ स्पष्ट करून त्या परिस्थितीतील आपली भूमिका कोणती हे संस्कृतीद्वारा निश्चित होते.

**४) संस्कृती समाजसदस्यांच्या अभिवृत्ती, मूल्ये आणि ध्येये परिभाषित करते** (Culture defines members attitudes, values and goals) :

एका विशिष्ट प्रकारे भावना व्यक्त करण्याची, वर्तन करण्याची आणि विविध बाबींना प्रतिक्रिया करण्याची व्यक्तीची प्रवृत्ती म्हणजे अभिवृत्ती (attitude) होय. संस्कृतीमुळे धर्म, नैतिकता, विवाह, कुटूंब, विज्ञान इ. विविध बाबींविषयीच्या व्यक्तीच्या अभिवृत्तींची जडण-घडण होते. मूल्ये (Values) ही वर्तनविषयक सर्वसामान्य मानदंड असतात. एखादे वर्तन अथवा एखादी गोष्ट चांगली की वाईट, इष्ट की अनिष्ट, बरोबर की चूक, योग्य की अयोग्य, वांच्छनीय की अवांच्छनीय, स्विकारार्ह की त्याज्य हे ठरविण्याचे निकष म्हणजे मूल्ये होत. आपली मूल्ये ही संस्कृतीद्वारा ठरविली जातात. जीवनात आपली काय ध्येये (Goals) असावीत, ती गाठण्यासाठी कोणत्या मार्गांचा अवलंब करावा हेही समाजसदस्यांसाठी संस्कृतीद्वाराच निर्धारित केले जाते. आपले समाजीकरण संस्कृतीच्या साच्यात घडविले जाते. त्यामुळेच अभिवृत्ती, मूल्ये व ध्येये यांचे निर्धारण होते.

**५) संस्कृती व्यक्तीच्या उपजीविकेचा मार्ग निवडण्याच्या कृतीवर प्रभाव पाडते** (Culture influences choice of individual's career) :

आपल्या उपजीविकेसाठी आपण कोणता मार्ग निवडावा यावरही संस्कृतीचाच प्रभाव असतो. आपल्या उपजीविकेसाठी आपण कोणता मार्ग निवडावा यावर बंधने घालण्याचे कार्य संस्कृती पार पाडते. पारंपारिक भारतीय समाजात व्यक्तीच्या व्यवसायाची निश्चिती प्रामुख्याने जातीसंस्थेद्वारेच केली जात होती. आधुनिक भारतातील परिस्थिती बदलली आहे, बदलत आहे. व्यक्ती स्वत:चा विकास करून, आपली परिस्थिती सुधारुन नवा जीवनमार्ग शोधण्याचा प्रयत्न करताना आढळतात, पण त्यांना हा प्रयत्न संस्कृतीने घालून दिलेल्या चौकटीतच करावा लागतो हे सत्य आहे. उदाहरणार्थ, अगदी अलीकडच्या काळापर्यंत स्त्रीयांना आपले कार्यक्षेत्र घराबाहेर विकसित करण्यासाठी संधीच दिली जात नव्हती, कारण 'घर आणि मुलांचे संगोपन' हेच स्त्रीचे कार्यक्षेत्र आहे असे मूल्य आपल्या संस्कृतीत होते. आजही वैद्यकीय अगर अभियांत्रिकी अशा जास्त खर्चिक व कमी जागा असणाऱ्या शिक्षणासाठी मुलींपेक्षा मुलांचाच प्राधान्याने विचार करण्याची वृत्ती आपल्याकडे दिसून येते. मुले-मुली लहान असताना मुलांनी सतत रडायचे नसते, कारण रडणे मुलांना शोभत नाही. असेच मुलांना शिकविले जाते. सतत रडणाऱ्या मुलाला 'रडूबाई रडू' असे म्हणून हिणवले जाते. बाहुलीबरोबर खेळण्यापासून मुलांना परावृत्त केले जाते कारण ते मुलींचे खेळणे आहे अशीच शिकवण दिली जाते. उपजिवीकेसाठी स्त्रीयांनी कोणते व्यवसाय निवडावेत व पुरुषांनी कोणते व्यवसाय निवडावेत याबाबत अजुनही फरक केला जातो असे दिसून येते. समाजसंमत मार्गच व्यक्तीनी निवडावा असे सर्वसाधारण बंधन संस्कृती घालीत असते.

६) **संस्कृती व्यक्तीच्या व्यक्तीमत्त्वाला आकार देते** (Culture molds individual's personality)**:**

संस्कृतीचा व्यक्तीच्या व्यक्तीमत्त्व विकासावर जबरदस्त प्रभाव असतो. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी योग्य त्या संधी उपलब्ध करून देणे आणि त्यावर योग्य ती बंधने लादणे अशी दुहेरी भूमिका संस्कृती पार पाडत असते. म्हणूनच रुथ बेनेडिक्ट (Ruth Benedict) म्हणतात, प्रत्येक संस्कृती तिची स्वत:ची खास अशी व्यक्तीमत्त्वे किंवा व्यक्तीमत्त्वाचे प्रकार निर्माण करते. या बाबीवर त्यांनी त्यांच्या संस्कृतीच्या अभ्यासात प्रकाश टाकला आहे. दुसऱ्या अमेरिकन मानववंशशास्त्रज्ञा मार्गारेट मीड यांच्या मते संस्कृती व्यक्तीचे वर्तन व चारित्र्य यांना आकार देते. असे असले तरी कोणत्याही व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व केवळ संस्कृतीमुळेच निश्चित होते असे नाही. 'व्यक्ती तितक्या प्रवृत्ती' यातून हेच स्पष्ट होते. प्रत्येक व्यक्तीची स्वत:ची क्षमता, दृष्टीकोण, तिची शिकण्याची क्षमता, तिला येणारे अनुभव व यातून व्यक्तीने आत्मसात केलेली संस्कृती इत्यादी बाबतीत भिन्नता असते. शिवाय तिचा बाह्य संस्कृतीतील लोकांशी येणारा संबंध, प्रसार व प्रचार माध्यमांचा व्यक्तीवर पडणारा प्रभाव, यामुळे व्यक्तीला इतर संस्कृतींची होणारी माहिती यातही भिन्नता आढळते. परिणामी कोणत्याही दोन व्यक्तींचे व्यक्तीमत्व एकसारखे असूच शकत नाही.

ब) **संपूर्ण समाजासाठी संस्कृतीकडून पार पाडली जाणारी कार्ये** (Functions of culture for society as a whole) **:**

संस्कृती संपूर्ण समाजासाठी देखील काही महत्वपूर्ण कार्ये करत असते. यापैकी काही कार्ये खालीलपमाणे–

१) **संस्कृती आणि समाज यांना अलग करता येत नाही** (Inseperability of culture and society):

वास्तवात संस्कृती आणि समाज यांना एकमेकांपासून अलग करता येत नाही. संस्कृतीच्या अस्तित्वाविना समाजाचा अस्तित्वाबाबत आपण विचारही करू शकत नाही. सामाजिक जीवनाला संघटीतपणा संस्कृतीद्वारेच लाभत असल्यामुळे समाज जीवन अस्तित्वात राहते. यासाठी अभौतिक संस्कृतीकडून अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडली जाते. कोणत्याही संस्कृतीत ज्ञान, श्रद्धा, मूल्ये याबरोबरच लोकरीती, लोकनीती, कायदे यासारखी सामाजिक नियमने अत्यंत महत्त्वाचे घटक असतात. अभौतिक संस्कृतीच्या या सर्व घटकांचे समाज सदस्यांकडून आत्मसातीकरण व्यवस्थितपणे झालेले असते म्हणून तर सामाजिक जीवन शक्य होते. संस्कृतीमुळेच संघटित सामाजिक जीवन शक्य होते.

२) **संस्कृती समाजात व्यवस्था व एकता निर्माण करते** (Culture creates order and unity in society) :

समाजव्यवस्था आणि समाजातील एकता यांचा आधार समाजाची संस्कृती हाच असतो. सर्वांना समान असलेली सामाजिक नियमने, श्रद्धा आणि मूल्ये हे संस्कृतीचे अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. नियमने श्रद्धा आणि मूल्ये यांचे समाजीकरणाच्या प्रक्रियेद्वारा व्यक्तींकडून आत्मसातीकरण घडून येते. या बाबी

व्यक्तींकडून शिकून घेतल्या जातात. ज्या मूल्यांद्वारा, श्रद्धांद्वारा आणि नियमनांद्वारा व्यक्तींचे वर्तन प्रभावित होते ती एकाच समाजातील सर्व व्यक्तींसाठी सारखी असल्यामुळे सर्वांच्या वर्तनात काही किमान सारखेपणा येतो. समाजातील सामाजिक संस्थांच्या रूपात अप्रत्यक्षपणे समाजातील नियमने मूल्ये श्रद्धा यांचे संघटन झालेले असते. सामाजिक संस्था परस्परसंबंधित आणि परस्परावलंबी असतात. सामाजिक संस्था, समान नियमने, मूल्ये आणि श्रद्धा यामुळे समाजात व्यवस्था आणि एकता निर्माण होते.

**३) संस्कृती समाजास सापेक्ष स्थिरता प्रदान करते** (Culture ensures relative stability of society):

संस्कृती ही हजारो वर्षांपासून सातत्याने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रामित होत आलेली आहे, ती सापेक्षत: स्थिर असते या बाबींचे अध्ययन आपण पूर्वी केले आहेच. संस्कृती आणि समाज यांच्यात अन्योन्य असे नाते असते. परिणामी संस्कृती सापेक्षत: स्थिर असल्यामुळे समाजालाही आपोआपच सापेक्ष स्थिरता प्राप्त होते. दुसऱ्या शब्दात, सामाजिक नियमने, मूल्ये, श्रद्धा आणि सामाजिक संस्था हे संस्कृतीचे असणारे महत्त्वाचे घटक सामाजिक संरचनेचे आणि समाज संघटनेचे महत्त्वाचे घटक बनतात. अभौतिक संस्कृतीचे हे घटक सापेक्षत: स्थिर असतात परिणामी समाजालाही सापेक्ष स्थिरता प्रदान करण्याचे कार्य संस्कृतीकडून पार पाडले जाते.

**व्यक्तिमत्त्व विकासावर प्रभाव पाडणारे घटक** (Factors influencing development of personality):

सर्वप्रथम 'व्यक्तिमत्त्व' (Personality) या संकल्पनेचा अर्थ समजून घेणे गरजेचे आहे. व्यक्तिमत्त्व हा शब्द सर्वांच्या परिचयाचा आहे. एवढेच नव्हे तर तो नित्य वापरलाही जातो. इंग्रजी भाषेत व्यक्तिमत्त्वाला 'पॅर्सनॅलिटी' (Personality) हा शब्द वापरतात. पर्सनॅलिटी हा इंग्रजी शब्द 'पर्सोना' (Persona) या लॅटिन भाषेतील शब्दावरून आला आहे. (रंगभूमीवरील नट आपली भूमिका पार पाडण्याच्यावेळी जे मुखवटे वापरीत असत त्यांना 'पर्सोना' म्हणत.) ''समूहातील व्यक्तीच्या भूमिकेचे निर्धारण करणाऱ्या लक्षणांचे एकत्रितकरण व संघटन म्हणजे व्यक्तिमत्त्व होय.'' अशी व्यक्तिमत्त्वाची व्याख्या पार्क व बर्गेस यांनी केली आहे. ("Personality is the sum and organization of those traits which determine the role of the individual in the group" - Park and Burgess) ''विविध प्रसंगात आंतरक्रिया करताना विशिष्ट प्रकारे वर्तन करण्याची व्यक्तीची प्रवृत्ती आणि वार्तनिक समग्रता म्हणजे व्यक्तिमत्त्व होय.'' अशी Yinger यांनी व्यक्तिमत्त्वाची व्याख्या केली आहे. प्रत्येक व्यक्तीची वागण्याची एक वैशिष्ट्यपूर्ण रीत असते. त्याच प्रकारे व्यक्ती दैनंदिन जीवनात सातत्याने वर्तन करीत असते. व्यक्तीची वैशिष्ट्यपूर्ण वर्तन प्रवृत्ती आणि ती ज्या ज्या परिस्थितीत वर्तन करीत असते त्या परिस्थितीची वैशिष्ट्ये या दोन्ही घटकानी व्यक्तीचे वर्तन निर्धारित होत असते.

व्यक्तिमत्त्व या संकल्पनेचा अर्थ समजून घेतल्यानंतर हॉर्टन व हंट (Horton and Hunt) यांनी व्यक्तिमत्त्व विकासावर प्रभाव पाडणारे १. जैविक वंशदाय, २. भौतिक परिस्थिती, ३. संस्कृती, ४.

सूमहातील अनुभव व ५. व्यक्तिगत अनुभव हे जे पाच  घटक मांडले आहेत त्यांचा थोडक्यात आढावा आपण घेऊ.

१. **जैविक वंशदाय** (Biological Inheritance) **:** मानवाला त्याच्या माता-पित्यांकडून अनुवंशाने मिळणाऱ्या घटकांचा समावेश जैविक वंशदायात होतो. प्रत्येक व्यक्तीला आपल्या माता-पित्याकडून विशिष्ट प्रकारची शरीर रचना, विशिष्ट पातळीची बुद्धीमत्ता, सौंदर्य, शिकण्याची विशिष्ट पातळीची क्षमता, मज्जासंस्थेची क्षमता याबरोबरच काही गुणधर्म मिळत असतात. माता-पित्याकडून व्यक्तीकडे संक्रमित झालेला जैविक वंशदाय व्यक्तिमत्त्व विकासावर प्रभाव पाडणारा एक महत्त्वाचा घटक आहे.

२. **भौतिक पर्यावरण** (Physical Environment) **:** अमेरिकन विद्वान एल्सवर्थ हंटिंग्टन (Ellsworth Huntington) यांच्यासारख्या काही विचारवंतानी पर्यावरणाचा (नैसर्गिक वातावरण. स्वाभाविक भूप्रकृती (Topography) आणि नैसर्गिक साधनसंपत्ती) समूह वर्तनावर पडणारा प्रभाव व त्यातून निर्माण होणाऱ्या वैविध्यपूर्ण वर्तनपद्धतींचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. व्यक्तिमत्त्वावर भौतिक पर्यावरणाचा अप्रत्यक्ष स्वरुपात प्रभाव पडत ०असतो. आजही काही भूभागावर अत्यल्प व विखुरलेल्या अवस्थेत लोकसंख्या आढळते. लोकसंख्येच्या घनतेचा व्यक्तिमत्त्व विकासावर प्रभाव पडत असतो. टर्नबुल (Turnbull) यांच्या मतानुसार युगांडातील एका आदिवासी जमातीला लाभलेल्या शिकारीच्या क्षेत्रात घट होत गेल्याने त्या जमातीतील लोक भूकेकंगाल बनले आहेत. परिणामी त्यांच्यातील दयाळूपणा, उपकारीपणा किंवा अनुकंपा या सद्‌गुणांचा इतका ऱ्हास होत गेला आहे की जिवंत राहण्यासाठी ते लहान मुलांच्या मुखातील घासही हिसकावून घेऊ लागले आहेत. आज पृथ्वीवरील सर्वात स्वार्थी लोक म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. यावरुन भौतिक पर्यावरणाचा व्यक्तिमत्त्वावर पडणारा प्रभाव निश्चितपणे दिसून येतो. मात्र आधुनिक काळात तंत्रज्ञान व दळणवळणाच्या साधनांत झालेल्या विकासामुळे भौतिक पर्यावरणाचा व्यक्तिमत्त्व विकासावर पडणारा प्रभाव कमी कमी होत चालला आहे.

३. **संस्कृती** (Culture) **:** संस्कृती व्यक्तिमत्त्व विकासावर प्रभाव पाडत असते. इतर समाजाकडून न दिले जाणारे वास्तविक असे काही अनुभव प्रत्येक समाज आपल्या सर्व सदस्यांना देत असतो. अशा सर्वांसाठी समान असणाऱ्या सामाजिक अनुभूतींमुळे त्या समाजातील सर्व सदस्यांच्या व्यक्तिमत्त्वात कमी-अधिक प्रमाणात पण समान स्वरुपात आढळणाऱ्या व्यक्तिमत्त्व गुण विशेषांचा उगम झाल्याचे दिसून येते. संस्कृती व्यक्तीमत्त्वावर कसा प्रभाव पाडते याचा विचार पुढील विभागात आपण अधिक विस्ताराने करणार आहोत.

४. **समूह-अनुभव** (Group Experiences) **:** व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास समाजीकरणाच्या प्रक्रियेद्वारे होत असतो. समाजीकरणासाठी व्यक्तीचा समूहाबरोबर संपर्क यावा लागतो. व्यक्तीला सामूहिक अनुभव मिळावे लागतात. आपल्या सूमहातच प्रत्येक व्यक्ती 'त्याच्या' अगर 'तिच्या' स्व संकल्पनेचा विकास घडवून आणू शकते. सी. एच. कूले (C. H. Cooley) यांच्या मतानुसार प्रत्येक व्यक्ती इतर लोकांच्या स्वत:च्या संदर्भात होणाऱ्या वर्तनाच्या किंवा प्रतिक्रियांच्या आरशात स्वत:चे प्रतिबिंब

पाहते आणि आपली स्वत:बद्दलची कल्पना बनविते. ही बाब समूहातच घडते. जी. एच्. मीड (G. H. Mead) यांनीही सामाजिक आंतरक्रियांतून 'स्व' किंवा 'मी' ची निर्मिती होते आणि सामाजिक आंतरक्रियांमुळेच 'स्व' किंवा 'मी' चे स्वरुप ठरत असते, असे प्रतिपादन केले आहे. दुसऱ्या भूमिकेत शिरण्यातून व्यक्ती आपल्या विषयीच्या इतरांच्या भावना जाणून घेते. मीड यांच्या मताप्रमाणे, व्यक्ती 'सामान्यीभूत इतरांच्या' (Generalized others) मानकांचा वापर करून आपल्या क्रियांविषयी विचार करू लागते व त्यातूनच 'स्व'ची कल्पना तयार होते. समूह अनुभूतींमुळे त्या समूहात समान व्यक्तिमत्त्वे विकसित होत जातात. परिणामी विविध समूहातील सदस्यांच्या व्यक्तिमत्त्वात भिन्नता आढळून येते तर एकाच समूहातील व्यक्तिमत्त्वे काही प्रमाणात सारखी बनतात.

५. **व्यक्तिगत अनुभव** (Uniqne/Personal Experiences) **:** कोणत्याही दोन व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वात तंतोतंत सारखेपणा आढळून येत नाही. एकाच कुटुंबात वाढणाऱ्या सख्ख्या भावंडांच्या इतकेच नव्हे तर जुळ्यांच्या व्यक्तिमत्वातही सारखेपणा आढळत नाही. कारण कोणत्याही दोन व्यक्तींना तंतोतंत समान अनुभव येत नाहीत. प्रत्येक व्यक्ती काही व्यक्तिगत अनुभवातून जात असते. तिला येणारे अनुभव हे खास तिच्या पुरतेच मर्यादित असतात. दुसऱ्या कोणालाही तसेच अनुभव मिळत नाहीत. व्यक्तीला येणारे असे खास व्यक्तीगत अनुभव व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव पाडत असतात आणि व्यक्तिमत्त्वाला आकार देत असतात.

**संस्कृती आणि व्यक्तिमत्त्व विकास** (Culture and Personality Development) :

या विभागात आपण संस्कृतीचा व्यक्तिमत्त्व विकासावरील प्रभाव अभ्यासणार आहोत. व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व घडविण्यामध्ये संस्कृतीचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. त्यामुळेच मानवशास्त्रज्ञ राल्फ लिंटन आणि अब्राहम कार्डिनर (Ralf Linton and Abraham Kardiner) यांनी व्यक्तिमत्त्व हे संस्कृती सापेक्ष असल्याचे प्रतिपादन केले आहे. काही बाबी सर्वच संस्कृतीत समान असल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ नवजात अर्भकाचे पालनपोषण प्रत्येक समाजात वयस्कांकडून केले जाते, ती समूहात रहातात, भाषेच्या सहाय्याने परस्परांशी संवाद साधतात किंवा योग्य वर्तनाबद्दल बक्षीस व अयोग्य वर्तनाबद्दल शिक्षा अनुभवतात. पण हे ही तितकेच खरे आहे की, इतर समाजांपेक्षा वेगळ्या आणि खास सामाजिक अनुभूतींतून त्या समाजातील सर्व व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वात सारखेपणा निर्माण होतो व त्यातून एका वैशिष्ट्यपूर्ण किमान व्यक्तिमत्त्वाची निर्मिती होते. अशा वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वासाठी Du Bois यांनी 'सरासरी व्यक्तिमत्त्व' (Model Personality) ही संज्ञा वापरली आहे. काही विचारवंतांनी दोन भिन्न संस्कृतीतील 'सरासरी व्यक्तिमत्त्वात' कशी विविधता आढळते याचे स्पष्टीकरण केले आहे.

अमेरिकन मानवशास्त्रज्ञा रुथ बेनेडिक्ट (Ruth Benedict) यांनी त्यांच्या १९३५ साली प्रकाशित झालेल्या "Patterns of Culture" या प्रसिद्ध पुस्तकात संस्कृती प्रतिमानांचे दोन प्रकार मांडले आहेत. **(१) ॲपोलोनियन** (Apollonian) **संस्कृती** या प्रकारच्या संस्कृतीत संयम, नेमस्तपणा, आत्मसमर्पण वृत्ती, शांतपणा समजूतदारपणा, सहकारी वृत्ती, दयाळूपणा या गुण वैशिष्ट्यांवर भर दिलेला असतो. **(२)**

**डायोनेशियन** (Dionysian) **संस्कृती** ही संस्कृती अहंमान्यता, भांडखोरपणा, मत्सर, विश्वासघातकीपणा, कपटीपणा, प्रतिष्ठा आणि स्पर्धात्मकता या गुणवैशिष्ट्यांनी युक्त असते.

रुथ बेनेडिक्ट यांच्या मताप्रमाणे न्यू मेक्सिकोतील झुनी (Zuni) आदिवासी जमात ॲपोलोनियन संस्कृती तर मेलॅनेशियातील डोबुअन (Dobuan) आदिवासी जमात आणि व्हॅंकुव्हर बेटावरील क्वाकिउल्ल इंडियन (Kwakiutl Indians) या जमाती डायोनेशियन संस्कृतीचे प्रतिनिधीत्व करतात. बेनेडिक्ट यांनी झुनी, डोबुअन आणि क्वाकिउल्ल इंडियन या तीन आदिवासी जमातींच्या संस्कृतींचा तुलनात्मक अभ्यास करून प्रत्येक संस्कृतीचा व्यक्तिमत्त्वावर पडणारा वैशिष्ट्यपूर्ण प्रभाव दाखवून दिला. (पण ही सर्व निरीक्षणे कित्येक दशकांपूर्वी करण्यात आली असून तेव्हा या संस्कृतीवर बाह्य लोकांचा अगर संस्कृतींचा फारसा प्रभाव पडला नव्हता.) या अभ्यासातून त्यांनी विशिष्ट संस्कृती विशिष्ट व्यक्तिमत्त्वांच्या निर्मितीला कशी कारणीभूत ठरते हे दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

**डोबुअन संस्कृती आणि तिचा व्यक्तिमत्त्वावरील प्रभाव** (Dobuan Culture and its impact on Personality) :

कोणत्या माता-पित्यांच्या पोटी जन्म घ्यावा याचे स्वातंत्र्य जर जन्माला येणाऱ्या अर्भकांना लाभले असते तर डोबुअन जमातीत जन्माला येणाऱ्या मुलांनी दुसऱ्यांदा विचार केला असता, कारण डोबुअन समाजात मुलाला आपल्या आई-वडिलांकडून प्रेम मिळत नाही. केवळ आपल्या बहिणीच्या मुलाबाबत चिंता करणारा त्याचा बाप, जोपर्यंत मुल मातेच्या दूधावरच पोसले जाते तोपर्यंत तिच्याशी लैंगिक संबंध ठेवता येत नसल्यामुळे, त्याचा तिरस्कारच करतो. बरेचदा आईला मुल नकोच असते. परिणामी गर्भपात करून घेणे ही या जमातीत नेहमीचीच गोष्ट आहे. थोडक्यात मुलाला आपल्या माता-पित्याकडून प्रेम न मिळता, तिरस्कारालाच सामोरे जावे लागते.

लवकरच त्या मुलाला कळू लागते की आपण जादूद्वारे नियंत्रित होणाऱ्या जगात जगतो आहोत. आपल्या आयुष्यात कोणतीही गोष्ट नैसर्गिक कारणांमुळे घडत नसून सर्व घटना (उदा. आजारपण, अपघात, मृत्यू) या कोणातरी नातेवाईकाने चेटूक अगर काळ्या जादूचा प्रयोग केल्यामुळेच घडतात. याची जाणीव त्याला होते. कोण, केंव्हा चेटूक करेल याचा नेम नसल्याने तो सतत चिंताग्रस्तच राहतो. पुढे त्याला आपल्या बायको अगर मित्राचाही विश्वास रहात नाही. प्रत्येक डेबुआन व्यक्ती विषप्रयोगाच्या भीतीने सतत धास्तावलेली असते. अन्न शिजवताना म्हणूनच त्यांच्याकडून विशेष काळजी घेतली जाते. परिणामी दुष्ट इच्छा बाळगणे आणि विश्वासघात हे डोबुअनांकडून सद्‌गुण मानले जातात. ज्याप्रमाणे व्यक्तीला येणारे कोणतेही अपयश हे दुसऱ्याकडून केल्या जाणाऱ्या काळ्या जादू अगर चेटूकाचा परिणाम मानले जाते त्याप्रमाणेच सर्व प्रकारचे यश हे दुसऱ्याच्या अपयशाचे प्रतिक मानले जाते. त्यांच्यादृष्टीने यश हे परिणामकारक जादूवर अवलंबून असते आणि यशाचे मोजमाप चोरी आणि शीलभ्रष्ट करण्याच्या व्यक्तीच्या क्षमतेवर केले जाते. परिणामी डोबुअन जमातीत व्यभिचार सार्वत्रिक आढळतो.

अशा सांस्कृतिक संरचनेत उमलणारे व्यक्तिमत्त्व कसे असणार? डोबुअन हे शत्रुत्व करणारे, संशयी, अविश्वासू, मत्सरी, दगाबाज आणि फसवे बनतात. अर्थात दुष्ट शक्तींनी व्यापलेल्या, शत्रूंनी घेरलेल्या, काळी जादू आणि चेटूक यांनी प्रभावित अशा विश्वात ते वावरत असल्याने त्यांच्या या प्रतिक्रिया स्वाभाविकच वाटतात. आपल्या आधुनिक मानसिक आरोग्य विषयक संकल्पनांच्या आधारे, आपण सर्व डोबुअन लोक आपला सारखा छळ होतो असे मानणारे (Paranoid) असतात असे म्हणू शकतो. पण प्रत्यक्ष जीवन जगताना ते ज्या धोक्यांना सामोरे जातात ते काल्पनिक नाहीत परिणामी त्यांना असे समजणे अवास्तव आहे. विशिष्ट संस्कृतीमुळे प्रभावित होणारे व्यक्तिमत्त्व त्या संस्कृतीच्या संदर्भात सामान्य असते.

**झुनी संस्कृती आणि तिचा व्यक्तिमत्त्वावरील प्रभाव** (Zuni Culture and its Impact on Personality) **:**

डोबुअन जमातीशी तुलना करता न्यु मेक्सिकोतील झुनी जमातीतील लोक हे भावनिकदृष्ट्या शांत जगतात वावरणारे आहेत. या जमातीकडून नवजात अर्भकाचे अत्यंत आनंदाने स्वागत केले जाते. अत्यंत नाजूकपणे आणि प्रेमाने त्याचे पालनपोषण केले जाते. त्याच्याकडे मायेने लक्ष दिले जाते. झुनी जमातीत फारसे गुन्हे घडत नाहीत. फारशी भांडणेही होत नाहीत. या लोकांच्या सर्व वर्तनात सहकार्य, नेमस्तपणा, आणि व्यक्तीवादाचा अभाव प्रकर्षाने जाणवतो. या जमातीतील सांस्कृतिक मूल्यांप्रमाणे प्रत्येक व्यक्ती स्वत:च्या भल्यासाठी अगर स्वार्थासाठी नव्हे तर संपूर्ण समूहाच्या भल्यासाठी झटत असते. कितीही मतभेद असले तरी ते सामोपचाराने मिटवले जातात. ते मद्यपान वर्ज्य मानतात, कारण ते त्यांच्या दृष्टीने असभ्यपणाचे लक्षण आहे. आक्रमक स्वरुपाचे वर्तन अगर परस्परांतील भांडण याना झुनी संस्कृतीत मान्यता नाही. आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवण्यास व्यक्तींना लहानपणापासूनच शिकविले जाते.

झुनी लोकांचे विश्वही भुताखेतांनी व जादूने नियंत्रित झालेले आहे. पण ते जादूचा इतरांच्या वाईटासाठी वापर करत नाहीत तर चांगल्यासाठीच करतात. या जमातीकडून व्यभिचाराचा तिरस्कार केला जातो आणि व्यभिचार ही खाजगी बाब मानली जाते. या जमातीत घटस्फोटाची पद्धतही अत्यंत साधी आहे. या मातृतसत्ताक कुटुंबपद्धती असणाऱ्या जमातीतील स्त्रीला आपल्या नवऱ्याला घटस्फोट एका विशिष्ट पद्धतीनेच द्यावा लागतो. एके दिवशी संध्याकाळी जमातीतील काही लोकांना ती आपल्या घरी पाचारण करते. नवऱ्याच्या सर्व चीजवस्तू, त्याचे कपडे इत्यादी एका फडक्यात बांधून ते गाठोडे उंबरठ्यावर ठेवले जाते. शेतीवर दिवसभर काम करून थकलेला नवरा जेव्हा परत येतो तेव्हा त्याच्या दृष्टीला ते गाठोडे पडते. याचा अर्थ त्याला त्याच्या पत्नीने घटस्फोट दिलेला आहे. त्याने गाठोडे घेऊन त्याच पावली आपल्या आईच्या घरी जावयाचे असते. सर्वसामांन्यपणे पत्नीने बांधून ठेवलेले गाठोडे हे घटस्फोटाचे चिन्ह मानून नवरा आपल्या आईकडे येतो. या जमातीत कुटुंबसंस्था मातृवंशिक व मातृस्थानीय असल्यामुळे घटस्फोटानंतर पित्याचे घरातील अस्तित्व संपुष्टात आल्याचा फारसा परिणाम मुलांच्या जीवनावर होत नाही. असे असले तरी या जमातीत घटस्फोटाचे प्रमाण अत्यंत कमी आढळते. सहकारिता, नेमस्तपणा आणि व्यक्तीवादाचा अभाव ही झुनी वर्तनपद्धतीची वैशिष्ट्ये आहेत. खाजगी मालमत्ता ही संकल्पना या जमातीत आढळत नाही. प्रत्येक व्यक्ती केवळ स्वत:च्या स्वार्थासाठी नव्हे तर संपूर्ण समूहाच्या भल्यासाठी सतत

कार्यरत रहाते. या जमातीत सदस्यांत निर्माण झालेली गैरसमजाची बाब अत्यंत शांतपणे आणि विचारविनिमयाने सोडवली जाते.

अशा सांस्कृतिक पर्यावरणात उमलणारे व्यक्तिमत्त्व डोबुअन जमातीतील व्यक्तिमत्त्वांच्या बरोबर दुसऱ्या टोकाचे असते. डोबुअन हे संशयी व अविश्वासू असतात तर झुनी आत्मविश्वासू आणि विश्वसनीय असतात. वरील दोन उदाहरणांच्या अभ्यासाअंती समाजपरत्वे व्यक्तिमत्वात भिन्नता आढळून येते हे स्पष्ट होते. प्रत्येक समाज आपल्या संस्कृतीनुरूप मूलभूत व्यक्तिमत्त्व प्रकार विकसित करत असतो.

मार्गारेट मीड या प्रसिद्ध मानवशास्त्रज्ञांनी त्यांच्या 'Sex and Temperament in Three Primitive Societies' या पुस्तकात लैंगिकतेचा (Sex) व्यक्तिमत्वावर पडणारा प्रभाव विशद केला आहे. 'पुरुषी' आणि 'स्त्रीसुलभ' (Masculine and Feminine) म्हणून आपण मानत असणारे काही गुणविशेष लैंगिकतेच्या जीवशास्त्रीय तथ्यांशी संबंधित असतातच असे नाही. याबाबत आढळणारी भिन्नता ही संस्कृतीने केलेल्या त्या गुणविशेषाच्या परिभाषेशी संबंधित असते ही बाब स्पष्ट करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. त्यांनी अभ्यासलेल्या न्युगिनीमधील तीन आदिवासी जमाती तीन भिन्न व्यक्तिमत्त्व प्रकार स्पष्ट करतात.

१. मीड यांना असे आढळून आले की न्युगिनीच्या डोंगराळ भागात वास्तव्य करणारे आरापेश (Arapesh) लोक सभ्य, सौम्य, मातृवंशीय आणि प्रेमळ आहेत. या जमातीतील स्त्री व पुरुष दोघेही आपण ज्याचा उल्लेख 'स्त्री-सुलभ' (Feminine) असा करु असेच वागतात.

२. न्युगिनीमधील मुंडुग्युमार (Mundugumor) जमात ही नरभक्षक (Cannibalistic) आहे. या जमातीतील स्त्री-पुरुष दोघेही आपण ज्याला पुरुषी (Masculine) म्हणू असेच वर्तन करत असतात. दोघेही तितकेच हिंसक, स्पर्धाळू, कामूक, द्वेषी आणि बेदरकार आहेत. म्हणजे स्त्रीया आणि पुरुष दोघेही पुरुषांप्रमाणेच वर्तन करतात. तशी त्या समाजाच्या संस्कृतीची अपेक्षा असते.

३. पण च्छांबुली (Tchambuli) या आदिवासी जमातीतील स्त्री-पुरुषांच्या भूमिका या आपल्या आधुनिक समाजात आढळणाऱ्या स्त्री-पुरुष भूमिकेच्या बरोबर विरुद्ध असल्याचे आढळते. या जमातीत पुरुषांपेक्षा स्त्रीया प्रभावशाली आहेत. पुरुष भावनिकदृष्ट्या स्त्रियांवर अवलंबून असतात आणि स्त्रीयांपेक्षा कमी जबाबदार असतात. पुरुष स्त्रियांप्रमाणे वागतात. या उदाहरणांवरून लैंगिक किंवा वैषयिक वर्तनाबाबतचे गुणविशेष हे जन्मजात असत नाहीत तर समाजाच्या संस्कृतीद्वारे निर्धारित होतात हेच स्पष्ट होते.

**एकाच संस्कृतीतील व्यक्तिमत्त्वात आढळणाऱ्या भिन्नतेची कारणे** (Causes for the differences in personality within the culture) :

प्रत्येक संस्कृती काही विशिष्ट वर्तनपद्धती, प्रेरणा आणि मूल्यांना महत्त्व देत असते. परिणामी समाजातील बहुसंख्य लोक संस्कृतीद्वारे निर्धारीत केलेल्या वर्तनपद्धती आणि विचार पद्धतींचे आत्मसातीकरण करून आपले व्यक्तिमत्त्व विकसित करीत असतात. संस्कृतीचा व्यक्तिमत्त्व विकासावर मोठ्या प्रमाणावर प्रभाव पडत असतो. परिणामी बहुसंख्य व्यक्तिमत्त्वे ही सामान्यत: सारखेपणा असलेली असतात. याचा अर्थ

असा नव्हे की प्रत्येक संस्कृती एकाच साच्याची व्यक्तिमत्त्वे निर्माण करत असते. आपण जेव्हा असे म्हणतो की डोबुअन व क्वाकिउल्ल इंडियन लोक अत्यंत स्पर्धाळू, भांडखोर आणि विश्वासघातकी असतात. याचा अर्थ सर्वच डोबुअन व क्वाकिउल्ल इंडियन या गुणांनी युक्त असतातच असे नाही. याप्रमाणेच आपण जेव्हा असे म्हणतो की आधुनिक अमेरिकन व्यक्तिगत विकासाला सर्वात जास्त प्राधान्य देतात तेव्हा सर्वच अमेरिकन तितक्याच प्रमाणात या मूल्याला महत्त्व देतातच असे नाही. काही लोक यश संपादनासाठी स्पर्धेला महत्त्व देतील तर काही अशा स्पर्धेपासून स्वत:ला दूरही ठेवतील. इतर काही लोक व्यक्तिगत यशाचा तिरस्कार करतील तर काही लोक समाजातील दरिद्री लोकांच्या उद्धारासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची टाकणारे असतील. अशा प्रकारे एकाच संस्कृतीतील व्यक्तिमत्त्वात भिन्नता आढळून येऊ शकते. मानवशास्त्रज्ञांनी व समाजशास्त्रज्ञांनी अशा व्यक्तिमत्त्व भिन्नतेचे निरीक्षण केले आहे. राल्फ लिंटन यांनी संस्कृतीतील व्यक्तिमत्त्व गुणविशेषातील भिन्नता दाखवून दिली आहे. परिणामी एकाच संस्कृतीतील काही लोक इतरांपेक्षा जास्त भांडखोर, काही लोक नम्र, दयाळू, दानशूर किंवा स्पर्धात्मक वृत्तीचे आढळतील. या सर्व भिन्नतेचे कारण हेच की व्यक्तिमत्त्व निर्धारणातील असंख्य घटकांपैकी संस्कृती हा एक घटक आहे. अशाप्रकारे व्यक्तिमत्त्व हे पूर्णपणे संस्कृतीद्वारेच निश्चित होत नाही. व्यक्तिमत्त्वात भिन्नता निर्माण करणारे काही घटक आपल्याला पुढीलप्रमाणे विशद करता येतील.

१. **अनुवंशिकता** (Heredity) **:** व्यक्तीना लाभणारा अनुवंश भिन्न भिन्न असतो. व्यक्तींना अनुवंशाने प्राप्त झालेल्या क्षमतांमधील भिन्नता त्यांच्या व्यक्तिमत्त्वात भिन्नता निर्माण करते. कोणतीही दोन नवजात बालके कधीही तंतोतंत सारखी असत नाहीत. गुणसूत्रीय व अनुवंशिक स्वरूपात असणारी जैविक भिन्नता प्रत्येक नवजात अर्भकाला दुसऱ्यांपेक्षा वेगळे बनवते. परिणामी समान किंवा एकाच सांस्कृतिक उद्दिपकाला अर्भकाची असणारी प्रतिक्रिया वेगळी असते.

२. **परिस्थितीजन्य भिन्नता** (Situational Differences) **:** मानवी मुल ज्या सामाजिक परिस्थितीत वाढत असते त्याचा प्रभाव त्याच्या व्यक्तिमत्त्वावर निश्चितपणे पडत असतो. उदा. एखाद्या घरात 'एकुलता एक' या अवस्थेत वाढणाऱ्या मुलाची सामाजिक परिस्थिती, एकापेक्षा जास्त भावंडात वाढणाऱ्या मुलापेक्षा भिन्न असते. एकाच कुटुंबात वाढणाऱ्या 'मुलाच्या' आणि 'मुलीच्या' वाट्याला येणारी सामाजिक परिस्थिती भिन्न असते. केवळ बहिण असणाऱ्या कुटुंबात वाढणाऱ्या मुलीला लाभणारी सामाजिक परिस्थिती भाऊ असणाऱ्या कुटुंबात असलेल्या सामाजिक परिस्थितीपेक्षा वेगळी असते. मुलांच्या जन्माचा क्रमही व्यक्तिमत्त्व विकासावर प्रभाव पाडत असतो. त्याप्रमाणेच माता-पित्यांचा असणारा वयोगटही मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर प्रभाव पाडतो. ज्याचे माता-पिता तरुण आहेत अशा मुलाला लाभणारी सामाजिक परिस्थिती वृद्ध माता-पित्यांच्या घरात वाढणाऱ्या मुलापेक्षा भिन्न असते. थोडक्यात एकाच समाजातील विविध कुटुंबातील व्यक्तींना, तसेच एका कुटुंबातील मुलांना येणारा परिस्थितीचा अनुभव निरनिराळा असतो. त्यामुळेही त्यांची व्यक्तिमत्त्वे निरनिराळ्या पद्धतीने आकारित होतात.

३. **उपसंस्कृतीचा प्रभाव** (Sub-Cultural Influence) **:** संस्कृती ही काही अखंड अशी बाब नाही किंवा एखादा साचा नाही की ज्यामध्ये मुलाला एखाद्या मूर्तीप्रमाणे घडविले जाते. रुथ बेनेडिक्ट यांच्या

मतानुसार संस्कृती ही काही एखाद्या गणवेशासारखी नाही की जिचा अंगिकार समाजातील सर्व सदस्यांनी केलाच पाहिजे. कोणत्याही समाजाच्या संस्कृतीत अनेक उप-संस्कृती समाविष्ट झालेल्या असतात. आणि यातील प्रत्येक उपसंस्कृतीचा स्वत:चा असा एक प्रभाव सर्व सदस्यांवर पडत असतो. परिणामी विविध उपसंस्कृतींचा विविध व्यक्तींवर पडणारा भिन्न-भिन्न प्रभाव त्यांच्या व्यक्तिमत्त्वात विभिन्नता निर्माण करतो.

४. **सांस्कृतीक पर्याय** (Cultural Alternatives) **:** प्रत्येक संस्कृती आपल्या सदस्यांना सार्वत्रिक गुणांबरोबरच (Universals) पर्यायी मार्गांचेही (Alternatives) ज्ञान पुरवत असते. सार्वत्रिक गुण ही संपूर्ण समाजाने मान्य केलेली व अंगिकारलेली संस्कृतीतील मध्यवर्ती अशी वैशिष्ट्ये असतात. समाजसदस्यांकडून हे वर्तनप्रकार शिकून आत्मसात केले जातात. उदा. समाजात बोलली जाणारी भाषा, देशभक्ती, एकविवाह पद्धती, वडिलधाऱ्यांविषयी आदर यासारखी समाजात खोलवर रुजलेली मूल्ये भारतीय संस्कृतीतील सार्वत्रिक गुणच दर्शवितात. ज्या क्रियांबाबत व्यक्तींना निवड करण्याचे स्वातंत्र्य संस्कृतीने दिलेले असते अशा पर्यायी मार्गांना सांस्कृतिक पर्याय (Cultural Alternatives) म्हणतात. उदा. कायदेशीररित्या विवाह करणे हा सार्वत्रिक गुण आहे. पण विवाह करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसमोर सर्वमान्य असे पर्याय देण्यात आलेले असतात. ते स्वत:च्या दारात, एखाद्या चर्च किंवा मंदिरात किंवा विवाह नोंदणी कार्यालयात विवाह करू शकतात. अशाप्रकारे समान ध्येय प्राप्त करण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या पर्यायांचा निर्देश पर्यायी मार्गाद्वारे होतो. आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर होणारा परिणामही भिन्न-भिन्न स्वरुपाचा असतो.

५. **संस्कृती हस्तांतरणातील तफावत** (Differences in the transmission of culture) **:** समाजीकरणाच्या प्रक्रियेद्वारे संस्कृती नव्या पिढीकडे हस्तांतरित केली जाते. हे हस्तांतरण ज्या व्यक्तींकडून घडते ते त्यांनी संस्कृतीतील आत्मसात केलेल्या गोष्टींपुरतेच मर्यादित रहाते. परिणामी एकाच वंश, धर्म, प्रदेश अगर सामाजिक वर्गात असणाऱ्या विविध माता-पित्यांकडून त्यांच्या मुलांकडे विविध सांस्कृतिक गुण व मूल्ये संक्रमित केली जातात आणि त्याप्रमाणे व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाला आकार प्राप्त होतो.

६. **बदलत्या संस्कृतीचा प्रभाव** (Impact of changing culture) **:** संस्कृती ही कधीही स्थिर असत नाही तर तिच्यात सातत्याने बदल होत असतात. काळानुरूप संस्कृतीचे स्वरूप बदलत असते. खाणे-पिणे, वागणे-बोलणे, पोषाख आणि अलंकार, श्रद्धा-समजुती, बऱ्या-वाईटाच्या कल्पना, एकूण जीवनपद्धती व जीवनमूल्ये यात बदल होत असतो. भौतिक वस्तूंच्या स्वरुपातही सतत बदल होत असतात. अशा काळानुरूप बदलणाऱ्या संस्कृतीचा त्या समाजातील सर्व सदस्यांवर पडणारा प्रभाव कधीच एकसारखा असत नाही. परिणामी व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वात भिन्नता निर्माण होते.

७. **संस्कृती व्यक्तीवादाला चालना देते** (Culture encourages individuality) **:** संस्कृती केवळ सारखेपणावरच भर देते असे नाही तर व्यक्तीवादालाही चालना देत असते. समाजसदस्यांसाठी संस्कृती पर्यायीमार्गांबरोबरच विशिष्ट गुणांचीही निश्चिती करत असते. काही संस्कृतींकडून स्वकर्तृत्व, संशोधकता, कल्पकता, नव परिस्थितीशी समायोजन क्षमता अशा मूल्यांना प्रोत्साहन दिले जाते. परिणामी संस्कृतीकडून व्यक्तीवादाला दिल्या जाणाऱ्या प्रोत्साहनामुळे समाजातील व्यक्तिमत्त्वात भिन्नता निर्माण होते.

सारांश, व्यक्तीच्या सवयी, दृष्टीकोण आणि गुणविशेष यांच्या संघटनातून व्यक्तिमत्त्व आकाराला येत असते. समाजीकरणाच्या प्रक्रियेचा लाभ झालेल्या प्रत्येक व्यक्तीला तिचे स्वत:चे असे एक व्यक्तिमत्त्व लाभलेले असते. या व्यक्तिमत्त्वाची उत्पत्ती व्यक्तीला लाभलेल्या जैविक, सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांतील क्रिया व प्रतिक्रियांतून होत असते. संस्कृती समाजसदस्यांमध्ये, त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये समानतेबरोबरच भिन्नताही निर्माण करत असते. केवळ संस्कृतीद्वारेच व्यक्तिमत्त्वाचे निर्धारण होत नसले तरी व्यक्तिमत्त्वावर संस्कृतीचा पडणारा प्रभाव आपल्याला दुर्लक्षित करता येणार नाही.

### **१.२.३ संस्कृतीचे महत्त्व** (Importance of Culture)

मानवाच्या सर्वांगीन विकासामध्ये संस्कृती नेहमीच महत्त्वाची भूमिका पार पाडत असते. संस्कृतीला मानवी जीवनात अधिक महत्त्व आहे. समाजातील सर्व घटकांच्या दृष्टिकोणातून संस्कृती फार महत्त्वाची आहे.

**१) समाजधारणेतील योगदान :** समाज म्हणजे व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समूह आणि समूहासमुहातील परस्पर संबंधाचे एक जाळेच आहे. समाजातील परस्पर संबंध हे सांस्कृतीक नियमने मुल्यामुळे निर्माण होत असतात, म्हणून समाजाच्या सातत्यासाठी संस्कृती अत्यंत आवश्य महत्त्वाची बाब आहे. संस्कृतीचे अस्तित्व असल्याशिवाय समाजाची व सामाजिक स्थैर्याची कल्पना करता येऊ शकत नाही.

**२) व्यक्तीच्या गरजा परिपूर्ण करण्याचे साधन :** संस्कृती म्हणजे त्या त्या समाजातील लोकांचा जीवन जगण्याचा मार्ग होय. समाजातील लोकांनी आपल्या शारीरिक, मानसिक, सामाजिक गरजा कशा प्रकारे भागवाव्यात याची निश्चिती संस्कृतीनेच केलेली असते. संस्कृती ही नेहमी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे स्थानांतरीत होत असते, त्यामुळे जुन्या पिढीकडून नव्या पिढीला बऱ्याच बाबी संस्कृतीच्या माध्यमातून सहजपणे मिळत असतात. त्यामुळे नव्या पिढीला उदरनिर्वाहासाठी फार यातना सहफ कराव्या लागत नाहीत. उदरनिर्वाहासाठी आवश्यक असणारे ज्ञान व कौशल्य संस्कृतीमुळेच उपलब्ध झालेले असते. संस्कृतीमुळेच व्यक्तिच्या जीवनाला परिपूर्णता व अर्थ प्राप्त होतो.

**३) समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी महत्त्वाचे साधन म्हणून संस्कृती महत्तवाची :** समाजातील प्रत्येक सामाजिक संस्था ही नियमनावर आधारित असते व मूल्यांची जपणूक करत असते. समाज रचनेतील प्रत्येक सामाजिक संस्था या एकमेकांवर आधारित किंवा संबंधीत असतात, म्हणूनच समाजात एकात्मता निर्माण होते. एकसारखी किंवा समान नियमने आणि मूल्ये हाच कोणत्याही समाजव्यवस्थेचा मूलभूत आधार होय. म्हणूनच समाजामध्ये एकात्मता निर्माण करण्यासाठी समाज संघटन घडवून आणण्यासाठी, व समाजात सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी संस्कृतीचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असते.

**४) व्यक्तीमत्त्व विकासासाठी संस्कृती महत्त्वाची :** सामाजीकरणाच्या प्रक्रियेत संस्कृती हा अत्यंत महत्त्वाचा आशय असतो. सामाजिकरणात व्यक्तीला त्या त्या समाजातील योग्य वर्तन रितींचा परिचय करून दिला जातो. म्हणजे समाजीकरणात व्यक्तीला संस्कृती शिकवली जाते. म्हणूनच या सर्व बाबी लक्षात घेऊन,

संस्कृतीमुळेच व्यक्तीच्या व्यक्तीमत्त्वाला विशिष्ठ असा दर्जा प्राप्त होतो. संस्कृतीचे अस्तित्व असल्यामुळेच त्या त्या समाजाच्या दृष्टीने योग्य व समाजयोगी व्यक्तीमत्त्वे घडवली जातात.

**५) सामाजिक आंतरक्रिया घडून येण्यासाठी संस्कृती महत्त्वाची :** सकारात्मक आंतरक्रिया घडून येण्यासाठी चांगल्या प्रकारची संस्कृती असणे आवश्यक आहे. भाषा, चिन्हे व प्रतीके हे संस्कृतीतील महत्त्वाचे घटक आहेत. भाषेमुळेच बहुसंख्य सामाजिक आंतरक्रिया शक्य होतात, या आंतरक्रियामुळेच संस्कृतीची ओळख होते व इतर व्यक्ती विविध प्रसंगात नेमक्या कशा वागतील याचा अंदाज बांधता येतो, त्यामुळेच सामाजिक संबंध भविष्यकथनक्षम बनतात व इतर व्यक्तीशी संवाद साधने शक्य होते. संस्कृतीमध्ये अस्तित्वात असलेल्या आदर्शांचे पालन केल्यामुळे व्यक्तीला समाजात इतरांची मान्यता मिळते व सुरक्षित व्यक्तीगत आणि सामाजिक जीवन शक्य होते.

म्हणूनच संस्कृतीच्या अस्तित्वाशिवाय समाजव्यवस्था परिपूर्ण होऊ शकत नाही, म्हणून संस्कृती समाजाच्या दृष्टीने, त्यातील व्यक्तींच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची कार्ये पार पाडत असल्याने संस्कृतीच्या या कार्यातच संस्कृतीचे मानवी जीवनातील महत्त्व सामावले आहे असे म्हणणे योग्य आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न** (Check Your Progress)

खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. सर एडवर्ड बी. टायलर यांनी दिलेली संस्कृतीची व्याख्या लिहा.

२. हॉर्टन व हंट यांची संस्कृतीची व्याख्या लिहा.

३. टिशलेर, व्हायटन व हंटर यांनी केलेली संस्कृतीची व्याख्या लिहा.

४. संस्कृतीच्या विविध व्याख्यांत मांडण्यात आलेले कोणतेही तीन मुद्दे लिहा.

५. संस्कृती अनुवंशिक असते काय?

६. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संस्कृती हस्तांतरणाची यंत्रणा कोणत्या?

७. संस्कृती कोणत्या अर्थाने संतोषप्रद आहे?

८. संस्कृतीची कोणतीही पाच वैशिष्ट्ये लिहा?

९. संस्कृतीचे दोन प्रमुख घटक कोणते?

१०. भौतिक संस्कृती म्हणजे काय?

११. अभौतिक संस्कृती म्हणजे काय?

१२. अभौतिक संस्कृतीचे उपघटक कोणते?

१३. नियमनात्मक संस्कृतीचे घटक कोणते?

१४. बोधात्मक संस्कृतीचे घटक कोणते?

१५. संस्कृतीकडून व्यक्तीसाठी पार पाडली जाणारी कोणतीही चार कार्ये लिहा.

१६. संपूर्ण समाजासाठी संस्कृतीकडून पार पाडली जाणारी कार्ये लिहा.

१७. 'व्यक्तिमत्त्व' या संकल्पनेचा अर्थ सांगा.

१८. व्यक्तिमत्त्व विकासावर प्रभाव पाडणारे हॉर्टन आणि हंट यानी सांगितलेले घटक लिहा.

१९. 'सरासरी व्यक्तिमत्त्व' म्हणजे काय?

२०. रुथ बेनेडिक्ट यांनी संस्कृतीचे कोणते दोन प्रकार मांडले आहेत?

२१. रुथ बेनेडिक्ट यांनी अभ्यासलेल्या आदिवासी जमातींची नावे लिहा?

२२. डोबुअन व झुनी व्यक्तिमत्त्व गुणविशेषात का फरक आढळतो?

२३. मार्गारेट मीड यांच्या मते 'पुरुषी' व 'स्त्री-सुलभ' वर्तनप्रकारांची निश्चिती कोणत्या घटकाकडून होते?

२४. संस्कृती आपल्या सर्व सदस्यांचे एकसारखे व्यक्तिमत्त्व निर्माण करते असे आपण म्हणू शकतो का?

२५. एकाच संस्कृतीतील विविध व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वात भिन्नता निर्माण करणाऱ्या घटकांची नावे लिहा.

**१.३ सारांश** (Let Us Sum Up) :

या घटकामध्ये आपण संस्कृती या संकल्पनेचा अर्थ व वैशिष्ट्ये यांचा अभ्यास केला आहे. संस्कृतीची व्यापक व प्रसिद्ध अशी व्याख्या सर एडवर्ड बी. टायलर यांनी दिली आहे. त्यांच्या मते, ''संस्कृती ही एक अशी संकीर्ण समग्रता आहे की ज्यात ज्ञान, श्रद्धा, कला, नीती, कायदा, रुढी या व अशाच इतर पात्रतांचा व सवयींचा समावेश होतो आणि या गोष्टी व्यक्तीने समाजाचा सभासद या नात्याने संपादित केलेल्या असतात.''

संस्कृतीत आपल्याकडून घडणाऱ्या सर्व क्रिया, आपल्या विचार करण्याच्या पद्धती, वर्तनपद्धती, आपल्या सर्व श्रद्धा आणि समाजाचा एक सदस्य या नात्याने आपण आत्मसात केलेल्या इतर सर्व बाबींचा समावेश होतो. Clyde Kluckhon यांच्या मते संस्कृती हा 'जीवन जगण्याचा आराखडा' आहे. संस्कृती समाजसदस्यांकडून शिकून घेतली जाते. संस्कृतीचे घटक जैविक अगर अनुवंशिक नसतात. व्यक्तीला ती ज्या समूहाचा अगर समाजाचा सदस्य असेल त्या समाजाच्या संस्कृतीतील घटक आत्मसात करावे लागतात. एखाद्या विशिष्ट समूह अगर समाजातील सर्वांसाठी संस्कृती समान असते व त्यात सर्वजण सहभागी होत असतात. शिवाय मानवाच्या असंख्य प्रकारच्या गरजा भागवण्याचे एक साधन म्हणून संस्कृतीचा उल्लेख करावा लागतो. अशी संस्कृती हा समाजाचा सामाजिक वारसाच असतो.

संस्कृतीच्या वैशिष्ट्यांत पुढील बाबींचा समावेश होतो. १. संस्कृतीचे संपादन होते किंवा ती शिकून घेतली जाते; २. संस्कृतीचे संक्रामण होते; ३. संस्कृती सामाजिक असते व त्यात सर्वांचा सहभाग असतो;

४. संस्कृती समाजाची आदर्श जीवनरीत असते; ५. संस्कृती संतोषप्रद आहे; ६. संस्कृती अभियोजनक्षम असते; ७. संस्कृती ही एकात्मता निर्माण करणारी यंत्रणा आहे; ८. संस्कृती अमूर्त असते; ९. संस्कृती समाजपरत्वे बदलते; १०. संस्कृती प्रतिकात्मक असते आणि ११. संस्कृती सापेक्षत: स्थिर असते.

प्रत्येक समाजाला संस्कृती लाभलेली असते. संस्कृतीत भौतिक आणि अभौतिक घटकांचा समावेश होतो. आपल्या सभोवतालच्या पर्यावरणाशी, त्यात होणाऱ्या बदलांशी समायोजन साधण्याच्या हेतूने मानवाने निर्माण केलेल्या सर्व वस्तूंचा समावेश भौतिक संस्कृतीत होतो. मानव या वस्तूंच्या सहाय्याने केवळ आपल्या भोवतालच्या पर्यावरणाशी समायोजनच साधत नाही तर त्या पर्यावणात बदल घडवून आपल्यासाठी त्याची उपयुक्तता वाढवत असतो. भौतिक संस्कृतीतील घटक मानवाचे पर्यावरणापासून संरक्षण करतात. भौतिक संस्कृतीतील या सर्व घटकांशी संबंधित असणाऱ्या कल्पनांना अभौतिक संस्कृती म्हणतात. ही अभौतिक संस्कृती भौतिक संस्कृतीतील घटकांच्या वापरांविषयीच्या कल्पना तसेच नियमने, ज्ञान, श्रद्धा, मूल्ये यांची एक व्यवस्था असते.

अभौतिक संस्कृतीचे नियमनात्मक संस्कृती व बोधात्मक संस्कृती अशा दोन उपविभागात विभाजन करता येते. अभौतिक संस्कृती कुटूंब, धर्म, शिक्षण, अर्थसंस्था आणि शासनामार्फत पुढच्या पिढ्यांकडे हस्तांतरित केले जाते.

नियमनात्मक संस्कृतीत विविध लोकरीती, लोकनीती आणि कायदे यांचा समावेश होतो. समाजमान्य अशा दैनंदिन जीवनातील वागणुकीच्या किंवा वर्तनाच्या पद्धती म्हणजे लोकरीती होत. याप्रमाणेच समूह कल्याणाशी निगडीत असणाऱ्या लोकरीतींना लोकनीती असे म्हटले जाते आणि त्यांचे पालन सर्व समाजसदस्यांकडून होणे अनिवार्य समजण्यात येते. लोकरीती व लोकनीतींच्या सहाय्याने साध्या व परंपरागत समाजात सामाजिक नियंत्रण यशस्वीरित्या घडवून आणले जाते. पण आधुनिक, संमिश्र समाजात यासाठी कायदे केले जातात. कायदे हे औपचारिक व लिखित स्वरुपाचे नियम असतात आणि त्यांचे उल्लंघन झाले तर अशा वर्तनासाठी शिक्षेची तरतूद असते. कायद्यांची अंमलबजावणी करणारी यंत्रणाही समाजात अस्तित्वात असते.

बोधात्मक संस्कृती म्हणजे आपल्या सभोवतालच्या विश्वाचे प्रतिनिधित्व करणारा वैचारिक स्वरुपाचा एक नकाशाच आहे. यामध्ये प्रामुख्याने ज्ञान, श्रद्धा व मूल्ये यांचा समावेश होतो. ज्ञानामध्ये सभोवतालचे जग कसे आहे, काय खरे व काय खोटे याविषयीच्या समाजाच्या कल्पनांचा समावेश असतो. आपल्या सभोवतालच्या पर्यावरणाशी समायोजन साधण्याशी व समूह जीवनाचे संघटन टिकवण्याशी या कल्पना संबंधीत असतात. व्यक्तींकडून योग्य म्हणून स्विकारलेल्या गोष्टींचा समावेश श्रद्धेत होतो व त्यांची योग्यायोग्यता तपासण्याजोगी असत नाही. मूल्ये म्हणजे समाजात काय योग्य व काय अयोग्य हे स्पष्ट करणाऱ्या अमूर्त स्वरूपाच्या कल्पनाच होत. जरी संस्कृतीचे भौतिक संस्कृती व अभौतिक संस्कृती असे विभाग आपण केले असले तरी संस्कृतीचे हे दोन्ही विभाग परस्पर संबंधीत असून ते परस्परांवर प्रभाव पाडत असतात. अभौतिक संस्कृती भौतिक संस्कृतीपेक्षा सापेक्षत: अधिक महत्त्वाची असते.

मानवेतर प्राण्यांपासून मानवाचे असणारे वेगळेपण सिद्ध करणारे आणि केवळ मानव समाजाचेच एक प्रभेदक लक्षण म्हणजे संस्कृती होय. संस्कृती म्हणजे भूतकाळात मानवाला आलेल्या अनुभवातून समृद्ध होत गेलेले ज्ञानाचे भांडार असून त्याच्या सहाय्याने आपल्याला वर्तमानकाळाशी समायोजन साधणे शक्य होते, इतकेच नव्हे तर भविष्यकाळाशी समायोजन साधण्याची क्षमता आपल्यात निर्माण होते. संस्कृतीमुळेच मानवशरीरधारी प्राण्याचे एका समाजोपयोगी सदस्यात रूपांतरण घडून येते. केवळ समाजसदस्यांच्यासाठीच नव्हे तर संपूर्ण समाजासाठीही संस्कृतीकडून काही कार्ये पार पाडली जातात. त्यापैकी काही कार्ये खालीलप्रमाणे

अ) समाजसदस्यासाठी संस्कृतीकडून पार पाडली जाणारी कार्ये

१) संस्कृती व्यक्तीवर्तनाला दिशा दर्शविते, २) संस्कृती व्यक्तीला अभियोजनक्षम बनविते, ३) संस्कृती समाजसदस्यांसाठी परिस्थिती निश्चित करते, ४) संस्कृती समाजसदस्यांचे दृष्टीकोण, मूल्ये आणि ध्येये परिभाषित करते, ५) संस्कृती व्यक्तीच्या उपजीविकेच्या मार्गाच्या निवडीवर प्रभाव पाडते, ६) संस्कृती व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देते. पण हेही नमूद केले पाहिजे की व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व केवळ संस्कृतीद्वारेच निश्चित होत नाही.

ब) संपूर्ण समाजासाठी संस्कृतीकडून पार पाडली जाणारी कार्ये - संस्कृती संपूर्ण समाजासाठी अनेक महत्त्वपूर्ण कार्ये पार पाडते.

१) संस्कृतीमुळेच संघटित जीवन शक्य होते, २) संस्कृती समाजात व्यवस्था आणि एकता निर्माण करते, ३) संस्कृती समाजास सापेक्ष स्थिरता प्रदान करते.

प्रत्येक व्यक्तीचे असणारे वेगळेपण दर्शविणाऱ्या कमी-अधिक प्रमाणातील स्थिर वैशिष्ट्यांच्या संचाला व्यक्तिमत्त्व असे म्हणतात. पार्क व बर्गेस यांनी, ''समूहातील व्यक्तीच्या भूमिकेचे स्वरूप ठरविणाऱ्या लक्षणांचे संकलन व संघटन म्हणजे व्यक्तिमत्त्व होय'', अशी व्यक्तिमत्त्वाची व्याख्या केली आहे. व्यक्तीच्या सवयी, दृष्टीकोण आणि गुणविशेष यांचे संघटन म्हणजे व्यक्तिमत्त्व होय. समाजीकरणाचा लाभ झालेल्या प्रत्येक व्यक्तीला तिचे स्वत:चे असे व्यक्तिमत्त्व लाभत असते. अशा या व्यक्तिमत्त्वाची उत्पत्ती जैविक, सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांतील क्रिया-प्रतिक्रियांतून होत असते. हॉर्टन व हंट यांनी व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवून आणणारे घटक म्हणून १. जैविक वंशदाय, २. भौतिक परिस्थिती, ३. संस्कृती, ४. समूहातील अनुभव व ५. व्यक्तिगत अनुभव या घटकांचे स्पष्टीकरण दिले आहे.

व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व विकासावर प्रभाव पाडणारा संस्कृती हा एक महत्त्वाचा घटक आहे. हा प्रभाव स्पष्ट करण्यासाठी रुथ बेनेडिक्ट व मार्गारेट मीड या मानवशास्त्रज्ञांनी आदिवासी जमातींच्या संस्कृतीची तुलना केली आहे. रुथ बेनेडिक्ट यांनी त्यांच्या "Patterns of Culture" या पुस्तकात न्यु मेक्सिकोतील झुनी व मॅलेनेशियातील डोबुअन या आदिवासी जमातीतील लोकांच्या व्यक्तिमत्त्वातील फरक स्पष्ट केला असून त्यांची निर्मिती या दोन्ही जमातींच्या संस्कृतीत असणाऱ्या भिन्नतेचा परिणाम आहे हे स्पष्ट केले

आहे. याप्रमाणेच मार्गारेट मीड यांनी त्यांच्या 'Sex Temperament in Three Primitive Societies' या पुस्तकात पुरुषी व स्त्री-सुलभ म्हणून आपण मानत असणारे काही गुणविशेष लैंगिकतेच्या जीवशास्त्रीय तथ्यांशी संबंधित नसून संस्कृतीने त्या गुणविशेषांच्या केलेल्या परिभाषेशी संबंधीत असतात ही बाब स्पष्ट केली आहे.

हे सत्य आहे की प्रत्येक संस्कृती सर्वांसाठी समान आणि समाजमान्य अशा गुणविशेष व मूल्यांच्या सहाय्याने व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व विकासावर प्रभाव टाकत असते. परिणामी एकाच संस्कृतीतील बहुसंख्य व्यक्तिमत्त्वे साधारणत: एकसारखी निर्माण होत असतात. पण प्रत्येक संस्कृती सर्वार्थाने समान व्यक्तिमत्त्वे निर्माण करते असे आपण म्हणूच शकत नाही. आज बहुसंख्य विचारवंत एकाच संस्कृतीमधून निर्माण होणारी व्यक्तिमत्त्वे एकसारखी असत नाहीत असेच मत मांडतात. एकाच संस्कृतीतील व्यक्तिमत्त्वात आढळणाऱ्या भिन्नतेसाठी पुढील कारणे कारणीभूत ठरत असतात. १. अनुवंशिकता, २. परिस्थितीजन्य भिन्नता, ३. उपसंस्कृतीचा प्रभाव, ४. सांस्कृतिक पर्याय, ५. संस्कृती हस्तांतरणातील तफावत, ६. बदलत्या संस्कृतीचा प्रभाव आणि ७. संस्कृतीकडून व्यक्तीवादाला दिली जाणारी चालना.

थोडक्यात, व्यक्तीच्या सवयी, दृष्टीकोण आणि गुणविशेष यांच्या संघटनातून व्यक्तिमत्त्व आकाराला येत असते. समाजीकरणाच्या प्रक्रियेचा लाभ झालेल्या प्रत्येकाला तिचे स्वत:चे असे एक व्यक्तिमत्त्व लाभलेले असते. या व्यक्तिमत्त्वाची उत्पत्ती व्यक्तीला लाभलेल्या जैविक, सामाजिक आणि संस्कृतिक घटकांतील क्रिया-प्रतिक्रियांतून होत असते. संस्कृती समाजसदस्यांच्या व्यक्तिमत्त्वात समानतेबरोबर भिन्नताही निर्माण करत असते. केवळ संस्कृतीद्वारेच व्यक्तिमत्त्वाचे निर्धारण होत नसले तरी, व्यक्तीमत्त्वावर संस्कृतीचा पडणारा प्रभाव आपल्याला दुर्लक्षित करता येणार नाही. त्याचबरोबर सांस्कृती मानवी जीवनात अत्यंत आवस्य असल्याने प्रस्तुत घटकात सांस्कृतीचे महत्त्वही थोडक्यात विषद करण्यात आले आहे.

## **१.४ स्वयं अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे** (Answers to Check Your Progress) :

१) सर एडवर्ड बी. टायलर :- ''संस्कृती ही एक अशी संकीर्ण समग्रता आहे की ज्यात ज्ञान, श्रद्धा, कला, नीति, कायदा, रुढी या व अशाच इतर पात्रतांचा व सवयींचा समावेश होतो आणि या गोष्टी व्यक्तीने समाजाचा सभासद या नात्याने संपादित केलेल्या असतात.''

२) हॉर्टन व हंट :- ''ज्याचे सामाजिक अध्ययन होते आणि ज्यात समाजातील सदस्यांचा सहभाग असतो असे सर्व काही म्हणजे संस्कृती होय.''

३) टिशलेर, व्हायटन व हंटर :- ''मानवी व्यक्ती ज्या समूहाच्या सभासद असतात त्यात त्या जे जे करावयास, वापरण्यास, उत्पादित करण्यास, माहीत करून घेण्यास आणि श्रद्धा ठेवण्यास शिकतात त्या सर्व गोष्टींना संस्कृती म्हणतात.''

४) संस्कृतीच्या विविध व्याख्यांत मांडण्यात आलेले तीन मुद्दे - १. संस्कृती समाज सदस्यांकडून शिकून घेतली जाते; २. एखाद्या विशिष्ट समूह अगर समाजातील सर्वांसाठी संस्कृती समान असते व त्यात

सर्वजण सहभागी होत असतात; ३. मानवाच्या विविध गरजा भागविण्यास मदत करणारे संस्कृती हे एक साधन आहे.

५) नाही, संस्कृती हा मानवाला अनुवंशिकतेने लाभणारा गुण नाही. समाजातील व्यक्तींना संस्कृती संपादित करावी लागते किंवा शिकून घ्यावी लागते.

६) एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संस्कृती हस्तांतरित करण्याच्या यंत्रणात कुटूंब, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे आणि रेडिओ, दूरदर्शन, वृत्तपत्रे, मासिके अशा संपर्क साधनांचा समावेश होतो.

७) संस्कृती आपल्या सदस्यांना त्यांच्या विविध गरजांच्या पूर्ततेसाठी योग्य साधने व पद्धती प्राप्त करून देते म्हणून ती संतोषप्रद आहे.

८) संस्कृतीची पाच प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे : १. संस्कृतीचे संपादन होते किंवा ती शिकून घेतली जाते. २. संस्कृतीचे संक्रमण होते. ३. संस्कृती सामाजिक व सहभागी असते. ४. संस्कृती समाजाची आदर्श जीवनरीत असते. ५. संस्कृती संतोषप्रद आहे.

९) भौतिक संस्कृती व अभौतिक संस्कृती हे संस्कृतीचे दोन प्रमुख घटक आहेत.

१०) आपल्या पर्यावरणाशी समायोजन साधण्यासाठी मानवाने निर्माण केलेल्या सर्व वस्तू म्हणजे भौतिक संस्कृती होय.

११) अभौतिक संस्कृती म्हणजे मानवाने निर्माण केलेल्या सर्व वस्तूंच्या वापराविषयीच्या कल्पना, ज्ञान, श्रद्धा व मूल्ये यांच्या एकत्रिकरणातून निर्माण झालेली एक व्यवस्था होय.

१२) नियमनात्मक संस्कृती व बोधात्मक संस्कृती हे अभौतिक संस्कृतीचे उपघटक आहेत.

१३) विविध स्वरुपाच्या लोकरीती, लोकनीती व कायदे हे नियमनात्मक संस्कृतीचे घटक आहेत.

१४) ज्ञान, श्रद्धा व मूल्ये हे बोधात्मक संस्कृतीचे घटक होत.

१५) समाजसदस्यांसाठी संस्कृतीकडून पार पाडली जाणारी चार कार्ये पुढीलप्रमाणे : १) संस्कृती व्यक्तीवर्तनाला दिशा दर्शविते, २) संस्कृती व्यक्तीला अभियोजनक्षम बनविते, ३) संस्कृती समाजसदस्यांसाठी परिस्थिती निश्चित करते, ४) संस्कृती समाजसदस्यांचे दृष्टीकोण, मूल्ये आणि ध्येये परिभाषित करते.

१६) संपूर्ण समाजासाठी संस्कृतीकडून पार पाडली जाणारी महत्त्वाची कार्ये पुढीलप्रमाणे : १) संस्कृतीमुळेच संघटित सामाजिक जीवन शक्य होते, २) संस्कृती समाजात व्यवस्था आणि एकता निर्माण करते, ३) संस्कृती समाजास सापेक्ष स्थिरता प्रदान करते.

१७) पार्क व बर्गेस यांच्या मताप्रमाणे, ''समूहातील व्यक्तींच्या भूमिकेचे स्वरूप ठरविणाऱ्या लक्षणांचे संकलन व संघटन म्हणजे व्यक्तिमत्त्व होय.''

१८) हॉर्टन आणि हंट यांनी व्यक्तिमत्त्व विकासावर प्रभाव पाडणारे १. जैविक वंशदाय, २. भौतिक परिस्थिती, ३. संस्कृती, ४. समूहातील अनुभव, ५. व्यक्तिगत अनुभव हे पाच घटक सांगितले आहेत.

१९) एखादा समाज आपल्या सदस्यांना ज्या खास सामाजिक अनुभूती देतो, अशा खास सामाजिक अनुभूतींतून त्या समाजातील सर्व व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वात सारखेपणा निर्माण होऊन त्यातून निर्माण होणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण किमान व्यक्तिमत्त्वाला 'सरासरी व्यक्तिमत्त्व' असे म्हणतात.

२०) रुथ बेनेडिक्ट यांनी ॲपोलोनियन व डायोनेशियन हे संस्कृतीचे दोन प्रकार सांगितले आहेत.

२१) रुथ बेनेडिक्ट यांनी झुनी, डोबुअन व क्वाकिउल्ल इंडियन या तीन आदिवासी जमातींच्या संस्कृतींचा अभ्यास केला आहे.

२२) डोबुअन व झुनी जमातींच्या संस्कृतीमध्ये असणाऱ्या भिन्नतेमुळे व्यक्तिमत्व गुणविशेषात फरक आढळतो.

२३) मार्गारेट मीड यांच्या मते 'पुरुषी' आणि 'स्त्री सुलभ' वर्तनप्रकारांची निश्चिती संस्कृतीद्वारे होते.

२४) नाही, संस्कृती आपल्या सर्व सदस्यांचे एकसारखे व्यक्तिमत्त्व निर्माण करु शकते, असे आपण म्हणू शकत नाही.

२५) एकाच संस्कृतीतील विविध व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वात भिन्नता निर्माण करणारे घटक पुढीलप्रमाणे – १. अनुवंशिकता, २. परिस्थितीजन्य भिन्नता, ३. उपसंस्कृती प्रभाव, ४. सांस्कृतिक पर्याय, ५. संस्कृती हस्तांतरणातील तफावत, ६. बदलत्या संस्कृतीचा प्रभाव, ७. संस्कृती व्यक्तीवादाला चालना देते.

## **१.५ सरावासाठी प्रश्न** (Exercise/Home Assignment) :

खालील प्रश्नांची उत्तरे तयार करा.

१) संस्कृतीच्या कोणत्याही दोन व्याख्या द्या व संस्कृतीचा अर्थ स्पष्ट करा.

२) संस्कृतीची प्रभेदक लक्षणे विशद करा.

३) संस्कृतीचे भौतिक आणि अभौतिक घटक स्पष्ट करा.

४) नियमनात्मक संस्कृतीच्या घटकांचे विश्लेषण करा.

५) बोधात्मक संस्कृतीच्या घटकांचे विश्लेषण करा.

६) भौतिक आणि अभौतिक संस्कृतीतील संबंध विशद करा.

७) समाजसदस्यांसाठी संस्कृतीकडून पार पाडली जाणारी कार्ये स्पष्ट करा.

८) संपूर्ण समाजाच्यादृष्टीने संस्कृतीचे असणारे महत्त्व यावर टीप लिहा.

९) व्यक्तिमत्त्व म्हणजे काय? व्यक्तिमत्त्व विकासावर प्रभाव पाडणारे विविध घटक स्पष्ट करा?

१०) 'व्यक्तिमत्त्व' म्हणजे काय ते सांगून व्यक्तिमत्त्व विकासावर संस्कृतीचा पडणारा प्रभाव विशद करा?

११) एकाच संस्कृतीतील विविध व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वात आढळणाऱ्या भिन्नतेला जबाबदार असणारे घटक स्पष्ट करा?

## १.६ चिंतन आणि कार्य (Reflection and Action) :

आपल्या भागात स्थायिक झालेल्या कोणत्याही दोन समुदायांचे काळजीपूर्वक निरीक्षण करा. त्या समुदायातील वर्तनपद्धतींचे व संस्थात्मक यंत्रणेचे काळजीपूर्वक निरीक्षण करून त्या दोन समुदायातील सांस्कृतीक भिन्नता शोधून काढा व त्यावर एक टिपणी तयार करा.

भौतिक संस्कृतीत समाविष्ट होणाऱ्या वीस वस्तूंची यादी तयार करा. भारतीय संस्कृतीत आढळणाऱ्या लोकरीती, लोकनीती, श्रद्धा आणि मूल्ये यांची प्रत्येकी पाच उदाहरणे द्या.

सभोवतालच्या समाजाचे निरीक्षण करून विशिष्ट संस्कृती सर्व समाजसदस्यांना एकत्र ठेवण्यासाठी कशी प्रयत्नशील राहते यावर एक टिपण तयार करा.

तुम्ही ज्या सांस्कृतिक समूहाचे सदस्य आहात त्याच्यावर भाष्य करा आणि तुमच्या सांस्कृतिक समूहात आढळणारी व्यक्तिमत्वातील काही समान गुणवैशिष्ट्ये शोधून काढा. ही समान गुणवैशिष्ट्ये संस्कृतीनेच उत्पन्न केली आहेत का यावर एक टिपण तयार करा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings) :


१) डॉ. सर्जेराव साळुंखे : समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना, नरेंद्र प्रकाशन, पुणे १९९६.

२) प्रा. रमेश जाधव : समाजशास्त्र, सी जमनादास आणि कंपनी, मुंबई, १९८८.

३) Tisehler Whitten and Haunter : *Introduction to sociology,* Holth, Rinehart and Winston, 1983.

४) Horton and Hunt : *Sociology,* MC Graw Hill, Tokyo, 1976.

५) Harry Johnson M. : *Sociology : A Systematic Introduction,* Allied Publishers, Bombay, 1970.


❑❑❑

# घटक–२
# समाजीकरण
(Socialization)

**घटक–संरचना** (Structure) **:**


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ विषय–विवेचन

२.२.१ सामाजिकीकरणाचा अर्थ प्रक्रिया आणि अवस्था

२.२.२ समाजीकरणाची साधने

२.२.३ समाजीकरणाचे महत्त्व

२.३ सारांश

२.४ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सरावासाठी प्रश्न / गृहपाठ

२.६ चिंतन आणि कार्य

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## २.० उद्दिष्ट्ये (Objectives) :

या घटकाच्या अध्ययनानंतर आपल्याला :

- सामाजिकीकरणाचा अर्थ प्रक्रिया आणि अवस्था समजून घेता येतील.
- सामाजिकीकरणाची साधने समजून घेता येतील.
- सामाजिकीकरणाचे महत्त्व समजून घेता येईल.

## २.१ प्रस्तावना (Introduction) :

मूल जन्माला येते तेंव्हा मानवजातीचा सदस्य या नात्याने त्याच्या काही गरजा सर्वसामान्य स्वरुपाचे भावनावेग (impulses) माता–पित्याकडून संक्रमित झालेली काही अनुवांशिक वैशिष्ट्ये आणि सूप्त स्वरुपातील काही क्षमता या बाबी त्याच्याजवळ असतात. जन्मत:च मूल म्हणजे मानव प्राणीजातीचा सदस्य असलेला एक सजीव प्राणी असतो. मूल त्याच्या अस्तित्वविषयक विविध गरजांसाठी मातापित्यांवरच

जवळ-जवळ सर्वस्वी अवलंबून असते. मुलाला त्याच्या समूहाचा किंवा समाजाचा क्रियाशील सदस्य होण्यासाठी आवश्यक अशी सर्व सामाजिक आणि सांस्कृतिक कौशल्ये शिकून घ्यावी लागतात. त्याला / तिला सर्व मानवी सामाजिक गुणधर्म संपादित करून घ्यावे लागतात. बाल्यावस्थेपासून ते मृत्यूपर्यंत व्यक्तीला समाजातील विविध सामाजिक भूमिका पार पाडाव्या लागतात. स्वत:च्या समाजात किंवा संस्कृतीत योग्य मानले जाणारे वर्तनप्रकार, अभिवृत्ती आणि मूल्ये व्यक्तीला शिकून घ्यावी लागतात. ज्या प्रक्रियेत व्यक्ती मानवी सामाजिक गुणधर्म, शारीरिक, बौद्धिक, भावनिक आणि सामाजिक कौशल्ये तसेच विविध सामाजिक भूमिका पार पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या पात्रता शिकून घेते तिला समाजीकरण म्हणतात. या घटकात आपण समाजीकरणाची व्याख्या, अर्थ आणि समाजीकरण प्रक्रियेचे स्वरुप समजून घेणारे आहोत.

## २.२ विषय विवेचन (Presentation of Subject-matter) :

या घटकाची विभागणी तीन भागात केली आहे. पहिल्या भागात समाजीकरण या संज्ञेच्या व्याख्या दिल्या आहेत आणि अर्थ स्पष्ट करण्यात आला आहे. दुसऱ्या भागात समाजीकरण प्रक्रियेचे स्वरुप थोडक्यात स्पष्ट केले आहे. तिसऱ्या भागात समाजीकरण प्रक्रियेतील विविध अवस्थांचे थोडक्यात विवेचन करून सामाजिकीकरणाचे महत्त्व स्पष्ट केले आहे.

### २.२.१ सामाजिकीकरणाचा अर्थ प्रक्रिया आणि अवस्था (Socialization : Definition and Nature) :

समाजीकरण या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी आपण काही व्याख्यांचा अभ्यास करू.

**१. ड्रेसलर आणि विलिस – ''ज्या प्रक्रियेद्वारा त्याच्या किंवा तिच्या संस्कृतीत योग्य मानले जाणारे वर्तनप्रकार आणि नियमने व्यक्ती शिकून घेते आणि त्यांचा अवलंब करते त्या प्रक्रियेला समाजीकरण असे म्हणतात.''** ("Socialization is the process by which an individual learns and adopts the behaviour patterns and norms considered appropriate in his or her culture").

**२. हॅरी जॉन्सन – ''सामाजिक भूमिका पार पाडण्याचे सामर्थ्य शिकणाऱ्याला प्राप्त करून देणारे शिक्षण म्हणजे समाजीकरण होय. समाजीकरणात संस्कृती शिकून घेतली जाते.''** ("Socialization is learning that enables the learner to perform social roles. Culture is what is learnt in socialization").

**३. हॉब्ज आणि ब्लँक – ''समाजीकरणामुळे सजीव प्राण्याचे सामाजिक मानवात रूपांतर होते''.** ("Socialization transforms the biological organism into a social being").

**४. वॉलेस आणि वॉलेस – ''समाजाच्या दृष्टीने योग्य अशा श्रद्धा आणि वर्तनप्रकार व्यक्तींमध्ये संक्रमित करून त्यांच्या 'स्व' चा किंवा व्यक्तिमत्त्वाचा विकास होणे शक्य करणारी प्रक्रिया म्हणजे समाजीकरण असे म्हणतात.''** ("Socialization is the process of transmitting socially

appropriate beliefs and behaviour patterns to an individual and making possible the development of a 'self', or personality").

५. लाईट आणि केल्लर – **''जिवंत राहण्यासाठी तसेच माणूस बनण्यासाठी आणि समाजाचा सभासद होण्यासाठी व्यक्तीला आवश्यक असलेली शारीरिक, मानसिक आणि सामाजिक कौशल्ये संपादन करण्याची प्रक्रिया म्हणजे समाजीकरण होय.''** (The process of acquiring the physical, mental and social skills that a person needs to survive and to become both and individual and a member of society is called socialization").

६. टिशेलर, व्हायटन आणि हंटर – **''समाजाचा सभासद म्हणून कार्यरत राहण्यासाठी आवश्यक असलेली बौद्धिक, शारीरिक आणि सामाजिक कौशल्ये मूल ज्या प्रदिर्घ आणि गुंतागुंतीच्या सामाजिक आंतरक्रियात्मक प्रक्रियांत शिकते त्याला समाजीकरण असे म्हणतात.''** ("The long and complicated processes of soical interaction through which a child learns the intellectual, physical and social skills needed to function as a member of society is called socialization").

७. मर्सर आणि वांडरर – **''संस्कृती शिकण्याची आणि तिच्याशी अभियोजन साधण्याची सतत सुरू असणारी प्रक्रिया म्हणजे समाजीकरण होय.''** ("The continual process of learning and adapting to culture is termed socialization")

८. गिडिन्स – **''समाजीकरण ही अशी प्रक्रिया आहे की ज्याद्वारे प्रारंभी असहाय्य असणारे मूल यथावकाश स्वत:विषयीची जाणीव असणारी, विविध बाबींचे ज्ञान असणारी, स्वत:च्या संस्कृतीतील विविध कौशल्ये संपादित केलेली व्यक्ती बनते.''** ("Socialization is the process whereby the helpess infant gradually becomes self aware, knowledgeable person, skilled in the ways of culture into which he or she is born").

**समाजीकरणाचा अर्थ :**

समाजीकरण या संकल्पनेच्या वर दिलेल्या व्याख्यांचे बारकाईने परीक्षण केल्यास समाजीकरणाचा अर्थ स्पष्ट करणारे खालील मुद्दे ध्यानात येतात.

१. समाजीकरण ही एक अध्ययन प्रक्रिया असून त्यात व्यक्ती शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि सामाजिक कौशल्यांचे संपादन करते किंवा ती शिकून घेते. समाजाचा सभासद म्हणून कार्यरत राहण्यासाठी या गोष्टी आवश्यक असतात.

२. समाजीकरण ही व्यक्तीच्या जीवनात सामान्यत: सतत चालणारी किंवा निरंतर अशी एक प्रक्रिया आहे.

३. समाजीकरणात व्यक्तीकडून संस्कृतीचे संपादन होते. त्यामुळे संस्कृती टिकून रहाणे शक्य होते. आपल्या संस्कृतीतील विविध नियमने, मूल्ये, वर्तनप्रकार, अभिवृत्ती, श्रद्धा, कौशल्ये या गोष्टी समाजीकरणात व्यक्तिंद्वारा आत्मसात केल्या जातात. या गोष्टी आपल्या समाजातील वागण्याच्या

'योग्य रीती' आहेत या दृष्टीनेच त्यांचे अध्ययन होते. या प्रक्रियेद्वारा संस्कृतीचे संक्रमण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे केले जाते.

४. समाजीकरणामुळे व्यक्तीत स्वत:विषयीची जाणीव निर्माण होते, व्यक्तीत जिवंत राहण्याची क्षमता निर्माण होते, तिच्या 'स्व' संकल्पनेचा विकास होतो तसेच तिच्या व्यक्तिमत्त्वाचाही विकास घडून येतो.

५. समाजीकरणाच्या प्रक्रियेद्वारा सजीव प्राण्याचे सामाजिक मानवात रूपांतर घडून येते, त्याला मानवत्व प्राप्त होते.

६. समाजीकरण ही अशी प्रक्रिया आहे की ज्यात स्वत:च्या समाजात किंवा संस्कृतीत योग्य मानल्या जाणाऱ्या बाबी शिकल्या जातात तर स्वत:च्या समाजात अयोग्य मानल्या जाणाऱ्या बाबी करणे टाळण्यास शिकले जाते.

७. व्यक्तीच्या दृष्टीने समाजीकरण महत्त्वाचे आहे. समाजीकरणामुळे व्यक्तीत सामाजिक भूमिका वठविण्याची क्षमता निर्माण होते, ती समाजातील इतर व्यक्तींबरोबर आंतरक्रिया करण्यास पात्र बनते, आणि समूहाशी तसेच समाजाशी एकरूप होण्याची पात्रता तिच्या अंगी निर्माण होते.

८. समग्र समाजाच्या दृष्टीने, समाजसातत्य टिकवून ठेवण्यासाठी सहाय्यभूत होणारी, सामाजिक स्थैर्य टिकवून ठेवणारी, संस्कृतीचे संक्रमण शक्य होणारी आणि सामाजिक नियंत्रणाचे एक प्रभावी साधन म्हणून, समाजीकरण ही एक अत्यंत महत्त्वाची सामाजिक प्रक्रिया होय.

**समाजीकरण प्रक्रियेचे स्वरुप (The Nature of Socialization Process) :**

मानवी मूल जन्माला येते त्या वेळी एक प्राणी म्हणून त्याच्या काही गरजा, सर्वसामान्य स्वरूपाचे भावनावेग (impulses), आणि काही प्रतिक्षिप्त क्रिया एवढ्याच गोष्टी त्याच्याजवळ असतात. अर्थात मानवजातीचा सदस्य म्हणून अनुवंशाने प्राप्त झालेली काही जैविक वैशिष्ट्येही (biological characteristics) त्याला लाभलेली असतात. या जैविक वैशिष्ट्यांमुळेच मानवी मुलाचे समाजीकरण घडून येणे शक्य होते, एवढेच नव्हे तर ते अत्यावश्यकही ठरते. मानवी मुलाला प्रचंड अध्ययन क्षमता लाभलेली असते. या अध्ययनक्षमतेच्या आधारे मुलाला आपण अन्न कसे सेवन करावे, इतरांशी कसे बोलावे, समाजात कसे वागावे, सभोवतालच्या भौतिक आणि सांस्कृतिक पर्यावरणाशी कसे जुळवून घ्यावे इ. बाबी शिकून घ्याव्या लागतात. पुढील ठळक मुद्यांच्या आधारे समाजीकरण प्रक्रियेचे स्वरूप समजून घेता येईल.

१. मानवी अर्भकाचे दीर्घकालीन परावलंबित्व आणि सहजप्रवृत्त वर्तनप्रकारांच्या प्राबल्याचा अभाव यामुळे मानवी अर्भकाचे समाजीकरण होणे ही बाब अत्यावश्यक ठरते.

२. मानव जातीचा सदस्य या नात्याने मानवी व्यक्तीला ज्या जैविक क्षमता प्राप्त झालेल्या असतात (उदा. विशिष्ट प्रकारची शरीर-रचना, उच्च बुद्धिमत्ता, प्रचंड अध्ययनक्षमता, भाषाक्षमता इ.) त्यामुळेच समाजीकरण प्रक्रिया शक्य होते.

३. मुलाला आई वडिलांकडून मिळणारे आनुवंशिक गुणधर्म तसेच सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरणातील घटक या दोन्ही बाबींद्वारा समाजीकरणाची प्रक्रिया प्रभावित होते आणि या दोन्ही प्रकारच्या घटकांचे समाजीकरण प्रक्रियेत योगदान लाभते.

४. समाजीकरण प्रक्रिया ही एक संपूर्ण आयुष्यभर चालणारी अध्ययनाची प्रक्रिया असते. हे अध्ययन आंतरक्रियास्वरुपी असते.

५. मुलांवर शिस्तीचे संस्कार करणे, मुलांच्या मनात विविध आकांक्षा रुजविणे, सामाजिक भूमिकांचे शिक्षण देणे आणि विविध प्रकारची कौशल्ये शिकविणे ही समाजीकरणाची प्रमुख उद्दिष्ट्ये (goals) आहेत.

६. अनुकरण, सूचन, सहानुभूती, तादात्म्यीकरण, स्पर्धा आणि भाषा हे समाजीकरणाची प्रक्रिया प्रभावित करणारे आणि समाजीकरणाला चालना देणारे काही महत्त्वपूर्ण घटक आहेत.

७. समाजीकरणाच्या प्रक्रियेत मुलाला सामाजिक नियमने, मूल्ये आणि विविध प्रकारची कौशल्ये आणि समाजात योग्य मानले जाणारे वर्तनप्रकार शिकवित असताना समाजीकरण घडवून आणणाऱ्या व्यक्ती अनुनय, पारितोषिके आणि शिक्षा यांचा अवलंब करीत असतात. या मार्गांचा औपचारिक आणि अनौपचारिक अशा दोन्ही स्वरुपात अवलंब केला जातो.

८. समाजीकरण आणि परिपक्वता (Maturity) या दोहोत भेद आहेत. वाढत्या वयाबरोबर शरीराची वाढ होते व शरीर परिपक्व होत जाते. पण शरीर परिपक्व झाले म्हणजे समाजीकरण झाले असे नव्हे. समाजीकरणाच्या प्रक्रियेत व्यक्तीच्या अंगी असणाऱ्या क्षमतांचा, गुणवैशिष्ट्यांचा, कौशल्यांचा 'स्व' संकल्पनेचा आणि समग्र व्यक्तिमत्त्वाचा विकास घडून येणे अभिप्रेत आहे.

९. समाजीकरणाच्या प्रक्रियेत एकाच समाजातील विविध व्यक्तीत सारखेपणा तसेच भिन्नताही निर्माण होते. समाजीकरणात नवनिर्मितीला चालना दिली जाते.

१०. बालपणीचे समाजीकरण अत्यंत महत्त्वाचे असते कारण त्याचा व्यक्तीच्या उर्वरित आयुष्यातील अध्ययन प्रक्रियेवर प्रभाव पडत असतो.

**समाजीकरण प्रक्रियेतील अवस्था (Stages in the process of Socialization) :**

समाजीकरण ही व्यक्तीच्या जन्मापासून ते तिच्या मृत्यूपर्यंत निरंतरपणे चालू राहणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत काही अवस्थाही दिसून येतात. या विभागात आपण समाजीकरण प्रक्रियेतील विविध अवस्थांचा थोडक्यात परिचय करून घेणार आहोत.

समाजीकरण ही टप्प्याटप्प्याने अधिकाधिक गुंतागुंतीची होत जाणारी प्रक्रिया आहे. प्रारंभिक समाजीकरण कुटुंबासारख्या सापेक्षत: कमी गुंतागुंतीच्या समूहात घडून येते व मग नंतर हळूहळू अधिक गुंतागुंतीच्या व्यापक समाजात ते घडून येते. समाजीकरणात अनेक गोष्टी व्यक्तीला शिकविल्या जात असल्या तरी, या सर्व गोष्टी एकाच वेळी व्यक्तीला शिकविल्या जात नाहीत. व्यक्तीचे वय, तिची

परिपक्वता, तिची भावनिक मानसिक स्थिती लक्षात घेऊनच तिला पेलेल, रुचेल, झेपेल अशा पद्धतीने मोठ्या कौशल्याने सामान्यत: समाजीकरण घडवून आणले जाते. सामाजिक भूमिकांचे व्यक्तीकडून आंतरीकरण होते. हॅरी जॉन्सन यांनी म्हटले आहे की, भूमिकांचे आंतरीकरण होणे हे जवळजवळ व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होण्यासारखेच असते. कारण, समाजीकरणात ज्या सामाजिक भूमिकांचे आंतरीकरण होते त्या तिच्या 'स्व' ('Self') च्या केंद्रस्थानी असतात. व्यक्तीची 'स्व' संकल्पना ही देखील समाजीकरण प्रक्रियेत इतर व्यक्तींबरोबर होणाऱ्या आंतरक्रियेचीच निर्मिती असते.

सिग्मंड फ्रॉईड, जीन पायगे, टालकॉट पार्सन्स, हॅरी जॉन्सन आणि एरिक एरिकसन यासारख्या अनेक मानसशास्त्रज्ञानी आणि समाजशास्त्रज्ञांनी व्यक्तीच्या जीवनातील विविध वैकासिक अवस्थांचे विवेचन केले आहे. विकासाच्या या अवस्था केवळ जैविक विकासाच्या अवस्था नसतात. या अवस्थांतून व्यक्तीचा सामाजिक विकासही घडून येत असतो असे समाजशास्त्रज्ञांचे प्रतिपादन आहे. अगदी प्रारंभिक अवस्थेपासून ते मृत्यूपर्यंत व्यक्तीच्या समाजीकरणात ज्या महत्त्वाच्या स्थूल अवस्था दिसतात त्यात नेमके काय शिकून घेतले जाते याचा अल्पसा परिचय खाली दिला आहे.

**१) मौखिक अवस्था (The Oral Stage) :** मुलाच्या जन्मापासून ते सुमारे एक वर्षापर्यंत ही अवस्था मानली जाते. जन्माला येण्यापूर्वी मातेच्या गर्भाशयात आवश्यक तेवढ्या उबदार आणि आरामदायी अवस्थेत मूल असते. त्याचे पोषणही मातेच्या शरीराद्वारेच होत असते. पण जन्मल्यानंतर मात्र त्याला बाहेरच्या वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी ताण-तणावाला तोंड द्यावे लागते. स्वत:ला श्वासोच्छ्वास करावा लागतो, सभोवतालच्या तापमानाशी जुळवून घ्यावे लागते. भूक लागल्याचे वा इतर असमाधानकारक स्थितीचे रडून इतरांना सूचित करावे लागते. समायोजनविषयक या समस्यांमुळे प्रारंभीच्या या काळात ते खूप रडतेही.

समाजीकरणाच्या दृष्टीने या अवस्थेतील महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे मौखिक परावलंबन प्रस्थापित करणे (to establish oral dependency) हे होय. हळूहळू मूल त्याला दूध पाजले जाण्याच्या विशिष्ट वेळांसंबंधी अचूक अंदाज बांधू लागते व त्यावेळी ते रडून आईला तसे सूचितही करते. त्याचप्रमाणे 'शी' 'शू' झाल्यामुळे अंथरुण ओले झाल्याचेही रडून ते इतरांना सुचविते. थोडक्यात, आपल्या विविध शारीरिक गरजांच्या पूर्ततेसाठी इतरांचे अवधान आपल्याकडे आकर्षित करून घेण्याचे कौशल्य ते आत्मसात करते.

या अवस्थेत मुलांच्या आंतरक्रिया त्याच्या आईशीच प्रामुख्याने होतात. त्याच्या गरजा भागविणारी कोणतीही व्यक्ती त्याच्या दृष्टीने 'आई'च असते. म्हणजे आई व इतर व्यक्ती वेगवेगळ्या आहेत असा स्पष्ट भेद आरंभी त्याला करता येत नाही. इतकेच काय, स्वत:ची आणि आईची अशा दोन भूमिकांचे आंतरीकरण करण्याएवढी क्षमताही त्याच्यात अजून विकसित झालेली नसते. फ्रॉईडच्या मताप्रमाणे या अवस्थेत मुलाचे आईशी फक्त 'प्राथमिक पातळीवरील तादात्म्यीकरण' (Primary identification) झालेले असते. आईच्या स्पर्शामुळे त्याला सुख लाभत असते. या अवस्थेच्या शेवटी-शेवटी स्वत:च्या भुकेवर थोडेफार नियंत्रण ठेवण्यास ते शिकते.

**२) गुदावस्था** (The Anal Stage) **:** सामान्यत: पहिल्या वर्षाच्या अखेरीपासून ते मुलाच्या वयाच्या तिसऱ्या वर्षापर्यंत ही अवस्था मानली जाते. या अवस्थेत एका नव्याच संघर्षमय व ताण-तणावाच्या स्थितीला मुलाला तोंड द्यावे लागते. मलमूत्र विसर्जनासंबंधीच्या शिस्तीच्या पालकांच्या अपेक्षा, हे या ताण-तणावाचे व संघर्षाचे प्रमुख कारण असते. मल-मूत्र विसर्जनाविषयीच्या योग्य त्या सवयी लावण्यापासूनच मुलावर शिस्तीचे संस्कार केले जातात. वर्तनाविषयीच्या समाजाच्या अपेक्षा शिकविण्यास हळूहळू याच अवस्थेत प्रारंभ होतो. पारितोषिक आणि शिक्षा अशा दोन्ही तंत्रांचा अवलंब अगदी हळुवारपणे यासाठी होत असतो. मुलाला जवळ घेणे, त्याचे पापे घेणे, त्याच्याकडे पाहून हसणे हे मुलाच्या दृष्टीने पारितोषिक असते तर त्याच्याकडे रागावून पहाणे, 'बागुलबुवा येईल' असे म्हणणे व थोडीशी भीती दाखविणे ही शिक्षा होय.

समाजीकरणाच्या दृष्टीने आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे, आता मूल स्वत:ची व आईची अशा दोन्ही भूमिकांचे आंतरीकरण करू शकते. मूल आईचे प्रेम स्वीकारते तसेच आईवरही प्रेम करायला शिकते. आईच्या सूचनांना ते प्रतिसाद द्यायला शिकते.

समाजीकरण घडवून आणणारी व्यक्ती (Socializing agent) म्हणून आईची भूमिका दुहेरी असते. एकीकडे आई व मूल या छोट्याश्या आंतरक्रियात्मक व्यवस्थेत ती सहभागी होते, तर दुसरीकडे कुटुंबातील इतरांशीही ती आंतरक्रिया करीत असतेच. एका दृष्टीने पाहता मूल आणि कुटूंब या दोहोंतच नव्हे, तर मूल आणि व्यापक समाज या दोहोंत मध्यस्थी करण्याची भूमिका ती पार पाडीत असते. या अवस्थेत मुलाच्या दृष्टीने आईची भूमिका साधनात्मक (instrumental) होय. कारण ती मुलाच्या गरजपूर्तीचे साधन असते, तर मुलाची भूमिका मुख्यत: अभिव्यक्तीच्या स्वरूपाची (expressive) असते.

**३) इडिपल अवस्था (The Oedipal Stage) :** सामान्यत: मुलाच्या वयाच्या तिसऱ्या-चौथ्या वर्षापासून ते बारा ते तेरा वर्षापर्यंत ही अवस्था असते. यापैकी चौथ्या-पाचव्या वर्षांपर्यंतचा काळ ''इडिपल क्रायसिस'' (Oedipal Crisis) चा काळ तर नंतरचा 'लॅटेन्सी काळ' (Latency Period) म्हणून ओळखला जातो.

इडिपलावस्थेत मुलग्याला आईचे आकर्षण वाटते आणि आपल्या वडिलांविषयी मात्र त्याच्या मनात मत्सराची (Jealousy) भावना निर्माण होते, असे फ्रॉईड यांनी म्हटले आहे. मुलग्याचे त्याच्या आईविषयीचे आकर्षण हे लैंगिक भावनेतून अबोध मनाच्या पातळीवर निर्माण झालेले असते असे त्याचे मत होते. मुलग्याला एकट्यालाच त्याची आई हवी असते, पण आईवर वडिलांचाही अधिकार आहे अशी त्याला जाणीव होते, आणि आपला प्रतिस्पर्धी म्हणून वडील त्याला नकोसे असल्याने त्यांच्याविषयी मत्सराची भावना मुलाच्या मनात निर्माण होते. पण वडिलांना दूर करणे ही त्याच्या आवाक्याबाहेरील गोष्ट असते. त्यामुळे मुलग्याच्या मनात अबोध पातळीवर चाललेला जो भावनिक-मानसिक गुंता असतो त्याला फ्रॉइडने ''इडिपस कॉम्प्लेक्स'' (Oedipus Complex) असे म्हटले आहे. ("The Oedipus Complex" is the feeling of jealous the boy is believed to have toward his father on account of their rivalry for the mother, the boy's feelings are believed to be sexual.")

मुलीच्या मनातदेखील अशीच आईविषयीची मत्सराची भावना निर्माण होते. तिचा निर्देश करण्यासाठी फ्रॉईड यांनी ''इलेक्ट्रा कॉम्प्लेक्स'' (Electra Complex) ही संज्ञा वापरली आहे. आता, लैंगिक भावनेविषयीची इतकी स्पष्ट जाणीव एवढ्या कोवळ्या वयात मुलांना असते असे मानावयास अनेक शास्त्रज्ञ तयार नाहीत. पण विशिष्ट वयात मुलगा आपल्या आईकडे, तर मुलगी आपल्या वडिलांकडे अधिक प्रमाणात आकर्षित झाल्याचे निदान वरकरणी तरी दिसते. अर्थात हा अबोध पातळीवरील भावनिक गुंता तसाच कायम राहात नाही. आपल्या लिंगसापेक्ष भूमिकांशी तादात्म्यीकरण (Identification) झाल्यामुळे मुलाच्या तसेच मुलीच्या मनातील हा गुंता सुटतो.

मुलाला आणि मुलीला, कुटुंबांतर्गत व्यभिचाराचा समाज तीव्र निषेध करतो ह्याची यथावकाश स्पष्ट जाणीव होते. तसेच समाजात लिंगानुरूप भूमिका पार पाडण्याविषयीचे समाजाचे दडपण उत्तरोत्तर वाढत जाते. त्यामुळे मुलगा पुरुषांप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करू लागतो व त्यासाठी त्याचे वडिलांच्या भूमिकेशी तादात्म्यीकरण होते तर मुलीचे असेच आईच्या भूमिकेशी तादात्म्यीकरण होते. म्हणजेच 'मुलगा' किंवा 'मुलगी' म्हणून समाजाच्या ज्या भूमिकाविषयक अपेक्षा असतात त्यांचे आंतरीकरण होते. लिंगसापेक्ष भूमिकेशी होणारे हे तादात्म्यीकरण सुयोग्य समाजीकरणामुळेच घडून येते.

समाजीकरणाच्या दृष्टीने महत्त्वाची बाब म्हणजे, या अवस्थेत 'मुलगा' किंवा 'मुलगी' एकतर आपापल्या 'लिंगसापेक्ष भूमिका' शिकतात, त्याचप्रमाणे इतर भावंडांच्या भूमिकांशी त्यांचे तादात्म्यीकरण झाल्यामुळे कुटुंबात 'मूल' म्हणून असलेली भूमिका शिकतात, तसेच संपूर्ण कुटुंबाशीही तादात्म्यीकरण झाल्यामुळे 'कुटुंबाचा सभासद' म्हणून असलेलीही भूमिका मुले शिकतात. सारांश, कुटुंबातील सर्व भूमिकांचे संपादन होऊन या अवस्थेत मुले कुटुंबाची सभासद बनतात.

याच अवस्थेत मुलाचा कुटुंबाबाहेरच्या जगाशी असलेला संबंध वाढत जातो. मूल शेजारच्या मुलांशी खेळते. त्याचाही त्याच्या समाजीकरणासाठी फार उपयोग होतो. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे मूल शाळेतही याच अवस्थेत प्रवेश करते. त्यामुळे शाळेतील शिक्षक आणि अन्य मुले यांच्याद्वारेही त्याचे समाजीकरण घडून येण्यास प्रारंभ होतो. आपल्या कुटुंबाबाहेर अधिक काळ राहण्यासाठी स्वतंत्र वृत्तीची जोपासना होणे या वयात अत्यंत महत्त्वाचे असते.

एकंदर भावी आयुष्यातील समाजीकरणाचा पाया घालण्याच्या दृष्टीने ही अवस्था अत्यंत महत्त्वाची होय. मुलाच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाच्या दृष्टीनेही या अवस्थेला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. या अवस्थेत मुलाला योग्य ते प्रेम मिळाले नाही अथवा त्याच्या समाजीकरणात काही त्रुटी राहिल्या तर त्याच्या व्यक्तिमत्त्वात गंभीर स्वरूपाचे दोष निर्माण होऊ शकतात व भावी आयुष्यात त्याला समायोजनाच्या अनेक समस्यांना तोंड द्यावे लागू शकते.

**४) कुमारावस्था किंवा पौगंडावस्था (Adolescent Stage) :** सामान्यत: १३ ते १८-१९ वर्षांपर्यंतची ही अवस्था मानली जाते. किशोरावस्था म्हणूनही या अवस्थेला ओळखले जाते. हा लैंगिक परिपक्वतेचा कालखंड होय. मुलांच्या लैंगिक इंद्रियांची पूर्ण वाढ होऊन अनेक शारीरिक तसेच मानसिक

बदल या कालखंडात घडून येतात. पालकांपासून अधिकाधिक स्वतंत्र होण्याच्या वृत्तीमुळे तसेच स्वयंनिर्णयक्षमता विकसित करण्याच्या प्रयत्नात अनेक ताण-तणावांना या वयातील मुलांना तोंड द्यावे लागते. म्हणूनच ''**वादळ आणि तणावांचा कालखंड**'' (Period of storm and stress) असे या काळाचे वर्णन केले जाते. एका बाजूला लैंगिक वर्तनावर नियंत्रण घालण्याविषयीच्या समाजाच्या अपेक्षा, तसेच एका बाजूला स्वतंत्र आणि आत्मनिर्भर बनावे अशी पालकांची अपेक्षा, तर अनेक गोष्टींवर त्याला न आवडणारे पालकांचे नियंत्रण, यामुळे दोलायमान मानसिक अवस्था असणारे हे वय होय. म्हणूनच फारच कौशल्याने या वयातील मुलांचे समाजीकरण घडवून आणावे लागते. आता मुलाला बाहेरच्या जगाची बरीचशी ओळख झालेली असते. महाविद्यालयीन शिक्षणाला प्रारंभ झालेला असतो. पुढच्या आयुष्याच्या दृष्टीने योग्य तो अभ्यासक्रम निवडावा लागतो. कला, क्रीडा, संगीत, नाट्य या क्षेत्रातही याच वयात अभिरुची निर्माण होतात व मुलाच्या व्यक्तिमत्त्वाचा चौफेर विकास होऊ लागतो.

याच वयात भिन्नलिंगी व्यक्तींबद्दलचे आकर्षण अधिक प्रमाणात मुलांच्या मनात निर्माण होते. प्रत्यक्ष लैंगिक संबंध न येता भिन्नलिंगी व्यक्तींविषयी योग्य ते आकर्षण व अभिवृत्ती निर्माण होणे, समतोल व्यक्तिमत्त्वविकासाच्या दृष्टीने आवश्यक बाब असते. तसेच याच वयात आपण पुढे कोण होणार याविषयीच्या आकांक्षा मुलांच्या मनात फेर धरून नाचू लागतात. भावी जीवनाविषयीच्या अनेक सुंदर कल्पना त्यांच्या मनात येतात. मुले या वयात भावुक व स्वप्नाळू बनतात. तसेच त्यांना वास्तवतेलाही सामोरे जावे लागते.

समाजीकरणाच्या दृष्टीने महत्त्वाची बाब म्हणजे अनेक सामाजिक भूमिकांचे संपादन मुलांकडून या वयात होते. तसेच पुढील आयुष्याची पूर्वतयारी मानसिक पातळीवर होत असते. विवाहाविषयीच्या, प्रापंचिक जबाबदाऱ्यांविषयीच्या व व्यवसायविषयीच्या कल्पनांना निश्चित असा आकार या वयात येत असतो. पालकांपासून पूर्ण स्वतंत्र होऊन, विवाह झाल्यावर आपले स्वत:चे वेगळे कुटूंब निर्माण झाल्यावर कुमाराचे प्रौढात रूपांतर झाले असे म्हणता येते.

लहानपणी होणारे समाजीकरण अत्यंत महत्त्वाचे असते. म्हणूनच त्याला प्राथमिक समाजीकरण असे म्हणतात. **प्राथमिक समाजीकरण** (Primary socialization) म्हणजे, समाजाचा सभासद होण्यासाठी आवश्यक अशी मूलभूत माहिती आणि कौशल्ये मुलांकडून संपादन केले जाण्याची प्रक्रिया होय. भाषेचे संपादन आणि तर्कशुद्ध विचार करण्याची पात्रता, संस्कृतीतील मूलभूत नियमने आणि मूल्ये शिकणे, नियमने व मूल्यांनुसार प्रत्यक्ष वर्तन करावयास शिकणे, आणि समाजाचा सदस्य म्हणून स्वत:विषयीची व्यक्तीने संपादन केलेली कल्पना (Social identity) या गोष्टी प्राथमिक समाजीकरणात व्यक्ती संपादन करून घेते. या गोष्टींचा प्रौढ समाजीकरणासाठी व्यक्तीला अत्यंत उपयोग होतो.

**५) प्रौढावस्थेतील समाजीकरण (Adult Socialization) :** प्रौढावस्थेतही समाजीकरण सुरूच राहते. हे समाजीकरण प्राथमिक समाजीकरणाहून काही बाबतींत वेगळे असते. गुणात्मक व आशयात्मक अशा दोन्ही प्रकारचे भेद प्राथमिक आणि प्रौढ समाजीकरणात दिसून येतात. **ज्या प्रक्रियेत प्रौढ व्यक्ती**

**अनेक नवे दर्जे आणि भूमिका शिकते त्याला प्रौढ समाजीकरण** (Adult Socialization) **असे म्हणतात.** प्राथमिक समाजीकरणाहून प्रौढ समाजीकरण अनेक बाबतींत वेगळे असते. पहिली गोष्ट म्हणजे ज्या प्रक्रियांद्वारे समाजीकरण घडवून आणले जाते त्यांविषयी मुलांपेक्षा प्रौढांना अधिक चांगली जाणीव असते. उदा. व्यावसायिक समाजीकरण घडून यावे म्हणून जाणीवपूर्वक प्रौढ व्यक्ती व्यवसाय प्रशिक्षण अभ्यासक्रम निवडतात. दुसरे असे की ज्या पद्धतीने आपले समाजीकरण घडून यावे असे त्यांना वाटते त्यावर प्रौढांचे अधिक नियंत्रणही असते व त्यामुळे अधिक उत्साहाने ते समाजीकरण प्रक्रियेत सहभागी होतात. नवी कौशल्ये व ज्ञान शिकण्याची चांगली संधी कोठे आहे याची ते निवड करतात. तिसरी अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे लहानपणी शिकलेल्याच भूमिका त्यांना पुढे कराव्या लागतील असे नसल्यामुळे अनेक नव्या भूमिका त्यांना शिकाव्या लागतात. म्हणजे लहानपणी ज्या भूमिकांसाठी कोणतीही पूर्वतयारी झालेली नसते अशा पूर्ण नव्या भूमिका प्रौढांना शिकाव्या लागतात. अशा नव्या भूमिका शिकण्यासाठी क्वचित प्रसंगी आधी शिकलेल्या भूमिकांविषयक नियमने व मूल्यांच्या विरोधी असलेली नवी मूल्ये शिकावी लागतात. प्रौढावस्थेत या अर्थाने पुनर्समाजीकरण (Resocialization) घडून येते.

प्रौढ समाजीकरणात व्यक्तीला अनेक नव्या जबाबदाऱ्या व भूमिका स्विकारून त्या पार पाडाव्या लागतात. विवाहामुळे पती वा पत्नी म्हणून नवी भूमिका व जबाबदाऱ्या येतात. मुले झाल्यावर आई किंवा वडील म्हणून पुन्हा नव्या भूमिका येतात. त्याचप्रमाणे नव्या व्यावसायिक भूमिका स्वीकारून त्या पार पाडाव्या लागतात. शिवाय प्रौढ नागरिक या नात्याने समाजातील एक जबाबदार व्यक्ती म्हणूनही नवी सामान्य स्वरूपाची भूमिकाही व्यक्तीलाही पार पाडावी लागते.

**पुनर्समाजीकरण (Resocialization) म्हणजे बालपणीच्या समाजीकरणात शिकलेल्या कल्पना, मूल्ये, भूमिका यांच्याहून वेगळ्या, विरोधी अशा कल्पना, मूल्ये व भूमिकांचे नव्याने समाजीकरण घडून येणे होय.** उदा. कुटुंबात नियमने, मूल्ये, धार्मिक श्रद्धा व्यक्ती संपादन करते. आता, शहरात जाऊन व्यावसायिक शिक्षणक्रम शिकताना वसतिगृहात व्यक्ती राहू लागल्यावर व इतर भिन्न पार्श्वभूमीच्या व्यक्तींच्या संपर्कात आल्यावर, अनेकदा पूर्वीच्या मूल्यांशी व श्रद्धांशी नव्या मूल्यांचा आणि श्रद्धांचा संघर्ष येतो व अनेक नवी मूल्ये व्यक्ती स्विकारते. हे पुनर्ससामाजीकरणच होय. समाजीकरणातील सुसंगतता प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीत कायम टिकून राहते असे नाही. काही वेळा त्यात विलगता आणि विसंगतीही दिसून येते. आदिवासी वा ग्रामीण समाजातील व्यक्ती शहरात येऊन राहिल्यावर तिचे एक प्रकारे पुनर्समाजीकरणच होत असते.

मनोरुग्णालये व तुरुंग यासारख्या संस्थांत घडवून आणले जाणारे समाजीकरण हे पुनर्ससामाजीकरणाचे उत्कृष्ट उदाहरण होय. या संस्थांना 'Total Institutions' किंवा 'परिपूर्ण संस्था' असे म्हणतात, कारण बाहेरच्या जगापासून तेथील व्यक्तींना पूर्णपणे अलग वातावरण राहावे लागते व नव्या सामाजिक वातावरणात मनोरुग्ण किंवा कैदी यांच्या व्यक्तिमत्त्वात व वर्तनप्रकारात मूलभूत स्वरूपाचे परिवर्तन घडवून आणले जाते. म्हणजे मनोरुग्ण किंवा गुन्हेगार यांच्या पुनर्ससामाजीकरणात त्यांचे पहिले विकृत व्यक्तिमत्त्व व तदनुषंगिक मूल्ये पुसून टाकून त्यांचे योग्य रीतीने पुन्हा समाजीकरण केले जाते.

**६) वृद्ध वयातील समाजीकरण (Old Age Socialization) :** व्यक्ती वयाने वृद्ध झाली म्हणजे समाजीकरण थांबते असे नाही. याही वयात नव्या भूमिका स्वीकाराव्या लागतात व अनेक समस्यांशी समायोजन साधण्यासाठी नव्या गोष्टी शिकाव्या लागतात. सामान्यत: या वयात असताना वृद्ध व्यक्तीच्या मुलामुलींची लग्ने झालेली असतात. सुना घरी येतात. त्यांच्याशी जुळवून घ्यावे लागते. पिढीतील अंतरामुळे मुले, सुना व वृद्ध व्यक्ती यांच्यात मतभेद होतात. त्यांच्याशी वृद्ध व्यक्तींना जुळवून घेणे कठीण असले तरी हे शिकावे लागते. नातू झाल्यावर आजी/आजोबांची भूमिका पार पाडावी लागते. अर्थात हे संयुक्त कुटुंबात. पण आता भारतात औद्योगिकरण व नागरीकरण यामुळे संयुक्त कुटुंबे फुटून नवी विभक्त कुटुंबे निर्माण होत आहेत. यांत तर म्हाताऱ्या व्यक्तींना काहीच स्थान नसते. त्यामुळे मुले दुरावल्यामुळे होणाऱ्या दु:खाच्या भावनेमुळे नव्या ताण-तणावांना वृद्धांना तोंड द्यावे लागते. काहींना तर वृद्धाश्रमात आपले आयुष्य घालवावे लागत आहे. म्हणजे तिथेही नव्या परिस्थितीत जुळवून घेण्यासाठी नव्या अभिवृत्ती व वर्तनप्रकारांचा त्यांना स्वीकार करावा लागतो. याचा अर्थ असा की, अगदी मृत्यूपर्यंत व्यक्तीला नव्या परिस्थितीला सामोरे जावे लागते व काहीतरी नवे स्विकारावे लागते.

अशाप्रकारे समाजीकरण ही व्यक्तीच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत निरंतरपणे चालणारी एक प्रक्रिया असून त्यात वर सांगितलेल्या प्रमुख अवस्था दिसून येतात.

एरिक एरिक्सन् यांनी व्यक्तीच्या जीवनचक्राची संकल्पना (Conception of the life cycle) मांडताना जीवशास्त्रीय, मानसशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यांचा एकत्रित अवलंब करून व्यक्तीच्या मनो-सामाजिक विकासातील विविध अवस्था विशद केल्या आहेत.

व्यक्तीच्या विकासात आठ स्वतंत्र अवस्था असतात असे एरिकसन् म्हणतो. विकसित होणाऱ्या व्यक्तीत होणारे जैविक (शारीरिक) बदल आणि व्यक्तीकडून केल्या जाणाऱ्या सामाजिक-सांस्कृतिक अपेक्षा या दोहोंत प्रत्येक अवस्थेत संघर्ष (Crisis) होतो. या दोन्ही गोष्टी व्यक्तीला परस्परविरुद्ध दिशेने ओढतात. सामान्य विकासप्रक्रियेत या संघर्षाची सोडवणूक करण्यासाठी व्यक्ती या दोहोंचा सुवर्णमध्य साधण्याचा प्रयत्न करीत असते. उदा. इतरांवर विश्वास ठेवायचा की अविश्वास दाखवायचा? सामान्य व्यक्ती सर्वच व्यक्तींवर पूर्ण विश्वास ठेवीत नाही वा सर्वच व्यक्तींवर पूर्ण अविश्वास दाखवीत नाही. तर किमान काही व्यक्तींवर पूर्ण विश्वास ठेवून त्यांच्याकडून सुरक्षितता, प्रेम मिळवते व इतरांवर कमी-अधिक विश्वास ठेवून आपण फसवले जाणार नाही याची दक्षता घेते.

खालील तक्त्यात एरिक एरिक्सन् यांनी सांगितलेल्या मनो-सामाजिक विकासाच्या आठ अवस्था, प्रत्येक अवस्थेतील मनो-सामाजिक संघर्ष आणि त्या त्या अवस्थेतील महत्त्वपूर्ण सामाजिक संबंध यांचा निर्देश केला आहे.

**एरिक एरिक्सन् यांनी सांगितलेल्या मनो–सामाजिक विकासाच्या अवस्था**

| अ.नं. Sr.No. | अवस्था (Stage) | मनो–सामाजिक संघर्ष (Psycho-social crisis) | महत्त्वपूर्ण सामाजिक संबंध (Significant Social Relations) |
|---|---|---|---|
| १. | जीवनातील पहिले वर्ष | विश्वास विरुद्ध अविश्वास | आई किंवा सांभाळ करणारी अन्य व्यक्ती |
| २. | दुसरे वर्ष | स्वायत्तता विरुद्ध साशंकता | पालक |
| ३. | ३ ते ५ वर्षे | पुढाकारवृत्ती विरुद्ध अपराधभावना | कुटुंबातील सदस्य |
| ४. | ६ वर्षे ते यौवनारंभकाळ | उद्योगशीलता विरुद्ध कमीपणाची भावना | शेजारी, शाळेतील सवंगडी |
| ५. | कुमारावस्था | अस्मिता विरुद्ध गोंधळाची अवस्था | समवयस्कांचा समूह, कुटुंबाबाहेरील अन्य समूह, नेतृत्वाचे आदर्श |
| ६. | प्रारंभिक प्रौढावस्था | घनिष्ठता विरुद्ध अलगता | मित्र परिवार, लैंगिक स्पर्धा, सहकार्य |
| ७. | मध्य प्रौढावस्था | उपक्रमशीलता विरुद्ध स्वयंकेंद्रित वृत्ती | श्रमविभाजन आणि कौटुंबिक संबंध |
| ८. | वृद्ध अवस्था | सचोटी विरुद्ध नैराश्य | मानवजात, स्वत:सारखे सर्वजण |

वरील तक्ता रावत एच. के. (२००७) यांच्या 'Sociology : Basic Concepts', रावत पब्लिकेशन्स, पान क्र. १३४ वरून घेतला आहे.

समाजशास्त्राच्या दृष्टीने एरिकसन्च्या सिद्धान्ताचे सर्वात महत्त्वाचे योगदान म्हणजे : – (१) समाजीकरण प्रक्रिया बाल्यावस्थेपर्यंत संपत नाही तर ती अगदी मृत्यूपर्यंत व्यक्तीच्या जीवनात निरंतरपणे चालणारी प्रक्रिया आहे, आणि 'स्व' संकल्पनेचा विकास या प्रक्रियेत आयुष्यभर होत राहतो असे त्याने दाखवून दिले आहे. (२) आपण आपल्या समाजाने आणि त्याच्या संस्कृतीने पुरविलेल्या सामग्रीचा उपयोग करूनच आपली स्वत:ची ओळख (Self Identity) करून घेतो किंवा 'स्व' संकल्पनेची बांधणी करीत असतो असाही त्याच्या प्रतिपादनाचा दुसरा महत्त्वाचा पैलू आहे.

### २.२.२ समाजीकरणाची साधने (Agencies of Socialization) :

व्यापक अर्थाने असे म्हणता येईल की, समाजाचा नवा सदस्य ज्या ज्या व्यक्तींच्या अथवा समूहांच्या संपर्कात येऊन आंतरक्रिया करतो अशा सर्व व्यक्ती व समूह ही समाजीकरणाची साधने म्हणून कार्य करीत असतात. समाज त्यातील वयाने व अनुभवाने ज्येष्ठ असणाऱ्या व्यक्तींकडून समाजीकरण घडवून आणतो. समवयस्कांच्या संगतीत राहिल्यामुळे, त्यांच्याशी आंतरक्रिया करीत राहिल्यामुळेही समाजीकरण स्वाभाविकपणेच घडून येते. त्याचप्रमाणे समाजातील काही समूहांद्वारा देखील व्यक्तीचे समाजीकरण

जाणीवपूर्वक घडवून आणले जाते वा ते घडून येते. या सर्व सामाजिक घटकांना समाजीकरणाची साधने म्हणता येईल. अधिक औपचारिक शब्दांत, **ज्या ज्या व्यक्ती, समूह वा इतर घटकांकडून, समाजाचा सभासद म्हणून जीवन जगण्यासाठी आवश्यक अशा शारीरिक, मानसिक आणि सामाजिक पात्रता आणि कौशल्ये व्यक्तीला शिकविली जातात, अशा सर्व घटकांना समाजीकरणाची साधने** (Agencies of Socialization) **असे म्हणता येईल.**

समाजीकरण घडवून आणणाऱ्या व्यक्तींचा विचार केल्यास त्यांचे दोन भागांत वर्गीकरण करता येईल. अधिकारी व्यक्तींकडून आणि समवयस्क व्यक्तींकडूनही समाजीकरण घडून येते. समाजीकरणाचे साधन असणारी अधिकारी व्यक्ती (Authoritarian Agency) म्हणजे वय, सत्ता, अनुभव आणि कौशल्ये याबाबत ज्येष्ठ आणि श्रेष्ठ असणारी व्यक्ती होय. उदा. मुलाच्या दृष्टीने त्याचे आई-वडील, मोठी भावंडे, शिक्षक व वयाने व अनुभवाने श्रेष्ठ असणाऱ्या समाजातील इतर व्यक्ती. या व्यक्तींना समाजव्यवहारांची चांगली जाण असल्याने त्या नव्या पिढीचे समाजीकरण घडवून आणतात. समानतेचे नाते असलेल्या व्यक्तीही समाजीकरणाचे साधन (Equalitarian Agency) म्हणून अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडतात. उदा. समवयस्क मित्र, शाळेतील, महाविद्यालयातील बरोबरीची इतर मुले, व्यवसायाच्या ठिकाणच्या बरोबरीच्या अन्य व्यक्ती इ. या दोन प्रकारच्या व्यक्तींमधील महत्त्वाचा भेद म्हणजे अधिकारी व्यक्तींपुढे नि:संकोचपणे व मनमोकळेपणे मुलाला बोलता व वागता येत नाही तर समवयस्क वा समानतेचे नाते असलेल्या व्यक्तींशी वागताना व्यक्तीला असे करता येणे सहज शक्य होते. त्यामुळेच वरील दोन्ही प्रकारच्या व्यक्तींकडून घडून येणाऱ्या समाजीकरणात गुणात्मक भेद आहे.

समाजातील विविध समूहांकडून व्यक्तीचे समाजीकरण घडवून आणले जाते. त्या समूहांना समाजीकरणाची माध्यमे, साधने वा यंत्रणा (Agencies or means of socialization) म्हणून संबोधले जाते. कुटूंब, शाळा, महाविद्यालये, समवयस्क मित्रांचे समूह, जनसंपर्कमाध्यमे, विविध व्यावसायिक प्रशिक्षण संस्था, निरनिराळ्या संघटना, मंडळे, राजकीय पक्ष इ. कडून व्यक्तीचे समाजीकरण घडून येत असल्याने ही समाजीकरणाची साधने होत. यापैकी कुटूंब, शाळा, समवयस्क मित्रांचा समूह आणि प्रसारमाध्यमे या चार साधनांचे समाजीकरणात अत्यंत महत्त्व असल्याने त्यांचा थोड्याशा तपशिलाने आपण विचार करू.

**१) कुटूंब (Family) :** समाजीकरणाचे साधन म्हणून कुटुंबाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कुटूंब ही व्यापक समाजाची एक साधी प्रतिकृतीच होय. मुलाचे प्राथमिक समाजीकरण कुटुंबातच मुख्यत: होते. आई, वडील, मोठी भावंडे यांच्याकडून कुटुंबात मुलाचे समाजीकरण होते. समाजातील रूढ वर्तनप्रकारांची पहिली ओळख मुलाला कुटुंबातच होते. समाजातील शिस्तीचे नियम, इतर मूल्ये यांचे ज्ञान कुटुंबात होते. आई-वडिलांच्या सवयी, श्रद्धा, धार्मिक अभिवृत्ती, मूल्ये मूलही शिकते. भावी काळात करावयाच्या काही भूमिका मूल कुटुंबातच शिकते. याशिवाय कुटुंबाबाहेरील सामाजिक जीवनात सहभागी होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या क्षमता, अभिवृत्ती व वर्तनपद्धती यांचे संपादन कुटुंबात होते. घरातच मूल आपल्या आई-वडिलांची भाषा शिकते. कुटुंबातील इतर व्यक्तींच्या नीतिकल्पना ते आपल्याशा करते. विशेष म्हणजे ज्या

प्रेमाने व आपुलकीने कुटुंबात समाजीकरण घडवून आणले जाते तसे अन्य कोणत्याही इतर समूहांत ते घडत नाही. कौटुंबिक आंतरक्रियांमधूनच हळूहळू मुलाचे व्यक्तिमत्त्व फुलत जाते. तसेच त्याच्या 'स्व' संकल्पनेचा उदय होण्यास कौटुंबिक आंतरक्रियांचा हातभार लागतो.

मुलाचे पहिले सामाजिक संबंध कुटुंबातील व्यक्तींशी प्रस्थापित होतात व ते अत्यंत घनिष्ठ स्वरूपाचे असतात. त्यामुळेच कुटुंबातील व्यक्तींकडून अत्यंत प्रभावीरित्या समाजीकरण घडवून आणले जाते. जर कौटुंबिक जीवनात व्यक्तीचे समाजीकरण नीट झाले नाही तर त्याच्या व्यक्तिमत्त्वात गंभीर उणिवा राहू शकतात. अनेक मनोविकृत व्यक्ती, बालगुन्हेगार, प्रौढ गुन्हेगारांविषयीच्या संशोधनात असे आढळून आले आहे की, कुटुंबातील समाजीकरणात काही दोष वा उणिवा राहिल्यामुळे, मुलांसमोर योग्य ते आदर्श न राहिल्यामुळे व त्यांना आवश्यक ते प्रेम न मिळाल्यामुळेच त्या व्यक्ती पुढे मनोविकृती जडलेल्या, आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या बनल्या होत्या. यावरूनच समाजीकरणाचे साधन म्हणून कुटुंबाचे महत्त्व लक्षात येण्यासारखे आहे.

**२) शाळा (School) :** शाळा, महाविद्यालये आणि अन्य शिक्षणसंस्था ही आधुनिक औद्योगिक समाजातील महत्त्वाची समाजीकरणाची साधने होत. पूर्वीच्या आदिवासी समाजात बहुतांशी समाजीकरण कुटुंबात वा संपूर्ण समाजाद्वारेच घडवून आणले जात होते. कारण आदिवासी समाजांचा आकार लहान होता. शिवाय परंपरागत व्यवसाय कुटुंबीयाकडूनच सहजगत्या शिकून घेतला जात असे. त्या समाजांतून भावी आयुष्यातील सर्व भूमिकांची पूर्वतयारी कुटुंबातच करून घेता येणे शक्य होते. पण आधुनिक गुंतागुंतीच्या औद्योगिक समाजात भावी काळातील सर्व भूमिकांची तयारी कुटुंबात होणे शक्यच नसते. औद्योगिक समाजातील प्रौढपणीच्या विविध भूमिकांसाठी काही किमान शालेय औपचारिक शिक्षणाची गरज असते. त्यामुळे पुढच्या जीवनात उपयुक्त अशा ज्ञानाचा लाभ मुलाला शालेय समाजीकरणातून होतो. आपल्या देशाची संस्कृती, त्याचा इतिहास, भूगोल, देशात होऊन गेलेला थोरामोठ्यांची चरित्रे, त्यांचे तत्त्वज्ञान इ. विविध गोष्टींविषयीची माहिती शाळा, महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमातून होते. शिवाय तर्कशुद्ध विचार, आधुनिक मूल्ये, शास्त्रीय ज्ञान इ. गोष्टीही शाळा महाविद्यालयीन शिक्षणामुळेच मुलाला प्राप्त होतात.

शाळा हा कुटुंबापेक्षा विशाल समूह होय. कुटुंबात अनौपचारिक वातावरण असते तर शाळेत औपचारिक नियमांना महत्त्व असते. शाळेच्या वेळा मुलाला पाळाव्या लागतात, तेथील शिस्तीच्या नियमांनुसार त्याला वागावे लागते. म्हणजे शाळेत सर्व गोष्टी मुलाच्या मनाप्रमाणे होत नाहीत. आपल्या व्यक्तिगत इच्छांवर नियंत्रण ठेवून शाळेत त्याला वागावे लागते. अर्थात शाळेतील अन्य मुलांमुळे अनौपचारिकरित्याही त्याचे समाजीकरण होतच असते. ती मुले भिन्न भिन्न सामाजिक-आर्थिक स्तरांतून येत असल्याने मुलाला त्यांच्यामुळे समाजातील इतर नियमने-मूल्यांच्या संचांची तसेच वर्तनपद्धतींची कल्पना येते. शाळेतील वा महाविद्यालयातील समाजीकरणात सर्वाधिक महत्त्वाचा प्रभाव अर्थातच शिक्षकांना असतो. शिक्षकांच्या वागण्याचा, त्यांच्या अभिवृत्ती व मूल्यांचा जबरदस्त प्रभाव मुलांवर पडतो. मुलांच्या आकांक्षांना शिक्षक मोठ्या प्रमाणावर वळण लावू शकतात. त्यांच्यापुढे ते आदर्श निर्माण करू शकतात. अशा प्रकारे आधुनिक समाजात शालेय समाजीकरणाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.

**३) समवयस्कांचा समूह (Peer Group) :** घरातील वडिलधारी मंडळी व शाळेतील शिक्षक यांच्याहून गुणात्मकरित्या वेगळ्या पद्धतीचे समाजीकरण समवयस्क मित्रांच्या समूहाकडून (Peer Group) घडून येते. घराशेजारील मुलाच्या वयाची इतर मुले, शाळेतील त्याच्या वर्गातील इतर मुले वा खेळाच्या मैदानावरील मुलाचे मित्र असे विविध ठिकाणी हे समूह तयार होऊ शकतात व त्यांचे समाजीकरणातील योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण असे आहे.

आता, घरातील आईवडील किंवा मोठी भावंडे वा शाळेतील शिक्षक, शिक्षिका ही मुलांच्या तुलनेत वयाने, अधिकाराने व अनुभवाने मोठी माणसे असतात. त्यांचेच मुलांना सामान्यत: ऐकावे लागते. या वडीलधाऱ्या व्यक्तींशी मुले बरोबरीच्या नात्याने वागू शकत नाहीत. पण समवयस्क मित्रांशी मात्र त्यांचे बरोबरीचे वा समानतेचे नाते प्रस्थापित होऊ शकते. त्यामुळे आपले मन ते मित्रांसमोर उघडे करू शकतात. कोणत्याही, त्यांच्या दृष्टीने 'खासगी' विषयांवर ते गप्पागोष्टी करू शकतात. एकमेकांशी चेष्टामस्करी चालते. मनमोकळी टीकाटिप्पणी चालते. अशा टीकेमुळे मुलाला आपल्याविषयीच्या वस्तुस्थितीची नेमकी जाणीव होते. स्वत:च्या योग्यता, पात्रता, दोष, उणिवा व्यक्तीला समवयस्क समूहात जेवढ्या प्रकर्षाने व सहजगत्या कळतात तेवढ्या त्या अन्य समूहात कळत नाहीत.

हॅविंगहर्स्ट (Havinghurst) यांच्या मते, समाजीकरणाच्या दृष्टीने, समवयस्क मित्रसमूहाची चार महत्त्वाची कार्ये आहेत. समवयस्क समूहांमुळे –

१) मुलांना आपल्या वयाच्या व्यक्तींशी नेमके कसे वागावयाचे हे समजू शकते. त्यांच्याशी होणाऱ्या आंतरक्रियांतून मुलांची सामाजिकता वाढीस लागते. समवयस्कांच्या समूहात मुले चारचौघांसारखी वागावयास शिकल्याने त्यांच्या वर्तनात तऱ्हेवाईकपणा येत नाही.

२) इतर मुले कशाला चांगले म्हणतात, कशाला वाईट समजतात, त्यांना काय आवडते व काय आवडत नाही याविषयीच्या निरीक्षणावरून विविध सामाजिक मूल्यांची मुलांची जाणीव वाढते. कपडे, भाषा, खेळ इ. विषयीची इतर मुलांची मते व मूल्येही मूल त्यांच्यात राहून आपलीशी करते.

३) अनेक सामाजिक अभिवृत्तींचे व भूमिकांचे संपादन मुलाकडून होते. धर्म, जात, पैसा इ. बाबतच्या बहुसंख्य मित्रांच्या अभिवृत्ती त्याच्याही अभिवृत्ती बनतात. समूहात मुलाला नेता, अनुयायी, मध्यस्थ इ. भूमिका कराव्या लागतात. त्यामुळे अशा भूमिकांचे शिक्षणही त्याला या समूहात मिळते.

४) समवयस्क सोबत्यांच्या संगतीतच मुलाला आपल्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाच्या अस्तित्वाची खरीखुरी जाणीव होणे, मित्रांशी वागताना त्याला स्वतंत्रपणेच निर्णय घ्यावे लागतात.

अशा प्रकारे समवयस्क मित्रसमूहांची मुलाच्या समाजीकरणातील भूमिका अतिशय महत्त्वाची आहे.

**४) जनसंपर्कमाध्यमे (Mass-Media) :** आधुनिक समाजातील सर्वच व्यक्तींच्या समाजीकरणात जनसंपर्कमाध्यमाना अत्यंत महत्त्व आहे. शिकणारी मुले असोत, व्यावसायिक असोत, शेतकरी असोत,

उद्योजक असोत वा अन्य कोणीही असोत, आजकाल माहिती व अत्याधुनिक ज्ञानाचा प्रसार करून त्यांचे समाजीकरण घडवून आणणारी व्यापक माध्यमे म्हणजे जनसंपर्कमाध्यमे!

जनसंपर्कमाध्यमे एकाच वेळी असंख्य लोकांपर्यंत पोहोचतात. वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, रेडिओ व दूरदर्शन ही अशी प्रभावी जनसंपर्क माध्यमे होत. ही माध्यमे माहिती, मूल्ये, मते, चर्चा इ. गोष्टी व्यक्तींसमोर ठेवतात. या माध्यमांचा उपयोग लोकांची करमणूक करण्यासाठीही होतो. पण समाजमनावर या माध्यमांचा जबरदस्त प्रभाव पडू शकतो. ही माध्यमे परंपरांचे जतन करू शकतात. त्याचप्रमाणे समाजपरिवर्तनासाठी व्यक्तींना अनुकूल बनवू शकतात आणि त्यांना प्रेरितही करू शकतात. विशेषत: रेडिओ, टेलिव्हिजनवरील शालेय कार्यक्रम, गोष्टी, गीते, कविता, कथा, माहितीपर निरनिराळे अन्य कार्यक्रम याद्वारे बहुसंख्य व्यक्तींचे एकाच वेळी प्रभावीपणे समाजीकरण घडवून आणले जाते. वर्तमानपत्रे वा मासिकांचा प्रभाव फक्त सुशिक्षित लोकांवर पडतो. पण रेडिओ व दूरदर्शनचा प्रभाव त्यांचा प्रसार झाला आहे अशा सर्व ठिकाणच्या सर्वच लोकांवर पडतो. दूरदर्शनाचा प्रभाव सर्व लोकमाध्यमांत सर्वाधिक प्रमाणात पडतो कारण ते दृक्-श्राव्य माध्यम आहे. अशाप्रकारे लोकसंपर्कमाध्यमे ही देखील समाजीकरणाची प्रभावी साधने आहेत, कारण लोकांचे विचार, मते, मूल्ये, अभिवृत्ती, ज्ञान या गोष्टींत भर टाकण्याचे वा ती बदलण्याचे सामर्थ्य त्यांत असते.

वरील चार माध्यमांशिवाय विविध मंडळे, संघटना, कार्यालये, राजकीय पक्ष, धार्मिक संघटना इत्यादींकडूनही समाजीकरण घडवून आणले जाते हेही ध्यानात ठेवणे आवश्यक आहे.

### २.२.३ समाजीकरणाचे महत्त्व (Presentation of Subject-matter : Importance of Socialization) :

या आधीच नमूद केल्याप्रमाणे, समाजीकरणाचे महत्त्व व्यक्तीसाठी आणि समग्र समाजाच्या दृष्टीने असलेल्या या प्रक्रियेच्या कार्यात सामावलेले आहे. याच कार्यांचे थोडक्यात विश्लेषण करून मानवी सामाजिक जीवनातील समाजीकरणाचे महत्त्व आपणाला खालील मुद्यांच्या आधारे समजून घेता येईल.

**१) समाजीकरणाद्वारे जैविक मानवी प्राण्याचे सामाजिक मानवात रूपांतर घडवून आणले जाते (Socialization transforms man, the biological being into Man, the social being):**

मानव जातीचा सदस्य म्हणून मूल जन्माला येते त्यावेळी त्याच्याजवळ काही जैविक क्षमता असतात. जन्मत:च मुलाजवळ कोणतेही मानवी सामाजिक गुणधर्म (human social qualities) नसतात. त्याला स्वत:च्या स्वतंत्र अस्तित्वाची व संस्कृतीची जाणीवही नसते. तो केवळ एक सजीव प्राणी असतो. पण समाजीकरणाच्या प्रक्रियेद्वारे या प्राण्याचे सामाजिक मानवात रूपांतर घडवून आणले जाते. या प्रक्रियेतच अनेक मानवी सामाजिक गुणवैशिष्ट्यांचे संपादन केले जाते.

**२) समाजीकरणामुळे शिस्तीचे संस्कार बिंबविले जातात (Socialization inculcates discipline) :**

समाजीकरणाच्या प्रक्रियेद्वाराच कुटुंबातील पालक व अन्य व्यक्ती, शाळेतील शिक्षक तसेच समाजातील इतर व्यक्तींद्वारा मुलांच्या मनावर शिस्तीचे संस्कार बिंबविले जातात. समाजाच्या शिस्तीसंबंधीच्या अपेक्षा मनावर बिंबविल्या जातात. व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनात आत्मनियंत्रण कसे महत्त्वाचे आहे, हे समाजीकरणात शिकविले जाते.

**३) समाजीकरणाद्वारे व्यक्तीला विविध प्रकारची कौशल्ये शिकविली जातात (Socialization provides various skills to the individual) :**

व्यक्तीला जीवन जगण्यासाठी आवश्यक आणि उपयुक्त असणारी शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि सामाजिक कौशल्ये व्यक्तीला समाजीकरणाद्वारे शिकविली जातात.

**४) समाजाचा क्रियाशील सभासद बनण्याची पात्रता समाजीकरण व्यक्तीत निर्माण करते (Socialization creates an ability to actively participate in the society) :**

समाजीकरणाद्वारे व्यक्तीला सामाजिक आंतरक्रिया करण्यासाठी, इतरांशी सामाजिक संबंध प्रस्थापित करण्यासाठी, तसेच समाजात तिचा क्रियाशील सहभाग मिळविण्याच्या दृष्टीने पात्र बनविले जाते. हे समाजीकरण प्रक्रियेद्वारा व्यक्तीच्या दृष्टीने पार पाडले जाणारे महत्त्वाचे कार्य होय. त्यामुळे व्यक्तीच्या जीवनाला स्थैर्य, सुरक्षितता व अर्थ लाभतो. एकतर समाजीकरणामुळे इतर व्यक्ती नेमक्या कोणत्या अपेक्षा आपल्याकडून ठेवतात हे कळते, त्याचप्रमाणे इतरांच्या वर्तनाबद्दलही कमी-अधिक अचूक अंदाज व्यक्तीला बांधता येतो. शिवाय व्यक्तीच्या मनात समाजीकरणाद्वारा विविध आकांक्षा रुजविल्या जातात, शिस्त निर्माण केली जाते, विविध भूमिका पार पाडण्यासाठी त्यांना तयार केले जाते व त्यासाठी त्यांना पुरेसे प्रेरितही केले जाते. त्यामुळेच त्यांच्या जीवनाला अर्थ प्राप्त होतो व समाजजीवनात त्या सक्रीय राहून योगदान देतात.

**५) समाजीकरणाद्वारे विविध सामाजिक भूमिका पार पाडण्याची पात्रता व्यक्तीत निर्माण केली जाते (Socialization contributes to the development of person) :**

बालपणापासून ते मृत्यूपर्यंत व्यक्तीला समाजात विविध सामाजिक भूमिका पार पाडाव्या लागतात (उदा. मुलगा-मुलगी, भाऊ-बहिण, विद्यार्थी, पती-पत्नी, माता-पिता, व्यावसायिक भूमिका, नागरिक, तसेच अनुभवी वृद्ध व्यक्ती अशा विविध भूमिका व्यक्तीला पार पाडाव्या लागतात). समाजीकरण प्रक्रियेत विविध भूमिकांशी निगडित हक्क आणि कर्तव्ये तसेच या भूमिका पार पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या अभिवृत्ती आणि मूल्ये यांचे प्रशिक्षण व्यक्तीला दिले जाते.

**६) समाजीकरण प्रक्रिया व्यक्तिमत्त्व विकासात महत्त्वपूर्ण योगदान देते (Socialization contributes to the development of personality) :**

व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे हे समाजीकरणाचे एक महत्त्वाचे कार्य होय. समाजीकरण प्रक्रियेत व्यक्तीच्या इतरांशी ज्या आंतरक्रिया होतात त्यातूनच तिच्या 'स्व' संकल्पनेचा विकास घडून येतो.

'स्व-संकल्पना' हा व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वातील केंद्रिय महत्त्वाचा घटक होय. विविध मानसिक घटकांचे 'स्व'मुळेच संघटन घडून येते. अशी स्व-संकल्पना निर्माण करणे म्हणूनच समाजीकरणाचे एक महत्त्वाचे कार्य ठरते. शिवाय, समाजीकरणात ज्या भूमिकांचे, मूल्यांचे, श्रद्धांचे, अभिवृत्तींचे व्यक्ती संपादन करते तेही तिच्या व्यक्तिमत्त्वातील महत्त्वाचे घटक असतात. खरे तर समाजीकरण आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास या दोन स्वतंत्र गोष्टी नसून एकाच प्रक्रियेची तीन दोन अंगे आहेत.

**७) समाजीकरण प्रक्रिया संस्कृतीचे संक्रामण घडवून आणण्यास मदत करते (Socialization process helps in transmission of culture) :**

समाजीकरण प्रक्रियेच्या माध्यमातूनच समाजातील प्रत्येक पिढी नव्या पिढीकडे आपल्या समाजाचा पूर्वापार चालत आलेला समग्र सामाजिक वंशदाय हस्तांतरित करीत असते. समाजातील वर्तनाच्या योग्य रीती, लोकरीती, लोकनीती, मूल्ये, श्रद्धा, अभिवृत्ती, ज्ञान, कौशल्ये, तंत्रे इ. चे म्हणजेच समग्र जीवनपद्धतीचे हस्तांतरण समाजीकरणाच्या माध्यमातून होत असते. ही समाजीकरणाची समाज जीवनातील महत्त्वाची भूमिका होय.

**८) समाजव्यवस्थेचे सातत्य आणि स्थैर्य टिकवून ठेवण्यात समाजीकरण प्रक्रिया योगदान देते (Socialization process cenfributes to preserve continuity & stability of social system) :**

समाजीकरण प्रक्रियेमुळेच कोणत्याही समाजाला त्यातील व्यवस्था टिकवून ठेवणे तसेच त्याचे स्थैर्य अबाधित राखणे शक्य होते. याचे कारण असे की समाजीकरण प्रक्रियेत समाजातील व्यक्तींना समाजाने योग्य मानलेल्या व प्रस्थापित झालेल्या वर्तनरीतींचा अवलंब करावयास शिकविले जाते. त्यामुळेच समाजातील विविध सामाजिक संस्था व त्याद्वारे समाजात निर्माण झालेली व्यवस्था (order) टिकून राहणे शक्य होते. समाजातील बहुसंख्य व्यक्तींचे सुयोग्य समाजीकरण घडून आले तर समाजव्यवहारात गोंधळ वा अस्थिरतेची स्थितीही निर्माण होत नाही. समाजीकरणात आपापल्या भूमिका योग्य रितीने पार पाडण्याचे शिक्षण व्यक्तींना दिले जाते व त्यासाठी त्यांना पर्याप्तपणे प्रेरित केले जाते. त्यामुळेच समाजव्यवहार सुरळित राहू शकतात.

**९) सामाजिक नियंत्रणाचे प्रभावी साधन म्हणून समाजीकरण प्रक्रिया कार्य करते (Socialization acts as effective agency of social control) :**

समाजीकरण हे समाजातील व्यक्तींच्या वर्तनांवर नियंत्रण ठेवण्याचे एक प्रभावी साधन होय. याचे कारण असे की केवळ दंडशक्तीचा वा शारीरिक शिक्षेचा वापर करून, पोलिसांचा, कायद्यांचा वापर करून लोकांच्या वर्तनावर सदासर्वकाळ प्रभावी नियंत्रण ठेवता येणे ही कोणत्याही समाजाला अशक्य असणारी गोष्ट होय. आधुनिक, औद्योगिक, गुंतागुंतीच्या, विशाल मानवी समाजात तर असे करणे ही महाकठीण बाब होय. कारण असे नियंत्रण हे बाह्य नियंत्रण ठरते. बाहेरून नियंत्रण प्रभावीपणे लादता येत नाही. पण समाजीकरणात वर्तनविषयक लोकरीतींचे आणि लोकनीतींचे व्यक्तींकडून आंतरीकरण (internalization) होत असल्याने आणि या गोष्टी व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वांचा अंगभूत भाग बनत असल्याने 'आतूनच'

व्यक्तींच्या वर्तनावर ह्या गोष्टी नियंत्रण ठेवू शकतात. समाजीकरण प्रक्रियेत नियमने-मूल्यांचे असे आंतरीकरण होत असल्यानेच समाजीकरण हे सामाजिक नियंत्रणाचे एक प्रभावी साधन ठरते.

वरील मुद्यांवरून समाजीकरणाचे महत्त्व स्पष्ट होण्यासारखे आहे. मानवी जीवनात समाजीकरणाचे किती महत्त्व आहे हे काही अपवादात्मक परिस्थितीत ज्यांचे समाजीकरण होऊ शकले नाही, अशा काही मानवी अपत्यांच्या उदाहरणांवरून अधिक प्रभावीरित्या पटवून सांगता येईल.

१७९९ मध्ये फ्रान्समधील जंगलात शिकाऱ्यांना सुमारे ११ वर्षे वयाचा एक मुलगा सापडला. किमान ५-६ वर्षे तरी जंगलात तो एकटाच राहिला असावा असे त्यांना वाटते. तो पूर्णपणे जंगली प्राण्यासारखा दिसत होता आणि वागतही होता. त्याला एका पिंजऱ्यात पकडून ठेवले गेले. त्यातून निसटण्याचा त्याने कित्येकदा प्रयत्न केला. अनेकांना तो मुलगा 'मूर्ख' (idiot) व त्याच्यात सुधारणा घडवून आणण्यापलीकडचा असा वाटला. पण जीन इटार्ड (Jean Itard) नावाच्या डॉक्टरांनी त्याच्या वागण्याचे योग्य निदान केले. इतर माणसांचा अजिबात संपर्क नसल्यामुळेच तो जंगली बनला होता असे त्यांचे मत झाले. त्यांनी त्याला घरी आणले, त्याचे नाव 'व्हिक्टर' असे ठेवले. काही गोष्टी त्याला शिकविण्याचा प्रयत्न केला. अगदी मंदगतीने तो स्वत: कपडे घालण्यास, काही साधे शब्द बोलण्यास आणि लिहिण्यास शिकला. अन्नाशी संबंधित अशाच मानवी आवाजांकडे तो लक्ष देत होता. बाकी इतर बोलणे ऐकण्याचेही तो टाळीत होता. डॉ. इटार्ड आणि त्याला अन्नपाणी देणाऱ्या स्त्री-व्यतिरिक्त अन्य कोणाही व्यक्तीबरोबर व्हिक्टरने संबंध जोडले नाहीत. वयाच्या ४० व्या वर्षी तो मरण पावला. याचा अर्थ असा की, समाजीकरणाशिवाय मानवी अपत्याला माणूसपण लाभणे अशक्य आहे. शिवाय लहानपणीचे समाजीकरण ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. कारण १०-१२ वर्षानंतर कितीही शिकविले तरी साध्या साध्या गोष्टीही मानवी मुलाला शिकता येत नाहीत, तसेच इतरांशी सामाजिक संबंधही जोडता येत नाहीत. व्हिक्टरचे वरील उदाहरण समाजीकरणाच्या मानवी जीवनातील महत्त्वावर प्रकाश टाकते.

असेच दुसरे एक उदाहरण ॲना (Anna) नावाच्या मुलीचे. अनैतिक संबंधापासून झालेली ही मुलगी इतरांच्या नजरेस पडली तर कुटुंबावर समाजाची भयंकर टीका होईल, या भीतीने तिच्या आईने एका खोलीत कोंडून ठेवली. ॲनाला जवळ जवळ सहा वर्षे कुटुंबापासून अगदी वेगळे ठेवले गेले. तिच्या आईने ती फक्त जिवंत राहील इतपतच तिच्याकडे लक्ष दिले. सामाजिक कार्यकर्त्यांनी तिचा शोध लावला. सहा वर्षाच्या ॲनाला त्यावेळी नीट बसणेदेखील जमत नव्हते. चालणे आणि बोलणे या तर दूरच्याच गोष्टी. इतर माणसांचा काहीही संपर्क न आल्यामुळे तिची अशी अवस्था झाली होती. पाहताक्षणीच ती पूर्ण मुकी, बहिरी आणि मंदबुद्धीची मुलगी वाटत होती. तिला सामाजिक कार्यकर्त्यांनी वेगळ्या शाळेत घातले. तिथे ती इतरांशी कसाबसा संवाद साधण्यास थोडीफार शिकली. अडखळत का होईना थोडे चालण्यास शिकली, स्वत:ची काळजी थोड्याफार प्रमाणात स्वत:च घेण्यास शिकली आणि काही प्रमाणात इतर मुलांशी खेळायलादेखील शिकली. पण तिच्या वयाच्या इतर सामान्य मुलींशी तिची तुलना केली तर तिचे हे शिकणे म्हणजे तिला त्या वयात जितके यायला हवे त्या मानाने अगदी नगण्य होय. या उदाहरणावरूनही व्यक्तीच्या

सामाजिक जीवनात समाजीकरणाला, विशेषत: बालपणीच्या समाजीकरणाला किती महत्त्व आहे हेच स्पष्ट होते.

ॲनाप्रमाणेच इसाबेला (Isaballa) या मुलीलाही एकांतात ठेवले गेले होते. तिची मूकबधिर आई व ती एका अंधाऱ्या खोलीत राहात. आई मूकबधिर असल्याने इसाबेलाचा भाषिक विकास तर होऊ शकला नाहीच, पण इतरांशी संपर्क न आल्याने तिचा भावनिक व मानसिक विकासही नीट होऊ शकला नाही. म्हणजेच व्यक्तीच्या विकासासाठी भाषा शिकणे, इतरांशी संपर्क येणे व समाजीकरण होणे किती आवश्यक आहे हेच इसाबेलाच्याही उदाहरणावरून दिसून येते.

बंगालमध्ये १९२० साली सिंग नावाच्या मिशनऱ्यास लांडग्याच्या कळपात दोन मुली आढळल्या. त्यांची नावे त्यांनी 'कमला' व 'अमला' अशी ठेवली. त्यांचे वर्तन अगदी लांडग्याप्रमाणेच होते. सिंग यांनी त्यांचे समाजीकरण घडवून आणण्याचा प्रयत्न केल्यावर बोलणे, चालणे, खाणेपिणे या गोष्टी त्यांनी थोड्याफार प्रमाणात आत्मसात केल्या. पण त्यांच्या वयाच्या इतर मुलींप्रमाणे काही त्यांना वागता येत नव्हते.

समाजसंपर्क नसलेल्या मानवी मुलांची काय अवस्था होते हे वरील उदाहरणांवरून स्पष्ट होईल. म्हणजे मानवी मुलांना समृद्ध जैविक वंशदाय लाभला असला तरी आपोआप मानवत्व त्यामुळे निर्माण होत नाही हे स्पष्ट आहे. समाजातील इतर व्यक्तींकडून बालपणात समाजीकरणाच्या माध्यमातून मानवी मुलांवर संस्कार केल्यावरच त्यांच्या क्षमतांचा विकास होतो, त्यांची व्यक्तिमत्त्वे विकसित होतात आणि मगच ती समाजात राहण्यास लायक होतात. हेच वरील सर्व उदाहरणे दाखवून देतात.

**सरावासाठी प्रश्न – १**

खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.

१. 'समाजीकरण' या संज्ञेची कोणतीही एक व्याख्या लिहा.

२. समाजीकरण प्रक्रियेत कोणकोणत्या प्रकारची कौशल्ये संपादित केली जातात?

३. व्यक्तीच्या दृष्टीने समाजीकरणाचे असलेले महत्त्व सांगा.

४. समग्र समाजाच्या दृष्टीने समाजीकरणाचे असलेले महत्त्व सांगा.

५. मानवी अर्भकाचे समाजीकरण होणे का अत्यावश्यक ठरते?

६. मानवी अर्भकाचे समाजीकरण होणे कशामुळे शक्य होते?

७. समाजीकरण प्रक्रियेवर कोणते घटक प्रभाव टाकतात आणि योगदान देतात?

८. समाजीकरणाची उद्दिष्ट्ये कोणती?

९. समाजीकरणाला चालना देणारे प्रमुख घटक कोणते?

१०. मौखिक अवस्थेत मूल कोणती कौशल्ये शिकते?

११. गुदावस्थेत मूल काय शिकते?

१२. 'इडिपस कॉम्प्लेक्स' म्हणजे काय?

१३. व्यक्तीच्या जीवनातील कोणता कालखंड 'वादळ आणि ताण-तणावाचा कालखंड' म्हणून ओळखला जातो?

१४. जीवनचक्राची संकल्पना मांडताना कोणत्या शास्त्रज्ञाने जीवशास्त्रीय, मानसशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यांचा एकत्रित अवलंब केला आहे?

१५. व्यक्तीच्या जीवनातील समाजीकरणाचे पहिले साधन कोणते?

१६. पालकांकडून मूल कोणत्या बाबी शिकते?

१७. शाळेतील समाजीकरण कुटुंबातील समाजीकरणाहून भिन्न का असते?

१८. समवयस्क समूहाची समाजीकरणातील दोन कार्ये सांगा?

१९. जनसंपर्क माध्यमे समाजीकरणाची महत्त्वाची साधने का मानली जातात?

२०. समाजातील व्यक्तींसाठी समाजीकरण प्रक्रिया कोणती कार्ये पार पाडते ते सांगा.

२१. समग्र समाजासाठी समाजीकरण प्रक्रियेची कार्ये कोणती ते सांगा.

## २.३ सारांश (Let Us Sum Up) :

या घटकाच्या पहिल्या विभागात आपण 'समाजीकरण' या संकल्पनेच्या व्याख्या आणि अर्थ यांचा अभ्यास केला आहे. समाजीकरण ही समाजशास्त्रातील एक केंद्रीय संकल्पना आहे. स्वत:च्या संस्कृतीत सुयोग्य मानले जाणारे वर्तनप्रकार, नियमने, मूल्ये, सामाजिक भूमिका इ. बाबी व्यक्ती समाजीकरणाच्या प्रक्रियेद्वारे शिकून घेत असते. या प्रक्रियेत मानवी सजीवाचे रूपांतर सामाजिक मानवात होते. समाजीकरण ही आयुष्यभर चालणारी निरंतर प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत व्यक्ती समाजात जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेली सर्व कौशल्ये शिकून घेते. या प्रक्रियेतच व्यक्तीच्या 'स्व' ची निर्मिती होते आणि व्यक्तिमत्त्वाचाही विकास होतो. समाजीकरणाची प्रक्रिया व्यक्ती आणि समाज या दोहोना उपयुक्त ठरणारी महत्त्वाची प्रक्रिया आहे.

या घटकाच्या दुसऱ्या विभागात आपण समाजीकरणाचे स्वरूप थोडक्यात समजून घेतले आहे. मानवी अर्भकाच्या इतरांवरील प्रदीर्घ परावलंबनामुळे समाजीकरण अत्यावश्यक बनते. विशिष्ट जैविक क्षमता आणि अध्ययन क्षमता यामुळे समाजीकरण घडवून आणणे शक्य होते. वंशदाय आणि सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरण या दोन्ही घटकांचा समाजीकरण प्रक्रियेवर प्रभाव पडतो. या दोन्ही घटकांचे योगदान या प्रक्रियेला लाभलेले असते. शिस्तीचे संस्कार करणे, आकांक्षा रुजविणे, सामाजिक भूमिका शिकविणे आणि विविध

प्रकारची कौशल्ये शिकविणे ही समाजीकरणाची प्रमुख उद्दिष्टये आहेत. अनुकरण, सूचन, सहानुभूती, तादात्मीकरण, स्पर्धा, भाषाक्षमता या घटकांकडून समाजीकरण प्रक्रियेला चालना मिळते.

या घटकाच्या तिसऱ्या विभागात आपण समाजीकरण प्रक्रियेतील विविध अवस्था आणि त्या त्या अवस्थेतील समाजीकरणाचा मुख्य आशय यांचे अध्ययन केले आहे. एरिक एरिक्सन् यांनी विशद केलेल्या व्यक्तीच्या जीवनचक्रातील आठ अवस्था, त्यातील मनो-सामाजिक संघर्ष आणि महत्त्वपूर्ण सामाजिक संबंध यांचाही आपण थोडक्यात परिचय करून घेतला आहे.

या घटकात आपण समाजीकरणाच्या साधनांचे अध्ययन केले आहे. ज्या ज्या व्यक्ती, समूह वा इतर घटकांकडून समाजाचा सभासद म्हणून जीवन जगण्यासाठी आवश्यक अशा शरीरिक, मानसिक आणि सामाजिक पात्रता आणि कौशल्ये व्यक्तीला शिकविली जातात अशा सर्व घटकांना समाजीकरणाची साधने (Agencies of Socialization) असे म्हटले जाते. समाजीकरणाची साधने म्हणून कुटूंब, शाळा, समवयस्कांचा समूह आणि जनसंपर्क माध्यमे या घटकांच्या समाजीकरणातील भूमिकेचा अभ्यास आपण केला आहे. वरील चार घटकांशिवाय, विविध मंडळे, कार्यालये, राजकीय पक्ष, धार्मिक संघटना आणि राज्यसंस्था हे घटकही व्यक्तीच्या समाजीकरणाची साधने म्हणून महत्त्वपूर्ण योगदान देत असतात याचीही आपण नोंद घेतली आहे.

या घटकात आपण समाजीकरणाचे मानवी सामाजिक जीवनातील महत्त्व समजून घेतले आहे. समाजीकरणाचे महत्त्व त्याच्या सामाजिक जीवनातील कार्यात सामावलेले आहे. समाजाचे सभासद असणाऱ्या व्यक्तींसाठी तसेच समग्र समाजासाठीही समाजीकरण प्रक्रिया काही महत्त्वाची कार्ये पार पाडते. समाजीकरणाचे सामाजिक जीवनातील महत्त्व स्पष्ट करणारे खालील मुद्दे आपण या घटकात अभ्यासले आहेत. (१) समाजीकरणाद्वारे सजीव मानवी प्राण्याचे सामाजिक मानवात रूपांतर घडवून आणले जाते, (२) समाजीकरणात व्यक्तीवर शिस्तीचे संस्कार बिंबविले जातात, (३) समाजीकरणाद्वारे व्यक्तीला विविध प्रकारची कौशल्ये शिकविली जातात, (४) समाजीकरण समाजाचा क्रियाशील सभासद बनण्याची पात्रता व्यक्तीत निर्माण करते, (५) समाजीकरणाद्वारे विविध सामाजिक भूमिका पार पाडण्याची पात्रता व्यक्तीत निर्माण केली जाते, (६) समाजीकरण प्रक्रिया व्यक्तिमत्त्व विकासात महत्त्वपूर्ण योगदान देते, (७) समाजीकरण प्रक्रिया संस्कृतीचे संक्रामण घडवून आणण्यास मदत करते, (८) समाजव्यवस्थेचे सातत्य आणि स्थैर्य टिकवून ठेवण्यात समाजीकरण प्रक्रिया योगदान देते, आणि (९) सामाजिक नियंत्रणाचे प्रभावी साधन म्हणून समाजीकरण प्रक्रिया कार्य ठरते.

## २.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to Check Your Progress)

१. हॅरी जॉन्सन - ''सामाजिक भूमिका पार पाडण्याचे सामर्थ्य शिकणाऱ्याला प्राप्त करून देणारे शिक्षण म्हणजे समाजीकरण होय. समाजीकरणात संस्कृती शिकून घेतली जाते.''

२. समाजाचा क्रियाशील सभासद होण्यासाठी आवश्यक अशी सर्व शारीरिक, मानसिक बौद्धिक आणि सामाजिक कौशल्ये व्यक्ती समाजीकरण प्रक्रियेत शिकून घेते.

३. व्यक्तीच्या दृष्टीने, समाजीकरण प्रक्रियेत व्यक्तीत जिवंत रहाण्याची क्षमता निर्माण केली जाते, इतरांशी आंतरक्रिया करण्याची आणि विविध सामाजिक भूमिका पार पाडण्यासाठी आवश्यक पात्रता आणि कौशल्ये यांचे शिक्षण दिले जाते.

४. समग्र समाजाच्या दृष्टीने, समाज सातत्य आणि सामाजिक स्थैर्य टिकवून ठेवणारी, संस्कृतीचे संक्रामण शक्य होणारी आणि सामाजिक नियंत्रणाचे साधन म्हणून समाजीकरण ही एक अत्यंत महत्त्वाची सामाजिक प्रक्रिया आहे.

५. मानवी अर्भकाचे इतरांवरील प्रदीर्घ परावलंबन आणि सहजप्रवृत्त वर्तनप्रकारांच्या प्राबल्याचा अभाव यामुळे मानवाचे समाजीकरण होणे अत्यावश्यक बाब ठरते.

६. काही जैविक क्षमतांमुळे (उदा. मानवी शरीराची विशिष्ट रचना, उच्च बुद्धिमत्ता, शिकण्याची क्षमता, भाषा क्षमता) मानवी अर्भकाचे समाजीकरण होणे शक्य होते.

७. अनुवांशिक गुणधर्म आणि सामाजिक-सांस्कृतिक परिस्थिती या दोन्ही घटकांचा समाजीकरण प्रक्रियेवर प्रभाव पडतो, या प्रक्रियेला या दोन्ही घटकांचे योगदान लाभते.

८. शिस्तीचे संस्कार करणे, आकांक्षा रुजविणे सामाजिक भूमिकांचे शिक्षण देणे आणि विविध प्रकारची कौशल्ये शिकविणे ही समाजीकरण प्रक्रियेची उद्दिष्ट्ये आहेत.

९. अनुकरण, सूचन, सहानुभूती, तादात्म्यीकरण, स्पर्धा आणि भाषाक्षमता हे समाजीकरणाला चालना देणारे प्रमुख घटक आहेत.

१०. मौखिक अवस्थेत स्वत:च्या शारीरिक गरजांच्या पूर्तीसाठी इतरांचे अवधान वेधून घेण्याचे कौशल्य मूल प्राप्त करते.

११. गुदावस्थेत मूल स्वत: आणि आई यात भेद करण्यास शिकते, या दोन्ही भूमिकांचे आंतरीकरण ते करू शकते त्याचप्रमाणे आईच्या सूचनांना प्रतिसाद देऊन तिच्या अपेक्षांची पूर्ती करण्यासही ते शिकते.

१२. मुलग्याला आईबद्दलचे वाटणारे (लैंगिक) आकर्षण आणि वडिलांविषयी वाटणारी मत्सराची भावना, त्यामुळे निर्माण होणारा अबोध पातळीवरील भावनिक-मानसिक गुंता या स्थितीचा निर्देश करण्यासाठी सिग्मंड फ्रॉईड यांनी 'इडिपस कॉम्प्लेक्स' ही संज्ञा वापरली आहे.

१३. व्यक्तीच्या आयुष्यातील कुमारावस्थेच्या कालखंडाला 'वादळ आणि ताण-तणावाचा कालखंड' अशी संज्ञा वापरली आहे.

१४. एरिक एरिकसन् यांनी जीवनचक्राची संकल्पना मांडताना जीवशास्त्रीय, मानसशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यांचा एकात्मिकरीत्या अवलंब करण्याचा प्रयत्न केला आहे.

१५. कुटूंब हे व्यक्तीच्या जीवनातील समाजीकरणाचे पहिले साधन आहे.

१६. भाषा, विविध सवयी, सामाजिक नियमने, अभिवृत्ती धार्मिक परंपरा, नैतिक तत्त्वे इ. बाबी मूल पालकांकडून शिकते.

१७. कुटूंब आणि शाळा हे समूह त्यांचा आकार, सामाजिक संघटन आणि सामाजिक संबंधांचे स्वरूप या बाबतीत वेगळे असतात त्यामुळे शाळेतील समाजीकरण कुटुंबातील समाजीकरणाहून भिन्न असते.

१८. समवयस्क समूहात (अ) आपल्या बरोबरीच्या वयाच्या व्यक्तींशी कसे वागावे (ब) इतरांच्या चांगले-वाईटाबाबतच्या कल्पना आणि योग्य वर्तन कोणते याबाबतच्या कल्पना शिकण्याची संधी मुलाला मिळते.

१९. जनसंपर्क माध्यमे एकाच वेळी असंख्य लोकांपर्यंत पोहोचतात आणि त्यांच्या विचारपद्धती, मूल्ये आणि अभिवृत्तीना प्रभावित करू शकतात, समाजाच्या संस्कृतीच्या रक्षणाचे किंवा त्यात परिवर्तन घडवून आणण्याचे काम करू शकतात. तसेच विविध विषयांबाबतचे ज्ञान, दृष्टिकोण व मते यांचा प्रसार घडवून आणू शकत असल्याने ती समाजीकरणाची महत्त्वाची साधने ठरतात.

२०. समाजीकरणाची व्यक्तींसाठीची कार्ये पुढीलप्रमाणे : (१) समाजीकरणाद्वारे सजीव मानवी प्राण्याचे सामाजिक मानवात रूपांतर घडवून आणले जाते, (२) समाजीकरणात व्यक्तीवर शिस्तीचे संस्कार बिंबविले जातात, (३) समाजीकरणाद्वारे व्यक्तीला विविध प्रकारची कौशल्ये शिकविली जातात, (४) समाजीकरण समाजाचा क्रियाशील सभासद बनण्याची पात्रता व्यक्तीत निर्माण करते, (५) समाजीकरणाद्वारे विविध सामाजिक भूमिका पार पाडण्याची पात्रता व्यक्तीत निर्माण केली जाते, (६) समाजीकरण प्रक्रिया व्यक्तिमत्त्व विकासात महत्त्वपूर्ण योगदान देते, (७) समाजीकरण प्रक्रिया संस्कृतीचे संक्रमण घडवून आणण्यास मदत करते.

२१. समग्र समाजासाठीची समाजीकरणाची कार्ये पुढीलप्रमाणे : (१) समाजीकरण प्रक्रिया संस्कृतीचे संक्रामण घडवून आणण्यास मदत करते, (२) समाजव्यवस्थेचे सातत्य आणि स्थैर्य टिकवून ठेवण्यात समाजीकरण प्रक्रिया योगदान देते, आणि (३) सामाजिक नियंत्रणाचे प्रभावी साधन म्हणून समाजीकरण प्रक्रिया कार्य ठरते.

## २.५ सरावासाठी प्रश्न / गृहपाठ (Exercise / Home Assignment) :

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१. समाजीकरणाची कोणतीही एक व्याख्या देऊन तिचा अर्थ स्पष्ट करा.

२. समाजीकरण या संज्ञेचा अर्थ आणि स्वरूप यांची चर्चा करा.

३. समाजीकरण प्रक्रियेतील विविध अवस्था स्पष्ट करा.

४. खालील विषयांवर टीपा लिहा.

अ) समाजीकरणाचा अर्थ

ब) समाजीकरणाचे स्वरूप

क) प्रौढ वयातील समाजीकरण

ड) एरिक एरिकसन् यांची ‘जीवनचक्र’ संकल्पना

५. समाजीकरणाच्या विविध साधनांच्या भूमिकेचे वर्णन करा.

६. खालील विषयावर टिपणे तयार करा.

अ) कुटूंब – समाजीकरणाचे एक साधन

ब) शाळा – समाजीकरणाचे एक साधन

क) समाजीकरणातील समवयस्क समूहांची भूमिका

ड) जनसंपर्क माध्यमे – समाजीकरणाचे साधन

७. समाजीकरणाचे मानवी जीवनातील महत्त्व लिहा.

८. खालील विषयांवर टिपणे लिहा.

अ) व्यक्तिगत सामाजिक जीवनातील समाजीकरणाचे महत्त्व

ब) समग्र समाजासाठीचे समाजीकरणाचे महत्त्व

## २.६ **चिंतन आणि कार्य** (Reflection and Action) **:**

कुटुंबातील मुलांच्या विविध क्रियांचे निरीक्षण करा. पालक त्यांना शिस्त लावण्यासाठी पारितोषिके आणि शिक्षा तसेच अनुनय यांचा कसा अवलंब करतात आणि मुले विविध भूमिका पार पाडण्यास कशी शिकतात याविषयी आपल्या निरीक्षणाच्या आधारे एक टिपण तयार करा.

एक आठवडाभर दूरदर्शनवरील विविध कार्यक्रम पहा आणि समाजीकरणाच्या दृष्टीने उपयुक्त अशा कोणकोणत्या प्रकारच्या माहितीचे त्या कार्यक्रमांतून प्रसारण होते यावर एक टिपण तयार करा.

उच्च, मध्यम आणि कनिष्ठ सामाजिक वर्गातील पालक मुलांना शिस्त लावण्यासाठी कोणत्या पद्धतींचा अवलंब करतात याचे समाजीकरणाच्या संदर्भात निरीक्षण करा. मुलांना शिस्त लावण्याबाबत विविध वर्गातील पालकांच्या पद्धतीत महत्त्वपूर्ण फरक दिसून येतात काय? आपल्या निरीक्षणाच्या आधारे टिपण तयार करा.

## २.७ अधिक वाचनासाठीची पुस्तके (Suggested Readings) :


१. साळुंखे सर्जेराव (२००४) : समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना, नरेंद्र प्रकाशन, पुणे.

२. Rawat, H. K. (2007) : Sociology : Basic Concepts, Rawat Publications, Jaipur.

३. Goode W. J. (1977) : Principles of Sociology, Mc Graw Hill Book Co; New York.

४. Dressler David and Willis William M. (1976) : Sociology Alfred Knopf, New York.

५. Shankar Rao, C. N. (2006) : Sociology Principles of Sociology with an introduction to sociological Thought, S. Chand and Co. Ltd., New Delhi.


♦♦♦

# घटक–३
# सामाजिक नियंत्रण
(Social Control)

**घटक–संरचना** (Structure) **:**

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

३.२.१ सामाजिक नियंत्रण : अर्थ आणि स्वरूप

३.२.२ सामाजिक नियंत्रणाची कार्ये

३.२.३ सामाजिक नियंत्रणाचे प्रकार

३.३ सारांश

३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सरावासाठी प्रश्न

३.६ अधिक वाचनासाठीची पुस्तके

## ३.० उद्दिष्ट्ये

१) सामाजिक नियंत्रणाचा अर्थ आणि स्वरूप समजून घेता येईल.

२) सामाजिक नियंत्रणाची कार्ये समजून घेता येतील.

३) सामाजिक नियंत्रणाचे प्रकार समजून घेता येतील.

## ३.१ प्रास्ताविक (Introduction) :

नियमन–व्यवस्थेच्या साहयाने समाजव्यवस्था आणि सामाजिक स्थैर्य राखता येते. नियमनांची व्यवस्था म्हणजे कायदे आणि नियमनांची अशी व्यवस्था की जिचा स्वीकार आणि पालन व्हावे अशी समाजातील सदस्यांची अपेक्षा असते. ज्यावेळी समाजातील बहुतांशी व्यक्ती, समाजाच्या नियमांचे पालन करतात, त्यावेळी समाजात सुव्यवस्था आणि स्थैर्य निर्माण होत असते. समाजाच्या अपेक्षेनुसार किंवा नियमनानुसार जे वर्तन घडून येते त्याला 'अनुचलन' (Conformity) असे म्हणतात. तरीसुद्धा, आपण बऱ्याच वेळा पाहतो की, कोणत्याही समाजातील सर्व व्यक्ती वर्तनविषयक सर्वच नियमनांचे पालन करीत नाहीत. ज्ञान असणाऱ्या

जवळपास सर्वच समाजांमध्ये सामाजिक विचलन या ना त्या स्वरूपामध्ये आढळून येते. काही समाजातील व्यक्ती नियमनाविरूद्ध वर्तन करतात व ज्या अशा व्यक्ती समाजातील नियमनांचे उल्लंघन करतात त्यांना आपण 'विचलित' (deviants) असे म्हणतो. म्हणून सामाजिक अनुचलन आणि सामाजिक विचलन या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. म्हणूनच 'यंग' आणि 'मॅक' यांच्या म्हणण्यानुसार, ''प्रत्येक वेळी नियमनांचे पालन होत नसते किंवा सर्व प्रकारच्या अपेक्षांनुसार व्यक्ती प्रत्येक वेळी अनुचलित वर्तन करू शकत नाही.'' यावरून असे स्पष्ट होते की, सामाजिक विचलन म्हणजे, समूहांच्या नियमनांशी दाखविलेली असहमती किंवा समूहाच्या निठमांचे उल्लंघन होय. या घटकांमध्ये आपण सामाजिक विचलनाचा अर्थ आणि त्याची कारणे याविषयीचा अभ्यास करणार आहोत.

आपल्याला माहितच आहे की प्रत्येक समाजामध्ये सामाजिक नियमने आणि मूल्ये असतात की जी समाजातील व्यक्ती वर्तनाला मागदर्शन करीत असतात. समाजातल्या सर्व व्यक्तींनी नियमने आणि मूल्यांना अनुसरून वर्तन करावे अशी प्रत्येक समाज अपेक्षा करतो. आपल्याला असे आढळून येते की, सर्व व्यक्ती समाजाच्या नियमने आणि मूल्यांना अनुसरून वर्तन करीत नसतात. काही व्यक्ती समाजातल्या नियमनांचे उल्लंघन करतात व जे वर्तन समाजाच्या नियमनांचे उल्लंघन करते त्याला सामाजिक विचलन ही संज्ञा दिली जाते. अशा स्वरूपाचे विचलनात्मक वर्तन तपासणे किंवा त्यावर प्रतिबंध घालण्याची गरज असते. म्हणून सामाजिक नियमने आणि मूल्यांना अनुरूप व्यक्ती वर्तनाला आकार देण्यासाठीची किंवा प्रभावीत करण्याची विशिष्ट साधने अथवा यंत्रणा समाजाजवळ असली पाहिजेत. सामाजिक नियंत्रण ही एक अशी प्रक्रिया आहे की, जिच्याद्वारे व्यक्तीचे समाजाची नियमने आणि मूल्यांनुरूप वर्तन करवून घेण्यासाठी अमलांत आणता येते. या घटनांमध्ये आपण 'सामाजिक नियंत्रण' या संज्ञेचा अर्थ जाणून घेणार आहोत. काही विशिष्ट प्रकारच्या सामाजिक नियंत्रणामुळे व्यवस्थित आणि शांततामय स्वरूपाच्या सामाजिक जीवनाचा आनंद घेणे शक्य असते. जर समाजातल्या प्रत्येक व्यक्तीला तिच्या आवडीप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य दिले तर, समाजात गोंधळाची परिस्थिती निर्माण होऊ शकते. किंबहुना अशा प्रकारच्या स्वातंत्र्यामुळे समाजाचा विनाश होण्याची शक्यता देखील निर्माण होऊ शकते. जर व्यक्तींच्या प्रबळ इच्छा शक्ती आणि कृती नियंत्रित केल्या नाहीत तर त्या विचलनात्मक कृतीकडे वळू शकतात. जर विचलनात्मक वर्तनाची दखल घेतली नाही तर, सामाजिक अस्थिरता आणि अव्यवस्था निर्माण होऊ शकते. अधिक प्रमाणात व्यक्तीला दिलेले स्वातंत्र्य हे समूह कल्याणाला हानीकारक असू शकते. म्हणून समाजामध्ये व्यवस्था आणि स्थैर्य टिकवून ठेवण्याच्या दृष्टीने व्यक्ती वर्तनावर कांही प्रकारचे नियंत्रण असणे गरजेचे असते. समाज काही सामाजिक नियंत्रणाची साधने विकसित करीत असतो. ज्या साधनांच्या आणि प्रक्रियांच्यामुळे समाजातील व्यवस्था आणि सामाजिक संघटन निर्माण करून ते टिकवून ठेवले जाते त्याला सामाजिक नियंत्रण असे म्हणतात.

सामाजिक नियंत्रणाचा अर्थ अभ्यासल्यानंतर, या घटकांमध्ये तुम्ही सामाजिक नियंत्रणाच्या कार्याचा अभ्यास करणार आहात. विविध विचार, प्रवृत्ती आणि हेतू असणाऱ्या अनेक व्यक्ती आणि समूहांचा मिळून समाज बनलेला असतो. जर प्रत्येक व्यक्तीला तिच्या स्वत:च्या इच्छेनुसार वर्तन करण्यासाठी अनिर्बंध स्वरूपाचे स्वातंत्र्य दिले तर, कदाचित त्यामुळे सामाजिक अव्यवस्था निर्माण होऊ शकते. प्रत्येक

समाजामध्ये समाजातील सर्व सदस्यांसाठी सर्वांना समान अशा स्वरूपाच्या सामाजिक नियमने आणि मूल्यांचा स्वत:चा असा एक संच असतो. प्रत्येक समाज विविध प्रकारच्या आंतरिक आणि बहिस्थ स्वरूपाची (उदा. कायदा, शिक्षण, शारीरिक बल, लोकरूढी लोकनिती, रूढी, धर्म इ.). सामाजिक नियंत्रणाची साधने आणि यंत्रणाच्या माध्यमातून अशा सामाजिक नियमने आणि मूल्यांनुसार सदस्यांचे वर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न करीत असतो. व्यवस्थशीर आणि स्थिर अशा समाज जीवनासाठी, सामाजिक नियंत्रणाच्या कोणत्याही प्रकाराद्वारे, समूह अथवा समाजाच्या नियमने आणि मूल्यांप्रमाणे व्यक्तीवर्तन घडून येणे आवश्यक असते. एकूण समाजाच्या दृष्टीने सामाजिक नियंत्रण महत्त्वाची अशी कार्ये पार पाडते. विविध प्रकारच्या समाजिक नियंत्रणातून, सामाजिक अनुचलन, ऐक्य आणि समाजातील व्यक्तीच्या संबंधामध्ये सलोखा निर्माण केला जातो. सामाजिक नियंत्रणाचा मुख्य उद्देश समाजामध्ये सुव्यवस्था प्रस्थापित करून त्याचे स्थैर्य आणि सातत्य टिकवून ठेवणे हा असतो. समाजातील सदस्यांमध्ये ऐक्यभावना आणि समाजामध्ये ऐक्य आणण्याचा प्रयत्न सामाजिक नियंत्रणाद्वारे होत असतो. एकूण समाजाच्या दृष्टीने पार पाडल्या जाणाऱ्या कार्यामध्येच सामाजिक नियंत्रणाचे महत्त्व सामावलेले असते.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ ''सामाजिक विचलन'' : अर्थ आणि स्वरूप

(Meaning and Nature of Social Deviance)

समाजशास्त्रज्ञांनी ज्याप्रमाणे सामाजिक विचलनाच्या व्याख्या देण्याचा प्रयत्न केला आहे, त्याप्रमाणे सामाजिक विचलनाची विविध वैशिष्ट्येही सांगितलेली आहेत. 'सामाजिक विचलन' या संज्ञेचा अर्थ जाणून घेण्यासाठी आपण, समाजशास्त्रज्ञांनी दिलेल्या या संज्ञेच्या काही व्याख्यांचा अभ्यास करणार आहोत.

**'सामाजिक विचलनाच्या' व्याख्या** (Definitions and meaning of "Social Defiance")

१. **हॉर्टन आणि हंट** – ''समाजातील कोणत्याही चालीरीती विषयक नियमनांना सहमती देण्यामध्ये आलेले अपयश म्हणजे 'सामाजिक विचलन' होय.''

   **Horton and Hunt :** "The term deviation is given to any failure to conform to customary norms."

२. **डेव्हिड पॉपेनो** – ''एखाद्या समूहाच्या किंवा समाजाच्या सामाजिक नियमनांचा भंग करणारे वर्तन म्हणजे विचलन होय.''

   **David Popeno** – "Deviance is behaviour that violates the social norms of a group or society."

३. **हॅरी जॉन्सन** – ''विलनात्मक वर्तन म्हणजे केवळ नियमनांचा भंग करणारे वर्तन नव्हे तर कर्ता संबंधित नियमनांशी अभिमुख असूनही तो मुद्दाम त्या नियमनांचा सहेतूक भंग करतो तेव्हा त्याला विचलनात्मक वर्तन म्हणतात.''

**Harry Johnson** – "Deviant behaviour is not merely behaviour that happens to violate a norm, it is behaviour that violates a norm to which the actor is oriented at the time, it is motivated violation."

४. **ड्रेसलर आणि विलिस** – ''वर्तनबद्दलच्या सामाजिक नियमनांहून दिशा किंवा प्रमाण याबाबतीत बऱ्याच प्रगमाणात निराळे असणारे वर्तन म्हणजे विचलनात्मक वर्तन होय.''

**Dressler and Willis** – "Deviant behaviour is behaviour that varies significantly in direction or degree, from social norm for that behaviour."

५. **वॉलेस आणि वॉलेस** – ''ज्या समूहात वर्तन घडून येते त्या सामाजिक समूहाच्या नियमनांचा भंग करणारे वर्तन म्हणजे विचलन होय.''

Wallace and Wallace – "Deviance is behaviour which violates the norms of the social group in which the behaviour occurs."

६. **जी. डंकन मिटचेल** – ''ज्या वर्तनामुळे इतरांच्या अपेक्षा आणि नियमनांचा भंग होतो व ज्या वर्तनाला सामाजिक अमान्यता किंवा शिक्षा मिळते अशा वर्तनासंदर्भात 'विचलन' ही संज्ञा उपयोगात आणली जाते.''

**G. Duncan Mitchell** – "The term 'deviance' is used to refer to behaviour which infringes rules or the expectations of others and which attracts disapproval or punishment."

**'सामाजिक विचलनाचा' अर्थ :**

वरील व्याख्यांच्या आधारे सामाजिक विचलनाचा अर्थ आपणास पुढील मुद्द्यांच्या आधारे सांगता येईल.

**१) सामाजिक विचलन ही एक सापेक्ष संज्ञा आहे** (Social deviance is a relative term) : सामाजिक विचलन ही एक सापेक्ष संज्ञा आहे, असे ज्यावेळी आपण म्हणतो त्यावेळी त्याचा अर्थ 'विचलनात्मक वर्तनाची' व्याख्या मांडण्यासाठीचा निश्चित असा मार्ग नसतो. आणि म्हणून वर्तनासंबंधीची विशिष्ट नियमने किंवा प्रमाणके यांच्या अनुषंगाने विचलनांच्या व्याख्या करता येतात. सामाजिक विचलन हे अनेक अर्थाने सापेक्ष असते.

**अ) विचलनात्मक वर्तन समूह किंवा समाज सापेक्ष असते.** ज्या एखाद्या समाजात एखादी कृती विचलनात्मक समजली जाते, ती कृती दुसऱ्या एखाद्या समाजात विचलनात्मक समजली जातेच असे नाही. वेगळ्या अर्थाने असे म्हणता येईल की, एखाद्या समाजातील सामाजिक विचलनात्मक कृती ही त्या समाजातल्या संस्कृतीवर अवलंबून असते. उदा. 'एखाद्या व्यक्तीची हत्या करणे' हे आपल्या समाजात विचलनात्मक वर्तन होत असले तरी, 'मॅरेज डेज' या आदिम जमातीमध्ये मुलांचे नामकरण व्यक्तीची दुसऱ्या

व्यक्तीकडून हत्या झाल्यानंतर होत असते. त्यामुळे नामकरणासाठी हत्येचे कृत्य विचलनात्मक वर्तन समजले जात नाही.

**ब) विचलनात्मक वर्तनाची व्याख्या कालसापेक्ष असते.** उदा. एखाद्या विविध समाजात शंभर वर्षापूर्वी एखादे वर्तन सामान्य समजले जात असले तर ते आज 'विचलीत' वर्तन समजले जाऊ शकते. भारतामध्ये मध्ययुगीन कालखंडात 'सतीप्रथा' सामान्य वर्तन समजले जात हेते. परंतु आज ते 'विचलनात्मक वर्तन' समजले जाते व कायद्याने अशा वर्तनाला प्रतिबंधदेखील केला आहे. त्याचप्रमाणे एखाद्या विशिष्ट समाजात, कालची एखादी विचलनात्मक कृती ही आज विचलनात्मक असेलच असे नाही. उदा. : अगदी अलिकडच्या काळापर्यंत म्हणजे 'धुम्रपान' ही कृती विचलनात्मक समजली जात होती तोपर्यंत (पाश्चात समाजातही) महिलांनी धुम्रपान आणखी करण्याची कृती समाजात मान्य नव्हती. परंतु आज मोठ्या शहरात महिला ज्यावेळी सिगरेट ओढताना दिसतात, त्यावेळी व्यक्ती त्याकडे दुर्लक्ष करताना दिसतात.

**क) विचलनात्मक वर्तनाचा व्याख्या नियमनाचा भंग करणाऱ्या व्यक्तीच्या सामाजिक स्थान सापेक्ष असते.** दुसऱ्या एखाद्या व्यक्तीची हत्या करणे ही विचलनात्मक कृती आहे. एखाद्या परकीय देशातल्या नागरीकाची सर्वसामान्य व्यक्तीने हत्या केली तर असे कृत्य विचलनात्मक वर्तन समजले जाते आणि तो शिक्षापात्र गुन्हा समजला जातो. परंतु जर कर, एखाद्या शिपायाने सीमारेषेवर शत्रूची हत्या केली तर, असे वर्तन केवळ सामान्य समजले जात नाही तर, त्याला पदक देऊन त्याचा सन्मानदेखील केला जाऊ शकतो.

**ड) विचलनात्मक वर्तनाची व्याख्या परिस्थिती सापेक्ष असते.** एका विशिष्ट परिस्थितीत समजले जाणारे विचलीत वर्तन दुसऱ्या ठिकाणी किंवा परिस्थितीमध्ये सामान्य वर्तन समजले जाऊ शकते. उदा. परीक्षा हॉलमध्ये विद्यार्थ्याला शिक्षकाने उत्तर लिहिण्यासाठी मदत केली तर शिक्षकाच्या दृष्टीने ते विचलनात्मक वर्तन समजले जाते आणि जर का त्याच शिक्षकाने नेहमीच्या वर्गात विद्यार्थ्याला प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी मदत केली तर ते सामान्य वर्तन समजले जाते.

**२) विशिष्ट समूह अथवा समाजाची संस्कृतीवरून विचलनात्मक वर्णनाची व्याख्या होत असते.** संस्कृती आणि संस्कृतीतील बदलांनुसार विचलनात्मक वर्तनांच्या व्याख्यांमध्ये बदल घडून येऊ शकतो.

**३) 'वाईट' स्वरूपाचे वर्तन हेच विचलनात्मक वर्तन असते, असे नव्हे.** सामान्यपणे 'नको असलेले' किंवा 'वाईट स्वरूपाच्या' वर्तनाला विचलनात्मक वर्तन समजले जाते. उदा. खून, चोरी, फसवेगिरी इ.सारख्या कृतींना आपण विचलनात्मक कृती समजतो. अशा कृतीसुद्धा वाईटच असतात. परंतु असे असले तरी, सर्वच विचलनात्मक कृतींना वाईट कृतीं म्हणता येत नाही. काही वेळा, समाजात विचलनात्मक वर्तन चांगले समजले जाते. उदा. समाजातील सर्वसामान्य व्यक्तींच्यापेक्षा साधू, संत असणाऱ्या व्यक्तींचे वर्तन वैशिष्ट्यपूर्ण असते. विचलनात्मक व्याख्येच्या आधारे साधू, संत व्यक्तींचे वर्तन कदाचित विचलनात्मक ठरू शकते. परंतु समाजात असे वर्तन 'वाईट' वर्तन म्हणून समजले जात नाही उलट ते चांगले वर्तन समजले जाते.

## सामाजिक विचलनाची कारणे :

समाजातील सामाजिक विचलनाचा अर्थ आणि प्रकार समजून घेतल्यानंतर सामाजिक विचलनास उत्तेजन देणारी प्रमुख कारणे जाणून घेण्याचा प्रयत्न आपण करणार आहोत. सामाजिक विचलन हे समाजामध्ये अनावश्यक समजले जात असले तरी, सर्व प्रकारच्या समाजामध्ये ते आढळून येते. कोणत्याही समाजातील अत्यंत तीव्र आणि निष्ठूर अशा विचलनात्मक वर्तनाचा परिणाम हा त्या समाजाच्या एकूण परिस्थितीवर होत असतो आणि त्यामुळे समाजातील अस्थैर्य आणि अव्यवस्था वाढत जाते आणि म्हणून, समाजशास्त्रज्ञ विविध प्रश्नांची उत्तरे जाणून घेण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रश्नांच्यामध्ये, व्यक्ती विचलनात्मक वर्तनाकडे का वळतात? व्यक्ती सामाजिक नियमनांच्याप्रमाणे वागण्यात अयशस्वी का होतात या ठिकाणी महत्त्वाची एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, सामाजिक विचलन ही बहुल-कारणात्मक घटना आहे. सामाजिक विचलनाला अनेक प्रकारची कारणे जबाबदार असतात.

वेगवेगळ्या समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक विचलनासंबंधी असणाऱ्या विविध सिद्धांताचे स्पष्टीकरण केले आहे. विचलनात्मक वर्तनासंबंधी काहीनी जीवशास्त्रीय स्वरूपात स्पष्टीकरण दिले आहे. (उदा. लेम्ब्रोसो आणि शेल्डन यांचा 'body-types' चा सिद्धांत) की जो सामाजिक विचलनामध्ये ‘अनुवंशिकता’ या घटकांवर अधिक भर देतो. सामाजिक विचलनासंबंधीचे काही मानसशास्त्रीय सिद्धांत आहेत. (उदा. मनोविश्लेषणात्मक आणि वर्तनात्मक सिद्धांत) की, जे बालपणात आलेले वैशिष्ट्यपूर्ण अनुभव आणि विचलनात्मक वर्तनाला जबाबदार असणाऱ्या कारणांमध्ये पालकांची भूमिका आणि चूकीचे समाजीकरण, यासारख्या घटकांवर भर देतात. विचलनात्मक वर्तनासंबंधीचे काही समाजशास्त्रीय सिद्धांतदेखील आहेत. (उदा. रॉबर्टमर्टन आणि एमिल डरखाईम यांचा प्रमाणक शून्यतेचा सिद्धांत, हेन्रीमॅके आणि क्लिफोर्ड शॉ यांचा संस्कृती  संक्रमणाचा सिद्धांत, एडविन सदरलँड आणि डोनाल्ड क्रंझी यांचा विभेदित साहचर्य सिद्धांत व एडविन लेमर्ट यांच्या संशोधनावर आधारित विचलनाचा लेबलिंग सिद्धांत) व त्यामध्ये विचलनात्मक वर्तनाला जबाबदार असणाऱ्या विविध सामाजिक घटकांवर भर दिला जातो. अशाप्रकारे विचलनात्मक वर्तन ही एक गुंतागुंतीची घटना आहे हे या ठिकाणी स्पष्ट होते आणि त्याला विविध जैविक, मानसिक आणि सामाजिक-सांस्कृतिक घटक जबाबदार असतात. विचलनात्मक वर्तनसंबंधी असणाऱ्या सिद्धांतांचा सविस्तरपणे अभ्यास करण्याऐवजी हॅरी एम. जॉन्सन यांना आढळून आलेल्या विचलनात्मक वर्तनाच्या समाजशास्त्रीय कारणांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करू या. विचलनात्मक वर्तनाची कारणमीमांसा विस्ताराने खाली केली आहे.

### १) **सदोष सामाजीकरण** (Faulty Socialization) :

एकूण समाजरचनेच्या आणि व्यक्तीच्या दृष्टीकोनातून समाजीकरणाची प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची अशी प्रक्रिया आहे. समाज हा त्यामधील सदस्यांच्या परिणामकारक अशा समाजीकरणाद्वारे, समाज-सुव्यवस्था ऐक्य आणि स्थैर्य यांची हमी देतो. समूह अथवा समाजातील वर्तनासंबंधीचे स्वीकृत असे वर्तन मार्ग व्यक्ती समाजीकरण प्रक्रियेच्या माध्यमातून शिकते. वेगळ्या शब्दांत, समाजीकरण ही आपल्या समाजाची मूल्ये

आणि नियमने शिकण्याची प्रक्रिया आहे. समाजीकरणाच्या प्रक्रियेमध्ये, कुटुंब, शिक्षण, धर्म इ.सारख्या विविध संस्थात्मक यंत्रणा महत्त्वाची भूमिका पार पाडतात. असे असले तरी, समाजात जन्माला आलेल्या सर्वच व्यक्तींचे एकचप्रकारे समाजीकरण झालेले नसते. तरीसुद्धा बहुतांशी व्यक्तींचे समाजीकरण झालेले असते. तर काही सदस्यांचे पुरेशा प्रमाणात समाजीकरण झालेले नसते. काही मुलांकडे पालकांनी पुरेसे लक्ष दिलेले नसते आणि मुलांना शिकण्याची संधी मिळालेली नसते. उदा. विस्कळित कुटुंबात जन्माला आलेली मुले, झोपडपट्टयांमध्ये वाढलेली मुले, गुन्हेगारांच्या सहवासात असलेली व ज्यांच्या पालकांची आर्थिक पार्श्वभूमी हलाखीची आहे व ज्यांच्याकडे पालकांचे दुर्लक्ष होते अशा सर्वांना योग्य समाजीकरण आणि नैतिक शिक्षण मिळत नसते. अशा वातावरणात वाढलेल्या मुलांना 'नियमनाविरूद्ध वर्तन करणे म्हणजे गुन्हा नाही' असे वाटू लागते. अशी मुले जुगार, मद्यपान, फसवेगिरी, आणि चोरी, खिसेकापू इ.मध्ये सहभागी असलेली आढळतात आणि हा सदोष समाजीकरणाचा एक मोठा परिणाम असतो. एका अभ्यासात टालकॉट पारसन्स यांना असे आढळून आले की, समाजीकरण प्रक्रियेत आलेल्या अपयशामुळे गुन्हेगारीचे प्रमाण आणि सामाजिक विचलन हे कनिष्ठ वर्गामध्ये अधिक दिसून येते.

२) **कमकुवत सामाजिक नियंत्रण** (Weak Social Control) :

समाजसंमत व्यक्ती वर्तन धडवून आणण्यामध्ये सामाजिक नियंत्रणाची यंत्रणा महत्त्वाची भूमिका पार पाडते. ज्यावेळी सामाजिक नियंत्रण भक्कम आणि योग्यरितीने अंमलात आणलेले असते, त्यावेळी समाजातील सामाजिक नियमने आणि मूल्ये व्यक्तीच्या सामाजिक वर्तनाचे नियंत्रण करून त्यांना सामाजिक विचलन करण्यापासून परावृत्त करतात. सामाजिक नियंत्रणामुळे सामाजिक यंत्रणा प्रस्थापित होत असते व ती व्यक्तीवर बाह्य स्वरूपात प्रभाव टाकते. सामाजिक नियंत्रणाच्या यंत्रणामध्ये (अ) सामाजिक समूहाची नियमने आणि त्यानुसार व्यक्तीचे जे वर्तन घडून येते त्यासाठी विविध स्वरूपाच्या बक्षीसांची केलेली तरतूद, (ब) सामाजिक नियमनांप्रमाणे न वागणाऱ्यांसाठी विविध स्वरूपाच्या शिक्षेची तरतूद जर सामाजिक नियंत्रण कडक असेल तर, सामान्यपणे समाजातील सदस्य, समाजाकडून मिळणाऱ्या शिक्षेच्या भितीमुळे सामाजिक नियमनांचे उल्लंघन करण्याचे धाडस करीत नाहीत असे असले तरी, काही विशिष्ट परिस्थितीमध्ये सामाजिक नियंत्रण कमजोर होत असते. शिक्षेसंबंधीची भीती कमी झाल्याने सामाजिक विचलनास अधिक वाव मिळते. अशाप्रकारे, अपरिणामकारक किंवा प्रभावहीन सामाजिक नियंत्रण किंवा कमजोर सामाजिक नियंत्रणाची व्यवस्था अप्रत्यक्षपणे विचलनात्मक वर्तनाला चालना देते.

३) **कायद्यांची कमकुवत अंमलबजावणी** (Poor enforcement of laws) :

समाजामध्ये विविध प्रकारचे सामाजिक नियंत्रण असू शकते. आदिवासी आणि ग्रामीण समाजासारख्या पारंपारिक समाजांमध्ये विचलनात्मक वर्तनाची तपासणी करण्यासाठी लोकरूढी आणि चालीरिती सारखी उपयुक्त अशी अनौपचारिक स्वरूपाची सामाजिक नियंत्रणाची साधने परिणामकारक स्वरूपाची होती. आधुनिक स्वरूपाच्या औद्योगिक समाज-व्यवस्था या गुंतागुंतीच्या स्वरूपाच्या असून त्या ठिकाणी व्यक्तीचे सामाजिक वर्तन नियंत्रीत करण्यासाठी कायद्याचा अंमल होतो. असे असले तरी त्याचा अंमल योग्यप्रकारे

झाला नाही तर, तो योग्य प्रकारे कार्य करू शकत नाही. बऱ्याच वेळेला, नियम, कायदे आणि नियमने केवळ कागदी घोडे असतात. त्यांचा विचलनात्मक वर्तनाचे नियंत्रण करताना परिणामकारक अशी अंमलबजावणी होत नसते. उदा. कर न भरणे हा गुन्हा आहे, व असे असले तरी, अनेक पगारदार व्यक्ती त्यांचा कर भरण्याचे विसरून जातात. सदरलँड यांनी अशा स्वरूपाच्या गुन्ह्याला 'पांढरपेशीय गुन्हेगारी' असे म्हटले आहे. त्याचप्रमाणे कायद्याच्या कमकुवतपणामुळे अनेक गुन्ह्यांच्या प्रकारात शिक्षाच होत नाही.

**४) विचलनाचे संयुक्तीकरण** (Rationalization of Deviance) :

अनेक विचलनात्मक घटनांच्यामध्ये व्यक्ती क्षमायाचना मागून विसरून जाते. परंतु अशा घटनांच्यामुळे सामाजिक विचलनाला एकप्रकारे प्रोत्साहनच मिळत असते. कारण या ठिकाणी विचलनात्मक वर्तनाचे व्यक्तीने बाह्य किंवा वरवरचे स्वरूपच विचारात घेतलेले असते. विचलनात्मक वर्तन करणारी व्यक्ती क्षमायाचनेसारखा युक्तीवाद करून आपली कृती विचलनात्मक नाही असे दाखविण्याचा प्रयत्न करते. उदा. पोलीस हवालदाराने लाच घेतली असेल (विचलनात्मक कृती) आणि तो अल्पवेतन मिळत असल्यामुळे लाच घेण्याचे समर्थन करीत असेल तर तो त्याचा युक्तीवाद असतो. अशा स्वरूपाच्या विचलनात्मक कृती अनेक असतात की ज्या क्षमायाचनेसारख्या युक्तीवादामुळे त्यांना प्रोत्साहन मिळत असते.

**५) नियमने/ कायदे यांची भ्रष्ट अंमलबजावणी** (Corrupt enforcement of norms/laws)

ज्यावेळी सामाजिक नियंत्रणाच्या साधनांकडून काटेकोरपणे कायदे लागू होत नाहीत, तोपर्यंत त्यांना व्यक्तींच्याकडून चांगला प्रतिसाद किंवा त्याचा आदर केला जात नाही. उदा. व्यक्ती न घाबरता विचलनात्मक वर्तन करतात, कारण त्यांना पोलीस भ्रष्ट असल्याची कल्पना असते आणि लाच दिल्यानंतर त्यांच्याकडून कसलीही अटक अथवा शिक्षा होणार नाही यावरती त्यांचा विश्वास असतो. अनेक वेळा कायद्याचा अंमल करणाऱ्या संघटनांशी गुन्हेगारांचे अनौपचारिक संबंध असल्यामुळे जरी त्यांनी गुन्हा केला तरी, त्यांना अटक होत नसते. उदा. आपल्या देशातील काही राज्यात मोटर सायकलवर बसताना हेल्मेट वापरणे सक्तीचे असले तरी, जोपर्यंत हेल्मेट न वापरणाऱ्यांच्यावर पोलीस गुन्हा नोंद करीत नाहीत तोपर्यंत मोठ्या प्रमाणावर मोटरसायकलस्वार हेल्मेट वापरणार नाहीत.

**६. सुप्त विचलन प्रवृत्ती** (Unconscious deviant tendencies) :

प्रत्येक व्यक्तीदत सुप्त अशी विचलन प्रवृत्ती असते. तथापि काही व्यक्ती त्या प्रवृत्तीस बळी पडत नाहीत. मात्र काही व्यक्तींना संधी मिळाल्यास ती प्रवृत्ती उफाळून येते व त्यांच्याकडून विचलनात्मक वर्तन घडून येते. उदा. एरवी सभ्यपणे वागणारी व्यक्ती अंधारात गर्दीचा फायदा घेऊन चोरी करण्यास प्रवृत्ती होते.

**७. विचलन उपसंस्कृती** (Deviant sub-culture) :

व्यापक संस्कृतीमध्ये आढळून येणाऱ्या काही उपसंस्कृती सामाजिक विचलनास मदत करीत असतात. म्हणजे या ठिकाणी एखाद्या विशिष्टातील व्यक्तींचे विचलनात्मक वर्तन ही त्यांची एक जीवनशैली बनून गेलेली असते. ज्या अनेक समाजशास्त्रज्ञांनी झोपडपट्टीसारख्या भागाचा किंवा कनिष्ठ वर्गातील संस्कृतीचा

अभ्यास केला होता, त्यांना असे आढळून आले की, सामाजिक विचलनाच्या घटना दारिद्र्य व्यक्तींच्यामध्ये सर्वत्र दिसून येतात. उदा. झोपडपट्ट्यांमध्ये असणाऱ्या गुन्हेगारी टोळ्यांची स्वत:ची म्हणून अशी संस्कृती असते, की ज्यामध्ये गुन्हा करणे हे विचलनात्मक वर्तन समजले जात नाही. याउलट त्या समूहातील सदस्यांच्या दृष्टीने ते योग्यच समजले जाते. अशा समूहांमध्ये जी व्यक्ती गुन्हेगारी स्वरूपाची कृत्ये करते तिला नेहमीच सन्मान मिळतो. अशा समूहाच्या संस्कृतीत विचलनाची उप-संस्कृती अशी संज्ञा दिली जाते व विचलनाच्या उप-संस्कृतीच्या प्रभावामुळे विचलनात्मक वर्तन वारंवार वाढतच असते. जर एखादी सर्वसाधारण व्यक्ती अथवा तरूण अशा विचलनात्मक समूहाच्या संपर्कात आले तर तेसुद्धा तशा विचलनात्मक वर्तनामध्ये गुंतले जाण्याची शक्यता असते असे संशोधनातील निष्कर्षावरून स्पष्ट झाले आहे.

**८) विचलनात्मक समूहांशी एकनिष्ठ राहण्याची प्रवृत्ती** (Loyalty to deviant groups) :

ज्यावेळी व्यक्ती विचलनात्मक समूहाची सदस्य होते, त्यावेळी तिला अशा समूहातून बाहेर पडणे कठिण होऊन जाते. तिला समूहाच्या विचलनात्मक कृतींना सहमती आणि पाठिंबा हा द्यावाच लागतो; मग अशा कृतींच्यामध्ये त्या व्यक्तीने यापूर्वी कधीही भाग घेतलेला नसतानासुद्धा सहमती दर्शवावी लागते. अनेकदा, अशा व्यक्ती ज्यावेळी गुन्हेगारी टोळीत जातात. त्यावेळी त्यांना त्या टोळीशी एकनिष्ठ आहोत हे दाखविण्यासाठी विचलनात्मक वर्तन करतात.

**९) पारंपारिक नियमनांची किंवा प्रथांचा पाठिंबा** (Support of customers/traditional norms)

काही वेळा विचलनात्मक कृतींना अशा काही प्रथा आणि नियमनांच्यामुळे प्रोत्साहन मिळत असते की ज्या फार काळ समकालीन समाजासाठी उपयुक्त नसतात. अशा प्रथांना कायद्याने प्रतिबंध असला तरी, व्यक्ती त्यांचे पालन करीत असतात. उदा. काही मंदिरांच्यासमोर प्राण्यांच्या बळी देण्याला कायद्याने प्रतिबंध असला तरी, अनेक भाविक पोलीसांची भीती न बाळगता प्राण्यांची हत्या करू शकतात कारण त्यांना करीत असलेल्या कृत्यांमुळे परमेश्वराचा आशीर्वाद मिळेल असे वाटत असते. भारतात हुंडा देण्या-घेण्याची परंपरा आहे. आज हुंडाबंदीचा कायदा असूनही लोक या परंपरेचे पालन करताना दिसतात.

**१०) गुपित स्वरूपाची उल्लंघने** (Secret Violations) :

काही व्यक्तींच्याकडून गुपित स्वरूपात काही गुन्हेगारी कृत्ये इतर व्यक्तींच्या आणि पोलीसांच्या निदर्शनास येणार नाहीत अशा पद्धतीने केली जातात. उदा. दिल्लीजवळच्या 'नोएडा' भागात दोन श्रीमंत व्यक्तींनी त्यांच्या घरात चाळीसहून अधिक मुलांचे अपहरण करून त्यांची हत्या केली होती. त्यांना जर अटक झाली नसती तर कदाचित त्यांनी त्याहूनही अधिक मुलांची हत्या केली असती.

अशाप्रकारे, सामाजिक विचलनात अनेक कारणे जबाबदार असतात. विचलनामुळे समाजव्यवस्था आणि स्थैर्य यांना धोका निर्माण होतो. समाजजीवनाला अनेक बाजूंनी ते हानीकारक ठरू शकते. म्हणून, प्रत्येक समाज हा त्या समाजातील नियंत्रणात्मक साधनांच्या किंवा सामाजिक नियंत्रणाच्या माध्यमातून

सामाजिक विचलनावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतो व अशी साधने आपण या पुढच्या घटनांमध्ये शिकणार आहोत.

**'सामाजिक नियंत्रणाच्या' निवडक व्याख्या :**

नामवंत समाजशास्त्रज्ञांनी दिलेल्या काही महत्त्वाच्या व्याख्यांचा अभ्यास करूया.

१. **इ.ए. रॉस :** ''समाजाने स्वीकृती केलेल्या वर्तन, प्रतिमानानुसार समाज सदस्यांनी आचरण करावे म्हणून समाजाकडून वापरल्या जाणाऱ्या साधनांची व्यवस्था म्हणजे सामाजिक नियंत्रण होय.''

(**E. R. Ross :** "The system of devices whereby society brings its members into conformity with the accepted standards of behaviour."

२. **ऑगबर्न आणि निमकॉफ** : ''प्रस्थापित नियम व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी समाजाने वापरलेली दबावपद्धती म्हणजे सामाजिक नियंत्रण होय.''

(**Ogburn and Nimkoff :** "The pattern of pressure which a society exerts to maintain order and establish rules.")

३. **लॅंडिस पी. एस.** : ''ज्या प्रक्रियेद्वारा समाजात व्यवस्था प्रस्थापित केली जाते आणि ती टिकवून ठेवली जाते त्या प्रक्रियेला सामाजिक नियंत्रण असे म्हणतात.''

(**Landis P. H. :** "Social control is the process by which order is established and maintained in the society.")

४. **लमले** : ''ज्या सामाजिक प्रक्रियेद्वारे व्यक्तीला समूहाचा जबाबदार घटक म्हणून तयार केले जाते व सामाजिक संघटनेची उभारणी करून ती टिकवली जाते, त्या प्रक्रियेला सामाजिक नियंत्रण असे म्हणतात.''

(**Lumley :** "Social control is a social process by which the individual is made group-responsive and by which social organization is built and maintained."

५. **मॅनहीम :** ''अशा पद्धतींची गोळा बेरीज की ज्या द्वारे समाज व्यक्ती वर्तनावर प्रभव टाकून ज़्श्र्प्द्ज समाजव्यवस्था टिकविण्याचा प्रयत्न करीत असतो. त्याला सामाजिक नियंत्रण असे म्हणतात.''

(**Manheim :** "Social control is the sum of those methods by which a society tries to influence human behaviour to maintain a given order.")

६. **शेपर्ड, ओडोम आणि ब्रुटन :** ''व्यक्तींना नियमनांचे अनुसरण करण्यास (नियमनांनुसार वागण्यास) भाग पाडणारी प्रक्रिया म्हणजे सामाजिक नियंत्रण होय.''

(**Shepard, Odom and Bruton :** "Social control is the process of constraining persons to conform to norms."

७. **ड्रेसलर आणि विलिस :** ''संस्कृती मान्य रितीने किंवा संस्कृतीने परिभाषित केलेल्या पद्धतीने, वागण्यास व्यक्तींना प्रोत्साहित करणारी शक्ती म्हणजे सामाजिक नियंत्रण होय.''

(**Dressler and Willis :** "Social control is the force that encourages the individuals to behave in a culturally defined, approved manner.")

८. **गिलिन आणि गिलिन** : ''समाज आपल्या एखाद्या उपसमूहाला किंवा समूह आपल्या सभासदांना समाजमान्य वर्तन प्रकारांना अनुरूप असे वर्तन करण्यास भाग पाडण्यासाठी सूचन अनुनय निर्बंध आणि शारीरिक शक्तीसह कोणत्याही साधनांचा अवलंब करून जबरदस्ती करतो, अशा उपायांच्या व्यवस्थेला सामाजिक नियंत्रण असे म्हणतात.''

(**Gillin and Gillin :** "Social control is that system of measures-suggestion, persuasion, restraint and coercion by whatever means including physical force by which society brings into conformity to the approved pattern of behaviour a sub-group or by which a group moulds into conformity its members.")

९. **वॉलेस आणि वॉलेस :** ''ज्या साधनांद्धारे समाजाचे सभासद समाजाची नियमने पाळावीत म्हणून एकमेकांना उद्युक्त करण्याचा प्रयत्न करतात त्याला सामाजिक नियंत्रण असे म्हणतात.''

(**Wallace and Wallace :** "Social control is the means by which members of a society attempt to induce each other to comply with the society's norms.")

वरील व्याख्यांच्या काळजीपूर्वक अभ्यासानंतर असे स्पष्ट होते की, विविध समाजशास्त्रज्ञांनी वेगवेगळ्या पद्धतीने सामाजिक नियंत्रणाच्या व्याख्या केल्या आहेत. तरी देखील, वरील व्याख्यांच्या मधून आलेले प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

१. समूह अथवा समाजाचे संस्कृतीमान्य रितीने किंवा संस्कृतीने परिभाषित समूहातील सदस्यांचे वर्तन प्रभावित होण्यासाठी सामाजिक नियंत्रण ही संज्ञा, एक प्रक्रिया, साधन, उपायात्मक व्यवस्था, पद्धती, प्रोत्साहित करणारी म्हणून संदर्भ दिला जातो व तशा स्वरूपाचा अर्थ व्याख्येतून प्रकट होतो. समूह अथवा समाजाच्या नियमने किंवा संस्कृतीमान्य रितीने समूह अथवा समाजातील व्यक्तीचे वर्तन प्रभावित करणारी प्रक्रिया म्हणजे सामाजिक नियंत्रण होय.

२. वरील व्याख्या सामाजिक नियंत्रणाच्या उद्दिष्टांवर देखील अधिक भर देतात. समाजव्यवस्था आणि सामाजिक संघटन निर्माण करून ते टिकवून ठेवणे आणि सामाजिक नियमनांच्याप्रमाणे व्यक्ती वर्तन घडवून आणण्यासाठी त्यांच्यावर दबाव आणणे ही सर्व सामाजिक नियंत्रणाची उद्दिष्टे आहेत.

३. सामाजिक नियंत्रण ही एक प्रक्रिया आहे असे त्यांच्या व्याख्यांतून निर्देशीत होते. सामाजिक नियंत्रण ही समूह अथवा समाजामध्ये सातत्याने घडून येणारी प्रक्रिया आहे आणि व्यक्तीच्या आयुष्यामध्ये देखील ती असते.

**सामाजिक नियंत्रणाचा अर्थ आणि स्वरुप** (The Meaning and Nature of Social Control):

वरील व्याख्यांवरून आपणास, सामाजिक नियंत्रणा विषयीची थोडीफार कल्पना आलीच आहे. आता आपण, अशा कांही मुद्यांचे विश्लेषण करू की ज्यामुळे आपणास, सामाजिक नियंत्रणाचा अर्थ स्पष्ट होण्यास मदत होईल.

१. **सामाजिक नियंत्रण सार्वत्रिक, सातत्यपूर्ण आणि व्यापक स्वरूपाची प्रक्रिया आहे.** (Social control is Universal, Continuous and Pervasive Process)

याचा अर्थ, सामाजिक नियंत्रणाचे अस्तित्व सर्व काळी आणि समाजातल्या सर्व प्रकारच्या समूहांमध्ये आढळून येते. सामाजिक नियंत्रण सर्व प्रकारच्या प्रगत सभ्य समाजामध्ये देखील पहावयास मिळते. अशा प्रकारे ती एक सातत्यपूर्ण स्वरूपाची प्रक्रिया आहे. लोकरूढी, नियमने, मूल्ये नियम, कायदे इ. सारख्या सामाजिक नियंत्रणाच्या साधनांच्यामध्ये, वारंवार होत आलेला बदल म्हणजेच ती एक सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे. सामाजिक नियंत्रणाचे स्वरूप व्यापक आहे याचा अर्थ, कोणत्याही समाजाअंतर्गत असणाऱ्या सर्व प्रकारच्या समूहातील सर्व व्यक्ती या सामाजिक नियंत्रणाच्या यंत्रणेमुळे अथवा त्यांच्या साधनांच्यामुळे प्रकाशित झालेल्या असतात. अशाच पद्धतीने, सामाजिक नियंत्रणाच्या यंत्रणा, व्यकतीचे बालपासून ते मृत्युपर्यंतचे सामाजिक वर्तन प्रभावित करतात.

२. **सामाजिक नियंत्रणामध्ये समूह आणि व्यक्तींच्या वर्तनावर असणाऱ्या समाजाच्या प्रभावाचा किंवा नियंत्रणाचा समावेश होतो.** (Social control involves influence or control of society over behaviour of individuals and groups)

तर समाजातील सदस्यांमधील परस्पर संबंध सलोख्याचे व सहकार्याचे तसेच समाजाच्या अपेक्षांप्रमाणे असतील तर, समाज टिकू शकतो. कारण मनुष्याच्या ठिकाणी अनेक स्वार्थी प्रवृत्ती आणि अनियंत्रित अशा इच्छा आकांक्षा असतात, की ज्या तो समाजातील इतर सदस्यांच्या बदल्यात पूर्ण करणार असतो, आणि त्यामुळे सदस्यांमधील सलोख्याचे आणि सहकार्याचे संबंध आपोआपच समाजात उदयास येणारे नसतात. समाजात सदस्याच्या हिताच्या दृष्टीने त्यांच्यामधील सलोख्याचे संबंध आणि सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावा लागतो. समाजामध्ये व्यक्ती आणि समूहांच्या स्वार्थी प्रवृत्ती अनियंत्रित इच्छा- आकांक्षाचे नियंत्रण करण्यासाठी त्यांच्यावर परिणामकारकपणे कारवाई करण्यासाठी सामाजिक नियंत्रणाची यंत्रणा वापरली जाते. म्हणून, सामाजिक नियंत्रणामध्ये समूह आणि व्यक्तीच्या सामाजिक वर्तनावर असणाऱ्या समाजाचा प्रभाव आणि नियंत्रण यांचा समावेश होतो. या ठिकाणी हे महत्त्वाचे आहे की, सामाजिक नियंत्रणाची साधने, यंत्रणा ही व्यक्तीने निर्माण केली नसून शेवटी ती, समाजाने निर्माण केलेली साधने असतात.

३. **सामाजिक नियंत्रण म्हणजे, अनुचलनात्मक वर्तन घडवून आणणारी यंत्रणा आहे.** (Social control refers to the mechanisms of encorcing conformity)

समाजाच्या अपेक्षा किंवा नियमने व मूल्ये यांना अनुसरून समाजातील समूह अथवा व्यक्तींचे होणारे वर्तन म्हणजे समाजमान्य वर्तन होय. समूह अथवा समाजाने याची खात्री करून घेतली पाहिजे की, त्यांचे

सदस्य सामाजिक नियमनांप्रमाणे वर्तन करतात की नाही व त्यासाठी म्हणून सामाजिक नियंत्रणाची यंत्रणा ही सामाजिक नियंत्रण लादण्याचा प्रयत्न करते. सामाजिक नियंत्रणाची यंत्रणा म्हणजे, सामाजिक नियमने आणि मूल्यांप्रमाणे व्यक्ती वर्तन घडून येण्यासाठी, सर्वप्रकारच्या समाजाकडून अथवा समूहांकडून उपयोगात आणली जाणारी साधने होय. सक्तीने समाजमान्य वर्तन घडवून आणण्यासाठीची यंत्रणा म्हणजे सामाजिक नियंत्रण होय.

४. **अंतर्गत आणि बाह्य यंत्रणांच्या माध्यमातून सामाजिक नियंत्रण साध्य होते**. (Social control is achieved through the internal and external mechanisms)

टिशलेर, व्हायटन, आणि हंटर, शेपर्ड, ओडोम आणि ब्रुटन यासारख्या समाजशास्त्रज्ञांच्या मते, समाजामध्ये सामाजिक नियंत्रणाची दोन प्रकारची यंत्रणा समाजात आढळून येते, ती म्हणजे 'अंतर्गत' आणि 'बाह्य'. टिशलेर आणि इतरांच्या मते, सामाजिक नियंत्रणाची अंतर्गत साधने म्हणजे अशी की, जी मानसशास्त्रीय स्वरुपाची असून ती इतरांच्या प्रतिक्रियांचा अभाव असतानादेखील व्यक्तीवर कार्य करीत असतात. सामाजीकरणाच्या प्रक्रियेतून नियमने, मूल्ये, चूक आणि बरोबर किंवा चांगल्या-वाईटाच्या संबंधीचे आंतरीकरण व्यक्तीकडून होत असते. त्यावेळी अशा प्रतीचे अपेक्षित वर्तन व्यक्ती शिकून त्याचे आंतरीकरण होत असते. त्यावेळी व्यक्तीमधूनच तिचा स्वत:वर प्रभाव आणि वर्तनावर नियंत्रण होत असते. सामाजिक नियंत्रणाची अंतर्गत साधने सामाजीकरणाच्या प्रक्रियेतून येत असतात. जी. एच. मीड यांची संकल्पना (मीड यांनी 'स्व' चे 'I' आणि 'Me' दोन भाग कल्पिले आहेत). आणि सिग्मंड फाईड यांची संकल्पना (फ्राईड यांनी 'Id', 'ego', आणि 'superego' असे तीन भाग कल्पिले आहेत) यांना सामाजिक नियंत्रणाची अंतर्गत साधने म्हणू शकतो.

समाज अथवा समूहाला अपेक्षित असणारे व्यक्तीवर्तन घडवून आणण्यासाठी, व्यक्तीच्या बाह्य स्वरूपात असणाऱ्या सामाजिक शक्तींना सामाजिक नियंत्रणाची बाह्य साधने अशी संज्ञा दिली जाते. विविध स्वरूपाच्या सामाजिक अनुज्ञा (social sanctions) (म्हणजेच नियमनांना किंवा मूल्यांना अनुसरून वर्तन केल्याबद्दल दिली जाणारी पारितोषिके आणि नियमनांचे उल्लंघन केल्याबद्दल दिली जाणारी शिक्षा) ही सर्व सामाजिक नियंत्रणाची बाह्य साधने आहेत. सामाजिक अनुज्ञाचे दोन मुख्य प्रकार आहेत. सकारात्मक अनुज्ञा आणि नकारात्मक अनुज्ञा. त्यानंतर या दोन मुख्य प्रकारांचे 'औपचारिक अनुज्ञा' आणि 'अनौपचारिक अनुज्ञा' असे प्रकार पडतात.

५. **विविध साधनांच्या माध्यमातून सामाजिक नियंत्रणाचा वापर होतो**

(Social control is exercised through variety of means)

सामाजिक नियंत्रणाची अनेक प्रकारची विविध साधने आहेत. वेगवेगळ्या समाजशास्त्रज्ञांनी वेगवेगळी सामाजिक नियंत्रणाची साधने सांगितली आहेत. इ. ए. रॉस यांच्या मते, लोकमत, कायदे, चालिरिती, धर्म, नितिमत्ता, सामाजिक उपाय, लोकरूढी आणि लोकनितीचा समावेश होतो. इ.सी. हाईसच्या मते, सामाजिक अनुज्ञा (पारितोषिके आणि शिक्षा), उपाय, अनुकरण आणि शिक्षण ही सर्व महत्त्वाची सामाजिक नियंत्रणाची

साधने आहेत. एफ. ई. लुमले यांनी सांकेतिक योजना पध्द्धतींच्या सामाजिक नियंत्रणांच्या साधनांवर अधिक भर दिला आहे. गिलिन आणि गिलिन यांच्या मते, सूचन, अनुनय, निर्बंध आणि शारीरिक शक्तीसह कोणत्याही साधनांची जबरदस्ती, इ.सारख्या साधनांचा सामाजिक नियंत्रणामध्ये समावेश होतो.

६. **सामाजिक नियंत्रणाच्या प्रक्रियेमध्ये शारीरिक शक्ती किंवा दबावतंत्राचा उपयोग होतो**

(Social control is exercised through variety of means)

सामाजिक नियमनांना अनुसरून व्यक्ती वर्तन घडवून आणण्यामध्ये ज्या वेळी अंतर्गत सामाजिक नियंत्रणाची साधने प्रभावी ठरत नाहीत त्यावेळी बाह्यशक्तीची किंवा जबरदस्ती करणारी सामाजिक नियंत्रणाची साधने उपयोगात आणून समाजमान्य व्यक्ती वर्तन घडवून आणले जाते. बाह्यशक्ती किंवा जबरदस्ती करून व्यक्तीला बेकायदेशीर, समाजबाह्य स्वरूपाच्या कृती करण्यापासून परावृत्त केले जाते. उदा. चेहऱ्यावर नाराजी प्रकट करणे, टीका करणे, सामाजिक जीवनापासून वंचित ठेवणे (उदा. गुन्ह्यासारख्या कृत्यासाठी तुरूंगात ठेवणे), दंड करणे, शिक्षेची भिती इ.सारख्या बाह्य शक्तींचा उपयोग व्यक्तीचे वर्तन सामाजिक नियमनांनुसार घडवून आणण्यासाठी केला जातो.

७. **सामाजिक नियंत्रण सहेतूक असते** (Social control is purposive) :

सामान्यता, सामाजिक नियंत्रण कोणत्याही हेतूशिवाय असत नाही. सामाजिक नियंत्रण विविध कारणांसाठी उपयोगी ठरते. सामाजिक नियंत्रणाची साधने आणि योजनापद्धतीमध्ये (अ) समूह अथवा समाजाच्या नियमने आणि मूल्यांनुसार समाजमान्य वर्तन घडवून आणणे. (ब) समाजव्यवस्था निर्माण करून ती टिकवणे. (क) सामाजिक ऐक्य निर्माण करून ते टिकवणे. (ड) विचलनामुळे विघटन निर्माण होण्याची जी शक्यता असते त्याला प्रतिबंध करण्यासाठी सामाजिक संघटनांचे सातत्य टिकवून ठेवण्याची हमी देणे. (इ) सामाजिक नियंत्रण समूहातील सदस्यांच्या कल्याणासाठी चालना देऊन त्यांना शांतताप्रिय सामाजिक जीवनाची हमी देणे इत्यादींचा समावेश होतो.

## ३.२.२ सामाजिक नियंत्रणाची कार्ये

(Presentation of Subject Matter : Functions of Social Control)

सामाजिक नियंत्रणाची कार्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील-

समाजशास्त्रामध्ये 'कार्य' ही संज्ञा एका विशिष्ट अर्थाने उपयोगात आणली जाते. हॅरी जॉन्सन याच्या मते, ''समाज-व्यवस्था किंवा तिच्या उप-व्यवस्थेच्या एक किंवा अनेक गरजा पूर्ण करण्यासाठीची कोणतीही आंशिक संरचना-एखाद्या प्रकारचा उपसमूह, एखादी भूमिका, एखादे सामाजिक नियमन किंवा एखादे सांस्कृतिक मूल्य काही योगदान देत असेल तर त्याला आंशिक संरचनेचे प्रकार्य असे म्हणतात.'' डरखिमच्या मतानुसार, 'जैविक समाजाच्या गरजा आणि सामाजिक संस्थांच्या कार्यामधील परस्पर संबंध होय.' मर्टन यांच्या मते, ''प्रकार्य म्हणजे असे निरीक्षित परिणाम की जे विशिष्ट व्यवस्थेच्या अभियोजनासाठी किंवा समायोजनासाठी योगदान देतात.'' समाज-व्यवस्थेचे अस्तित्व, सामाजिक ऐक्य आणि सामाजिक

स्थैर्य या समाजाच्या प्रमुख गरजा आहेत व अशा गरजांची पूर्तता सामाजिक नियंत्रणाच्या यंत्रणेकडून होत असते. सामाजिक नियमने, मूल्ये, श्रद्धा यासारख्या विविध सामाजिक नियंत्रणाच्या साधनाद्वारे सामाजिक नियंत्रणाचा वापर करता येतो यासंबंधीची माहिती आपण अगोदरच घेतली आहे. अशा योजना पद्धतींच्यामध्ये संरचना किंवा संख्यात्मक यंत्रणाचा समावेश होतो आणि त्याच्या साहयाने समाजात अपेक्षित असणाऱ्या वर्तनाची हमी देता येते. सामाजिक व्यवस्था आणि तिचे अस्तित्व आणि सामाजिक समायोजनासाठी अशी सामाजिक नियंत्रणाची यंत्रणा सकारात्मकपणे योगदान करीत असते. अशा रितीने, एकूण समाज रचनेच्या किंवा त्या समाजाच्या घटकांसाठी सामाजिक नियंत्रणाची यंत्रणा विशिष्ट स्वरूपाची कार्ये पार पाडीत असते. सामाजिक नियंत्रणाची काही महत्त्वाची कार्ये जाणून धेवूया. सामाजिक नियंत्रणाची काही महत्त्वाची कार्ये खालीलप्रमाणे आहेत -

**१. समूहाची नियमने आणि मूल्ये यांच्या अनुरूप वर्तन करण्यासाठी सदस्यांना तयार करणे :**

(To make the members to conform to norms and values of the group)

समूहातील सदस्यांनी समूहाच्या अपेक्षा आणि समूहाच्या नियमने आणि मूल्यांप्रमाणे वागले पाहिजे आणि हे समूहाची व्यवस्था, स्थैर्य आणि सातत्य टिकून राहण्याच्या दृष्टीने अत्यंत गरजेचे असते आणि त्यासाठी त्यांचे वर्तन नियंत्रीत होणे गरजेचे असते. सामाजिक अनुचलन घडवून आणण्यासाठी व्यक्तीचे वर्तन सामाजिक नियंत्रण नियंत्रित करते. जर मानवी वर्तन नियंत्रित केले नाही तर त्यामुळे गोंधळ निर्माण होऊ शकतो त्यालाच आपण नेहमी 'जंगलराज' असे संबोधतो. जर समाजामध्ये सामाजिक नियंत्रण अस्तित्वात असेल तर त्यामुळे सामाजिक वर्तनामध्ये एकवाक्यता येऊ शकते. समूहाने स्वीकृत केलेल्या नियमनांच्या प्रमाणे व्यक्तीचे वर्तन घडवून आणता येऊ शकते. विल्यम पी. स्कॉट यांच्या मतानुसार, सामाजिक समूहाच्या अपेक्षानुसार घडून येणाऱ्या वर्तनास सामाजिक अनुचलन असे म्हणतात. सामाजिक अनुचलन हे सामाजिक नियंत्रणाचे ध्येय असते. व्यक्ती ज्या समूहाची सदस्य असते त्या समूहाची नियमने आणि मूल्ये यांना अनुसरून असणारे वर्तन सामाजिक नियंत्रणाच्या विविध यंत्रणातून घडवून आणता येते. अशाप्रकारे सामाजिक नियंत्रणामुळे समूहाच्या सध्या प्रचलित असणाऱ्या नियमने आणि मूल्यांना अनुसरून व्यक्ती वर्तन करत असतात.

**२. सामाजिक सुव्यवस्था निर्माण करणे आणि ती टिकवणे**

(To create and maintain the social order)

अस्तित्वात असणारी समाजव्यवस्था निर्माण करणे आणि ती टिकवणे हे सामाजिक नियंत्रणाचे महत्त्वाचे कार्य आहे. समाजातील सर्व सदस्यांना समान अशा नियमने आणि मूल्यांचा संच असतो आणि तो समाजव्यवस्थेचा पाया असतो. सामाजिक नियंत्रणाची यंत्रणा सदस्यांचे वर्तन सामाजिक नियमने आणि मूल्यांना अनुसरून घडवून आणण्याची हमी देते. अशा रितीने, समाजनुरूप वर्तन घडवून आणण्यासाठी सदस्यांचा अनुनय करून अथवा शारीरिकबलाचा उपयोग करून समाजात सुव्यवस्था निर्माण करण्याचे आणि ती टिकवण्याचे कार्य सामाजिक नियंत्रण करीत असते.

असे असले तरी, समाज हा गतीशील स्वरूपाचा असतो हे उघड आहे. समाज हा ढ़ज्ञ बदलत असतो. तथापि, सामाजिक नियंत्रणेच्या यंत्रणेमुळे अस्तित्वात असणाऱ्या समाजव्यवस्थेला अधिक अडथळा होणार नाही अशा दृष्टीने हळूवारपणे सामाजिक परिवर्तनदेखील घडून येत असते. सामाजिक नियंत्रणाच्या यंत्रणेमुळे व्यक्तीला सामाजिक परिवर्तन आणि त्यातून निर्माण होणाऱ्या समाजव्यवस्थेशी समायोजन करण्यासाठीचा पुरेसा अवधी मिळतो. त्यावेळी विशिष्ट परिस्थितीमध्ये समाजात अतिशय वेगाने बदल घडवून येत असतो. त्यावेळी सामाजिक नियंत्रण त्यावर आवर घालण्याचा प्रयत्न करते. वेगाने घडून येणाऱ्या बदलांचा वेग कमी करत असते. अशाप्रकारे, समाजव्यवस्था आणि तिचे सातत्य टिकवून ठेवले जाते.

### ३. सामाजिक एकात्मता किंवा एकता निर्माण करणे

(To create social integration or social unity)

समाज हा अनेक समूह आणि उपसमूहांचा मिळून बनलेला असतो. आणि अशा समूह आणि उपसमूहांचे वैशिष्ट्यपूर्ण असे सांस्कृतिक गुणधर्म असतात. विविध सांस्कृतिक परंपरा असणाऱ्या विविध समूह आणि उपसमूहांचे एकत्रित अस्तित्व हे सामाजिक जीवनातील एकतेचे मूलतत्त्व आहे. समाजातील सर्व सदस्यांची विविध प्रकारच्या परंपरा आणि सामाजिक वर्णनाच्या पद्धती असतानासुद्धा, समूहाने मान्य केलेल्या समान अशा नियमनांच्या आणि नियमांच्याप्रमाणे त्यांना वर्तन करावेच लागते. समाजानुरूप वर्तन घडवून आणण्यासाठी सामाजिक नियंत्रण व्यक्ती वर्तन नियंत्रित करते हे आपण या अगोदर पाहिलेच आहे. सामाजिक नियंत्रणाद्वारेच केवळ सामाजिक एकात्मता घडवून आणली जाऊ शकते. सामाजिक नियंत्रणाची यंत्रणा अशा प्रकारे कार्य करत असते की, त्यामुळे समाजातील सदस्यांच्या वर्तनाला दिशा प्राप्त होते. तसेच समाजाची समान अशी नियमने आणि मूल्ये यांच्याप्रमाणे होणाऱ्या वर्तनातून ते कार्य करत असल्याचे दिसते. सदस्यांच्या वर्तन प्रकारातून त्याची फलश्रुती दिसून येत असते. वेगळ्या अर्थाने सामाजिक नियंत्रण सदस्यांच्या वर्तनामध्ये एकसूत्रीपणा आणते आणि समाजातील एकात्मतेला चालना देते.

### ४. समाजाचे सातत्य आणि स्थैर्य टिकवून ठेवणे

(To maintain continuity and stability of society)

सामाजिक नियंत्रणाच्या प्रभावशीलतेवर समाजाचे अस्तीत्व अवलंबून असते. जर सामाजिक नियंत्रणाची यंत्रणा व्यक्तीचे समाजानुरूप वर्तन घडवून आणण्यामध्ये अयशस्वी झाली तर, समाजामध्ये अव्यवस्था निर्माण होऊन, समाजरचना मोडकळीस येईल. अशा अराजकता निर्माण झालेल्या अवस्थेत समाजाला स्थैर्य टिकवून ठेवणे अवघड असते आणि म्हणून समाजव्यवस्थेचे सातत्य आणि स्थैर्य टिकवून ठेवणे हे सामाजिक नियंत्रणाचे जसे एक वैशिष्ट्य समजले जाते तसेच ते सामाजिक नियंत्रणाचे एक कार्य म्हणून देखील ओळखले जाते.

### ५. सामाजिक अनुज्ञाद्वारे सामाजिक विचलनाची तपासणी :

(To check social deviance through social sanctions)

सामाजिक अनुज्ञाद्वारे सामाजिक विचलनाची तपासणी करणे हे एक सामाजिक नियंत्रणाचे दुसरे कार्य आहे. प्रभावी स्वरूपाचे सामाजीकरण हे एक सामाजिक नियंत्रणाचे महत्त्वाचे साधन आहे. सामाजीकरणाच्या माध्यमातून समूह अथवा समाजामध्ये अस्तित्वात असणारे नैतिक नियम, मूल्ये आणि सामाजिक नियमने व्यक्ती शिकत असते. आणि ज्यावेळी अशा गोष्टींचे आंतरीकरण होते याचा अर्थ, सामाजिक नियंत्रण आणि सामाजिक विचलन यांचे प्रभावीपणे मोजमाप घेता येते. आदिवासीसारख्या साध्या समाजामध्ये, सामाजीकरण हे सामाजिक नियंत्रणाचे एक प्रभावी माध्यम असते. परंतु आधुनिक अशा व्यापक आणि गुंतागुंतीच्या समाजव्यवस्थांच्यामध्ये समाजीकरणाबरोबरच बाह्य स्वरूपाची सामाजिक नियंत्रणाची साधने व्यक्ती आणि समूहाचे सामाजिक विचलन तपासून पहाण्यासाठी जास्त गरजेची असतात.

सामाजिक अनुज्ञा हे सामाजिक नियंत्रणाचीच एक यंत्रणा असून ती व्यक्तीबाह्य स्वरूपाची असते. रॉबर्ट ब्रिस्टेड यांच्या मते, ''सामाजिक नियमनांचा आधार म्हणजे सामाजिक अनुज्ञा असतात व ज्या व्यक्ती सामाजिक अनुज्ञाप्रमाणे वर्तन करत नाहीत त्यांना शिक्षा होते व जे त्याप्रमाणे वर्तन करतात त्यांना योग्य ते बक्षीस दिले जाते.'' डंकन मिटचेल म्हणतात, ''सामाजिक अनुज्ञा हे कायदा लादण्याचे साधन असून त्याचे स्वरूप सकारात्मक अथवा नकारात्मक असू शकते. याचाच अर्थ, ते बक्षीसाच्या किंवा शिक्षेच्या स्वरूपात असू शकते.''

अशा पद्धतीने, सामाजिक अनुज्ञेचे स्वरूप सकारात्मक किंवा नकारात्मक स्वरूपाचे असू शकते हे या ठिकाणी स्पष्ट होते. सकारात्मक स्वरूपाच्या सामाजिक अनुज्ञेमध्ये अनेक स्वरूपाच्या बक्षीसांचा समावेश होता. (उदा. समाधान व्यक्त करणे, शाबासकी देणे, अभिनंदन करणे, चांगल्या वर्तनाबद्दल सन्मान अथवा किताब देणे). समूह अथवा समाजाच्या सामाजिक नियमने आणि मूल्यांप्रमाणे वर्तन करणाऱ्या व्यक्तींना सकारात्मक अनुज्ञा दिली जाते. समूह अथवा समाजाच्या अपेक्षेप्रमाणे वर्तन घडून यावे या दृष्टीने व्यक्तीला प्रोत्साहन देण्याचे काम सकारात्मक अनुज्ञाद्वारे होत असते. म्हणून, सामाजिकदृष्ट्या योग्य असणारे वर्तन सकारात्मक अनुज्ञेद्वारे व्यक्तीवर लादलेले असते. नकारात्मक अनुज्ञांच्यामध्ये विविध प्रकारच्या शिक्षा (उदा. असमाधान व्यक्त करणे, टीका करणे, विशिष्ट फायद्यांच्यापासून दूर ठेवणे, शारीरिक स्वरूपाच्या शिक्षा, तुरूंगवास इ.) चा समावेश होतो. समाज अथवा समूहाच्या मूल्य आणि नियमनांनुसार वर्तन घडून न आल्यास नकारात्मक अनुज्ञांचा वापर केला जातो. प्रभावी स्वरूपात नकारात्मक अनुज्ञांचा वापर केल्याने समाजातील व्यक्ती नियमने आणि मूल्यांच्या विरूद्ध वर्तन करणार नाहीत याची खात्री असते. समाजामध्ये व्यक्तीला मिळणारे किताब अथवा शिक्षा या औपचारिक आणि अनौपचारिक स्वरूपाच्या असतात. असे असले तरी, औपचारिक आणि अनौपचारिक मार्गाने सकारात्मक आणि नकारात्मक अनुज्ञांचा उपयोग करून समाजमान्य वर्तन घडवून आणले जाते व सामाजिक विचलनाचे मोजमाप करता येते.

### ३.२.३ सामाजिक नियंत्रणाचे प्रकार :

(Forms of Social Control)

सामाजिक विचलनावर नियंत्रण ठेवणे आणि सामाजिक नियमनांनुसार वर्तनाची हमी देणे हा उद्देश विविध प्रकारच्या सामाजिक नियंत्रणाचा असतो. सामाजिक नियंत्रणाच्या ज्या प्रकारांच्यामुळे समूहातील सदस्यांना समूहाच्या नियमनाप्रमाणे वर्तन करण्यास भाग पाडले जाते, अशा प्रकारांची संख्या इतकी अमाप असते की, त्याचे सार्वत्रिक स्वरूपात स्वीकृत होईल अशा स्वरूपात वर्गीकरण करणे नेहमीच शक्य नसते. तरीसुद्धा विविध अभ्यासकांनी सामाजिक नियंत्रणाच्या विविध प्रकारांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्यातील काही प्रकारांचा विस्ताराने अभ्यास करूया.

१. **औपचारिक आणि अनौपचारिक सामाजिक नियंत्रण** (Formal and Informal Social Control):

औपचारिक आणि अनौपचारिक सामाजिक नियंत्रण असे दोन प्रमुख सामाजिक नियंत्रणाचे प्रकार बहुतेक सर्व समाजशास्त्रज्ञांनी मान्य केलेले आहेत. सामाजिक नियंत्रणाच्या प्रकारांचे हे वर्गीकरण प्रामुख्याने सामाजिक नियंत्रणाच्या साधनांचे स्वरूप आणि नियंत्रणाचा वापर कशा मार्गाने होतो यावर आधारित आहे. आपल्याला माहितच आहे की, विचलनात्मक वर्तन नियंत्रित करण्याच्या उद्देशाने, सामाजिक नियंत्रणाची साधने हेतूपूर्वक, जाणीवपूर्वक निर्माण केलेली असतात. सामाजिक नियंत्रणाच्या अशा साधनांचा उल्लेख औपचारिक स्वरूपाची सामाजिक नियंत्रणाची साधने म्हणून केला जातो. औपचारिक नियंत्रणाच्या साधनांचे उदाहरण म्हणजे, शासन संस्थेकडून लागू झालेले कायदे, संघटनांचे औपचारिक नियम, कार्यालयीन कामकाज आणि जबाबदारी पार पाडण्यासाठी तयार करण्यात आलेले कायदे आणि नियम, इ. अशा नियम आणि कायद्यासारख्या औपचारिक सामाजिक नियंत्रणाच्या साधनांची निर्मिती जाणीवपूर्वक आणि हेतूपुरस्कर स्वरूपाची असते.

अशा कायदे आणि नियमांची अंमलबजावणीदेखील औपचारिक प्रक्रियेच्या माध्यमातून करण्यात आलेली असते. उदा. पोलीस दल, न्यायालयीन व्यवस्था यांची स्थापना शासकीय कायद्यांची अंमलबजावणी होण्याच्या उद्देशानेच झालेली असते आणि जर एखाद्या घटनेत कायद्याचे उल्लंघन झालेच तर, संबंधित व्यक्तीला तिने केलेल्या विचलनात्मक वर्तनाची गंभीरता विचारात घेऊन शिक्षा दिली जाते. कार्यालयीन आदेशांचे उल्लंघन किंवा शासकीय नियमांचे उल्लंघन होणाऱ्या घटनांमध्ये तसेच संघटनाच्या नियमांचे उल्लंघन झाल्यास, संबंधित व्यक्तीला औपचारिक स्वरूपातून शिक्षा देत असताना, तिला मेमो दिला जातो, तिची बढती रोखली जाते किंवा तिला नोकरीतून निलंबीत केले जाते.

अनौपचारिक नियंत्रणाच्या साधनांचे स्वरूप आणि त्यांच्या अंमलबजावणीचे स्वरूप हे औपचारिक नियंत्रणाच्या साधनांहून भिन्न असते. समाजाच्या विकास प्रक्रियेबरोबर अनौपचारिक नियंत्रणाची साधने समाजात उदयास येत असतात हे या ठिकाणी लक्षात घेतले पाहिजे. ती जाणीवपूर्वक अथवा हेतूपुरस्कर निर्माण केलेली नसतात. अनौपचारिक नियंत्रणाच्या साधनाचे उदाहरण म्हणजे, रूढी, परंपरा, लोकरूढी, लोकनिती इ. अशा स्वरूपाची साधने अनौपचारिकरित्या एका पिढीकडून दुसऱ्या पुढच्या पिढीकडे हस्तांतरीत

होत असतात. समाजातील बहुतांशी सदस्य अशा रूढी परंपराबरहुकम वर्तन करीत असतात. अशा स्वरूपाच्या सामाजिक नियंत्रणाच्या साधनांची अंमलबजावणीदेखील अनौपचारिक मार्गानेच होत असते. उदा. जर काही व्यक्ती समाजातील विशिष्ट रूढी परंपरांचे पालन करीत नसतील तर, त्यांची टिंगल केली जाते किंवा त्यांच्यावर टीका होते. असे असले तरी, रुढीपरंपरांच्या तुलनेत, समाजातील लोकनितीच्या उल्लंघनाची मात्र, गांभीर्याने दखल घेतली जाते. ज्या व्यक्ती लोकनितीचे उल्लंघन करतात त्यांना शिक्षादेखील तितक्याच गंभीर स्वरूपाची दिली जाते.

सामाजिक नियंत्रणाच्या औपचारिक आणि अनौपचारिक साधनांच्या वापराचे प्रमाण आणि स्वरूप प्रत्येक समाजामध्ये आणि समूहामध्ये भिन्न भिन्न स्वरूपाचे असते. सर्व प्रकारच्या पारंपारिक आदिवासी समाजांमध्ये अनौपचारिक सामाजिक नियंत्रणाच्या साधनांचा प्रभावी आणि अधिक वापर केला जातो, तर औपचारिक स्वरूपाच्या संघटना आणि आधुनिक औद्योगिक समाज-व्यवस्थांच्यामध्ये प्रामुख्याने सामाजिक नियंत्रणाच्या औपचारिक साधनांच्या माध्यमातून नियंत्रणाचा वापर होत असतो. तरीसुद्धा आधुनिक समाजव्यवस्थांच्या ठिकाणी, समाजानुरूप वर्तन घडून येण्यासाठी आणि सामाजिक विचलनासारख्या घटनांवर नियंत्रण ठेवण्याच्या उद्देशाने, औपचारिक आणि अनौपचारिक अशा दोन्ही सामाजिक नियंत्रणाच्या प्रकारांचा अवलंब होत असतो. ही महत्त्वाची बाब या ठिकाणी लक्षात घेतली पाहिजे.

### २. **सकारात्मक आणि नकारात्मक सामाजिक नियंत्रण** (Positive and Negative Social Control)

सामाजिक नियमने आणि मूल्यांना अनुसरून वर्तन घडून आणणे हा सामाजिक नियंत्रणाचा उद्देश असतो व हे समाजामध्ये सामाजिक नियंत्रणाच्या साधनांच्याद्वारे कौशल्यपूर्णरित्या पार पाडले जाते. अशी साधने समाजात व्यक्तीबाह्य स्वरूपाची असतात. ज्या व्यक्ती सामाजिक नियमांना अनुसरून वर्तन करतात त्यांना विविध स्वरूपाची बक्षिसे दिली जातात. व्यक्तीच्या अशा वर्तनाला समाजामध्ये अधिक मजबूती प्राप्त होते व इतर व्यक्तीसुद्धा अशा वर्तनाचे अनुकरण करतात. दुसऱ्या बाजूला ज्या व्यक्ती नियमनांचे उल्लंघन करतात, त्यांनी नंतरच्या काळात नियमनांचे उल्लंघन करू नये यासाठी त्यांना शिक्षा केली जाते व इतर व्यक्तींनीदेखील नियमनांचे उल्लंघन करण्याचे साहस करू नये हा पाठीमागचा उद्देश असतो.

अशाप्रकारे सकारात्मक अनुज्ञांच्या माध्यमातून समाजानुरूप वर्तनाला मजबूती प्राप्त होते. (विविध स्वरूपात दिली जाणारी बक्षीसे) त्याचप्रमाणे नकारात्मक अनुज्ञांच्या माध्यमातून विचलनात्मक वर्तन नियंत्रीत होत असते. (विविध स्वरूपात दिल्या जाणाऱ्या शिक्षा). म्हणून नामवंत समाजशास्त्रज्ञ किंबालयंग यांनी सामाजिक नियंत्रणाचे वर्गीकरण (१) सकारात्मक सामाजिक नियंत्रण आणि (२) नकारात्मक सामाजिक नियंत्रण प्रकारांमध्ये केले आहे. या ठिकाणी बक्षिसासारख्या सकारात्मक अनुज्ञांचा उपयोग म्हणजे 'सकारात्मक सामाजिक नियंत्रण' या अर्थाने केला आहे. व्यक्तीचा गौरव करणे, तिला प्रोत्साहन देणे, सामाजिक संमत्ती देणे, पैशाच्या स्वरूपात बक्षीस देणे, प्रमाणपत्र, पदक इ.सारख्या सकारात्मक अनुज्ञांचा परिणाम व्यक्तींच्या कृतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात होत असतो. नकारात्मक अनुज्ञांचा उपयोग नकारात्मक सामाजिक नियंत्रण या अर्थाने केला जातो. (उदा. विविध स्वरूपाच्या शिक्षा त्यामध्ये

टीका करणे, काही गोष्टींपासून वंचित ठेवणे, एकांतवास, दंड, तुरूंगवास, शारीरिक स्वरूपाच्या शिक्षा, शिक्षा करण्यासंबंधीची धमकी देणे, इ.) नियमनांप्रमाणे वर्तन घडून न आल्यास वरील शिक्षा होतात. शिक्षेच्या भितीपोटी व्यक्ती समूहाची नियमने आणि कायदे यांना अनुरूप वर्तन करीत असते. शिक्षेच्या भितीमुळे याठिकाणी विचलन करण्याचे धाडस केले जात नाही.

सर्व प्रकारच्या समाजामध्ये आणि समूहांच्यामध्ये सकारात्मक आणि नकारात्मक सामाजिक नियंत्रणाच्या दोन्ही प्रकारांचा उपयोग पहायला मिळू शकतो.

३. **प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सामाजिक नियंत्रण** (Direct and Indirect Social Control) :

प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ कार्ल मॅनहम यांनी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सामाजिक नियंत्रणाच्यामध्ये फरक केला आहे. समोरा-समोरच्या आंतरक्रियाच्या वेळच्या परिस्थितीमध्ये किंवा कायदे अथवा नियमासारख्या प्रत्यक्ष स्वरूपातून ज्यावेळी सामाजिक नियंत्रण उपयोगात आणले जात असते अशा आधारावरती सामाजिक नियंत्रणाचा हा प्रकार अवलंबून असतो. सामान्यत जे नियंत्रण लहान आकाराच्या प्राथमिक समूहांच्यामध्ये आणि पारंपारिक आदिवासी समाजांमध्ये समोरा-समोरच्या घडून येणाऱ्या आंतरक्रियेसारख्या परिस्थितीत वापरले जाते त्याला प्रत्यक्ष सामाजिक नियंत्रण अशी संज्ञा दिली जाते, तर जे सामाजिक नियंत्रण दुय्यम समूह आणि नियम आणि कायद्याने चालणाऱ्या औपचारिक संघटनांच्यामध्ये वापरात आणले जाते त्याला अप्रत्यक्ष सामाजिक नियंत्रण असे म्हणतात.

प्राथमिक समूहामध्ये व्यक्ती प्रत्यक्षपणे परस्परांच्या शारीरिक सान्निध्यात येतात त्यावेळी त्या परस्परांची स्तुती करणे, टीका करणे, अथवा थट्टा-मस्करीसारख्या वर्तन प्रकारातून परस्परांच्या वर्तनावर सामाजिक नियंत्रणाचा वापर करतात. आपल्या अपेक्षेपेक्षा आकाराने विशाल असणाऱ्या समूहांमध्ये सर्व व्यक्ती परस्परांच्या परिचयाच्या असतीलच असे नाही आणि त्यांच्यामध्ये नेहमीच शारीरिक संपर्क येईलच असे म्हणता येत नाही. अशा विशाल समूहांच्या आणि संघटनांच्यामध्ये काही विशिष्ट अशा नियमांच्या आणि प्रक्रियांच्या माध्यमातून प्रामुख्याने अप्रत्यक्ष सामाजिक नियंत्रणाचा वापर केला जातो. असे असले तरी, विशाल समूहांच्यामध्ये प्रत्यक्ष सामाजिक नियंत्रणाचा संपूर्णपणे अभाव असत नाही हे या ठिकाणी विचारात घेतले पाहिजे.

अगदी अलिकडच्या काळापर्यंत सर्व पारंपारिक आदिवासी आणि ग्रामीण समाजांच्यामध्ये प्रत्यक्ष सामाजिक नियंत्रणाचे वर्चस्व होते. परंतु सामाजिक परिवर्तनाच्या रेट्यामुळे या सर्व समाजांच्यामध्ये बदल झालेला दिसतो. म्हणून सर्व प्रकारच्या समकालीन समाजांमध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अशा दोन्ही सामाजिक नियंत्रणाच्या प्रकारांचा वापर होतो. आधुनिक स्वरूपाच्या सर्व औद्योगिक समाजांमध्ये, सामाजिक नियंत्रणाचा अप्रत्यक्ष सामाजिक नियंत्रणाच्या प्रकाराचे वर्चस्व दिसून येते. तरीसुद्धा, सर्व प्रकारच्या समकालीन समाजांमध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अशा दोन्ही प्रकारचे सामाजिक नियंत्रण त्या ठिकाणी आढळून येते.

४. **संघटित आणि असंघटित सामाजिक नियंत्रण** (Organized and Unorganized Social Control)

गुरविच आणि मूर यांनी सामाजिक नियंत्रणाचे दोन प्रकारामध्ये वर्गीकरण केले आहे. संघटित आणि असंघटित सामाजिक नियंत्रण. हे वर्गीकरण, सामाजिक नियंत्रणाच्या साधनांचे स्वरूप व सामाजिक नियंत्रण करवून घेण्यासाठी स्वतंत्रपणे एखादी संघटना समाजात अस्तित्वात आहे अथवा नाही या आधारावरती केलेले आहे. ज्यावेळी स्वतंत्र अशा संघटनेच्या माध्यमातून सामाजिक नियंत्रणाचा वापर होत असतो त्यावेळी त्याला संघटित सामाजिक नियंत्रण म्हटले जाते. उदा. शासन, कायदे, पोलीस दल, न्यायसंस्था यांच्या माध्यमातून वापरात आणलेले सामाजिक नियंत्रण हे संघटित सामाजिक नियंत्रण असते. दुसऱ्या बाजूला, समाजातील व्यक्ती समाजातल्या रूढी परंपरांचे नियम, शिष्टाचार यांचे पालन करतात किंवा नाही पहाण्यासाठीची स्वतंत्र संघटना नसते, म्हणून ज्यावेळी लोकरूढी, लोकनिती सारख्या माध्यमातून जे सामाजिक नियंत्रण वापरात आणलेले असते. त्याला असंघटित सामाजिक नियंत्रण म्हणतात.

५. **जाणीवपूर्वक स्वरूपाचे आणि अजाणीवपूर्वक स्वरूपाचे सामाजिक नियंत्रण :**

(Conscious and Unconscious Social Control)

लुथर एल बर्नाड यांनी सामाजिक नियंत्रणाचे जाणीवपूर्वक सामाजिक नियंत्रण आणि अजाणीवपूर्वक सामाजिक नियंत्रण असे दोन प्रकार केले आहेत. त्यांच्या मते, आपल्या समाजजीवनात अशा स्वरूपाचे सामाजिक नियंत्रण कार्यरत असते, की ज्याची व्यक्तीला जाणीव होत नसते. म्हणजेच सामाजिक नियंत्रणाच्या काही प्रकारांची जाणीवच व्यक्तीला होत नसते. कारण सामाजिक नियंत्रणाचे काही प्रकार, व्यक्तीला कसल्याही प्रकारची जाणीव होऊ न देता शांतपणे नियंत्रणाचे कार्य करीत असतात. अशा नियंत्रणामध्ये समाजातील रूढी, परंपरा, लोकरूढी, संकेत इ.चा समावेश होतो. म्हणून, अशा प्रकारच्या सामाजिक नियंत्रणाच्या माध्यमातून जे नियंत्रण होत असते त्याला अजाणीवपूर्वक सामाजिक नियंत्रण असे म्हणतात. असे असले तरी, सामाजिक नियंत्रणाच्या इतर काही प्रकाराविषयी समाजातील व्यक्ती जागरूक असतात आणि अशा प्रकारांचा प्रभाव नेहमी अनुभवास येत असतो. समाजाकडून ज्या ज्या वेळी गरज भासेल त्यावेळी जाणीवपूर्वक अशा स्वरूपाची सामाजिक नियंत्रणाची साधने विकसीत होत असतात. त्याची अंमलबजावणीसुद्धा औपचारिक संघटनांच्या माध्यमातून केलेली असते. उदा. औपचारिक नियम, कायदे इ. म्हणून औपचारिक नियम, फायदे इ.सारख्या माध्यमातून जे सामाजिक नियंत्रण अमलात आणले जाते त्याला जाणीवपूर्वक सामाजिक नियंत्रण असे म्हणतात.

लूथर एल. बर्नाड यांनी छळवादी किंवा पिळवणूकवादी सामाजिक नियंत्रण आणि विधायक सामाजिक नियंत्रण अशा स्वरूपाचे देखील वर्गीकरण केले आहे. पिळवणूकवादी किंवा छळवादी स्वरूपाच्या सामाजिक नियंत्रणाच्या प्रकारांमध्ये शिक्षा, दहशत, सूड, परिक्षणता, दडपशाही इ.चा समावेश होतो॰ विधायक सामाजिक नियंत्रणाच्या प्रकारांमध्ये रूढी, परंपरा, कायदे, शिक्षण, सामाजिक सुधारणा, अलौकीक शक्तीवरील श्रद्धा इ.चा समावेश होतो.

**स्वयं-अध्ययनासाठीचे प्रश्न** (Check your Progress) :

खालील प्रश्नांची एक वाक्यात उत्तरे द्या.

१. हॉर्टन आणि हंट यांची विचलनाची व्याख्या द्या.

२. हॅरी जॉन्सन यांची विचलनात्मक वर्तनाची व्याख्या द्या.

३. सहमती म्हणजे काय?

४. कोणत्या अर्थाने विचलनात्मक वर्तन सापेक्ष असू शकते ?

५. विचलनात्मक वर्तनाची कोणतीही पाच कारणे द्या.

६. रॉस इ.ए. यांनी दिलेली सामाजिक नियंत्रणाची व्याख्या द्या.

७. शेपर्ड, ओडम आणि ब्रुटन यांनी दिलेली सामाजिक नियंत्रणाची व्याख्या द्या.

८. गिलिन आणि गिलिन यांनी दिलेली सामाजिक नियंत्रणाची व्याख्या द्या.

९. सामाजिक नियंत्रणामुळे कोणकोणत्या विविध हेतूंची पूर्तता होते.

१०. सामाजिक नियंत्रणाचे स्वरूप आणि अर्थ स्पष्ट करणारे कोणतेही पाच मुद्दे सांगा.

११. सामाजिक नियंत्रण का गरजेचे आहे.

१२. १९८४ मध्ये सामाजिक नियंत्रण या संज्ञांचा वापर कोणी केला.

१३. 'सामाजिक अनुज्ञा' या संज्ञेचा अर्थ सांगा.

१४. 'सामाजिक अनुज्ञेचे' प्रकार सांगा.

१५. सामाजिक नियंत्रणाच्या प्रमुख कार्यांची यादी तयार करा.

१६. Ed, ego आणि superego या संकल्पना कोणाशी संबंधीत आहेत.

१७. औपचारिक आणि अनौपचारिक सामाजिक नियंत्रणाच्या साधनांची कोणतीही दोन उदाहरणे द्या.

१८. सकारात्मक सामाजिक नियंत्रण आणि नकारात्मक सामाजिक नियंत्रण यांच्यातील फरक सांगा.

१९. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सामाजिक नियंत्रण यांच्यातील फरक सांगा.

२०. संघटित आणि असंघटित सामाजिक नियंत्रणाच्या प्रकारांच्या वर्गीकरणाचे आधार कोणते आहेत?

२१. जाणीवपूर्वक आणि अजाणीवपूर्वक सामाजिक नियंत्रण यांच्यातील फरक सांगा.

## **१.३ सारांश** (Let us Sum-up) :

या घटकांमध्ये आपण सामाजिक विचलनाचा अर्थ आणि त्याची कारणे यांचा अभ्यास केला. आपण ज्या प्रमुख मुद्यांचा या घटकांमध्ये अभ्यास केला त्याचे थोडक्यात संक्षिप्तीकरण या ठिकाणी केले आहे. कोणत्याही समाजात, नियमनात्मक व्यवस्थेच्या साह्याने व्यवस्था आणि समाजाचे स्थैर्य टिकवून ठेवले जाते. नियमनात्मक व्यवस्थेचा संदर्भ या ठिकाणी कायदे आणि नियमनांची अशी व्यवस्था की, जिचे पालन आणि स्वीकार होण्यासंबंधीची अपेक्षा समाजातील व्यक्ती करीत असतात. ज्यावेळी समाजातील नियमनांचे बहुतांशी व्यक्ती पालन करतात, त्यावेळी समाजाला सुव्यवस्था आणि स्थैर्य मिळते. समाजाची नियमने किंवा अपेक्षांनुसार घडून येणाऱ्या वर्तनास समाजमान्य वर्तन असे म्हणतात. असे असले तरी, कोणत्याही समाजातील सर्वच व्यक्ती वर्तनासंबंधीच्या नियमनांचे पालन करीत नसल्याचे आपणाला दिसून येते. आपणास माहिती असणाऱ्या सर्व मानवी समाजात या ना त्या स्वरूपात सामाजिक विचलन आढळून येतच असते. काही व्यक्ती नियमनांच्याविरूद्ध वर्तन करीत असतात व त्या व्यक्ती समाजाच्या नियमनांचे उल्लंघन करतात त्यांना आपण विचलनात्मक वर्तन करणाऱ्या व्यक्ती म्हणून संबोधतो. म्हणून समाजमान्य वर्तन प्रकार आणि सामाजिक विचलन या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

विचलन एक असे वर्तन असते की ते ज्या समूहात घडून आलेले असते, त्या समूहातील नियमनांचे उल्लंघन त्यामुळे होत असते. सामाजिक विचलन ही एक अशी कृती किंवा वर्तन असते की, जे समूह किंवा समाजाच्या अपेक्षा आणि समाईक नियमनांच्या विरूद्ध असते. विचलन ही एक सापेक्ष घटना असून ती 'नियमने' किंवा 'वर्तनासंबंधी समूहांच्या असणाऱ्या अपेक्षांच्या' संदर्भात जाणून घेतली जाते. कोणतेही एखादे विशिष्ट वर्तन विचलनात्मक आहे किंवा नाही हे ते ज्या समूहात घडून आले त्यावरून निश्चित केले जाते. विचलनात्मक वर्तन हे प्रामुख्याने नियमनांचे प्रमाण आणि दिशा या दोन्हींच्या संबंधावरून भिन्न भिन्न असू शकते. हॅरी जॉन्सन या समाजशास्त्रज्ञाने या घटकांवर भर दिला आहे की, जर व्यक्ती मुद्दाम नियमनांचे उल्लंघन करत असेल तर ते विचलनात्मक वर्तन असते. विचलनात्मक वर्तनाची दखल समाज गांभीर्याने घेत असतो. त्याकडे दुर्लक्ष केले जात नाही. समाजातील सदस्य अनेक प्रकारे अशा स्वरूपाचे वर्तन अस्वीकृत करीत असतात. विचलनात्मक वर्तनासाठी व्यक्तीला या ना त्या स्वरूपात शिक्षाही मिळतच असते. विशिष्ट समूह अथवा समाजाची संस्कृती म्हणून सामाजिक विचलनाची व्याख्या केली जाते. म्हणून विचलनात्मक वर्तनाची व्याख्या, संस्कृती आणि संस्कृतीमधल्या बदलांनुसार बदलू शकते. वाईट वर्तन म्हणता येत नाही.

सामाजिक विचलन अनेक अर्थाने सापेक्ष असते. (अ) विशिष्ट समूह किंवा समाजसापेक्ष विचलनात्मक वर्तन असते. (ब) सामाजिक विचलनाची व्याख्या वेळ अथवा कालसापेक्ष असते, (क) जी व्यक्ती सामाजिक नियमनांचे उल्लंघन करते अशा व्यक्तीच्या समाजातील स्थानसापेक्ष विचलनात्मक वर्तनाची व्याख्या असते. (ड) ज्या परिस्थितीमध्ये वर्तन घडून येते त्या परिस्थितीसापेक्ष विचलनात्मक वर्तनाची व्याख्या असते.

या घटकांमध्ये आपण सामाजिक नियंत्रणाची कार्ये समजावून घेतली. समाज हा विविध स्वरूपाचे विचार, प्रवृत्ती आणि हितसंबंध असणाऱ्या अनेक व्यक्ती आणि समूहांचा मिळून बनलेला असतो. जर प्रत्येक व्यक्तीला तिला इच्छेनुसार वर्तन करण्याचे अनिर्बंध स्वातंत्र्य दिले तर, कदाचित त्यामुळे सामाजिक अव्यवस्था निर्माण होऊ शकते. प्रत्येक समाजाला त्याची स्वत:ची म्हणून सर्व सदस्यांसाठी समान अशा स्वरूपाच्या सामाजिक नियमने आणि मूल्यांचा संच असतो व कायदा, शिक्षण, शारीरिक बल, लोकरूढी, लोकनिती रूढी, धर्म इ. सारख्या सामाजिक नियंत्रणाच्या आंतरिक आणि बाह्य स्वरूपाच्या साधनांद्वारे प्रत्येक समाजामध्ये समाजातील नियमने आणि मूल्यांप्रमाणे वर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला जातो. स्थिर आणि व्यवस्थाबद्ध समाजजीवनाच्या दृष्टीकोनातून व्यक्तीचे वर्तन समाजानुरूप घडून येण्यासाठी काही स्वरूपात सामाजिक नियंत्रण आवश्यक असते. हॅरी जॉन्सन यांच्या मते, ''समाजव्यवस्था किंवा तिच्या उप-व्यवस्थेच्या एक किंवा अनेक गरजा पूर्ण करण्यासाठीची कोणतीही आंशिक संरचना- एखाद्या प्रकारचा उपसमूह एखादी भूमिका, एखादे सामाजिक नियमन किंवा एखादे सांस्कृतिक मूल्य काही योगदान देत असेल तर त्याला आंशिक संरचनेचे प्रकार्य असे म्हणतात.'' समाजव्यवस्थेचे अस्तित्व, सामाजिक एकात्मता आणि सामाजिक स्थैर्य या समाजाच्या महत्त्वपूर्ण गरजा असतात. सामाजिक नियंत्रणाची यंत्रणा अशा गरजांची पूर्तता करते. आपण विस्ताराने ज्या प्रमुख सामाजिक कार्याचा उल्लेख केला होता त्यामध्ये (१) समूहातील सदस्य समूहाच्या नियमने आणि मूल्याप्रमाणे वर्तन करतात याची खात्री सामाजिक नियंत्रण करून देते. (२) सामाजिक नियंत्रण समाज-व्यवस्था निर्माण करून ती टिकवण्याचा प्रयत्न करते. (३) सामाजिक नियंत्रण सामाजिक एकात्मता निर्माण करते. (४) सामाजिक नियंत्रणाची यंत्रणा समाजाचे सातत्य आणि स्थैर्य टिकवून ठेवण्याच्या दृष्टीने योगदान करते. (५) सामाजिक नियंत्रणाची यंत्रणा सामाजिक अनुज्ञाद्वारे सामाजिक विचलनाची तपासणी करते.

या घटकांमध्ये आपण सामाजिक नियंत्रणाचा अर्थ अभ्यासला. विद्याभूषण आणि सचदेवा यांनी सांगितल्याप्रमाणे, स्मॉल आणि व्हिन्सेंट यांनी १९८४ मध्ये पहिल्यांदा सामाजिक नियंत्रण या संज्ञेचा उपयोग केला होता. असे असले तरी, १९०१ मध्ये अमेरिकन समाजशास्त्रज्ञ ई.ए. रॉस यांचे 'सामाजिक नियंत्रण' शीर्षक असणारे पुस्तक लिहिले होते की ज्यामध्ये सामाजिक नियंत्रण या संकल्पनेचे लेखकाने विस्तारपूर्वक परीक्षण केले होते. जी संख्या व्यक्तीचे वर्तन समूहाच्या अपेक्षांनुसार घडून यावे म्हणून नियंत्रणात्मक स्वरूपाची कार्ये पार पाडते अशा संदर्भाने इ.ए. रॉस यांनी सामाजिक नियंत्रण या संज्ञेचा उपयोग केला होता.

सामाजिक नियंत्रणाच्या अभ्यासाची सुरूवात आपण या संज्ञेच्या काही व्याख्यांच्या अभ्यासापासून केली होती. सामाजिक नियंत्रणाची व्याख्या इ.ए. रॉस यांनी ''ज्याद्वारे समाज आपल्या सभासदांकडून समाजमान्य वर्तनाच्या आदर्शांना अनुरूप असे वर्तन घडवून आणतो अशा योजनापद्धतींची व्यवस्था म्हणजे सामाजिक नियंत्रण.'' इतर व्याख्यांच्यामध्ये 'सामाजिक नियंत्रण म्हणजे अशी प्रक्रिया की जी व्यक्तींना सामाजिक नियमनांनुसार वर्तन करण्यासंबंधीचे निर्बंध लादते.' या घटकांवर भर दिलेला दिसतो. संस्कृतीमान्य रितीने किंवा संस्कृतीने परिभाषित केलेल्या पद्धतीने वागण्यास व्यक्तींना प्रोत्साहन देणारी शक्ती म्हणजे सामाजिक नियंत्रण होय. ज्या व्याख्यांचा आपण अभ्यास केला त्यातून असा अर्थ स्पष्ट होतो की, सामाजिक

नियंत्रणाचा समूह अथवा समाजाच्या संस्कृतीमान्य किंवा सामाजिक नियमनांनुसार समूहातील अथवा समाजातील व्यक्ती वर्तन प्रभावित होण्यासाठीची एक प्रक्रिया साधन, उपयांची व्यवस्था, पद्धती किंवा शक्ती या अर्थाने उपयोग होतो.

सामाजिक नियंत्रणाचा अर्थ आणि स्वरूप स्पष्ट करणारे काही मुद्यांचे विश्लेषणदेखील आपण केले होते.

(अ) सामाजिक नियंत्रण सार्वत्रिक स्वरूपाची सातत्याने चालणारी अशी व्यापक प्रक्रिया आहे. (ब) समूह आणि व्यक्तीवर्तनावर असणाऱ्या समाज नियंत्रणाचा समावेश सामाजिक नियंत्रणामध्ये होतो. (क) समाजमान्य वर्तन प्रकारांना अनुरूप वर्तन करण्यास भाग पाडणारी यंत्रणा म्हणजे सामाजिक नियंत्रण. (ड) 'अंतर्गत' आणि 'बाह्य' साधनांच्या साहयाने सामाजिक नियंत्रण साध्य होते. (इ) विविध साधनांच्याद्वारे सामाजिक नियंत्रणाचा वापर होतो. (ई) सामाजिक नियंत्रणाच्या प्रक्रियेत शारीरिक शक्ती किंवा दबावतंत्राचा उपयोग होतो. (प) सामाजिक नियंत्रण सहेतूक असते.

या घटकांमध्ये आपण सामाजिक नियंत्रणाच्या विविध प्रकारांचा अभ्यास केला. सामाजिक विचलनावर नियंत्रण आणि सामाजिक नियमनानुसार अपेक्षित वर्तन करवून घेणे हा विविध प्रकारच्या सामाजिक नियंत्रणामागचा हेतू असतो. या घटकांमध्ये आपण ज्या सामाजिक नियंत्रणांच्या प्रकारांचा अभ्यास केला, त्यामध्ये १) औपचारिक सामाजिक नियंत्रण आणि अनौपचारिक सामाजिक नियंत्रण, २) सकारात्मक सामाजिक नियंत्रण आणि नकारात्मक सामाजिक नियंत्रण, ३) प्रत्यक्ष सामाजिक नियंत्रण आणि अप्रत्यक्ष सामाजिक नियंत्रण, ४) संघटित सामाजिक नियंत्रण आणि असंघटित सामाजिक नियंत्रण, ५) जाणीवपूर्वक स्वरूपाचे सामाजिक नियंत्रण आणि अजाणीवपूर्वक स्वरूपाचे सामाजिक नियंत्रण, ६) पिळवणूकवादी स्वरूपाची किंवा छळवादी स्वरूपाचे सामाजिक नियंत्रण आणि विधायक स्वरूपाचे सामाजिक नियंत्रण यांचा समावेश होतो.

## ३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to check Your Progress) :

१. **हार्टन आणि हंट** – ''समाजातील कोणत्याही चालीरिती विषयक नियमनांना सहमती देण्यामध्ये आलेले अपयश म्हणजे सामाजिक विचलन होय.''

२. **हॅरी जॉन्सन** – ''विचलनात्मक वर्तन म्हणजे केवळ नियमनांचा भंग करणारे वर्तन नव्हे तर कर्ता संबंधित नियमनांशी अभिमुख असूनही तो मुद्दाम त्या नियमनांच्या सहेतूक भंग करतो तेव्हा त्याला विचलनात्मक वर्तन म्हणतात.''

३. समाजाच्या अपेक्षा किंवा नियमने यांच्या अनुरूप असणाऱ्या वर्तनास समाजमान्य वर्तन असे म्हणतात.

४. **विचलनात्मक वर्तन चार प्रकारे सापेक्ष असू शकते.** (अ) विशिष्ट समूह किंवा समाजसापेक्ष विचलनात्मक वर्तन असते. (ब) सामाजिक विचलनाची व्याख्या वेळ अथवा काल सापेक्ष असते (क) जी व्यक्ती सामाजिक नियमनांचे उल्लंघन करते अशा व्यक्तीच्या समाजातील स्थानसापेक्ष विचलनात्मक

वर्तनाची व्याख्या असते. (ड) ज्या परिस्थितीमध्ये वर्तन घडून येते त्या परिस्थितीसापेक्ष विचलनात्मक वर्तनाची व्याख्या असते.

५. विचलनाच्या प्रमुख पाच कारणांमध्ये खालील कारणांचा समावेश होतो –

(अ) सदोष सामाजीकरण (ब) प्रभावहीन सामाजिक नियंत्रण (क) कायद्यांची कमकुवत अंमलबजावणी (ड) विचलनाचा बौद्धीक युक्तीवाद (इ) भ्रष्ट नियमने/ कायद्यांची अंमलबजावणी.

६. **इ.ए. रॉस :** ''ज्याद्वारे समाज आपल्या सभासदांकडून समाजमान्य वर्तनाच्या आदर्शांना अनुरूप असे वर्तन घडवून आणतो, अशा योजना पद्धतींची व्यवस्था म्हणजे सामाजिक नियंत्रण होय.''

७. **शेपर्ड, ओडोम आणि ब्रुटन :** ''व्यक्तींना नियमनांचे अनुसरून करण्यास (नियमनांनुसार वागण्यास) भाग पाडणारी प्रक्रिया म्हणजे सामाजिक नियंत्रण होय.''

८. **गिलिन आणि गिलिन :** ''समाज आपल्या एखाद्या उपसमुहाला किंवा समूह आपल्या सभासदांना, समाजमान्य वर्तन प्रकारांना अनुरूप असे वर्तन करण्यास भाग पाडण्यासाठी सूचन अननय, निर्बंध आणि शारीरिक शक्तीसह कोणत्याही साधनांचा अवलंब करून जबरदस्ती करतो, अशा उपयांच्या व्यवस्थेला सामाजिक नियंत्रण असे म्हणतात.''

९. **सामाजिक नियंत्रणाच्या योजनापद्धती आणि साधने :** (अ) समूह अथवा समाजाच्या नियमनांना आणि मूल्यांना अनुसरून असणारे वर्तन घडवून आणणे. (ब) सामाजिक सुव्यवस्था निर्माण करून ती टिकवणे, (क) सामाजिक ऐक्य निर्माण करणे आणि ते टिकवणे. (ड) विचलनामुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य विघटनाला प्रतिबंध घालून सामाजिक संघटन नियमितपणे टिकून राहण्याची हमी देणे. (इ) समूहातील सदस्यांच्या कल्याणासाठी हातभार लावणे आणि त्यांना शांतताप्रिय सामाजिक जीवनाची हमी देणे.

१०. (अ) सामाजिक नियंत्रण सार्वत्रिक स्वरूपाची सातत्याने चालणारी अशी व्यापक प्रक्रिया आहे. (ब) समूह आणि व्यक्तीवर्णनावर असणाऱ्या समाज नियंत्रणाचा समावेश सामाजिक नियंत्रणामध्ये होतो. (क) समाजमान्य वर्तन प्रकारांना अनुरूप वर्तन करण्यास भाग पाडणारी यंत्रणा म्हणजे सामाजिक नियंत्रण. (ड) 'अंतर्गत' आणि 'बाह्य' साधनांच्या साहय्याने सामाजिक नियंत्रण साध्य होते. (इ) विविध साधनांच्याद्वारे सामाजिक नियंत्रणाचा वापर होतो.

११. सामाजिक विचलनावर नियंत्रण ठेवणे आणि सामाजिक नियमनांना अनुसरून व्यक्ती वर्तन घडवून आणणे हा विविध प्रकारच्या सामाजिक नियंत्रणामागचा हेतू असतो.

१२. स्मॉल आणि व्हिन्सेट यानी विचलन या संज्ञेचा वापर केला.

१३. सामाजिक अनुज्ञा ही सामाजिक नियंत्रणाचीच एक यंत्रणा असून ती व्यक्तीबाह्य स्वरूपाची असते व त्याला सामाजिक नियंत्रणाचा आधार असतो व ज्या व्यक्ती सामाजिक अनुज्ञेप्रमाणे वर्तन करीत नाहीत त्यांना शिक्षा होते व ज्या अनुज्ञेप्रमाणे वर्तन करतात त्यांना योग्य ते बक्षीस मिळत असते.

१४. सामाजिक अनुज्ञेचे प्रमुख दोन प्रकार आहेत : सकारात्मक अनुज्ञा (विविध स्वरूपाची बक्षीसे) आणि नकारात्मक अनुज्ञा (विविध स्वरूपाच्या शिक्षा).

१५. सामाजिक नियंत्रणाच्या कार्यामध्ये (अ) समूहाची नियमने आणि मूल्ये यांना अनुरूप वर्तन करण्याच्या दृष्टीने सदस्यांना तयार करणे. (ब) सामाजिक नियंत्रण समाज व्यवस्था निर्माण करून ती टिकवते. (क) सामाजिक नियंत्रण समाजामध्ये सामाजिक एकात्मता निर्माण करते. (ड) सामाजिक नियंत्रणाची यंत्रणा समाजाचे सातत्य आणि स्थैर्य टिकवण्यामध्ये योगदान देते. (इ) सामाजिक नियंत्रणाची यंत्रणा सामाजिक अनुज्ञेद्वारे सामाजिक विचलनाची तपासणी करते.

१६. सिग्मन्ड फ्राईड यांचेशी

१७. औपचारिक स्वरूपाच्या सामाजिक नियंत्रणाच्या साधनांचे उदाहरण, म्हणजे शासन संस्थेने आमलात आणलेले कायदे, संघटनांचे औपचारिक नियम व अनौपचारिक स्वरूपाच्या सामाजिक नियंत्रणाच्या साधनांचे उदाहरणामध्ये, लोकरूढी आणि लोकनिती याचा उल्लेख करता येतो.

१८. सकारात्मक अनुज्ञा किंवा विविध स्वरूपाच्या बक्षीसांचा वापर (स्तुती करणे, तिला प्रोत्साहन देणे, सामाजिक संमत्ती देणे, पैशाच्या स्वरूपात बक्षीस देणे, प्रमापणत्र, पदक इ.) चा समावेश नियमनानुसार वर्तन केल्याने सकारात्मक सामाजिक नियंत्रणामध्ये होतो. नकारात्मक सामाजिक नियंत्रणामध्ये (विविध स्वरूपाच्या शिक्षा यामध्ये टीका, काही गोष्टीपासून वंचित ठेवणे, एकांतवास, दंड, तुरूंगवास, शारीरिक स्वरूपाच्या शिक्षा, शिक्षा करण्याची धमकी देणे) इ.चा नियमानुसार वर्तन न केल्याने नकारात्मक सामाजिक नियंत्रणात समावेश होतो.

१९. सामान्यता, जे नियंत्रण लहान आकाराच्या प्राथमिक समूहांच्यामध्ये आणि पारंपारिक आदिवासी समाजांमध्ये समोरासमोर घडून येणाऱ्या आंतरक्रियेसारख्या परिस्थितीच्या ठिकाणी वापरले जाते त्याला प्रत्यक्ष सामाजिक नियंत्रण असे म्हणतात व जे सामाजिक नियंत्रण दुय्यम समूह आणि नियम आणि कायद्याने चालणाऱ्या औपचारिक संघटनांच्यामध्ये वापरात आणले जाते त्याला अप्रत्यक्ष सामाजिक नियंत्रण असे म्हणतात.

२०. संघटित आणि असंघटित सामाजिक नियंत्रणाचे वर्गीकरण हे सामाजिक नियंत्रणाच्या साधनांचे स्वरूप आणि सामाजिक नियंत्रण करवून घेण्यासाठीची असणारी स्वतंत्र संघटना समाजात अस्तित्वात आहे किंवा नाही या आधारावरती होत असते.

२१. अजाणीवपूर्वक सामाजिक नियंत्रण हा सामाजिक नियंत्रणाचा असा प्रकार आहे की (रूढी, परंपरा) जो समाजातील व्यक्तींना तो कक्ष असलेल्या कार्याची जाणीव होणार नाही अशा शांत पद्धतीने नियंत्रणाचे कार्य करीत असतो आणि जाणीवपूर्वक सामाजिक नियंत्रण हा सामाजिक नियंत्रणाचा असा प्रकार आहे की, ज्याची जाणीव समाजातील व्यक्तींना होत असते व त्याचा प्रभावदेखील व्यक्तीच्या अनुभवास येत असतो. (उदा. कायदे)

## ३.५ सरावासाठीचे प्रश्न:

१. सामाजिक नियंत्रणाचा अर्थ आणि स्वरूप स्पष्ट करा.

२. सामाजिक नियंत्रणाची कार्ये सांगा.

३. सामाजिक नियंत्रणाचे प्रकार विशद करा.

## ३.६ अधिक वाचनासाठीची पुस्तके (Suggested Readings) :

1. Haralambos M. and R. M. Heald : Sociology : Themes and Perspectives, Oxford University Press, New Delhi, 1981.
2. Liska, Allen E. : Perspectives in Deviance, 2nd Edition, Prentice Hall, Englewood Cliffs, N.J. 1987.
3. Shankar Rao, C. N. : Sociology : Primary Principles, S. Chand and Co., New Delhi, 2004.
4. Bottomore, T. B. : Sociology : A Guide to Problems and Literature, Blackie and Sons (India), Bombay, 1975.
5. Vidya Bhushan and Sachdeva : An Introduction to Sociology, Kitab Mahal, Allahabad, 1993.
6. Perry, John and Erna K. Perry : Contemporary Society : An Introduction to Social Science, Allyn and Bacon, Boston, 2000.
7. Shankar Rao, C. N. : Sociology : Primary Principles, Chand and Co., New Delhi, 2004 Johnson, Harry M. : Sociology : A Systematic Introduction, Allied Publisher, Bombay, 1970.
8. Broom, Leonard and Philip Setznick : Sociology, Raw, Peterson and Co., New York, 1957.
9. McIver and Page : Society : An Introductory Analysis, MacMillan and Co. Ltd., London, 1965.
10. Shepard, J. M., Odom, S. S. and Bruton B. T. : Sociology, John Wiley and Sons, Inc. New York, 1977.
11. Abraham M. Francis : Contemporary Sociology : An Introduction to Concepts and Theories, Oxford, New Delhi, 2006.
12. Salunkhe Sarjerao : Samajshastrateel Moolbhoot Sankalpana (in Marathi), Narendra Publication, Appa Balwant Chowk, Pune, 2006.

13. Biesanz. J. and M. Biesanz, Modern Sociology, Englewood Cliffs, N.J., 1964.

14. Fletcher, R. : The Making of Sociology Michael Joseph, London, 1971.

15. Ginsberg, M. : Sociology, Oxford University Press, London, 1967.

16. Gittler J. B. : Review of Sociology, John Wileyand Sons, New York, 1957.

17. Merton R. K., Broom L., Cotrell (Eds) : Sociology Today, Basic Books Inc., New York, 1959.

18. Oqburn and Nimkoff : A Handbook of Sociology, Routledge and Kegan Paul, London, 1969.

19. Sutherland H. : Control of Life, Burns, Oats and Washington, London, 1954.

❑❑❑

# घटक–४
# सामाजिक परिवर्तन
(Social Change)

**घटक–संरचना** (Structure) **:**


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

४.२.१ सामाजिक परिवर्तन अर्थ आणि वैशिष्ट्ये

४.२.२ सामाजिक परिवर्तनाचे घटक

४.२.३ सामाजिक परिवर्तनातील अडथळे

४.३ सारांश

४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सरावासाठी प्रश्न

४.६ अधिक वाचनासाठीची पुस्तके


## ४.० उद्दिष्ट्ये

१) सामाजिक परिवर्तनाचा अर्थ आणि वैशिष्ट्ये समजून घेता येईल.

२) सामाजिक परिवर्तनाचे घटक समजून घेता येतील.

३) सामाजिक परिवर्तनातील अडथळे समजून घेता येतील.

## ४.१ प्रास्ताविक (Introduction) :

अंतर्गत तसेच बहिर्गत परिस्थितीत होणाऱ्या परिवर्तनाला अनुसरून समाजव्यवस्थांमध्ये परिवर्तन होत असते. सामाजिक परिवर्तन ही सार्वत्रिक स्वरूपाची घटना आहे. कारण सर्वच समाजात परिवर्तन घडून येत असते. म्हणून सामाजिक परिवर्तन हे समाजशास्त्रातील संशोधनाचे एक महत्त्वपूर्ण क्षेत्र ठरते. बहुतेक सर्वच समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक परिवर्तनाच्या अभ्यासात रस घेतलेला आहे. समाजशास्त्राचा जनक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ऑगस्त कॉम्त यांनी समाजशास्त्राच्या अभ्यासाचे सामाजिक स्थितीशास्त्र (social statics) आणि सामजिक गतिशास्त्र (social dynamics) असे दोन विभाग पाउलेले आहेत. सामाजिक

स्थितीशास्त्रात समाजातील स्थैर्याचा तर सामाजिक गतिशास्त्रात समाजात होणाऱ्या परिवर्तनाचा अभ्यास केला जातो. सामाजिक परिवर्तन ही समाजशास्त्रातील एक महत्त्वपूर्ण व मूलभूत अशी संकल्पना आहे. सामाजिक परिवर्तन या संज्ञेचा सामान्य माणूस जो अर्थ धेतो. त्या अर्थाहून वेगळा असा समाजशास्त्रीय अर्थ या संज्ञेचा आहे. म्हणून पहिल्या घटकात आपण सामाजिक परिवर्तनाचा समाजशास्त्रीय अर्थ समजावून घेणार आहोत.

मागील पहिल्या अध्ययन घटकांत आपण परिवर्तन हे मानव समाजाचे स्थायी वैशिष्ट्य आहे हे समजावून घेतले. समाजात सतत परिवर्तन होत असते. त्यामुळे समाजाचे स्वरूप गतिशील असते. पहिल्या घटकात सामाजिक परिवर्तनाच्या काही व्याख्या अभ्यासून त्याआधारे सामाजिक परिवर्तनाचा अर्थ समजावून घेतलेला आहे. आता या दुसऱ्या अध्ययन घटकात आपण सामाजिक परिवर्तनास जबाबदार असणाऱ्या विविध घटकांचा अभ्यास करणार आहोत. हे घटक अंतर्गत (म्हणजे एखाद्या समाजाच्या बाह्य परिस्थितीत उद्भवणारे) तसेच बहिर्गत (म्हणजे एखाद्या समाजाच्या बाह्य परिस्थितीत उद्भवणारे) अशा दोन्ही प्रकारचे असू शकतात. हे घटक सामाजिक परिवर्तनाच्या दोन पैलूंवर प्रभाव टाकीत असतात. पहिला म्हणजे सामाजिक परिवर्तनाची गती आणि दुसरा म्हणजे सामाजिक परिवर्तनाची दिशा होय. सामाजिक परिवर्तनाचे घटक अभ्यासल्याने सामाजिक परिवर्तनाविषयीच्या आपल्या ज्ञानात अधिक भर पडणार आहे.

मानव समाजात सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया सतत सुरू असते. तथापि सर्वच सामाजिक बदल समाजाकडून सहजासहजी स्वीकारले जात नाहीत. काही ठराविक सामाजिक बदलच स्वीकारले जातात. तर काही बदलांना समाजाकडून नाकारले जाते किंवा त्यांना विरोध केला जातो. कोणत्याही समाजात सामाजिक परिवर्तनाला चालना देणारे जसे काही घटक असतात तसेच सामाजिक परिवत्रनाच्या मार्गात अडथळा निर्माण करणारेही काही घटक असतात. अशा घटकांनाच सामाजिक परिवर्तनातील अडथळे असे म्हणतात. या अध्ययन घटकात आपण सामाजिक परिवर्तनाच्या मार्गातील काही प्रमुख अडथळ्यांचा म्हणजेच सामाजिक परिवर्तनास विरोध करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणार आहोत.

## ४.२ विषय विवेचन (Presentation of Subject Matter) :

सामाजिक परिवर्तन या संकल्पनेचा अर्थ समजाऊन घेण्यासाठी सर्वप्रथम आपण काही प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञांनी दिलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या व्याख्या अभ्यासणार आहोत. त्यानंतर सामाजिक परिवर्तनाशी संबंधित असणाऱ्या उत्क्रांती, क्रांती, प्रगती, विकास यासारख्या संकल्पनांचा अर्थ स्पष्ट करणार आहोत. आणि शेवटी सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप स्पष्ट करणारी सामाजिक परिवर्तनाची काही वैशिष्टये पाहणार आहोत.

### ४.२.१ सामाजिक परिवर्तन अर्थ आणि वैशिष्ट्ये

आता आपण काही नामवंत समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक परिवर्तनाच्या दिलेल्या व्याख्या अभ्यासू त्यामुळे आपणास सामाजिक परिवर्तनाचा अर्थ समजण्यास मदत होईल. तसेच सामाजिक परिवर्तनाची ठळक वैशिष्टये नमूद करण्यासही मदत होईल.

१. **हॅरि जॉन्सन** – ''मूलभूत अर्थाने सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक संरचनेतील परिवर्तन होय.'' (In its basis sense, social change means change in social structure)

२. **टिशलेर, व्हायटन आणि हंटर** – ''समाजाचे सामाजिक संघटन, दर्जे, संस्था आणि सामाजिक संरचना यांच्यात होणाऱ्या बदलांचा सामाजिक परिवर्तनात समावेश होतो.'' (Social change consists of alterations in society's social organization, statuses, institutions and social structure).

३. **मॉरिस गिन्सबर्ग** – ''अभिवृत्ती आणि श्रद्धा यांच्यात होणाऱ्या बदलांचाही सामाजिक परिवर्तन या संज्ञेत समावेश करणे आवश्यक आहे. कारण या घटकांमुळेच संस्था टिकून राहतात आणि त्यांच्याबरोबरच त्या बदलतात.'' (Term social change must also include changes in attitudes and beliefs in so far as they sustain institutions and change with them)

४. **किंग्जले डेव्हिस** – ''केवळ सामाजिक संघटेत म्हणजेच समाजाच्या संरचनेत आणि कार्यांत घडून येणाऱ्या बदलांनाच सामाजिक परिवर्तन असे म्हणतात.'' (Social change means only such alternations as occur in social organization i.e. the structure and functions of society.)

५. **हॉर्टन आणि हंट** – ''सामाजिक संरचना आणि सामाजिक संबंध यांच्यातील बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय.'' (Social change – changes in the social structure and social relationships)

६. **लुंडबर्ग** – ''मानवा मानवातील संबंधाची प्रस्थापित प्रतिमाने आणि प्रमाणभूत आचरण यांच्यातील कोणत्याही बदलांचा निर्देश सामाजिक परिवर्तनाद्वारे होतो.'' (Social change refere to any modification in established patterns of inter-human relationships and standards of conduct).

८. **गर्थ आणि मिल्ल** – ''भूमिका, संस्था किंवा संरचना असलेल्या व्यवस्था यांच्या संदर्भात काळाच्या ओघात घडून येणाऱ्या कोणत्याही बदलांना (त्यांची उत्पत्ती, विकास व ऱ्हास) उद्देशून सामाजिक परिवर्तन ही संज्ञा वापरली जाते.''

इतरही काही समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक परिवर्तनाच्या व्याख्या दिलेल्या आहेत. तथापि त्या व्याख्या वरिल व्याख्यांतून व्यक्त होणाराच अर्थ व्यक्त करतात. यानंतर आपण वरील व्याख्यांमध्ये प्रतिबिंबित झालेला सामाजिक परिवर्तनाचा अर्थ समजावून घेऊ. वरील व्याख्यांवरून हे स्पष्ट होते की सामाजिक परिवर्तन म्हणजे खाली नमूद केलेल्या समाजाच्या एका किंवा सर्व पैलूमध्ये घडून येणारे परिवर्तन होय.

१. मूलभूत अर्थाने सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक संरचनेतील परिवर्तन होय.

२. सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक संघटनेतील परिवर्तन होय.

३. सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक दर्जे व भूमिका यांच्यातील परिवर्तन होय.

४. सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक संस्थांमधील परिवर्तन होय.

५. सामाजिक परिवर्तन म्हणजे समाजाच्या उपव्यवस्थांच्या संरचनेत व कार्यात होणारे परिवर्तन होय.

६. सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक अभिवृत्ती व मूल्ये यांच्यातील परिवर्तन होय.

७. सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक संबंधाच्या प्रतिमानात व प्रमाणभूत आचरणात होणारे परिवर्तन होय.

वस्तुत: सामाजिक परिवर्तनाच्या अर्था संबंधीचे वरील सर्व मुद्दे हे एकाच वस्तुस्थितीच्या विविध पैलूंचा निर्देश करतात. आणि ती वस्तुस्थिती म्हणजे सामाजिक संघटनेच्या किंवा सामाजिक संरचनेच्या विविध पैलूतील किंवा घटक तत्त्वांतील परिवर्तन होय. आता हा मुद्दा अधिक स्पष्ट करू या. टॉलकॉट पार्सन्स यांच्या मते, ''परस्परसंबंधित संस्था, अभिकरणे आणि सामाजिक प्रतिमाने तसेच समूहात प्रत्येक व्यक्तीने धारण केलेले दर्जे व भूमिका यांच्या विशिष्ट मांडणीस किंवा व्यवस्थेस उद्देशून सामाजिक संरचना ही संज्ञा वापरली जाते.'' (Social structure is the term applied to the particular arrangement of the interrelated institutions, agencies and social patterns, as well as the statuses and roles which each person assumes in the group) म्हणून सामाजिक संरचनेच्या कोणत्याही घटकांत किंवा भागात (म्हणजेच दर्जे, भूमिका, सामाजिक संस्थांची संरचना व कार्ये, सामाजिक नियमने व मूल्ये, भूमिका धारकांच्या अभिवृती व श्रद्धा इत्यादीमध्ये) होणाऱ्या परिवर्तनास सामाजिक परिवर्तन असे म्हणतात. समाज ही सामाजिक संबंधाची एक व्यवस्था असते. त्यामुळे सामाजिक संबंधांच्या प्रतिमानात होणाऱ्या परिवर्तनासही सामाजिक परिवर्तन म्हटले जाते. सामाजिक मूल्ये, सामाजिक संस्था, सामाजिक संबंध आणि अभिवृत्ती व श्रद्धा यांच्यातील परिवर्तनास सामाजिक परिवर्तनाचा गाभा मानले जाते.

**सामाजिक परिवर्तन आणि सांस्कृतिक परिवर्तन यांच्यातील फरक :**

सामाजिक परिवर्तनाचा अर्थ समजण्यासाठी सामाजिक परिवर्तन व सांस्कृतिक परिवर्तन यांच्यातील फरक लक्षात घेणे आवश्यक ठरते. आपण मागे अभ्यासल्याप्रमाणे संस्कृतीमध्ये मानवनिर्मित अशा सर्व भौतिक व अभौतिक गोष्टींचा (घटकांचा) समावेश होतो. त्यामुळे संस्कृतीतील कोणत्याही भौतिक किंवा अभौतिक घटकात होणाऱ्या परिवर्तनास सांस्कृतिक परिवर्तन असे म्हणतात. वेशभूषा, केशभूषा, भोजनपद्धती, निवासपद्धती, हत्यारे, यंत्रे, भाषा, ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, तत्त्वज्ञान, श्रद्धा, मूल्ये, सामाजिक संघटनांचे प्रकार व नियम इत्यादी सर्व संस्कृतीचे घटक आहेत. यापैकी कोणत्याही घटकांत घडून येणाऱ्या परिवर्तनास सांस्कृतिक परिवर्तन असे म्हणतात. याउलट सामाजिक संरचनेत होणाऱ्या परिवर्तनास सामाजिक परिवर्तन असे म्हणतात. सामाजिक संरचना हा ही संस्कृतीचाच एक घटक असल्याने साहजिकच तिच्यातील परिवर्तन म्हणजेच सामाजिक परिवर्तन हे सांस्कृतिक परिवर्तनाचाच एक भाग ठरते. परंतू संस्कृतीच्या एखाद्या घटकातील बदलामुळे सामाजिक संरचनेत बदल न झाल्यास हा बदल केवळ सांस्कृतिक परिवर्तन ठरेल, सामाजिक परिवर्तन नव्हे. उदा. वेशभूषेतील बदल हे सांस्कृतिक परिवर्तन ठरेल. पूर्वी धोतर आणि बंडी

वापरणारा शेतकरी आज पँट व शर्ट वापरू लागला आहे. हा बदल सांस्कृतिक परिवर्तन आहे. पण या बदलाने सामाजिक संरचनेत बदल होत नसल्याने त्यास सामाजिक परिवर्तन म्हणता येणार नाही.

तसेच भाषा उच्चारण पद्धती, गायनपद्धती, संगीताची शैली, चित्रकला, शिल्पकला इत्यादीमधील बदल हे सांस्कृतिक परिवर्तन ठरेल. तथापि या बदलांमुळे सामाजिक संरचनेत किंवा सामाजिक आंतरक्रियांच्या व्यवस्थेत कोणताच बदल होत नसल्याने त्यांना सामाजिक परिवर्तन म्हणता येणार नाही. याउलट लोकरूढी, लोकनीती, कायदे यासारखी सामाजिक नियमने, श्रद्धा आणि मूल्ये इत्यादी संस्कृतीचे घटक असून ते सामाजिक संरचनेशी घनिष्ठपणे निगडीत असतात. त्यामुळे त्यांच्यात बदल झाल्यास सामाजिक संरचनेत बदल होतो. त्यामुळे अशा सांस्कृतिक बदलांना सामाजिक परिवर्तन म्हणता येते. याचाच अर्थ असा की प्रत्येक सामाजिक परिवर्तन हे सांस्कृतिक परिवर्तन असतेच. परंतू प्रत्येक सांस्कृतिक परिवर्तन हे सामाजिक परिवर्तन असेलच असे नाही. मात्र काही प्रकारच्या सांस्कृतिक परिवर्तनामुळे सामाजिक परिवर्तन घडून येण्यास चालना मिळू शकते. थोडक्यात सामाजिक परिवर्तन ही संकल्पना सांस्कृतिक परिवर्तन या संकल्पनेहून वेगळी आहे. सांस्कृतिक परिवर्तन ही अधिक व्यापक संकल्पना असून तिच्या तुलनेत सामाजिक परिवर्तन ही संकल्पना कमी व्यापक किंवा संकुचित स्वरूपाची आहे.

**सामाजिक परिवर्तन या संकल्पनेशी संबंधित असणाऱ्या काही इतर संकल्पनांचा अर्थ :**

सामाजिक परिवर्तन या संकल्पनेचा अर्थ अधिक सुस्पष्ट होण्यासाठी या संकल्पनेशी संबंधित असणाऱ्या उत्क्रांती, प्रगती, क्रांती, विकास इत्यादी संकल्पनांचा अर्थ थोडक्यात समजावून घेणे उचित ठरते. कारण काही समाजशास्त्रज्ञांनी सामजिक परिवर्तनाचे वर्णन व विश्लेषण करताना या संकल्पनांचा वापर केलेला आहे. या संकल्पनाद्वारे समाजात होणाऱ्या विशिष्ट प्रकारच्या परिवर्तनाचा निर्देश किंवा बोध होतो. म्हणून त्यांना सामाजिक परिवर्तनाच्या समानार्थी संकल्पना (kindred concepts) असे काहीवेळा म्हटले जाते. मात्र आज समाजशास्त्रज्ञांना असे वाटते की सामाजिक परिवर्तन आणि या इतर संकल्पनांमध्ये काहीतरी फरक आहे. मॅकायव्हर आणि पेज यांनी उत्क्रांती व प्रगती यांना सामाजिक परिवर्तनाची रूपे किंवा प्रकार (forms) मानलेले आहे. जर काही विचारवंत क्रांती, विकास, सुधारणा यांनाही सामाजिक परिवर्तनाचीच रूपे किंवा प्रकार मानतात. म्हणून या इतर संकल्पनांचा आपण थोडक्यात अर्थ समजावून घेणार आहोत.

१. **उत्क्रांती** (Evolution) :

उत्क्रांती म्हणजे वरच्या दिशेने मार्गाक्रमण करणे असा शब्दश: अर्थ आहे. ''एखाद्या पदार्थात साध्या, निम्न व एकजिनसी अवस्थेकडून संकीर्ण, उच्च व बहुजिनसी अवस्थेकडे क्रमाक्रमाने होणारे परिवर्तन किंवा स्थित्यंतर किंवा रूपांतरण म्हणजे उत्क्रांती होय. अशी व्याख्या आपणास करता येईल. हर्बर्ट स्पेन्सरच्या मते ''कोणताही पदार्थ सापेक्षत: निश्चित, असंबद्ध अशा एकजिनसीपणाकडून सापेक्षत- अनिश्चित असंबद्ध अशा बहुजिनसीपणाकडे संक्रमित किंवा परिवर्तीत होणे म्हणजे उत्क्रांती होय.''

मॉरिस गिन्सबर्गच्या मते उत्क्रांती ही परिवर्तनाची अशी प्रक्रिया आहे जी कोणत्याही वस्तूत काही तरी नाविन्य निर्माण करते आणि संक्रमण रूपात क्रमबद्ध निरंतरता व्यक्त करते.

वरील व्याख्यांच्या आधारे उत्क्रांतीसंबंधी पुढील मुद्दे आपणास मांडता येतात.

१. उत्क्रांती ही सर्वव्यापी वा सर्व समावेशक प्रक्रिया आहे. सृष्टीतील सर्वच पदार्थात एवढेच नव्हे तर समाज, संस्कृती, सामाजिक संस्था यांच्यामध्येही उत्क्रांत होण्याचे तत्त्व अंगभूत असते.

२. उत्क्रांती ही विविध अवस्थांमधून होत असते. साध्या अवस्थेकडून संकीर्ण अवस्थेकडे प्रत्येक पदार्थ उत्क्रांत होत जातो. एका अवस्थेनंतर दुसऱ्या अवस्थेची लक्षणे हळूहळू प्रकट होत असतात. तथापि पुढील अवस्थेची लक्षणे ही अगोदरच्या अवस्थेत सुप्त स्वरूपात असतात. प्रत्येक अवस्था ही मागील अवस्थेपेक्षा अधिक उन्नत, चांगली व उच्च दर्जाची असते.

३. उत्क्रांतीत पदार्थामध्ये संख्यात्मक व गुणात्मक परिवर्तन होत असते. संख्यात्मक परिवर्तन म्हणजे पदार्थात वाढ किंवा वृद्धी होणे म्हणजे आकाशात बदल होणे होय. तर गुणात्मक परिवर्तन म्हणजे पदार्थाच्या गुणधर्मात म्हणजे संरचनेत परिवर्तन होणे होय.

४. उत्क्रांती ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. कारण उत्क्रांत होत जाणे हा पदार्थांचा स्वभावच आहे. म्हणून उत्क्रांती ही मानवी हस्तक्षेपापासून मुक्त आहे.

५. उत्क्रांती ही जैविक व सामाजिक अशा दोन प्रकारची आहे. डार्विन या शास्त्रज्ञाने जीवसृष्टी ही साध्या म्हणजेच एकपेशीय जीवापासून अत्यंत संकीर्ण शरीररचना असलेल्या जीवापर्यंत क्रमाक्रमाने उत्क्रांत होत आलेली आहे असे मत मांडले आहे. यालाच जैविक उत्क्रांती असे म्हणतात. डार्विनच्या विचाराने प्रभावित होऊन हर्बर्ट स्पेन्सर व इतर काही समाजशास्त्रज्ञांनी असे मत मांडले की समाज, सामाजिक संस्था संस्कृती या गोष्टी देखील उत्क्रांतीच्या तत्त्वानुसार साध्या अवस्थेकडून संकीर्ण अवस्थकेडे क्रमाक्रमाने विकसित किंवा परिवर्तीत होत आलेल्या आहेत. यालाच सामाजिक उत्क्रांती असे म्हणतात. मानव समाज हा वन्य अवस्था, रानटी अवस्था व सभ्य अवस्था या अवस्थांमधून उत्क्रांत होत आलेला आहे. विवाहसंस्थाही लैगिंक स्वैराचार, समूह विवाह, बहुविवाह, एक विवाह या अवस्थांमधून उत्क्रांत होत आलेली आहे.

अशा प्रकारे स्पेन्सर, टायलर, मॉर्गन इत्यादींनी सामाजिक परिवर्तनाच्या विश्लेषणासाठी सामाजिक उत्क्रांतीची संकल्पना वापरलेली आहे.

२. **प्रगती** (Progress) :

उत्क्रांतीप्रमाणेच प्रगती हे सामाजिक परिवर्तनाचा महत्त्वाचा प्रकार आहे. आरंभीच्या समाजशास्त्रज्ञांच्या लिखाणात प्रगतीची संकल्पना ही उत्क्रांतीच्या संकल्पनेशी घनिष्टपणे निगडीत असलेली आढळते. कॉम्ट, स्पेन्सर, वाड्र, हॉबहाऊस यासारख्या समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक प्रगतीच्या दृष्टिकोनातून समाजाचा अभ्यास केलेला आहे. अनेक समाजशास्त्रज्ञांनी तर उत्क्रांती व प्रगती या संज्ञा आदलून बदलून वापरलेल्या आहेत. त्यामुळे प्रगती या संज्ञेचा नेमका अर्थ समजावून घेणे आवश्यक ठरते. प्रगती म्हणजे वेगाने पुढे पुढे जाणे असा शब्दश: अर्थ आहे. ''आदर्श मानल्या गेलेल्या ध्येयाच्या पूर्ततेच्या दिशेने होणाऱ्या परिवर्तनास प्रगती

असे म्हणता येईल.'' ऑग्बर्न व निमकॉफ यांच्या मते चांगल्या हेतुच्या पूर्ततेसाठी घडवून आणलेले परिवर्तन म्हणजे प्रगती होय. लेस्टर वार्ड यांच्या मते ज्या परिवर्तनामुळे मानवी सुखात भर पडते त्यास प्रगती असे म्हणतात.''

वरील व्याख्यांच्या आधारे प्रगतीविषयी पुढील मुद्दे आपणास सांगता येतात.

१. प्रगती हे निश्चित दिशेने होणारे परिवर्तन असते. ही दिशा समाज आपल्या मूल्यांच्या आधारे निश्चित करीत असतो. वेगवेगळ्या समाजांची मूल्ये वेगवेगळी असल्याने त्यांची प्रगतीची कल्पना ही वेगवेगळी असू शकते.

२. प्रगतीमध्ये निश्चित ध्येय किंवा उद्दिष्ट असते. हे ध्येय देखील समाजाच्या मूल्यांधारे निर्धरित केले जाते. हे ध्येय साध्य करण्यासाठी प्रगतीवर कोणत्या ना कोणत्या प्रकारचे नियंत्रण ठेवले जाते. त्यामुळे प्रगतीस नियोजित परिवर्तन असे आपण म्हणू शकतो.

३. प्रगतीत चांगले किंवा इष्ट परिवर्तन अभिप्रेत असते. म्हणून प्रगतीमुळे समाजाची उन्नती होत असते. मानवी सुखात वाढ होत असते.

४. प्रगती आपोआप होत नसते. त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. प्रगतीचा मार्ग विशिष्ट दिशेने वळवावा लागतो. प्रगतीसाठी दूरदृष्टी असलेल्या नेतृत्त्वाची गरज असते.

५. प्रगती ही वैयक्तिक तसेच सामाजिक अशा दोन प्रकारची असते. वैयक्तिक प्रगती म्हणजे एखाद्या व्यक्तीने स्वत:च्या जीवनात विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन अपेक्षित परिवर्तन घडवून आणणे होय. तर सामाजिक प्रगती म्हणजे समाजाने आपल्या सामूहिक जीवनात विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन अपेक्षित परिवर्तन घडवून आणणे होय. जेंव्हा समाजात आरोग्य, शिक्षण, रोजगार इत्यादी बाबतच्या चांगल्या व पुरेशा सुविधा उपलब्ध होतात. तेव्हा अशा समाजास प्रगत समाज म्हटले जाते. यासंदर्भात प्रा. हॉर्नेल म्हणतात की, ''सामाजिक संरचनेतील ज्या बदलांमुळे मानवाची कार्ये मुक्त होतात, त्यांना उत्तेजन मिळते, ती अधिक सुलभ व एकात्म होतात. त्या बदलांना सामाजिक प्रगती असे म्हणतात.''

३. **क्रांती** (Revolution) :

क्रांती हा देखील सामाजिक परिवर्तनाचा एक विशिष्ट प्रकार किंवा रूप आहे. आकस्मिक किंवा झटपट बदल (sudden change), उग्र किंवा समग्र बदल (redical or complete change), मौलिक किंवा मूलभूत बदल (fundamental change), जुने मोडून त्याजागी नवीन आणणे इत्यादी अर्थाने क्रांती ही संज्ञा वापरली जाते. सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने विचार करता, ''क्रांती म्हणजे समाजाच्या कोणत्याही क्षेत्रात किंवा व्यवस्थेत मूलभूत बदल घडून येणे म्हणजेच प्रस्थापित व्यवस्था नष्ट करून तिच्या जागी नविन व्यवस्था आणणे होय.'' राज्यक्रांती, औद्योगिक क्रांती, हरितक्रांती इत्यादी संज्ञा हाच अर्थ सूचित करतात. वरील विवेचनावरून क्रांतीसंबंधी पुढील मुद्दे सांगता येतात.

१. क्रांती ही आपोआप होत नाही. समाजातील एखादा शक्तीशाली समूह किंवा संघटना प्रभावशाली नेतृत्त्वाच्या मार्गदर्शनानुसार प्रयत्नपूर्वक क्रांती घडवून आणतो.

२. क्रांती ही हिंसक किंवा अहिंसक असू शकतो. राज्य क्रांतीसाठी हिंसक मार्गाचा अवलंब केला जाऊ शकतो. उदा. फ्रेंच राज्यक्रांती व रशियन राज्यक्रांती. तथापि अहिंसक मार्गानेही राज्यक्रांती होऊ शकते. उदा. भारताचा स्वातंत्र्य लढा, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक क्षेत्रांतील क्रांतीसाठी बहुधा हिंसक मार्गाची गरज भासत नाही.

क्रांतीमुळे प्रस्थापित व्यवस्थेत मूलभूत वा आमूलाग्र परिवर्तन घडून येत असते. उदा. औद्योगिक क्रांतीमुळे उत्पादन व्यवस्थेत तर हरितक्रांतीमुळे अन्नधान्य उत्पादन व्यवस्थेत मूलभूत बदल धडून आले. फ्रेंच राज्यक्रांतीमुळे राजेशाहीच्या जागी लोकशाही व्यवस्था तर रशियन राज्यक्रांतीमुळे सामंतशाहीच्या जागी साम्यवादी व्यवस्था उदयास आली.

३. क्रांतीमुळे विशिष्ट क्षेत्रात किंवा व्यवस्थेत मूलभूत बदल तर होतातच शिवाय क्रांतीचे इतर क्षेत्रावर वा व्यवस्थावरही व्यापक व दूरगामी परिणाम होत असतात. उदा. औद्योगिक क्रांतीमुळे आर्थिक क्षेत्रात तर मूलभूत बदल झालेच, शिवाय कुटुंब, विवाह, शिक्षण, धर्म इत्यादी व्यवस्थांमध्येही महत्त्वपूर्ण बदल घडून आले.

५. उत्क्रांती व क्रांती यांच्यात महत्त्वपूर्ण फरक आहेत. उत्क्रांती नैसर्गिक तर क्रांती मानवनिर्मित प्रक्रिया आहे. उत्क्रांती मंद गतीने तर क्रांती जलदगतीने घडून येते. उत्क्रांतीस प्रदीर्घ कालावधी (हजारो वर्षे) लागू शकतो. याउलट क्रांती ही एका वर्षात, एका महिन्यात किंवा एका रात्रीतही होऊ शकते.

४. **विकास** (Development) :

विकास ही देखील सामाजिक परिवर्तनाशी संबंधित असलेली एक संकल्पना आहे. पुढील दिशेने होणारे परिवर्तन किंवा प्रगतीशील परिवर्तन या अर्थाने विकास ही संज्ञा वापरली जाते. ''इच्छित किंवा अपेक्षित दिशेने निरंतरपणे होणारे परिवर्तन म्हणजे विकास होय.'' अशी आपणास व्याख्या करता येईल. विकासाची दिशा ही सामाजिक मूल्यांनुसार निर्धारित केली जाते. त्यामुळे प्रगतीप्रमाणेच विकास ही संकल्पना देखील मूल्यभारीत (value laden) किंवा मूल्यप्रभावित आहे. अलिकडील काळात मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रात विकास घडवून आणण्याचे प्रयत्न केले जात आहेत. त्यानुसार आर्थिक विकास, सामाजिक विकास, राजकीय विकास, सांस्कृतिक विकास इत्यादी संज्ञा वापरल्या जातात. व्यवहारात विकास म्हणजे आर्थिक विकास असाच अर्थ सामान्य माणूस घेताना दिसतो. अभिजात अर्थशास्त्रीय साहित्यात आर्थिक विकास म्हणजे एकूण राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होणे, दरडोई उत्पन्नात वाढ होणे, राष्ट्रीय बचतीत व भांडवलात वाढ होणे असा अर्थ घेतलेला दिसतो. वर्तमानकाळात मात्र विकास ही संकल्पना अधिक व्यापक अर्थाने वापरली जाते. संयुक्त राष्ट्रसंघाच्या तज्ज्ञ समितीच्या मते ''विकासाचा संबंध मानवाच्या केवळ भौतिक गरजांशी नसून तो त्याच्या जीवनाच्या सामाजिक परिस्थितीतील सुधारणेशी आहे. विकास म्हणजे केवळ आर्थिक वृद्धी (वाढ) नव्हे, तर वृद्धीबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक, संस्थागत तसेच आर्थिक परिवर्तन होय.'' यावरून

''विकास म्हणजे मानवी कल्याणाच्या दृष्टिने आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक इत्यादी क्षेत्रात आवश्यक ते परिवर्तन घडून येणे.'' अशीही व्याख्या करता येईल.

समाजशास्त्राच्या दृष्टीने सामाजिक विकास ही संकल्पना महत्त्वाची ठरते. तथापि सार्वत्रिक स्वरूपात स्वीकारली जाईल अशी विकासाची व्याख्या समाजशास्त्रात आढळत नाही. टी. बी. बॉटमोर (T. B. Battomore) या समाजशास्त्राने नमूद केल्याप्रमाणे अलिकडील समाजशास्त्रीय लिखाणात विकास ही संकल्पना औद्योगिकदृष्टया प्रगत असलेले समाज आणि अल्प उत्पन्न असलेले ग्रामीण व कृषक समाज जे आज औद्योगिक समाज बनण्याच्या मार्गावर आहेत. अशा या दोन प्रकारच्या समाजातील फरक दाखविण्यासाठी वापरली जाते. डब्लू. डब्लू. रास्टो या अर्थशास्त्रज्ञाच्या मते ''सामाजिक विकास हे सामाजिक संबंधात होणाऱ्या परिवर्तनाचेच दूसरे नाव आहे, ज्याची अभिव्यती ही आर्थिक विकासाद्वारे होत असते.'' म्हणून सामाजिक विकासाच्या संकल्पनेत समाजात होणाऱ्या परिवर्तनाचे मापन करण्यासाठी अनेक आर्थिक-सामाजिक निकष विचारात घेतले जातात. समाजशास्त्रीयदृष्ट्या 'सामाजिक विकास' ही संकल्पना समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, सामाजिक न्याय इत्यादी मूल्यांनुसार निरंतरपणे होणाऱ्या विकासाच्या प्रक्रियेसाठी वापरता येईल. समाजात कोणत्याही प्रकारचा भेदभाव, शोषण व दमन नसणे आणि आर्थिक, सामाजिक व राजकीय संबंधातील अप्रमाणबद्धता (asymmetries) किंवा असमतोल कमी होणे ही सामाजिक विकासाची वैशिष्ट्ये मानता येतील. थोडक्यात सामाजिक विकास ही संकल्पना सामाजिक मुल्यांनुसार सामाजिक संबंधात होणाऱ्या परिवर्तनाचा निर्देश करते. म्हणून सामाजिक विकास हे विशिष्ट प्रकारचे सामाजिक परिवर्तनच असते.

**सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये :**

(Nature and characteristics of social change)

सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप व वैशिष्ट्ये खालील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येतील.

१. **सार्वत्रिक घटना** (Universal Phenomenon) :

सामाजिक परिवर्तन ही सार्वत्रिक स्वरूपाची घटना आहे. म्हणजे जगातील सर्वच समाजात सामाजिक परिवर्तन घडून येत असते. कोणताही समाज पूर्णत: स्थितीशील नसतो. समाज मग तो आदिम असो, ग्रामीण असो की नागर असो. अथवा प्रगत असो वा अप्रगत असो त्यामध्ये सामाजिक परिवर्तन होत असतेच. फक्त त्याची गती तेवढी कमी जास्त असते. काही समाजात मंदगतीने तर काही समाजात जलदगतीने सामाजिक परिवर्तन होत असते.

२. **निरंतर प्रक्रिया** (Continuous process) :

सामाजिक परिवर्तन ही निरंतरपणे (सातत्याने) घडणारी प्रक्रिया आहे. समाजात होणारे काही बदल हे आपणास जाणवणारे किंवा दृश्य स्वरूपाचे असतात. मात्र काही बदल हे आपणास न जाणवणारे म्हणजेच अज्ञात असू शकतात. जर आपण मानव समाजांचा बारकाईने अभ्यास केला तर आपल्या लक्षात येईल की प्राचीन काळापासून अर्वाचीन काळापर्यंत मानव समाज आमूलाग्रपणे व निरंतरपणे बदलत आलेले आहेत. आतासुद्धा आपला समाज बदलत असलेला दिसून येतो. जागतिकीकरणाची प्रक्रिया आणि माहिती तंत्रज्ञान

यामुळे समाजात वेगाने बदल होत आहेत. जुन्या गोष्टींच्या जागी नविन गोष्टी येत आहेत. तथापि जुन्या व नव्या गोष्टीत खंड (break) नसतो. परिवर्तनामुळे जुनी व्यवस्था व नविन व्यवस्था यांच्यात पडदा किंवा भिंत निर्माण होत नाही. याउलट परिवर्तन ही जुन्या व नवीन व्यवस्थेतील एक अवस्था असते. परिवर्तन हे नविन व्यवस्था निर्माण करण्यासाठी जुनी व्यवस्था, पूर्णत: ना खंडीत करते, ना नष्ट करते. अशा प्रकारे परिवर्तन ही रूपांतरणाची एक अखंड वा निरंतर प्रक्रिया आहे.

३. **बहुलघटकीय आणि संकीर्ण घटना** (Multi-factoral and complex phenomenon) :

सामाजिक परिवर्तन हे केवळ एक वा दोन घटकांमुळे घडून येत नसते. तर अनेक घटकांच्या संयुक्त किंवा एकत्रित प्रभावामुळे समाजात परिवर्तन घडून येत असते. सामाजिक जीवनाची विविध अंगे किंवा क्षेत्रे ही परस्परांशी निगडीत असतात. त्यामुळे एका क्षेत्रातील परिवर्तनामुळे इतर क्षेत्रातही सहेतुकपणे किंवा निर्हेतुकपणे परिवर्तन घडून येत असते. त्यामुळे सामाजिक परिवर्तन ही अतिशय संकीर्ण अशी घटना असते. त्यामुळे केवळ एखाद्याच सिद्धांताच्या आधारे सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप स्पष्ट करणे सोपे नसते. थोडक्यात सामाजिक परिवर्तन ही संकीर्ण घटना असून त्यास अनेक घटक जबाबदार असतात.

४. **नियोजित किंवा अनियोजित** (Planned or unplanned) :

परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. निसर्गातील सर्वच घटकांत परिवर्तन होत असते. मानव समाजातही परिवर्तन होत असते. तथापि समाजातील हे परिवर्तन नियोजित किंवा अनियोजित असू शकते. आपल्या समाजात परिवर्तन करू इच्छिणाऱ्या लोकांच्या सक्रिय सहभागामुळे जे परिवर्तन घडून येते ते नियोजित परिवर्तन ठरते. उदा. पंचवार्षिक योजना आणि विकास प्रकल्प यांच्या अंमलबजावणीमुळे भारतीय समाजात घडून आलेले परिवर्तन हे नियोजित परिवर्तन आहे. याउलट लोकांची इच्छा व सहभाग नसतानाही समाजात जे परिवर्तन घडून येते ते अनियोजित परिवर्तन असते. उदा. नैसर्गिक आपत्तीमुळे (भूकंप, चक्रीवादळे, त्सुनामी लाटा इ.) समाजात होणारे परिवर्तन हे अनियोजित परिवर्तन ठरते.

५. **संरचनात्मक कार्यात्मक परिवर्तन** (Structural-functional change) :

अधिक काटेकोरपणे बोलावयाचे झाल्यास सामाजिक परिवर्तन म्हणजे समाजाच्या संरचनेत व कार्यात होणारे परिवर्तन असते. सामाजिक परिवर्तनामुळे व्यक्तिच्या जीवनातही बदल होत असतात. तथापि व्यक्तिच्या जीवनात होणाऱ्या बदलात सामाजिक परिवर्तन म्हटले जात नाही. सामाजिक संस्था, सामाजिक स्तरीकरण व्यवस्था, सामाजिक मूल्ये व नियमने, सामाजिक आंतरक्रियांची व्यवस्था इत्यादीतील बदलांनाच प्रामुख्याने सामाजिक परिवर्तन म्हटले जाते. या सर्व बाबी ह्या समाजाचे संरचनात्मक व कार्यात्मक पैलू आहेत. म्हणून त्यांच्यातील परिवर्तन हे सामाजिक परिवर्तन ठरते.

६. **कालसंबंद्ध परिमाण** (Temporal dimension) :

सामाजिक परिवर्तन घडून येण्यासाठी प्रदीर्घ कालावधी लागतो. त्यामुळे सामाजिक परिवर्तनास काल परिमाण असते. सामाजिक परिवर्तनामुळे समाजाच्या परिस्थितीत फरक पडत असतो आणि असा फरक होण्यासाठी प्रदीर्घ कालावधी लागतो. मॅकायव्हर म्हणतात त्याप्रमाणे समाजाची जडणघडण सतत चालू

असते. समाजात सातत्याने नविन शोध लागत असतात. नविन मूल्ये तंत्रे व विचारसरणी उदयास येत असतात. त्यामुळे सामाजिक परिवर्तनास चालना मिळत असते आणि त्यासाठी बराच मोठा कालावधी लागत असतो.

**७. गती भिन्नता** (Difference of rate) :

सामाजिक परिवर्तनाची गती ही वेगवेगळ्या कालखंडात व वेगवेगळ्या समाजात वेगवेगळी असते. कोणत्याही समाजात सामाजिक परिवर्तनाची गती किंवा वेग काही वेळा मंद तर काही वेळा शीघ्र असते. उदा. १७ व्या शतकापर्यंत भारतीय समाजातील परिवर्तनाची गती खूपच मंद होती. लोक त्यांच्या रूढीपरंपरांचे पालन आंधळेपणाने करीत होते. युद्ध आणि वेगवेगळे आजार यामुळे लोकांचे आयुर्मान खूपच कमी होते. तथापि १८ व्या व १९ व्या शतकात विविध यांत्रिक व तांत्रिक शोध लागले. त्यामुळे उद्योग, व्यापार, वैद्यक, कृषी इत्यादी क्षेत्रांचा विकास सुरू झाला. पुरेसे अन्नधान्य उपलब्ध होऊ लागले. आधुनिक औषधोपचार उपलब्ध होऊ लागले. त्यामुळे लोकांचे आयुर्मान वाढले. त्यामुळे १९ व्या शतकात परिवर्तनाची गती खूपच वाढली. शतकानुशतके चालत आलेल्या रूढी परंपरा व जीवनपद्धतीत बदल घडून आले. अशाप्रकारे परिवर्तनाची गती वेगवेगळ्या कालखंडात वेगवेगळी असते. त्याचबरोबर वेगवेगळ्या समाजातील परिवर्तनाची गती ही भिन्न भिन्न असते. काही समाजात मंदगतीने तर काही समाजात जलदगतीने परिवर्तन होत असते. उदा. आदिम समाजात मंदगतीने तर औद्योगिक नागर समाजात जलदगतीने परिवर्तन होताना दिसते.

**८. दिशा** (Direction) :

सामाजिक परिवर्तनास दिशा असते. सामाजिक परिवर्तन हे समाजास प्रगतीच्या दिशेने नेणारे जसे असते तसेच ते काही वेळा अधोगतीच्या दिशेने नेणारे ही असू शकते. सामाजिक परिवर्तनाच्या दिशेच्या संदर्भात समाजशास्त्रज्ञांनी एक दिशावती सिद्धांत, अनेक दिशावर्ती सिद्धांत, चक्राकार सिद्धांत असे वेगवेगळे सिद्धांत मांडलेले आहेत. एक दिशावर्ती सिद्धांतानुसार सामाजिक परिवर्तन हे एकाच दिशेने सरळ रेषेत होत असते. अनेक दिशावर्ती सिद्धांतानुसार परिवर्तन हे वृक्षाच्या फांद्या जसा अनेक दिशांना पसरतात तसे अनेक दिशेने होत असते. तर चक्राकार सिद्धांतानुसार सायकलचे चाक जसे गोलाकार दिशेने फिरते तसे सामाजिक परिवर्तन हे ही गोलाकार दिशेने होत असते.

**९. परस्पर निगडीत** (Inter-connection) :

समाजात होणारे परिवर्तन किंवा बदल हे परस्परांशी निगडीत असतात. जेंव्हा समाजाच्या एका क्षेत्रात बदल होतो तेंव्हा त्याचा प्रभाव पडून इतर क्षेत्रातही बदल घडून येत असतात. उदा. स्त्री शिक्षणामुळे परस्परांशी निगडीत असलेले अनेक बदल समाजात घडून आले आहेत. स्त्री शिक्षणामुळे स्त्रियांना रोजगाराच्या संधी मिळू लागल्या. त्यामुळे त्यांचा दर्जा उंचावण्यास मदत झाली. एवढेच नव्हे तर विवाह, कुटूंब अर्थ इत्यादी सामाजिक संस्थांमध्येही बदल घडून येऊ लागले. शिकलेली स्त्री उशिरा विवाह (प्रौढ विवाह) करू लागली. स्वत:चा जोडीदार स्वत: निवडू लागली. केवळ एक किंवा दोन अपत्यांनाच जन्म देणे

पसंत करू लागली. संयुक्त कुटूंबात राहण्याऐवजी केंद्र कुटुंब स्थापन करण्यावर भर देऊ लागली. अशा प्रकारे एका क्षेत्रातील परिवर्तनाची प्रतिक्रिया म्हणून इतर अनेक क्षेत्रात परिवर्तनाची एक शृंखलाच सुरू होते. त्यामुळे सामाजिक परिवर्तन ही परस्परांशी निगडीत असतात.

१०. **तटस्थ संकल्पना** (Neutral concept) :

सामाजिक परिवर्तन ही तटस्थ संकल्पना आहे. कारण समाजात होणाऱ्या चांगल्या किंवा वाईट, योग्य किंवा अयोग्य, अपेक्षित किंवा अनपेक्षित अशा सर्व प्रकारच्या बदलांचा निर्देश सामाजिक परिवर्तन या संकल्पनेद्वारे होतो.

### ४.२.२ सामाजिक परिवर्तनाचे घटक :

या अध्ययन घटकात आपण सामाजिक परिवर्तनाचे घटक अभ्यासणार आहोत. काही समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक परिवर्तनास कोणतातरी एकच घटक जबाबदार असतो असे मानलेले आहे. उदा. ऑगस्त कॉम्ट यांच्या मते मानवी बुद्धीच्या विकासामुळे, एच. टी. बकल यांच्या मते भौगोलिक परिस्थितीमुळे विशेषत: हवामानामुळे, हर्बर्ट स्पेन्सर यांच्या मते, 'जे बलवान असतात ते टिकून राहतात' या निसर्ग निवडीच्या तत्त्वामुळे तर कार्ल मार्क्स यांच्या मते आर्थिक घटकामुळे म्हणजे उत्पादन पद्धतीतील बदलामुळे सामाजिक परिवर्तन घडून येते. परंतु ही मते एकांगी आहेत. कारण केवळ अमूक एकाच घटकामुळे परिवर्तन होत नसते. त्यास अनेक घटक जबाबदार असतात. या अध्ययन घटकात आपण सामाजिक परिवर्तनास जबाबदार असणाऱ्या काही निवडक घटकांची चर्चा करणार आहोत. ते पुढीलप्रमाणे आहेत –

१. भौतिक पर्यावरणातील घटक (Physical Environmental Factors)

२. लोकसंख्याशास्त्रीय घटक (Demographical Factors)

३. तंत्रविद्यात्मक घटक (Technological Factors)

४. सांस्कृतिक घटक (Cultural Factors)

५. आर्थिक घटक (Economic Factors)

हे सर्व घटक परस्परसंबंधित असून ते कधी एकसमवायच्छेदेकरून (simultaneously) तर कधी एकत्रीतपणे (collectively) सामाजिक परिवर्तन घडवून आणीत असतात. तथापि यातील प्रत्येक घटकाची सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यामध्ये काय भूमिका असते हे समजण्यासाठी त्या प्रत्येकाची स्वतंत्रपणे चर्चा आपण या अध्ययन घटकात करणार आहोत. येथे आणखीन एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे आणि ती म्हणजे प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ लॅपिअर म्हणतात त्याप्रमाणे हे घटक सामाजिक परिवर्तनाचे निर्धारक म्हणून कमी आणि मध्यस्थ म्हणून अधिक प्रमाणात कार्य करीत असतात. आता या प्रत्येक घटकाची सामाजिक परिवर्तनातील भूमिका तपासून पाहू.

## १. भौतिक पर्यावरणातील घटक :

या घटकांनाच भौगोलिक घटक असेही म्हणतात. प्रत्येक समाज निश्चित अशा भौतिक पर्यावरणात वास्तव्य करीत असतो. आणि त्या पर्यावरणाशी मिळतेजुळते घेऊनच त्या समाजाचे जीवन आकारास येत असते. भौतिक पर्यावरणात भूप्रदेश, तापमान, पर्जन्यमान, नद्या, पर्वत, वनस्पती, प्राणी, खनिजसंपत्ती इत्यादींचा समावेश होतो. या सर्व भौतिक घटकांचा समाजातील निवासस्थान, खाणेपिणे, पोषाख, आचारविचार, श्रद्धा व मूल्ये, सामाजिक संस्था, व्यवसाय, मालमत्ता इत्यादींच्या स्वरूपावर प्रभाव पडत असतो. उदा. वाळवंटातील समाजात भीषण पाणीटंचाई व अति उष्णतामान असते. त्यामुळे नदीकाठच्या व चांगल्या हवामानाच्या प्रदेशातील समाजाच्या तुलनेत वाळवंटातील समाजाची फारशी प्रगती होत नाही. प्राचीन मानवी संस्कृतींची भरभराट ही नदीकाठच्या व चांगल्या हवामानाच्या प्रदेशातच झालेली होती. कारण जीवनासाठी व शेती पिकण्यासाठी पाण्याची व उत्तम हवामानाची गरज असते. सध्या जागतिक तापमानात होणारी वाढ व हवामानातील बदल यांचा प्रभाव सर्वच भूप्रदेशातील समाजावर पडत आहे. पर्यावरणाचे होणारे प्रदूषण व ऱ्हास या गोष्टींचा प्रभाव पडून सर्वच समाजांना शाश्वत किंवा चिरंतन विकासाची (sustainable development) संकल्पना स्वीकारणे भाग पडत आहे. म्हणजेच भौतिक पर्यावरणाचा सामाजिक धोरण व विकासाची प्रक्रिया यांच्यावर प्रभाव पडत आहे. समाजाचे भौतिक पर्यावरण स्थिर नसते. त्यामध्ये सतत बदल होत असतात आणि त्यामुळे समाजात बदल होण्यास चालना मिळत असते. उदा. भौतिक पर्यावरणात ज्वालामुखीचा उद्रेक, भूकंप, वादळे, महापूर, अतिवृष्टी, अनावृष्टी होणे, कडाक्याची थंडी पडणे, हिमयुगाचा प्रारंभ व अस्त होणे, नद्यांचा प्रवाह बदलणे, जमिनीचा पृष्ठभाग पाण्याखाली जाणे, पाण्याखालील भाग वर येणे इत्यादी घटना घडत असतात आणि त्यांचा प्रभाव पडून मानव समाजात परिवर्तन घडून येत असते. जेव्हा प्रलयकारी भूकंप होतो तेव्हा मानवी वसाहतीत मोठे बदल घडून येतात. इ.स. १९९३ मध्ये महाराष्ट्रातील उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यात झालेल्या भूकंपामुळे अनेक गावे उध्वस्त झाली. माती व मोठे दगड वापरून बांधलेली घरे कोसळून शेकडो लोक मेले. त्यामुळे नंतर लोकांनी कमी वजनाचे साहित्य वापरून भूकंपविरोधी अशी नवीन घरे बांधली. डिसेंबर २००४ मध्ये त्सुनामी लाटांच्या तडाख्यामुळे तामिळनाडूच्या किनारपट्टीवरील वसाहती उध्वस्त झाल्या. जेव्हा एखाद्या प्रदेशात भयंकर दुष्काळ पडतो तेव्हा लोकांना अन्नपाण्याच्या शोधार्थ स्थलांतर करावे लागते. अतिवृष्टी होऊन नद्यांना महापूर आल्यास काठावरील अनेक गावे उध्वस्त होतात. सिंधू व तिच्या उपनद्यांना आलेल्या महापूरामुळे मोहोंजोदारो-हडप्पा संस्कृती नष्ट झाली असा एक तर्क आहे. महापूरामुळे नदीकाठावरील लोकांना स्थलांतर करावे लागते. सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील नद्यांना आलेल्या पुरामुळे लोकांना कसे स्थलांतर करावे लागले हे आपणास माहितच आहे. मध्यपूर्व आशियातील अनेक देशातील (सौदे अरेबिया व इतर) लोक पूर्वी अन्नपाण्याच्या शोधार्थ सतत भटकंती करीत. वाळवंटात तंबू ठोकून रहात. तथापि तेथे खनिज तेलाचे साठे सापडल्यानंतर मात्र या देशात अनेक आर्थिक-सामाजिक बदल वेगाने घडून आले. हे देश गर्भश्रीमंत बनले, वातानुकूलीत यंत्रणा असलेली महानगरे अस्तित्वात आली. लोकांची जीवनशैली उच्चभ्रू बनली. तेलउत्पादक राष्ट्रांची 'ओपेक' ही

संघटना उदयास आली. आंतरराष्ट्रीय राजकारणावर तिचा मोठा प्रभाव पडू लागला. अशाप्रकारे भौतिक घटकांमुळे अनेक सामाजिक, आर्थिक व राजकीय बदल घडून येतात.

भौतिक पर्यावरणातील बदलामुळे जसे सामाजिक परिवर्तन घडून येते तसेच मानवी कृतीमुळेही भौतिक पर्यावरणात बदल होऊन सामाजिक परिवर्तनास चालना मिळत असते. आपल्या गरजा भागविण्यासाठी मानव भौतिक साधनसंपत्तीचा वाटेल तसा उपयोग करतो. अधिक धान्य पिकविण्याच्या नादात जमिनीची सुपीकता टिकविण्याकडे दुर्लक्ष करतो. वृक्षलागवड न करताच बेसुमार वृक्षतोड करतो. नैसर्गिक साधनसंपत्ती टिकविण्याचे व पुन्हा निर्माण करण्याचे प्रयत्न करीत नाही. या सर्व गोष्टींचा भौतिक पर्यावरणावर प्रभाव पडून सामाजिक परिवर्तनास चालना मिळत असते. मानवाच्या अशा चुकीच्या कृतीमुळेच अनेक संस्कृती नष्ट झाल्या आहेत. आजही अनेक समाजात जमिनीची सुपीकता कमी होत आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीची टंचाई जाणवू लागली आहे. अशा घटनांमुळे गावे-शहरेच बदलत नसतात तर रीतीरिवाज, सामाजिक संस्था व जीवनपद्धतीही बदलत असते.

अशाप्रकारे भौतिक पर्यावरण व मानवी कृती यांचा एकमेकांवर सतत प्रभाव पडून सामाजिक परिवर्तन घडून येत असते.

**२. लोकसंख्याशास्त्रीय घटक :**

लोकसंख्येतील विविध घटकांमुळेही सामाजिक परिवर्तन घडून येत असते. लोकसंख्याविषयक बाबी ह्या जैविक घटकांशी निगडीत असतात. म्हणून लोकसंख्याशास्त्रीय घटकांना जैविक घटक असेही म्हणतात. लोकसंख्याशास्त्रीय घटकांत अनुवंशिकता व संकर, लोकसंख्येचा आकार व रचना, लिंगप्रमाण, जन्मप्रमाण, मृत्यूप्रमाण, कमावत्या व्यक्तींचे प्रमाण, तरूणांचे प्रमाण, वृद्ध लोकांचे प्रमाण, अपंगांचे प्रमाण, लोकसंख्येचे ग्रामीण व शहरी विभागात झालेले विभाजन, बालमृत्यूचे प्रमाण, लोकांचे आयुर्मान, स्थलांतर इत्यादी बाबींचा समावेश होतो. या विविध लोकसंख्याविषयक बाबीत बदल घडून येत असतात. आणि या बदलांचा प्रभाव समाजव्यवस्थेवर पडून सामाजिक परिवर्तनास चालना मिळत असते. काही प्रमुख लोकसंख्याशास्त्रीय घटकांमुळे घडून येणाऱ्या परिवर्तनाचे स्वरूप पुढीलप्रमाणे सांगता येईल -

**१) आनुवंशिकता व संकर :** या दोन जैविक तत्वांमुळे सामाजिक परिवर्तनास चालना मिळत असते. स्त्री व पुरूष यांच्या संकरातून नवीन पिढी जन्माला येते आणि आनुवंशिकतेच्या तत्त्वानुसार नव्या पिढीला आपल्या मातापित्याची गुणवैशिष्ट्ये प्राप्त होतात. तरी पण नवीन पिढी ही तंतोतंत मागच्या पिढीसारखी नसते. गुण व शक्ती यांच्या दृष्टीने नवीन पिढी (अपत्ये) ही मागच्या पिढीहून (माता-पित्याहून) बरीचशी वेगळी असते. मागच्या पिढीपेक्षा नवीन पिढीला नवे ज्ञान, नवे अनुभव प्राप्त होत असतात. तसेच नवीन पिढीला नाविन्याचीही आवड असते. त्यामुळे साहजिकच दोन पिढ्यांत भिन्नता निर्माण होते व याचा परिणाम म्हणून परिवर्तनास वाव मिळत असतो. वेगवेगळ्या वंशातील, वर्णातील, जातीतील, वर्गातील, राष्ट्रातील स्त्री पुरूषांत संकर घडून आल्यास भिन्नतेचे प्रमाण वाढत जाते. अलिकडील काळात अशा संकराची व्याप्ती वाढल्याने दोन पिढयात भिन्नता वाढून सामाजिक परिवर्तनास चालना मिळत आहे. लहान व सजातीय

समाजापेक्षा मोठ्या व संमिश्र समाजात संकराचे प्रमाण अधिक असते व त्यामुळेपरिवर्तनास अधिक वाव मिळतो.

२) **लोकसंख्येची रचना व आकार :** लोकसंख्येच्या रचनेत व आकारात बदल झाल्यानेही सामाजिक परिवर्तन घडत असते. समाजाच्या लोकसंख्येत वाढ वा घट झाल्याने परिवर्तनास वाव मिळतो. समाजातील जन्मदर जास्त व मृत्यूदर कमी असल्यास लोकसंख्येत अतिरिक्त वाढ होऊन त्यातून अनेक समस्या उद्भवतात. त्यामुळे समाजजीवन ढवळून निघते व परिवर्तन घडून येते. भारतात अतिरिक्त लोकसंख्येमुळे दारिद्र्य, बेकारी, गलिच्छ वस्त्यांची वाढ, अनारोग्य, गुन्हेगारी अशा अनेक समस्या निर्माण होऊन परिवर्तनास चालना मिळाली आहे. याउलट मूत्यूदर जास्त व जन्मदर कमी असेल तर समाजाची लोकसंख्या घटत जाते. अशा समाजात साधनसंपत्तीचा पुरेपूर वापर करून घेता येत नाही. मनुष्यबळ अपूरे पडू लागते, समजाची कार्यक्षमता कमी होते. संरक्षणविषयक प्रश्न निर्माण होतात. अशा समस्यांमुळेही परिवर्तनास चालना मिळते. अमेरिका, जर्मनी यासारख्या देशांत घटत्या लोकसंख्येमुळे अशा समस्या निर्माण होऊन परिवर्तनास चालना मिळाली आहे. अलिकडील काळात वैद्यकशास्त्रातील प्रगतीमुळे संतती नियमनांची साधने उपलब्ध होऊन त्यांच्याद्वारे जन्मप्रमाण कमी करणे व वैद्यकीय व आरोग्यविषयक सोयीसुविधा पुरवून मृत्यूप्रमाण कमी करणे शक्य झाले आहे. जन्म व मृत्यू प्रमाणावर काही प्रमाणात नियंत्रण ठेवणे शक्य झाल्यानेही लोकसंख्येच्या आकारात बदल होऊन सामाजिक परिवर्तन घडून येत आहे. उदा. भारतात कुटुंब नियोजनाच्या प्रसारामुळे गर्भपात, लहान कुटुंब, उच्च जीवनमान या गोष्टी काही प्रमाणात साध्य होत आहेत. त्यामुळे भारतातील विवाह, कुटुंब, धर्म या संस्थांमध्ये बदल होत आहेत. उच्च जीवनमान टिकविण्याच्या अपेक्षेने प्रगत समाजात संततीस (मुलेबाळे) पूर्वीसारखे संपत्ती न मानता आर्थिक ओझे मानण्याची प्रवृत्ती अनेक समाजात वाढत चालली आहे. त्यामुळेच काही समाजात विवाह न करणे, केल्यास संतती न होऊ देणे, अथवा एखादेच मूल होऊ देणे या गोष्टी अनेक स्त्री-पुरूष पसंत करू लागले आहेत. म्हणजेच त्यांच्या अभिवृत्तीत व मूल्यांत बदल होऊ लागला आहे.

३) **लिंग आणि वय :** लोकसंख्येतील स्त्री-पुरूष प्रमाणात बदल झाल्यासही सामाजिक परिवर्तन घडू शकते. स्त्री-पुरूष प्रमाण बहुतांशी समान असेल तर एकविवाहाची प्रथा रूढ होते. परंतु पुरूषापेक्षा स्त्रियांचे प्रमाण खूपच जास्त असेल तर बहुपत्नीत्वाची प्रथा आणि पुरूषापेक्षा स्त्रियांचे प्रमाण खूपच कमी असेल तर बहुपतित्वाची प्रथा रूढ होऊ शकते.

समाजात तरूण व प्रौढ व्यक्तींपेक्षा (कमावत्या) लहान व वृद्ध व्यक्तींची (न कमावत्या) संख्या खूपच जास्त असेल तर मनुष्यबळाचा तुटवडा जाणवतो व या गोष्टीचेही समाजजीवनावर परिणाम होऊन परिवर्तनास वाव मिळतो.

४) **स्थलांतर :** समाजातील लोकसंख्येचे एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात किंवा एका समाजातून दुसऱ्या समाजात स्थलांतर होत असेल तर सामाजिक परिवर्तनास चालना मिळते. औद्योगिक क्रांतीनंतर जगात सर्वत्रच नागरीकरणाची गती वाढू लागली. उद्योग, व्यापार, रोजगार, शिक्षण इत्यादीची केंद्रे बनलेल्या

शहरांकडे खेड्यातील लोक स्थलांतर करू लागले. त्यामुळे कुटुंबव्यवस्था, आप्तसंबंध, धर्मश्रद्धा, सामाजिक मूल्ये व जीवनपद्धती इत्यादीत मोठे बदल घडून आले आहेत. भारतासारख्या समाजात तर खेड्यांकडून शहरांकडे लोकांचे होणारे स्थलांतर ही बाब खेडे व शहर या दोघांच्याही दृष्टीने अनेक समस्या निर्मितीस आणि म्हणून परिवर्तनाला कारणीभूत ठरत आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत उच्चशिक्षीत व प्रशिक्षीत व्यक्ती जगात जेथे कोठे रोजगाराच्या व करिअर विकासाच्या संधी मिळतील तेथे स्थलांतर करू लागल्या आहेत. त्यामुळे सामाजिक परिवर्तनास मोठी चालना मिळाली आहे.

अशाप्रकारे लोकसंख्याविषयक घटकांत परिवर्तन होऊन सामाजिक परिवर्तन घडून येण्यास वाव मिळत असतो.

**३) तंत्रविद्यात्मक घटक :** तंत्रविद्यात्मक घटकांमुळे समाजात आमूलाग्र, सर्वस्पर्शी व संकीर्ण असे बदल घडून आले आहेत. म्हणून अनेक विचारवंतांनी (उदा. ऑर्म्बन, व्हेबलेन) तंत्रविद्यात्मक घटकांना सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी व प्राथमिक घटक मानलेले आहे. विज्ञानाच्या वाढीबरोबरच तंत्रविद्येची म्हणजेच तंत्रज्ञानाची वाढ झाली आणि त्याचा मानवी जीवनाच्या सर्व पैलूंवर प्रभाव पडून सामाजिक परिवर्तनास कल्पनातीत गती मिळाली आहे. तंत्रज्ञानाने घडून आलेल्या सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप समजावून घेण्यापूर्वी तंत्रज्ञान म्हणजे काय व तंत्रज्ञानाची विविध क्षेत्रे कोणती आहेत याचा संक्षिप्त परिचय करून घेऊ.

मानवी जीवनातील समस्या सोडविण्यासाठी वैज्ञानिक ज्ञानाचा उपयोग करण्याच्या प्रयत्नातून तंत्रज्ञान उदयास आलेले आहे. त्यामुळे तंत्रज्ञान हे मूलत: उपयुक्ततावादी आहे. विविध क्षेत्रातील वैज्ञानिक शोधावर आधारलेली तंत्रे (Techniques) मानवाने निर्माण केलेली आहेत. मानवी जीवनातील समस्या सोडविण्यासाठी या तंत्रांचे उपयोजन (वापर) कसे करावयाचे याचे ज्ञान म्हणजे तंत्रज्ञान होय अशी व्याख्या आपणास करता येईल. यावरून तंत्रज्ञान ही संज्ञा तंत्र या संज्ञेपेक्षा अधिक व्यापक आहे हे स्पष्ट होते. त्यामध्ये ज्ञानाचे उपयोजन, उपयोजनाची पद्धती व समस्या असे तीन घटक समाविष्ट आहेत. विशिष्ट समस्या सोडविण्यासाठी वैज्ञानिक ज्ञानाचे उपयोजन करण्याची विशिष्ट कार्यपद्धती (procedure) विकसीत केली की तंत्रज्ञानाचा उदय होतो. आधुनिक काळात तंत्रज्ञानाची नेत्रदिपक प्रगती झाली असून त्याची विविध क्षेत्रे सातत्याने विकसीत होत आहेत. उदा. उत्पादन तंत्रज्ञान, रासायनिक तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, अणूतंत्रज्ञान, अवकाशतंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान इत्यादी. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे मानव समाजाच्या विविध क्षेत्रात अनेक सकारात्मक व नकारात्मक बदल घडून आलेले आहेत. चाक, कंपास, बंदुकीची दारू, छपाई यंत्र, बाष्पयंत्र, तारायंत्र, दूरध्वनी, आकाशवाणी, चित्रपट, दूरदर्शन, मोटार, जहाज, विमान, मोबाईल, संगणक, इंटरनेट इत्यादीमुळे केवळ सामाजिक संरचनामध्येच नव्हे तर आपल्या सवयी, अभिवृत्ती, भूमिका, श्रद्धा, मूल्ये आणि एकंदर जीवनशैली इत्यादीमध्येही क्रांतीकारक परिवर्तन झालेले आहे. उदा. विशिष्ट गरजापूर्तीसाठी शोधून काढलेल्या बाष्पयंत्रामुळे अर्थव्यवस्थेत तर बदल झालेच शिवाय जुने रीतीरिवाज, प्रथा, श्रद्धा, मूल्ये, जीवनविषयक दृष्टिकोन नामशेष झाले. विवाह, कुटुंब, धर्म, राज्य, शिक्षण या सामाजिक संस्थांचेही स्वरूप पार बदलून गेले. दूरदर्शनमुळे आपली जीवनशैली, मनोरंजनाच्या कल्पना, शिक्षणपद्धती, राजकारण, क्रीडा व

कला, श्रद्धा व मूल्ये इत्यादीत कसे बदल होत आहेत हे आपण अनुभवत आहोत. तंत्रज्ञानामुळे होणाऱ्या सर्व क्षेत्रांतील सर्व बदलांचे तपशीलवार विवेचन करणे येथे शक्य नाही. म्हणून काही निवडक क्षेत्रातील बदलांची चर्चा आपण करणार आहोत.

**१) आर्थिक क्षेत्रातील बदल :** तंत्रज्ञानाच्या विकासामुळे मोठमोठी यंत्रे उदयास आली. उत्पादन प्रक्रियेचे यांत्रिकीकरण झाले. हस्तोद्योग किंवा घरगुती उत्पादन पद्धती मागे पडून कारखाना उत्पादन पद्धती सुरू झाली. म्हणजेच औद्योगिकीकरणास जोरदार चालना मिळाली. कारखान्यात यंत्राच्या साहय्याने दैनंदिन गरजेच्या वस्तूंचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होऊ लागले. परिणामी लोकांना मुबलक व आकर्षक वस्तूंचा पुरवठा होऊ लागला. उत्पादन प्रक्रियेत सुक्ष्म श्रमविभाजन व विशेषीकरण सुरू होऊन रोजगाराच्या संधी वाढल्या. केवळ निर्वाहासाठी उत्पादन करण्याऐवजी नफ्यासाठी, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय बाजारपेठासाठी उत्पादन होऊ लागले. पतपेढ्या, बँका, शेअर बाजार अशा संस्था उदयास येऊन मुद्राप्रधान अर्थव्यवस्था निर्माण झाली. अधिक उत्पादीत मालास बाजारपेठ मिळावी म्हणून औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या राष्ट्रांनी वसाहतवादाचे व साम्राज्यवादाचे धोरण स्वीकारले त्यातून शस्त्रास्त्रे निर्मितीची स्पर्धा वाढून दोन महायुद्धे झाली. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे कृषी उत्पादन तंत्रातही आमूलाग्र बदल झाले. आधुनिक शेती अवजारे, रासायनिक खते, संकरीत बी-बियाणे, जंतुनाशके व किटकनाशके, कृत्रिम पाणी पुरवठा करणारी यंत्रणा यांचे कारखाने निघाले. त्यांचा वापर वाढल्याने हरितक्रांती घडून आली. वाढत्या लोकसंख्येस मुबलक अन्नधान्य पुरविणे शक्य होऊ लागले. कृषी उत्पादनावर आधारलेल्या उद्योगांचीही भरभराट होऊ लागली. अशाप्रकारे आर्थिक क्षेत्रात मूलभूत बदल घडून आले.

**२) सामाजिक क्षेत्रातील बदल :** औद्योगिकरणाच्या प्रक्रियेत मोठमोठे उद्योगधंदे शहरात सुरू झाले. शहरे ही उद्योगाची, व्यापाराची, रोजगारांची केंद्रे बनली. त्यामुळे खेड्यातील लोक शहरांकडे स्थलांतर करू लागले. म्हणजेच नागरीकरणाची गती वाढली. नागरी जीवनशैलीचा (नगरवादाचा) प्रभाव वाढला. नागरी संबंध अधिकाधिक व्यक्तीवादी, औपचारिक व करारात्मक स्वरूपाचे बनले. नागरी जीवनात झोपडपट्ट्या, अनारोग्य, गुन्हेगारी, बेकारी, मद्यपान, जुगारीवृत्ती, भिक्षावृत्ती, वेश्याव्यवसाय, प्रदूषण, वाहतुकीची कोंडी, प्रदूषण इत्यादी समस्यांची तीव्रता वाढली. कामगार व भांडवलदार असे नवे सामाजिक वर्ग उदयास येऊन जुनी सामाजिक स्तरीकरण व्यवस्था बदलली. औद्योगिकीकरण व नागरीकरणामुळे विवाह, कुटुंब, धर्म, शिक्षण, मनोरंजन इत्यादी सामाजिक संस्थात रचनात्मक-कार्यात्मक बदल घडून आले. व्यक्तिवादाचा प्रभाव वाढून संयुक्त कुटुंबाचे विघटन होऊन केंद्र कुटुंब स्थापन करण्याची प्रवृत्ती वाढली. विवाहविषयक जुने निर्बंध शिथील झाले. आज इंटरनेटच्या माध्यमातून विवाह जमविणे सुरू झाले आहे. वैत्तनिक-तांत्रिक ज्ञानामुळे धर्मश्रद्धा, कर्मकांड, देवदेवता, मंत्रतंत्र इत्यादीवरील विश्वास कमी झाला. धर्मनिरपेक्षतावादाचा प्रभाव वाढू लागला. पारंपारिक गुरूकुल शिक्षणपद्धती मागे पडली. शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ अशा औपचारिक शिक्षण संस्था उदयास आल्या. धार्मिक शिक्षणाचे महत्त्व कमी होऊन वैज्ञानिक-तांत्रिक शिक्षणास महत्त्व आले. असे शिक्षण घेतलेल्या व्यक्तीला स्वकर्तृत्वाने संपत्ती व सत्ता मिळवून आपले सामाजिक स्थान व दर्जा उंचावणे शक्य होऊ लागले. परिणामी उर्ध्वगामी सामाजिक गतिशीलतेस वाव मिळू

लागला. मनोरंजनाची पारंपारिक साधने (यात्रा, जत्रा, सर्कस, प्राण्यांचे खेळ, तमाशा इ.) मागे पडून आकाशवाणी, चित्रपट, दूरदर्शन, आर्केस्ट्रा, व्ही.डी.ओ. अशा तांत्रिक व बाजारू साधनांचा प्रभाव वाढू लागला. अशाप्रकारे सामाजिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल झाले.

**३) सांस्कृतिक क्षेत्रातील बदल :** तंत्रज्ञानाचा प्रभाव पडून मानवी संस्कृतीच्या भौतिक व अभौतिक पैलूतही बदल घडून आले. मोटार, रेल्वे, जहाज, विमान अशा जलदगतीच्या साधनांमुळे जगात कोठेही स्थलांतर करणे सुलभ झाले. त्यामुळे भौगोलिक गतिशीलता वाढली. वेगवेगळ्या प्रदेशातील व समाजातील लोकांचा संपर्क वाढून त्यांच्यात सांस्कृतिक देवाणघेवाण होऊ लागली. त्यामुळे लोकांच्या खाणेपिणे, पोषाख, अलंकार, निवास इत्यादीबाबतच्या सवयीत बदल होऊ लागले. वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन, चित्रपट, इंटरनेट इत्यादी दळणवळणाच्या साधनांमुळे नवे ज्ञान, नवे विचार, नव्या कल्पना, नवीन मूल्ये समाजाच्या सर्व स्तरातील लोकांपर्यंत पोहचू लागली. त्यामुळे त्यांच्या श्रद्धा, अभिवृत्ती, मते, दृष्टिकोन इत्यादीत बदल होऊ लागले. माहिती तंत्रज्ञानात झालेल्या क्रांतीमुळे सर्व जग खूपच जवळ आले आहे. जगातील सर्व देशांची एकच आर्थिक व सामाजिक व्यवस्था निर्माण करू पाहणारी जागतिकीकरणाची प्रक्रिया गतिमान झाली आहे. जग हे जणू एक खेडे (Global village) बनले आहे. त्यामुळे वेगवेगळ्या समाजातील सांस्कृतिक घटकतत्त्वांचा लोक स्वीकार करू लागले आहेत. परिणामी सांस्कृतिक बदलास मोठी चालना मिळत आहे. अशाप्रकारे तंत्रज्ञानामुळे समाजाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात परिवर्तन घडून आले आहे.

तंत्रज्ञानामुळे आमूलाग्र परिवर्तन होत असले तरी ते परिवर्तन कोणत्याही परिस्थितीत समान स्वरूपाचे असेलच असे नाही. तंत्रज्ञानाचा वापर कोणत्या पद्धतीने होतो त्यावर परिवर्तनाचे स्वरूप अवलंबून असते. मुद्रणकला, आकाशवाणी, चित्रपट, दूरदर्शन इ. साधनांद्वारे लोकांमध्ये जसे सहकार्य व सामंजस्य निर्माण करता येते तसे त्यांच्यात शत्रुत्व व वैमनस्यही निर्माण करता येते. थोडकयात ज्या पद्धतीनुसार तंत्रज्ञानाचा वापर होईल त्यानुसार परिवर्तनाचे स्वरूप ठरत असते. तथापि त्यामुळे जे काही परिवर्तन होईल ते मात्र आमूलाग्र व सर्वस्पर्शी असे असते.

**४. सांस्कृतिक घटक :**

सांस्कृतिक घटकांमुळेही सामाजिक परिवर्तन घडून येत असते. कोणत्याही समाजाची संस्कृती पूर्णत: स्थिर नसते. तिच्या भौतिक व अभौतिक घटकांत बदल होत असतो आणि त्या बदलांचा प्रभाव पडून समाजात सामाजिक परिवर्तन होत असते. संस्कृतीच्या अभौतिक घटकातील बदल हे सामाजिक परिवर्तनास विशेषकरून कारणीभूत ठरत असतात. मूल्ये, श्रद्धा, कल्पना, विचारसरणी, तत्त्वज्ञान, नीतीमत्ता, शिष्टाचार, प्रथा परंपरा, संस्थात्मक संरचना इत्यादी संस्कृतीचे अभौतिक घटक आहेत. जर त्यांच्यात बदल झाला तर समाजात संरचनात्मक बदल होण्यास चालना मिळत असते. संस्कृती प्रसारण (cultural diffusion) आणि संस्कृती संमिलन (cultural assimilation) यासारख्या प्रक्रियांमुळे सामाजिक संबंधात व सामाजिक संस्थांत महत्त्वपूर्ण बदल घडून येतात. ''वेगवेगळी संस्कृती असलेल्या दोन समूहांचा संपर्क प्रस्थापित

झाल्यावर एका संस्कृतीतील गुणतत्त्वे  दुसऱ्या संस्कृतीत संक्रमित होणे व त्या दोन समूहांनी भौतिक वस्तू (items) व कल्पना (ideas) यांची आपसात देवाणघेवाण करणे म्हणजे प्रसारण (प्रसार) होय.'' संस्कृती प्रसारणाच्या या प्रक्रियेमुळे सर्वच प्रगत समाजात सामाजिक परिवर्तन घडून आलेले आहे. या प्रक्रियेत साधारणत: प्रभावशाली समूह हा आपली संस्कृती दुर्बल समूहावर लादण्याचा प्रयत्न करीत असतो. तथापि तो दुर्बल समूहाच्या संस्कृतीतील काही गोष्टींचाही स्वीकार करीत असतो. प्रसारणाची प्रक्रिया ही समाजांतर्गत तसेच दोन समाजामध्येही घडत असते.

संस्कृती संमिलनामुळेही सामाजिक परिवर्तन घडून येते. कोईंगच्या मते ''संमीलन ही अशी प्रक्रिया आहे की जिच्यामुळे एका समूहातील व्यक्ती दुसऱ्या समूहाची संस्कृती आत्मसात (संपादन) करतात, त्या समूहातील अभिवृत्ती, मूल्ये, आचारविचार, थोडक्यात जीवनमार्ग यांचा स्वीकार करून त्या समूहात राहण्यासाठी येतात.'' संस्कृती संमीलन ही मंद गतीने व क्रमशा: घडणारी प्रक्रिया आहे. तसेच ती दोन मार्गी व देवाणघेवाणीची प्रक्रिया आहे. इस्लाम व ब्रिटिश संस्कृतीच्या प्रभावामुळे भारतातील विवाह, कुटुंब, शिक्षण, कायदा, धर्म, मनोरंजन, इत्यादी संस्थांमध्ये महत्त्वपूर्ण बदल घडून आले आहेत. आधुनिक काळात विभिन्न संस्कृती असलेले समाज परस्परांच्या घनिष्ट संपर्कात येत असल्याने त्यांच्यात सांस्कृतिक देवाणघेवाण होत आहे. त्यामुळे सामाजिक परिवर्तनास मोठी चालना मिळाली आहे.

सांस्कृतिक घटक सामाजिक परिवर्तनाच्या दिशेवरही प्रभाव टाकीत असतात. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे मोठे परिवर्तन होते हे खरे. पण तंत्रज्ञानाचा वापर कसा करावयाचा हे तंत्रज्ञानावर नव्हे तर समाजाच्या संस्कृतीतील मूल्ये, विचारसरणी, जीवनविषयक दृष्टिकोन इत्यादी गोष्टींवर अवलंबून असते. प्रत्येक समाजाची काही मूल्ये, विचारसरणी व जीवनविषयक दृष्टिकोन असतो. या गोष्टींना तो समाज खूप महत्त्व देत असतो. त्या गोष्टींनुसार समाज तंत्रज्ञानाचा वापर करीत असतो. त्यामुळे मूल्ये, विचारसरणी व दृष्टिकोन या गोष्टी सामाजिक परिवर्तनाची दिशा निर्धारित करीत असतात. उदा. औद्योगिक क्रांतीनंतर इंग्लंड, अमेरिका, रशिया या देशांनी समाज तंत्रज्ञान उपयोगात आणले. पण त्यांनी आपापल्या मूल्यानुसार ते उपयोगात आणले. त्यामुळे तीनही देशात वेगवेगळे सामाजिक परिवर्तन घडून आले. इंग्लंड अमेरिकेत भांडवलशाही तर रशियात साम्यवादी व्यवस्था उदयास आली. अणुशक्तीचा उपयोग भारत शांतता व मानवी कल्याणासाठी करू इच्छिते तर काही देश संहारक कार्यासाठी करू इच्छितात. त्यामुळे अणुशक्तीमुळे होणारे परिवर्तन भारतात वेगळ्या तर इतर देशांत वेगळ्या स्वरूपाचे असल्याचे दिसते.

मॅक्स वेबर यांनी आपल्या ''प्रोटेस्टंट एथिक्स अँड स्पिरिट ऑफ कॅपिटॅलिझम'' या ग्रंथात लोकांच्या धर्मश्रद्धा व धर्माचरण आणि आर्थिक वर्तन यातील सहसंबंधावर प्रकाश टाकला आहे. त्यांनी असे दाखवून दिले आहे की, ख्रिश्चन धर्मातील प्रॉटेस्टंट पंथाच्या प्रभावामुळेच इंग्लंड, अमेरिका, जर्मनी या पाश्चिमात्त्य देशात आधुनिक भांडवलशाहीचा विकास होऊ शकला. कॅथालिक पंथाचा प्रभाव असलेल्या इटली, स्पेन या पाश्चिमात्त्य देशात तसेच हिंदू, बौद्ध, इस्लाम, जैन इत्यादी धर्मांचा प्रभाव असलेल्या पौर्वात्य देशांत मात्र भांडवलशाहीचा विकास होऊ शकला नाही. कारण केवळ प्रॉटेस्टंट पंथाचे नीतीशास्त्र (आचारशास्त्र) हे भांडवलशाहीस उत्तेजन देणारे आहे. अशाप्रकारे धर्मश्रद्धा, धर्माचरण, नीतीमत्ता इ. सांस्कृतिक गोष्टी

सामाजिक परिवर्तनात सकारात्मक तशीच नकारात्मक भूमिका बजावित असतात. समाजातील रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, दैववादीवृत्ती इ. सांस्कृतिक बाबी नवीन शोधांना व त्यांच्या वापरास आणि म्हणून परिवर्तनास विरोध करीत असतात.

सांस्कृतिक बदलांमुळे सामाजिक परिवर्तन होते हे खरे. तथापि संस्कृतीतील सर्वच घटकांत समान गतीने बदल होत नसतात. यासंदर्भात विल्यम एफ. ऑग्बर्न यांनी 'सांस्कृतिक पश्चायन' (Cultural lag) हा सिद्धांत मांडला आहे. त्यांच्या मते संस्कृतीचे भौतिक संस्कृती व अभौतिक संस्कृती असे दोन प्रकार पडतात. भौतिक संस्कृतीत हत्यारे अवजारे, यंत्रे, भांडीकुंडी, घरदार, वाहतुकीची साधने इत्यादींचा समावेश होतो. तर अभौतिक संस्कृतीत कुटुंब, धर्म, शासन, शिक्षण इत्यादींचा समावेश होतो. जेव्हा भौतिक संस्कृतीत बदल होतो तेव्हा अभौतिक संस्कृतीतही बदल होतोच. तथापि भौतिक संस्कृतीत वेगाने बदल होतो. परिवर्तनाच्या संदर्भात अभौतिक संस्कृती भौतिक संस्कृतीच्या मागे रहाते; तिच्यात परिवर्तन होण्यास विलंब लागतो. या स्थितीस ऑग्बर्न यांनी सांस्कृतिक पश्चायन असे म्हटले आहे. तंत्रज्ञानाची प्रगती वेगाने घडून येते. पण त्यामानाने नियमने, मूल्ये, श्रद्धा इ. अभौतिक गोष्टीत मात्र मंदगतीने बदल होतात. म्हणून तंत्रविद्यात्मक परिवर्तनामुळे सांस्कृतिक पश्चायन घडून येते असे ऑग्बर्न म्हणतात. परंतु व्यक्तीच्या मानसशास्त्रीय दुराग्रहामुळेही असे पश्चायन घडून येत असते.

**५) आर्थिक घटक :**

कार्ल मार्क्स या विचारवंताने आर्थिक दृष्टिकोनातून सामाजिक परिवर्तनाचा अन्वयार्थ लावलेला आहे. त्याने असे प्रतिपादन केलेले आहे की, आपले अस्तित्व टिकविण्यासाठी मानवाने काम करण्यास प्रारंभ केल्याच्या काळापासून अन्नपदार्थांचे उत्पादन व वितरण या प्रक्रियांत समाविष्ट असलेल्या घटकांना मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. मानवामानवातील आर्थिक संबंधाचे नियमन करणाऱ्या मूलभूत नियमनांतील परिवर्तनावर मार्क्सवादी सिद्धांत जोर देतो. मार्क्सवादी सिद्धांतानुसार उत्पादनाची साधने आणि उत्पादन संबंध यांच्यात जेव्हा संघर्ष उद्‌भवतो तेव्हा समाजात क्रांतिकारी बदल घडून येतात.

मार्क्सवादी विचारानुसार समाज हा दोन मोठ्या घटकांनी बनलेला आहे. १) आर्थिक पायाभूत संरचना (economic infrastructure) किंवा पाया (base) २) अधिसंरचना (super-structure) आर्थिक पायाभूत संरचनेत उत्पादनसाधने आणि उत्पादनसंबंध यांचा समावेश होतो. तर अधिसंरचनेत कायदा, विचारसरणी, राजकीय संस्था, धर्मसंस्था यासारख्या समाजव्यवस्थेच्या इतर सर्व पैलूंचा समावेश होतो. तर अधिसंरचरेत कायदा, विचारसरणी, राजकीय संस्था, धर्मसंस्था यासारख्या समाजव्यवस्थेच्या इतर सर्व पैलूंचा समावेश होतो. अधिसंरचना ही आर्थिक पायाभूत संरचनेवर आधारलेली असते. समाजाच्या आर्थिक पायाभूत संरचनेत होणारे बदल हा सामाजिक परिवर्तनास चालना देणारा प्रमुख घटक आहे, यसा मूलभूत गृहीत तत्वावर सामाजिक परिवर्तनाविषयीचे मार्क्सवादी स्पष्टीकरण आधारलेले आहे. सातत्याने विकसीत होणारी उत्पादन साधने व उत्पादन संबंध (वर्गसंबंध) यांच्यात विरोध निर्माण होता तेव्हा समाजात क्रांतिकारक परिवर्तन घडून येते. मार्क्स असे मानतो की, आतापर्यंत अस्तित्वात असलेलया सर्वच समाजांचा

इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे. मार्क्सने असा विश्वास व्यक्त केला आहे की, आजच्या भांडवलशाही समाजातील संघर्षाचा (कामगारांचा वर्ग व भांडवलदारांचा वर्ग यांच्यातील संघर्ष) परिणाम म्हणून कामगारांचा वर्ग हा भांडवलशाही व्यवस्थ उलथवून टाकील. अशाप्रकारे कार्ल मार्क्सने सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेतील आर्थिक घटकांच्या महत्त्वावर जोर दिलेला आहे. थोडक्यात आर्थिक घटकांमुळेच म्हणजेच उत्पादन व वितरण व्यवस्थेत बदल झाल्यानेच समाजात बदल होतो असे मार्क्स म्हणतो. अर्थात मार्क्सचे हे मत एकांगी आहे. तथापि सामाजिक परिवर्तनात आर्थिक घटकांची भूमिका महत्त्वपूर्ण असते हे नाकारता येत नाही.

वर नमूद केलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या घटकांशिवाय समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक परिवर्तनाच्या घटकांशिवाय समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक कायदे, सामाजिक नियोजन व शिक्षण यासारख्या इतर काही घटकांनाही सामाजिक परिवर्तनाचे घटक मानलेले आहे. या घटकांमुळेसुद्धा पारंपारिक सामाजिक संस्था आणि समाजाच्या सदस्यांची सामाजिक मूल्ये, अभिवृत्ती व मते इत्यादीमध्ये बदल घडून आलेले आहेत. उदा. सामाजिक कायदे, सामाजिक नियोजन व शिक्षण प्रसार यामुळे भारतातील जातीसंस्थेत महत्त्वपूर्ण परिवर्तन घडून आलेले आहे. तसेच सतीप्रथा व अस्पृश्यतापालन यासारख्या अनिष्ट प्रथांचे निर्मूलन करण्यामध्ये या घटकांची मोठी मदत झालेली आहे.

### ४.२.३ **सामाजिक परिवर्तनातील अडथळे** (Obstacles of Social change)

प्रास्ताविकात म्हटल्याप्रमाणे सामाजिक परिवर्तनाच्या मार्गात अनेक घटक अडथळा म्हणून येत असतात. त्या घटकांनाच सामाजिक परिवर्तनातील अडथळे असे म्हणतात. हे घटक सामाजिक परिवर्तनास विरोध करतात तसेच त्याची गतीदेखील कमी करतात. ज्या घटकांना सामाजिक परिवर्तनातील अडथळे मानले जाते ते घटक सकारात्मक तसेच नकारात्मक अशा दोन्ही प्रकारे कार्य करीत असतात. काही समाजशास्त्रज्ञ या घटकांकडे नकारात्मक दृष्टीने पाहतात. कारण ते घटक समाजात मुकतपणे व अविरोधीपणे बदल घडून येण्यास संमत्ती देत नाहीत. म्हणून ते या घटकांना अडथळे असे म्हणतात. याउलट काही समाजशास्त्रज्ञ या घटकांकडे सकारात्मक दृष्टीने पाहतात आणि असे मानतात की जर हे अडथळे समाजात उपस्थित नसतील तर समाजात होणोर बदल हे समाजाचे संघटन उध्वस्त करतील. अशा प्रकारे सामाजिक परिवर्तनाच्या मार्गातील या अडथळ्यांकडे नकारात्मक तसेच सकारात्मक दृष्टीने पाहता येत असले तरी आपण मात्र या घटकांचा वस्तुनिष्ठ दृष्टीने अभ्यास करणार आहोत. आता सामाजिक परिवर्तनातील काही महत्वपूर्ण अशा प्रमुख अडथळ्यांचे विवेचन करू या.

#### १. **सांस्कृतिक परंपरा आणि भूतकाळाविषयी आदरभाव –**

लोकांची मनोवृत्ती ही परिवर्तनशील असेल तरच समाजात परिवर्तन होत असते. तथापि, बहुसंख्य लोक हे परंपराप्रिय असतात. परंपरेने चालत आलेल्या गोष्टींकडे ते मोठ्या श्रद्धेने वा आदरभावाने बघत असतात. त्यामुळे परंपरेच्या विरोधी असणाऱ्या नवीन गोष्टी स्वीकारण्यास ते सहसा तयार होत नाहीत. म्हणून परंपरा ह्या सामाजिक परिवर्तनाच्या मार्गातील प्रबळ अडथळा मानल्या जातात. परंपरा ह्या समाजात खोलवर

रूजलेल्या असतात. लोकांच्या मनावर त्यांचा जबरदस्त पगडा असतो. त्यामुळे समाजात सामाजिक परिवर्तन घडून येणे अवघड असते. अनेक समाजात अशा काही म्हणी आहेत की ज्या परंपरा पालनास पाठिंबा देतात. उदा. इजिप्तमध्ये अशा अर्थाची एक म्हण आहे की '' जो कोणी, आपल्या भूतकाळाकडे पाठ फिरवितो तो सर्व काही गमावून बसतो. भारतात 'जुने ते सोनं' ही म्हण प्रसिद्ध आहे. अशा प्रकारच्या म्हणी लोकांचा परंपरावरील विश्वास बळकट करतात आणि असे वातावरण तयार करतात की परंपरा ह्या बदलू शकत नाहीत. कारण त्या स्थिर झालेले वर्तनप्रकार आहेत. काही लोक आपला इतिहास आणि परंपरा यांच्या विषयी कमालीचा आदरभाव बाळगतात. असे लोक कोणत्याही नवीन गोष्टीकडे संशयाने पाहतात आणि तिला विरोध करतात कारण ती नवीन गोष्ट आपल्या भूतकाळातील वैभवशाली गोष्टी नष्ट करील अशी भीती त्यांना वाटत असते. म्हणून ते परंपरांना व भूतकालीन गोष्टींना चिकटून राहतात. त्यांच्यात होणारा बदल ते सहजासहजी स्वीकारीत नाहीत. उदा. हुंडा देणे घेणे ही प्राचीन काळापासून चालत आलेली प्रथा किंवा परंपरा आहे. तथापि आज हुंडाबंदीचा कायदा होऊन देखील बहुसंख्य भारतीय लोक या प्रथेचे पालन करताना दिसतात.

### २. दैववादी वृत्ती

लोकांची दैववादीवृत्ती हा ही सामाजिक परिवर्तनाच्या मार्गातील महत्त्वाचा अडथळा आहे. अनेक लोक दैवावर विश्वास ठेवतात. जगातील प्रत्येक गोष्ट ही पूर्वनिर्धारित आहे असे ते मानतात. त्यामुळे ते सुस्त बनतात आणि समाजात बदल होण्याची आकांक्षाच बाळगत नाहीत. अशा प्रकारे दैववादीवृत्ती ही नाविन्याची किंवा परिवर्तनाची प्रभावीपणे मुस्कटदाबी करते. दैववादीवृत्तीचे लोक जे काही धडते ते आपल्या भल्यासाठीच घडते असे मानतात. म्हणून ते आपल्या जीवनात बदल करीत नाहीत. उलट आपल्या वाट्यास जसे जीवन येईल तसेच स्वीकारतात. त्यांना त्यामध्ये बदल करणे आवडत नाही. त्यामुळे परिवर्तनात अडथळे येतात.

### ३. धर्मश्रद्धा

लोकांच्या मनावर धर्मश्रद्धांचा मोठा पगडा असतो. वैज्ञानिक ज्ञानाचा प्रसार होऊन देखील अद्याप बरेच लोक जग हे ईश्वराने निर्माण केलेले असून त्यातील प्रत्येक गोष्ट वा घटना ही ईश्वरी इच्छेनुसार घडते अशी श्रद्धा बाळगतात. आणि त्यामुळे ईश्वरनिर्मित गोष्टीत बदल करणे हे पाप आहे असे त्यांना वाटते. धर्मश्रद्धाळू लोक धर्मग्रंथात जेकाही लिहीले आहे ते प्रमाण (सत्य) मानतात. त्यामुळे धर्मग्रंथाच्या विरोधी असणाऱ्या गोष्टींना ते स्वीकारत नाहीत. धर्मश्रद्धांच्या विरोधी असणाऱ्या वैज्ञानिक शोधांना विरोध केल्याची अनेक उदाहरणे आढळतात. उदा. चंद्रावर पर्वत व दऱ्या आहेत असे प्रतिपादन करणाऱ्या गॅलिलीओस धर्मगुरूंनी पापी ठरवून कैदेत टाकले. विश्वात अनेक ग्रह तारे असून ते गतिमान आहेत असे सांगणाऱ्या ब्रुनो या शास्त्रज्ञास धर्मगुरूंनी जिवंत जाळले. पृथ्वी विश्वाच्या केंद्रस्थानी आहे असे बायबल मध्ये सांगितलेले आहे. तथ्थपि कोपर्निकसने सूर्य हा विश्वाच्या केंद्रस्थानी असून पृथ्वी त्याच्या भोवती फिरते असे सिद्ध केले.

तथापि त्याने ख्रिश्चन धर्मपंडितांच्या भीतीने आपले संशोधन आपल्या हयातीत प्रसिद्ध केले नाही. अशाप्रकारे धर्मश्रद्धा ह्या परिवर्तनात अडथळे आणतात.

### ४. अंधश्रद्धा

समाजातील बहुसंख्य लोक अंधश्रद्ध असतात. ते अनेक अशास्त्रीय व अतार्किक गोष्टींवर विश्वास ठेवतात. अशा विश्वासांच्या म्हणजेच अंधश्रद्धांच्या विरोधी असणाऱ्या नवीन गोष्टी स्वीकारण्यास ते तयार नसतात. उदा. भारतातील अनेक लोक अद्यापही देवी किंवा पटकी (कॉलरा) यासारखे रोग हे देवतांच्या अवकृपेमुळे होतात असे मानतात. आणि रोगमुक्त होण्यासाठी आधुनिक औषधोपचार घेण्याऐवजी देवदेवतांना नवस बोलतात. त्यांना कोंबड्या बकऱ्यांचे बळी देतात. काही लोक मुले ही ईश्वराची देणगी आहे असे मानातात आणि संतती नियमनाच्या कार्यक्रमास विरोध करतात. अशा प्रकारे अंधश्रद्धा ह्या परिवर्तनातील अडथळा ठरतात.

### ५. स्वसमूहश्रेष्ठतावाद

प्रत्येक समाजात तसेच समूहात कमीजास्त प्रमाणात स्वसमूह श्रेष्ठतावादाची (स्वसमूह केंद्रितता) प्रवृत्ती आढळते. ही प्रवृत्तीही सामाजिक परिवर्तनात अडथळा ठरते. विल्यम सम्नर यांच्या मते स्वत:च्या समूहास सर्व गोष्टींच्या केंद्रस्थानी ठेऊन इतर सर्व गोष्टींचे मापन व मूल्यांकन आपल्या समूहाच्या संदर्भात करण्याचा दृष्टिकोन म्हणजे स्वसमूहश्रेष्ठतावाद होय. विल्यम स्कॉट यांच्या मते आपली स्वत:ची संस्कृती किंवा समूह मूलत: इतरांपेक्षा श्रेष्ठ आहे असे मानण्याची प्रवृत्ती म्हणजे स्वसमूह श्रेष्ठता वाद होय. आपली संस्कृती किंवा जीवनपद्धती इतरांपेक्षा श्रेष्ठ व योग्य मानण्याची ही जी प्रवत्ती आहे ती परिवर्तनास बाधक ठरते. कारण अशा प्रवत्तीचे लोक इतरांच्या संस्कृतीतील गोष्टींचा स्वीकार करण्यास नकार देतात. समाजात परिवर्तन होण्यासाठी इतर समाजाच्या संस्कृतीतील गोष्टींचा मोकळ्या मनाने स्वीकार करणे आवश्यक असते. स्वसमूहश्रेष्ठतावादाची प्रवृत्ती अशा स्वीकारास विरोध करते. त्यामुळे परिवर्तनात अडथळे येतात. उदा. अनेक भारतीय लोक भारतीय संस्कृती ही जगात सर्वश्रेष्ठ आहे असे मानून पाश्चात्य संस्कृतीतील अनेक चांगल्या गोष्टींचाही स्वीकार करण्यास विरोध करतात. त्यामुळे परिवर्तनात बाधा निर्माण होते.

### ६. लोकमत

लोकमत समाजात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडीत असते. लोकांचे आचार, विचार, मनोवृत्ती, पूर्वग्रह, इत्यादीवर लोकमताचा मोठा प्रभाव असतो. लोकमत हे दुधारी शस्त्र आहे. कारण ते परिवर्तनास जशी चालना देते तसेच ते त्यास प्रतिबंधही करते. प्रचलित किंवा प्रस्थापित गोष्टी किंवा व्यवस्था ह्या आपल्यासाठी चांगल्या आहेत असे जर बहुसंख्य लोकांचे मत असेल तर ते नवीन गोष्टींना किंवा व्यवस्थांना विरोध करतात. पारंपारिक समाजात प्रामुख्याने असे घडते. पारंपारिक भारतीय खेड्यातील लोकमत हे बालविवाहास अद्यापही अनुकूल आहे. त्यामुळे बालविवाहबंदीचा कायदा होऊन देखील अनेक पालक मुलींचा विवाह बालवयात करताना दिसतात. विधवाविवाह, आंतरजातीय विवाह हे कायदेशीर ठरवून देखील

केवळ लोकमताच्या दबावामुळे अनेक लोक त्यांना विरोध करतात. अशाप्रकारे लोकमत परिवर्तनाच्या मार्गातील अडथळा ठरते.

### ७. सामाजिक अभिवृत्ती आणि बंधने :

कांही वेळा सामाजिक अभिवृत्ती व बंधने किंवा कर्तव्यबुद्धी ही देखील सामाजिक परिवर्तनात अडथळे ठरतात. प्रत्येक समाजात आपले कुटुंब, समूह, समुदाय इत्यादींबाबतच्या काही सामाजिक अभिवृत्ती व बंधने रूढ झालेली असतात. आणि त्यांच्या विरोधी गोष्टी स्वीकारण्यास लोक तयार नसतात. त्यामुळे परिवर्तनात अडथळे येतात. उदा. भारतीय समाजात प्रत्येक बाबतीत पत्नी ही पतीपेक्षा सर्वच बाबतीत कनिष्ठ स्तरावर असावी अशी सामाजिक अभिवृत्ती आहे. त्यामुळे अनेक उच्चशिक्षीत नोकरदार स्त्रिया ह्या आपल्या पतीच्या पदापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर होणारी नियुक्ती किंवा बढती नाकारतात. त्यामुळे त्यांच्या दर्जात व भूमिकेत होणाऱ्या परिवर्तनात आडथळे येतात. परिणामी सामाजिक प्रगतीतही बाधा उत्पन्न होते.

### ८. बंदिस्थ सामाजिक स्तरीकरण व्यवस्था :

समाजातील सामाजिक स्तरीकरणाची व्यवस्था ही बंदिस्त स्वरूपाची असेल तर सामाजिक परिवर्तनात अडथळे येतात. भारतातील जातीयव्यवस्था हे बंदिस्त सामाजिक स्तरीकरण आहे. कारण जातिव्यवस्थेत व्यक्तीचा सामाजिक दर्जा, व्यवसाय, सामाजिक संपर्काचे क्षेत्र, मित्रपरिवार व एकंदर जीवनपद्धतीही जातीच्या म्हणजेच जन्माच्या आधारे निर्धारित होते. आणि त्यामध्ये व्यक्त स्वकर्तृत्वाने बदल करू शकत नाही. म्हणजेच जातिव्यवस्था ही उर्ध्वगामी सामाजिक गतिशीलतेस मनाई करते. त्यामुळे व्यक्तीला विशेषतः कनिष्ठ जातीतील व्यक्तीला आपला सामाजिक दर्जा उंचावण्याची संधी मिळत नाही. अशी ही जातिव्यवस्था हजारो वर्षांपासून प्रचलित असल्याने भारतातील सामाजिक परिवर्तनातील ती एक मोठाच अडथळा ठरली आहे.

### ९. समाजातील दुफळी किंवा फाटाफूट :

कांही वेळा हा समाज वंश, जात, धर्म, भाषा, प्रांत इत्यादीवर आधारलेल्या अनेक लहान लहान गटात विभागलेला असतो. हे गट आपले स्वार्थी हितसंबंध साध्य करण्यासाठी एकमेकांशी तीव्र स्पर्धा करीत असतात. त्यामुळे एका गटाचे सदस्य हे प्रतिस्पर्धी गटातील सदस्यांकडे द्वेषभावनेने पाहतात. त्यामुळे समाजात दुफळी माजते. गटागटात संघर्ष उद्‌भवतो. अशा स्थितीत एका गटाने सुरू केलेल्या परिवर्तनास दुसरा गट विरोध किंवा प्रतिबंध करतो. जर हे गट राजकीयदृष्ट्या शक्तीशाली असतील तर सामाजिक परिवर्तनात वारंवार अडथळे उद्‌भवतात.

### १०. राजकीय श्रेष्ठजन किंवा नेतृत्व :

हा सामाजिक परिवर्तनास जसा चालना देणारा तसेच त्यास विरोध करणारा असा घटक आहे. समाजातील राजकीय नेतृत्व हे पुरोगामी, गतिशील वा परिवर्तनशील असेल तर ते सामाजिक परिवर्तनास जोरदार चालना देते. याउलट राजकीय नेतृत्व हे प्रतिगामी किंवा पुराणमतवादी असेल तर ते सामाजिक परिवर्तनातील एक अडथळा ठरते. राजकीयदृष्ट्या शक्तीशाली असणारे श्रेष्ठजन किंवा नेते हे लोकमतावर

प्रभाव टाकीत असतात आणि सामाजिक परिवर्तनास अनुकूल किंवा प्रतिकूल ठरेल अशा लोकमताची जडणघडण करीत असतात. त्यामुळे जर राजकीय नेते हे सनातनी व परंपराप्रिय असतील तर ते सामाजिक परिवर्तनास प्रतिबंध करतात. विशेषतः आपली सत्ता धोक्यात आणणाऱ्या परिवर्तनास प्रतिबंध करतात. जेव्हा एका राजकीय पक्षाची सत्ता जाऊन दुसरा राजकीय पक्ष सत्तेवर येतो तेव्हा नवीन सत्ताधारी पक्ष अगोदरच्या सत्ताधारी पक्षाने सुरू केलेले सामाजिक परिवर्तनाचे कार्यक्रम राबविणे पूर्णपणे बंद करतो. भारतात असे अनेक वेळा घडलेले दिसून येते.

**११. नवीन शोधांचा अस्वीकार :**

सामाजिक परिवर्तन घडून येण्यासाठी जीवनाच्या विविध क्षेत्रात नवेनवे शोध लागावे लागतात. ज्या समाजात असे शोध फारसे लागत नाहीत तेथे सामाजिक परिवर्तनास पुरेसा वाव मिळत नाही. सामाजिक परिवर्तनासाठी केवळ नवीन गोष्टींचा लोक तेव्हाच स्वीकार करतात जेव्हा त्यांची उपयुक्तता सिद्ध होते. पण नवीन गोष्टींची उपयुक्तता सिद्ध होण्यास बराच मोठा कालावधी जावा लागतो. त्यामुळे नवीन शोधांचा लोक लगेचच स्वीकार करीत नाहीत. परिणामी परिवर्तनात अडथळे येतात. उदा. अमेरिकेतील रेड इंडियन लोकांनी बंदुकीची उपयुक्तता सिद्ध झाल्याने तिचा त्वरीत स्विकार केला. मात्र आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीने आधुनिक औषधांची उपयुक्तता सिद्ध होण्यास दीर्घ कालावधी लागत असल्याने त्या औषधांचा मात्र त्यांनी त्वरीत स्वीकार केला नव्हता. साधारणतः वैज्ञानिक व तांत्रिक क्षेत्रातील नवीन गोष्टींची उपयुक्तता लवकर सिद्ध होते. त्यामानाने सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील नवीन गोष्टींची उपयुक्तता सिद्ध होण्यास दीर्घ कालावधी लागतो. त्यामुळे त्या गोष्टींचा लोक लवकर स्वीकार करीत नाहीत. उदा. गुलामगिरी, अस्पृश्यतापालन अशा प्रथा बंद करणे, स्त्रियांना मतदानाचा हक्क देणे, दुर्बल घटकांना आरक्षण देणे इ. नवीन गोष्टींची उपयुक्तता सिद्ध होण्यास दीर्घ कालावधी लागणार असल्याने त्यांचा अद्याप अनेक लोकांनी स्वीकार केलेला नाही. परिणामी सामाजिक परिवर्तनात अडथळे निर्माण झालेले आहेत.

**१२. संस्कृतीशी विसंगती :**

नव्याने शोधून काढलेल्या गोष्टी जर समाजाच्या प्रचलित संस्कृतीशी सुसंगत किंवा अनुरूप असतील तर त्या लोकांकडून स्वीकारल्या जातात आणि परिवर्तनास चालना मिळते. मात्र त्या गोष्टी संस्कृतीशी विसंगत असतील म्हणजे संस्कृतीशी अनुरूप ठरत नसतील तर लोक त्यांचा स्वीकार करीत नाहीत. परिणामी परिवर्तनात अडथळे येतात. उदा. शिकार करणारे आदिवासी लोक बंदूक आणि घोडा यांचा वापर करण्यास लगेच तयार होतील कारण शिकारीच्या अवस्थेतील संस्कृतीशी या गोष्टी अनुरूप ठरतात. मात्र हे लोक घरात पशुपालन करण्याची कल्पना लगेच स्वीकारणार नाहीत कारण ही कल्पना त्यांच्या संस्कृतीशी विसंगत ठरते.

**१३. आर्थिक घटक :**

सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवलाची (पैशाची) गरज भासते. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या समाजाला भांडवलाअभावी मोठमोठे उद्योगधंदे उभारणे, दळणवळणाच्या प्रगत साधनांचे जाळे उभारणे, विकास प्रकल्प राबविणे, सामाजिक सुधारणा करणे शक्य होत नाही. परिणामी

तेथील सामाजिक परिवर्तनास अडथळे येतात. समाजामध्येच व्यक्तीचीही स्थिती असते. साधारणतः नवीन गोष्टी महाग असतात. गरीबांना त्या खरेदी करणे परवडत नाही. उदा. बाजारात सौर उर्जेवर चालणारी अनेक उपकरणे उपलब्ध आहेत. तथापि ती महाग असल्याने गरीबांना ती विकत घेता येत नाहीत. त्यामुळे ते अद्यापही पारंपारिक चुलीचाच वापर करतात. परिणामी परिवर्तनास वाव मिळत नाही.

**१४. स्थैर्याची अपेक्षा :**

साधारणपणे आपल्या जीवनात स्थैर्य असावे अशी लोकांची अपेक्षा असते. सामाजिक परिवर्तन म्हणजे जीवनपद्धतीत बदल घडवून आणणे होय. अशा परिवर्तनामुळे जीवनात विविध तऱ्हेची अस्थिरता निर्माण होते. शिवाय बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेणे अवघड जाते. परिवर्तनामुळे जीवनातील प्रस्थापित समतोल मिघडतो आणि लोकांना हे नको असते. म्हणून ते परिवर्तनास विरोध करतात.

**१५) नवीन शोधाविषयीचे अज्ञान :**

हाही परिवर्तनाच्या मार्गातील महत्त्वाचा अडथळा आहे. साधारणतः नवीन शोधांचे परिपूर्ण आकलन होण्यास सामान्य लोकांना खूप वेळ लागतो. सामाजिक क्षेत्रातील नवीन कल्पनांच्या व विचारसरणींच्या बाबतीतही हे खरे आहे. त्यामुळेही परिवर्तनात अडथळे येतात. उदा. संतती नियमनाच्या आधुनिक साधनांचे व पद्धतींचे आकलन होण्यास व त्यांचा स्वीकार करण्यास लोकांना अनेक वर्षे लागली. अशा साधनांच्या व पद्धतींच्या संभाव्य दुष्परिणामाची लोकांना अज्ञानामुळे भीती वाटत होती. अडाणी भारतीय लोक ही साधने अद्यापही वापरत नसल्याने लोकसंख्या वाढ रोखण्यात अपेक्षित यश आलेले नाही.

**स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न–१** (Check your progress – 1)

खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या –

१. कोणत्याही एका समाजशास्त्रज्ञाची सामाजिक परिवर्तनाची व्याख्या द्या.

२. विविध व्याख्यांमध्ये प्रतिबिंबीत झालेला सामाजिक परिवर्तनाचा अर्थ सांगा.

३. सामाजिक परिवर्तन व सांस्कृतिक परिवर्तन यातील फरक स्पष्ट करा.

४. उत्क्रांती म्हणजे काय?

५. 'क्रांती' या संकल्पनेचा अर्थ सांगा.

६. 'प्रगती' या संकल्पनेचा अर्थ सांगा.

७. 'विकास' म्हणजे काय?

८. उत्क्रांती आणि क्रांती यांच्यातील फरक सांगा.

९. सामाजिक विकास म्हणजे काय?

१०. पार्सन्स यांची सामाजिक संरचनेची व्याख्या द्या.

११. सामाजिक परिवर्तन ही सार्वत्रिक घटना का मानली जाते?

१२. सामाजिक परिवर्तन ही बहुलघटकीय व संकीर्ण अशी घटना का असते?

१३. नियोजित सामाजिक परिवर्तनाचे एक उदाहरण सांगा.

१४. एक दिशावर्ती आणि अनेक दिशावर्ती सामाजिक परिवर्तनातील फरक स्पष्ट करा.

१५. सामाजिक परिवर्तन ही तटस्थ संकल्पना का मानली जाते.

१६. सामाजिक परिवर्तनास जबाबदार असलेल्या घटकांची यादी तयार करा.

१७. भौतिक पर्यावरणातील कोणकोणते घटक समाजात परिवर्तन घडवून आणतात ?

१८. समाजव्यवस्थांवर प्रभाव टाकणारे लोकसंख्याशास्त्रीय घटक नमूद करा.

१९. तंत्रज्ञान म्हणजे काय ?

२०. मानवाच्या सामाजिक जीवनात मोठ्या प्रमाणावर बदल घडवून आणण्यास प्रारंभ करणाऱ्या तांत्रिक शोधांची उदाहरणे द्या.

२१. सांस्कृतिक पश्चायनाचा सिद्धांत कोणी मांडला आहे ?

२२. कार्ल मार्क्सच्या मते क्रांतिकारक सामाजिक परिवर्तन केव्हा घडून येते ?

२३. सामाजिक कायदे, सामाजिक नियोजन आणि शिक्षण हे घटक पारंपारिक सामाजिक जीवनाच्या कोणत्या पैलूत घडवून आणू शकतात ?

२४. परंपरा सामाजिक परिवर्तनात अडथळा कसा आणते याचे एक उदाहरण द्या.

२५. स्वसमूहश्रेष्ठतावाद म्हणजे काय?

२६. जातीव्यवस्था ही भारतातील सामाजिक परिवर्तनात कसा अडथळा ठरते?

२७. अंधश्रद्धा ह्या सामाजिक परिवर्तनातील अडथळा कशा ठरतात?

२८. तुमच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असणारे सामाजिक परिवर्तनातील पाच अडथळे सांगा.

## ४.३ सारांश : (Let us Sum Up)

समाजातील ज़्फठ्र आणि परिवर्तन ह्या समाजशास्त्रीय अभ्यासातील दोन महत्त्वाच्या बाबी आहेत. समाजाच्या अंतर्गत आणि बहिर्गत परिस्थितीत होणाऱ्या बदलांना अनुसरून विविध समजव्यवस्थांमध्ये परिवर्तन होत असते. परिवर्तनामुळे समाजाचे स्वरूप गतिशील राहते. या अध्ययन घटकातील पहिल्या उपविभागात आपण सामाजिक परिवर्तनाच्या व्याख्या व अर्थ अभ्यासलेला आहे. वेगवेगळ्या समाजशास्त्रज्ञांनी वेगवेगळ्या संज्ञा वापरून सामाजिक परिवर्तनाची व्याख्या दिलेली आहे. तथापि सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक संरचनेतील आणि सामाजिक संबंधाच्या व्यवस्थेतील परिवर्तन होय. अशाच

मतितार्थ वरील सर्व व्याख्यांचा आहे. म्हणून सामाजिक संघटन, सामाजिक दर्जा व भूमिका, सामाजिक संस्था, सामाजिक अभिवृत्ती व मूल्ये, सामाजिक संबंधाची प्रतिमाने इत्यादींमधील बदलांना उद्देशून सामाजिक परिवर्तन असे म्हटले जाते. त्याचबरोबर आपण येथे सामाजिक परिवर्तन या संकल्पनेशी संबंधित असलेल्या उत्क्रांती, प्रगती, क्रांती, विकास इत्यादी संकल्पनांचाही अर्थ समजावून घेतलेला आहे. या अध्ययन घटकातील दुसऱ्या उपविभागात आपण सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप व वैशिष्ट्ये अभ्यासलेली आहेत. यासदर्भात आपण पुढील मुद्दे अभ्यासलेले आहेत. १. सामाजिक परिवर्तन ही सार्वत्रिक स्वरूपाची घटना आहे., २. सामाजिक परिवर्तन ही निरंतरपणे चालणारी प्रक्रिया आहे., ३. सामाजिक परिवर्तन ही बहुलघटकीय व संकीर्ण अशी घटना आहे., ४. सामाजिक परिवर्तन हे नियोजित तसेच अनियोजित असू शकते., ५. सामाजिक परिवर्तन हे प्रामुख्याने समाजाच्या संरचनात्मक व कार्यात्मक पैलूत होणारे परिवर्तन असते., ६. सामाजिक परिवर्तनास काल परिमाण असते., ७. वेगवेगळ्या कालखंडात व वेगवेगळ्या समाजात सामाजिक परिवर्तनाची गती भिन्न भिन्न असते., ८. सामाजिक परिवर्तनास दिशा असते, ९. सामाजिक परिवर्तनेही परस्परांशी निगडीत असतात., १०. सामाजिक परिवर्तन ही तटस्थ संकल्पना आहे.

सर्वच समाजात सर्व कालावधीत सामाजिक परिवर्तन होत असते. समाजात सातत्याने उलथापालथ होत असते. समाजात होणाऱ्या परिवर्तनास अनेक घटक जबाबदार असतात. हे घटक समाजांतर्गत तसेच समाजबाह्य अशा दोन्ही प्रकारचे असतात. हे घटक सामाजिक परिवर्तनाची दिशा आणि गती या दोन्ही पैलूंवर प्रभाव टाकीत असतात. या अध्ययन घटकात आपण सामाजिक परिवर्तनाचे महत्त्वपूर्ण घटक म्हणून १) भौतिक पर्यावरणातील घटक, २) लोकसंख्याशास्त्रीय घटक, ३) तंत्रविद्यात्मक घटक, ४) सांस्कृतिक घटक आणि ५) आर्थिक घटक अशा पाच प्रकारच्या घटकांची चर्चा केलेली आहे. याशिवाय आपण सामाजिक परिवर्तनास जबाबदार असणाऱ्या सामाजिक कायदे, सामाजिक नियोजन व शिक्षण या घटकांचाही ओझरता उल्लेख केलेला आहे. सामाजिक परिवर्तनाचे हे सर्व घटक परस्परांशी घनिष्टपणे निगडीत असतात. हे सर्व घटक एकत्रीतपणे सामाजिक परिवर्तन घडवून आणतात. सामाजिक संरचनेचे किंवा सामाजिक संस्थेचे विविध घटक ज्याप्रमाणे परस्पर निगडीत असतात त्याप्रमाणेच समाजाच्या एका क्षेत्रात घडून आलेल्या बदलांचा परिणाम म्हणून इतर क्षेत्रातही परिवर्तन होण्यास चालना मिळत असते.

समाजात निरंतरपणे सामाजिक परिवर्तन होत असते. तथापि समाजात होणारी सर्वच परिवर्तने समाजाकडून सहजासहजी स्वीकारली जात नाहीत. कांही ठराविक परिवर्तने स्वीकारली जातात. मात्र काही परिवर्तने नाकारली जातात. सामाजिक परिवर्तनाच्या मार्गात अनेक सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक घटक अडथळा आणीत असतात. या घटकांनाच सामाजिक परिवर्तनातील अडथळे असे म्हणतात.

या अध्ययन घटकात आपण सामाजिक परिवर्तनातील काही महत्त्वपूर्ण अडथळ्यांचा अभ्यास केलेला आहे. सामाजिक परिवर्तनास प्रतिबंध किंवा विरोध करणारे प्रमुख अडथळे पुढीलप्रमाणे आहेत - १) सांस्कृतिक परंपरा व भूतकाळाविषयीचा आदरभाव, २) दैववादीवृत्ती, ३) धर्मश्रद्धा, ४) अंधश्रद्धा, ५) स्वसमूहश्रेष्ठतावाद, ६) लोकमत, ७) सामाजिक अभिवृत्ती व बंधने, ८) बंदिस्त सामाजिक स्तरीकरणाची

व्यवस्था, ९) समाजातील दुफळी वा फाटाफूट, १०) राजकीय श्रेष्ठजन वा नेतृत्व, ११) नवीन शोधांचा अस्वीकार, १२) संस्कृतीशी विसंगती, १३) आर्थिक घटक, १४) स्थैर्याची अपेक्षा, १५) नवीन शोधाविषयीचे अज्ञान.

## ४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. हॅरि जॉन्सन : मूलभूत अर्थाने समाजसंरचनेतील बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय.

२. विविध व्याख्यांमध्ये प्रतिबिंबित झालेला सामाजिक परिवर्तनाचा अर्थ म्हणजे समाजाच्या संघटना, सामाजिक दर्जा व भूमिका, सामाजिक संस्था, समाजाच्या उपव्यवस्थांची संरचना व कार्ये, सामाजिक अभिवृत्ती व मूल्ये, सामाजिक संबंधाची प्रतिमाने इत्यादीतील परिवर्तन होय.

३. संस्कृतीच्या भौतिक किंवा अभौतिक घटकांतील बदल म्हणजे सांस्कृतिक परिवर्तन होय. याउलट समाजाच्या संरचनात्मक पैलूत होणारे परिवर्तन म्हणजे सामाजिक परिवर्तन होय.

४. एखाद्या पदार्थात साध्या, निम्न व एकजिनसी अवस्थेकडून संकीर्ण, उच्च व बहुजिनसी अवस्थेकडे क्रमाक्रमाने होणारे परिवर्तन म्हणजे उत्क्रांती होय.

५. समाजाच्या कोणत्याही क्षेत्रात किंवा व्यवस्थेत अल्पावधीत आमूलाग्र वा मूलभूत बदल घडून येणे म्हणजे क्रांती होय.

६. आदर्श मानल्या गेलेल्या ध्येयाच्या किंवा सामाजिक स्थितीच्या पूर्ततेच्या दिशेने होणाऱ्या परिवर्तनास प्रगती असे म्हणतात. प्रगती हा असा बदल असतो की, ज्यामुळे जास्तीत जास्त लोकांना जास्तीत जास्त सुखाची प्राप्ती होत असते.

७. विकास म्हणजे मानवी कल्याणाच्या दृष्टीने आर्थिक, सामाजिक सांस्कृतिक इत्यादी क्षेत्रात आवश्यक ते परिवर्तन घडून येणे होय.

८. उत्क्रांती ही नैसर्गिक, मंदगतीने व प्रदीर्घ कालावधीत घडून येणारी परिवर्तनाची प्रक्रिया आहे. याउलट क्रांती ही मानवनिर्मित, जलदगतीने व सापेक्षतः अल्पावधीत घडून येणारी परिवर्तनाची प्रक्रिया आहे.

९. समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, सामाजिक न्याय इत्यादी मूल्यांनुसार निरंतरपणे होणाऱ्या विकासास सामाजिक विकास असे म्हणतात. समाजातील भेदभाव, शोषण व दमन कमी होत जाणे व आर्थिक, सामाजिक व राजकीय संबंधातील अप्रमाणबद्धता (असमतोल) कमी होणे ही सामाजिक विकासाची वैशिष्टये आहेत.

१०. परस्परासंबंधित संस्था, अभिकरणे आणि सामाजिक प्रतिमाने तसेच समूहात प्रत्येक व्यक्तीने धारण केलेले दर्जे व भूमिका यांच्या विशिष्ट मांडणीस किंवा व्यवस्थेस उद्देशून सामाजिक संरचना ही संज्ञा वापरली जाते.

११. जगातील सर्वच समाजात निरंतरपणे सामाजिक परिवर्तन होत असल्याने सामाजिक परिवर्तनास सार्वत्रिक घटना मानली जाते.

१२. विविध घटकांचा संयुक्त प्रभाव पडून सामाजिक परिवर्तन घडत असते आणि कोणत्याही एका सिद्धांताच्या आधारे त्याचे पर्याप्त स्पष्टीकरण देता येत नाही. म्हणून सामाजिक परिवर्तनास ही बहुलघटकीय व संकीर्ण घटना ठरते.

१३. पंचवार्षिक योजनांमुळे भारतीय समाजात घडून आलेले परिवर्तन हे नियोजित परिवर्तनाचे उदाहरण आहे.

१४. एकदिशावर्ती परिवर्तनात एकाच दिशेने सरळ रेषेत परिवर्तन होते. याउलट अनेक दिशावर्ती परिवर्तनात वृक्षाचा फांद्या जसा अनेक दिशांना पसरतात तसे अनेक दिशेने परिवर्तन होते.

१५. समाजात होणाऱ्या चांगल्या किंवा वाईट, योग्य किंवा अयोग्य, अपेक्षित किंवा अनपेक्षित अशा सर्व प्रकारच्या परिवर्तनाचा निर्देश सामाजिक परिवर्तन या संकल्पनेद्वारे होत असल्याने ती तटस्थ संकल्पना मानली जाते.

१६. भौतिक पर्यावरणातील घटक, लोकसंख्याशास्त्रीय घटक, तंत्रविद्यात्मक धटक, सांस्कृतिक घटक, आर्थिक घटक, सामाजिक कायदे, सामाजिक नियोजन, शिक्षण इत्यादी सामाजिक परिवर्तनाचे घटक आहेत.

१७. महापूर, भूकंप, ज्वालामुखीचा उद्रेक, दुष्काळ, प्रदूषण, नैसर्गिक साधणनसंपत्तीची टंचाई इत्यादी भौतिक पर्यावरणातील घटक समाजात परिवर्तन घडवून आणतात.

१८. लोकसंख्येतील वाढ व घट, लिंगप्रमाण, जन्मप्रमाण, मृत्यूप्रमाण, कमावत्या लोकांचे प्रमाण, युवा लोकांचे प्रमाण, स्थलांतर इ. लोकसंख्याशास्त्रीय घटक सामाजिक व्यवस्थांवर प्रभाव टाकीत असतात.

१९. व्यापक अर्थाने तंत्रज्ञान म्हणजे शास्त्रीय ज्ञानाचे व्यावहारिक हेतूपूर्तीसाठी केलेले उपयोजन होय. तंत्रज्ञानात ज्ञानाचे उपयोजन, त्या उपयोजनांसाठी वापरली जाणारी पद्धती व व्यावहारिक समस्या या तीन घटकांचा समावेश होतो.

२०. बाष्पयंत्र, मुद्रणकला, दूरध्वनी, आकाशवाणी, दूरदर्शन, विमान, मोबाईल, संगणक इत्यादी शास्त्रीय शोधाची उदाहरणे आहेत, ज्यांच्यामुळे मानवाच्या सामाजिक जीवनात मोठ्या प्रमाणावर बदल होण्यास प्रारंभ झाला आहे.

२१. विल्यम एफ. ऑग्बर्न यांनी सांस्कृतिक पश्चायनाचा सिद्धांत मांडला.

२२. कार्ल मार्क्सच्या मते जेव्हा सतत विकसीत होणाऱ्या उत्पादन साधनांमध्ये आणि उत्पादन-संबंधामध्ये (वर्गसंबंधामध्ये) विरोध निर्माण होतो तेव्हा क्रांतिकारक परिवर्तन घडते.

२३. पारंपारिक सामाजिक संस्था, अनिष्ट सामाजिक प्रथा, आणि समाजातील सदस्यांच्या अभिवृत्ती, मूल्ये व मते इत्यादी पारंपारिक पैलूंमध्ये सामाजिक कायदे, सामाजिक नियोजन व शिक्षण हे घटक परिवर्तन घडवून आणतात.

२४) हुंडाबंदीचा कायदा असूनही भारतात हुंडाप्रथा पाळली जाते हे परंपरा सामाजिक परिवर्तनात कसा अडथळा आणतात याचे एक उदाहरण आहे.

२५) विल्यम सम्नरच्या मते स्वतःच्या समूहास सर्व गोष्टींच्या केंद्रस्थानी ठेवून इतर सर्व गोष्टींचे मापन व मूल्यांकन आपल्या समूहाच्या संदर्भात करण्याचा दृष्टिकोन म्हणजे स्वसमूहश्रेष्ठतावाद होय.

२६) बंदिस्त सामाजिक स्तरीकरणाचा प्रकार असलेली जातिव्यवस्था ही प्रामुख्याने कनिष्ठ जातीतील व्यक्तींना उर्ध्वगामी सामाजिक गतिशीलतेची संधी देत नाही. अशाप्रकारे ती सामाजिक परिवर्तनातील मोठा अडथळा ठरते.

२७) मुले ही ईश्वरी देणगी आहेत अशा अंधश्रद्धेपोटी कांही लोक संतती नियमनाची साधने वापरत नाहीत. अशा अंधश्रद्धा ह्या सामाजिक परिवर्तनास प्रतिबंध करतात.

२८) सामाजिक परिवर्तनातील पाच महत्त्वपूर्ण अडथळे पुढीलप्रमाणे आहेत –

१) सांस्कृतिक परंपरा व भूतकाळाविषयी आदरभाव, २) दैववादीवृत्ती, ३) धर्मश्रद्धा, ४) अंधश्रद्धा, ५) स्वसमूह श्रेष्ठतावाद.

## ४.५ सरावासाठी प्रश्न

१. सामाजिक परिवर्तन अर्थ आणि वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२. सामाजिक परिवर्तनाचे घटक चर्चा करा

३. सामाजिक परिवर्तनातील अडथळे विशद करा.

४. टिपा लिहा

१. उत्क्रांती २. प्रगती ३. क्रांती ४. विकास

५. सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये

## ४.६ अधिक वाचनासाठी पुस्तके :


- डॉ. संगवे विलास – समाजशास्त्र.
- डॉ. भांडारकर पु. ल. आणि वैद्य नी. स. – समाजशास्त्रीय सिद्धांत.
- डॉ. साळुंखे सर्जेराव – समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना.
- प्रा. खंडागळे चंद्रकांत – भारतीय समाज.


❑❑❑